म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १४३९

# न. वि. गाडगीळ

RLFBK-0012358

৩৩৮৫০

১৫।৭।৫৫

# आधुनिक
# राज्य
# आणि
# स्वातंत्र्य

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्र. ३३८२८ दि: १-१-९५
क्रमांक ~~१२८८५~~ नों: दि: ~~१-१-९५~~
१२८८६

# आ धु नि क

# रा ज्य

# आ णि

# स्वा तं त्र्य

न. वि. गाडगीळ

९२३५
REFBK-0012358

पॉप्युलर
प्रकाशन
मुंबई

© न. वि. गाडगीळ

पहिली आवृत्ति
मे १९६२
वैशाख १८८४

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २ BR

प्रकाशक : ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ Cताडदेव रोड, मुंबई ३४ WB I

# यस्येयम् जन्मकुंडली

प्रस्तुत ग्रंथाची जन्मकुंडली सांगणें आवश्यक आहे. १९६० च्या एप्रिलमध्यें गुरुकुल कांगडी विश्वविद्यालयाचा हीरक-महोत्सव साजरा व्हावयाचा होता. त्या निमित्तानें अनेक समारंभ व्हावयाचे होते व त्यांपैकीं एकासाठीं निमंत्रण आलें होतें. मुख्य दीक्षान्त समारंभ राष्ट्रपति यांचे हस्तें व्हावयाचा होता व त्यांचें भाषण व्हावयाचें होतें. समारंभापूर्वीं सुमारें पंधरा दिवस त्यांची प्रकृति नादुरुस्त झाली व त्यांनीं, भेटीस गेलों असतां, असें सुचविलें कीं, दीक्षान्त भाषण मीं करावें व मीं तें मान्य केलें.

अशा महत्त्वाच्या प्रसंगीं करावयाचें दीक्षान्त भाषण म्हणजे चार घरीं भीक मागून सादर करावयाचा सत्यनारायण नव्हे, याची जाणीव उत्पन्न झाली. नित्यांतला विषय घेऊन भाषण तयार करावें हेंहि पटेना, म्हणून जें थोडें तात्त्विक असेल व जें तत्कालीन परिस्थितीला प्रस्तुत असेल असें तें असावें असा निश्चय केला व त्या दृष्टीनें भाषण तयार केलें व त्यांत स्वातंत्र्य, समता, कायदा व लोकशाही ह्या चार गोष्टींचा विचार केला. सदहू भाषण हिंदींत झालें व अनेकांच्या वाचनांत आलें आणि अनेकांनीं प्रशंसापर उद्गारहि काढले, त्यामुळें असें वाटूं लागलें कीं, याच भाषणांतील विचार अधिक व्यापक प्रमाणावर मांडावेत व लहानसा ग्रंथ लिहावा. त्याप्रमाणें विचार कायम केला. अवश्य ते ग्रंथ एकत्र केले व सहा महिन्यांत हा ग्रंथ पुरा करून मराठी वाचकांस सादर करीत आहें.

राज्यविषयक कल्पनांचा विचारशः विस्तार; ‘ राज्यशास्त्र विचार ’ या ग्रंथांत केला आहे. त्याचप्रमाणें स्वातंत्र्य, समता व लोकशाही यांचाहि विचार ‘ राज्य-व्यवहार-शास्त्र ’ व ‘ राज्य-कारभार-शास्त्र ’ या ग्रंथांत केलेला असून ‘ विधिशास्त्र-विचार ’ यांत कायद्याच्या तत्त्वज्ञानाचा व व्यवहाराचा विचार केला आहे. ‘ राज्योपनिषद् ’ या छोट्याशा पुस्तिकेंत तेच विचार संक्षेपानें मांडले आहेत. तथापि या ग्रंथांत जे विचार मांडले आहेत ते राजकारणांतील दार्शनिक दृष्टीनें मांडले आहेत. कायदा, स्वातंत्र्य व समता यासंबंधी विचार मांडतांना अमूक एक कायदा अमूक एक स्वातंत्र्य अगर अमूक एका क्षेत्रांतील समता याचा विचार आला आहे हें खरें, तथापि अधिक विचार या सर्व कल्पनांमागें असणारे तात्त्विक सिद्धांत व दार्शनिक दृष्टिकोन याबाबत आहे. लोकशाहीबद्दलचा विचारहि त्याच दृष्टीनें केला आहे. स्वातंत्र्य, समता ज्या गोष्टी मनुष्याचें जीवन सुखी व संपूर्ण करतात, त्या जास्तींत जास्त प्रमाणांत व जास्तींत जास्त लोकांना उपलब्ध व्हावयाच्या तर लोकशाही राज्यव्यवस्थेंतच. आणि लोकशाही ही कायद्याचे द्वारा कार्यान्वित होत असते व त्या दृष्टीनें कायद्याचें महत्त्व काय व त्याच्या आज्ञापालनाची आवश्यकता व मर्यादा यांचाहि विचार केला पाहिजे. स्वातंत्र्य हें गेल्या दीडशें वर्षांत वाढलें आहे, त्याचा वराच प्रचार झाला आहे व आज जरी अनेक प्रदेशांतून व राज्यांतून तें सुस्थापित दिसत असलें तरी ज्याप्रमाणें वेदरत ब्राह्मणानें दररोज सूर्याला अर्घ्य

दिलें पाहिजे त्याचप्रमाणें कल्याणेच्छु म्हणजे स्वातंत्र्येच्छु प्रत्येक नागरिकानें दररोज जागृतीची व अधिकार-संरक्षणाची संध्या म्हटलीच पाहिजे. 'जो जागेल तो जगेल' व जो जागृत राहील तोच स्वतंत्र राहील हेंहि तितकेंच खरें आहे. स्वातंत्र्य व अधिकार यांचे संबंध चढउतार होणाऱ्या समुद्राचे व भूमीचे जे संबंध आहेत त्याप्रमाणें आहेत. संधि मिळतांच अधिकार अगर सत्ता स्वातंत्र्यावर आक्रमण करते म्हणून सीमेवरील पाहारा सतत जागृत असला पाहिजे. आजच्या जगांत जागृतीची आवश्यकता किती आहे हें सांगण्याचें कारण नाहीं, स्वातंत्र्य हें अर्थपूर्ण करणाऱ्या दृष्टीनें व्यक्तिमात्राला आर्थिक क्षेत्रांत संपन्नता, सामाजिक क्षेत्रांत न्याय व समता, आणि जीवनांत पूर्णतेचा आनंद आला पाहिजे हाच सिद्धान्त विविध दृष्टिकोनांतून या ग्रंथांत मांडण्याचा यथाशक्ति प्रयत्न केला आहे. यांत कांहीं अलौकिक अगर नवीन कांहीं सांगितलेलें नाहीं, अनेक विचारवंतांनीं या क्षेत्रांत सांगितलेलें आहे त्यांच्याच विचारांचा मागोवा घेत घेत व त्यांत स्वतःचे कांहीं विचार घालून स्वतःच्या अनुभवाशीं पडताळून प्रतिपादन केलें आहे. मराठी वाचकांना तें पसंत पडेल अशी आशा करतों.

कार्तिक शुद्ध प्रतिपदा २०१७ — **न. वि. गाडगीळ**

दिनांक २१-१०-६०

# अ नु क्र म णि का


१ स्वातंत्र्य : कांहीं स्थूल विचार
१

२ विचार-स्वातंत्र्याचें विविध स्वरूप
५१

३ स्वातंत्र्य व सामाजिक मर्यादा
१४४

४ स्वातंत्र्य, समता व कायदा
२१९

५ एक दृष्टिक्षेप
२७१

स्थळप्रत.
३३४८० वि: १०-५
ग्रंथ संग्रहालय ठाणे
९२३४६

# स्वातंत्र्य : कांहीं स्थूल विचार

आधुनिक जगांत जीं प्रथम श्रेणीचीं राष्ट्रें मानलीं जातात त्यांत भारताची गणना करण्यांत येते. १९४७ च्या ऑगस्टमध्यें भारत स्वतंत्र झाला व घटना-समितिद्वारा भारताची घटना तयार करण्यांत आली व २६ जानेवारी १९५० रोजीं घटनेचा अंमल सुरू होऊन भारत हें प्रभुत्वपूर्ण लोकशाही प्रजातंत्र राज्य या स्वरूपांत अस्तित्वांत आलें. घटना समितीनें घटना पूर्ण करून नोव्हेंबर १९४९ मध्यें भारतांतील जनतेतर्फें सदरहू घटनेचा स्वीकार केला. भारताची घटना अथवा घटना–कायदा, हा मागील अनुभव जमेला धरून, विद्यमान परिस्थिति लक्षांत घेऊन, उज्ज्वल भविष्यासाठीं, इष्ट तो विवेक करून, रचण्यांत आला. कुठल्याहि समाजांत भविष्य-काळाचा साधारणपणें विचार करूनच विद्यमान प्रयत्नांची दिशा आंखण्यांत येते. समाज सतत बदलत असतो. समाजांतील नैतिक मूल्यें बदलत असतात. अपरिवर्तनीय असें कांहींहि सामाजिक विचारक्षेत्रांत असूं शकत नाहीं. कितीहि दक्षता घेतली तरी कुठलाहि कायदा सर्व परिस्थितीला संवादी व संपूर्ण राहील असें अनुभवाला येत नाहीं आणि म्हणून परिस्थितीप्रमाणें सामान्य कायदा व घटनाकायदासुद्धां बदलणें इष्ट असतें. तथापि, ज्याप्रमाणें वास्तूच्या बाबतींत सामान्य दुरुस्त्या व मौलिक दुरुस्त्या असा आपण फरक करतों, त्याचप्रमाणें लोकव्यवहार लक्षांत घेऊन कायद्यांत सामान्य दुरुस्त्या करणें हा एक भाग व मौलिक दुरुस्त्या करणें हा दुसरा भाग. घराला रंग देणें, पडझड दुरुस्त करणें, दरवाजा अगर खिडक्या यांत कमीजास्त करणें हा एक भाग. पण घराचा आकार बदलणें त्याचप्रमाणें त्याचें जोतें तोडून कमीजास्त करणें हा भाग निराळा. घराला ज्याप्रमाणें पाया व जोतें असतें व त्यांवर सर्व इमारत अवलंबून असते त्याप्रमाणें समाजाचे अगर राज्याचे कांहीं पायावजा अगर मौलिक सिद्धान्त असतात व त्यांचा बदल करणें म्हणजे एक प्रकारें क्रान्तीच असते.

१९५० मध्यें भारताची घटना अंमलांत आली व त्याप्रमाणें राज्यकारभार व त्याच्याद्वारें लोकव्यवहाराचें नियमन व नियंत्रण व मार्गदर्शन चालूं झालें. दोन साधारण निवडणुकाहि होऊन गेल्या. गेल्या दहा वर्षांत घटनेमध्यें कांहीं महत्त्वाच्या

दुरुस्त्या पण झाल्या. सामान्यपणें जीं कांहीं ध्येयें–सामाजिक व आर्थिक–भारताच्या संविधानानें स्वीकारलीं आहेत त्यांना अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें घटनेचा उपयोग करावयाचा असतो. लोकांच्या आशा व आकांक्षा लक्षांत घेऊन हें करावयाचें असतें. भारताचें राज्य लोकशाही प्रजातंत्र स्वरूपाचें असल्यानें नागरिकाला मौलिक स्वातंत्र्यें घटनेनें दिलीं आहेत व प्रत्येक नागरिकाला आपल्याला काय वाटतें हें योग्य मर्यादेंत सांगण्याचा अधिकार आहे. मुद्रण–स्वातंत्र्य, भाषण–स्वातंत्र्य व संघ–स्वातंत्र्य हीं सर्व त्याला घटनेनें बहाल केलीं आहेत, आणि त्यांचा त्यानें उपयोग केल्यास योग्य तेंच तो करीत आहे असें मानलें पाहिजे. त्याला जें पसंत नाहीं तें सांगण्याचा त्याला पूर्ण हक्क आहे. तें सांगणें तो व्यक्तिगत रीतीनें करील अगर संघ किंवा संस्थे-मार्फत करील. कलियुगांत शक्ति ही व्यक्तींत नसून संघांत आहे असें सूत्र आहे. रस्त्यानें एकटादुकटा ओरडत गेला तर लोक वेडा मानतात, पण जमावानें व्यक्ति ओरडत गेल्या तर त्याला मोर्चा; अगर निदर्शन असें म्हणतात. मौलिक हक्क यांचा उद्देशच असा आहे कीं, व्यक्तीला त्याच्या विकासासाठीं अवश्य तें, योग्य मर्यादा सांभाळून, करण्याचा हक्क आहे. राज्यांत जें चालतें त्यावर व्यक्तीला केवळ निवडणुकीच्या वेळीं अभिप्राय व्यक्त करण्याचा अधिकार आहे असें नव्हे, तर तो अधिकार त्याला कायमचाच आहे. किंबहुना भाषण–स्वातंत्र्य व संघ–स्वातंत्र्य हें श्वासोच्छ्वासाइतकें महत्त्वाचें त्याच्या जीवनाला वाटत असतें. राज्याचा कायदा अगर कारभार कागदावर कांहीं जरी असला तरी त्याबद्दलचा अनुभव व्यक्तीला जो येईल, तें त्याचें स्वरूप म्हणून व्यक्तीला, तो अनुभव सांगण्याचा, समाजाच्या चावडींत बोलून दाखविण्याचा अधिकार असला पाहिजे; आणि सर्वसामान्य जनांचा अनुभव व अभिप्राय लक्षांत घेऊन, सारासार विचार करून, शासनानें राज्यकारभार चालविला पाहिजे हें एक लोकशाही राज्यव्यव-स्थेचें महान् तत्त्व आहे. या दृष्टीनें गेल्या दहा वर्षांत जें घडलें आहे तें लक्षांत घेतलें पाहिजे. त्याजबरोबर ज्या मौलिक पायावर व कल्पनांवर राज्य व लोकशाही राज्य स्थापन झालेलें आहे त्यांचाहि विचार सतत डोळ्यांपुढें ठेवला पाहिजे. आज भारता-मध्यें अनेक लोकांना राज्य जें कांहीं करीत आहे त्यामुळें आपलें स्वातंत्र्य कमी झालें आहे असें वाटतें. कांहीं लोकांना जी समता लोकशाहींत आहे ती पूर्णपणें भारताच्या लोकशाहींत अनुभवाला येत नाहीं असें वाटत आहे आणि जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणें उपाय सुचवीत आहे. अशा वेळीं राज्य व तें ज्या मौलिक सिद्धान्तांवर प्रस्थापित झालें आहे त्या पायाभूत सिद्धान्तांचा विचार करणें आवश्यक आहे आणि या दृष्टीनें कांहीं विचार प्रस्तुत ग्रंथांत करावयाचें योजिलें आहे.

भारत हें एक प्रभुत्वपूर्ण लोकशाही प्रजातंत्रस्वरूपी राज्य आहे हें वर सांगितलें आहे. भारत हें जसें स्वतंत्र राष्ट्र आहे तसेंच भारतांतील लोक हे स्वतंत्र लोक आहेत हें उघड आहे. राष्ट्राच्या दृष्टीनें स्वतंत्र राष्ट्र याचा अर्थ जें राष्ट्र अन्य राष्ट्राच्या आज्ञा मानत

नाहीं अगर त्या मानण्याची नैतिक अगर वैध जबाबदारी त्याच्यावर नाहीं, हा आहे. प्रभुत्वपूर्ण राज्य याचा अर्थ तें राज्य अन्याच्या आज्ञा मानत नाहीं व त्याच्या क्षेत्रांत त्याच्या आज्ञा कोणी उल्लंघन केल्यास त्याला दंड निश्चित, हा आहे. या दृष्टीनें विचार करतांना आधुनिक राज्यांत स्वातंत्र्य याचा अर्थ काय व त्याला काय मर्यादा आहे हा विचार करणें इष्ट आहे. स्वातंत्र्य याचा अर्थ स्वाभाविकपणें मर्यादा नसणें, बंधन नसणें, असा आहे. व्यक्तीला त्याच्या सुखासमाधानासाठीं जी परिस्थिति असावी असें त्याला वाटतें ती परिस्थिति म्हणजे स्वातंत्र्य असें तो मानतो. त्यावर कांहीं निर्बंध अगर मर्यादा आल्यास त्याच्या सुखांत न्यूनता येते. साहजिकपणें त्याला आपल्या स्वातंत्र्यावर आक्रमण झालें असें वाटतें. व्यक्तीला स्वतःच्या सुखाला आवश्यक वाटणारी जी परिस्थिति तो ज्या समाजांत अगर राज्यांत राहात आहे त्याच्या हेतूशीं व आदर्शांशीं विसंगत असतां कामा नये हें अमान्य होणार नाहीं. ही सुसंगति ठेवावयाची याचा अर्थ राज्याच्या शक्तीलासुद्धां नियमन व बंधन असलें पाहिजे असा होतो. व्यक्ति व राज्य यांच्यांतील संबंध, व्यक्तीचें स्वातंत्र्य व समाजाची अगर राज्याची सुरक्षा या संदर्भांत समजले पाहिजेत. स्वातंत्र्य याचा अर्थ बंधनें नसणें हें मर्यादित अर्थानें खरें आहे; पण त्याजबरोबर व्यक्तीच्या विकासाच्या दृष्टीनें त्या स्वातंत्र्याच्या कल्पनेंत व वस्तुस्थितींतहि प्रगतीला वाव असला पाहिजे. जर व्यक्तीच्या व्यक्तिविकासाला बाह्यमर्यादा असतील, तर व्यक्तीचें स्वातंत्र्य पूर्णांशानें नाहीं असें होतें. व्यक्तीवर कोणी स्वातंत्र्य लादूं शकत नाहीं. पण व्यक्तीच्या स्वातंत्र्यावरहि मर्यादेपलिकडे कोणी बंधन घालूं शकत नाहीं. मर्यादा मानणें अगर सर्वस्वीं पालन करणें याचा अर्थ स्वातंत्र्य नव्हे. त्याचप्रमाणें कुठलाहि कायदा अगर मर्यादा न मानणें याचाहि अर्थ स्वातंत्र्य नव्हे. मर्यादा जर व्यक्तीच्या विकासाला पूर्ण वाव देत असतील व विफलतेची भावना उत्पन्न करणाऱ्या त्या नसतील, तर व्यक्तीला स्वातंत्र्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. याच्या उलट जें व्यक्तीला पटत नाहीं त्याप्रमाणें करण्यास अगर वागण्यास भाग पाडलें गेलें तर व्यक्तीला स्वातंत्र्य नाहीं असें म्हणणें अयोग्य ठरणार नाहीं. समाजाचें हित व सुरक्षा लक्षांत घेतां व्यक्तीला अनिर्बंध स्वातंत्र्य देणें कोणीहि इष्ट अगर योग्य मानणार नाहीं व समाजाच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीनें कांहीं क्षेत्रांत व कांहीं गोष्टींत राज्यानें सक्ति केली तर त्यायोगें स्वातंत्र्य मर्यादित झालें असें कोणाला म्हणतां येणार नाहीं. देवी टोंचून घेण्याची सक्ति केल्यास, प्राथमिक शिक्षणाची सक्ति केल्यास, यात्रेच्या प्रसंगीं टोंचून घेण्याची सक्ति केल्यास, व्यक्तीचें स्वातंत्र्य कमी झालें असें होत नाहीं. पण जेथें मर्यादेचा संबंध सार्वजनिक हित अगर संरक्षणाशीं नसेल व ज्या ठिकाणीं मर्यादा अगर नियमन होत असेल ; व ज्याच्यायोगें व्यक्तीवर त्याच्या इच्छेविरुद्ध कांहीं करण्यास भाग पाडलें जात असेल तर त्या मर्यादेनें स्वातंत्र्यास न्यूनता आली असें म्हटल्यास तें क्षम्य होईल.

स्वातंत्र्यावरील निर्बंधाचा अगर मर्यादांचा आपण जेव्हां विचार करतों त्यावेळीं कोणी तरी मर्यादा घालणारी अशी सत्ता असते हें गृहीत धरलेलें असतें. ज्या ठिकाणीं ही अमर्याद सत्ता मर्यादित लोकांच्या अगर मर्यादित व्यक्तींच्या हातांत असेल त्या ठिकाणीं व्यक्तींना स्वातंत्र्याचा उपभोग योग्य तऱ्हेनें घेतां येईल, हें कठीण असतें. अमर्याद सत्ता हातीं असल्यानंतर विवेकानें तिचा उपयोग केला जातो असा इतिहासाचा दाखला नाहीं. उलट अमर्याद सत्ता अमर्याद अहंकार उत्पन्न करते व जें आपण केलें तेंच बरोबर, आपण म्हणूं तेंच सत्य व आपण बांधूं तेंच तोरण अशी परिस्थिति मग उत्पन्न होते. आपण जें करीत आहोंत तें लोकहितासाठीं, अशी सत्ता वापरणाऱ्यांची श्रद्धा असते व आपण जर सत्तेवर नसूं तर राष्ट्र संकटांत सांपडेल, राष्ट्राची प्रगति होणार नाहीं, असेंहि त्यांना वाटतें. आणि म्हणून जनहितार्थ आपण निरंतर सत्ताधीश राहणें ही राष्ट्राची गरज ते मानतात. हा इतिहासाचा अनुभव लक्षांत घेतां स्वातंत्र्याचें रक्षण करावयाचें असल्यास सत्तेवर नियंत्रण असलें पाहिजे. किंबहुना, स्वातंत्र्याचा उपभोग सत्तेवर असला तरच शक्य आहे. इतकेंच नव्हे, तर स्वातंत्र्याच्या इष्ट उपभोगासाठीं सत्ताहि निश्चितपणें कुणाला तरी जबाबदार असली पाहिजे. त्याचप्रमाणें जर समाजांत निर्भयता नसेल तर समाजांत स्वातंत्र्य टिकणार नाहीं. सत्तेच्या आज्ञा पाळाव्यात हा सिद्धान्त जसा मौलिक आहे, त्याचप्रमाणें सत्तेच्या गैर आज्ञांना विरोध करणें हें स्वतंत्र नागरिकाचें कर्तव्य, हाहि एक मौलिक सिद्धान्त आहे. स्वातंत्र्य याचा अर्थ बंधन नसणें असा सामान्यतः आहे हें वर सांगितलेंच आहे. पण अजिबात बंधन नसणें म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्य हें खरें नाहीं. ज्या समाजांत कांहींहि व कसलेंहि बंधन, नैतिक अगर वैध, व्यक्तीवर नसेल तर तो समाज राहणार नाहीं. तेथें शांतता व व्यवस्थाहि राहणार नाहीं. जें आपल्याला पसंत नसेल तसें आपण इतरांच्या बाबतींत करूं नये याची जाणीव जर व्यक्तीमध्यें नसेल तर समाजाची रचना होणार नाहीं; अगर झाली असल्यास विस्कळीत होईल. 'आत्मनः प्रतिकुलानि परेषाम् न समाचरेत्' हा समाजधारणेचा मौलिक सिद्धान्त आहे. समाजामध्यें अनेक व्यक्ति असतात. प्रत्येकाची बुद्धि निरनिराळी, प्रत्येकाच्या आशाआकांक्षा निरनिराळ्या आणि त्यामुळें समाजाच्या धारणेसाठीं नियमन व नियंत्रण आवश्यक होतें आणि असें नियमन व नियंत्रण असेल तरच समाजामध्यें व्यवस्था व शांति व त्यामुळेंच व्यक्तीला सुख लाभतें. हें सर्व लक्षांत घेतां समाजाच्या व व्यक्तीच्याहि हितासाठीं व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणें आवश्यक असतें. अनिर्बंध अगर निरपेक्ष स्वातंत्र्य कुठल्याहि मानवी समाजांत व्यक्तीला असूं शकत नाहीं. जें इष्ट असतें तें हें कीं, समाजाच्या हिताची व्यवस्था पाहणारी यंत्रणा म्हणजे शासन व व्यक्ति यांच्या आदर्शांत व आकांक्षांत समतोल असला पाहिजे. ज्या मर्यादा सत्ता घालील त्या अशा असाव्यात कीं, त्यांत राहून व्यक्तीला आपल्या व्यक्तिविकासास पूर्ण संधी, योग्य संधी मिळाली पाहिजे.

स्वातंत्र्य म्हणजे बंधन नसणें हें खरें, तथापि यांतील सापेक्षता ओळखली पाहिजे. अजिबात बंधन नसणें म्हणजे स्वातंत्र्य हें खरें नव्हे. कुठलाहि व्यवसाय करावा, कुठेंहि नोकरी करावी याबाबत बंधन नाहीं म्हणून ती व्यक्ति स्वतंत्र; अगर त्या समाजांत संपूर्ण स्वातंत्र्य नांदत आहे असें नव्हे. नोकरींत शाश्वती नाहीं, धंद्यांत प्राप्ति नाहीं, बेकारीचा राक्षस डोळ्यांपुढें उभा आहे, या परिस्थितींत व्यक्ति स्वतंत्र आहे हें म्हणणें औपचारिक दृष्ट्या खरें असलें तरी वस्तुतः तें खरें नाहीं. स्वातंत्र्य याचा अर्थ केवळ लौकिक स्वातंत्र्य एवढाच नसून त्याचा संबंध व्यक्तीच्या मानसिक परिस्थितीशीं पण आहे. जीवंत राहण्यासाठीं वाटेल त्या शर्ती पत्करून नोकरी करणें अगर व्यवसाय करीत असतांना अनंत विवंचना मनाला सतावीत असतांना त्या व्यक्तीचें स्वातंत्र्य यथार्थपणें त्याला उपभोगतां येत नाहीं. आयुर्वेदांत स्वास्थ्याची व्याख्या अशी केली आहे कीं; शरीर, मन व आत्मा प्रसन्न असतील तर स्वास्थ्य. त्याचप्रमाणें शरीर व मन या दोहोंना स्वातंत्र्याचा अनुभव असेल तरच स्वातंत्र्य. मन चिंतेनें ग्रासलें गेलें आहे. दुपारची वेळ कशी भागवावयाची याची चिंता आहे या स्थितींत सगळीं मौलिक स्वातंत्र्यें व मतदानाचा हक्क असूनसुद्धां स्वातंत्र्य आहे हें म्हणणें केवळ औपचारिक ठरतें. त्याचबरोबर आर्थिक चिंता नाहीं म्हणून स्वातंत्र्य आहे हेंहि खरें नाहीं. गुलामांना खाण्यापिण्याच्या दृष्टीनें चांगलें वागविलें तथापि ते गुलामच. स्वर्गसुख अगर स्वातंत्र्य असा विकल्प आला तर व्यक्तींना निर्णय करणें अवघड असतें आणि स्वातंत्र्याची ओढ असूनसुद्धां उद्यांची काळजी दूर होण्यासाठीं समाजांतील बहुसंख्याक दरिद्री स्वातंत्र्यापेक्षां आर्थिक सुस्थितीकडे झुकतात म्हणून स्वातंत्र्य हें आर्थिक सुस्थितीच्या अभावीं अर्थशून्य ठरतें. स्वातंत्र्य आहे एवढ्यानें स्वातंत्र्याचीं जीं ध्येयें अगर स्वातंत्र्यानें जें साध्य व्हावयाचें तें साध्य होत नाहीं. स्वातंत्र्याच्या पूर्णतेसाठीं आर्थिक सुस्थिति आवश्यक आहे. तथापि आर्थिक सुस्थिति म्हणजे स्वातंत्र्य हाहि सिद्धान्त बरोबर नाहीं. ज्या जगांत आपण वावरत आहोंत त्या जगांत आर्थिक सुस्थिति व स्वातंत्र्य यांत विरोध दिसत आहे. हा विरोध कमी व्हावा असे प्रयत्न चालले आहेत हें मान्य. कांहीं राष्ट्रांतून आर्थिक सुस्थिति आहे पण व्यक्तीचें जीवन इतकें सांचेबंद झालें आहे कीं व्यक्तीचें मन विचार करण्यास जवळ जवळ विसरलेलें आहे. तयार कपड्याप्रमाणें तयार विचार व तयार मतें लोकांना दिलीं जात आहेत. किंबहुना त्यांना तीं घ्यावीं लागत आहेत. म्हणून मनाचें स्वातंत्र्य हें अधिक महत्त्वाचें आहे. असलेलें अगर मिळालेलें स्वातंत्र्य वापरण्याइतकी मनाची तयारी असली पाहिजे आणि ही तयारी क्षणांत होत नसते. मनाची ही प्रवृत्ति व्यापक शिक्षणानें उत्पन्न होते आणि त्या दृष्टीनें विचार करतां व्यक्तिमात्राला जास्तींत जास्त शिक्षण मिळण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे. ज्ञान ही शक्ति आहे आणि ज्याचें ज्ञान अधिक तो अधिक प्रभावी हें उघड आहे. ज्ञान मिळविण्याची संधी नाकारणें म्हणजे स्वातंत्र्य नाकारणें असें नव्हे, तर सत्ता नाकारणें,

व्यक्तीला समर्थ होऊं न देणें असा त्याचा अर्थ होतो. कोणी शिक्षण देणें याचा अर्थ स्वातंत्र्य कमी करणें असा करील तर तें चुकीचें आहे. व्यक्तीला आपल्या स्वातंत्र्याचा अधिक उपयोग करण्यासाठीं ज्ञानाची आवश्यकता आहे. तें त्याला मिळालें पाहिजे व तेथें सक्ति झाल्यास ती वस्तुतः सक्ति नसून त्या व्यक्तीला शक्तिदान आहे. ज्ञानानें आलेला अनुभव सजवून व संकलित करून व्यक्ति समाजापुढें मांडते आणि हें मांडण्यामध्यें त्याचें मानसिक स्वातंत्र्य विकसित होतें आणि तसें झालें म्हणजे व्यक्तीच्या स्वातंत्र्याला पूर्णता येते.

स्वातंत्र्याला ज्ञानाच्या अभावीं अपूर्णता येते. स्वातंत्र्याचा खरा उपभोग घेण्यासाठीं मन हें शिक्षित व सुसंस्कृत असलें पाहिजे. त्याचप्रमाणें ज्या समाजांत व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगावयाचें आहे त्या समाजामध्यें विषमतेचें वातावरण शक्य तितकें कमी असेल, तरच स्वातंत्र्याचा यथार्थ उपभोग शक्य असतो. समाजामध्यें मूठभर माणसांना खास सवलती, खास अधिकार, या स्थितींत सर्वसामान्य नागरिकाला स्वातंत्र्य हें एक थट्टेचा विषय ठरतें. त्याचप्रमाणें कुठल्या का दृष्टीनें होईना, मग ती दृष्टि धर्मविषयक असो, जातिविषयक असो, जन्मविषयक असो; बहुसंख्याक हे जर अल्पसंख्याकांवर जुलूम करीत असतील, तर नागरिकाचें स्वातंत्र्य संशयास्पद असतें व त्याच्या स्वातंत्र्याला चीड आणणारी मर्यादा बसते. स्वातंत्र्य नांदावयाचें तर समाजामध्यें समभावाचें वातावरण असलें पाहिजे. स्वातंत्र्य या कल्पनेंत सत्ताधीशांच्या जुलमापासून सोडवणूक हा भाव आहे यांत शंका नाहीं. जे सत्ताधीश असतात—मग सत्ता वापरणारी व्यक्ति असो, वंश असो; अगर वर्ग असो–ते आपली सत्ता अशी वापरतात कीं त्यांच्या आज्ञेप्रमाणें व आदेशाबरहुकूम सर्वांनीं वागणें प्राप्त होतें; न वागेल तर तो वंचित होतो. भरडला गेला नाहीं तरी उपेक्षित होतो आणि म्हणून स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं सत्तेला मर्यादा घालणें अवश्य असतें. म्हणून स्वातंत्र्यरक्षणासाठींच कांहीं मौलिक अधिकार व्यक्तीला दिले जातात व त्याबाबत राज्य ग्वाही देतें. जगांत सर्वत्र हाच अनुभव आहे कीं, अनियंत्रित सत्ता ही स्वातंत्र्याचा निष्ठुर शत्रु ठरते. सत्तेवर नियंत्रण नसल्यानें कुठल्याहि व्यक्तीचें स्वातंत्र्य निश्चित नसतें आणि त्यामुळें व्यक्तींतील जें श्रेष्ठ व उदात्त असतें तें आंतलें आंत जिरतें व समाज एका चांगल्या गोष्टीला अंतरतो. अनियंत्रित सत्ता असतांना जेव्हां व्यक्तीला त्याच्या कर्तृत्वाला वाव मिळतो, तेव्हां तें कर्तृत्व सर्व समाजाच्या प्रगतीसाठीं न होतां जे सुखवस्तु आहेत, संपन्न आहेत, आहेरे आहेत त्यांच्यासाठीं उपयुक्त ठरतें. सत्ता वापरणारे ज्या सामाजिक स्तरांतून येतात, ज्या सामाजिक वर्गांतून येतात त्यांच्याचसाठीं सत्तेचा वापर होतो. मतदानाचा हक्क ज्या वर्गाला असेल त्याच वर्गाचें हित जोपासलें जातें. हा अनुभव इतिहासांत आढळून येतो. ज्यांना घरें आहेत त्यांनाच मताचा अधिकार ज्याकाळीं होता त्याकाळीं नगरपालिकेचे कारभार घरमालकांच्याच दृष्टीनें चालत असत. मोठे जमीनदार, मोठे

शेतकरी, आयकर देणारे यांनाच जेव्हां मताधिकार होता त्यावेळीं झालेले कायदे हेंच दर्शवितात. समाजांतील कुठल्याहि व्यक्तीला अगर समूहाला राज्यकारभारांत भाग न दिल्यास म्हणजे त्यांना राज्यकारभारांत आपलें म्हणणें मांडण्यास संधी न दिल्यास, मतदानाचा हक्क न दिल्यास (त्याचा अर्थ असा होतो कीं) त्याचें नागरिकत्व अपुरें रहातें. त्यांना सत्तेपासूनच नव्हे तर सुखापासूनहि वंचित केलें आहे; मग हे हक्क नाकारणें धर्माच्या दृष्टीनें, वंशाच्या दृष्टीनें, शिक्षणाच्या दृष्टीनें, संपत्तीच्या दृष्टीनें, कुठल्याहि दृष्टीनें का असेना, परिणाम तोच होतो. म्हणून स्वातंत्र्य संपूर्ण व्हावयाचें, त्याची सांगता व्हावयाची, तर स्वातंत्र्याचा समाजांत होणारा उपयोग, समतेच्या, संस्थापनेच्या दृष्टीनें व्हावयास पाहिजे. समता म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. पण समतेशिवाय स्वातंत्र्य हें अपूर्ण. समता व स्वातंत्र्य यांत विरोध आहे असें अनेक वेळां प्रतिपादिलें जातें आणि आज भारतांत तर हा विरोध मोठ्या प्रमाणांत चर्चिला जात आहे. राज्यानें व्यापाराचें व उद्योगांचें नियंत्रण केलें व त्यामुळें स्वातंत्र्य कमी झालें आहे, हा आज एका पक्षाचा दावा आहे. कायद्याच्या साहाय्यानें समता प्रस्थापित केल्यामुळें खरें स्वातंत्र्य कमी झालें आहे हाहि दावा आहे. मुळांत माणसें व त्यांची बुद्धि समान नसतां, कायद्याच्या साहाय्यानें ही नैसर्गिक स्थिति बदलून समता आणणें याचा अर्थ अनेकांना त्यांच्या व्यक्तिविकासाचा जो हक्क आहे त्यावर मर्यादा आली आणि त्यामुळें त्यांचें स्वातंत्र्य आकसलें असें त्यांना वाटतें. समतेची मागणी म्हणजे स्वातंत्र्याची हानि हा सिद्धान्त बरोबर नाहीं. समता व स्वातंत्र्य यांत विरोध नसून या दोन्ही कल्पना एकमेकांना पूरक आहेत. एखाद्या हुकूमशहाच्या अंमलांत सर्व लोक सारख्याच जुलुमाखालीं असतात तेथें समता आहे पण स्वातंत्र्य नाहीं. ज्या ठिकाणीं किमान समताभाव नसेल त्या ठिकाणीं स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग अशक्य. समाजामध्यें आणि ज्या समाजांत विषमता अधिक आहे, तीव्र आहे त्या समाजांत समता असावी ही इच्छा पण तीव्र असते. विषमता साधारण असल्यास समतेची भावना नसते असें नाहीं. पण तीव्र नसते व तिला द्वेषाचें स्वरूप येत नाहीं. पण जेथें विषमता तीव्र आहे त्या ठिकाणीं समतेची भावना अधिक तीव्र होते व तिचें सामाजिक द्वेषांत परिवर्तन होतें आणि मग तेथें क्रान्तीच्या भावना उत्पन्न होतात. विषम समाजांतील विषमता कुठल्याहि नैसर्गिक गोष्टीवर आधारलेली नसते. जे संपन्न असतात त्यांची संपन्नता मानवनिर्मित कायद्यानें अगर मानवनिर्मित सामाजिक परिस्थितीनें निर्माण झालेली असते. रंगांतील काळेगोरेपणा, अगर शरीरांतील कमीजास्त उंची याबाबत लोकांना तेवढा राग येत नाहीं, पण प्रयत्न न करतां श्रीमंती व सुख यांची मिरास उपभोगणारे व जे केवळ निसर्गानें नव्हे, अंगच्या दुर्गुणानें नव्हे; किंवा अंगच्या नालायकीनें नव्हे, तर समाजांतील व्यवस्थेमुळें वंचित व उपेक्षित असतात. या दोन वर्गांत असणारे संबंध क्रान्तीची पार्श्वभूमि असते. उपेक्षिलेले

गुणीजन, लायकी असून वंचित झालेलें कौशल्य, क्रांतीचें मार्गदर्शन करीत असतें. संपत्तीच्या व संपन्नतेच्या जोरावर सुखावर अधिकार सांगणारे लोक मूठभर असल्यानें बहुजनसमाज त्यांच्या विरुद्ध उभा राहतो. संपत्तीची प्राप्ति सत्तेच्या द्वारें संरक्षिली जाते आणि सत्ता व संपत्ति एकत्र येऊन समाजांतील बहुसंख्याक बहुजन समाजाला सुखापासून दूर ठेवते. सुख केवळ सत्ता असेल तरच आहे असें नव्हे, पण सत्ता नसल्यास सुख मिळतेंच असें नाहीं आणि जरी मिळालें तरी त्या सुखाचें स्वरूप साहजिकच मर्यादित असतें. सत्तासंपन्नांच्या ताटांतून त्यांनीं जेवढें टाकून दिलें असेल तेवढेंच सुख सत्ताहीनांच्या वांट्याला येतें म्हणून ज्या ठिकाणीं समता आहे, ज्या ठिकाणीं सामाजिक अधिकार समान आहेत त्या ठिकाणीं सुखाची वांटणी अधिक न्यायपूर्ण आणि म्हणून स्वातंत्र्याचा उपभोगहि अधिक प्रमाणांत होतो आणि चांगल्याप्रकारें होतो. ज्या ज्या ठिकाणीं खास सवलती व खास अधिकार नाहींसे केले गेले त्या ठिकाणीं सामान्य जनांच्या सुखामध्यें भरच पडली आहे अशी इतिहासाची साक्ष आहे. सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, जेथें समता अधिक तेथें स्वातंत्र्याचा उपभोग व उपयोग अधिक व अधिक चांगला.

स्वातंत्र्याचा पूर्ण अर्थ त्या कल्पनेच्या सर्व कलांतून समजून घेणें जसें इष्ट तसेंच समतेच्या कल्पनेचा अर्थ तिच्या विविध अंगांतून पाहणेंहि इष्ट. स्वातंत्र्याच्या मर्यादा जशा स्वातंत्र्याच्या उपभोगासाठीं अवश्य, त्याचप्रमाणें समतेच्याहि मर्यादा आवश्यक असतात व त्यायोगानेंच समतेच्या कल्पनेला पूर्णता येते. कांहीं तरी अफाट व अर्वाच्य कल्पना समतेबाबत केल्यानें तिला पूर्णता येत नाहीं व वस्तुस्थितींत विपर्यास होतो. समता म्हणजे निरपेक्ष सारखेपणा नव्हे. त्याचप्रमाणें प्रत्येकाबाबत सांचीव शिक्क्याप्रमाणें वर्तन नव्हे. मनुष्य हा निर्जीव नाहीं. त्याच्या शरीराचा आकारसुद्धां सारखा तोच राहात नाहीं. आणि मनाच्याबाबत तर त्याचा चंचलपणा वर्णन करण्याला कवि व योगी दोघेहि असमर्थ ठरले आहेत. वंशपरंपरेनें येणारी पार्थिव संपत्ति कायद्यानें कमीजास्त करतां येईल पण मानसिक संपत्ति ही जी त्या व्यक्तीच्या वांट्याला वडिलोपार्जित म्हणून आली असेल तिच्यांत कायद्यानें कमीजास्त करणें शक्य नसतें. वंशपरंपरागत कांहीं वारसा मानसिक विचारांचा प्रत्येक व्यक्तीला येतो. त्याचप्रमाणें सामाजिक परिस्थितीमुळें मनुष्याच्या स्वभावावर घडत गेलेले परिणाम माणसामाणसामध्यें एकसारखेपणा नसतो हेंच दाखवितात. म्हणून समाजांत कांहीं अनिवार्य विविधता व विषमता ही असतेच. 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' हा सिद्धान्त अयोग्य नाहीं. ती मति अगर तो स्वभाव हा सामाजिक परिस्थिति, पिढीजात संस्कार यांमुळें बनलेला असतो हें खरें. मानवी मन हें कांहीं निरपेक्ष असें नाहीं. तें ऐतिहासिक निर्मिति आहे. पिढ्यानुपिढ्या तें बनत बनत बनलें आहे म्हणून पिढ्यानुपिढ्या प्रयत्न केल्यास व सामाजिक परिस्थिति बदलत गेल्यास तें बदलत जाईल

असें म्हणणें तर्कदृष्ट्या योग्य आहे. तथापि, आजची समाजांतील व्यक्तिव्यक्तीमधील विविधता ही स्पष्ट आहे व ती मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं. सब घोडे बारा टक्के अशी वागणूक समाजामध्यें शक्य असल्यास इष्ट नाहीं. रावापासून रंकापर्यंत प्रत्येकाला सारखीच वागणूक मिळणें अगर देणें यांत समतेच्या यथार्थ कल्पनेचा आविष्कार नाहीं. प्रत्येक मनुष्याला सुख हवें असतें पण प्रत्येक मनुष्याची सुखाची कल्पना सारखी नसते आणि म्हणून सुखाच्या दृष्टीनें त्याला जी परिस्थिति समाजानें उपलब्ध करून द्यावयाची तीहि एकसारखी असणार नाहीं; म्हणून प्रत्येकाला त्याला त्याच्या इच्छेप्रमाणें सुख मिळावें म्हणून समाजानें थोडा वाव दिला पाहिजे. कुणाला मटार आवडेल, कुणाला मेथी आवडेल व त्याप्रमाणें त्यानें घ्यावें असा वाव देण्यांत समतेला अगर समतेच्या कल्पनेला बाध येत नाहीं. एखाद्याला वकील व्हावेंसें वाटेल, एखाद्याला डॉक्टर, एखाद्याला कारागीर व त्याप्रमाणें होण्यास समाजानें संधी दिली तर तेथें विषमता आली असें म्हणतां येणार नाहीं. तसेंच समाजानें कृत्रिम बंधनें अगर मर्यादा निर्माण करून कुठल्याहि जीवनाचें क्षेत्र कुणाहि व्यक्तीसाठीं अगर कुणाहि समूहासाठीं मिरास म्हणून ठेवणें हें समतेच्या विरुद्ध उघड आहे. समता याचा अर्थ समतल असणें. समता म्हणतांच एका स्तराची, एका पातळीची कल्पना येते आणि म्हणून प्रत्येक व्यक्तीला त्याच्यामध्यें जी कांहीं शक्ति असेल, जें कांहीं कौशल्य असेल, त्याला सारखा वाव मिळाला पाहिजे. याचाच अर्थ तेथें समता असली पाहिजे. जे मौलिक हक्क असतील ते सर्वांना समान असले पाहिजेत. अमुक धर्माचा म्हणून अगर अमुक जातीचा म्हणून कोणाला त्या हक्कापासून वंचित करणें म्हणजे विषमता. जे मौलिक हक्क आहेत त्यांत तारतम्यभाव दाखवावयाचा असल्यास तो योग्य कारणासाठीं आहे व सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें तसें आहे हें स्पष्ट असलें पाहिजे व लोकांना तें मान्य असलें पाहिजे. ज्या गोष्टी समाजांतील प्रत्येक व्यक्तीला, त्याच्या जीवनाला व आध्यात्मिक विकासाला आवश्यक असतील त्या सर्व सर्वांना मिळाल्याच पाहिजेत. त्या मिळाल्यानंतर अनावश्यक गोष्टींबाबत कांहीं कमीजास्त झाल्यास तितका विरोध असणार नाहीं. प्रत्येकाला भाकरी मिळाल्याशिवाय कोणा एकालाहि बासुंदी खाण्याचा हक्क नाहीं. प्रत्येकाला किमान शिक्षण मिळाल्याशिवाय कोणालाहि श्रेष्ठ शिक्षण मिळण्याचा अधिकार नाहीं. या दृष्टीनें विचार केल्यास समतेची कल्पना स्पष्ट होते. समता याचा अर्थ व्यक्तिमात्राला समाजांत उन्नतीसाठीं सारखी संधी असली पाहिजे. त्याचप्रमाणें जर कोणाची संधी कमी असेल तर तें कृत्य सार्वजनिक हितार्थ आहे हें स्पष्ट असलें पाहिजे, स्वयंसिद्ध असलें पाहिजे. शहरामध्यें शिक्षण हवें म्हणून खेडेगांवांत तें कमी करणें अगर विश्वविद्यालयीन शिक्षणाची अधिक जरुरी आहे म्हणून प्राथमिक शिक्षणावरील खर्च कमी करणें हें समतेच्या कल्पनेंत बसत नाहीं. अमुक एक कार्यासाठीं अमुक एक व्यक्ति योग्य आहे असें ठरविल्यानें समतेच्या कल्पनेला बाध येत नाहीं. मात्र व्यक्तीची निवड ही गुणावर

झाली पाहिजे. संपत्ति ही गुणलुब्ध होऊन व्यक्तीकडे आली पाहिजे. केवळ वंश अगर जन्म यावर ती येऊं नये. गुणानुसार पुरस्कार झाल्यानें समतेला बाध तर येत नाहींच; उलट समतेचा अर्थ स्पष्ट होतो. कुणालाहि दुसऱ्या कुणाच्या खाजगी स्वार्थासाठीं शासनाद्वारें वंचित केलें जाणार नाहीं, उपेक्षिलें जाणार नाहीं, अशी परिस्थिति असली म्हणजे समता वाढीस लागते. सर्वांना ज्या हरकती व अडचणी असतील त्याच प्रत्येक व्यक्तीला असल्यास त्याला तक्रार करण्याचें कारण नसतें. समान संधी मिळाल्यानें कोणाला कमीजास्त प्राप्ति झाल्यास त्याचा दोष समाजावर नाहीं. जें कांहीं मग प्राप्त होईल तें व्यक्तीव्यक्तीच्या गुणानुसार असेल. समान संधीच्या वातावरणांत समाजानें कोणावर अन्याय केला असें होत नाहीं.

जेव्हां समतेचा अगर स्वातंत्र्याचा विचार केला जातो त्यावेळीं व्यक्ति ही समाजांत नांदते व व्यक्तीप्रमाणें समाजाचेंहि असें कांहीं स्वातंत्र्य असतें, कांहीं अधिकार असतात व कांहीं कर्तव्यें पण असतात. समाज हा व्यक्तींनीं बनलेला तथापि समाज म्हणजे व्यक्ति नव्हे. व्यक्तीचा पण व्यक्तीहून निराळा असा भाव त्यांत असतो. सभा ही हजर असणाऱ्या व्यक्तींनीं सजते. तथापि, सभेचें असें खास अस्तित्व असतें. तोच न्याय समाजाच्या बाबतींत आहे. आणि या दृष्टीनें विचार करतां व्यक्तीच्या अधिकारापेक्षां समाजाचे अधिकार अधिक व अग्रेसर मानले पाहिजेत. व्यक्तीचें संरक्षण महत्त्वाचें पण समाजाचें संरक्षण हें प्रथम व प्रमुख. भारत देश भारतीय नागरिकांनीं बनविलेला, पण भारत देश अगर भारत ही केवळ कल्पना नाहीं, तिला वस्तुस्थितींत आधार आहे. भारताच्या गरजा, भारताचें ध्येय ही केवळ भारतीयांच्या गरजांची अगर ध्येयांची गोळाबेरीज नव्हे. रास व राशींतील दाणे हे एक आहेत व पृथक्‌हि आहेत आणि या दृष्टीनें विचार करतां जें समष्टीरूपानें आहे त्याचा विचार प्रथम व व्यक्तीचा विचार त्याच्या संदर्भात झाला पाहिजे. जर समष्टीला म्हणजे समाजाला अगर राज्याला कांहीं अधिकार नसतील, तर व्यक्तीचे अधिकार नष्ट झाले नाहीं तरी नाममात्र राहतील. राज्य हें प्रभावी आहे. दंड करण्याची सत्ता त्याला आहे, म्हणून नागरिकांना अधिकार आहे, नागरिकांना स्वातंत्र्य आहे. समाजाच्या आशीर्वादानें व अभयदानानें व्यक्ति स्वातंत्र्य व सुख उपभोगितात. किंबहुना स्वातंत्र्य हा समाजानें दिलेला वर आहे व तो अनुशासनाच्या व आज्ञाधारकत्वाच्या तपानें मिळत असतो. आणि मग हें उघड होतें कीं, सामाजिक हित, सामाजिक स्वातंत्र्य व व्यक्तीचें स्वातंत्र्य यांच्यामध्यें विरोध आला असतांना व्यक्तीचें स्वातंत्र्य व हित हें बाजूला सारणें इष्ट व योग्य ठरतें. एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, समाजाच्या बाहेर व्यक्तीला स्वातंत्र्य आहे हें म्हणणें अर्थशून्य आहे. स्वातंत्र्याची कल्पना ही सापेक्ष आहे व तिचा संदर्भ सामाजिक आहे. समाजाच्या बाहेर व्यक्ति संपूर्णपणें आधुनिक जगांत राहूं शकत नाहीं व तसें कोठें होत असेल तर त्या व्यक्तीचें अस्तित्व व जीवन पशुजीवनापासून निराळें राहणार नाहीं. म्हणून नानाविध संबंध,

नानाविध संघर्ष हे सगळे समाजांत असतात व त्यांतून समाज आपल्या परंपरेनें, आपल्या संकेतानें व आपल्या कायद्यानें व नियमानें कांहीं समान व सर्वमान्य असें बंधन निर्माण करीत असतो व त्यांतून व्यक्तीचें स्वातंत्र्य त्याला लाभत असतें. प्रत्येक व्यक्तीला सर्व कांहीं सर्व काळीं त्याला वाटेल तसें वागूं देणें हें त्याच्याच हिताच्या दृष्टीनें इष्ट नसतें. म्हणून कांहीं बंधनें त्याला मानावीं लागतात व हीं बंधनें तात्त्विक दृष्ट्या जरी बंधनें मानलीं तरी वस्तुतः त्याच्या स्वातंत्र्याची संरक्षण करणारी ती व्यवस्था असते. व्याकरणाशिवाय भाषा जशी अमोघ व अर्थशून्य त्याप्रमाणें बंधनविरहित निरपेक्ष स्वातंत्र्य हें अर्थशून्य ठरतें. समाजाचीं बंधनें मानण्यांत स्वातंत्र्य गमावलें अगर कमी झालें असें वाटणें अस्वाभाविक नाहीं; पण समाजाचा विचार करतांना त्यामध्यें अस्वाभाविक कांहीं नाहीं. कारण तें व्यक्तीच्या स्वातंत्र्याला अनिवार्य असेंच असतें. जर मला स्वातंत्र्य हवें आहे तर ज्यांच्याशीं मी बोलणार, ज्यांच्यामध्यें मी वावरणार, ज्यांच्याशीं मी व्यवहार करणार त्यांचा विचार मला करावयास पाहिजे व जेव्हां मी देशाचा विचार करतों त्या वेळेला देशांतील नागरिकांचाच विचार करीत असतों. ( आजच्या व उद्यांच्या ) समाजाच्या हिताचा विचार करतों याचा अर्थ समाजांतील व्यक्तीच्या हिताचा विचार करतों. आजच्या व उद्यांच्या आणि समाजाच्या हितार्थ ज्यांत माझें हित समाविष्ट आहे त्याच्यासाठीं निरपेक्ष स्वातंत्र्यावर मी बंधन स्वीकारत असतों. याचा अर्थ असा नव्हे कीं, स्वातंत्र्य म्हणजे राज्याच्या आज्ञा जशाच्या तशा पालन करणें. राज्याचा आधार कायद्याचें पालन हें खरें, तथापि कायद्यांत जसा विवेक असावा तसा त्याच्या पालनांतहि असला पाहिजे. व्यक्ति म्हणजे समष्टीच्या अगर समाजाच्या जीवनाचें प्रतिबिंब. राशींतील दाणा हा राशीच्या स्वरूपाशीं जसा समरस असतो, त्याचप्रमाणें व्यक्तीहि समाजाच्या स्वरूपाशीं समरस असते. पण त्याचबरोबर दाण्याला एक पृथक् अस्तित्व असतें त्याचप्रमाणें व्यक्तीलाहि. व्यक्तीनें प्रगति करणें, विकास करणें याचा अर्थ त्या समाजाचीहि प्रगति व विकास — अल्प प्रमाणांत कां होईना — होतच असतो. समाजाला सोडून अगर समाजाच्या बाहेर अशी ती प्रगति अगर विकास असूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें समाजाच्या उन्नतींत व्यक्तीची पण उन्नति असते. समाज अधिक संपत्तिमान्, अधिक समृद्ध झाला याचा अर्थ समाजांतील व्यक्तीहि संपत्तिमान्, समृद्ध झाली. म्हणून व्यक्ति जेवढी अधिक प्रगति करील तेवढी समाजाची प्रगति अधिक व समाजाची प्रगति अधिक म्हणजे व्यक्तीची पण प्रगति अधिक, आणि हें सर्व लक्षांत घेतां स्वातंत्र्याचा अर्थ केवळ बंधनविरहित स्थिति असा नसून, व्यक्तीची वर्तणूक ही समाजाच्या विविध हितसंबंधांच्या समन्वयानुसार जसजशी अधिक प्रगतिपर तसतसें व्यक्तीचें स्वातंत्र्य अधिक-अधिक अर्थपूर्ण होतें. स्वातंत्र्याचा अर्थ म्हणजे जास्तींत जास्त समाजाच्या हितार्थ व त्याच्या दृष्टीनें वागणें असा होतो. स्वातंत्र्य म्हणजे अभावात्मक अशी कांहीं कल्पना नसून तिचें स्वरूप भावात्मक ( पॉझिटिव्ह ) आहे.

१८ व्या व १९ व्या शतकांत पाश्चात्य देशांत राजकीय विचार व राज्य ही संस्था कसकशी विकास पावली याचा इतिहास प्रस्तुत लेखकानें 'राज्यशास्त्रविचार' या ग्रंथांत केला आहे. भारतीय तत्त्वज्ञान या बाबतींतील थोडें निराळें आहे व प्राचीन भारतांतील राज्यविषयक कल्पना कशा वाढत गेल्या याचा इतिहासहि मनोरंजक आहे. तथापि त्या विकासाचा विचार अन्य प्रसंगीं करण्याची प्रस्तुत लेखकाची मनीषा आहे. तथापि सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, सर्वभूत समानता हा हिंदु संस्कृतीचा आत्मा असल्यानें त्या तत्त्वाचा प्रभाव राजकारणी विचारावर झालेला आहे. जें जें आत्मवश आहे तें स्वातंत्र्य, जें परवश तें पारतंत्र्य, ही कल्पना भारतीय समाजांत प्राचीन काळापासून आहे. भारतांत समाजाची रचना कांहीं एका विशिष्ट विचारसरणीवर आधारित असल्यानें समतेच्या कल्पनेला मर्यादा बसलेली आहे. तथापि स्वधर्मानुसार वागणें यांत स्वातंत्र्य आहे व सुखहि आहे आणि त्या दृष्टीनें कर्मव्यवस्था समाजांत वर्ग कल्पून केली आहे. विचारांना पूर्ण स्वातंत्र्य, उच्चारालाहि पूर्ण स्वातंत्र्य, पण वर्तनांत व वागणुकींत धर्मदृष्टीनें मर्यादा, असें थोडक्यांत दृश्य भारतीय समाजाच्या शेकडों वर्षांच्या इतिहासांत दिसून येतें. भारतांतील राजकीय विचारांत, व्यवस्थेचा विचार धर्माच्या दृष्टीनें केलेला आहे म्हणून स्वातंत्र्य व समता यांचा विचार तेथें मौलिक मानला गेला नाहीं असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांत जें राजकीय तत्त्वज्ञान विकसित झालें त्यांत सुरुवातीपासूनच स्वातंत्र्य व समता यांचा विचार कमीजास्त प्रमाणांत केला गेला. ग्रीसमधील राजकीय विचारापासून फ्रान्समधील क्रान्तीच्या वेळच्या राजकीय विचारापर्यंत स्वातंत्र्य म्हणजे निरपेक्ष स्वातंत्र्य नव्हे. राज्यकर्त्यांच्या अगर राज्याच्या मर्यादेंतून व त्याच्या संदर्भात जें स्वातंत्र्य तें त्याचें स्वरूप. जर्मन राजकीय विचारांत तर राज्याच्या आज्ञा पालन करणें हेंच स्वातंत्र्याचें मुख्य लक्षण अशी परिस्थिति झाली होती. स्वातंत्र्य म्हणजे केवळ बंधनाचा अभाव असें नसून व्यक्तीला कांहीं तरी स्वतःचा निर्णय घेण्याचा अधिकार ही गोष्ट वरील विचारसरणींत होती हें खरें. तथापि व्यक्तीनें स्वतःचा निर्णय घेणें हें सर्व व्यक्तींना करूं दिल्यास कठीण अवस्था होईल. म्हणून सर्व व्यक्तींच्या निर्णयाला जें सामान्य असेल ती समाजाची इच्छा समजून तिचा खरा प्रतिनिधि राज्य आणि म्हणून राज्याशीं जुळतें घेणें व राज्याच्या आज्ञा मानणें यांतच स्वातंत्र्य आहे हें त्या विचारसणीचें स्वरूप होतें. व्यक्ति कांहीं तरी निर्णय घेईल, व्यक्तीची इच्छा स्वैर असेल, व्यक्तीचे विचार अव्यवस्थित असतील, या सर्वांवर उपाय म्हणजे राज्याची इच्छा ही श्रेष्ठ आणि ती जेव्हां निश्चित होते त्यावेळीं व्यक्तीच्या इच्छेंतील निर्णयांतील स्वैरपणा व अव्यवस्थितपणा नाहींसा होतो. यांतून असा अर्थ काढण्यांत आला कीं, राज्याच्या इच्छा व्यक्ति जशा अधिकाधिक मानील व राज्याच्या आज्ञांचें पालन व्यक्ति जसजसें अधिक करील; त्या त्या प्रमाणांत ती व्यक्ति अधिक स्वातंत्र्याचा उपभोग घेईल. राज्य व व्यक्ति, समाज व

व्यक्ति यांचे संबंध असे कल्पिले गेले कीं त्या संबंधांत जें कांहीं राज्यानें अपेक्षिलें असेल त्याप्रमाणें वागणें यांतच स्वातंत्र्य आहे. ही विचारसरणी मान्य केल्यानें अनेक अडचणी दूर होतात हें खरें. माझ्या व्यक्तिगत जीवनांत जें श्रेष्ठ असेल तेंच राज्याच्या आदेशांत व आज्ञांत असणार व जेव्हां मी राज्याचे आदेश मानतों तेव्हां मी माझेच आदेश मानतों असा अर्थ होतो. जसजसें राज्याचें ध्येय व हेतु यांचा साक्षात्कार मला होत जातो, तसतसें राज्याच्या हेतूंत व आदर्शांत व माझ्या हेतूंत व आदर्शांत भिन्न भाव नाहीं असें वाटूं लागतें. आणि यामुळें राज्याच्या मताप्रमाणें चालणें म्हणजे माझ्या मताप्रमाणें चालणें. राज्य आज्ञा करतें याचा अर्थ, मी आज्ञा करतों. या विचारसरणीच्या मुळाशीं राज्यांतील व्यक्तींच्या इच्छेचें व आकांक्षांचें सामुदायिक स्वरूप राज्याच्या इच्छेंत व आज्ञेंत संकलित झालेलें आहे हा आहे. आणि म्हणून राज्याची इच्छा ही प्रतिनिधिस्वरूप एवढेंच नव्हे, तर ती प्राथमिक असें ठरतें व ती मानण्यांत माझें व्यक्तिगत कल्याण आहे. एवढेंच नव्हे तर त्याच्या हितांत माझें हित आहे व तें साधल्यास माझेंहि हित साधेल. हत्तीच्या पावलांत जशीं सर्व पावलें आलीं तोच न्याय येथें आहे. राज्याच्या आज्ञा मानण्यांत एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे स्वातंत्र्य आहे. खुषीनें घेतलेल्या निर्णयांत स्वातंत्र्य नसून राज्यानें लादलेल्या निर्णयांत स्वातंत्र्य आहे हा या विचारसरणीचा निष्कर्ष निघतो.

एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीची ही विचारसरणी जी युरोपमध्यें प्रभावी होती ती फार काळ टिकली नाहीं. ही विचारसरणी मान्य केल्यास व्यक्तीचें व्यक्तित्व याला महत्त्व राहत नाहीं. त्याच्या इच्छा महत्त्वहीन होतात. त्याचा निश्चय लुळा पडतो. प्रत्येक व्यक्तीला आपण कांहींतरी आहोंत, इतरांपेक्षां कांहींतरी निराळे आहोंत ही जी स्वाभाविक भावना व प्रत्यक्ष अनुभव याला मग वाव राहत नाहीं. राज्य याचा संबंध क्षणोक्षणीं येत असतो आणि मग राज्य ही कोणी तरी आज्ञा देणारी, हुकूम करणारी अशी संघटना वाटते. त्याच्या आज्ञा एक तर राजीखुषीनें मानल्या पाहिजेत. राजीखुषी नसली तर अनिवार्य म्हणून मानल्या पाहिजेत. पण माझ्या मनाविरुद्ध त्या असतील, माझ्या कांहीं मौलिक श्रद्धेविरुद्ध त्या असतील तर त्यांना विरोध करण्याला मला तात्विक भूमिका अगर नैतिक हक्क या विचारसरणींत शिल्लक राहात नाहीं. मला जें योग्य वाटतें तें बाजूला सारून माझा स्वतःचा अभिप्राय दूर करून जें श्रद्धेला पटत नाहीं, जें माझ्या अनुभवाला विसंगत व विरुद्ध वाटतें तें करण्यांत माझें स्वातंत्र्य फुलतें हें म्हणणें मला पटत नाहीं. व्यक्तीला त्याच्या अनुभवानें, त्याच्या विचारानें बाह्य जगाशीं संबंध आल्या-नंतर आलेल्या अनुभवानें योग्य वाटतें तें त्याला करूं न देणें हें कायद्यानें बरोबर असलें, तरी तेथें न्यायाचा अभाव व नैतिकतेचा अपुरेपणा खास आहे. व्यक्तीचा अनुभव अप्रस्तुत व अयोग्य ठरवून इतरांच्या अनुभवानुसार त्याला वागणें भाग पाडणें यांत व्यक्तीचा अवमान तर आहेच, पण व्यक्तीच्या गुणांना मारून टाकण्यासारखें आहे. प्रत्येक व्यक्ति

ही संपूर्णपणें विचारहीन असते असें नाहीं. थोडाबहुत विचार प्रत्येक व्यक्ति करीत असते. जगामध्यें ती वावरते, अन्याशीं तिचा संबंध येतो व तिच्या मनांत उत्पन्न होणारे विचार हे त्या संबंधांतून निर्माण होतात. ते विचार सर्वसाधारण समाजाच्या विचारांशीं जुळत असले तरी त्यांत व्यक्तीचें असें वैशिष्ट्य पण असतें. तोच आंबा एखादी व्यक्ति चोखून खाईल, कापून खाईल, रस काढून खाईल. यांत प्रत्येक व्यक्तीचें वैशिष्ट्य आहे. जगाशीं आलेल्या संबंधांत उत्पन्न झालेल्या प्रतिक्रिया प्रत्येक व्यक्ति आपापल्या परीनें विचारांच्या खलबत्त्यांत घालून एक रसायन तयार करीत असते. व्यक्तिगत केलेले विचार, व्यक्तिगत निश्चित केलेले अभिप्राय मग व्यक्ति समाजाच्या सामान्य व्यवहारांत दाखल करते, असें झालें म्हणजे व्यक्तीला कांहीं स्वातंत्र्य आहे असें म्हणतां येईल.

समाजाच्या अगर राज्याच्या दृष्टिकोनाशीं जास्तींत जास्त जुळवून घ्यावें व यांत जास्त स्वातंत्र्य आहे या विचारसरणींत प्रत्येक व्यक्तीमध्यें जें श्रेष्ठ व चांगलें आहे तें लक्षांत घेऊन राज्याचे आदेश बनतात असें गृहीत धरलें आहे. पण व्यक्ति ही जेवढें कांहीं चांगलें आहे तेवढीच असते असें नाहीं. दोष आणि गुण यांसह व्यक्ति बनली असते. आणि व्यक्तीची जी दृष्टि बनते ती केवळ एकांगी नसते. तिच्या विचारांचें जें स्वरूप असतें तें तिला आलेल्या चांगल्या व वाईट दोन्ही अनुभवांतून निर्माण होतें. मी म्हणजे, मी जें सर्व कांहीं आहे व करतों, संकल्पितों व संपन्न करतों, या सर्वांची गोळाबेरीज आहे. व्यक्तीमध्यें अगर व्यक्तीच्या जीवनांत एकेक भाग घेऊन विचार करणें हें योग्य नव्हे. व्यक्ति जीवनांत जी धडपड करते तिचा परिणाम तिच्या जीवनावर होत असतो व त्यांत आलेला अनुभव हा त्या व्यक्तीला अत्यंत महत्त्वाचा वाटतो अणि व्यक्तीची सर्व धडपड तिला आयुष्यांत सार्थकता वाटावी या दृष्टीनें असते. म्हणून राजकीय आदेशांत अगर सामाजिक दृष्टिकोनांत प्रत्येक व्यक्तीचें सर्व कांहीं आलें अगर व्यक्तीचे दृष्टिकोन त्यांत संपूर्णपणें प्रतिबिंबित झाले, असें म्हणतां येणार नाहीं. आणि म्हणून त्या प्रमाणांत व्यक्तीला जें अनुभवाला आलें नाहीं त्याबाबत इतरांच्या अनुभवावर भार टाकून वागावें लागतें असा अर्थ होतो; आणि मग स्वाभाविकपणें ती व्यक्ति स्वतंत्र आहे हें म्हणणें बरोबर ठरत नाहीं. व्यक्तीला समाजांतील अगर राज्यांतील व्यक्तिव्यक्तींना जें समान वाटत असेल त्याचाच समावेश सामाजिक दृष्टिकोनांत अगर राज्याच्या आदेशांत होतों हें सर्वस्वीं खरें नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' अशी स्थिति असल्यानें प्रत्येकाला जें वाटतें तेंच दुसऱ्याला वाटतें हा सिद्धान्त अक्षरशः बरोबर नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, नानाविध मनांचीं माणसें राजकारणांत व समाजांत वावरतात व सदासर्वकाळ त्यांना जें आज वाटत आहे तें व तसेंच सदासर्वकाळ वाटत राहील असें नाहीं. एखाद्या गोष्टीबद्दल आज जें वाटेल तेंच उद्यां वाटेल असेंहि नाहीं. मनाच्या हातांत तेच तेच पत्ते येत नाहींत. काळ हा क्षणाक्षणाला पत्ते पिसत असतो. आणि

त्यामुळें निश्चित मत निरपेक्षपणें कुठल्याहि बाबतींत कोणी देऊं शकणार नाहीं. आज प्रत्येकाला जगांत शांतता असावी व भारत समृद्ध व्हावा असें वाटतें. तथापि जगांतील शांततेबाबतच्या कल्पना व्यक्तिगणिक निरनिराळ्या प्रकारच्या आहेत. तसेंच भारताच्या समृद्धीबद्दलहि कुणाला आज राष्ट्रांत खूप उत्पादन झालें म्हणजे राष्ट्र समृद्ध झालें असें वाटतें, तर कुणाला उत्पादनाची वांटणी अगर विभाजन अधिक सारखें झालें तर समृद्धि होईल असें वाटतें. तथापि समृद्धीच्या कल्पनेपुरतें अगर शांततेच्या कल्पनेपुरतें जें समान वाटतें तें ढोबळ असलें तरी त्याच्या इच्छेचा अगर वाटण्याचा भाव त्यांत आहे हें खरें. पण या सगळ्या इच्छा ढोबळ अर्थानें एकत्र आल्या, त्यांचा समन्वय झाला याचा अर्थ त्यांतून जें निर्माण होईल तें सर्वांना मान्य असेल असा नाहीं. राजकारणांतील अनुभव असा आहे कीं, ढोबळ दृष्टीनें एकच दृष्टिकोन असून एकत्र आल्यानें त्यांतील विविधता व पृथक्पणा अधिक स्पष्ट होत जातो. आणि ज्यांत एकाला सांगता वाटते, त्यांतच दुसऱ्याला विनाश वाटतो. ज्यांत एकाला सफलता वाटते, त्यांतच दुसऱ्याला शोकांतिकेचा विलाप ऐकूं येतो. संपूर्णतया समाजाची अमुक एक इच्छा निश्चितपणें अगर निरपेक्षपणें दृष्टोत्पत्तीस येते अगर बनते असें नाहीं. सामान्यपणें थोडें अस्पष्ट रीतीनें समाजाला सामान्यतया काय वाटत आहे याची कल्पना करतां येते. प्रत्येकाला त्याच्या दृष्टीनें जें हवें असतें व त्याच्या दृष्टीनें त्याला जें चांगलें वाटतें, ती त्याची दृष्टि त्याच्याच अनुभवांतून निर्माण झालेली असते. त्याच्या अनुभवामध्यें त्याच्या अनुभवाच्या गाभाऱ्यांत इतरांना प्रवेश नसतो व प्रत्येकाचा अनुभव एकत्र आणण्यानें प्रत्येकाचा अनुभव संपूर्णपणें त्या अनुभवाच्या बोंडल्यांतून दिसून येत नाहीं; आणि म्हणून प्रत्येकाचा जो विशिष्ट अनुभव आहे तो लक्षांत घेऊन व्यक्तीचें स्वातंत्र्य किती व कसें याचा विचार करणें योग्य ठरतें. किंबहुना राजकीय तत्त्वज्ञानाचा हा पाया आहे असें म्हणणें वावगें नाहीं.

प्रत्येकाचा अनुभव हा कांहीं विशिष्ट आहे हें मान्य केल्यानंतर समाजाचा असा एक दृष्टिकोन अगर समाजाची अशी इच्छा ही कल्पना कांहीं विशिष्ट अर्थानेंच व विशिष्ट मर्यादेंतच स्वीकारली पाहिजे. त्याजबरोबर राज्य जें करीत आहे, अगर राज्याचे आदेश व आज्ञा या सर्वस्वीं जी सामाजिक इच्छा आहे अगर जे सामाजिक दृष्टिकोन आहेत त्याला धरून आहेत हीहि कल्पना कांहीं मर्यादेपर्यंत व विशिष्ट अर्थानें स्वीकारली पाहिजे. सामाजिक जीवनांत सर्व कांहीं तर्कशुद्ध असतें असें नाहीं. त्याचप्रमाणें समाजांत जें घडत असतें तें सर्व विचारान्तीं घडत असतें असेंहि नाहीं. सामाजिक मन असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां वस्तुतः तसें कांहीं मन असतें असें नव्हे. पण समाजामध्यें जें घडलें, जी वस्तुस्थिति असते व ज्या वस्तुस्थितींत व्यक्तिविषयक दृष्टीनें साम्य अगर समानता असते त्यावरून सामाजिक मन तेथें निदर्शित झालें आहे असें मानलें जातें. अनेक व्यक्तींनीं बनलेला समाज, अनेक व्यक्तींच्या

विचारांतून निर्माण झालेलें सामाजिक वर्तन, अगर समाजाची वागणूक ही कांहीं नियोजनानें होत नाहीं अगर एखाद्या निश्चित केलेल्या पद्धतीनें अगर वेळापत्रकानें ती चालली आहे असें आढळून येत नाहीं. सामाजिक वागणुकींत कांहीं नियमबद्धता दिसून येते हें खरें व ही नियमबद्धता आणणारे नियम कोणी तरी रचलेले असतात हेंहि तितकेंच खरें व या नियमांची रचना करण्यांत नानाविध व्यक्ति भाग घेत असतात हेंहि खरें. समाजाचा शासकीय प्रतिनिधि म्हणजे राज्य याचा त्यांत मोठा हिस्सा असतो हेंहि खरें. राज्य म्हणजे अनेक नियम, अनेक कानून. आपल्या क्षेत्रांतील व्यक्तींचें नियमन व नियंत्रण राज्य करीत असतें. आपल्या क्षेत्रांत तें प्रभुत्वपूर्ण असतें आणि तें आपल्या सत्तेच्या साहाय्यानें समाजांतील नानाविध वैयक्तिक व सामाजिक व्यवहारांना नियंत्रित करीत असतें. जेव्हां आवश्यक वाटतें त्या वेळेला राज्य सत्तीनें आपल्या आज्ञा व आपले नियम अंमलांत आणीत असतें व ही सत्ति अगर हा हिंसेचा उपयोग सामाजिक हितार्थ आहे हा राज्याचा दावा असतो. हें सामाजिक हित क्षणिक जरी असलें तरी समाजाच्या व राज्याच्या कायम हिताचा तो एक भाग असतो; आणि म्हणून सत्तेचा उपयोग यथायोग्य आहे असें राज्य समजतें. समाजांतील कांहीं व्यक्तींना अगर राज्यांतील नागरिकांना जें राज्य करीत आहे तें समाजाच्या हितार्थ आहे हें मान्य नसतें व कित्येकांना असें वाटतें कीं, राज्य करील तें बरोबर, राज्य करील तें समाजाच्या हितार्थ. राज्य कधीं वांकडें करणार नाहीं. तें कधीं चूक करणार नाहीं. दुसऱ्या विचारसरणीचा स्वीकार केल्यास समाजाला खरें स्वातंत्र्य लाभणार नाहीं, आणि जीवन हें विफल आहे असें वाटेल, अशी विचारसरणी आजच्या जगांत मान्यता पावली आहे. राज्य हें सर्वांचें हें खरें; तथापि तें सर्वांनीं मानलें तर. तसेंच राज्याबद्दलची निष्ठा व एकतेची भावना ही सामान्यपणें सर्वांनीं राज्यास व राज्याच्या आदेशास मान्यता दिली तरच. तथापि ही मान्यता विचारहीन ज्ञानविरहित आज्ञापालनांत नसते. खरी मान्यता राज्याच्या आदेशांतील तत्त्व पटून जी दिली जाते ती. योगवासिष्ठांत म्हटलें आहे कीं, 'स्वभावात् न तु भयात् य पश्चति स पश्चति.' दंडाच्या भीतीनें झालेलें आज्ञापालन हें कमी प्रतीचें व बिनभरंवशाचें. याच्या उलट मनाची खात्री होऊन, मनाला पटून जें आज्ञापालन होतें तें खरें व टिकाऊ. यांतून असाहि अर्थ निघतो कीं, राज्यविषयक निष्ठा ही सशर्त आहे, निरपेक्ष नाहीं. सदासर्वदा राज्यसत्तेनें ती गृहीत धरून चलण्यांत धोका आहे. ही विचारसरणी १९ व्या शतकाच्या दुसऱ्या अर्धांत प्रभावी होऊं लागली. राज्य म्हणजे सर्वांचें, सर्वांच्या हितासाठींच तें आहे. सर्वांना न्याय देणारें तें आहे ही कल्पना ह्या दृष्टीनें बरोबर आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थितींत राज्याचा तसा अनुभव व्यक्तिमात्राला आल्यास तक्रार करण्याचें कारण नाहीं. अनुभव असा येतो कीं, राज्य लोकांचें, सत्ता एखाद्या वर्गाची व फायदा मर्यादित गटाचा, 'खुल्क खुदा का, मुल्ख बादशहा का, अंमल कंपनी सरकार का' हाच न्याय आढळून येतो. म्हणून कल्पनेंतील न्यायी व निर्दोषी राज्याचा विचार न

करतां प्रत्यक्ष अनुभवाला येणाऱ्या राज्याचा विचार केला पाहिजे. राज्य करणारे सत्ताधीश हे सर्वसामान्य नागरिकांप्रमाणें असतात. माणसें असतात हें खरें आणि म्हणून ज्या लोभांना व प्रलोभनांना मानव बळी पडतात तीच वृत्ति सत्ताधीशांत असते आणि म्हणून त्यांनीं दिलेले आदेश तपासले पाहिजेत, निरीक्षिले पाहिजेत, त्यांतील उघड हेतु व गुप्त हेतु यांची विचक्षणा झाली पाहिजे. समाजाच्या अनुभवाशीं त्याची तुलना झाली पाहिजे. आणि मगच त्यांना मान्यता मिळाली पाहिजे. सत्ताधीशांच्या अनुभवाचें क्षेत्र मर्यादित व पुष्कळ वेळां तो अनुभव सत्ताधीशांच्या भोंवतालीं वावरणाऱ्या स्तुतिपाठकांच्या संबंधांतून निर्माण झालेला असतो. आणि म्हणून सत्ताधीश करतील तें बिनचूक अगर निरपेक्ष योग्य हें मानण्यांत सामान्यतः व्यक्तीच्या व समाजाच्या स्वातंत्र्याला धोका आहे. जें आपल्याला पटत नाहीं तें राज्यानें सांगितलें म्हणून स्वीकारणें यांत व्यक्तीला आपल्या व्यक्तित्वाचें समर्पण करावें लागतें. आपल्या अस्मितेला सोडावें लागतें. स्वाभिमान तर आपण होऊन त्या व्यक्तीला सोडून जातो. आज जें जगामध्यें स्वातंत्र्य आहे तें राज्याच्या आज्ञा निरपेक्षपणें व बिनतक्रार मान्य केल्यानें निर्माण झालेलें नाहीं तर आपला आवाज प्रचलित सत्तेच्या विरुद्ध काढून आपल्या सदसद्विवेक बुद्धीला राज्याच्या कायद्यापेक्षां अधिक पवित्र व प्रभावी मानून निर्माण झालेलें आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी खरा, पण त्याचें महत्त्व व त्याची शक्ति हीं त्याच्या पृथक्पणांत, व्यक्तिविशिष्ट जीवनांत, सांठवलेली असते. त्याचा अनुभव हा जसा वैयक्तिक तशीच त्याची इच्छा व मति हींहि वैयक्तिक आणि या बाबतींत तो जर अन्यांचा गुलाम बनला तर तो स्वतंत्र आहे हें म्हणण्यांत स्वारस्य नाहीं. शारीरिक गुलामगिरीपेक्षां मानसिक गुलामगिरी अधिक भयावह आहे. म्हणून खऱ्या स्वातंत्र्याचा पाया मानसिक स्वातंत्र्य हा आहे. ‘मन एव मनुष्याणाम् कारणाम् बंधमोक्षयो.’

मनुष्य राज्यांत राहतो याचा अर्थ सर्वस्वीपणें तो राज्याशीं सायुज्जता पावला आहे असें नव्हे. तसें मानलें तर मग व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा अगर स्वातंत्र्याचा विचार करण्याची आवश्यकता राहात नाहीं. राज्य व व्यक्ति यांत संपूर्णपणें अद्वैत झालें तर स्वातंत्र्य ह्या कल्पनेच्या मुळाशीं जें द्वैत आहे व जें गृहीत धरल्याशिवाय ज्याचा विचार करतां येत नाहीं तें नष्ट झाल्यानें स्वातंत्र्याची कल्पना निःशेष होते. स्वातंत्र्य म्हणजे अन्य कुणापासून, बंधनापासून, मर्यादेपासून निर्मुक्त अशी त्याची कल्पना असते. पण जेथें मर्यादा नाहीं, कुणी हुकूम करणारा व कोणी ऐकणारा, कोणी आज्ञा देणारा कोणी आज्ञा पाळणारा, असा भाव जेथें नाहीं तेथें स्वातंत्र्य, ही कल्पना अप्रस्तुत ठरते. म्हणून जेव्हां आपण स्वातंत्र्याचा विचार करतों तेव्हां वर सांगितलेल्या द्वैताला धरून तो करतों. समाजांत व्यक्ति आहे म्हणून समाज व व्यक्ति यांच्या संबंधांत विचार करून व्यक्तीला स्वातंत्र्य किती, त्यावर समाजाचीं बंधनें किती, हा विचार प्रस्तुत ठरतो. तसेंच व्यक्ति ही नागरिक या नात्यानें राज्यांत राहते म्हणून राज्याचें बंधन किती, राज्याच्या मर्यादा

कोणत्या, हाहि विचार प्रस्तुत ठरतो. व्यक्ति समाजांत राहते, वावरते व व्यवहार करते. अनेक नातीं व अनेक संबंध व्यक्तीच्या जीवनांत वावरतात आणि या सगळ्या संबंधांतून, या सर्व व्यवहारांतून त्याला आपलें जीवन सुखी करावयाचें असतें, त्यांत त्याला सांगता आणावयाची असते. कुटुंबियांशीं, स्नेह्यांशीं, कुठल्या संस्थेच्या सभासदांशीं, व्यवसायांतील मंडळीशीं त्याचे नित्य संबंध येत असतात. तथापि कांहीं संबंध असे असतात कीं ते त्यानें जोडलेले असतात. कांहीं नातीं अशीं असतात कीं तीं त्यानें जोडलेलीं असतात. पण कांहीं संबंध व कांहीं नातीं हीं त्याच्या जन्माबरोबरच निर्माण होतात व मरेपर्यंत टिकतात. आई, बाप, भाऊ, बहीण हीं नातीं व हे संबंध घेऊनच तो जन्मतो. पत्नी, व्यवहारांतील संबंध अगर नातीं हीं तो स्वतः निर्माण करीत असतो व त्याची इच्छा झाल्यास तीं तो तोडूं शकतो. पत्नीला घटस्फोट देईल, नोकरी सोडून देईल, तथापि; आईबाप बदलूं शकत नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. त्यानें स्वतःहून निर्माण केलेले संबंध तो तोडूं शकतो. ज्या संबंधांत तो निर्माण झाला आहे ते तो तोडूं शकत नाहीं. धर्म बदलूं शकतो, पण अमुक राज्यांत जन्मामुळें आलेलें नागरिकत्व सामान्यपणें तो बदलूं शकत नाहीं. आणि जन्मानें अगर जन्माच्या वेळीं विद्यमान असलेल्या नागरिकत्वाच्या कायद्यानें त्याला प्राप्त झालेलें नागरिकत्व त्याला टाकतां येत नाहीं. तो राज्याच्या बाहेर गेला तरी त्याचें नागरिकत्व शरीराच्या छायेप्रमाणें त्याच्यामागें जातें. राज्याचा नागरिक असल्यानें व तें नागरिकत्व टाकतां येत नसल्यानें राज्याचे आदेश व राज्याच्या आज्ञा यांचें बंधन त्याच्यावर जन्मापासून असतें आणि मग ते आदेश व आज्ञा या पाळावयाच्या कीं नाहीं याचा विचार त्याला करावा लागतो. नागरिकत्व टाकतां येत नाहीं असें नाहीं, पण दुसऱ्या कुठल्या राज्याचें नागरिकत्व त्याला घ्यावें लागतें. नागरिकत्वविरहित व्यक्ति (स्टेटलेस्) कुठल्याहि हक्कव्यवस्थेवर अधिकार सांगूं शकत नाहीं. अशी व्यक्ति म्हणजे क्षणभर प्राणहीन शरीर मानलें तरी चालेल. अशा व्यक्ति गेल्या महायुद्धानंतर व विकृत राजकारणामुळें बऱ्याच ठिकाणीं आहेत हें खरें; पण आपल्याला विचार करावयाचा आहे तो नागरिकत्व आहे अशा व्यक्तीचा. राज्य नागरिकांना आज्ञा देत असतें याचा अर्थ ती आज्ञा कोणी तरी व्यक्ति अगर समूह देत असतो आणि या आज्ञा पालन करावयाच्या असतात. म्हणून व्यक्तीला स्वातंत्र्य किती याचा व सामान्यपणें स्वातंत्र्य या कल्पनेचा विचार करणें प्रस्तुत ठरतें. श्रुतिस्मृतींची आज्ञा मानली नाहीं तर कोणी तुरुंगांत घालणार नाहीं. पुरुषानें एकाच स्त्रीशीं विवाह करावा, हें जरी ध्येय धर्मानें ठेवलें असलें तरी तें मानलेंच पाहिजे अशी सक्ति नाहीं, पण त्या बाबतींत राज्याचा कायदा झाल्याबरोबर त्याचें पालन करणें मग अवश्य ठरतें. आणि पालन न केल्यास राज्य आपली शक्ति उपयोगांत आणून त्या व्यक्तीला राज्याचा आदेश पालन करण्यास भाग पाडतें. एखाद्या संस्थेच्या सभासदाला त्या संस्थेचे

नियम नैतिक दृष्ट्या बंधनकारक, पण त्यानें ते पाळले नाहीं तर त्याला फार तर संस्थेचें सभासदत्व सोडावें लागेल; यापेक्षां अधिक दंड अगर शिक्षा तेथें नसते. याच्या उलट राज्याच्या आज्ञा न मानल्यास दंड अगर शिक्षा भोगावी लागते. संस्थेच्या सभासदत्वाचा राजिनामा जसा देतां येतो तसा नागरिकत्वाचा राजिनामा त्याला देतां येत नाहीं. मग त्याच्यापुढें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, एक तर आज्ञा पाळावी अगर तुरुंगवास भोगावा. आज्ञा मानणें हें जर अपरिहार्य तर मग त्याला स्वातंत्र्य तें काय राहिलें असा प्रश्न उपस्थित होतो. प्रत्येक नागरिकानें कायदा मानला पाहिजे हा तर राज्यव्यवस्थेचा पाया आहे, आद्य तत्त्व आहे. तथापि व्यक्तीला जर राज्याचा कायदा हा आपल्या सुखावर आक्रमण करणार आहे असें वाटलें तर त्यानें कसें वागावें? एक तर त्याला जें वाटतें; मग तें बरोबर असो वा चुकीचें असो, त्याप्रमाणें वागावें व राज्यानें केलेली शिक्षा निमूटपणें सहन करावी. या ठिकाणीं त्याच्या मनाला आज्ञापालन न करण्यांत मनाचें स्वातंत्र्य आहे असें वाटतें. आज्ञापालन करून स्वातंत्र्याची भावना व अनुभव तेव्हां येतो, जेव्हां कायद्याचें पालन करण्यांत आपल्या व्यक्तिविकासावर, आपल्या नैतिक भावनांवर कुठल्याहि तऱ्हेनें आक्रमण होत नाहीं याची खात्री असते. ही खात्री ज्या परिस्थितींत होते ती परिस्थिति असली म्हणजे स्वातंत्र्य असा यांतून अर्थ निघतो, आणि म्हणून नागरिक स्वातंत्र्याची अपेक्षा करतो याचा अर्थ वर लिहिलेली परिस्थिति समाजांत असली पाहिजे हा होय. आपल्या सुखप्राप्तीसाठीं व ध्येयप्राप्तीसाठीं, नागरिक जीवनाचा मार्ग आक्रमीत असतांना त्याच्यामागील राज्याच्या आदेशामुळें अडचण उत्पन्न होणार नाहीं, धोका उत्पन्न होणार नाहीं, ही परिस्थिति असली म्हणजे स्वातंत्र्य आहे असें मानतां येईल. ही परिस्थिति नित्य स्वरूपाची नसते व तिच्यामध्यें स्वातंत्र्याची शंभर टक्के ग्वाही आहे असेंहि नसतें. शिवाय ही परिस्थिति सर्वव्यापक असेल असेंहि नाहीं. राज्य भाषणस्वातंत्र्याची ग्वाही देईल, पण श्रोते मिळवून देण्याची ग्वाही देऊं शकत नाहीं. एकत्र येण्याचें स्वातंत्र्य देईल, पण, एकत्र आणूं देण्याची व्यवस्था करूं शकणार नाहीं. निश्चित वय प्राप्त झाल्यानंतर स्त्री-पुरुषांच्या विवाहांत कुठलीहि अडचण राज्य आपल्या कायद्यानें ठेवणार नाहीं. कुणालाहि कुणाशींहि विवाह करण्याची मोकळीक तें देईल, याचा अर्थ मनुष्याचें जिच्यावर प्रेम आहे ती स्त्री पत्नी म्हणून मिळवून देईल असा नव्हे. धर्मानें अगर अन्य कारणानें ज्या अडचणी व बंधनें निर्माण केलीं असतील तीं सर्व राज्य दूर करील, पण सामाजिक क्षेत्रांत सक्ति करणार नाहीं. कोणाला नोकर ठेवावें हें राज्य सांगणार नाहीं, पण नोकर ठेवल्यास अमुक एक गोष्टी, रजा, पगार, विमा इत्यादि बाबतींत तें सक्ति करील.

स्वातंत्र्य म्हणजे एक घाऊक असा भाव असला तरी स्वातंत्र्याची मुख्य कल्पना अनेक तपशिलांनीं निर्माण होत असते. मनुष्याचें जीवन विविध, त्याच्या वागणुकीचें व वर्तनाचें क्षेत्र पण विविध असतें. जर त्या त्या क्षेत्रांत स्वातंत्र्य आहे असें गृहीत धरलें

तर त्या व्यक्तीला मनाप्रमाणें वागण्याची मुभा असली पाहिजे. जर ती मुभा नाकारली तर तेथें स्वातंत्र्य नाहीं असें सिद्ध होतें. कांहीं करूं न देणें याचा अर्थ स्वातंत्र्य असाच होतो. तथापि सर्व क्षेत्रांत सर्वशः व्यक्तीला जें वाटेल तें करण्याची मुभा ठेवणें हें अन्य व्यक्तींच्या व समाजाच्या स्वातंत्र्याशीं विसंगत असतें. म्हणून कोणत्या क्षेत्रांत किती मुभा असावी याचा विचार करतांना व्यक्तीचे अधिकार व त्याजबरोबर त्याचीं समाजविषयक व राज्यविषयक कर्तव्यें यांचाहि विचार झाला पाहिजे. व्यक्तीला स्वातंत्र्य हवें आहे व राज्याला सुव्यवस्था हवी आहे. व्यक्ति व राज्य यांचे संबंध तपशीलवार निश्चित करणें हें काम सोपें नाहीं. राज्याच्या कोठल्या बंधनानें व्यक्तीला आपल्या स्वातंत्र्यावर गदा आली असें वाटेल हें त्यानेंच ठरवावयाचें आहे. आणि हें व्यक्तीनें ठरवावयाचें असल्याकारणानें कुठल्या परिस्थितींत व्यक्ति कायदा अवमानील हें सांगणें कठीण. स्वातंत्र्याची व्याख्या म्हणजे राज्याच्या आज्ञाही पाळणें नव्हे. ती १८ व्या शतकांतील विचारसरणी आधुनिक जगांत कोणी मान्य करणार नाहीं. मग व्यक्तीला कायदेभंगाचे प्रसंग त्याच्या जीवनांत येतील हें उघड आहे. प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, जर त्याला प्रसंगविशेषीं कायदेभंग करण्याचा नैतिक हक्क आहे हें मान्य केलें तर त्या विशिष्ट परिस्थितीचा अधिक विचार करावयास पाहिजे. सामान्यपणें त्याच्या व्यक्तिविकासाला अडचणी उत्पन्न होणार नाहींत असें वातावरण समाजांत असलें म्हणजे नागरिकाला स्वातंत्र्य आहे असें वाटतें व असें वातावरण ठेवण्याचें कार्य समाजाचें आहे, राज्याचें आहे. व्यक्तीला जीवन विफल वाटणार नाहीं, त्याला आपला कोंडमारा होत आहे असें वाटणार नाहीं, असें वातावरण निर्माण करावयाचें, या गोष्टीसाठीं समाजामध्यें अगर राजकीय जीवनांत कांहीं नित्य, कांहीं शाश्वत मूल्यें राज्यानें व समाजानें स्वीकारलीं पाहिजेत व तीं प्रभावी राहतील याची काळजी घेतली पाहिजे. या दृष्टीनें राज्याच्या संविधानांत कांहीं मौलिक हक्क जनतेला आहेत याचा स्पष्ट उल्लेख तरी असला पाहिजे; अगर संकेत व परंपरा या इतक्या प्रभावी असल्या पाहिजेत, कीं त्याविरुद्ध जाणें हें राज्यकर्त्यांना अनुचित वाटलें पाहिजे. कठीण वाटलें पाहिजे. त्याचबरोबर संविधानामध्यें सर्व नागरिक-स्वातंत्र्यें दिलीं आहेत, पण तीं जर अनुभवाला येत नसतील तर खरें स्वातंत्र्य तेथें नांदणार नाहीं. संस्था किती जरी चांगल्या हेतूसाठीं असली तरी तिचे हेतु व्यक्तीला अनुभवांत दिसले पाहिजेत. आपण सामान्यपणें योग्य मार्गानें चाललों असतांना राज्याची व्यवस्था अगर कायदे आपल्याला अडथळा करणार नाहींत हा विश्वास उत्पन्न करणारें वातावरण समाजांत असलें पाहिजे आणि तसें नसेल तर स्वातंत्र्य हें औपचारिक राहील, तें अनुभवाला येणार नाहीं. मला योग्य वाटतें तें मी करूं शकतों. माझ्या उत्सवाला तो मर्यादेंत असतांना कोणी बंधन घालणार नाहीं, याची खात्री असली पाहिजे. मी कांहीं नवीन करण्याचें योजलें तर मला तें करतां आलें पाहिजे. अन्याच्यापेक्षां कांहीं निराळें जीवन, अन्याच्यापेक्षां कांहीं निराळे विचार, अन्याच्यापेक्षां कांहीं कर्तृत्व, माझ्या

हिंमतीवर मी करूं लागलों तर त्यापासून मला समाजाकडून त्रास होणार नाहीं असा विश्वास मनांत असला म्हणजे मला स्वातंत्र्य आहे हें खरें ठरतें. मी कोणता व्यवसाय करावा, माझ्या जीवनाचा नकाशा काढण्यांत स्वातंत्र्य असावें, हें मला ठरवितां आलें पाहिजे व तें ठरवीत असतांना अगर जें ठरविलें आहे तें करीत असतांना समाजानें त्यांत अडथळा आणूं नये, अशी परिस्थिति असली पाहिजे. याबरोबर हेंहि खरें कीं, हें जें स्वातंत्र्य आहे, ज्याची मी अपेक्षा करतों व जें मला माझ्या जीवनाला आवश्यक वाटतें, तें अनिर्बंध नाहीं याची जाणीव मला असली पाहिजे आणि तें स्वातंत्र्य राज्याच्या कायद्याशीं जुळणारें असलें पाहिजे. किंबहुना राज्याच्या कायद्यानें त्याबाबत ग्वाही दिली असली पाहिजे. राज्याचा कायदा जेथें प्रवेश करूं शकत नाहीं, असेंहि एक क्षेत्र व्यक्तीच्या सामाजिक जीवनांत असतें. तेथें व्यक्तीच्या स्वातंत्र्याला कायद्याची मर्यादा नसली, तरी समाजांतील प्रस्थापित नीतिमूल्यांची मर्यादा असते.

स्वातंत्र्याचा विचार करतांना वर सांगितल्याप्रमाणें राज्याचा कायदा व समाजांतील नीतिमूल्यें या दोहोंचा विचार वर सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत असतो. स्वातंत्र्य हें जे सत्ताधीश राज्यकर्ते आहेत त्यांच्या जुलमापासून व्यक्तींना वांचविण्याचें एक साधन असें त्याचें थोडेंसें स्वरूप असतें. ज्याच्या हातांत समाजांत सत्ता असते तो सत्तेचा दुरुपयोग केल्याशिवाय राहत नाहीं असा अनुभव आहे. ही गोष्ट केवळ हुकूमशाही राज्यव्यवस्थेंतच होते असें नाहीं, तर लोकशाहींतसुद्धां अधिकारावर आलेला बहुमताचा पक्ष अल्पसंख्याकांवर जुलूम करूं शकतो हाहि अनुभव आहे. सामान्यपणें अधिकारप्राप्तीनंतर मस्ती येते. अधिकाराचा दुरुपयोग होतो, मग तो अधिकार व्यक्तीच्या हातांत असो अगर पक्षाच्या हातांत असो आणि म्हणून त्या सत्तेला मर्यादेंत ठेवण्यासाठीं त्या सत्तेचा वापर योग्य व्हावा यासाठीं राज्यांतील व्यक्तींना स्वातंत्र्याची जरुरी असते. केवळ लोकशाही आहे म्हणून सर्वांचें स्वातंत्र्य अबाधित आहे असें नाहीं. अल्पसंख्याकांवर जुलूम झाल्याचीं व होत असल्याचीं उदाहरणें लोकशाहीव्यवस्थेंत पण दिसून येत आहेत. दक्षिण आफ्रिकेंत वंशशुद्धीच्या नांवाखालीं होणारा अन्याय हें त्याचेंच उदाहरण आहे. राज्यांतील राजकीय अल्पसंख्याकांवरहि अन्याय होत असतो हेंहि तितकेंच खरें. या दृष्टीनें विचार करतांना केवळ व्यक्तीला स्वातंत्र्य आहे एवढ्यावरच भागणार नाहीं. व्यक्तीप्रमाणें धार्मिक, वांशिक, व्यावसायिक, असेहि कांहीं गट राज्यांत असतील, तर त्यांनाहि त्यांच्या उन्नतीच्या दृष्टीनें स्वातंत्र्य असलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर आज कित्येक मुलूख असे आहेत कीं, त्यांच्यावर असणारा अंमल अन्य राज्यांचा आहे. ते पारतंत्र्यांत आहेत. मग तें पारतंत्र्य वसाहतस्वरूपी असो, अगर संरक्षण–व्यवस्थेखालील असो ; अन्य राज्याच्या ताब्यांत असल्यानें तेथें स्वातंत्र्य नाहीं हें उघड आहे. म्हणून स्वातंत्र्याचा विचार

करतांना तें कायद्याशीं जुळून असलें पाहिजे. याचाहि विचार करतांना अंमल चालविणारें राज्य कोणतें व कोणत्या स्वरूपाचें आहे याचाहि विचार करावयास पाहिजे.

लोकशाही राज्यांत अल्पसंख्याकांवर प्रसंगाप्रसंगानें जुलूम होतो हें जरी खरें असलें तरी जास्तींत जास्त स्वातंत्र्य व्यक्तींना व अल्पसंख्य गटांनाहि लोकशाहींतच सामान्यपणें मिळतें हेंहि तितकेंच खरें. जें राज्य लोकशाहीस्वरूपी नाहीं त्या ठिकाणीं स्वातंत्र्य हें थोड्या लोकांची अगर एखाद्या वर्गाची खास मिरास असते. इतिहासाचा अनुभव लक्षांत घेतां व्यक्ति व अल्पसंख्याक यांना संरक्षण लाभावें, या दृष्टीनें लोकशाही ही इष्ट, इतकेंच नव्हे तर आवश्यक असते. तथापि आज भारतांत एक असा विचार बाळगणारा वर्ग आहे कीं, लोकशाही ही सर्व झूट आहे. निवडणुका ह्या अनिष्ट आहेत. दुसरा विचारप्रवाह असा आहे कीं, लोकशाही ही ठीक असली तरी तिचें जें आधुनिक तंत्र आहे तें अयोग्य आहे. माणसांना सद्‌गुणी करण्याऐवजीं तें स्वार्थी करीत असतें. आणखी एक विचारप्रवाह असा आहे कीं, लोकशाहीचें हें तंत्र समाजांत सामाजिक न्याय मिळवून देऊं शकत नाहीं. थोड्या लोकांच्या हातांत अगदीं लोकशाही मार्गानें अगणित संपत्ति जाते व सर्वसामान्य जन दरिद्री राहतात. म्हणून जनसुखाच्या दृष्टीनें लोकशाही अनुपयुक्त ठरते. किंबहुना भारतांत आज लोकशाहीची टिंगल व निंदा करणें ही एक विद्वान् वर्गांत फॅशन झाली आहे. लोकशाही नको तर हुकूमशाही, नोकरशाही अगर तत्सम कांहीं तरी अस्तित्वांत आल्याशिवाय राहणार नाहीं. यांतील अनिवार्यता फार थोड्या लोकांच्या लक्षांत येते. लोकशाहीच्या अभावीं व्यक्तीचें महत्त्व लोपतें. तिच्या अनुभवाला शासक विचारीत नाहींत आणि सामान्यपणें आर्थिक दृष्ट्या थोडें समाधान लाभत असलें तरी मानसिक प्रसन्नता व्यक्तीला लाभत नाहीं. याच्या उलट लोकशाहींतील अनुभव असतो. लोकशाही म्हणजे लोकांनीं सत्ता दिलेलें सरकार व लोकांच्यासाठीं कारभार अशी वस्तुस्थिति असते. निदान सामान्यपणें ती असते एवढें तरी मानण्यास हरकत नाहीं. मतदान करून प्रतिनिधि निवडून देऊन बहुमत असलेल्या पक्षाचें लोकशाही सरकार बनतें. जे कायदे व जे आदेश येणेंप्रमाणें अस्तित्वांत आलेलें सरकार देतें ते सर्वांना सारखे असतात. याचा अर्थ असा नव्हे कीं लोकशाही आहे म्हणून अगर कायदे सर्वांना सारखे आहेत, म्हणून नागरिक सुखी आहेत. व्यक्तीला सुखाचा अनुभव तेव्हां येतो कीं आपल्याला कोणी तरी विचारीत आहे. आपल्या मताला व म्हणण्याला मान आहे. जो कारभार होत आहे त्यांत कोठें तरी स्थान आहे आणि जर आपल्यांत लायकी आहे तर कुठल्याहि अधिकारापासून आपल्याला दूर ठेवलें जाणार नाहीं. लोकशाहीमध्यें सार्वत्रिक मतदानाचा हक्क असल्यानें व्यक्तिमात्राला महत्त्व येत असतें. निवडणुकीच्या संबंधांत प्रत्येक नागरिकाला एक प्रतिष्ठा येते, एक भाव येतो. मनुष्याला त्याच्या लग्नाच्या प्रसंगांत एकदांच सामाजिक प्रतिष्ठा किमान अशी मिळत असते.

'लक्ष्मीनारायणस्वरूपेण वराय' असें त्याचें वर्णन होत असतें, तशीच प्रतिष्ठेची संधी, तसेंच महत्त्व निवडणुकीच्या प्रसंगांत प्रत्येक मतदार नागरिकाला येत असतें. पांच वर्षें कोणी त्याला विचारत नाहीं. पण निवडणुकीची नौबत वाजूं लागली, कीं त्याच्या दारापर्यंत अन्यथा त्याला न विचारणारे येतात. ज्याला कोणी विचारत नव्हतें अशा त्याला उमेदवार व पक्षाचे प्रचारक विचारूं लागतात. थोडक्यांत, प्रत्येक नागरिकाला भाव येतो आणि मग आपल्याला काय हवें आहे तें व आपल्या राजकीय व सामाजिक कल्पना सांगण्याची त्याला संधी मिळते. राज्याचे आपण मालक आहोंत याचा साक्षात्कार त्याला होत असतो. मतदानाचा हक्क नसेल तर हें कांहीं घडत नाहीं. या दृष्टीनें विचार करतां प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा हक्क असतो हें त्याच्या स्वातंत्र्यासाठीं व व्यक्तिविकासासाठीं आणि म्हणून त्याच्या सुखासाठीं अवश्य असला पाहिजे. भारतामध्यें सामान्य जनाला मतदानाचा हक्क नसे त्यावेळीं कोणीं विचारलें नाहीं. राजकीय नाटक कंपन्या मोठ्या शहरांच्याबाहेर आपले खेळ करीत नसत. निवडणुकीचें राजकारण सुरू झाल्याबरोबर खेड्यापाड्यांतून राजकीय पक्ष व महत्त्वाकांक्षी उमेदवार फेऱ्या घालूं लागले. शाळा काढतों, रस्ते बांधून देतों, तहकुबी देववतों, अशी भाषा खेडेगांवांतून सुरू झाली. तीच गोष्ट शहरी भागांतून सुरू झाली. सामान्य जनाच्या इच्छांना महत्त्व आलें. त्यांच्या सुखासाठीं राज्य आहे अशी ग्वाही देण्यांत प्रत्येक पक्ष अहमहमिका करूं लागला. महाराचें दर्शन झालें तर आंघोळ करावी ही वृत्ति कमी झाली. महारवाड्यांतून ब्रह्मकुलोत्पन्न व क्षत्रियकुलावंतास झाडू घेऊन हरिजनवस्ती साफ करूं लागले. चर्चिलनें म्हटलें आहे आहे कीं, 'निवडणुकीच्या निमित्तानें जेवढा समताभाव उत्पन्न होतो तेवढा कशानेंहि नाहीं.' लोकशाहींत अनेक दोष असतील. पण मतदानाचा हक्क हा अनेकदोषपरिहारार्थ मोठा उपाय आहे. आणि तो हक्क असला म्हणजे लोभी सत्ताधीशांना वठणीस आणण्यास उपयोगी पडतो हें निश्चित आहे. सामान्य जनाच्या दुःस्थितीकडे सरकारला लक्ष देण्याला भाग पाडणारें हें मोठें शस्त्र आहे. मतदानाचा हक्क याचा अर्थ कोणीं राज्य करावें हें ठरविण्याचा हक्क आहे. थोडेंसें स्वयंवरासारखें आहे. आपल्या अनुभवाला धरून आपल्या सुखासाठीं राज्यकारभार चालेल या दृष्टीनें कोणता पक्ष अगर कोणती व्यक्ति योग्य हें ठरविण्याची संधी निवडणुकीमुळें जनतेला मिळते. त्याजबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मनुष्याच्या गरजा व कल्पना बदलत असतात म्हणून कोणाहि पक्षाला अगर व्यक्तींना कायमचें सत्ताधीश करणें हें अयोग्य असतें. म्हणून लोकशाहींत ठराविक मुदतीपर्यंतच कोणी व्यक्ति अगर पक्ष सत्ताधीश असतो. लोकशाहींतील मुख्य भाग म्हणजे लोकांचा अनुभव व इच्छा याप्रमाणें कारभार चालवयाचा तर हें सत्तादान निरंतरचें अगर बिनशर्त असतां कामा नये. जर एखाद्या पक्षाला अगर व्यक्तीला कायमची सत्ता दिली तर जनहितापेक्षां स्वजनांचें हितच ते पाहतात हा इतिहासाचा अनुभव आहे. म्हणून दुसरी महत्त्वाची गोष्ट यथार्थ लोकशाहीला

आवश्यक असते ती म्हणजे सत्ताधीश अगर शासन हें जबाबदार असलें पाहिजे. जर सत्ता अगर सरकार हें जबाबदार नसेल तर तें सामान्य जनतेच्या सुखासाठीं राज्य चालविण्याऐवजीं सामान्य जनांना सत्ताधीशांच्या अगर सत्ताधीश वर्गाच्या सुखासाठीं राबवतें. राज्यसत्ता मग लोकांच्या सुखाचें साधन बनण्याऐवजीं लोक हे तिच्या सुखाचें साधन बनतात. लोकशाहीचा अनुभव आणि लोकांनीं स्वातंत्र्यासाठीं केलेले प्रयत्न याचा विचार करतां असें आढळून येतें कीं, सामान्य जनांना कांहीं तरी अधिकार असे असले पाहिजेत कीं ते विद्यमान सरकार अगर शासक यांच्या इच्छेवर अवलंबून असतां कामा नयेत. लोकशाही यथार्थ असावयाची तर सरकारला आपण क्षणांत बाजूला सारलें जाऊं अशी भीति व अशी वृत्ति तेथें असली पाहिजे. आणि तसें असलें म्हणजे जनतेच्या सुखाची काळजी अधिक वाहिली जाते. त्याजबरोबर जनतेचे जे हक्क आहेत त्यावर हल्ला केल्यास जनतेच्या स्वातंत्र्याबाबत कांहीं कमीजास्त केल्यास आपलें आसन स्थिर नाहीं याचीहि जाणीव शासनाला असली पाहिजे. म्हणून हे मौलिक हक्क कुणाच्या औदार्यावर अगर सहिष्णुतेवर अवलंबून न राहतां स्वयंभू असले पाहिजेत. नागरिकत्वाबरोबर ते प्राप्त झाले पाहिजेत. केव्हांहि द्यावेत व परत घ्यावेत असें त्यांचें स्वरूप नसलें पाहिजे.

ज्या मौलिक हक्कांवर राज्यांतील व्यक्तीचें व अल्पसंख्याक गटाचें स्वातंत्र्य अवलंबून आहे, त्या हक्कांवर अतिक्रमण होणार नाहीं व अतिक्रमण झाल्यास तें दूर करण्याची व्यवस्था राज्याच्या संघटनेंत व संविधानांत असली पाहिजे. अन्यथा सदरहू हक्क विटंबन ठरतील. या दृष्टीनें विचार करतांना प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, ही व्यवस्था कोणती व कशा स्वरूपाची असावी, व्यक्तिव्यक्तींत तंटा उपस्थित झाल्यास, अन्याय केला गेल्यास, व्यक्तींना कोर्टाकडे तक्रार करतां येते. तथापि येथें जो आपण विचार करीत आहोंत तो व्यक्तिव्यक्तींतील संबंधाचा नसून व्यक्ति व राज्य यांच्यांत तंटा उपस्थित झाल्यास निःपक्षपातीपणें न्याय झाला पाहिजे यासाठीं व्यवस्था असली पाहिजे. ही व्यवस्था मग सामान्य न्यायालयामार्फत होवो अथवा विशिष्ट न्यायालयामार्फत होवो. या दृष्टीनें न्यायाधीश कोण असावें व त्यांची नेमणूक कोणी करावी हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. ज्यांना आपण सत्तेवर बसविलें ते सत्तेचा वापर निःस्पृहपणें व निःपक्षपातीपणें करतील अशी ग्वाही कोणी देऊं शकत नाहीं. म्हणून निःपक्षपाती न्यायदान हा सुराज्याचा आत्मा आहे. न्यायदान निःपक्षपाती नाहीं असें वातावरण समाजांत उत्पन्न झालें म्हणजे अराजकतेची ती नांदी आहे असें मानण्यास हरकत नाहीं. समाजांत स्वातंत्र्य नांदावयाचें तर राज्याचे कायदे सर्वांना सारखे असले पाहिजेत व त्यांत डावें-उजवें होतां कामा नये. प्रत्येक नागरिकाला तसा विश्वास असला पाहिजे. राज्यांतील कायदे-कानून यांची अंमल-बजावणी करणारी शासन-व्यवस्था आधुनिक राज्यांत फार मोठ्या प्रमाणावर असते व तिला अनंत कामें करावीं लागतात. तथापि शासनाच्या सर्व क्षेत्रांत निःपक्षपातीपणा असला पाहिजे व तसें नसेल तर स्वातंत्र्य अर्थशून्य होतें, म्हणून न्यायदान न्यायाला

धरून व निःपक्षपाती आहे हा विश्वास राज्यांत असावा म्हणून न्यायदानाचें काम, कायद्याचा अर्थ लावण्याचें काम स्वतंत्र व निःपक्षपाती लोकांकडून झालें पाहिजे. राज्यांतील सर्व अधिकारी लहानमोठेसुद्धां विद्यमान सरकार नेमत असतें या दृष्टीनें त्यांच्या नेमणुकीचा प्रश्नहि महत्त्वाचा ठरतो. न्यायदानाचें काम म्हणजे व्यक्तिव्यक्तींतील संबंधांत व त्याचप्रमाणें व्यक्ति व राज्य यांच्या संबंधांत न्याय देणें अशा स्वरूपाचें असतें. राज्य व्यक्तीला विनाकारण स्थानबद्ध करतें, राज्यद्रोहाचा खटला भरतें, त्याच्या हालचालीवर निर्बंध घालतें. या सर्वांबाबत निःस्पृहपणें न्याय द्यावयाचा यासाठीं निःस्पृह न्यायाधीश असले पाहिजेत. आपली नोकरी विद्यमान सरकारच्या मर्जीवर अवलंबून आहे असें असेल तर न्यायाधीश निःस्पृहपणें न्याय देणें अशक्य नसलें तरी असंभवनीय आहे. म्हणून सदसद्विवेक बुद्धीला साक्षी ठेवून निर्णय दिल्यास कुठल्याहि तऱ्हेनें आपल्या बढती व बहालींत गडबड होणार नाहीं, त्याचप्रमाणें कुठलाहि घातपात होणार नाहीं, अशी मनाची खात्री न्यायाधीशाची असली पाहिजे. दिलेला निर्णय सरकारच्या इच्छेप्रमाणें नाहीं म्हणून बदली अगर अन्य कांहीं अन्याय न्यायाधीशावर होतां कामा नये. या दृष्टीनें न्यायाधीशाच्या जागेवर एकदां नेमणूक झाल्यानंतर निवृत्तीचें वय होईपर्यंत न्यायाधीशाबाबत सरकारला कांहीं करतां येऊं नये असें असलें पाहिजे. थोडक्यांत म्हणजे चांगलें वर्तन असेपर्यंत त्याची नेमणूक कायम असली पाहिजे. जर तो अयोग्य वागत असेल, भ्रष्ट असेल, शारीरिक दृष्ट्या असमर्थ असेल तर जरूर त्याला निवृत्त करावें. अमेरिकेमध्यें न्यायाधीश निवडले जातात आणि मग पुन्हां निवडून यावें या दृष्टीनें न्यायदान निःस्पृहपणें न होतां लोकप्रियतेच्या दृष्टीनें होतें. त्याचप्रमाणें न्यायाधीशांची नेमणूक विद्यमान सरकारच्या मर्जीवर ठेवणें हेंहि तितकेंच अनिष्ट आहे. वरिष्ठांची मर्जी पाहून अगर लोकमत पाहून न्याय देणें ही गोष्ट सर्वस्वीं अनिष्ट व हानिकारक आहे. म्हणून एकदां नेमणूक केल्यानंतर सद्वर्तनी असेपर्यंत त्या न्यायाधीशाची नेमणूक कायम राहिली पाहिजे. त्यांत सरकारला हस्तक्षेप करण्याला वाव असूं नये. पण निःस्पृहपणा व निःपक्षपातीपणा केवळ वर सांगितल्याप्रमाणें व्यवस्था असली तरी सर्वथा प्राप्त होईल असें नाहीं. वाक्य व्याकरणदृष्ट्या शुद्ध आहे पण अर्थशून्य आहे असेंहि असतें, म्हणून जो न्यायाधीश असेल त्याची वृत्ति निःस्पृहपणाची असली पाहिजे व निःपक्षपाती न्याय देणें हें त्यानें आद्य कर्तव्य मानलें पाहिजे. न्याय देतांना त्यानें वरिष्ठाची मर्जी पाहून तो देऊं नये. त्याचप्रमाणें लोकमताच्या पसंतीकडे पाहून देऊं नये हें जसें आवश्यक तसें कुठल्याहि राजकीय विचारांच्या दृष्टीनें त्यानें न्याय देऊं नये हें तितकेंच जरूर आहे. निवडणुकीचा निकाल देणाऱ्या न्यायाधीशानें अमुक एक तऱ्हेनें निकाल दिला तर अमुक एक पक्ष रोडावतो अगर फोंफावतो; अगर अमुक एक तऱ्हेनें निकाल दिल्यास एखाद्या राजकीय पक्षाला अडचणींत टाकल्यासारखें होतें हे विचार मनांत आणून न्याय दिल्यास तो न्याय निःपक्षपाती आहे असें म्हणणें बरोबर होणार

नाहीं. निवृत्तीनंतर राज्यपालपद मिळण्याचा संभव आहे अगर अन्य कांहीं स्थान मिळण्याचा संभव आहे असें वातावरण राज्यांत असल्यास न्यायाधीश निःस्पृहपणें न्याय देतीलच असें वाटत नाहीं. पुष्कळ वेळां सत्ताधीश पक्षाकडे झुकतें माप टाकलें जातें व तें टाकणारे न्यायाधीश विद्यमान सरकारच्या पुरस्कारास पात्र होतात असें आढळून येतें. म्हणून निवृत्तीनंतर कार्यकारी सत्तेनें म्हणजे सरकारनें अशा नेमणुका करणें म्हणजे निःस्पृह न्यायदानाच्या दृष्टीनें इष्ट नाहीं.

न्यायाधीशाची नेमणूक झाल्यानंतर त्याची बढती व बहाली याबाबत कुठलाहि अधिकार कार्यकारी सत्तेला असूं नये ही गोष्ट निःपक्षपाती न्यायदानाच्या दृष्टीनें इष्ट आहे. त्याचप्रमाणें आधुनिक राज्य हें सर्वगामी झाल्यानें त्याचें कार्यकारी क्षेत्र जीवनाच्या बहुतेक क्षेत्रांना व्यापून टाकतें. आतां राज्याचें स्वरूप केवळ संरक्षक नसून व्यक्तीच्या व समाजाच्या संवर्धनाची जबाबदारी आधुनिक राज्यानें घेतली आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत नागरिकाच्या शिक्षणाची, योगक्षेमाची, स्वास्थ्याची सर्व जबाबदारी आधुनिक राज्यानें संकल्पानें अगर संविधानानें घेतली आहे आणि या सर्व क्षेत्रांत नियमन करणें, नियंत्रण करणें यासाठीं व्यापक प्रमाणावर राज्य कायदेमंडळामार्फत कायदे करीत असतें. तपशीलवार कायदे करणें कायदेमंडळाला शक्य नसतें, कारण तितका वेळ नसतो. त्याच प्रमाणें तपशीलवार विचार करण्याची विशेष पात्रता कायदेमंडळांतील सभासदांना असतेच असें नाहीं. म्हणून आधुनिक प्रवृत्ति अशी आहे कीं, सामान्य तत्त्वें ग्रथित करणारा मुख्य कायदा करावयाचा व त्यांत कार्यकारी सत्तेला स्वीकारलेल्या तत्त्वाला धरून तपशिला-बाबत नियम करण्याचा अधिकार दिलेला असतो आणि हे नियम मग कार्यकारी सत्ता म्हणजे राज्यकारभारांतील निरनिराळे खातेप्रमुख नियम करीत असतात. नियम केल्या-बरोबर नियमानुसार जे अंमलबजावणी करणारे आहेत त्यांना सत्ता द्यावी लागते. आणि मग पुष्कळ वेळां असा प्रश्न उपस्थित होतो कीं, ज्याला सत्ता वापरावयाची आहे त्यानेंच केलेले नियम मुख्य कायद्याला धरून आहेत कीं नाहीं? अनुभव असा येतो कीं, या नियमाची अंमलबजावणी होतांना अनेक वेळां व्यक्तीच्या स्वातंत्र्याला धोका येतो. व्यक्तीच्या अधिकारावर आक्रमण होतें. मग हें आक्रमण झालें कीं नाहीं, केलेल्या नियमाप्रमाणें वर्तन झालें कीं नाहीं, असे प्रश्न उपस्थित झाल्यास त्यांचा निर्णय देण्याची जबाबदारी न्यायालयावर येते. सामान्यपणें कार्यकारी अधिकारी अगर शासक यांना वकिलाबद्दल व कायद्याच्या कांटेकोरपणाबद्दल प्रेम नसतें. त्यांनींच नियम केलेले असतात व तेच अंमलबजावणी करतात. या परिस्थितींत सर्व प्रसंगीं हे अधिकारी निःपक्षपातीपणें वागतील अशी ग्वाही नाहीं व अनुभवहि नाहीं. कारभाराच्या दृष्टीनें अनेक लहान लहान केंद्रें उत्पन्न केलीं जातात व प्रत्येक ठिकाणीं क्षणाक्षणाला नागरिकांच्या जीवनाबाबत निर्णय घेतले जातात. हे सर्व निर्णय नियमानुसार असले पाहिजेत, हें उघड आहे. म्हणून व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आक्रमण होणार नाहीं या

दृष्टीनें कांहीं तरी संरक्षक योजना त्या बाबतींत असली पाहिजे. सामान्यपणें ज्याला कामकाजाची रीत (प्रोसीजर) म्हणतात ती निश्चित असली पाहिजे. संबंधित नागरिकाला आपलें म्हणणें मांडण्यास संधी मिळाली पाहिजे. आवश्यक तेथें त्यास वकील देऊन आपलें म्हणणें मांडण्यास संधी दिली पाहिजे. त्याचप्रमाणें जेथें नियमाप्रमाणें निर्णय दिला नसेल, त्यावर अपील करण्याचा अगर दाद मागण्याचा अधिकार असला पाहिजे. कार्यकारी अधिकारी यांना झटपट निकाल लावावयाचा असतो ही इच्छा स्तुत्य, पण ह्या झटपटींत नागरिकांच्या मौलिक अधिकारांचा बळी पडतां कामा नये. कांहीं कायद्यांतून नागरिकाला कांहीं गोष्टींविरुद्ध अन्य कोर्टाकडे दाद मागतां येत नाहीं. सार्वजनिक कार्यासाठीं जमीन अगर मिळकत घेण्याचा अधिकार सरकारला आहे, पण जें कारण सार्वजनिक म्हणून सरकार दाखवीत आहे तें कारण सार्वजनिक नाहीं हें कोर्टापुढें मांडण्याचा अधिकार नाहीं. सरकारनें सार्वजनिक म्हटलें म्हणजे तें अखेरचें. अधिकार फक्त नागरिकाला नुकसानभरपाई कमी आहे एवढ्यापुरताच तक्रार करण्याचा राहतो. एका दृष्टीनें हें बावगें नाहीं. तथापि कांहीं तरी आपलें म्हणणें मांडण्याला नागरिकाला हक्क असला पाहिजे. नियमानुसार व कांहीं न्यायदानाचीं जीं मौलिक लक्षणें आहेत त्याविरुद्ध कार्यकारी अधिकारी वागल्यास अपिलाचा अधिकार असला पाहिजे. अलिकडे बहुतेक राज्यांतून ज्याला शासनविषयक कायदा (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह लॉ) म्हणतात असा असतो व त्यामध्यें कामाची रीत निश्चित केलेली असते व त्यामुळें नागरिकस्वातंत्र्यावरील धोका बऱ्याच प्रमाणांत कमी झालेला दिसतो. तथापि जीं मुख्य कोर्टें आहेत त्यांचे अधिकार निरनिराळ्या शासकीय केन्द्रांत होणाऱ्या निर्णयानें कमी होतां कामा नयेत हें इष्ट आहे. आयकराबद्दल एक ट्रिब्युनल नेमलें. वाहतुकीबाबत दुसरें एक मंडळ नेमलें, ही व्यवस्था कारभाराच्या दृष्टीनें सोईची हें मान्य केलें पाहिजे. तथापि ह्याहि मंडळाकडून न्यायदानांतील मौलिक सिद्धान्तांना बाध आला असेल, तर त्याबाबत सामान्य कोर्टाकडे दाद मागण्याची व्यवस्था असली पाहिजे. राज्यकारभारांत इतका तज्ज्ञपणा आला आहे कीं, न्यायदान देण्याच्या दृष्टीनें सर्व कांहीं ज्ञान सामान्य न्यायाधीशाला असतें असें नाहीं. म्हणून तज्ज्ञ बाबतींत निर्णय देणारीं तज्ज्ञ मंडळें असणें इष्ट, तथापि न्यायाच्या सामान्य कल्पना व सामान्य सिद्धान्तांना धरून तज्ज्ञ मंडळाचा निर्णय नसेल, तर सामान्य न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क असला पाहिजे. आजवर सांगितल्याप्रमाणें अनेक स्वतंत्र राज्यकारभारांत काम करीत आहेत त्यामुळें अनेक कारभारविषयक निर्णय लवकर लागतात हें खरें. तथापि मंडळामार्फत न्यायाची व्यवस्था करणें म्हणजे कार्यकारी सत्तेमार्फतच तें न्यायदान करणें असा त्याचा अर्थ आहे. कार्यकारी सत्तेला अनिर्बंध अधिकार देणें हें व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. म्हणून राज्यानें म्हणजे कार्यकारी सत्तेनें अगर सरकारनें कांहीं अन्याय केल्यास

अगर अपकृत्य ( इर्ट ) केल्यास त्याविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार व्यक्तीला असला पाहिजे. अन्यथा स्वातंत्र्य हें अर्थशून्य ठरतें. मग राज्यसत्तेनें केलेला अन्याय एखाद्या अधिकाऱ्यानें केलेला असो अगर राज्यसत्तेनें नेमलेल्या एखाद्या मंडळानें केलेला असो, त्याविरुद्ध दाद मागण्याची व्यवस्था असली पाहिजे. राज्याचा कारभार हा अखेरीस व्यक्तीमार्फतच चालत असतो आणि म्हणून राज्यसत्तेच्या कोणाहि नोकरानें कांहींहि अन्याय केला असला, तरी त्याची जबाबदारी राज्यावर असल्याकारणानें राज्याविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार असला पाहिजे. नोकराची चूक मालकाची नोकरी बजावत असतांना झाली तर त्याबद्दल नोकर जबाबदार नाहीं, मालक जबाबदार आहे, हा खाजगी न्यायांतील सिद्धान्त सरकारी कामाबाबत पण लागू झाला पाहिजे. चूक झाली तर नोकराची असें म्हणून राज्याला जबाबदारी टाळतां येणार नाहीं आणि तशी जबाबदारी जर राज्य टाळूं लागेल तर त्या ठिकाणीं खऱ्या स्वातंत्र्याला धोका आहे हें निश्चित.

आधुनिक शासनांत राज्यकारभाराच्या दृष्टीनें निरनिराळ्या खात्यांतून सत्ता-विभागणी होते आणि कारभाराची कार्यक्षमता उच्च दर्जाची असावी म्हणून कायद्यानें दिलेल्या सत्तेबरोबर आणखी एक सत्ता बहाल केली जाते. तिला मर्जी ( डिस्क्रीशन ) असें म्हणण्यांत येतें. प्रत्येक बाबतींत नियमानुसार कांटेकोरपणें वागल्यास नियमानुसार तो निर्णय ठरेल, पण त्यांत न्याय राहणार नाहीं, विवेक राहणार नाहीं हें खरें. उदा.; रस्त्यामध्यें लघवी केल्यास तो एक गुन्हा आहे व त्याला सहा महिन्यांचीसुद्धां शिक्षा देतां येते, पण किती शिक्षा द्यावी हें अपराधाचें स्वरूप, अपराध केला त्यावेळची परिस्थिति, अपराध्याचें वय, व्यक्तित्व हें लक्षांत घेऊन केली पाहिजे आणि ह्यासाठीं न्यायाधीशाला जसें मर्जीप्रमाणें वागण्याची मुभा आहे तसेंच थोडेंसें शासनामध्यें असलें पाहिजे. आणि मर्जीप्रमाणे वागण्याची सत्ता याचा अर्थ वाटेल त्याप्रमाणें वागण्याची सत्ता नव्हे. मर्जीनुरूप केलेल्या निर्णयांत विवेक असला पाहिजे. कुणाला सवलत अगर सोय करून देण्याच्या इच्छेपेक्षां दिलेल्या निर्णयानें जास्तींत जास्त न्याय दिला व केवळ शब्दमत्सरी न्याय दिला असें होऊं नये. वाटेल तसा उपयोग या मर्जीच्या अधिकाराचा केला तर नागरिकांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण होण्याचा संभव असतो. तो धोका टाळतां आला पाहिजे. त्याचबरोबर राज्यकारभाराची सोय व कार्यक्षमता यांचाहि विचार केला पाहिजे. ज्यावेळीं मर्जीनुसार निर्णय दिला जातो त्या ठिकाणीं कायद्याच्या शब्दांपेक्षां सारासार विवेक याचा प्रभाव न्यायाधीशाच्या मनावर असतो, म्हणून त्याच्या मनाला तसें कां वाटलें हें तोच सांगूं शकतो. आणि म्हणून या मर्जीच्या अधिकाराला कांहीं बंधनें घालावीं हें इष्ट पण मोठें अवघड काम असतें आणि हा मर्जीचा अधिकार इतका व्यापक असतो कीं, कायदेमंडळानें केलेला कायदा मंत्री अगर शासक आपल्या स्वतःच्या मर्जीचा उपयोग करून त्याला व्यर्थ करूं शकतो. किती जरी मर्जीचा अधिकार

योग्य रीतीनें योग्य प्रसंगीं वापरावा असें म्हटलें तरी सगळे प्रसंग मागील अनुभवाप्रमाणें अगर चालू अनुभवाप्रमाणें असतीलच असें नाहीं. तथापि कांहीं मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीनें मागील निर्णय उपयोगी पडतात. न्यायदानांत दाखले (प्रिसिडंट) हे फार महत्त्वाचे मानले जातात. सामान्यपणें दिलेला निर्णय सर्व परिस्थितीचा विचार करतांना उचित, योग्य व युक्तिसंगत (रिझनेबल) वाटला पाहिजे. अर्थात् निर्णय देणाऱ्याला कितीहि जरी बाह्य मार्गदर्शन असलें तरी शेवटीं त्याच्या मनाचा कौल हा निर्णयात्मक ठरतो. आणि मनुष्य कितीहि विवेकी व न्यायनिष्ठ असला तरी त्याच्या हातून चूक होणार नाहीं असें कोणी म्हणूं शकत नाहीं. म्हणून राज्यांतील स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अशा निर्णयाविरुद्ध अपील करण्याची, दाद मागण्याची व्यवस्था असली पाहिजे. गुन्हा जर जामीनक्षम (बेलेबल) असेल तर अपराध्याला जामिनावर सोडलें पाहिजे. पण फार मोठ्या रकमेचा जामीन मागितला गेल्यास त्याचा सरळ अर्थ असा होतो कीं गुन्हेगार तो देऊं शकत नाहीं व त्याला कदेंत राहावें लागतें. या ठिकाणीं न्यायाधीशानें केलेलें वर्तन मर्जीच्या अधिकारांत आहे. पण त्या निर्णयानें त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याला हानि पोंचली हें सरळ आहे. म्हणून असल्या निर्णयाविरुद्ध दाद मागण्याची सोय असली पाहिजे. शासनाच्या कार्यांत वर सांगितल्याप्रमाणें क्षणोक्षणीं निर्णय मर्जीच्या अधिकारान्वयें होतात म्हणून कार्यकारी अधिकाऱ्यानें जें कांहीं केलें असेल तें कायद्यानुसार आहे किंवा नाहीं, वैध (लीगल) आहे किंवा नाहीं, हें ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला असला पाहिजे. याचाच अर्थ असा होतो कीं, कार्यकारी सत्ता (एक्झिक्युटिव्ह) ही न्यायदानी (ज्युडीशरी) सत्तेपासून पृथक् असली पाहिजे. शासनव्यवस्था, शासनांतील कार्यकारी व्यवस्था ही न्यायदानव्यवस्थेपासून पृथक् असली तरच न्याय मिळतो असें नाहीं. पण या दोन्ही व्यवस्था पृथक् असतील तर कार्यकारी सत्तेकडून व्यक्तीविरुद्ध अन्याय होण्याचा संभव, अगर व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्रमण होण्याचा संभव कमी असतो. राज्यांतील न्याय देणारे जर कार्यकारी अधिकारी असतील अगर न्याय देणाऱ्या व्यवस्थेवर कार्यकारी सत्तेची हुकमत असेल तर मिळणारें न्यायदान कार्यकारी सत्तेच्या संकेताप्रमाणें मिळेल हा अनुभव आहे. म्हणून या दोन्ही व्यवस्था निरनिराळ्या असणें हें स्वातंत्र्याच्या दृष्टीनें इष्ट आहे. अशी व्यवस्था असली म्हणजे खरोखर दोषी कोण हें जनतेला ठळकपणें दिसून येतें. भारताच्या संविधानांत कार्यकारी व्यवस्था व न्यायदानी व्यवस्था ही पृथक् असावी असा आदेश आहे. अद्यापि बहुतेक राज्यांतून हें घडून आलें नाहीं आणि त्यामुळें अनेक ठिकाणीं विद्यमान सरकारनें नागरिकांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण केलेलें आढळून येत आहे. संसदीय लोकशाही (पार्लमेन्टरी डेमॉक्रसी) भारतांत प्रभावी आहे. बहुमत प्राप्त झालेल्या पक्षांतून मंत्रिमंडळ बनतें. तें आपला कारभार कसा चालविणार याची जाहिरात पक्षाच्या निवडणुकीच्या कार्यक्रमांत केलेली असते आणि विधिमंडळें जागृत असल्याकारणानें प्रश्न विचारून, ठराव आणून, व अन्य

अगर अपकृत्य ( हर्ट ) केल्यास त्याविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार व्यक्तीला असला पाहिजे. अन्यथा स्वातंत्र्य हें अर्थशून्य ठरतें. मग राज्यसत्तेनें केलेला अन्याय एखाद्या अधिकाऱ्यानें केलेला असो अगर राज्यसत्तेनें नेमलेल्या एखाद्या मंडळानें केलेला असो, त्याविरुद्ध दाद मागण्याची व्यवस्था असली पाहिजे. राज्याचा कारभार हा अखेरीस व्यक्तीमार्फतच चालत असतो आणि म्हणून राज्यसत्तेच्या कोणाहि नोकरानें कांहींहि अन्याय केला असला, तरी त्याची जबाबदारी राज्यावर असल्याकारणानें राज्याविरुद्ध दाद मागण्याचा अधिकार असला पाहिजे. नोकराची चूक मालकाची नोकरी बजावत असतांना झाली तर त्याबद्दल नोकर जबाबदार नाहीं, मालक जबाबदार आहे, हा खाजगी न्यायांतील सिद्धान्त सरकारी कामाबाबत पण लागू झाला पाहिजे. चूक झाली तर नोकराची असें म्हणून राज्याला जबाबदारी टाळतां येणार नाहीं आणि तशी जबाबदारी जर राज्य टाळूं लागेल तर त्या ठिकाणीं खऱ्या स्वातंत्र्याला धोका आहे हें निश्चित.

आधुनिक शासनांत राज्यकारभाराच्या दृष्टीनें निरनिराळ्या खात्यांतून सत्ताविभागणी होते आणि कारभाराची कार्यक्षमता उच्च दर्जाची असावी म्हणून कायद्यानें दिलेल्या सत्तेबरोबर आणखी एक सत्ता बहाल केली जाते. तिला मर्जी ( डिस्क्रीशन ) असें म्हणण्यांत येतें. प्रत्येक बाबतींत नियमानुसार कांटेकोरपणें वागल्यास नियमानुसार तो निर्णय ठरेल, पण त्यांत न्याय राहणार नाहीं, विवेक राहणार नाहीं हें खरें. उदा.; रस्त्यामध्यें लघवी केल्यास तो एक गुन्हा आहे व त्याला सहा महिन्यांचीसुद्धां शिक्षा देतां येते, पण किती शिक्षा द्यावी हें अपराधाचें स्वरूप, अपराध केला त्यावेळची परिस्थिति, अपराध्याचें वय, व्यक्तित्व हें लक्षांत घेऊन केली पाहिजे आणि ह्यासाठीं न्यायाधीशाला जसें मर्जीप्रमाणें वागण्याची मुभा आहे तसेंच थोडेंसें शासनामध्यें असलें पाहिजे. आणि मर्जीप्रमाणे वागण्याची सत्ता याचा अर्थ वाटेल त्याप्रमाणें वागण्याची सत्ता नव्हे. मर्जीनुरूप केलेल्या निर्णयांत विवेक असला पाहिजे. कुणाला सवलत अगर सोय करून देण्याच्या इच्छेपेक्षां दिलेल्या निर्णयानें जास्तींत जास्त न्याय दिला व केवळ शब्दमत्सरी न्याय दिला असें होऊं नये. वाटेल तसा उपयोग या मर्जीच्या अधिकाराचा केला तर नागरिकांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण होण्याचा संभव असतो. तो धोका टाळतां आला पाहिजे. त्याचबरोबर राज्यकारभाराची सोय व कार्यक्षमता यांचाहि विचार केला पाहिजे. ज्यावेळीं मर्जीनुसार निर्णय दिला जातो त्या ठिकाणीं कायद्याच्या शब्दांपेक्षां सारासार विवेक याचा प्रभाव न्यायाधीशाच्या मनावर असतो, म्हणून त्याच्या मनाला तसें कां वाटलें हें तोच सांगूं शकतो. आणि म्हणून या मर्जीच्या अधिकाराला कांहीं बंधनें घालावीं हें इष्ट पण मोठें अवघड काम असतें आणि हा मर्जीचा अधिकार इतका व्यापक असतो कीं, कायदेमंडळानें केलेला कायदा मंत्री अगर शासक आपल्या स्वतःच्या मर्जीचा उपयोग करून त्याला व्यर्थ करूं शकतो. किती जरी मर्जीचा अधिकार

योग्य रीतीनें योग्य प्रसंगीं वापरावा असें म्हटलें तरी सगळे प्रसंग मागील अनुभवाप्रमाणें अगर चालू अनुभवाप्रमाणें असतीलच असें नाहीं. तथापि कांहीं मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीनें मागील निर्णय उपयोगी पडतात. न्यायदानांत दाखले ( प्रिसिडंट ) हे फार महत्त्वाचे मानले जातात. सामान्यपणें दिलेला निर्णय सर्व परिस्थितीचा विचार करतांना उचित, योग्य व युक्तिसंगत (रिझनेबल) वाटला पाहिजे. अर्थात् निर्णय देणाऱ्याला कितीहि जरी बाह्य मार्गदर्शन असलें तरी शेवटीं त्याच्या मनाचा कौल हा निर्णयात्मक ठरतो. आणि मनुष्य कितीहि विवेकी व न्यायनिष्ठ असला तरी त्याच्या हातून चूक होणार नाहीं असें कोणी म्हणूं शकत नाहीं. म्हणून राज्यांतील स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अशा निर्णयाविरुद्ध अपील करण्याची, दाद मागण्याची व्यवस्था असली पाहिजे. गुन्हा जर जामीनक्षम (बेलेबल) असेल तर अपराध्याला जामिनावर सोडलें पाहिजे. पण फार मोठ्या रकमेचा जामीन मागितला गेल्यास त्याचा सरळ अर्थ असा होतो कीं गुन्हेगार तो देऊं शकत नाहीं व त्याला कदेंत राहावें लागतें. या ठिकाणीं न्यायाधीशानें केलेलें वर्तन मर्जीच्या अधिकारांत आहे. पण त्या निर्णयानें त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याला हानि पोंचली हें सरळ आहे. म्हणून असल्या निर्णयाविरुद्ध दाद मागण्याची सोय असली पाहिजे. शासनाच्या कार्यांत वर सांगितल्या-प्रमाणें क्षणोक्षणीं निर्णय मर्जीच्या अधिकारान्वयें होतात म्हणून कार्यकारी अधिकाऱ्यानें जें कांहीं केलें असेल तें कायद्यानुसार आहे किंवा नाहीं, वैध ( लीगल ) आहे किंवा नाहीं, हें ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला असला पाहिजे. याचाच अर्थ असा होतो कीं, कार्यकारी सत्ता ( एक्झिक्युटिव्ह ) ही न्यायदानी ( ज्युडीशरी ) सत्तेपासून पृथक् असली पाहिजे. शासनव्यवस्था, शासनांतील कार्यकारी व्यवस्था ही न्यायदानव्यवस्थेपासून पृथक् असली तरच न्याय मिळतो असें नाहीं. पण या दोन्ही व्यवस्था पृथक् असतील तर कार्यकारी सत्तेकडून व्यक्तीविरुद्ध अन्याय होण्याचा संभव, अगर व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्रमण होण्याचा संभव कमी असतो. राज्यांतील न्याय देणारे जर कार्यकारी अधिकारी असतील अगर न्याय देणाऱ्या व्यवस्थेवर कार्यकारी सत्तेची हुकमत असेल तर मिळणारें न्यायदान कार्यकारी सत्तेच्या संकेताप्रमाणें मिळेल हा अनुभव आहे. म्हणून या दोन्ही व्यवस्था निरनिराळ्या असणें हें स्वातंत्र्याच्या दृष्टीनें इष्ट आहे. अशी व्यवस्था असली म्हणजे खरोखर दोषी कोण हें जनतेला ठळकपणें दिसून येतें. भारताच्या संविधानांत कार्यकारी व्यवस्था व न्यायदानी व्यवस्था ही पृथक् असावी असा आदेश आहे. अद्यापि बहुतेक राज्यांतून हें घडून आलें नाहीं आणि त्यामुळें अनेक ठिकाणीं विद्यमान सरकारनें नागरिकांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण केलेलें आढळून येत आहे. संसदीय लोकशाही ( पार्लमेन्टरी डेमॉक्रसी ) भारतांत प्रभावी आहे. बहुमत प्राप्त झालेल्या पक्षांतून मंत्रिमंडळ बनतें. तें आपला कारभार कसा चालविणार याची जाहिरात पक्षाच्या निवडणुकीच्या कार्यक्रमांत केलेली असते आणि विधिमंडळें जागृत असल्याकारणानें प्रश्न विचारून, ठराव आणून, व अन्य

मार्गानें स्वातंत्र्याचें रक्षण केलें जातें व सरकार हें जबाबदार असल्याकारणानें जनतेच्या हक्कावर विशेष आक्रमण झाल्यास अविश्वाचा ठराव येईल व प्राप्त झालेली सत्ता हिसकून घेतली जाईल या दृष्टीनें स्वातंत्र्यावर आक्रमण करण्यास संसदीय लोकशाहींतील सरकार फारसें धजत नाहीं. तथापि न्यायदान–व्यवस्था व कार्यकारी व्यवस्था या पृथक् असण्यांत अनेक फायदे आहेत.

स्वातंत्र्य रक्षिलें जाईल या दृष्टीनें कार्यकारी सत्ता व न्यायदानी सत्ता ह्या पृथक् असल्या पाहिजेत हें वर सांगितलें. तथापि तेवढ्यानें स्वातंत्र्य–रक्षणाची १०० टक्के ग्वाही मिळाली असें होत नाहीं. स्वातंत्र्यविषयक जे कांहीं कायदे असतील त्यांचाच अर्थ न्यायाधीश लावणार व त्या कायद्यांची अंमलबजावणी कार्यकारी सत्ता म्हणजे सरकार करणार. याचा अर्थ स्वातंत्र्यविषयक कायदे एक तर राज्याच्या संविधानांत (कॉन्स्टिट्यूशन) असले पाहिजेत अथवा राजकीय परंपरा व संकेत प्रभावी असून न्यायालयें व राज्य त्यांची दखल घेतात अशी परिस्थिति असली पाहिजे. संविधानांत स्वातंत्र्यविषयक संरक्षणाची योजना असणें ही गोष्ट आतां आधुनिक राज्यांतील सर्व घटनांतून दिसून येते. फ्रेंचक्रान्तीनंतर नागरिक-स्वातंत्र्याना विशेष महत्त्व आलें. आणि त्यांचा निर्देश घटनाकायद्यांतून अगर संविधान यांत होऊं लागला. कायद्याचे दोन प्रकार असतात. एक घटना-कायदा (ऑरगॅनिक) व एक सामान्य कायदा (ऑर्डिनरी). घटना कायद्यानें राज्याचें स्वरूप, राज्याची रचना, राज्याचे हेतु व आदर्श हे निश्चित केले जातात. सामान्य कायद्यानें नित्याचे व्यवहार यांचें नियमन होतें. जें घटना-कायद्यांत असेल　　वाटेल तेव्हां बदलतां येत नाहीं. घटनेचें महत्त्व व पावित्र्य हें कांहीं निराळेंच असतें. तसेंच घटनेंत बदल करावयाचा झाल्यास त्याच्यासाठीं एक निराळें तंत्र असतें. व त्याचा निराळा मंत्र असतो. आणि घटनाकायद्यांतच त्यांत कसा बदल करावयाचा याची व्यवस्था असते. सामान्य कायदा करणें, त्यांत बदल करणें, तो संपविणें या बाबतींतील रीत अगर प्रक्रिया ही अगदीं सरळ असते. इंग्लंडमध्यें घटनाकायदा असा नाहीं. पण अनेक कायद्यान्वयें राज्याच्या रचनेसंबंधीं व्यवस्था केलेली आहे. निराळा घटनाकायदा तेथें नसल्यानें कुठल्याहि कायद्यांत बदल करावयाचा झाल्यास एकच पद्धत आहे. आयकर अगर वाहतुकीचा बदल ज्या तऱ्हेनें तद्विषयक कायद्यांत करतां येतो त्याच तऱ्हेनें राजा असावा कीं नाहीं, उमराव सभा (हाऊस ऑफ लॉर्डस्) असावी कीं नसावी याचाहि विचार करतां येतो. एकाच लेखणीनें सर्व कार्य करतां येतें पण जेथ घटना–कायदा आहे, तेथें बदल करावयाचा झाल्यास एक खास रीत असते. अमेरिकेमध्यें घटनेमध्यें बदल करावयाचा झाल्यास केवळ कॉंग्रेसच्या दोन्ही सभांतून म्हणजे सेनेट व प्रतिनिधि सभा (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह) यामध्यें ती दुरुस्ती पास झाल्यानें होत नाहीं. संकल्पित दुरुस्त्या जीं घटक राज्यें आहेत त्या राज्यांतील विधानसभेंतून बहुसंख्याक राज्यांतून पास झाल्यास

होते. भारताच्या घटनेप्रमाणें लोकसभेमध्यें एकंदर संख्येच्या बहुमतानें व हजर असलेल्या संख्येच्या दोनतृतीयांशानें मान्यता दिल्यास दुरुस्ती होते. सांगण्याचें तात्पर्य असें कीं, नागरिक-स्वातंत्र्याबाबत, मौलिक अधिकाराबाबत घटनेमध्यें कांहीं व्यवस्था असल्यास स्वातंत्र्य अधिक रक्षिलें जातें हें उघड आहे. आणि हीं स्वातंत्र्य घटना-कायद्यांत निर्देशित असल्यानें न्यायालयें त्यांना बाजूला सारूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें कार्यकारी सत्ता अगर सरकार यालाहि त्या बाबतींत नापसंती असली तरी मान्यता द्यावी लागते आणि बदल करावयाचा म्हटलें तर सोपें नसतें. सामान्य कायद्यांतील बदल करणें सोपें असतें. या दृष्टीनें बदल करतांना मौलिक हक्कांची नोंद घटना-कायद्यांत असणें हें योग्य व स्वातंत्र्य-रक्षणाच्या दृष्टीनें इष्ट. भारताच्या संविधानांत मौलिक हक्कांची नोंद घटना-कायद्यांत असणें हें योग्य व स्वातंत्र्यरक्षणाच्या दृष्टीनें इष्ट. भारताच्या संविधानांत मौलिक अधिकार याचा एक अध्याय अगर प्रकरण आहे, त्यांत भाषण-स्वातंत्र्य, संघ-स्वातंत्र्य इत्यादि स्वातंत्र्यांचा व त्यावरील मर्यादांचा स्पष्ट उल्लेख आहे. आधुनिक राज्यांतील सर्व घटना-कायद्यांत कमीजास्त प्रमाणांत मौलिक हक्कांचा निर्देश केलेला आहे. तथापि घटना-कायद्यांत सर्व व्यवस्था आहे एवढ्यानें स्वातंत्र्य-संरक्षण नागरिकांना निश्चितपणें लाभेल असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण त्याबरोबर हेंहि खरें कीं, सुशिक्षित नागरिक यांच्या डोळ्यांपुढें मौलिक हक्क यांचा विचार सामान्यपणें असतो. मौलिक हक्क किंवा अधिकार हे नित्य जीवनांत उपयोगांत आणले जातात व एका दृष्टीनें ते नागरिकांच्या जीवनाचा स्वाभाविक असा धागा बनतात. एकत्र यावें, चर्चा करावी, सभा भरवाव्यात, भाषणें करावीं, जे आपले विचार असतील ते लेखनद्वारें लोकांपुढें मांडावे, तसेंच राज्यांत कुठेंहि हिंडण्याची मोकळीक आहे, मनाला पसंत असेल तो व्यवसाय करण्याची मुभा आहे, इत्यादि गोष्टी नागरिकाला स्वाभाविक वाटतात. बोलणारा मूर्खासारखा बोलत असेल, सभेमध्यें गोंधळ होत असेल अगर व्यवसायामध्यें अनेक अनिष्ट गोष्टी होत असतील हें सर्व जरी नागरिक पाहात असला तरी या हक्कांना बंदी व्हावी असें त्याला सहसा वाटत नाहीं. घटनेनें सामाजिक जीवनच नियमित होतें असें नव्हे, तर व्यक्तीचें खाजगी जीवनहि न कळत नियमित होत जातें. म्हणून नागरिक-स्वातंत्र्याची व्यवस्था ही इष्ट अशीच आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं घटनेच्या कायद्यांत आहे म्हणून व्यक्तीच्या अनुभवाला तें येतें. पुष्कळ वेळां समाजांत प्रक्षोभ उत्पन्न होतो. जनता विवेकापासून दूर जाते आणि घटनेंत असलेलें स्वातंत्र्य क्षणिक ठरतें. त्याचप्रमाणें संकटकालीन परिस्थिति जाहीर करून अगर तसा दावा सांगून कांहीं काळ का होईना, घटनेंत दिलेलीं स्वातंत्र्यें विद्यमान सरकार निर्बल व निःसत्व करूं शकतें, म्हणून स्वातंत्र्याचें खरें संरक्षण येथपर्यंत सांगितलेल्या सर्व व्यवस्थेपेक्षां नागरिकांच्या निश्चयावर अवलंबून असतें. ज्या प्रमाणांत लोकांचा निश्चय प्रभावी असेल त्या प्रमाणांत घटनेंतील स्वातंत्र्यें लोकांना

उपलब्ध होतात. प्रतिबंधक अटकेच्या कायद्यांत अटक करण्याइतकी परिस्थिति आहे कीं नाहीं हें कार्यकारी सरकार ठरवतें. त्या बाबतींत कोर्टाला हस्तक्षेप करतां येत नाहीं. कोर्ट एवढेंच पाहतें कीं, ठराविक वेळेच्या आंत अटक केलेल्या इसमास अटकेचीं कारणें सांगितलीं आहेत किंवा नाहींत आणि नियमाप्रमाणें अटक झाली आहे कीं नाहीं. अशीं उदाहरणें जर वारंवार होऊं लागलीं आणि जनतेनें तीं निमूटपणें सहन केलीं तर स्वातंत्र्य तेथें आहे असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. म्हणून जनता जागृत असेल तर खरें स्वातंत्र्य जोपासलें जातें व त्याचें सुख लोकांना मिळतें. स्वातंत्र्याची किंमत अखंड जागृति ही आहे.

लोक जागृत पाहिजेत म्हणजे स्वातंत्र्य प्रभावी ठरतें. त्याचप्रमाणें लोक विवेकी पाहिजेत, हेंहि आवश्यक आहे. न्यायाधीशानें न्याय द्यावयाचा तर समाजांतील लोकमत विचारी व विवेकी असेल तर तें सुलभ होतें. न्यायदान हें लोकांच्या स्वातंत्र्यासाठीं, त्यांच्या हक्काच्या संरक्षणासाठीं असतें. न्यायाधीश हा समाजांतील एक घटक असतो. समाजांत वावरत असतो. मित्रमंडळींत चर्चा करीत असतो. समाजांत जें बोललें जातें, जें लिहिलें जातें हें सर्व त्याला माहीत असतें. समाजांतील नीतिमत्तेच्या कल्पनांचा त्याच्या मनावर संस्कार झालेला असतो. समाज वर्गहीन नसल्यानें वर्गविषयक भावनापासून तो संपूर्णपणें अलिप्त असतो असेंहि नाहीं. नकळत कांहीं अस्पष्ट भाव जे सामाजिक जीवनांत वावरत असतात, त्यांचा परिणाम त्याच्या मनावर होत असतो. आणि त्याच्या निर्णयामध्यें त्याला नकळत हे अस्पष्ट भाव प्रभावी ठरत असतात. तथापि हें फार थोड्या प्रमाणावर होतें. कारण, एक प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी तो जाणत असतो, त्याचप्रमाणें अनुभवानें व अभ्यासानें समतोलपणा त्याच्या वागणुकींत व स्वभावांत येत असतो. तथापि सर्वसामान्य जनता जितकी विवेकी नसते तितकी विचारप्रधान नसते. असा अनुभव आहे कीं, ज्या एखाद्या खटल्यांत लोकमत प्रक्षुब्ध झालें असेल व जेथें ज्युरी अगर पंच यांनीं आपलें मत सांगावयाचें असतें तेथें निर्मळ व निःपक्ष न्यायदानाच्या कामीं या पंचांकडून मदत होत नाहीं. ही पंच मंडळी सामान्य जन असतात व पंच झाले म्हणून समाजांतील पूर्वग्रह व समाजाचे दृष्टिकोन हे मनामध्यें घेऊनच ते निर्णय देत असतात. अशा परिस्थितींत न्यायाधीश त्याची इच्छा व निश्चय असूनसुद्धां न्याय देऊं शकत नाहीं. याचें अगदीं ताजें उदाहरण म्हणजे मुंबईंतील नानावटी यांचा कज्जा होय. पंचांचा निर्णय पूर्णतया विकृत व विपर्यस्त होता, हें उघड आहे. म्हणून समाजांतील न्याय व स्वातंत्र्य हें चांगल्या तऱ्हेनें राखलें जावें या दृष्टीनें लोकमत हें विचारी व विवेकी असलें पाहिजे. समाजामध्यें अपकृत्य केल्यास अगर अपराध केल्यास शासन निश्चत मिळतें असें वातावरण असलें म्हणजे स्वातंत्र्य प्रभावी राहतें. सरकारनें अगर सरकारी अधिकाऱ्यानें कांहीं अधिकाराचा दुरुपयोग केल्यास अगर एखादें अपराधी अगर अयोग्य कृत्य

झाल्यास ताबडतोब त्याची दखल घेतली जाईल, हा विश्वास जनतेंत असला पाहिजे. पुष्कळ वेळां समाजामध्यें वातावरण प्रक्षुब्ध होतें. संकटकालीन परिस्थिति म्हणून सरकार कांहीं गोष्टी करतें व पुष्कळ वेळां अधिकाराचा तेथें दुरुपयोग होतो... अक्षम्य कृत्यें केलीं जातात. त्याबाबतची दखल संकटकालीन परिस्थिति समाप्त झाल्यानंतर घेण्याची कांहीं तरी व्यवस्था असली पाहिजे. बेफाम गोळीबार केला, शेकडों माणसें मारलीं गेलीं असें जर घडून आलें असेल तर तेथें चौकशी झाली पाहिजे. अन्याय्य कृत्यें केलीं असतील तर करणाऱ्यास शासन झालें पाहिजे. परिस्थितीला तोंड देण्यासाठीं पोलिसांना गोळीबार करावा लागतो हें मान्य, तसा अधिकार त्यांना न दिल्यास शांतता व सुव्यवस्था राहाणार नाहीं हें खरें. लोकसमूह प्रक्षुब्ध झाला याचा अर्थ तेथें अविचार व अविवेक यांचा कारभार सुरू झाला असा होतो. 'लोक आणि ओक आवरतां आवरेना' हा अनुभव सर्वत्र येतो. लोकांचे प्रिय पुढारीसुद्धां लोकप्रक्षोभाला आवरू शकत नाहींत हा अनुभव हिंदुस्थानांत आहे व अन्यत्रहि आहे. म्हणून प्रत्येक गोळीबाराची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे असा आग्रह अविवेकी तर आहेच, पण राजकीय दृष्ट्या अदूरदृष्टीचा व अराजक वृत्तीला मदत करणारा आहे, म्हणून अवश्य तेवढा व आवश्यक त्या समयापुरता गोळीबार करणें; अगर कांहीं कडक गोष्टी करणें हें आवश्यक मानलें पाहिजे. किंबहुना राज्यसत्तेचें तें कर्तव्यकर्म आहे. पण जेथें जरुरी-पेक्षां अधिक अगर अधिक काळ गोळीबार झाला असेल, अगर अधिक प्रमाणांत कडक वागणूक झाली असेल, तर त्याबद्दल चौकशी व्हावी व दोषी अधिकाऱ्यांना शिक्षा व्हावी हें मान्य केलें पाहिजे. किंबहुना असें करणें समाजांतील स्वातंत्र्याच्या संरक्षणाच्या दृष्टीनें आवश्यक आहे. सोलापुरांत लष्करी कायदा १९३० सालीं पुकारला व त्यांत सैनिकांनीं अगर अन्य अधिकाऱ्यांनीं जें जें कांहीं केलें तें सर्व जरुरीपुरतेंच होतें असें म्हणतां येणार नाहीं. पण सामान्यपणें लष्करी कायद्याच्या अंमलांत जें कांहीं केलें जातें त्या बाबतींत संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध दिवाणी अगर फौजदारी काम चालवितां येत नाहीं. प्रसंग किती कठीण आहे याबद्दलचें मत संबंधित अधिकाऱ्यांचेंच ग्राह्य धरलें जातें व एका दृष्टीनें तें योग्य आहे. तथापि कांहींहि झालें तरी जेथें उघड उघड निर्दयता दाखविली गेली असेल तेथें, अजिबात प्रायश्चित्त न देणें हेंहि अयोग्य आहे. १९१९ सालीं पंजाबमध्यें लष्करी अंमल सुरू झाला आणि उघड उघड जरूर नसतांना गोळीबार केला व लोकांशीं निर्दयतेची वागणूक केली. तथापि त्याबाबत चौकशीसुद्धां केली गेली नाहीं. शासनाच्या दृष्टीनें बंदोबस्त करण्यासाठीं पोलिसांना व लष्कराला सांगावयाचें व त्यांच्यावर चौकशीची व शिक्षेची तरवार टांगती ठेवावयाची हें बरोबर नाहीं. पण त्याचबरोबर कांहींहि मर्यादा पोलीस अगर लष्कर यांच्यावर न ठेवणें हेंहि अयोग्य व नागरिकांच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अनिष्ट आहे.

नागरिकांचें स्वातंत्र्य व राज्याचें संरक्षण या दोन बाबतींत कायमचा व अनिवार्य विरोध आहे असें मानण्याचें कारण नाहीं. तसेंच व्यक्तीचें हित व समाजाचें हित यांतहि न जुळवतां येणारा असा विरोध आहे असेंहि नाहीं. राज्यतंत्र अगर शासनाचें तंत्र असें असतें कीं, तेलाचा थेंब पाण्यावर टाकला असतांना ज्याप्रमाणें तो पसरतो त्याचप्रमाणें सत्तेचा स्वभाव आहे. तथापि सत्ता ही स्वभावतः निःपक्षस्वरूपी आहे, ती तटस्थ असते. तिचा जो उपयोग करील त्याच्या इच्छेनुसार ती वागते, तिचें स्वरूप बनतें. ज्योत प्रकाशहि देईल व आगहि लावील. ती ज्याच्या हातांत आहे त्याची इच्छा तिच्या उपयोगाबाबत प्रभावी असते. अशा स्थितींत राज्यांतील नागरिकांचे हक्क अगर स्वातंत्र्यें विद्यमान सरकारच्या इच्छेवर अमर्यादपणें सोंपविणें हें हितावह नाहीं. तसें झालें तर नागरिकांचें स्वातंत्र्य हें राजसत्तेच्या मर्जीवर व सोईवर अवलंबून राहील. हें न व्हावें म्हणून आधुनिक राजकीय विचारानुसार कांहीं मौलिक अधिकार व कांहीं निर्बंध राज्यसत्तेवर संविधानांतच घालण्यांत येतात. तथापि केवळ संविधानांत राज्यसत्तेवर मर्यादा आहेत अगर मौलिक स्वातंत्र्याबाबत व्यवस्था आहे, एवढ्यानें स्वातंत्र्याचें संरक्षण होईल असें नाहीं व अनुभवहि तसा नाहीं. मौलिक अधिकार महत्त्वाचे हें कोणीहि अमान्य करीत नाहीं. परंपरेनें सदरहू मौलिक अधिकार एकप्रकारें प्रतिष्ठा पावतात व जनमनामध्यें ते रुजले असल्याकारणानें राजसत्ता उघड उघड त्यांवर आक्रमण करीत नाहीं. तथापि आक्रमण न करणें अगर अप्रत्यक्षपणें करणें ही एक गोष्ट आहे. पण जर जनता हक्काबाबत जागृत असेल व राज्यसत्तेचें प्रत्येक कृत्य निरीक्षीत असेल, तपाशीत असेल, तर स्वातंत्र्य हें अबाधित राहतें. त्याच्या पिकाचें संरक्षण होतें. त्या क्षेत्राची नीट बांधबंदिस्ती राहते. समाजामध्यें स्वातंत्र्य असल्यानें नानाविध मतप्रणाली निर्माण होतात आणि पुष्कळ वेळां एकानें केलेला त्याच्या स्वातंत्र्याचा उपयोग दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या उपभोगाआड येतो. सामान्यपणें व्यक्ति स्वतःच्या स्वातंत्र्याबाबत दक्ष असतात व ते जें करतात तें अगदीं योग्य आहे असें मानतात. त्याच्या स्वातंत्र्याआड अन्य विचारसरणी अगर कृत्य आल्यास त्यांना ती गोष्ट स्वाभाविकपणें स्वातंत्र्याचा दुरुपयोग आहे असें वाटतें. शांत चित्तानें व विवेकानें विचार करून वागणारी मंडळी थोडी. जी समतोल वृत्ति न्यायाधीशाची असते ती सर्वसामान्य जनांत दिसून येत नाहीं. म्हणून घटनेंत जें कांहीं असेल त्यानें स्वातंत्र्यरक्षण होईल हें खरें, तथापि जनता जागृत पाहिजे. याचबरोबर सामान्यपणें ती समतोल व विवेक करणारी असली पाहिजे. जनता प्रसंगीं प्रक्षुब्ध होते आणि पूर्वग्रहांना बळी पडून अविवेकी वृत्ति दाखविते आणि तसें झालें म्हणजे अनेक व्यक्तींच्यावर अन्याय होतो. त्याचें स्वातंत्र्य हें अर्थशून्य ठरतें. सामान्य जनता प्रक्षुब्ध होते. एवढेंच नव्हे, तर सरकारसुद्धां प्रक्षुब्ध होतें. त्याचा तोल जातो. तें अविवेकी बनतें. व्यक्ति ज्याप्रमाणें युक्तिवाद करीत असतांना पराजित झाली म्हणजे 'शेषम् कोपेन पूरयेत्' या न्यायानें वागते त्याचप्रमाणें शासनहि वागतें. विशेषतः लोकशाही

राज्यव्यवस्थेंत सत्ताधीश सारासार विचार करून वागण्याचा प्रयत्न करतात, पण जेथें त्यांच्या हितसंबंधाचा प्रश्न येतो त्यावेळीं युक्तिवाद बाजूला करून कांहीं तरी कलागत काढून विरोधकांच्या स्वातंत्र्यावर, मौलिक अधिकारावर आक्रमण करतात. संकटकालीन परिस्थिति नसतांना ती आहे असें जाहीर करतात, अगर ती असली अगर ती असेल तर त्या बाबतींत घटनेनें दिलेले अधिकार ती वस्तुतः संपली असतांनासुद्धां वापरतात. विरुद्ध पक्षांतील अतिरेकी टीकेवर नाराज होऊन सामान्य विरोधाला अराजकीय विरोध मानून कायद्यांतील सर्व शस्त्रें मग राज्यसत्ता उपयोगांत आणते व विरोध निःशेष करण्याचा प्रयत्न करते. म्हणून स्वातंत्र्याचें खरें संरक्षण व संवर्धन व्हावयाचें, तर जनता विवेकी असावी, त्याचबरोबर सरकारहि विवेकी असलें पाहिजे. विरोधकांची विचारसरणी अप्रिय जरी असली तरी तिची कदर केली पाहिजे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे मताबाबत सहिष्णुता समाजांत असली पाहिजे आणि विचाराबाबत समतोलपणा, वागणुकीबाबत सहिष्णुता, या गोष्टी उपजत अशा व्यक्तींना लाभत नाहींत. त्या अनुभवानें व अभ्यासानें व्यक्तीमध्यें येत असतात. स्वातंत्र्याबाबत अखंड जागृत राहिलें पाहिजे व तसें सामान्य जनता न करील, तर स्वातंत्र्य तेथें नांदणार नाहीं हें जसें खरें; त्याचप्रमाणें विचारांत समतोलपणा व वागणुकींत सहिष्णुता हीं अवश्य असलीं पाहिजेत म्हणजे स्वातंत्र्य मूठभर व्यक्तींची अगर एखाद्या विशिष्ट वर्गाची मिरास न ठरतां तें सामान्य जनतेला वारसा ठरतें. प्रत्येकाच्या अनुभवाला तें आलें म्हणजे तें स्वातंत्र्य पूर्ण व अर्थ-पूर्णहि. समाज हा एका दृष्टीनें नित्य व एका दृष्टीनें अनित्य. तो सारखा गतिमानहि असतो व त्याचप्रमाणें कांहीं बाबतींत अगदीं स्तब्ध, स्थिर व गतिशून्य असतो. समाजाचें हें स्वरूप लक्षांत घेऊन स्वातंत्र्याची कल्पना व स्वरूप हें कालानुस्वरूप बदलत असतें. पण त्याचा अंतर्गत भाव कायम असतो. म्हणून तो अंतर्गत भाव कायम ठेवून बदल-णाऱ्या स्वातंत्र्याच्या स्वरूपाचा विचार पुनः पुनः करावा लागतो. संध्या व गायत्री जप जसा खऱ्या ब्राह्मणाला आवश्यक त्याचप्रमाणें स्वातंत्र्याच्या बाबतींतील मंत्र हा नागरिकानें नित्य जपला पाहिजे हेंहि जरूर असतें. नागरिक जागरूक असेल, दक्ष असेल, तर त्याचें स्वातंत्र्य अबाधित राहील. जगाच्या बाजारांत वावरणाऱ्यांनीं सावधान असलें पाहिजे तरच तरणोपाय आहे. रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ सावधपण सर्वत्र विषयीं ’ हाच मुख्य मंत्र नागरिक-स्वातंत्र्याबाबतहि असला पाहिजे.

स्वातंत्र्याची खरी जोपासना व त्याचें संरक्षण, त्याच्यावरील आक्रमणाविरुद्ध धीटपणें बोलण्याची व आवश्यक ती कृति करण्याची बुद्धि नागरिकांत असेल तरच शक्य आहे. किंबहुना अन्यायाची चीड ही स्वाभाविक असली पाहिजे. आज्ञा पालन करणें याच्याइतकेंच आज्ञा मोडणें हें समाजांतील स्वातंत्र्याच्या दृष्टीनें आवश्यक असतें. अन्याय निमूटपणें सहन करणें, स्वातंत्र्यावरील आक्रमण उदासीनपणें पाहात राहणें ही स्थिति ज्या समाजांत आहे, त्या समाजाचें खरें स्वातंत्र्य फार काळ टिकणार

नाहीं. नागरिकांत ही वृत्ति कशी येईल व कशी येते याचा विचार करणें जरूर आहे. मूठभर लोकांत ही वृत्ति असून भागत नाहीं. कारण मूठभर लोकांना बगलेंत मारणें, प्रलोभनें दाखवून निःसत्व करणें, अगर सरळ चिरडून टाकणें हें सत्ताधीशांना सहज करतां येतें आणि सामान्य जनमत उदासीन अगर निष्क्रिय असल्यानें हे न्यायाविरुद्ध ओरडणारे अल्पसंख्य वेडे अगर व्यवहारशून्य मानले जातात. या दृष्टीनें विचार करतां ही अन्याय-प्रतिरोधाची वृत्ति, त्यागपूर्वक स्वातंत्र्यसंरक्षणाची वृत्ति ही सर्व समाजांत असली पाहिजे. ती स्वातंत्र्यसंरक्षणासाठीं व समाजाच्या नैतिक उन्नतीसाठीं आवश्यक आहे. या दृष्टीनें विचार करतां शासनाच्या कार्यांत नागरिकांचा संबंध जितका अधिक येईल तेवढें ही वृत्ति निर्माण करण्याच्या दृष्टीनें व जोपासण्याच्या दृष्टीनें इष्ट ठरतें. राज्यांतील सत्ता केंद्रित असेल तर तिचा संबंध सामान्य जनतेशीं थोडा येतो व तशी केंद्रित झालेली सत्ता थोड्या लोकांच्या अनुभवावर आपलें धोरण आंखीत असते व थोड्यांचें मत म्हणजे जनमत मानून आपला कार्यक्रम रचत असते. जोडा कोठें चावतो हें घालणाऱ्याला कळतें, तें तो विकणाऱ्या दुकानदाराला कळत नाहीं. 'पाण्यामाजी मीन राहतो कैसा, जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे' ही उक्ति सार्थ आहे. म्हणून ज्यांच्या जीवनावर राजकीय अगर शासकीय निर्णयानें परिणाम होणार आहे, त्यांचा अनुभव, त्यांच्या मनांतील विचार समजून घेणें केवळ प्रस्तुत आहे, एवढेंच नव्हे तर सुराज्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे. म्हणून सत्तेचें विकेंद्रीकरण करणें हें इष्ट असतें. विकेंद्रीकरण झाल्यानें समाजांतील अधिकाधिक भाव व व्यक्ति शासनाच्या सान्निध्यांत येतात व त्यांचें सहकार्य उपलब्ध होतें. सत्ता व स्वातंत्र्य यांच्या एकत्र येण्यानें संघर्ष टळतात. नागरिक व शासक या उभयतांची सोय करण्याकडे मग स्वाभाविक प्रवृत्ति होते. शासनाच्या क्रियेशीं संबंध येत असल्यानें कांहीं आक्रमण झाल्यास ताबडतोब लक्षांत येतें आणि अशा रीतीनें जी जागृत वृत्ति असावी ती त्या ठिकाणीं उत्पन्न होते, वाढीला लागते. सामान्यपणें आपल्या सल्ल्यानें, आपल्याला विचारून निर्णय झाले असें मग नागरिकांना वाटतें आणि आपले निर्णय आपण पाळले पाहिजेत ह्या नैतिक जबाबदारीची भावना त्यांच्यांत जागृत होते. इतिहासाचा अनुभव असा आहे कीं, सुराज्य हें महत्त्वाचें खरें; पण स्वराज्याची बरोबरी तें करूं शकत नाहीं. जें वरून लादलें गेलें असेल त्याबाबत तें उपयुक्त असूनसुद्धां जनता त्याबाबत उदासीन असते. पण लोकांना विचारांत घेऊन त्यांच्या इच्छा जाणून, त्यांच्या सल्लामसलतीनें जें होतें तें जनतेला उल्हसित करणारें असतें. त्याचप्रमाणें स्वाभाविक प्रेरणेनें मनुष्यांतील ज्येष्ठ व श्रेष्ठ, उत्कट व भव्य जितकें निर्माण होतें तितकें कोणा बाह्य शक्तीनें आज्ञापून, किंबहुना आग्रह करूनसुद्धां होत नाहीं. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या प्रवृत्तीनुसार, त्याच्या प्रेरणेनुसार पूर्णपणें बिनमर्यादेनें करूं दिल्यास तेंहि बरोबर नाहीं. कारण समाजामध्यें जीवनाच्या कांहीं क्षेत्रांत व कांहीं बाबतींत एकता

व समानता असावी लागते, पण त्याजबरोबर व्यक्तीला आपल्याला स्वतंत्रपणें विचार करण्याची व मर्यादेंत वागण्याची, आपले विचार समाजापुढें मांडण्याची मोकळीक आहे याची जाणीव असली म्हणजे स्वातंत्र्यसंरक्षणाची बुद्धि व प्रवृत्ति त्याच्यामध्यें उत्पन्न होते व फोंफावते.

समाज व व्यक्ति यांच्या दृष्टिकोनांत व त्यांच्या गरजेंत, त्यांच्या आवश्यकतेंत विचारपूर्वक समझोता अगर समन्वय घडवून आणणें हें विचारपूर्वक झालें पाहिजे. आपोआप घडून येईल असें म्हणून भागणार नाहीं. आपोआप घडून येण्याच्या क्रियेंत पुष्कळ वेळां चांगलें व उपयुक्त हें बळी पडतें व पुष्कळ वेळां अशी कांहीं जुळणी होते कीं, क्षणभर सुखाची व शांततेची वाटणारी क्रिया अंतीं विस्फोटक व विघटनात्मक ठरते. म्हणून व्यक्तिविषयक काय, समाजविषयक काय, किंवा गटविषयक काय हें ठरविण्याच्या दृष्टीनें कांहीं सिद्धान्त मनाशीं ठरविले पाहिजेत. सामान्यपणें त्याचें वर्गीकरण केलें पाहिजे आणि जें ठरविलें गेलें असेल त्याला जेथें जरूर तेथें कायद्याचा पोषाख दिला पाहिजे व जरूर तेथें सामाजिक संकल्प व संकेत यांच्यावर सोंपविलें पाहिजे. अगदीं यादी करून प्रत्येक तपशील ठरविणें प्रगतिपर समाजांत कठीण असतें. तथापि अनेकांनीं व्यक्तिगत कोणतें असावें, सामाजिक कोणतें असावें व नागरिकांचें खास असें क्षेत्र कोणतें, राज्याचें असें क्षेत्र कोणतें, याचा विचार केलेला आहे. समाजामध्यें पोषाख केला पाहिजे, विनपोषाखानें नागडें असें सार्वजनिक ठिकाणीं जाणें मना आहे. हें सार्वजनिक वागणुकीचें क्षेत्र राज्याचें व समाजाचें. पोषाख केला पाहिजे ही राज्याची आज्ञा मानली पाहिजे. पण अमुकच तऱ्हेचा व अमुकच रंगाचा तो असला पाहिजे, असा आग्रह राज्य करणार नाहीं. त्या बाबतींत व्यक्तीला आपल्या मर्जीप्रमाणें वागण्याची मोकळीक असते. सामाजिक संकेत त्याहि बाबतींत व्यक्तीच्या इच्छा मर्यादित करीत असतात. काय विचार करावा, काय खावें, हें व्यक्तीचें क्षेत्र. काय वाचावें, कोणतें ज्ञानार्जन करावें हें सामान्यपणें व्यक्तीचें क्षेत्र. तथापि अश्लीलता अगर अराजकता यांचा विचार करून कांहीं मर्यादा समाज व राज्य जरूर घालील. व्यक्ति व समाज ह्यांच्या संबंधांत जशी कांहीं व्यवस्था असली पाहिजे, तशीच केवळ नागरिक व राज्य यांचे जे संबंध असतात त्याहि बाबतींत असली पाहिजे. त्याचप्रमाणें स्वातंत्र्याच्या संवर्धनाच्या दृष्टीनें सत्तेचें विकेंद्रीकरण असावें हें इष्ट व आवश्यक मानल्यानंतर मग विकेंद्रीकरण कसें असावें याचाहि विचार प्रस्तुत ठरतो. कोणतीं कामें व कोणते विषय मुख्य सत्तेनें घ्यावेत, कोणते विषय स्थानिक सत्तेनें घ्यावेत, संयुक्त राज्यव्यवस्थेंत मध्यवर्ती सत्तेनें कोणतीं कामें करावीं व घटकराज्यानें काय कामें करावीं ह्या-संबंधींहि कांहीं सिद्धान्त असले पाहिजेत. भारताच्या घटनेमध्यें जी कार्यविभागणी केली आहे ती या देशांतील पूर्वीचा अनुभव व अन्य संयुक्त राज्यांचा अनुभव लक्षांत घेऊन केली आहे. जें संयुक्त राज्याच्या दृष्टीनें आवश्यक तें मध्यवर्ती सरकारकडे यावें

हें उघड. देशाचें संरक्षण हें सर्व देशाचें कार्य म्हणून संरक्षणाची व्यवस्था मध्यवर्ती सरकारकडे असावी हें युक्त ठरतें. त्याचप्रमाणें परराष्ट्रीय संबंध हेहि मध्यवर्ती सरकारकडे येणें अपरिहार्य ठरतें. महाराष्ट्र राज्याचें परराष्ट्रीय धोरण व बंगालचें परराष्ट्रीय धोरण हें निराळें असूं शकत नाहीं. कारण आंतरराष्ट्रीय दृष्टीनें भारत हें एक राज्य आहे व त्यांतील घटक राज्यें हीं भारत राज्याच्या सुव्यवस्थेच्या दृष्टीनें, राज्यकारभाराच्या दृष्टीनें निर्माण केलीं आहेत. तीं स्वतंत्र राष्ट्रें नव्हत. अलमारीमध्यें अनेक कप्पे असतात, पण त्यांतील एक काढून पृथक् करतां येत नाहीं. प्रत्येकाला स्वतंत्र अस्तित्व आहे, पण पृथक्पणा असा तेथें येऊं शकत नाहीं. देशामध्यें एक चलन असलें पाहिजे. एक व्यापारी-धोरण असलें पाहिजे. वाहतुकीची व्यवस्था एकसूत्री असली पाहिजे. ह्या दृष्टीनें हे सर्व विषय मध्यवर्ती सत्तेकडे येणें अनिवार्य ठरतें. त्याचप्रमाणें जीं कार्यें व जें क्षेत्र स्थानिक स्वरूपाचें, स्थानिक गरजेशीं ज्याचा संबंध अधिक आहे तीं कामें साहजिकपणें स्थानिक सत्तेकडे अगर संयुक्त राज्याच्या संदर्भात सांगावयाचें झाल्यास घटक राज्याकडे असलीं पाहिजेत. पुण्यांतील सडका सीमेन्टच्या असाव्यात का डांबरी असाव्यात याचा विचार पुणें नगरपालिकेनें करणें इष्ट. त्याचा विचार महाराष्ट्र राज्यांतील मुख्य सत्तेनें करणें हें उघड उघड गैर ठरतें. त्याचप्रमाणें जंगलें कशीं राखावीं व वाढवावीं. शिक्षणाची व्यवस्था–धोरण नव्हे–कशी असावी हें घटक राज्यांनीं ठरविणें अधिक योग्य. बारीकसारीक गोष्टीसाठीं खेड्यांतील लोकांना मुंबईला जावें लागल्यास कारभार नीट होणार नाहीं. लोकांना समाधान वाटणार नाहीं. एकंदरीनें एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत व्यक्ति व समाज, व्यक्ति व राज्य यांच्या संबंधांत जास्तींत जास्त समन्वय घडून आणला पाहिजे हें उघड आहे.

व्यक्ति व समाज ह्यांचे संबंध, नागरिक व राज्य ह्यांचे संबंध काय असावे, हें ठरवितांना जास्तींत जास्त प्रमाणांत व्यक्तीच्या इच्छा व त्यांचे अभिप्राय विचारांत घेतले गेले पाहिजेत. त्याचप्रमाणें व्यक्तीला त्या निर्णयांत आपल्यालाहि स्थान होतें असें वाटलें पाहिजे आणि जेव्हां एखाद्या निर्णयापासून मोठ्या प्रमाणांत असंतोष निर्माण होतो त्या वेळेला तो निर्णय जबरदस्तीनें अंमलांत आणणें राज्याच्या स्थैर्याच्या व स्थापनेच्या दृष्टीनें अनिष्ट ठरतें. लोकांचें मन जाणून घेणें व त्यांच्या इच्छेला जास्तींत जास्त मान देणें हें आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानाचा दृष्टीनें राज्याचें मुख्य कर्तव्य मानलें जातें. लोकांच्या इच्छा जाणून घ्यावयाच्या ही गोष्ट महत्त्वाची, पण सोपी नाहीं. लोकांचें समाधान नक्की कशांत आहे हेंहि अगदीं निश्चितपणें जाणणें ही मोठी गोष्ट आहे, पण जाणून घेतली पाहिजे हेंहि तितकेंच आवश्यक व महत्त्वाचें आहे. कारण राज्य शेवटीं जे निर्णय घेतें ते कायद्याच्या स्वरूपांत असतात म्हणून नागरिकांवर ते बंधनकारक ठरतात व राज्याच्या कायद्यांचें पालन अगर राज्याज्ञेचें पालन यांवर सर्व राज्याची उभारणी आहे. नागरिक कायदा मानतात म्हणून राज्य चालतें. अन्यथा तें राज्य नसून एक

अराजक ठरतें. कोणी कोणाला विचारीत नाहीं. 'जिसकी लाठी उसकी भैंस' अशी अवस्था व अव्यवस्था तेथें दिसून येते. या दृष्टीनें राज्याच्या कायद्यामागें जास्तींत जास्त लोकांचा अनुभव प्रभावी असला पाहिजे हें उघड आहे. जास्तींत जास्त समाधान याची निर्मिती जास्तींत जास्त विचारविनिमय केल्यानें होते. सल्लामसलतींतून समाधान जन्माला येतें असें म्हणण्यास हरकत नाहीं आणि जेव्हां आपल्याला विचारलें गेलें, आपण विचारविनिमयांत भाग घेतला, अशी जाणीव जेव्हां नागरिकांना असते तेव्हां निर्णय पाळणें हें मनापासून व चांगल्या रीतीनें त्याच्याकडून होतें. सामान्य वैयक्तीक व्यवहारांतसुद्धां मला विचारलें होतें, माझा सल्ला घेतला होता, अशी व्यक्तीला महत्त्व देणारी भावना असली म्हणजे व्यक्तीचें सहकार्य व व्यक्तीला संतोष अधिक वाटतो. आपल्याला विचारलें गेलें याचा अर्थ आपण कोणी तरी आहोंत हा विश्वास त्या व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होतो. कोणी फडतूस मनुष्य आपण नाहीं. एकंदर चित्रांत कोठें तरी आपण आहोंत या जाणीवेनें त्याचें मन खुलतें, त्याची अस्मिता फुलते व त्याचा दृष्टिकोन अधिक सृजनशील होतो. राज्य आपल्या गरजेचाहि विचार करतें, याची जाणीव त्याच्या राज्यविषयक निष्ठेला द्विगुणित करणारी ठरते. मनुष्याला विचारलें म्हणजे त्याला विचार करावा लागतो आणि एकदां विचार करूं लागला म्हणजे शक्याशक्यतेचा, योग्यायोग्यतेचा तो विचार करतो व कुठल्याहि प्रश्नावर वा घटनेवर त्याचा अभिप्राय अधिक समतोल, अधिक विवेकी होतो. त्याचप्रमाणें न विचारतां, न सल्लामसलत घेतां कांहीं लादलें गेलें तर साहजिकच त्याची प्रतिक्रिया विरोधी स्वरूपाची होते. राज्य सामान्यपणें प्रमुख प्रमुख प्रश्नांबाबत नागरिकांना विचारीत आहे या परिस्थितीमुळें नागरिक विवेकी होतात, आपल्या अधिकारांबाबत जागृत होतात आणि जसे ते जागृत झाले म्हणजे खऱ्या अर्थानें स्वातंत्र्याचे ते संरक्षक बनतात. त्यांच्या इच्छेविरुद्ध राज्यानें कांहीं केल्यास त्यालाच ते विरोध करतील, निषेध करतील, आणि त्यांचा विरोध व निषेध याला न जुमानतां राज्य कांहीं करील तर राज्याच्या स्थैर्यास धोका उत्पन्न होतो, याची जाणीव राज्याचें प्रतिनिधिस्वरूप म्हणजे विद्यमान सरकार याला असते. ज्या ठिकाणीं लोकशाही राज्यव्यवस्था आहे, अगर ज्या ठिकाणीं या नाहीं त्या स्वरूपांत लोकांच्या म्हणण्याला मान आहे, त्या ठिकाणीं विद्यमान सरकार लोकमतावर अवलंबून असल्यानें अगर लोकमत बाजूला ठेवणें त्याला इष्ट वाटत नसल्यानें लोकमताचा संपूर्णपणें अनादर करून तें वागत नाहीं. लोकमत सामान्यपणें जागृत असलें तरी प्रत्यक्ष सरकारला विरोध करणारे अगर निषेधाच्या पायीं सर्वस्व पणाला लावणारे असे थोडे असतात हें खरें, तथापि ही मंडळी, या थोड्या व्यक्ति, आपल्या आदर्श आचरणानें अगर तळमळीनें जनमनाला आव लावतात हेंहि तितकेंच खरें. हीच थोडीशी मंडळी खरोखर स्वातंत्र्याचे संरक्षक असतात. अधिकाराच्या गांवकीचे ते जागले असतात. जगाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत आपल्याला असें आढळून येईल कीं,

मूठभर व्यक्तींनीं आपल्या निर्भयपणानें व निश्चयानें मोठमोठ्या कार्यांची सुरुवात केलेली आहे आणि हा निर्भयपणा व हा निश्चय समाजांतील केवळ मूठभर व्यक्तींतच न राहतां अधिक व्यापक बनतो. किंबहुना अन्यायाची चीड हें त्या समाजाचें लक्षण बनतें. त्या वेळेला त्या समाजांत स्वातंत्र्य पूर्णपणें विलसतें.

सामान्यपणें जें प्रचलित आहे, तें बहुतेकांना पसंत असतें. पसंत नसलें तरी त्याबाबत ते उदासीन असतात. समाजांत कांहीं जें होत आहे हें अटळ व अनिवार्य आहे म्हणून प्रज्ञाहत होऊन अगतिक होतात. कांहीं थोडेसे धडपड करतात व जे आवांक्याबाहेर आहे तें बदलण्याचा प्रयत्न करतात. कांहीं यशस्वी होतात. कांहीं समाजाच्या कुत्सित वृत्तीचे विषय बनतात. तथापि जगांतील मोठमोठ्या, इतिहासाचा ओघ बदलणाऱ्या गोष्टी या थोड्या निश्चयी व्यक्तींच्या प्रयत्नाच्या गोमुखांतून उगम पावतात. समाजांतील आदर्श पाळण्याची ही तपश्चर्या सर्वसामान्य लोकांकडून होत नाहीं. सतत जागृत राहण्याचेंहि कार्य सर्व नागरिकांकडून होत नाहीं. आधुनिक लोकशाही राज्यांत हें जागृतीचें कार्य प्रतिनिधिद्वारा केलें जातें. जें व्यक्तीनें करावयाचें तें राजकीय संस्थांमार्फत केलें जातें. एका दृष्टीनें समाज हें कार्य कांहीं संस्थांवर सोंपवून देतो व सर्वसामान्य जन आपले प्रतिनिधि निवडून देऊन आपल्यावरचा भार प्रतिनिधींवर टाकत असतो. पुरोहितद्वारा केलेलें धर्मकृत्य हें जसें सर्वश्रेष्ठ कोणी मानत नाहीं, त्याचप्रमाणें नागरिकानें केवळ प्रतिनिधि निवडून दिल्यानें कर्तव्यपूर्ति झाली असें म्हणणें बरोबर नाहीं. निवडणुकीच्या द्वारें जनमन अजमावलें जातें हें खरें. नागरिकाला असा विश्वास वाटतो कीं, आपल्या गरजा काय आहेत, आपल्या अपेक्षा काय आहेत याची जाणीव आपल्या प्रतिनिधीला आहे व आपलीं गाऱ्हाणीं लोकसभेच्या वेशीवर टांगलीं जातील असा त्याला विश्वास असतो. नागरिकांचें स्वातंत्र्यसंरक्षण करण्याची हमी प्रतिनिधीनें घेतलेली असते असा विश्वास त्या ठिकाणीं असतो. तथापि केवळ प्रतिनिधि निवडण्यानें आपलें कर्तव्य संपलें असें नागरिक मानील तर तें चुकीचें आहे. प्रतिनिधि हे नेहमींच योग्य निःस्पृह व कर्तव्यदक्ष असतातच असें नाहीं. लोकशाही म्हणजे पक्षबाजी व पक्षबाजीच्या राजकारणांत राजाचा रंक व रंकाचा राव केव्हां होईल याचा भरंवसा नसतो. सर्वच प्रतिनिधि स्वतःच्या हिताबद्दल उदासीन नसतात व अनेक प्रसंगीं स्वतःचें हित म्हणजे मतदारसंघाचें हित असें गणित करून स्वतःचा स्वार्थ सोज्वळपणें साधतात. भारतांत तर लोकशाही ही व्यवस्था नवीनच आहे म्हणून सर्वस्वी लोकप्रतिनिधींवर सोंपवून स्वातंत्र्य रक्षिलें जाणार नाहीं. सर्व ओझें संतांवर टाकून भागणार नाहीं. भक्तानें पण थोडेंसें ओझें उचललें पाहिजे. त्याजबरोबर लोकशाहीचें राज्यकार्य कसें चालतें याचा विचार करतांना संपूर्णपणें संसद अगर पार्लमेंट हेंहि स्वातंत्र्याचें रक्षण करूं शकेल असेंहि म्हणवत नाहीं. दक्षप्रतिनिधि निवडून दिला. पार्लमेंटनेंहि चांगला कायदा केला तथापि अंमलबजावणी करणारी शासनव्यवस्था

पार्लमेंटच्या उद्देशाची पूर्ति पूर्णपणें करीलच अशी ग्वाही देतां येत नाहीं आणि आधुनिक राज्याचें वाढतें कार्यक्षेत्र लक्षांत घेतां शासन काय करतें, कसें करतें, केव्हां करतें, याची दखल नागरिकांनीं अधिक घ्यावयास हवी आहे. निवडणूक पांच वर्षांनीं एकदां होणार. पार्लमेंट सटीसहामासीं भरून कायदे पास करणार. नागरिकांच्या जीवनाशीं क्षणोक्षणीं, दररोज जो संबंध येतो तो शासनव्यवस्था आणि या दृष्टीनें शासनव्यवस्थेवर सतत निरीक्षण राहील व तिला नागरिकांच्या जीवनावर, स्वातंत्र्यावर आक्रमण करण्याची संधी मिळणार नाहीं अशी कांहीं तरी व्यवस्था हवी आहे. ही व्यवस्था शासनाच्या खालच्या स्थरांतील केंद्रापासून अगदीं खात्याच्या मुख्य केंद्रापर्यंत असली पाहिजे. कायदा चांगला कीं वाईट, नियम उपयुक्त कीं अन्यथा हें, त्यांचा नागरिकांना प्रत्यक्ष जीवनांत काय अनुभव येतो यावरून ठरवावयाचें असतें. आंबा वरून पिवळा व पिकलेला दिसतो आहे, पण खातांना जर तो आंबट अगर अन्यथा त्याची चव लागेल, तर वरून तो कितीहि चांगला असला तरी त्याचा उपयोग नाहीं. म्हणून कायद्याची अंमलबजावणी ज्यांच्या जीवनावर त्याचा परिणाम होणार आहे त्यांना विचारून, त्यांची सल्लामसलत घेऊन व्हावयास पाहिजे आणि जास्तींत जास्त लोकांना आपला अनुभव सांगतां यावा, जास्तींत जास्त लोकांची सल्लामसलत विचारांत घेतली जावी, ह्या दृष्टीनें मागें सांगितल्याप्रमाणें सत्तेची विभागणी व विकेंद्रीकरण जास्तींत जास्त असलें पाहिजे. दिल्लीला बसून भांबुर्ड्याचें राजकारण करणें हें अशक्य. सर्वसामान्यपणें मर्यादा मुख्य व मध्यवर्ती सरकारनें घालणें हें योग्य, पण बारीकसारीक गोष्टी ज्याचा संबंध व प्रभाव मर्यादित क्षेत्रांत व मर्यादित समूहापर्यंत असतो तीं कामें त्या स्थानिक क्षेत्रांतच राहणाऱ्या लोकांच्या सल्ल्यानें व्हावीं हें योग्य. लोकांच्यावर जबाबदारी टाकली म्हणजे जबाबदारीची जाणीव त्यांना होते व ती जाणीव झाली म्हणजे जबाबदारी पूर्ण करण्याच्या दृष्टीनें माणसें विचार करूं लागतात व तीं विचार करूं लागलीं म्हणजे चातुर्य प्रसवतें. कौशल्य उदित होतें. जबाबदारी सामुदायिक असल्यानें सामुदायिक व सामान्य गरजांचा विचार मग अधिक होतो. सामान्य व सामुदायिक गरजा कोणत्या ह्याची पण जाणीव तेथें उत्पन्न होते. सामुदायिक गरजाची जाणीव आहे व त्याचप्रमाणें त्या पुऱ्या करण्याची थोडी तरी सत्ता आहे या परिस्थितींत त्यांना उल्हास वाटतो. त्यांच्या प्रयत्नांना तेज येतें व प्रयत्नान्तीं फलप्राप्ति झाल्यानें जो एक आनंद निर्माण होतो तो त्यांच्या व्यक्तिविकासाला जोपासणारा व सामुदायिक प्रतिष्ठेला वाढविणारा असतो. वरून कांहीं तरी लादलें, प्रयत्न न करतां कांहीं सुखसोयी लाभल्या यांत आनंद असला, तरी व्यक्तीच्या नैतिक जीवनावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं. आज विकासक्षेत्रें देशभर दिसून येत आहेत. अनेक खेड्यांतून रस्ते, विहिरी, शाळा, चावड्या आधुनिक शेतीची माहिती देणारीं केंद्रें आज उपलब्ध झालीं आहेत. पण या सर्व गोष्टी शासनामार्फत व शासनप्रणीत व्यवस्थेमुळें

झाल्या आहेत. लोकांच्यामध्यें उन्नतीची जाणीव व विकासाचें वेड अद्याप तरी मोठ्या प्रमाणांत दिसून येत नाहीं. खेड्यांचा विकास होत आहे. खेडुतांचा विकास होत नाहीं. जें व्हावयास हवें आहे तें खेडुतांचा, ग्रामीणांचा विकास झाला पाहिजे. खेड्यांचा विकास, ग्रामाचा विकास हें महत्त्वाचें नाहीं असें नाहीं. गांवकरी सुधारले म्हणजे गांव सुधारतो आणि त्या सुधारणेचा ओघ अखंड राहतो, ह्या दृष्टीनें जें कांहीं व्हावयास पाहिजे तें ज्यांच्यासाठीं आहे, त्यांच्याकडून झालें पाहिजे. लोकांनीं कारभारांत रस घेतला, त्यांत त्यांना गोडी वाटली म्हणजे शासन हें यथार्थ ठरतें. येथून तेथून शासनाचें कार्य म्हणजे नियम, नमुने, पत्रकें व परिशिष्टें यांतच सामावलेलें असतें. परिणामापेक्षां पद्धतींतच वेळ व पैसा खर्च होतो. व्याकरण-शुद्धतेकडे लक्ष दिल्यानें अर्थसौरभ कमी व्हावा, पदलालित्य कमी व्हावें असें होतें व कार्यांत रुक्षता व ठोकळेबाजपणा येतो आणि सत्ता जर अधिकाधिक केंद्रित असली तर हा परिणाम अधिकाधिक दिसून येतो. केंद्रांत भयंकर गजबज व दूरस्थ क्षेत्रांत पूर्ण शांतता, केंद्रांत कंपवाद व परिघांत अर्धांगवायु असें चित्र दिसतें. (एपिलॅप्सी इन सेन्टर ॲण्ड पॅरॅलेसीस ॲट दी सरकम्फरन्स)

कारभारांत केंद्रीकरण नसावें, कारण केंद्रित कारभारानें नेटकेपणा येत असला, तरी नेमकेपणा येत नाहीं. सर्व क्षेत्रांतील गरजा सारख्या नसतांना सारखा कारभार होतो आणि कारभाराचें मुख्य ध्येय म्हणजे जनसंतोष तो तेथें पूर्णपणें लाभत नाहीं. कितीहि कारभार कार्यक्षम असला तरी त्याची अखेरची कसोटी लोकांचा संतोष ही आहे. कारभार चांगला आहे पण लोक नाराज आहेत, यांत राज्याची प्रतिष्ठा नाहीं. नियमाप्रमाणें झालें पण मनाप्रमाणें झालें नाहीं असें होतें. लोक कारभारांत भाग घेत आहेत, रस घेत आहेत, असें असलें म्हणजे सामाजिक शांतता व सामाजिक समाधान अधिक निर्माण होतें. आपण केलें आहे ही भावना असली म्हणजे सामाजिक संतोष निर्माण होतो. दक्षिणेंतील देवालयांतून कोण्या भक्ताला प्रत्यक्ष पूजा करून देत नाहींत. त्यानें पैसे द्यावयाचें व देवालयांतील नेमलेल्या पुरोहितानें पूजा करावयाची, यांत भक्ताला संतोष वाटत नाहीं. तेंच गंध, तींच फुलें, स्वतः भक्तानें वाहिलीं तर त्याच्या मनाला जी प्रसन्नता वाटते, ती पुरोहितद्वारा केलेल्या पूजेनें वाटत नाहीं. या दृष्टीनें राज्यकारभार हा केंद्रांत व सर्वतोपरी नोकरशाहीद्वारा होण्यानें जनमन नाराज असतें आणि सर्वत्र समान कारभार असला तरी समाधान व संतोष दिसून येत नाहीं. म्हणून जास्तींत जास्त प्रमाणांत प्रत्यक्ष राज्यकारभाराशीं जनतेचा संबंध सहकार्याच्या दृष्टीनें आला पाहिजे. 'गांव करील तें राव करूं शकत नाहीं' यांतील मर्म लक्षांत ठेवलें पाहिजे. या दृष्टीनें विचार करतां स्थानिक बाबती, स्थानिक स्वराज्यविषयक कारभार किंबहुना खेड्यांतील जास्तींत जास्त शासनाचाहि भाग लोकांकडे येणें योग्य ठरतें. जेवढें जेवढें अनिवार्यपणें समान असलें पाहिजे तेवढें

वगळून बाकीचें कारभाराचें क्षेत्र स्थानिक घटकाकडे दिलें पाहिजे. मग तो घटक गांव असो अगर गांवाचा छोटासा समूह असो, सर्वसामान्य धोरणाच्या चौकटींत व कार्यक्षमतेच्या दृष्टीनें जे नियम असतील त्यांना धरून स्थानिक लोकांना कारभार करण्याची मोकळीक असली पाहिजे. या व्यवस्थेमध्यें निरनिराळ्या ठिकाणीं मिळणारा अनुभव अखिल राज्याच्या दृष्टीनें उपयुक्त ठरतो. मर्यादेंत प्रयोग करण्याची मुभा असल्यानें अनेक स्थानिक प्रयोग होतील, त्यांतून कांहीं बिनमोल अनुभव प्राप्त होईल आणि व्यापक राज्याच्या दृष्टीनें हे प्रयोग महत्त्वाचे ठरतील. समान कायदे, समान नियम जेथें परिस्थिति समान आहे त्या ठिकाणीं योग्य. 'सब घोडे बारा टक्के' हा न्याय बरोबर नाहीं. तोच रोग असला तरी तेंच औषध सगळ्या रोगांना देणें हें शास्त्रशुद्ध नाहीं. 'युक्तियुक्तम् रसायनम्' या न्यायानें जसें वैद्य वागतात त्याचप्रमाणें राजकीय व्यवहारांतहि तारतम्य दाखविणें जरूर असतें. एकांगी कल्पना राजकारणांत अयोग्य ठरते, एवढेंच नव्हे तर प्रसंगीं घातुक ठरते. भाषिक प्रांतव्यवस्था योग्य तथापि एकसारखी ती लागू करणें, हें बरोबर नाहीं. इतिहास, परंपरा, अन्य सामाजिक कारणें, यांचा विचार होऊनच कुठलेंहि तत्त्व लागू करणें शहाणपणाचें असतें. लोकांना आपल्या म्हणण्याप्रमाणें स्थानिक कारभार करण्याची संधी देणें, त्यांच्यावर त्याची जबाबदारी टाकणें, यामुळें लोकांनाहि आपले प्रश्न आपण सोडविले पाहिजेत, चांगल्या तऱ्हेनें सोडविले पाहिजेत, याची जाणीव होते आणि अनुभव घेत घेत ते तरबेज होत जातात, तयार होत जातात व त्यांचें नागरिकत्व मग श्रेष्ठतर होत जातें. त्यांचीं मनें विचारी होतात आणि राज्यांतील सार्वजनिक जीवन उन्नत होत जातें. केवळ अधिकाराच्या जोरावर कारभार चालवणें, अगर कायदा अंमलांत आणणें, हें क्षणभर कार्यक्षम आहे असें वाटेल; पण खरी कार्यक्षमता त्या ठिकाणीं दिसून येणार नाहीं. जें स्वमतीनें व स्वखुषीनें स्वीकारलें जात नाहीं तें फार काळ स्थिर राहत नाहीं व त्याविरुद्ध केव्हां स्फोट होईल हें कोणी सांगूं शकत नाहीं. कायदा सरकारनें केला याचा अर्थ तो करण्याचा त्याला अधिकार होता एवढेंच. तो योग्य आहे असा त्याचा अर्थ होत नाहीं. कायद्याची नैतिक प्रतिष्ठा नागरिकांच्या संतोषावर व स्वीकृतीवर अवलंबून आहे, म्हणून सामान्यतः जनमनाचा विचार करून लोकांच्या भावनेला व विचारसरणीला विचारांत घेऊन त्याशीं विसंगत होणार नाहीं अशा तऱ्हेनें कायदा केला गेल्यास त्याला नैतिक प्रतिष्ठा प्राप्त होते व त्याचें पालन करण्यांत जनतेला विषाद वाटत नाहीं. त्याचें पालन ती योग्य प्रकारें करते. आपला कारभार आपणच केला आहे, आपणच नियम केले आहेत, या परिस्थितींत जनता राजी राहते.

आधुनिक समाज हा पूर्वीसारखा राहिलेला नाहीं. ज्या अर्थव्यवस्थेवर तो आधारला होता ती आतां राहिलेली नाहीं. समाजांतील व्यवहार व व्यवसाय इतके वाढले आहेत कीं, जुन्या परंपरा, जुनीं मूल्यें हीं आतां गैरलागू ठरलीं आहेत. जुनी बाराबंदी आतां कोणी

घालीत नाहींत. सालोसाल जशी पोषाखाबाबत फॅशन बदलत आहे, त्याचप्रमाणें सामाजिक विचाराबाबत परिस्थिति दिसून येत आहे. निरनिराळ्या निष्ठा, निरनिराळ्या अस्मिता व अभिमान निर्माण होत आहेत. कुठलेंहि राष्ट्र आतां एकाकी नाहीं व कुठल्याहि एका राष्ट्रांत कांहीं झालें तरी त्याचा आवाज गोलघुमटांतील आवाजाप्रमाणें जगभर ऐकूं येतो आणि जगांत कोठेंहि कांहीं झालें तरी त्याचा परिणाम जगांतील मागासलेल्या क्षेत्रावरहि होतो. युद्ध सुरू झालें म्हणजे आतां युद्धभूमीचा व्याप म्हणजे प्रत्यक्ष युद्धांत पडलेल्या राज्याचें प्रादेशिक क्षेत्र असतें. एवढेंच नव्हे, तर त्या युद्धाचा परिणाम जगभर होतो. कोरियांतील युद्ध पण पुण्यांतील बाजारभाव कडाडले, हा अनुभव आतां सार्वत्रिक आहे. जसें राजकारणांत तसेंच सामाजिक विचारांत व व्यवहारांत. जगांत जें एखाद्या ठिकाणीं होतें तेंच मग सर्वत्र होत जातें. ह्या दृष्टीनें विचार करतां स्थानिक गरजा लक्षांत घेऊन प्रादेशिक दृष्टीनें जसें विकेंद्रीकरण इष्ट ठरतें तसेंच कार्यपरत्वेंहि इष्ट ठरतें. समाजामध्यें आतां वकील, व्यापारी, वैद्य व उद्योगी हे कार्यपरत्वें आधुनिक समाजांत, आधुनिक राज्यांत संघटित होत आहेत. वकील-मंडळें, वैद्यक-मंडळें, व्यापारी संघ हीं सर्व संघटनें कार्यविषयक दृष्टीनें आहेत. त्यांत प्रादेशिक भाव दुय्यम महत्त्वाचा आहे. मग प्रश्न असा उपस्थित होतो कीं, त्यांना त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रांत नियमन करण्याची मुभा असावी कीं नाहीं? त्या त्या व्यवसायांत पडणाऱ्यांच्या गरजा तेच जाणूं शकतात. ते अनुभवाची भाषा बोलतात. या दृष्टीनें विचार करतां त्यांनाहि कांहीं मर्यादा ठेवून आपल्या व्यवसायाचें नियमन करण्याचा अधिकार असला पाहिजे हें युक्त दिसतें. याप्रमाणें आज अनेक राज्यांतून परिस्थिति दिसून येत आहे. सबंध भारतांतील वकील–व्यवसायाचें आतां संघटन होत आहे व सर्वसामान्य मर्यादा राज्य घालून देईल त्यांना धरून त्या व्यवसायांतील व्यवस्था व त्या बाबतींतील अनुशासन–व्यवस्था ही त्या व्यवसायांतील संघटनेलाच करावी लागेल. याचप्रमाणें निरनिराळ्या व्यवसायाबाबत होत जाईल. जें व्यवसायाच्या क्षेत्रांत तेंच उद्योगधंद्याच्या बाबतींतहि होईल व व्हावें हें इष्ट आहे. मजूर व मालक यांचे संबंध निश्चित व नियमित करणारे कायदे हे सर्वसामान्यपणें सरकार करील, तथापि निरनिराळ्या व्यवसायांत मुख्य तत्त्वांना धरून, मुख्य कायद्यांना धरून निरनिराळे नियम करावे लागतील. कारण त्या त्या धंद्यांतील परिस्थिति लक्षांत घेऊनच्च तसें करणें इष्ट ठरेल. ह्या तऱ्हेनें राज्याचा कारभार चालल्यास जेवढें आवश्यक तेवढें समान ठेवून व बाकीच्या क्षेत्रांत पूर्ण मुभा ठेवल्यानें लोकांना स्वातंत्र्याचा अनुभव अधिक येईल व लोकांच्या कर्तृत्वाला अधिक वाव मिळेल. त्यांची वृत्ति अधिक विधायक होईल यांत शंका नाहीं. स्वातंत्र्य व जबाबदारी जेथें नांदते तेथें प्रयत्नांचे कर जुळतात हा अनुभव आहे.

येथपर्यंतच्या विवेचनांत कायद्यांचें व नियमांचें पालन हें सक्तीनें न होतां संतोषानें व्हावें असें सामान्यतः सांगितलें आहे. कायदा किंवा नियम हे केवळ ते करणारास अधिकार आहे एवढ्यानें ते योग्य व उपयुक्त आहेत, समाजाच्या हिताचें आहे हें म्हणणें बरोबर नाहीं. सुलतानाला अगर हुकूमशहाला केवळ कायद्याच्याच दृष्टीनें विचार केला, तर त्याला वाटेल तो कायदा करण्याचा अधिकार आहे. पण त्यानें केलेला कायदा, त्यानें केला म्हणून तो न्याय्य अगर योग्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. कायद्याचें औचित्य व इष्टता ही लोकमताच्या व लोकगरजेच्या दृष्टीनें ठरवावयाची असते. कायदा म्हणजे निव्वळ अधिकार असलेल्या व्यक्तीनें अगर संघटनेनें काढलेल्या आज्ञा अगर हुकूम असा अर्थ करणें संकुचित दृष्टीचें तर आहेच; पण त्या विचारसरणींत नैतिकता नाहीं व एका अर्थानें वैधपणाहि नाहीं (कान्स्टिट्यूशनल). कायदे हे लोकव्यवहारांच्या नियमनासाठीं असतात, म्हणून लोकांच्या इच्छा, त्यांच्या भावना या मुख्य महत्त्वाच्या समजल्या पाहिजेत. 'आग रामेश्वरीं व बंब सोमेश्वरीं' असें जर कायद्यानें होऊं लागलें तर तो कायदा व्यर्थ व कायद्याचा मुख्य हेतु जो लोकव्यवहार–नियमन तो साध्य होत नाहीं. ज्या प्रमाणांत समाजांतील विचारसरणीला, समाजाच्या गरजांना जुळणारा तो असेल, त्या प्रमाणांत त्याला लोक मनापासून मान्यता देतात. पटलें म्हणून मानणें ही गोष्ट व दंडाच्या भयानें मानणें ही गोष्ट यांत मौलिक फरक आहे. लोकांच्या ज्या इच्छा असतील त्या समजून घेऊन कायदा केला पाहिजे. कारण लोकांच्या मान्यतेवर व खुषीच्या मान्यतेवर कायद्याचें कायदेपण, त्याचा वैधपणा, त्याची नैतिक प्रतिष्ठा अवलंबून आहे. लोकांच्या इच्छा काय हें जाणून घेण्याचा मार्ग म्हणजे ज्या रीतीनें कायदा बनतो, त्या रीतींतील प्रत्येक अवस्थेंत लोकमत शासनानें जाणून घेतलें पाहिजे. लोकांचें सहकार्य प्रत्येक अवस्थेंत संपादिलें पाहिजे. ज्या गोष्टी लोकांना मौलिक वाटतात, त्यांच्या नैतिक जीवनाच्या दृष्टीनें अपरिहार्य वाटतात, त्यांविरुद्ध जर कायद्याची व्यवस्था असेल तर त्या कायद्याला ते मानणार नाहींत. विरोध करतील व प्रसंगीं क्रान्तीच्याद्वारें प्रचलित शासनाला गादीवरून खालीं उतरवतील. लोकांच्या मौलिक श्रद्धा अगर नैतिक भावना चुकीच्या असतील, वेडेपणाच्या असतील, संकुचित असतील, पण त्या आहेत हें निश्चित. उपयुक्ततेच्या दृष्टीनें गोवध हा अयोग्य नसेल; तथापि लोकांच्या श्रद्धेनें गाय म्हणजे माता ही वस्तुस्थिति असल्यानें तद्विषयक त्या श्रद्धेविरुद्ध कायद्यानें कांहीं केल्यास लोकमत प्रक्षुब्ध होईल हें स्पष्ट आहे. लोकांच्या श्रद्धा व नैतिक मूल्यें हीं निरपेक्ष नाहींत हें मान्य. समयानुसार त्यांत परिवर्तन होतें हेंहि मान्य. तथापि त्या सर्व श्रद्धा व सर्व मूल्यें हीं जोंपर्यंत चालू नाणीं आहेत तोंपर्यंत त्यांना मूल्य आहे व समाजाच्या व्यवहारांत त्यांचा स्वीकार न झाल्यास साहजिक असंतोष निर्माण होणें हें अनिवार्य आहे. म्हणून अशा मौलिक श्रद्धांना गोंजारून शासनानें वागलें पाहिजे. सर्वत्र कायदे-

भंग झाला; व प्रत्येक जण फालतूसालतू गोष्टींत सत्याग्रह करूं लागला तर समाजांत अराजक माजेल व शासन कोलमडेल, अशा उपदेशानें जनता आपल्या मौलिक श्रद्धा सोडावयास तयार नाहीं. प्रत्येक काळांत दोन-चार माणसें तरी अशीं असतात कीं, अराजक चालेल पण ज्या गोष्टी शासन करीत आहे त्याविरुद्ध आम्ही बंड करूं, आवाज उठवूं, असें निर्भीडपणें व अनन्यश्रद्धेनें तीं सांगतात व प्रसंगीं जो दृष्टिकोन ही थोडी मंडळी मांडतात तो दृष्टिकोन मग आमजनतेचाहि होतो. जगाच्या इतिहासांतील मोठमोठ्या समाजसुधारणेच्या चळवळीचा उगम ह्या मूठभर लोकांच्या मानससरोवरांतूनच झालेला दिसतो.

वरील दृष्टीनें विचार करतांना एक गोष्ट निश्चित आहे कीं, राज्याचा कायदा खऱ्या अर्थानें प्रस्थापित व्हावयाचा तर जनतेच्या संमतीनें व स्वीकृतीनें तो होऊं शकतो. कायदा व जनता हा विवाह राक्षसीविवाह न ठरतां प्रेमविवाह झाला पाहिजे, असें म्हटलें तर यांत काव्य व वस्तुस्थिति दोन्ही आहेत. कायदा म्हणजे निव्वळ आज्ञा नव्हे, तें एक आवाहन आहे. त्या कायद्यांत व त्यांतील व्यवस्थेंत जनतेला आपल्या अनुभवाचें प्रतिबिंब दिसलें पाहिजे व आशेचे किरण दिसले पाहिजेत. आणि जनतेचें सहकार्य व आज्ञापालन व्यापक व विधायक व्हावें हें इष्ट असल्यानें जास्तींत जास्त लोकांशीं कायदा होण्यापूर्वी विचारविनिमय झाला पाहिजे आणि आधुनिक राज्याचा असा अनुभव आहे कीं, लोकांना पटला नाहीं तर कायद्याला स्थिरता नाहीं व प्रतिष्ठापण नाहीं आणि मग समाजांत शांतता नाहीं व संघर्ष केव्हां उफाळेल याचा भरंवसा नाहीं. जनतेला कायदेशीर अधिकार आहेत याची जाणीव कायदे करणाऱ्यांना असली पाहिजे व त्या अधिकाराचें स्वरूप त्या कायद्यांत दिसून आलें पाहिजे. कायदा योग्य आहे, सर्व दृष्टीनें विचार करतांना तो इष्ट आहे, असें सामान्यपणें नागरिकाला वाटलें पाहिजे. तसें न वाटेल तर त्याला कायदा पालन करण्यासाठीं प्रेरणा देणारी वस्तुस्थिति तेथें नाहीं ही गोष्ट उघड आहे. या स्थितींत कायदा पाळणें म्हणजे नापसंत पतीबरोबर संसार करणाऱ्या स्त्रीप्रमाणें त्या व्यक्तीची अवस्था होते. मन कुढें होतें, बुद्धि निष्प्रभ होते. व्यक्तिविकास स्तब्ध होतो. विफलता व विमनस्कता त्याच्या जीवनांत हळूहळू येऊन जीवन खुजें व खुरटें होतें. समाजाच्या दृष्टीनें समाजाचें नैतिक सामर्थ्य कमी होतें व कायदा स्वीकारणें म्हणजे स्वातंत्र्य घालविणें असा सरळ अर्थ होतो. लोक याहि स्थितींत बाह्य दृष्टीनें कायदा मानतील, त्याचें पालन करतील हें खरें, पण कांहीं तरी असे निघतील कीं, संबंधित कायद्याला विरोध करतील व आपल्या नैतिक बळानें समाजजीवनाचा वृक्ष गदगदा हालवून सोडतील. म्हणून जास्तींत जास्त प्रमाणांत जास्तींत जास्त लोकांचें म्हणणें विचारांत घेऊन, त्यांचे अभिप्राय लक्षांत घेऊन कायद्याची रचना झाली पाहिजे. आधुनिक राज्यांत विशेषतः लोकशाही राज्यांत राज्यसत्तेला केवळ सत्तेच्या जोरावर अनिर्बंध काळपर्यंत अंमल चालवतां येत नाहीं. ज्या प्रमाणांत राज्यकारभार चांगला

आहे, जनतेच्या हितार्थ आहे, ही खात्री पटविण्याची शक्ति राज्यसत्तेजवळ आहे त्या प्रमाणांत राज्यसत्ता नांदूं शकते. लोकांना पटावयाचें म्हणजे केवळ ते बाह्यतः मान्यता देतात एवढेंच नव्हे तर मनापासून त्यांना तें पटलें पाहिजे. शेवटीं राज्य हें नागरिकांचें आहे आणि एक नागरिक जरी क्षुद्र वाटला, तरी तो क्षुद्र नाहीं. त्याच्या मानसिक शक्तींतून समाजाची नैतिक शक्ति उत्पन्न होते, त्याच्या विचारांतून समाजांतील नैतिक मूल्यें निर्माण होतात आणि राज्य हें या नैतिक मूल्यांवर आधारित असतें. जें मनाला पटलें नाहीं तें फार काळ मन मानणार नाहीं व शेवटीं त्याची जी श्रद्धा असेल ती त्याला सर्व जगाविरुद्ध का होईना धीटपणें उभें राहण्यास प्रोत्साहित करते. राज्यविषयक निष्ठा, कायद्याचें परिपालन या गोष्टी प्रभावी राहाव्या म्हणून जनतेची संमति प्रत्येक क्षणाला आवश्यक आहे. किंबहुना जनतेची संमति व स्वीकार हें समाजधारणेचें श्रेष्ठ जीवनसत्व आहे. कोणतीहि राज्यसत्ता याकडे दुर्लक्ष करील तर ती दुर्लक्षित होईल.

वरील विचारसरणीविरुद्ध असा आक्षेप येऊं शकतो कीं, प्रत्येक मनुष्याला त्याच्या बुद्धीला न पटल्यास अनिर्बंधपणें वागण्याचा अधिकार आहे हें मान्य केल्यास समाजामध्यें अराजक माजेल व समाजाचें स्थैर्य कायम राहणार नाहीं. किंबहुना नित्य संघर्ष ही समाजाची अवस्था होईल. तसेंच समाजामधील प्रत्येक व्यक्ति ही स्वतंत्र, स्वेच्छाचारी झाली तर समाजधारणेचें आद्यतत्त्व म्हणजे व्यक्तीव्यक्तींनीं जुळवून घेणें, सार्वजनिक हिताचें ज निःसंशय असेल तितकें तरी मानणें हें नाहींसें होतें. व्यक्ति तेवढ्या प्रकृति हें मान्य करून अनुभवाची भाषा समाजहिताच्या सामुदायिक हिताच्या व्याकरणानें नियंत्रित झाली पाहिजे. व्यक्ति व्यक्ति निराळी हें जरी खरें असलें तरी सर्व व्यक्तींमध्यें व व्यक्तीसाठीं कांहीं तरी समान असतें आणि संयम व सौजन्य हे समाजांत वावरत असले म्हणजे समाजाच्या प्रगतीसाठीं शांतता व सुव्यवस्था समाजांत नांदली पाहिजे याची जाणीव मग समाजांत उत्पन्न होते. व्यक्तीव्यक्तीमध्यें पुष्कळ गोष्टी समान असतात, समान अनुभव त्यांना येतो हें खरें असलें तरी शिक्क्याप्रमाणें त्यांत सारखेपणा असत नाहीं. तसेंच तेथें एकता आहे, पण ऐक्य नाहीं ही गोष्ट उघड असते. एका माणसाचा अनुभव शंभर टक्के दुसऱ्या माणसाच्या अनुभवाशीं जुळत नाहीं. म्हणून एका माणसाची इच्छा ती संपूर्णपणें इतर सर्व माणसांची इच्छा असें असूं शकत नाहीं. गोफ विणत जातांना निरनिराळे धागे आपलें निराळेंपण सोडून गोफांत एकत्र होतात. आपला पृथक्‌भाव टाकून देऊन गोफ या वस्तूंत स्वत्व विसरून जातात. तथापि संपूर्ण सायुज्यता तेथेंहि नसते. एकेक धागा तेथें असतो. दुसऱ्या उपमेनें सांगावयाचें झाल्यास गुडदाणीच्या गुळांत प्रत्येक दाणा सामावलेला असतो. तथापि प्रत्येक दाण्याचें अस्तित्व अनुभवाला येत असतें. तीच स्थिति व्यक्ति व समाज यांच्या संबंधांबाबत असते. तेथें ऐक्यतेचाहि भाव आहे व पृथक्‌पणाचाहि. म्हणून प्रत्येक व्यक्ति आपलें स्वातंत्र्य संपूर्णपणें समाजाच्या समष्टिव्यक्तित्वांत

संपूर्णपणें देऊं इच्छीत नाहीं. कांहीं तरी जीवनाचें क्षेत्र व्यक्तीहि स्वतःचें खास असें मानते. तेथें तो इतर कोणाचाहि हस्तक्षेप सहन करणार नाहीं. राज्याच्या आज्ञा त्या क्षेत्राच्या सीमेच्या आंत तो येऊं देणार नाहीं. त्याला स्वतःला त्या क्षेत्रांत इतरांचा अधिकार कधींहि पसंत पडत नाहीं. त्या क्षेत्राची अशी त्याची कांहीं नैतिक भावना असते, कांहीं मूल्यें असतात, आणि त्यांच्याशीं तो तन्मयता पावलेला असतो. त्यांत त्याची व्यक्ति व त्याच्या व्यक्तित्वाचीं मूल्यें असें तादात्म्य अगर समन्वय तेथें दिसून येतो. या स्थितींत त्याला जें पटत नाहीं, तत्त्वतः पटत नाहीं, तें त्याजवर लादलें गेल्यास त्याचें स्वातंत्र्य नष्ट झालें असें त्याला वाटतें. कोणी तरी आपल्याला गुलामाप्रमाणें वागवीत आहे या जाणीवेनें त्याचें जीवन व्यस्त होतें. आपण कोणाच्या तरी हातचें बाहुलें झालों आहोंत या विचारानें तो कावराबावरा होतो. जें त्याला व्हावयाचें आहे तें त्याला होतां येत नाहीं. या परिस्थितींत कायदा म्हणजे सक्ति आणि म्हणून त्याला आपल्या व्यक्तित्वावर आक्रमण झालें आहे असें वाटतें. जें विश्व त्यानें कल्पिलेलें असतें, तें त्याला मर्यादित झालें असें वाटतें. व्यक्तीचें जीवन त्याच्या दृष्टीनें सार्थ व सांगतापूर्ण व्हावयाचें झाल्यास राज्यांतील कायदे जास्तींत जास्त त्याच्या इच्छेप्रमाणें व संमतीप्रमाणें असले पाहिजेत व त्यांचें आज्ञाप्रद स्वरूप कमींत कमी असलें पाहिजे आणि तसें झालें म्हणजे त्याचें कर्तृत्व मारलें जात नाहीं व त्याची विधायक वृत्ति वाढीस लागते. व्यक्तिमात्राला आपल्या सदसद्विवेक बुद्धीला जें वाटतें तें बोलण्याची मोकळीक असली पाहिजे. स्वातंत्र्याचा उपभोग या गोष्टीला भोजनांत जेवढें मिठाला स्थान आहे तेवढें स्थान असलें पाहिजे. त्याच्या सदसद्विवेक बुद्धीला मार्गदर्शन करणाऱ्या सामाजिक परंपरा असूं शकतील, संस्था असूं शकतील, तथापि ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, तें मार्गदर्शन प्रसंगीं त्याला अपूर्ण वाटतें. सामाजिक परंपरा, संस्था, देशांतील कायदे हे अनुभवावर आधारलेले असल्यानें त्यांचें मार्गदर्शन अधिक मोलाचें, अधिक महत्त्वाचें हें खरें. तथापि प्रसंगविशेषीं तें व्यक्तीला पुरेसें न वाटल्यास त्याला जें वाटत असेल, त्याच्या सदसद्विवेक बुद्धीला जें पटेल त्याप्रमाणें वागण्याची त्याला मुभा असली पाहिजे. तथापि ही मुभा अगर मोकळीक अमर्याद नाहीं, अनिर्बंध नाहीं. तिला समाजाच्या मौलिक हिताच्या मर्यादा असतात व असल्या पाहिजेत, हेंहि व्यक्तीनें मान्य केलें पाहिजे. व्यक्ति समाजांत जन्मलेली असते आणि हजारों वर्षांचा अनुभव व ज्ञानाचा वारसा व्यक्तीला जन्मतःच मिळतो. समाजाचे अनंत उपकार व्यक्तीवर जन्मापासूनच झालेले असतात. म्हणून समाजाच्या मौलिक गोष्टींविरुद्ध त्यानें जाऊं नये ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. व्यक्तीचें व्यक्तित्व समाजाच्या संदर्भातच वावरावयाचें असतें. अराजक न माजवतां आपलें ध्येय साध्य करावयाचें, आपल्या मूल्यांची जोपासना करावयाची ही वृत्ति सामान्यपणें व्यक्तीची असली पाहिजे. तथापि असा प्रसंग येणें असंभवनीय नाहीं. जेव्हां व्यक्तीला समाजाच्या परंपरेला अनुसरून वागणें अगर

राज्याच्या आज्ञा मानणें हें त्याच्या मौलिक श्रद्धेला पटत नसल्यानें शक्य नसतें आणि मग त्याचें कर्तव्य, त्याचा श्रेष्ठ धर्म आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जें वाटतें त्याप्रमाणें वागणें हा ठरतो. अन्याय होत आहे याची जाणीव असून जे स्वस्थ बसतात, उदासीनपणें केवळ प्रेक्षक बनतात, ते कदाचित् व्यवहारी ठरतील; पण त्यांच्या मनांतल्या मनांत आपण चुकत आहोंत याची जाणीव त्यांना असते. जे प्रत्यक्ष विरोध करतात त्यांना विरोधाचें प्रायश्चित्त द्यावें लागतें हें खरें. पण आत्मिक समाधान त्यांना मिळतें हेंहि तितकेंच खरें. जे उदासीन राहतात ते कांहीं काळानें अन्यायाचे स्तुतिपाठक बनतात, हाहि जगाचा अनुभव आहे. म्हणून स्वातंत्र्य याचा अर्थ आपल्या श्रद्धेशीं निष्ठावंत राहणें आणि त्या श्रद्धेच्या संरक्षणार्थ धैर्यानें विरोध करणें हा आहे आणि अशा प्रकारचें धैर्य ज्या समाजांत नाहीं तेथें खरें स्वातंत्र्य नाहीं आणि असें धैर्य ज्या व्यक्तींत नाहीं ती व्यक्ति स्वतःशीं प्रामाणिक पण नाहीं.

प्रत्येक व्यक्तीला त्याच्या श्रद्धेप्रमाणें वागूं देणें यांत त्याच्या व्यक्तित्वाला पूर्ण वाव देण्यासारखें आहे. त्याला सृजनशील होण्याला व त्याची विधायक वृत्ति जोपासण्याला संधी देण्यासारखें आहे. तथापि या परिस्थितींत समाजाच्या व राज्याच्या स्थैर्याला धोका आहे हा आक्षेप नाकबूल करतां येणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याचें इतकें व्यापक स्वरूप कल्पिल्यास व्यक्तींना प्रचलित सत्तेविरुद्ध बंड करण्याचा हक्क आहे हें मान्य करणें मग तर्कशुद्ध व अनिवार्य होतें. विचारवंतांपुढें मग असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, व्यक्तिस्वातंत्र्य का व्यवस्था, सत्याचा आग्रह का सोय, आणि मग या प्रश्नाचें उत्तर देणें कुणालाहि सोपें जात नाहीं. व्यवस्था म्हणजे जें कांहीं होईल तें निमूटपणें सहन करणें ही स्थिति समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. व्यवस्थेच्या कालीपुढें व्यक्तीच्या आशांचा व स्वातंत्र्याचा बळी देणें याला कोणी मान्यता देणार नाहीं. राज्याला व्यक्तीनें विरोध केला म्हणजे सदासर्वकाळ सर्व प्रसंगीं तो चुकीचा असतो हेंहि खरें नाहीं. उठल्यासुटल्या शांतता व व्यवस्थेच्या नांवाखालीं विरोधकांना झोडपून काढणें यांत सत्तेचा साक्षात्कार होतो, पण शहाणपण शोधूनहि सांपडत नाहीं. मुत्सद्देगिरी संपली म्हणजे गुद्देगिरीला सुरुवात होते, असाच अनुभव येथून तेथून दिसून येतो. त्याजबरोबर उठल्यासुटल्या सारासार विचार न करतां क्रान्ति क्रान्ति ओरडत राहणें, सत्याग्रह व मोर्चे यांचा आलाप काढीत राहणें व मूक हरताळ करून न पटणारें मान्य करून घेणें हेंच आजचें राजकारण होऊन बसलें आहे. सत्ताधीशांना सत्तेसाठीं सत्ता प्रदान केलेली नसते, तर सत्तेच्या साधनानें राज्यांतील नागरिकमात्राला सुखी जीवन, सुखी आयुष्य उपलब्ध होईल ही व्यवस्था करण्यासाठीं दिली असते. आणि जर त्या सत्तेचा उपयोग जनहिताच्या दृष्टीनें होत नसेल, जर सत्ताधीशांचीं कृत्यें द्वेषपूर्ण व लोकांच्या हिताविरुद्ध असतील, लोकांना जें हवें आहे तें बेपर्वाईनें नाकारलें जात असेल तर त्या सत्तेविरुद्ध जनतेनें उभें राहिलें पाहिजे, अथवा

आपलें मौलिक स्वातंत्र्य गमावून बसलें पाहिजे. जगाची प्रगति जी आज झालेली दिसत आहे त्याचें श्रेय युगायुगांत श्रेष्ठ धारिष्ट्य असणाऱ्या व्यक्तींनीं प्रचलित सत्तेला जो विरोध केला, जें कार्य केलें त्याला आहे. ही मंडळी तावडतोब यशस्वी होतात असें नाहीं. अपयशाचें प्रायश्चित्त फांशीच्या तक्तावर त्यांना मोजावें लागतें. कारागृहाच्या भिंतीआड राहून सत्याची किंमत द्यावी लागते. तथापि शेवटीं सत्याचा विजय होतो हेंहि तितकेंच खरें. ह्या व्यक्तींच्या त्यागानें अन्यांना उत्साह मिळत असतो. समाजांत स्वातंत्र्याची लालसा जोपासली जाते व समाजाचा नैतिक दर्जा उंचावतो. जीवनाच्या कुठल्याहि क्षेत्रांत व्यक्तींनीं केलेला त्याग व दाखविलेलें धैर्य एक सामाजिक हवा उत्पन्न करीत असते आणि त्या हवेंत समाजाच्या नैतिक जीवनाला जोपासणारीं मूल्यें वाढीस लागतात. समाजाच्या प्रगतीसाठीं व्यक्तींना त्यांना जें योग्य वाटतें, प्रामाणिक वाटतें, तें बोलून दाखविण्याचा, तें करून दाखविण्याचा अधिकार असला पाहिजे व मर्यादेंत त्या अधिकाराचा उपयोग करणें हें असामाजिक नाहीं. समाजाच्या अंतिम स्थैर्याच्या दृष्टीनें विरोधी नाहीं. क्षणभर अराजकाला प्रोत्साहन देणारें वाटलें तरी राज्यसत्तेला योग्य मार्गावर ठेवणारें असें तें नैतिक साधन ठरतें.

12346

# : २ :

## विचार-स्वातंत्र्याचें विविध स्वरूप

स्वातंत्र्याच्या मुख्य व मध्यवर्ती भावनेचा विचार येथपर्यंत केला आणि कायद्यांत अगर संविधानांत कितीहि स्वातंत्र्याबद्दलची ग्वाही दिली असली, तरी स्वातंत्र्य हें तेवढ्यानें जनतेला लाभत नाहीं अगर लाभलेलें संरक्षित होत नाहीं. स्वातंत्र्याचें खरें संरक्षण नागरिकांची त्याबाबतची तीव्र इच्छा व प्रसंग पडल्यास स्वातंत्र्यावर होणाऱ्या आक्रमणाचा विरोध करणें यानें होतें. जनतेच्या स्वातंत्र्यावर आक्रमण केलें तर त्याला विरोध होईल याची जाणीव शासनकर्त्यांच्या, सत्ताधीशांच्या मनांत कायम ठेवणें, हीच खरी स्वातंत्र्याची ग्वाही आहे. हातावर निरांजन घेऊन तें विझलें जाऊं नये म्हणून ज्याप्रमाणें मनुष्य हळूहळू पावलें टाकतो तीच वृत्ति राज्य-कर्त्यांच्या मनांत सतत असली पाहिजे. जनता कायद्याला भिते व सरकार जनतेला भितें या परिस्थितींत जनतेचें स्वातंत्र्य सुरक्षित राहातें. आक्रमण झाल्यास विरोध निश्चित होईल ही स्थिति समाजांत येण्याच्या दृष्टीनें समाजांतील व्यक्ति स्वतंत्र विचार करणाऱ्या असल्या पाहिजेत, व त्यांच्यांत अन्यायाविरुद्ध बोलून दाखविण्याचें व क्रिया करण्याचें धैर्य असलें पाहिजे. मानसिक स्वातंत्र्य हें मानसिक धैर्याची पार्श्वभूमि आहे. मानसिक स्वातंत्र्य केवळ भीतीपासून मुक्ति असें नव्हे. दंडाच्या अगर शिक्षेच्या भीतीनें मनुष्य वागत नाहीं, एवढ्यानें त्याची बुद्धि, त्याचें मन स्वतंत्र-पणें विचार करतें असें होत नाहीं. अनेक पूर्वग्रह, अंधश्रद्धा, असंयम यांमुळें मनाचें खरें स्वातंत्र्य विकृत होतें. मनुष्य राज्याला न भितां मोठ्या धैर्यानें तो वागेल, पण सामाजिक परंपरा, धार्मिक समजुती या मनाच्या शृंखला त्याला तोडण्याचें धैर्य होत नाहीं, असा अनुभव आहे. आणि मग त्या स्थितींत त्याचें मन स्वतंत्र आहे, त्याची बुद्धि स्वतंत्र आहे, असें म्हणणें योग्य ठरत नाहीं. व्यक्तीला सुख व समाधान हवें असतें, तें समाधान त्याला समाजांत मिळतें आणि राज्य हें त्याच्या समाधानासाठीं आहे, त्याचें जीवन सुखी व्हावें यासाठीं आहे, असें तो मानतो आणि आधुनिक राज्य त्याचा हा दावा मान्य करतें. या परिस्थितींत राज्यसरकार, जें कांहीं करतें त्यावर त्याचा अभिप्राय त्याला त्यापासून प्राप्त होणाऱ्या सुखावर अवलंबून असतो. ‘ वितरति

गुरुः, प्राज्ञे विद्या यथैव तथा जडे' या न्यायाचें सरकारचें कृत्य सामान्यपणें सर्वांना सारखेंच असतें. तथापि व्यक्तिगत प्रकृतीच्या फरकानें त्याचे परिणाम विविध होतात आणि प्रत्येक व्यक्ति मग आपल्यावर झालेल्या परिणामाला अनुसरून आपलें मत बनवत असते, आपला अभिप्राय देत असते. सरकारनें दारूबंदी केली. स्त्रियांना आनंद झाला. रोजची मारपीट टळली असा त्यांचा अनुभव व तसा त्यांचा अभिप्राय असणें साहजिक आहे. जे दारू पिणारे होते त्यांना साहजिक वाटलें कीं, आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आला. दारूचे दुकानदार होते त्यांचा वृत्तिच्छेद झाला म्हणून साहजिकपणें सरकारवर ते रागावले. दारूबंदीमुळें गुत्त्याच्या आसपास होणारी ओरडाओरड व गुंडगिरी थांबली, म्हणून सामान्य नागरिकांना बरें वाटलें. सांगण्याचें तात्पर्य असें कीं, सगळ्यांचा अनुभव सारखाच नसतो आणि प्रत्येकाचा अनुभव हा पेटन्ट मेडिसीनप्रमाणें विकत घेतलेला नसतो. प्रत्येकाचा अनुभव हा ज्याच्या त्याच्या स्वतंत्र व खाजगी मालकीचा असतो आणि म्हणून एखाद्या व्यक्तीला राज्यकारभारापासून सामान्यपणें अगर एखाद्या राज्याच्या कृत्यापासून अगर कायद्यापासून विशेषपणें सुख झालें का दुःख झालें हें त्यांनाच ठरवावयाचें असतें. एकाचा अनुभव तो सर्वांचा असा ढोबळ सिद्धान्त काढणें गैर असतें. प्रत्येकाचा अभिप्राय विचारांत घेतला पाहिजे हें आवश्यक व स्वातंत्र्याच्या दृष्टीनें तें प्रगतिपर राज्याचें लक्षण मानलें जातें, म्हणून प्रत्येकाला आलेला अनुभव त्याला जाहीरपणें मुक्त मनानें सांगतां आला पाहिजे. भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य व संघ-स्वातंत्र्य हीं स्वातंत्र्यें अगर हे अधिकार मानसिक स्वातंत्र्याच्या दृष्टीनें मग आवश्यक ठरतात. किंबहुना मानसिक स्वातंत्र्याचें स्वरूप याप्रमाणें त्रिविध आहे. मानसिक स्वातंत्र्याच्या पूर्णतेसाठीं जें वाटतें तें बोलून दाखविण्याचा हक्क, जें वाटेल तें छापून वांटण्याचा हक्क, जें वाटतें तें अन्याबरोबर चर्चा करून अंमलांत आणण्याचा हक्क आवश्यक आहे. किंबहुना हे हक्क नसतील तर स्वातंत्र्य अपूर्ण आहे. इतकेंच नव्हे, तर तें अजिबात नाहींच असें म्हटलें तरी चालेल. माणसाला आपल्याला काय वाटतें आहे, आपले विचार काय आहेत, हें बोलून दाखविण्याचा हक्क नसला तर तो मनुष्य जीभ असून मुका, हातपाय असून निष्क्रिय ठरतो व समाजव्यवस्थेंत अगर राज्यकारभारांत तो उपेक्षित ठरतो व गुरांच्या बाजारांत गुरें ज्याप्रमाणें विकलीं अगर विकत घेतलीं जातात, त्याप्रमाणें या व्यक्तींना कोणी विचारीत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्रिविध स्वरूपी मनाचें स्वातंत्र्य नसेल, संघ-स्वातंत्र्य नसेल तर त्या व्यक्तीला समाजामध्यें नेहमींच संरक्षण मिळेल असेंहि म्हणतां येत नाहीं. व्यक्तीच्या नैतिक जीवनासाठीं त्याच्या व्यक्तिविकासासाठीं त्याला मानसिक स्वातंत्र्याची अत्यंत जरूर असते. त्याला जें वाटतें तें जरी चुकीचें असलें तरी त्याला बोलण्याचा, लोकांना सांगण्याचा व संघ करून तें कार्यान्वित करण्याचाहि अधिकार असला पाहिजे. त्याचें तें करणें अयोग्य असेल, प्रचलित सामाजिक मूल्याच्या दृष्टीनें तें अयोग्य असेल, त्या बाबतींत समाजाला

व राज्याला मर्यादा घालण्याचा हक्क आहे. म्हणून व्यक्तीचा हक्क नाकारणें हें बरोबर ठरत नाहीं. त्याचे हक्क मान्य केले पाहिजेत. हक्काच्या उपभोगाची मर्यादा समाजानें राज्यामार्फत सांगितली पाहिजे. ऐनजिनसी हक्क नाकारणें याचा अर्थ तो स्वतंत्र नाहीं, तो गुलाम आहे हाच होतो. भाषणस्वातंत्र्याला बंदी घालणें अगर नाकारणें याचा अर्थ समाजांत जें प्रचलित आहे त्यावर होणारी टीका नाकारणें आहे. जें वेडेंवांकडें, स्वार्थी अगर अंधश्रद्धेचें असेल तें कायम ठेवण्यासारखें आहे. जेथें भाषणस्वातंत्र्य नाहीं तेथें जे सत्तेवर आहेत ते आपला दृष्टिकोन समाजाचा दृष्टिकोन मानतात, आपलें हित सामाजिक हित समजतात, आपला व आपल्या भक्ताचा अभिप्राय जनतेचा मानतात. स्वतः म्हणजे समाज, स्वमत म्हणजे जनमत, असें त्यांना वाटत असतें. जनतेवर भाषणबंदी, म्हणून विरोध नाहीं, आणि विरोध नाहीं याचा अर्थ मान्यता. लोक बोलत नाहींत म्हणून त्यांचें मौन संमति मानलें जातें आणि मग कायदा -- जो जनमताचें प्रतिबिंब असला पाहिजे -- ज्याच्यांत सर्वजनांच्या गरजेचा विचार करावयाचा असतो -- तो मग मूठभर सत्ताधीशांची जी इच्छा असते त्याचा निदर्शक ठरतो. जगांतल्या क्रान्त्यांचा इतिहास अशी साक्ष देतो कीं, हुकूमशाही व दडपशाही यांचा प्रवास याच वातावरणांत होत असतो.

विचारस्वातंत्र्य म्हणजे भाषणस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य हीं पृथक् दिसलीं तरी वस्तुतः एकच आहेत. मला बोलण्याची मुभा आहे पण कुणाशीं मी बोलावयाचें नाहीं, याचा अर्थ मला वस्तुतः बोलण्याची मुभा नाहीं. भाषणस्वातंत्र्य आहे पण सभाबंदी आहे, याचा अर्थ भाषणस्वातंत्र्य नाहीं असाच होतो. म्हणून भाषणस्वातंत्र्य हें खरें होण्यासाठीं संघस्वातंत्र्य अगर एकत्र येण्याचा व विचारविनिमय करण्याचा अधिकार असला पाहिजे. एकत्र येण्यास हरकत नाहीं; पण तेथें भाषण करावयाचें नाहीं, याचा अर्थ संघस्वातंत्र्य नाहीं हाच आहे. जीं माणसें एकत्र येतात तीं कांहीं उद्देशासाठीं. त्या उद्देशासंबंधीं विचारविनिमय अगर चर्चा व्हावयाची, तर एकत्र येणाऱ्यांना बोलण्याचें स्वातंत्र्य, विचारविनिमय करण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे. अन्यथा माणसें एकत्र आलीं व कांहींहि तेथें विचारविनिमय झाला नाहीं तर त्यांचें एकत्र येणें हें गुरांच्या बाजारासारखें आहे. एकत्र आले पण एकचित्त झाले नाहींत. शरीरें एकत्र आलीं, मनें एकत्र येण्याला अवसर मिळाला नाहीं; म्हणून भाषणस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य हीं एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यापैकीं कुठलीहि एक नाकारणें म्हणजे दोन्ही नाकारण्यासारखें आहे. व्यक्तीचें स्वातंत्र्य नाकारण्यासारखें आहे आणि राज्यसत्ता हीं स्वातंत्र्यें नाकारते याचा अर्थ त्या राज्यसत्तेला कांहीं हितसंबंध व खास असे हितसंबंध राखावयाचे आहेत, म्हणजे त्यांचें संरक्षण करावयाचें आहे. भाषणस्वातंत्र्य अगर संघस्वातंत्र्य अगर अन्य मौलिक स्वातंत्र्यें हीं निरपेक्ष अगर अमर्याद नाहींत हें खरें. त्यांच्यावर असलेल्या अगर त्यांच्यावर काय मर्यादा असाव्यात, कुठल्या प्रमाणांत त्या असाव्यात, कुठल्या प्रसंगीं त्या असाव्यात, याचा विचार यथावकाश केला

जाईल. पण ह्या ज्या मर्यादा असतील त्यांचा हेतु हींच स्वातंत्र्यें समाजाच्या दृष्टीनें सर्वांना उपलब्ध व्हावींत हाच असला पाहिजे. केवळ त्या मर्यादा प्रचलित सत्तेच्या दृष्टीनें समाजविरोधक वाटतात अगर त्यांच्या दृष्टीनें समाजाच्या स्थैर्यासाठीं अगर शांततेसाठीं त्या आवश्यक आहेत, एवढ्यानेंच त्या योग्य ठरत नाहींत. विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य हीं समाजाच्या प्रगतीसाठीं आवश्यक आहेत आणि तशीं तीं आहेत हें सिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं. जर राज्याचा हेतु प्रजाजनाचें सुख हा असेल आणि प्रत्येक आधुनिक राज्यानें तें आतां मान्य केलें आहे, तर प्रजेला कशांत सुख आहे हें राज्यानें समजून घेतलें पाहिजे. आणि प्रजेला कशांत सुख आहे हें समजून घ्यावयाचें तर प्रजेच्या मनांत जें आहे तें तिला बोलून दाखविण्याचा अधिकार असला पाहिजे. प्रजेला काय हवें आहे, लोकांना काय हवें आहे हें समजून घेण्याच्या दृष्टीनें जास्तींत जास्त नागरिकांच्या मनांत काय आहे हें जाणून घेतलें पाहिजे आणि विशेषतः प्रस्तुत बाबतींत ज्या सर्वांचे हितसंबंध कमीजास्त प्रमाणांत येतात, त्या सर्वांचें तर अधिक विस्तृतपणें ऐकून घेतलें पाहिजे. मजूरविषयक कायदे करावयाचे तर मालकांना व मजुरांना व्यक्तिशः व संस्थामार्फत आपापलें म्हणणें मांडण्यास पूर्ण मुभा असली पाहिजे. दिवसाचे आठ तास असावेत हा कायदा करावयाचा तर मजुरांचा दृष्टिकोन समजून घेतला पाहिजे, त्याचप्रमाणें मालकांचाहि. केवळ उद्योग व व्यापार मंडळें ( चेम्बर्स ) ह्यांचेंच म्हणणें ऐकून घेऊन कायदा केल्यास समाजांतील एकाच भागाचें मत अगर एकाच भागाची गरज विचारांत घेतली असें होतें म्हणून मजुरांचें मत घेतलें पाहिजे. त्यांच्या गरजांचा विचार केला पाहिजे. दहा तासांनंतर मजूर थकून जातो आणि त्याचें आयुष्य रसहीन होतें, निःसत्व होतें. कारण कामावरून परत येईपर्यंत त्याचा उत्साह निःशेष होतो. मनुष्याला अन्न, वस्त्र, निवास या गरजा जशा आवश्यक, त्याचप्रमाणें विश्रांति व मनोरंजन ह्याहि गोष्टी आवश्यक आहेत. मजूर यंत्र नव्हे, तो मनुष्य आहे; व ज्या परिस्थितींत तो काम करीत असेल तिचा परिणाम त्याच्या जीवनावर काय होतो हें तोच सांगू शकतो. म्हणून त्याचा अभिप्राय घेतला गेला पाहिजे. कारखान्यांचा उद्देश उत्पादन हें जरी खरें असलें तरी तें उत्पादन असामाजिक तऱ्हेनें होऊं नये व त्यांतून सामाजिक असमाधान निर्माण होऊं नये हेंहि पाहिलें पाहिजे. तात्पर्य, कायदा करतांना अगर एखादें कृत्य करतांना राज्यसत्तेनें त्याचा परिणाम ज्यांच्या जीवनावर होणार आहे, त्या सर्वांचें मत जाणलें पाहिजे आणि जास्तींत जास्त सुख व कमींत कमी दुःख निर्माण होईल हीच विचारसरणी डोळ्यांपुढें ठेवली पाहिजे. घटस्फोटाचा कायदा करतांना स्त्रियांच्या भावनांचा विचार केला पाहिजे व पुरुषांच्याहि भावनांचा विचार केला पाहिजे. आणि हा विचार करावयाचा तर दोघांनाहि मुक्तपणें आपलें म्हणणें मांडण्याची पूर्ण संधी दिली पाहिजे. म्हणून विचारस्वातंत्र्य असलें पाहिजे, भाषणस्वातंत्र्य असलें पाहिजे, तसेंच एकत्र येऊन

आपणांस काय पाहिजे हें सांगण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे. असें झालें म्हणजे राज्यसत्तेला जास्तींत जास्त प्रमाणांत जनमनांत काय आहे हें समजतें. सामान्यपणें हीं स्वातंत्र्यें राज्यांत असावीं याबद्दल कोणी वाद घालीत नाहीं. पण या स्वातंत्र्याचा अर्थ जेव्हां विशद केला जातो त्यावेळीं पुष्कळ लोक साशंक होतात व प्रसंगीं विरोधी बनतात. जोंपर्यंत जें प्रचलित आहे त्याची स्तुति होत असते व विद्यमान हितसंबंधांवर हल्ला होत नाहीं, तोंपर्यंत भाषणस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य हीं गोंजारलीं जातात. पण जें आहे तें अन्यायकारक आहे, त्यामध्यें न पटणारी विषमता आहे व त्याला समाज व राज्यसत्ता जबाबदार आहेत असा जेव्हां आरोप केला जातो, अगर टीका केली जाते, त्यावेळीं मात्र ही टीकाकार मंडळी उपद्व्यापी समजली जाते. समाजांतील गुण्यागोविंदाला त्यांच्यापासून धोका आहे असें मानलें जातें. समाजांतील गुण्यागोविंद म्हणजे जें आहे तें असावें असें म्हणणारा वर्ग असतो. जें आहे तें अनुभवानें आलेलें आहे असें मानून नव्या अनुभवाला, नव्या विचाराला मग बंदी घालण्याची इच्छा होते. समाजामध्यें सामाजिक विषमता आहे व सामाजिक उच्चनीचभाव हा केवळ जन्मानें निश्चित केला जात आहे म्हणून तो अन्यायाचा असें म्हणतांच सामाजिक स्वास्थ्य व शांतता बिघडली जाते, म्हणून असले विचार दडपून टाकण्याचें सरकारचें कार्य आहे असें आग्रहानें प्रतिपादिलें जातें. जर समाजाची प्रगति व्हावयाची तर व्यक्तींना नवे विचार करण्याची, नवा अनुभव वेंचण्याची व आपलीं मतें बोलून दाखविण्याची संधी मिळाली पाहिजे. समाजांत दिसून येणारी आर्थिक विषमता ही मानवनिर्मित आहे. ज्या कायद्यानें ती प्रस्थापित केली आहे अगर तिला प्रतिष्ठा दिली आहे, ते कायदे बदलले पाहिजेत हें सांगण्याची मुभा असली पाहिजे. संपत्ति ही समाजाच्या सहकार्यानें निर्माण होते म्हणून समाज हा त्या संपत्तीच्या निर्मितींतील एक भागीदार मानला गेला पाहिजे. जी विषमता निसर्गनिर्मित नाहीं, मानवी संकल्पांनीं अगर मानवी कृत्यांनीं निर्माण झाली आहे, ती नाहींशी झाली पाहिजे हें सांगण्याची मुभा नसेल तर ती विषमता कायम राहील आणि लोकांच्या मनांतील तें शल्य अधिक तीव्र होत जाईल. समाजाचें सुख हें जें राज्याचें ध्येय, तें मग साध्य होणार नाहीं. आर्थिक समता असल्याशिवाय समाजांत जास्तींत जास्त सुख उत्पन्न होणार नाहीं हें सांगण्यांत राज्यद्रोह नाहीं, असामाजिक कांहीं नाहीं याची जाणीव राज्यसत्तेनें ठेवली पाहिजे. भाषणस्वातंत्र्य याचा अर्थ प्रचलिताची स्तुति अगर सत्ताधीशांचीं स्तवनें हा नाहीं. भाषणस्वातंत्र्यांत दोष दाखविणें, अन्यायाला विरोध करण्याची प्रेरणा देणें, नव विचार सांगणें, नव्या समाजाचें स्वरूप सांगणें, या सर्व गोष्टी येतात. शहाणपण व दूरदृष्टि ही कोणा व्यक्तीची, कोणा जातीची अगर जमातीची मिरास नाहीं. कोणीहि सर्वज्ञतेचा दावा सांगणें हें बरोबर नाहीं आणि तसा कोणी सांगेल तर त्याविरुद्ध कोणी बोलल्यास तें ऐकून घेतलें पाहिजे. सर्व कांहीं सत्य वेदांत आहे,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थलप्रत

सर्व कांहीं सत्य उपनिषदांत आहे, असा आग्रह लोकशाही युगांत अयोग्य ठरतो. जें भारतांत नाहीं तें कोठेंहि नाहीं याचा अर्थ भारतानंतर कोणालाहि विचार करण्याची पात्रता नाहीं असा होतो. प्रत्येक युगाचें सत्य परिस्थितीप्रमाणें बदलत असतें. ज्ञान ही अखंड वाहणारी गंगा आहे व समाजहि सर्व काळीं सर्व ठिकाणीं एकसारखा नाहीं व एकसारखा राहत नाहीं, म्हणून कुठलेंहि आग्रही प्रतिपादन योग्य ठरत नाहीं. विचारस्वातंत्र्य असल्यास प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करतां येते, अनुभवाच्या कांट्यांत प्रत्येक गोष्ट तोलली जाते, टीकेच्या चाळणींतून प्रत्येक गोष्ट चाळली जाते व त्या त्या युगाचें सत्य आकार घेत जातें, कायम होत जातें. लोकशाही युगांत आग्रही प्रतिपादन म्हणजे व्यक्तीच्या कर्तृत्वावर शंका प्रदर्शित करण्यासारखें आहे. म्हणून न पटणारे विचारसुद्धां ऐकून घेतले पाहिजेत. जीं सत्यें व जीं मूल्यें समाजानें शाश्वत व सनातन मानलीं आहेत, त्यांविरुद्धसुद्धां टीका करण्याचा अधिकार व्यक्तिमात्राला असला पाहिजे. जेव्हां अशा प्रकारची टीका होते, प्रचलिताविरुद्ध आवाज काढला जातो, याचाच अर्थ जें आजचें सनातन आहे, जें आजचें सत्य आहे तें अपुरें आहे, याची जाणीव समाजांत सुरू झाली आहे हा होतो.

समाजाला अप्रिय वाटणारे, राज्यसत्तेला भयंकर वाटणारे विचार यांच्या आविष्काराला वाव न दिल्यास अगर ते दडपून टाकल्यास जें होणार आहे, जें अटळ आहे, तें टळत नाहीं. समाजसुधारक आगरकर यांना तीव्र विरोध झाला. जीवंतपणीं स्मशानयात्रा काढण्यांत आली. या सर्व गोष्टींनीं त्यांचे विचार मारले गेले नाहींत, तर सहस्रमुखानें ते बाहेर पडूं लागले. ‘न स्त्री स्वातंत्र्यमर्हति’ या विचारसरणीच्या लोकांनीं भयंकर विरोध केला, तथापि स्त्रीस्वातंत्र्य तर आलेंच; पण ‘यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः’ येथपर्यंत समाजाची प्रगति झाली आहे. पंच्याहत्तर वर्षें जास्तींत जास्त दडपशाही करून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ब्रिटिश सत्ता थांबवूं शकली नाहीं. दडपशाहीनें विचारस्वातंत्र्याची बंदी केल्यास जे क्रान्तिकारक निपजावयाचे, जे सुधारक निपजावयाचे, ते कोणी थांबवूं शकत नाहीं. समाजांतील घाण, समाजांतील दोष, त्याचप्रमाणें राज्यकारभारांतील भ्रष्टाचार, राजकारणांतील शीलशून्यता, याविरुद्ध ज्यांनीं कंकण बांधलें आहे ते दृढसंकल्पी व दृढनिश्चयी असल्यानें त्यांचा निःपात राज्यसत्तेनें करूं म्हटलें तरी ती करूं शकत नाहीं. उलट दडपशाहीनें त्यांची शक्ति वाढते. लोकप्रियता विस्तारित होते. दडपशाहीनें मतें बदलत नाहींत, मनगटाचा उपयोग केल्यानें मनें लीन होत नाहींत. उलट, एखाद्या विचारसरणीविरुद्ध, एखाद्या चळवळीविरुद्ध दडपशाही केल्यानें समाजामध्यें त्या विचारसरणीबाबत, त्या चळवळीबाबत कुतूहल उत्पन्न होतें. सामान्यपणें उदासीन असलेले लोक चिकित्सक बनतात. जें नेहमींच्या अनुभवाला सोडून असेल तें झाल्यामुळें समाजामध्यें कुतूहल निर्माण होतें. तोंड दाबल्यानें मन दाबलें जात नाहीं. सभेला बंदी केल्यानें चौकांतील विचारविनिमय मग तळघरांत

होतो. सभाबंदी केल्यानें कट मूळ धरूं लागतात. राज्यसत्तेनें अगर समाजानें बंदी केल्यास अगर दुर्लक्ष केल्यास, ऐकण्याचें नाकारल्यास, धक्का देणारीं कृत्यें होतात. ऐकूं जाईल, बहिऱ्यांना ऐकूं जाईल, इतका आवाज तोंडाऐवजीं अन्य गोष्टींच्या द्वारें काढला जातो. एखादी स्नेहलता आत्महत्या करून हुंड्याचा प्रश्न जनमतापुढें तीव्रतेनें आणते. एखादा खुदीराम पिस्तुलाचा आवाज काढून हिंदी मनांत दडपलेल्या भावना ऐकल्या जातील एवढ्या आवाजानें काढतो. मतप्रदर्शन बंद केल्यानें जें दुर्लक्षिलेलें असतें तें समाजाच्या डोळ्यांपुढें येतें व न ऐकलेलें कानाच्या दारावर ठणठणीतपणें आदळतें. जी विचारसरणी अगर ज्या भावना समाजांतील सामान्य लोकांच्या मनांत आलेल्या नसतात, त्या मनांत येतात. एवढेंच नव्हे, तर मनाला ग्रस्त करतात. १९२९ सालीं साम्यवादी तत्त्वज्ञान हिंदुस्थानांत कोणाला फारसें माहीत नव्हतें. पण मीरत–केसमुळें साम्यवादी तत्त्वज्ञान हा चर्चेचा विषय झाला. ज्याचा अभ्यास मागल्या माडींतील लहानशा खोलींत होत होता, त्या विषयाची चर्चा गल्लोगल्लीं होऊं लागली. उपाहारगृहांतून, कर्तनालयांतून, साम्यवादाचें ज्ञान लोकांना होऊं लागलें. तात्पर्य, विचारसरणी जगामध्यें दडपून टाकल्यानें दडपली जात नाहीं. अनेक वेळां सत्य चिरडलें गेलें, अवमानिलें गेलें, तरी सत्य हें चिवट आहे, हरळीप्रमाणें अमर आहे. ज्याप्रमाणें हरळी अधिक तोडल्यास, अधिक खोडल्यास अधिक वाढते; त्याप्रमाणें सत्याचें स्वरूप आहे. ख्राइस्टला क्रूसावर चढवला, त्याचा देह निकालांत लागला, पण त्यानें प्रतिपादिलेलें सत्य जगामध्यें विस्तार पावलें, अमर झालें व तेंहि क्रूसाच्या साहाय्यानें. तात्पर्य, सत्य काय आहे हें सत्ता ठरवूं शकत नाहीं. अभिमानानें व आवेशानें सत्तेनें विरुद्ध असलेल्या कांहीं विचारांना दाबून टाकण्याचा प्रयत्न केल्यास आज नाहीं उद्यां तो विफल होतो आणि मग सत्ताधीशांचें तथाकथित सत्य त्यांच्यासह इतिहासजमा होतें. परास्त होतें. ज्ञात इतिहासकाळांत कांहींहि परिणाम न करतां विचारसरणींना व भावनांना दडपून टाकणारें तंत्र अद्यापि कुणाला सांपडलें नाहीं. येशूला क्रूसावर चढविलें. साक्रेटिसाला विष दिलें, अनेकांना देशनिर्वासित केलें. तथापि सत्याचा जय हा अखेरीस झालाच. हाच इतिहासाचा संदेश आहे.

तात्पर्य, हें आहे कीं, विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य यांना बंदी केल्यानें अगर दडपून टाकल्यानें विद्यमान सत्ताधीश कायम राहूं शकत नाहीं. त्याप्रमाणें प्रचलित विचारसरणी ही शाश्वत होऊं शकत नाहीं. जें आज समाजाला अप्रिय व असामाजिक वाटतें तेंच उद्यां लोकप्रियता पावतें. समाजाच्या श्रेष्ठ कल्याणाचें वाटतें. नवविचार हा सुरुवातीला एका व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होतो. गोमुखांतून निघालेली गोदावरी वाढत वाढत अफाट होते, त्याचप्रमाणें एका व्यक्तीच्या मनांत उत्पन्न झालेला विचार तो अनेकांशीं बोलून दाखवितो आणि वाढत वाढत तो विचार एका व्यक्तीचा न राहतां तो सामाजिक बनतो. केवळ नवविचार आहे म्हणून त्याला बंदी करणें हें सामाजिक हिताच्या दृष्टीनें योग्य नाहीं. नवा विचार

चुकीचा असेल, समाजविघातक असेल, पण तो केवळ नवा विचार आहे असें म्हणून त्याला दडपून टाकणें हें बरोबर नाहीं. ‘पुराणमित्येव न साधु सर्वम्।’ जुनें म्हणजे सर्व चांगलें हें जसें बरोबर नाहीं, त्याचप्रमाणें नवें म्हणजे सर्व वाईट ही विचारसरणी अयोग्य आहे. म्हणून समाजानें सारासार विचार करून कोणतें ग्राह्य, कोणतें अग्राह्य हें ठरविलें पाहिजे. त्यासाठीं चर्चा झाली पाहिजे व चर्चा होण्यासाठीं भाषणस्वातंत्र्य असलें पाहिजे. आज समाजामध्यें जे विचार प्रचलित आहेत त्यांचें निरीक्षण केलें तर असें आढळून येईल कीं, पन्नास वर्षांपूर्वी हेच विचार जेव्हां मांडले गेले त्यावेळीं त्यांना समाजानें असामाजिक मानलें होतें. ‘न पठेत् यावनीम् भाषाम् प्राणैः कंठगतैरपि।’ मरण पत्करावें पण यावनी भाषा शिकूं नये हे गेल्या शतकांतील विचार आतां तसे राहिले नाहींत. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रांत शंभर वर्षांपूर्वी किंबहुना पन्नास वर्षांपूर्वी वावरत असलेली विचारसरणी आज इतिहाससमालोचकांचा विषय बनली आहे. विद्यमान असलेली ती विचारसरणी अतीतांच्या पदार्थसंग्रहालयांत दाखल झाली आहे. तात्पर्य, समाजाचें जीवन हें न बदलणारें व नित्य आहे असें नाहीं. तें क्षणाक्षणाला वाटलें तर युगायुगाला बदलत आहे. आणि समयानुसार समाजाचीं नीतितत्त्वें, समाजाचें दार्शनिक स्वरूप पण बदलत असतें. जें आज पटत नाहीं तें उद्यां पटत असतें. जें आज असत्य वाटतें तें उद्यां प्रतिष्ठित सत्य होतें. सत्य – विशेषतः सामाजिक व राजकीय सत्य – हें सापेक्ष असतें आणि म्हणून सत्य कोणतें व असत्य कोणतें याचा विचार सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात करावयाचा असतो. सत्तेनें सांगितलें अगर जाहीर केलें म्हणून एखादी गोष्ट सत्य अगर असत्य ठरूं शकत नाहीं. सत्य कोणतें व असत्य कोणतें हें चर्चा व अनुभव यांच्या साहाय्यानें ठरतें. जें न पटणारें आहे तें विवरलें जातें. त्याची सत्यता व प्रतिष्ठा पटवून देण्याची संधी त्यांच्या प्रतिपादकांना मिळते. संपत्ति-विषयक कल्पना, धर्मविषयक कल्पना, वारसाविषयक कल्पना, लग्नविषयक कल्पना ह्या निरंतर व न बदलणाऱ्या अशा नाहींत. श्रुति, स्मृति व सदाचार व स्वस्यच प्रियमात्मनः म्हणजे स्वतःला योग्य वाटतें तें, या चार गोष्टींनीं योग्य कोणतें, अयोग्य कोणतें, हें ठरविलें जावें, असा शास्त्राचा दंडक आहे. कुठल्याहि रीतीनें अगदीं एक मतानेंसुद्धां समाजविरोधी ठरलेल्या गोष्टींची चर्चा बंद केली जाऊं नये. जें असत्य असेल, जें समाजाला पटणारें नसेल, त्याचें स्वरूप चर्चा झाल्यानें समाजाला स्पष्ट होतें. जें स्वभावतः असत्य असेल त्याचें खरें स्वरूप चर्चेच्या खुल्या वातावरणांत लपलें जात नाहीं. शिवाय कांहीं प्रसंगीं असेंहि असूं शकेल कीं, तें असत्य समाजानें पूर्ण चर्चेअंतीं असत्य ठरविलें तरीसुद्धां तें प्रतिपादण्यांत, त्यांचा आग्रह धरण्यांत कांहींचा स्वार्थ असेल, पण समाजाचें त्यांत अनहित असेल अशी परिस्थिति जेव्हां येईल त्या वेळेला समाजाच्या हिताच्या दृष्टीनें संबंधित व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणें योग्य व इष्ट ठरेल.

सामान्यपणें समाजानें खुल्या चर्चेच्या वातावरणांत जें समाजाला अनिष्ट व अनहितकारक आहे असें ठरविल्यानंतर त्यावर बंदी करावयाची ती कोणी व कशी हा प्रश्न उत्पन्न होतो. व्यक्तीचें स्वातंत्र्य मर्यादित करण्याचा, त्यावर अंशतः का होईना बंदी घालण्याचा प्रसंग हा अपवादात्मकच असला पाहिजे. आणि या कामीं पूर्ण विचारांतींच उपाययोजना झाली पाहिजे. बंदी करण्यास योग्य आहे हें ठरविण्याच्या दृष्टीनें कांहीं कसोट्या असल्या पाहिजेत. केवळ समाजाच्या हितासाठीं तें आहे व तसें प्रतिपादणारी व्यक्ति अगर संस्था तळमळ दाखविणारी आहे, निःस्वार्थ आहे एवढ्यानेंच भागत नाहीं. एखादे कृष्णराव धर्माभिमानी आहेत, तळमळीचे गृहस्थ आहेत, त्यांना समाजाचें हित श्रेष्ठ वाटतें एवढ्यावरून त्यांनीं एखादें लिखाण अश्लील म्हटलें म्हणजे तें समाजानें अश्लील मानणें अगर सरकारनें त्याबाबत कांहीं कारवाई करणें योग्य नव्हे. शिष्ट काय अशिष्ट काय, श्लील काय अश्लील काय, सदभिरुचीला धरून काय, सोडून काय, हें ठरविणें सोपें नाहीं. हें ठरविण्याची क्रिया मताचा भाग आहे, वस्तुस्थितीचा नाहीं. उदा. मी येथें खुर्चीवर बसलों आहे ही गोष्ट मताचा विषय नव्हे, वस्तुस्थितीचा (फॅक्ट) आहे. पण माझ्यासमोर लेखक बसला आहे तो लिहिण्याच्या कामांत लक्षपूर्वक लिहितो आहे का अन्यथा, हा मताचा प्रश्न आहे. सदाचार कोठें संपतो व स्वैराचार कोठें सुरू होतो ही सीमा अस्पष्ट असते आणि मानसिक सृष्टींतील असल्यानें जमिनीवर रेघ ओढतो तशी ओढतां येत नाहीं. कुठलेंहि मत देणें हें तत्कालीन सामाजिक परिस्थितीला धरून दिलें पाहिजे. एके काळीं डोक्यावर टोपी नसलेले कोणीहि विद्यार्थी नसत. आज टोपी घालून कॉलेजांत जाणारा विद्यार्थी 'दश सहस्रेषु' सुद्धां एक सांपडणार नाहीं. तेव्हां कांहीं काळापूर्वी असलेला सदाचार अगर स्वैराचार चालू क्षणाला तसा तो राहत नाहीं. जमान्याप्रमाणें जनमत बदलत जातें. या स्थितींत समाजाविरुद्ध कोणतें, अश्लील कोणतें हें ठरविणें सोपें नाहीं. कोर्टांतील न्यायनिवाडे पण निश्चित असें सांगत नाहींत. जर तर हीच भाषा वापरतात. हिंदुस्थानांत अश्लीलते-बाबत कायद्याची स्थिति काय आहे याचा विचार नुकताच कांहीं लेखांतून मुंबईच्या 'आलमगीर'मधून आलेला आहे. त्याहि लेखांत लेखकाला या संबंधांतील निर्णयात्मक अशी कसोटी दाखवितां आली नाहीं. किंबहुना कोणालाहि ती दाखवितां येणार नाहीं. ह्या दृष्टीनें विचार करतांना कोणी एक व्यक्ति अगर संस्था वाङ्मयांतील फौजदार बनून श्लील कोणतें, अश्लील कोणतें हें ठरवूं म्हणेल तर तें बरोबर होणार नाहीं. तीच गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांबाबत खरी आहे. ज्यांचा वाङ्मयाशीं उभ्या आयुष्यांत संबंध आला नाहीं, त्याला एखाद्या लिखाणांत अश्लील काय आहे हें सांगण्याचा अधिकार देणें योग्य ठरणार नाहीं. सामान्यपणें प्रचलित समजुतीविरुद्ध, परंपरागत रीतीरिवाजाविरुद्ध कांहीं लिहिलें तरी अधिकाऱ्यांच्या डोळ्याला तें धोक्याचें वाटतें, त्या लिखाणानें समाजाची उलथापालथ होईल असें वाटतें. कांहीं कांहीं अधिकाऱ्यांचीं स्थानें अशीं असतात

कीं, त्यांच्या संबंधांत येणारी प्रत्येक व्यक्ति लबाड आहे, धोकेबाज आहे, अशीच मनोवृत्ति त्या ठिकाणीं उत्पन्न होते. संशयी वृत्तीचे ते बनतात. सामान्यपणें गुन्हा शाबीत होईपर्यंत आरोपी हा गुन्हेगार नाहीं असें मानलें पाहिजे, हें कायद्याचें आद्य तत्त्व आहे. तथापि तपासणीला आलेलीं पुस्तकें ज्याअर्थीं पोलिसांनीं धाडलीं आहेत त्याअर्थीं तीं सामान्यपणें अश्लील असलीं पाहिजेत, असा प्राथमिक समज करून घेऊनच अधिकारी मग तपासणी करतात. सामान्य माणसाला एखादें लिखाण वाचतांना अगर नंतर त्याला कांहीं विशेष वाटलें नसलें तरी सेन्सॉरला अगर अधिकाऱ्याला त्यांत कांहीं तरी अश्लील, अयोग्य दिसतें. चित्रपटनियंत्रण-मंडळाविरुद्ध अशीच तक्रार आहे. जे प्रसंग सामान्य प्रेक्षकाला कांहीं विशेष असे वाटणार नाहींत, त्यांवरच नियंत्रण-मंडळाची कात्री चालते. म्हणून समाजाच्या दृष्टीनें योग्य काय, अयोग्य काय, समाजानें काय वाचावें, काय चित्रपटांत पाहावें, ह्याबाबत कांहीं तरी सामान्य कसोट्या असल्या पाहिजेत. मनुष्य जें पाहातो, जें वाचतो, जें ऐकतो, या सर्वांतून त्याला प्रेरणा मिळत असते. त्याचीं अशीं खास मूल्यें या मसाल्यांतून तो निर्माण करीत असतो. साधारणपणें जें लिखाण असभ्य, अश्लील अगर जें घातुक आहे तें प्रतिबंधित झालें पाहिजे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि निश्चितपणें अश्लील अगर घातुक काय, याची व्याख्या वर सांगितल्याप्रमाणें कायद्यांत निश्चित नाहीं. ‘समाजस्वास्थ्य’ या मासिकाचे अंक अश्लील म्हणून त्याच्या संपादकाविरुद्ध सरकारनें कारवाई केली होती. तथापि त्याहि खटल्यांत निश्चितपणें अश्लील म्हणजे काय हें ठरवतां आलें नाहीं. लैंगिक गोष्टीबद्दल चर्चा करणें एके काळीं अश्लील समजलें जात होतें. समाजाच्या नीतीविरुद्ध तें आहे असें मानलें जात होतें. आतां लैंगिक शिक्षण हें विद्यार्थी व विद्यार्थीनींना द्यावें असा प्रचार करण्यांत येत आहे. एके काळीं बर्नार्ड शॉच्या नाटकालाहि इंग्लंड सरकारनें बंदी केली होती. सामान्यपणें अश्लील कोणतें, समाजाच्या नीतीवर हल्ला करणारें कोणतें हें ठरवितांना समाजांतील विद्यमान भावना जशा लक्षांत घेतल्या पाहिजेत, त्याचप्रमाणें व्यक्तीच्या भाषणस्वातंत्र्याचा, विचारस्वातंत्र्याचा विचार पण लक्षांत घेतला पाहिजे. विद्यमान नीतिमूल्यें, विद्यमान समजुती यांचाच एकांगी विचार केला तर समाजांत प्रगति होणार नाहीं व नवविचारांना मुळांतच मारलें जाईल असें होईल. म्हणून वर सांगितलेल्या दोन्ही दृष्टींचा विचार करून न्यायाधीशानें याबाबत निर्णय दिला पाहिजे. राज्यांत लोकमतानुसार कायदा राहील याची शंभर टक्के ग्वाही मुरलेल्या लोकशाहींतसुद्धां उपलब्ध होत नाहीं. लोकमत पुढें जात असतें, नवनवे विचार हे अरुणाप्रमाणें पुढें पुढें जात असतात. दीर्घ दृष्टि असणारीं समाजांतील श्रेष्ठ धारिष्ट्याचीं माणसें विचार करीत असतात. त्यांचे विचार खळखळ उत्पन्न करणारे असतात. सामान्यपणें नव्या विचाराला हळूहळू पाठिंबा मिळत जातो. एकाचें मत बहुसंख्याकांचें मत होतें; मग त्याचें कायद्यांत रूपांतर होतें. कायदा झाला म्हणजे

विद्यमान मूल्यांना, विचारांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. समाजाच्या जीवनाचा तीं मूल्यें मग भाग बनलीं. तथापि त्यापुढें प्रगति नाहीं असें होत नाहीं. लोकमत पुढें चालूंच असतें आणि कायदा त्याच्याबरोबर राहण्याचा प्रयत्न करीत असतो. लोकमताला अगतिकत्व नसतें व कायद्याला अंत नसतो. म्हणून अश्लील कोणतें, अयोग्य कोणतें, हें ठरवितांना शासनानें प्रचलित व प्रगतिपर या दोहोंचा विचार करून तें ठरविलें पाहिजे. सामान्यपणें जनतेमध्यें अभिरुचीची, सभ्यतेची अशी एक भावना असते. तिचें वर्णन करतां येणार नाहीं. ती अमुक असें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. तथापि ती असते, व्यक्तिमात्राला तिची जाणीव असते, ही गोष्ट तितकीच खरी आहे. म्हणून तिची जाणीव असेल, तिला जें विसंगत वाटेल तें अयोग्य अगर अशिष्ट म्हणण्यास हरकत नाहीं. न्यायाची कल्पना जशी जनतेमध्यें असते व तिची जाणीव प्रत्येक व्यक्तीला संबंधित प्रसंगाला होत असते. 'हा काय न्याय झाला' असे उद्गार ज्यावेळीं मनुष्य काढतो त्यावेळीं त्याच्या मनांत न्याय्य काय आहे याची जाणीव असते, त्याचप्रमाणें अश्लीलतेबाबत व श्लीलतेबाबत लोकांची अशी भावना असते. जें नाटक अगर चित्रपट आपण आपली पत्नी व लेकी व सुनांसह पाहिलें असतांना मनाला संकोच वाटणार नाहीं तें नाटक अश्लील नव्हे, ही कसोटी तात्यासाहेब केळकर यांनीं सांगितली होती. थोडक्यांत म्हणजे, सर्वसामान्य जनाला जें शिष्ट वाटतें तें शिष्ट, ही कसोटी असली पाहिजे. कांहीं मंडळी अशी असतात कीं, कुठलेंहि नवीन त्यांना नको असतें. ते इतके वेदाभ्यास जड असतात कीं, किंचित् मनोरंजनात्मक अशी गोष्ट त्यांना नको असते. ससाजाचा दृष्टिकोन म्हणजे चार स्वयंमन्य शिष्टांचा दृष्टिकोन नव्हे. ही गोष्ट लक्षांत ठेवून शासनानें सदभिरुचिपूर्ण कोणतें अगर अन्यथा कोणतें हें ठरविलें पाहिजे. एकांगी अदूरदृष्टीनें विचार केला गेल्यास रामायण, महाभारत हेहि धर्मग्रंथ अश्लील ठरतील, शाकुंतलांतील कित्येक संवाद गाळावे लागतील, त्याचप्रमाणें सामाजिक बाबतींत प्रगतीच्या दृष्टीनें केलेले सर्व विचार समाजाला धोक्याचे मानले जातील. लैंगिक शिक्षणाबाबत तर कोणी विचारसुद्धां करणार नाहीं.

काय अश्लील, काय समाजाच्या हितासाठीं प्रतिबंधित केलें पाहिजे, याचा विचार वर सांगितल्याप्रमाणें व्यापक व प्रगतिपर दृष्टीनें झाला पाहिजे. समाजाच्या जीवनाच्या विविध क्षेत्रांत नाना तऱ्हेचे प्रश्न उपस्थित होत असतात. त्या प्रश्नांसंबंधीं बोललें जातें, लिहिलें जातें व विचार केला जातो. समाजांतील वातावरण चर्चासन्मुख असलें म्हणजे मनामध्यें लपलेले संशय, न कळत मनावर परिणाम करणारे पूर्वग्रह मग चर्चेच्या वातावरणांत बाहेर येतात व संबंधित व्यक्तीचें जीवन व मन अधिक प्रसन्न होतें. कांहीं तरी भलत्याच प्रमाणांत आढ्यता बाळगून अतिरेकीपणानें जुन्यांना कवटाळून जीवन जगण्यानें मनुष्य आग्रही बनतो व त्याचबरोबर प्रगतिविन्मुख होतो. मर्यादेबाहेरचा सोज्वळपणा अगर सोंवळेपणा समाजामध्यें व विशेषतः प्रगतिपर समाजामध्यें इष्ट ठरत नाहीं. याचा

अर्थ जें कांहीं नवें नवें दृष्टीस येईल त्याच्यामागें धांवणें असा नाहीं. अज्ञान हें ज्याप्रमाणें स्वातंत्र्याला बाधक आहे, त्याचप्रमाणें अल्पज्ञान अगर विकृत ज्ञानहि तितक्याच प्रमाणांत स्वातंत्र्याला बाधक असतें. म्हणून समाजामध्यें व्यापक दृष्टि ठेवून स्वतंत्र बुद्धीनें विचार करण्याची प्रवृत्ति स्वातंत्र्याच्या दृष्टीनें जोपासली गेली पाहिजे. आपल्याला विचार करण्याचें स्वातंत्र्य जसें आहे, त्याचप्रमाणें अन्यांनाहि आहे याची जाणीव व्यक्तिमात्राला असली पाहिजे. आणि म्हणून ज्याला स्वातंत्र्याचे विचार, स्वातंत्र्याचें मर्म कळलें आहे तो कधींहि अन्यांच्या भावनांबाबत अपमानकारक अगर तुच्छतापूर्वक बोलणार नाहीं. विशेषतः, अन्याच्या धार्मिक मतांबद्दल, त्याच्या धार्मिक श्रद्धांबद्दल अपमानकारक बोलणें अगर कमी लेखणें हें जसें सौजन्याचें लक्षण नाहीं, त्याचप्रमाणें स्वातंत्र्याचें रहस्य कळल्याचेंहि लक्षण नाहीं. आजकालच्या मराठी वर्तमानपत्रांतून जें लिहिलें जातें, त्यामध्यें सौजन्य व सद्भाव फार थोडा दिसून येतो. वर्तमानपत्रें हीं मार्गदर्शक, सामाजिक नीतिमूल्यांची संरक्षक अशीं असलीं पाहिजेत. आणि म्हणून मुद्रणस्वातंत्र्य हा एक मौलिक हक्क मानला जातो. तथापि लोकशाही युगांत कोणावरती काय आरोप केले जातील हें कोणी सांगूं शकत नाहीं. हातांत वर्तमानपत्र असलें म्हणजे सत्य लपवून, असत्य सूचित करून, एखाद्या कार्याचा संपूर्णपणें नाश करतां येतो. ज्या सत्याचा शोध वादावादांतून लागावयाचा त्यालाच प्रथम अपमृत्यु येतो. आणि मग होणारी चर्चा शिवराळपणाच्या धुळीनें समाजाला कलंकित करीत असते. एखाद्या व्यक्तीच्या मागें लागावयाचें ठरविल्यानंतर सूक्तासूक्त, योग्यायोग्य गोष्टींचा विचार न करतां विद्वेषानें व विकृतपणें त्याच्यावर हल्ला केला जातो. वादाचा विषय सार्वजनिक असला तरी वैयक्तिक जीवनांतील कथित व तथाकथित गोष्टींवर भर देऊन बदनामी व अपकीर्ति याबाबत उच्चांक गांठला जातो, कार्याऐवजीं कर्त्यावर टीका होते, गाणें गोड आहे कीं नाहीं याचा विचार न करतां गायकाच्या स्वरूपाचा विचार केला जातो; आणि अशा रीतीनें मुद्रणस्वातंत्र्याचा व विचारस्वातंत्र्याचा दुरुपयोग केला जातो. आणि मग ह्या स्वातंत्र्याच्या दुरुपयोगासाठीं राज्यानें घातलेल्या मर्यादा या कशा इष्ट आहेत हें कळतें. समाजामध्यें जोंपर्यंत आपली अपकीर्ति अगर आपला अपमान होत नाहीं, तोंपर्यंत सामाजिक जीवनांत चाललेली धुळवड मनांतल्या मनांत आपण आनंदानें पाहात असतों. नागरिकांचें खरें कर्तव्य म्हणजे आपल्यावर जेव्हां अन्याय झाला असेल त्याच वेळीं प्रतिकार करणें एवढेंच नव्हे, तर अन्यांच्या बाबतींत तसा कांहीं प्रकार होत असेल तर त्याहि ठिकाणीं आपला आवाज उठविणें हेंहि आहे. दगड व चपला विरोधी पक्षाच्या सभेंत आल्या हें वाचून आनंद मानणारे कांहीं असतात. पण ज्यांना हें पसंत नाहीं असेहि अनेक असतात. पण ते धोरणीपणानें स्वस्थ बसतात आणि जेव्हां त्यांच्यावर प्रसंग येतो, त्यांचेंच धोतर सोडलें जातें त्यावेळीं सामाजिक नीतिमत्तेचा, सार्वजनिक जीवनाच्या शुद्धतेचा मोठा कळवळा त्यांना येतो. असले ढोंगी व

उदासीन हे समाजांतील स्वातंत्र्याचे दुष्मन असतात, असें कोणी प्रतिपादल्यास त्यांत सत्याचा अंश असतो. जी गोष्ट सार्वजनिक जीवनासंबंधीं तीच गोष्ट धार्मिक गोष्टीबाबत खरी असते. अन्यधर्मीय एकमेकांत भांडत असले म्हणजे बरें वाटतें. मुसलमानांनीं ख्रिस्त्यांची नालस्ती केली अगर ख्रिस्त्यांनीं अन्यधर्मीयांची केली तर सामान्यपणें हिंदुधर्मीय उदासीन असतात. जर समाजांतील स्वातंत्र्याचें खरें संरक्षण व्हावयाचें असेल तर समाजांत धार्मिक असहिष्णुतेला विरोध असला पाहिजे, त्याचप्रमाणें विचारस्वातंत्र्य अगर भारताच्या घटनेंत दिलेलें धर्मस्वातंत्र्य, धार्मिक प्रचाराचें स्वातंत्र्य, याचा अर्थ हीं स्वातंत्र्यें अमर्याद आहेत असें नव्हे. एखाद्या धर्मातील श्रेष्ठता, उदात्तता दाखविणें हें निराळें व त्या त्या धर्मातील आचारांविरुद्ध, श्रद्धास्थानांविरुद्ध अपमानकारक बोलणें अगर चेष्टापूर्वक बोलणें हें विचारस्वातंत्र्याच्या नांवाखालीं क्षम्य ठरत नाहीं. धर्मविषयक चर्चा तर अत्यंत श्रेष्ठ अशा वातावरणांत झाली पाहिजे. प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, हा शिवराळपणा, हा बेजबाबदारपणा चालू द्यावयाचा व सामाजिक शांतता बिघडूं द्यावयाची का ? कीं अवश्य तेवढी मुद्रणबंदी करावयाची ? समाजाचें हित व समाजाची शांतता ही जर धोक्यांत येत असतील तर त्यांना बंदी केलीच पाहिजे, हें कोणीहि मान्य करील आणि हीं बंदी स्वातंत्र्यावर आक्रमण नसून स्वातंत्र्याचें संरक्षण आहे, हीहि गोष्ट सूक्ष्म विचारान्तीं पटण्यासारखी आहे.

आधुनिक राज्याचें सर्वव्यापी कार्यक्षेत्र लक्षांत घेतां व्यक्तीच्या जीवनांतील सर्व क्षेत्रांवर राज्य नियंत्रण करीत असतें. भाषण-स्वातंत्र्य आहे, सभा-स्वातंत्र्य आहे, विचार-स्वातंत्र्य आहे, पण विचार-स्वातंत्र्यालासुद्धां वळण लावणारी पार्श्वभूमि अशी असली पाहिजे कीं, त्यांतहि राज्याचा हस्तक्षेप मर्यादेपलीकडे असूं नये. गेल्या चाळीस वर्षांचा इतिहास असें सांगतो कीं, नागरिकांच्या मनाला वळण देणारें, त्यांच्या आदर्शांना आकार देणारें असें शिक्षण बालपणापासूनच देण्याचा उपक्रम अनेक राष्ट्रांतून चालू आहे. सोव्हिएट रशियांत शिक्षण हें सर्वस्वीं सरकारची जबाबदारी आहे. त्याच्या पाठ्यक्रमाच्या पुस्तकापासून कवायतीपर्यंतची व्यवस्था राज्याच्या नियंत्रणाखालीं चालते. जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती देश उद्धरी, हा सिद्धान्त निराळ्या अर्थानें आतां अनुभवाला येत आहे. शिक्षण देणारी, इतकेंच काय पाळण्याची दोरी पण हातांत घेणारी आतां व्यक्ति राहिली नसून सरकारी संस्थांनीं तें काम हातीं घेतलें आहे. स्त्रिया कामावर गेल्या कीं त्यांचीं मुलेंबाळें दायांच्या स्वाधीन, मोठीं झाल्याबरोबर शाळेच्या स्वाधीन व त्यानंतर समाजाच्या नियोजनव्यवस्थेच्या स्वाधीन. या परिस्थितींत जें जें कांहीं लहानपणापासून शिकवलें जाईल त्याला अनुसरून बालकांची बुद्धि विकसित होणार. याचा अर्थ मनाला विचार करण्याचें एक विशिष्ट वळण लागणार आणि जें शिकविलें गेलें आहे तेंच श्रेष्ठ व योग्य अशी प्रवृत्ति उत्पन्न होणार. ही गोष्ट लक्षांत घेतां विचार-स्वातंत्र्य आहे एवढ्यानें भागत नाहीं, तर मनाला स्वतंत्र विचार

करण्याची संवय आहे असें झालें पाहिजे. भारतामध्यें राज्य हें निधर्मी असल्यानें सामान्यपणें धार्मिक शिक्षण शाळांतून दिलें जात नाहीं. एवढेंच नव्हे तर नीतिविषयक शिक्षण पण आतां अभ्यासक्रमाचा भाग नाहीं. या गोष्टीचा थोडासा परिणाम विद्यार्थ्यांच्या हल्लींच्या अनुशासनहीनतेंत दिसून येत आहे. भारतामध्यें अनेक धर्म आहेत व प्रामुख्यानें हिंदु, मुसलमान, खिश्चन व शिख हे आहेत. वास्तविक सर्व धर्मांचीं आद्य तत्त्वें हीं भिन्न भिन्न नाहींत. नीतिविषयक कल्पनाहि सामान्यपणें तशाच आहेत. तथापि कुठल्याहि शिक्षणविषयक संस्थेला विशिष्ट धर्माचें शिक्षण देण्याची मुभा नसावी हें इष्ट आहे. कारण धर्मनिष्ठा धर्मांधपणांत केव्हां बदलेल याचा भरंवसा नसतो. आणि एकदां धर्मांधपणाचें वेड समाजांत शिरलें म्हणजे असहिष्णुता उत्पन्न होते व असहिष्णुतेच्या वातावरणांत स्वातंत्र्य जोपासलें जात नाहीं. म्हणून हें सहिष्णुतेचें व सद्भावनेचें वातावरण लहानपणासूनच मुलांच्या भोंवतालीं राज्यांत असलें पाहिजे. तसें असलें म्हणजे मनाला विचार करण्याची संवय मुलांमध्यें निर्माण होते. जी गोष्ट धर्मविषयक बाबतींत तीच गोष्ट सर्वसामान्यपणें सामाजिक शास्त्राच्या शिक्षणाबाबत असली पाहिजे. अर्थशास्त्राचे सिद्धान्त अगर राजकारणशास्त्राचे सिद्धान्त यांचें शिक्षण देतांना आग्रहीपणा त्यांत नसावा. निरनिराळीं मतें व विचारप्रणाली यांचें ज्ञान अवश्य मिळालें पाहिजे. मग, तुलनेनें विचार करण्याची शक्ति जागृत होते. ज्ञान प्रथम दिलें पाहिजे व विचार करण्याच्या शक्तीला अवसर दिला पाहिजे व अनुकूल वातावरण सर्व शिक्षणक्षेत्रांत असलें पाहिजे. आधुनिक राज्यांत शिक्षणाचें महत्त्व इतकें आहे कीं, एखाद्या वेळेस शस्त्रागाराकडे दुर्लक्ष केलें तरी चालेल, पण राज्यानें शिक्षणक्षेत्राकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. शस्त्र अगर अस्त्र किती प्रभावी असलें तरी माणसानें तें चालवायचें आहे, म्हणून मनुष्य हा अधिक प्रभावी मानला पाहिजे. त्याच्या मनांत नसेल तर सांगितलेलें कार्य तो करणार नाहीं व केलें तर विकृत करील. राज्य म्हणजे नागरिक. भिंतीची शक्ति तिची ताकद ज्या विटांनीं ती बांधली आहे त्यांवर अवलंबून आहे. कच्च्या विटांची पक्की भिंत होत नाहीं. एकांगी शिक्षण घेतलेले नागरिक व्यापक दृष्टीचे व समतोल बुद्धीचे होत नाहींत हें स्पष्ट आहे. म्हणून स्वातंत्र्यरक्षणासाठीं समतोल बुद्धीचा, व्यापक बुद्धीचा, नागरिक असेल तरच तें रक्षिलें जाईल. आणि तसा नागरिक तयार करण्याचें कार्य शिक्षणाचें आहे. म्हणून शिक्षणक्षेत्रांत सर्वसामान्यपणें सरकारनें धोरण आंखून द्यावें व त्या नंतरच्या कार्यांत मर्यादेपलिकडे ढवळाढवळ करूं नये. विद्यार्थीदशेंतच विशिष्ट बुद्धीनें व विशिष्ट हेतूनें रचलेल्या पाठ्यक्रम पुस्तकांच्याद्वारा मतें लादणें इष्ट नाहीं. विद्यार्थ्यांमध्यें ज्ञानाबाबत कुतूहल उत्पन्न व्हावें, संबंधित विषयांची गोडी त्याला लागावी, अशा तऱ्हेनें व्यवस्था असली पाहिजे. शिक्षणाच्या व्यवस्थेनें त्याचें व्यक्तित्व वाढीस लागलें पाहिजे. तें संकुचित होतां कामा नये.

विद्यार्थीदशेंत काय वाचनांत यावें याबाबतींत सामान्य मर्यादा सरकारनें ठेवून जें हवें असेल व जी इच्छा असेल तें वाचण्याची मुभा असली पाहिजे. विद्यमान सरकारला अगर सत्ताधारी पक्षाला जें सिद्धान्तदृष्ट्या पटत आहे तेवढें शिकविलें जावें असा आग्रह धरतात, तें इष्ट ठरणार नाहीं. सामाजिक व्यवस्थेसंबंधींचीं किंबहुना सामाजिक शास्त्रासंबंधींचीं मतें हीं निरपेक्ष असूं शकत नाहींत. समाज बदलला म्हणजे समाजविषयक सिद्धान्तहि बदलतात. म्हणून समाजविषयक शास्त्रांतून आग्रहानें प्रतिपादन केलें जाऊं नये आणि व्यक्तीला विविध दृष्टिकोनांची माहिती मिळून त्याला स्वतंत्रपणें निर्णय घेण्याची संधी असली पाहिजे. केवळ त्याचीं मतें नवीन आहेत, क्षणभर विपरीत आहेत, धर्मवेडेपणाचीं आहेत, अश्लील आहेत, इतिहासाविरुद्ध आहेत, क्षणभर असामाजिक आहेत, असें जरी असलें तरी त्यांच्या प्रदर्शनावर राज्यानें बंदी घालूं नये. सामान्यपणें राज्याच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीनें जी मर्यादा आवश्यक तेवढीच घातली जावी. अन्य कांहीं मर्यादा घातल्या गेल्यास त्या योग्य नाहींत. पुस्तकप्रकाशनासच बंदी करणें ही एक अयोग्य मर्यादा आहे. अशी मर्यादा घातली म्हणजे खरोखर त्या पुस्तकांत काय सांगितलें आहे, काय दृष्टिकोन आहे, या गोष्टींचें ज्ञान लोकांना होत नाहीं आणि मग नाना तऱ्हेचे संशय समाजामध्यें उत्पन्न होतात. तसेंच एखाद्या अधिकाऱ्यानें उठावें आणि बंदी घालावी हेंहि बरोबर नाहीं. नाट्यशास्त्र माहीत नाहीं, साहित्याचा परिचय नाहीं, अशा एखाद्या अधिकाऱ्यानें अमुक एक नाटक समाजाच्या हिताविरुद्ध आहे हें सांगावें यांत न्याय्य व्यवस्था वाटत नाहीं. सरसहा जर बंदी होऊं लागली, तर समाजांत नवविचारांना संधी मिळणार नाहीं. समाजाचें वैचारिक जीवन सांचलेल्या डबक्यासारखें होईल. जेथें अमुक एक गोष्ट परंपरेविरुद्ध आहे, रीतीरिवाजाला सोडून आहे, एवढ्याच कारणासाठीं तिला प्रतिबंध होत असेल, तर तो समाज कधींहि प्रगति करूं शकणार नाहीं. आणि एकदां नव्या विचारांना बंदी करणारें वातावरण योग्य मानलें गेलें म्हणजे त्याचा अर्थ व परिणाम असा होतो कीं, जें प्रस्थापित आहे तेंच बरोबर आहे, जे सत्ताधीश आहेत तेच शहाणे आहेत. सामान्यपणें अनिर्बंध अविवेकी मतस्वातंत्र्य असावें असें कोणीहि म्हणणार नाहीं. मग ज्या मर्यादा असतील त्या कोणत्या दृष्टीनें असाव्यात हेंहि समजून घेतलें पाहिजे. समाजाच्या श्रेष्ठ हिताच्या दृष्टीनें त्या असाव्यात हें सामान्यपणें बरोबर. ज्या मतस्वातंत्र्याचा आपण विचार करीत आहोंत तें मतस्वातंत्र्य म्हणजे जे सामान्य प्रश्न समाजांत निर्माण होतात व ज्यांचा संबंध सार्वजनिक जीवनाशीं आहे ते, एखाद्या व्यक्तीबद्दल अगर एखाद्या व्यक्तीच्या कृत्याबद्दल बोलणें या बाबतींत मतप्रदर्शनाला साहजिकच अधिक मर्यादा असणार. व्यक्तीचें जें कृत्य केवळ खाजगी आहे व ज्याचा संबंध कुठल्याहि सार्वजनिक प्रश्नाशीं अगर नीतिमत्तेशीं येत नाहीं, त्या प्रश्नावर मत देणें याबाबत देशांतील कायदे आहेत ते विचार करतील. तें स्वातंत्र्य म्हणजे ज्या मतस्वातंत्र्याचा येथपर्यंत विचार केला तें नव्हे. मतस्वातंत्र्याच्या

नांवाखालीं व्यक्तीची बदनामी, बेअब्रू अगर अपमान केला तर तें कृत्य मतस्वातंत्र्याच्या हक्काचा सदुपयोग ठरणार नाहीं. अमुक एक गृहस्थ दारू पितो, अमुक एक गृहस्थ व्यभिचारी आहे, अमुक एक गृहस्थ बायकोला मारहाण करतो; अगर अमुक एक गृहस्थ अप्रामाणिक आहे, असें कांहीं बोलणें हें मौलिक स्वातंत्र्याच्या कक्षेंत येत नाहीं आणि म्हणून तें गुन्हा ठरतें. मात्र जेव्हां एखाद्या व्यक्तीचें कृत्य सार्वजनिक महत्त्वाचें असेल तर त्यावर केलेली टीका अगर मतप्रदर्शन मौलिक स्वातंत्र्याच्या कक्षेंत येतें. एखादा मनुष्य लबाड आहे, म्हणून त्याच्याशीं व्यवहार करणें धोक्याचें, असें कोणी म्हटल्यास तें क्षम्य ठरेल. कारण समाजाला त्या व्यक्तीपासून धोका आहे व त्या दृष्टीनें त्याबाबत केलेलें मतप्रदर्शन गुन्हा होत नाहीं. तथापि तो गुन्हा होत नाहीं यासाठीं जें विधान केलें असेल तें सत्य असलें पाहिजे व सार्वजनिक हितार्थ तें असलें पाहिजे. मतस्वातंत्र्य याचा अर्थ कुणाहि व्यक्तीची निंदा अगर नालस्ती करणें असा नाहीं. मुद्रणस्वातंत्र्य याचा अर्थ वाटेल तें खोटें लिहिणें, बदनामीकारक लिहिणें, बेअब्रू करणारें लिहिणें असा नव्हे. मतप्रदर्शन अगर लिखाण हें वैयक्तिक बाबतींत गुन्हास्वरूपी नसलें पाहिजे. व्यक्ति जर सार्वजनिक क्षेत्रांत उतरली तर ती टीकेचा विषय व्हावी, हें सरळ आहे. प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, ती सार्वजनिक क्षेत्रांत उतरली म्हणून तिच्या वैयक्तिक जीवनाचा अगर त्यांतील केवळ वैयक्तिक स्वरूपाच्या घटनांचा जाहीर पंचनामा व्हावा, असा त्याचा अर्थ नाहीं; अगर मतस्वातंत्र्याच्या नांवाखालीं तसें करणें योग्य नाहीं. निवडणुकीला उमेदवार उभा आहे त्यावेळीं त्याचा पक्ष, त्याचा कार्यक्रम यांवर टीका व्हावी हें योग्य. पण त्याच्या वैयक्तिक जीवनावर टीका होणें हें गैर. तथापि उमेदवाराला तो अप्रामाणिक म्हणून, दुर्वर्तनाचा म्हणून, नोकरींतून काढून टाकला असेल तर त्याबाबत सार्वजनिक महत्त्वाचें म्हणून योग्य ठरेल. पण अप्रामाणिकपणाबद्दल काढून टाकला ही गोष्ट सत्य असली पाहिजे. सर्वच सत्य सार्वजनिक महत्त्वाचें नसतें. जेवढें सार्वजनिक महत्त्वाचें असेल तेवढेंच मतप्रदर्शनासाठीं प्रस्तुत मानलें पाहिजे. एखादा गवई आपल्या बायकोला मारत असेल, पण त्याच्या रागदारीवर टीका करतांना ह्या गोष्टीचा उल्लेख करणें अयोग्य व मतस्वातंत्र्याला धरून तें नाहीं. कारण त्या सत्याला सार्वजनिक महत्त्व नाहीं. उलट, पक्षाचा कार्यक्रम दारूबंदीचा आहे व उमेदवार दारू पिणारा आहे, असें असेल तर उमेदवाराच्या दारूच्या व्यसनाबद्दल, संवयीबद्दल टीका करणें योग्य ठरतें. मात्र तो दारू पितो हें सत्य असलें पाहिजे. कोणाहि व्यक्तीविरुद्ध वाटेल तें बोलण्याचा अगर वाटेल त्या रीतीनें त्याचा अपमान करण्याचा अगर कमीपणा आणण्याचा हक्क वा स्वातंत्र्य कोणालाहि नाहीं. फक्त अपवाद जो आहे तो वर सांगितला आहे. मतस्वातंत्र्य हें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें वापरलें गेलें पाहिजे. जी गोष्ट व्यक्ति मतस्वातंत्र्याच्या दृष्टीनें सार्वजनिक हितार्थ करील तिला संरक्षण मिळालें पाहिजे. पुष्कळ वेळां टीकेमध्यें अतिशयोक्ति असते. पण

केवळ अतिशयोक्ति आहे म्हणून टीका करणाऱ्याला प्रमाणाबाहेर प्रायश्चित्त घ्यावें लागूं नये. उदाहरणार्थ, निवडणुकीला उमेदवार उभा आहे व टीकाकारानें त्याच्या लायकीबद्दल अगर वक्तृत्वाबद्दल बोलतांना श्रीयुत 'क्ष' हे जांभया देण्यापुरतेच सभागृहांत तोंड उघडीत असत, असें विधान केल्यास त्यांतील वक्रता व दुष्टपणा स्पष्ट असला, तरी तें सत्य असेल तर सार्वजनिक हितार्थ ठरतें. सार्वजनिक जीवन हें आतां एवढें गुंतागुंतीचें झालें आहे कीं, अगदीं तोलून मापून बोलणें अगर लिहिणें हें उत्कृष्ट ध्येय असलें तरी अंमलांत आणणें कठीण आहे. लोकशाही समाजव्यवस्थेंत हजारों माणसें सार्वजनिक जीवनांत वावरत असतात, भाग घेत असतात व सर्वच कांहीं शंभर टक्के जबाबदार नसतात, म्हणून भाषणांतून अगर लेखांतून जें कांहीं लिहिलें अगर बोललें जातें त्याबाबत कोर्टापुढें कांहीं आल्यास कोर्टानें थोडें व्यापकपणें व सहानुभूतिपूर्वक विचार केला पाहिजे. एखाददुसरा शब्द कमीजास्त झाल्याबरोबर नुकसानभरपाई देणें अगर दंड, अगर शिक्षा करणें कायदेशीर असलें तरी विशेष न्यायाचें ठरत नाहीं. सार्वजनिक क्षेत्रांत वावरणारांनीं विचार करून बोलावें, समतोलपणें लिहावें व बोलावें हें मान्य. तथापि, तसें लिहिलें वा बोललें गेलें आहे कीं नाहीं याचा विचार करतांना कांटेकोरपणा असूं नये ही दृष्टि असावी.

समाजांतील व्यक्तीविरुद्ध बोलतांना विचार-स्वातंत्र्यावर, मतप्रदर्शन-स्वातंत्र्यावर काय मर्यादा असाव्यात याचें थोडें दिग्दर्शन वर केलें आहे. व्यक्तीविरुद्ध मतप्रदर्शन करणें हें व्यक्तीचा संबंध सार्वजनिक क्षेत्राशीं येत असेल तर त्याचा विचार केला पाहिजे. अन्यथा तो येथें प्रस्तुत नाहीं. समाजांतील चालीरीती, समाजांतील परंपरा, धार्मिक समजुती, धार्मिक संकेत, थोडक्यांत म्हणजे समाजाच्या सामाजिक क्षेत्रांत जें कांहीं आहे व होत आहे याबद्दल मतप्रदर्शित करतांना जास्तींत जास्त स्वातंत्र्य पाहिजे व त्याची मर्यादा काय असावी याचा विचार थोडासा वर केला आहे. तथापि, राजकीय बाबतींत व आर्थिक बाबतींत मतस्वातंत्र्याचा विचार करतांना मतस्वातंत्र्याचा प्रश्न सोपा नाहीं. मनुष्यानें कोणते कपडे घालावे, कोणता रोजगार करावा, हे प्रश्न व त्यानें राज्याच्या आज्ञा मानाव्या कीं नाहीं हा प्रश्न या दोहोंत महत्त्वाचा फरक आहे. मनुष्याचें खाणेंपिणें अगर पोषाख ह्या गोष्टी दुय्यम महत्त्वाच्या आहेत. म्हणून राजकीय क्षेत्रांतील मतस्वातंत्र्याचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा आणि म्हणून त्याचा विचार थोड्या विस्तारानें व्हावयास पाहिजे. मनुष्य हा जेव्हां जन्माला येतो त्यावेळीं जी समाजाची परिस्थिति असते ती त्याला स्वीकारावी लागते. सामाजिक व्यवस्था, आर्थिक रचना, राजकीय संघटन, हें जसें त्याच्या जन्माच्या वेळीं असेल तसें त्याला प्रौढ होईपर्यंत स्वीकारावें लागतें, व तेथें त्याला विकल्प नाहीं. निवड करण्याचीहि संधी नाहीं. मनुष्याला पत्नीची निवड करतां येते, माता-पित्यांची नाहीं; त्याचप्रमाणें मनुष्याला जन्मापूर्वी अमुक राज्यांत अगर अमुक समाजांत मला जन्म हवा असें सांगतां येत नाहीं. मात्र जन्मानंतर जन्मावेळची परिस्थिति बदलून

घेण्याचा व त्यासाठीं प्रयत्न करण्याचा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. 'मी हिंदु म्हणून जन्मलों असलों तरी हिंदु म्हणून मरणार नाहीं,' ही डॉ. आंबेडकरांची घोषणा त्यांचा व्यक्तिगत निश्चय दाखविणारी असली, तरी त्यांत एक मौलिक व चिरंतन तत्त्व मानवी समाजाबाबत दिसून येतें. आर्थिक अगर सामाजिक अगर राजकीय व्यवस्था बदलण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे हें निर्विवाद. जन्म लादलेला आहे, पण कर्तृत्वाचें स्वातंत्र्य आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तथापि मागें सांगितल्याप्रमाणें जे हक्क व जीं स्वातंत्र्यें मनुष्याला जन्मसिद्ध अगर संविधानानें प्राप्त झालीं असतील तीं निरपेक्ष आहेत का, अमर्याद आहेत का, संदर्भशून्य आहेत का, हे प्रश्न उपस्थित होतात. मतस्वातंत्र्य बोलण्याचें व प्रकाशित करण्याचें यांत कांहीं फरक आहे का ? त्याचप्रमाणें समाजामध्यें प्रक्षोभ निर्माण झालेला आहे, संकटकाळ आला आहे, त्यावेळचें मतस्वातंत्र्य व शांततेच्या व स्वास्थ्याच्या काळाचें मतस्वातंत्र्य यांत कांहीं फरक आहे का ? समाजामध्यें सर्वत्र संप, सत्याग्रह, प्रक्षोभ, लोकांचा उठाव, या वातावरणांत समाजाच्या व राज्याच्या बाबतींत टीका करण्याचें किती स्वातंत्र्य असावें, तसेंच भाषण कोठें झालें, या गोष्टींचा विचार असावा कीं नाहीं, इत्यादि प्रश्न उपस्थित होतात. सामान्यपणें सर्वच टीका सद्‌बुद्धीनें व सद्‌भावनेनें केली जात नाहीं. त्याचबरोबर सर्वच टीका दुष्ट हेतूनें अगर द्वेषबुद्धीनें केली जात नाहीं. कांहीं टीका अगर मतप्रदर्शन यांत विधायक मनमिळाऊपणा असतो ; तर कांहीं टीकेंत मनाला जखमी करणारे वाक्प्रचार असतात. सार्वजनिक बाबतींत मतस्वातंत्र्याचा विचार करतांना संबंधित व्यक्तीचा हेतु म्हणजे टीका करणाऱ्याचा हेतु हा प्रधान नसून टीकेंतील सत्य व त्याचे सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें होणारे परिणाम हे अधिक महत्त्वाचे असतात. सरकारच्या राजकीय कृत्यावर टीका झाली पाहिजे, मतप्रदर्शन झालें पाहिजे आणि लोकशाही राज्यव्यवस्थेंत टीका अगर चर्चा ही लोकशाहीचा आत्मा आहे, त्याचें जीवनसत्व आहे. तथापि कुठल्याहि समाजव्यवस्थेंत अगर राज्यव्यवस्थेंत कांहीं शाश्वत, कांहीं सनातन, कांहीं राज्यसंस्थेला जीवनशक्ति देणारें असतें. प्रश्न असा उपस्थित होतो कीं, नित्याच्या व सामान्य गोष्टीवरील टीका व ज्यावर समाज उभारला आहे, ज्या तत्त्वावर राज्य संघटित झालें आहे, त्यावरील टीका यांत कांहीं फरक करावयाचा का नाहीं ? लोकमान्य टिळकांनीं राज्य व सरकार असा समर्पक भेद कल्पिला आहे. राज्य ही अचलमूर्ति व सरकार ही उत्सवमूर्ति. म्हणून उत्सवमूर्ति बसवावयाची, तिची पूजा व प्रतिष्ठा करावयाची आणि वेळ येतांच तिचें विसर्जनहि करावयाचें. परंतु अचलमूर्ति ही अचल. त्याचप्रमाणें प्रत्येक राज्याच्या व्यवस्थेंत अगर घटनेंत शाश्वत कोणतें, मौलिक कोणतें व क्षणिक कोणतें, बदलतां येण्यासारखें कोणतें, याचा निर्देश असतो; अगर त्याबाबत संकेत असतात. प्रचलित सरकारवर अगर प्रचलित सत्ताधीश मंत्रिमंडळावर टीका करणें, कितीहि टीका करणें, ही एक गोष्ट, पण राज्याच्या मौलिक सिद्धान्तावर टीका करणें ही दुसरी गोष्ट आहे.

सरकारनें नियोजन केलें, त्यावर टीका करणें ही एक गोष्ट आहे. पण लोकशाही राज्य-व्यवस्थाच नको ही निराळी गोष्ट आहे. सरकारविरुद्ध बोलणें, अगर लिहिणें याबाबत मतस्वातंत्र्य असलें पाहिजे व त्याप्रमाणें मत प्रदर्शित केल्यास तो सरकारद्रोह होईल, राज्यद्रोह होणार नाहीं. अमुक एक सरकार नको हें सांगणें योग्य, पण कुठलें सरकार नको हें सांगणें राज्याविरुद्ध आहे, म्हणून तें सांगणें अयोग्य. तथापि विद्यमान व्यवस्थे-विरुद्ध मतस्वातंत्र्य व टीका आहे, का व्यवस्थेविरुद्ध टीका आहे हें सांगणें सोपें नसतें. इंग्रजांच्या राज्यांत ज्या टीकेला अगर लिखाणाला राजद्रोह म्हणतां आला असता त्या टीकेला व लिखाणाला आतां राजद्रोह म्हणतां येणार नाहीं. त्यावेळीं सरकार व राज्य यांत फरक मानला जात नव्हता. आतां ती स्थिति नाहीं. सरकार हें आतां राज्याचे मुनीम आहेत आणि त्याची नेमणूक ठराविक काळापर्यंत आहे. ती मुदत वाढवली जाईल अगर कमी केली जाईल. नोकराला नोकरींतून कमी करावयाचें झाल्यास महिन्याची नोटीस तरी द्यावी लागते; पण लोकशाहीमध्यें मंत्रिमंडळाला क्षणाचीहि नोटीस न देतां जनतेला, म्हणजे राज्याच्या मालकाला, काढून टाकतां येतें. म्हणून मतस्वातं-त्र्याचा आपण विचार करीत असतांना आपली राज्यव्यवस्था लोकशाही स्वरूपाची आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. भारतांत पहिला राजद्रोहाचा खटला टिळकांच्या विरुद्ध १८९६ सालीं झाला आणि त्यानंतर स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत अनेक खटले झाले. सरकारवर टीका करण्याचा हक्क आहे ही गोष्ट स्पष्टपणें कधींच मानली गेली नाहीं. केलेल्या टीकेनें सरकारविषयीं अप्रीति अगर द्वेष उत्पन्न झाला, अगर होण्याचा संभव आहे एवढ्याच दृष्टीनें विचार झाला. आतां ही स्थिति राहिलेली नाहीं. आणि भाषणस्वातंत्र्याचा हक्क संविधानानें प्रत्येक नागरिकाला दिला आहे. पण प्रश्न एवढाच उपस्थित होईल कीं, ज्या योग्य मर्यादा ( रिझनेबल ) सांगितल्या आहेत त्या ओलांडल्या कीं नाहीं ?

प्रस्थापित समाजरचनेविरुद्ध, आर्थिक व्यवस्थेविरुद्ध, राजकीय व्यवस्थेविरुद्ध बोलणें हा अपराध नाहीं. उलट, नागरिकाच्या मौलिक व प्राप्त अधिकाराचा उपयोग आहे ही आजची परिस्थिति आहे. ज्याला जुन्या अर्थानें राजद्रोह म्हणतां येईल तो गुन्हा आतां राहिला नाहीं. जर टीका मर्यादेबाहेर गेली व प्रस्थापित सरकारला हिंसेच्या मार्गानें बाजूस सारावें असें प्रतिपादन कोणी केलें तर तसें करणें स्वातंत्र्याचा दुरुपयोग आहे. त्याचप्रमाणें संविधान अगर राज्याची घटना घटनेंत सांगितलेल्या वैध मार्गानें बदलून न घेतां हिंसेच्या व अवैध मार्गानें बदलून घेण्याचा प्रचार केला तर तोहि स्वातंत्र्याचा दुरुपयोग आहे. हिंसेचा अवलंब न करतां केलेला प्रचार हा निःसंशय गुन्हा ठरेल असें आतां नाहीं. तथापि हिंसेचा अवलंब करून केलेला प्रचार हा निःसंशय गुन्हा ठरेल, याबद्दल शंका नाहीं. तथापि प्रचार कसा, केव्हां झाला याचा विचार म्हणजे स्थळ, काळ व सामाजिक परिस्थिति यांचा विचार

केल्याशिवाय कोर्ट निर्णय देणार नाहीं, लेखी प्रचार व तोंडी प्रचार यांचे परिणाम सारखेच होतात असें नाहीं. गोवधबंदीचा प्रचार मुसलमानी मोहल्ल्यांत हिंदुधर्मीयानें तीव्रतेनें केल्यास तेथें जो परिणाम होईल तो हिंदु वस्तींत केल्यानें होणार नाहीं. तसेंच गोवधासंबंधीं शास्त्रांतील वचनें देऊन एखादें चोपडें प्रसिद्ध करण्यापासून जो परिणाम होईल, तो सभेंत केलेल्या व्याख्यानद्वारा प्रचारापासून निराळा होईल. समजा, एखाद्या साम्यवादी लेखकानें प्रबंध लिहिला आणि त्यांत भारतांतील संविधान हें भांडवलशाही स्वरूपाचें आहे व सामान्य जनतेला लुटण्याच्या हेतूनें रचलें आहे आणि म्हणून सामान्य लोकांनीं उठाव करावा व जनतेचें राज्य स्थापावें, अशा अर्थाची विचारसरणी त्यांत प्रतिपादली तरी तेवढ्यानें त्यानें दुरुपयोग केला असें होत नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें समाजरचना, राज्यरचना, बदलून घेण्याचा हक्क व्यक्तिमात्राचा आहे. प्रश्न एवढाच उत्पन्न होतो कीं, बदलण्यासाठीं त्यानें काय उपाय प्रतिपादले आहेत आणि त्या प्रतिपादनाचा समाजावर काय परिणाम झाला आहे? जर त्या प्रतिपादनांत हिंसेच्या मार्गाचा स्पष्ट व प्रक्षोभक निर्देश असेल तर मर्यादा ओलांडली गेली हें स्पष्ट आहे. तथापि, केवळ मर्यादा ओलांडली गेली म्हणून सरकारनें त्याविरुद्ध कारवाई करावी असें नाहीं. समजा, तसें प्रवचन प्रबंधांतून अगर ग्रंथांतून केलें असलें तरी वाचकांवर काय परिणाम झाला याचाहि विचार केला पाहिजे. सामान्यपणें नागरिकांच्या राजकीय चातुर्यावर, जाणतेपणावर, थोडा तरी विश्वास सरकारनें दाखविला पाहिजे. ज्या ठिकाणीं लोकांना स्पष्ट माहीत आहे कीं, मतदान करून आपण सरकार बदलूं शकतों व अहिंसामय क्रांति करूं शकतों त्या ठिकाणीं लोक हिंसेचा मार्ग स्वीकारणार नाहींत. इतकेंच नव्हे, तर असल्या विचारसरणीकडे दुर्लक्ष करतील. तसेंच कुठल्याहि टीकाप्रबंधांत केवळ टीकाच आहे आणि दोन्ही बाजू समतोलपणें मांडल्या नाहींत अगर दुसरी बाजू मांडलीच नाहीं एवढ्यानें तो प्रबंध अगर मतस्वातंत्र्याचा दुरुपयोग आहे असें ठरत नाहीं. विद्यमानाची स्तुति केली नाहीं म्हणून कुठलीहि टीका स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊं शकत नाहीं. लोकशाही याचा अर्थ केवळ चांगलें आहे तेंच पाहणें असा नाहीं. केवळ वाईट आहे म्हणून त्यावर टीका करणें असा नाहीं व कोणी तशी टीका केली तर तो गुन्हा नाहीं. चर्चा म्हटली म्हणजे साधकबाधक दोन्ही बाजू असाव्या हें खरें, तथापि एखादी बाजू त्यांत नसली म्हणजे मौलिक हक्कांचा दुरुपयोग झाला असें नाहीं. राज्यकारभारांतील व शासनांतील दोष दाखविणें हें नागरिकांचें कर्तव्य आहे. त्यांनीं जर ते दाखविले नाहींत तर राज्यकर्त्यांना राज्यकारभारांत दोष नाहींत असेंच वाटूं लागेल आणि आपण दोषविरहित आहोंत ही एकदां त्यांची भावना झाली, तर लोकांच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीनें तें इष्ट नाहीं व अंतीं भयानक ठरतें. आज भारतांत एवढें विचारस्वातंत्र्य आहे कीं, गेल्या बारा वर्षांत राजकीय लिखाण असें आक्षेपार्ह मानून सरकारजमा झाल्याचीं उदाहरणें नाममात्र आहेत. किती चोपड्या अणि किती तरी पुस्तकें भारतीय संविधानावर

टीका करणारीं झालीं आहेत. त्याचप्रमाणें राजकीय विचारप्रणालीच्या दृष्टीनें किती तरी निबंध कडव्या भाषेंत लिहिलेले प्रसिद्ध झाले आहेत. गेल्या बारा वर्षांत भारतांतील साधारण माणसाची राजकीय बुद्धि व राजकीय चातुर्य हें वाढलें आहे. निव्वळ प्रबंधानें मग तो 'आवडी'चा असो अगर 'दाभाडी'चा असो, सामान्य जन प्रक्षोभित होत नाहींत. ज्याला अनुभवी व मुरलेला असा मनुष्य म्हणतां येईल तसा थोडासा भारतांतील सामान्य मनुष्य हळूहळू होत आहे. पुस्तकद्वारा अगर वृत्तपत्रद्वारा भांडवलशाहीविरुद्ध जें आज लिहिलें जात आहे, तें सर्वच कांहीं मधुर व मनमिळाऊ भाषेंत लिहिलें जात नाहीं. कठोर व कटु भाषा यांचा अवलंब सर्रास होत आहे. तथापि या कामीं होणारा प्रसंगविशेषीं अतिरेक स्वातंत्र्याचा दुरुपयोग आहे असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. जर हिंसेच्या मार्गाचा अवलंब करावा असा प्रचार केला जात असेल व त्यापासून होणारे परिणाम दिसूं लागले असतील, अगर थोडेसे झाले असतील, तर मात्र स्वातंत्र्याचा दुरुपयोग झाला, मर्यादेचें अतिक्रमण झालें असें म्हणतां येईल व समाजाच्या हिताच्या दृष्टीनें उपाययोजना करणें हें योग्य ठरेल. केवळ थोडासा हिंसेचा वास येतो म्हणून लिखाणाला आक्षेपार्ह ठरविणें व जप्त करणें शासनाच्या दृष्टीनें व्यवहारीपणाचें नाहीं व राष्ट्राच्या दृष्टीनें मुत्सद्दीपणाचें नाहीं. लिखाणामुळें राज्याला धोका अगर सार्वजनिक शांततेला धोका संभाव्य आहे, एवढ्यानें स्वातंत्र्यावर आक्रमण करणें बरोबर नाहीं. धोक्याची अगर सार्वजनिक शांतताभंगाची जवळ जवळ निश्चिति पाहिजे व तो धोका अगदीं समीप आहे अशी परिस्थिति असेल, तरच सरकारी कृत्य हें समर्थनीय ठरेल आणि त्याजबरोबर कुणा एका शासकानें अगर मंत्र्यानें तशी परिस्थिति आहे असें म्हटल्यानें सरकारची कारवाई समर्थनीय ठरणार नाहीं. दंगाधोपा करतील असें गृहीत धरून जीं माणसें संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत मुंबई सरकारनें पकडलीं त्या बाबतींत त्या सरकारचें कृत्य संपूर्णपणें असमर्थनीय होतें आणि पकडलीं नसतीं तर मुंबई सरकारचा कबजा चळवळ करणारे घेणार होते हें ज्या मंत्र्यानें विधान केलें त्यांत राजकीय अदूरदृष्टि तर होतीच, पण राजकीय अप्रामाणिकपणाहि होता. तात्पर्य असें कीं, परिणामाच्या संभाव्यतेच्या सबबीवर एखादें लिखाण दडपून टाकणें यांत नागरिकांच्या हक्कावर आक्रमण आहे आणि अशा रीतीनें जर लिखाणावर प्रतिबंध होऊं लागला तर त्याचा परिणाम विचारस्वातंत्र्यावर होईल. इतकेंच नव्हे, तर विचार करण्याची संवयसुद्धां माणसें विसरून जातील. मन निष्क्रिय होईल. जीवन निःसत्त्व होईल. समाजजीवन निस्तेज होईल. आणि मग विद्यमानाची स्तुति हा नागरिक-धर्म बनेल व विचारशून्य आज्ञापालन हें नागरिकांचें श्रेष्ठ कर्तव्य मानलें जाईल. शासनाला मग आपण सर्वज्ञ आहोंत असाच विश्वास उत्पन्न होईल आणि लोक मुकाट्यानें ऐकतात म्हणून त्यांना सर्व कांहीं मान्य आहे असें वाटूं लागेल. ज्या सरकारवर टीका होत नाहीं, ज्या सरकारचीं कृत्यें चिकित्सापूर्वक जनतेकडून तपासलीं जात नाहींत, तें सरकार मग मर्यादित लोकांचें होतें

व मर्यादित लोकांचें हितच पाहतें. म्हणून लोकांच्या राज्यांत राजकीय विचारांना पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. राजकीय विचार कांहीं हवेंत उत्पन्न होत नाहींत, त्यांचे मनोरे समाजांत घडणाऱ्या दैनंदिन गोष्टींच्या पायावर बांधले जातात. त्यांचा आकार व शिल्प व्यक्तिमात्रांना येणाऱ्या नित्याच्या अनुभवांतून रचलें जातें. भांडवलशाही नष्ट झाली पाहिजे, असें जेव्हां एखादा नागरिक सांगतो त्यावेळीं त्याच्यापुढें भांडवलशाहींतील मजुरांची पिळवणूक, गिऱ्हाइकांची फसवणूक, मालकांची स्वार्थी वागणूक डोळ्यांपुढें असते. नानाविध लोकांच्या अभिप्रायावर आधारलेल्या विचारांतून मग राष्ट्रीय धोरण निर्माण होत असतें. राज्याची प्रगति वाट चालत असते.

मतस्वातंत्र्याचा विचार करतांना त्याच्या माध्यमाचा विचार केला पाहिजे, असें मागें सांगितलें आहे आणि विचारस्वातंत्र्याचें माध्यम सामान्यपणें भाषण, मुद्रण याव्यतिरिक्त शिल्प, चित्रकला ह्याहि द्वारें विचार प्रदर्शित केले जातात. भाषणामध्यें संगीत, काव्यगायन इत्यादिकांचा समावेश होतो. शाहिरानें डफावर थाप मारून शूरवीरांचा पोवाडा गाइला म्हणजे त्याचा परिणाम होतोच. तें भाषण नसेल, पण विचार-प्रदर्शनाचें एक प्रभावी साधन आहे. तीच गोष्ट कीर्तन, काव्य-गायन, याबाबत लागू आहे. एखाद्या चंडिकेची मूर्ति काढून तिच्या भाल्याचा आघात जी व्यक्ति, अप्रिय विचारसरणी असेल तिच्या प्रतिकावर झालेला दाखविणें हेंहि विचार-प्रदर्शनाचें माध्यम होऊं शकतें. लिहिलें नाहीं, बोललें नाहीं म्हणून चित्रकला, कला व शिल्प यांच्याद्वारा मतस्वातंत्र्याचा दुरुपयोग होत नाहीं असें नाहीं. मतस्वातंत्र्याचा आविष्कार जेव्हां प्रकाशनाद्वारें वा पुस्तकद्वारें होतो त्यावेळीं केवळ तें पुस्तक अमक्या व्यक्तीनें अगर अमक्या पक्षानें प्रसिद्ध केलें, लिहिलें एवढ्यावरून त्याला बंदी होतां कामा नये. शांततेचा काळ असेल, तर कुठल्याहि प्रकाशनाला सामान्यपणें बंदी होतां कामा नये, प्रकाशनापूर्वींहि बंदी होतां कामा नये, प्रकाशनानंतरहि बंदी होतां कामा नये. तथापि वाटेल त्या विचारसरणीचीं प्रकाशनें समाजामध्यें मुक्तपणें अनिर्बंधपणें प्रसारित झालीं तरी त्यापासून राज्याला धोका आहे असें मानणें चुकीचें. प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, याला कांहीं मर्यादा असावी कीं नाहीं ? कांहीं आधुनिक राज्यांतून सैनिकांच्या हातांत अनिर्बंधपणें प्रकाशनें पडूं देत नाहींत. राज्याचें संरक्षण, राज्याचें अस्तित्व हें शेवटीं सैनिकांच्या निष्ठेवर अवलंबून आहे आणि त्यांच्या निष्ठेंत ढवळाढवळ करणारें असें कांहीं लिखाण प्रसिद्ध झालें, तर संभाव्य धोका राज्यानें पत्करावा, कीं त्याविरुद्ध वेळींच प्रतिबंधक उपाय योजावेत ? समतावादी वर्तमानपत्रांना सैनिकांसाठीं बंदी असावी का ? बंदी असावी अशा तऱ्हेची विचारसरणी लोकसभेंत मांडली गेली होती व सैनिकांच्या हातांत डाव्या पक्षांचीं वर्तमानपत्रें नेहमीं दिसून येतात अशीहि तक्रार करण्यांत आली होती. सैनिक हा नागरिक असतो आणि सैनिकानें गणवेष चढवला म्हणून त्यानें नागरिकत्वाचे हक्क

सोडून दिले असें होत नाहीं. सैनिकांना राजकीय सभांना जाण्याची, हजर राहण्याची मुभा असावी का, हाहि प्रश्न महत्त्वाचा होतो. नागरिक या नात्यानें प्रत्येक सैनिक हा मतदार आहे आणि कोणाला मत द्यावयाचें याचा निर्णय घेण्याच्या दृष्टीनें प्रत्येक पक्षाची विचारसरणी त्याच्या डोळ्यांपुढें आली पाहिजे. त्याला तें ऐकण्याची संधी मिळाली पाहिजे, हा युक्तिवाद बरोबर ठरतो. त्याचबरोबर सैनिकांमध्यें कांहीं गडबड झाल्यास राज्य सुरक्षित राहत नाहीं; आणि राज्यच राहिलें नाहीं तर राज्यामार्फत ग्वाही मिळालेले सर्व अधिकार व स्वातंत्र्य नष्ट होतें. क्षणाची गरज कांहीं असली तरी राज्य ही युगाची गोष्ट आहे आणि तिचें संरक्षण व तिचें अस्तित्व यांचें महत्त्व मौलिक व अग्रहक्की असलें पाहिजे. प्रस्तुत लेखकाच्या मतें सैनिकांनीं राजकीय सभांना जावें; अगर वाटेल तें प्रकाशन त्यांनीं वाचावें हें इष्ट नाहीं. त्याला कांहीं तरी मर्यादा असली पाहिजे. सैनिकांना गोंधळांत टाकणारी परिस्थिति उत्पन्न होण्यास सरकारचें वर्तनहि कारणीभूत असूं शकेल. तथापि सरकारला ठीक मार्गावर आणण्याचें काम अगर सरकारला बदलण्याचें काम हें राज्यांतील संरक्षण-व्यवस्थेचें नाहीं, सैन्याचें तें काम नाहीं. तें काम सामान्य नागरिकांचें आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. राज्यानें विद्यमान सरकारद्वारा युद्ध पुकारलें व सैनिक जर युद्ध पुकारणें हें गैर आहे असें म्हणून लढण्याचें नाकारूं लागले तर राज्य कोलमडेल व अराजक माजेल. देशामध्यें अस्वस्थता उत्पन्न झाली आहे व जनतेनें प्रक्षोभित होऊन दंगाधोपा करण्यास सुरुवात केली व शांतता प्रस्थापित करण्यास सैनिकव्यवस्था अंमलांत आली आणि त्यावेळीं सैनिकांनीं बंदोबस्त करण्याचें नाकारलें तर जो परिणाम होईल तो समाजाच्या दृष्टीनें अत्यंत भयानक असाच होईल. सैनिक हे यंत्रें नव्हेत हें मान्य, ते नागरिक आहेत हेंहि मान्य, तथापि जो व्यवसाय त्यांनीं स्वीकारला आहे त्या व्यवसायाचीं नीतिमूल्यें त्यांनीं मानलींच पाहिजेत. खाटिकाला बकरें कापतांना रडूं आलें तर त्या कर्तव्याला तो लायक नाहीं हा त्याचा अर्थ होतो. सैनिकाचें कर्तव्य जो हुकूम दिला असेल त्याचें बिनतक्रार व तंतोतंत पालन करणें हें आहे. दिलेली आज्ञा योग्य कीं अयोग्य हें ठरविण्याचा अधिकार त्याला नाहीं. क्षणभर ती आज्ञा त्याला चुकीची वाटत असेल, तथापि तिचें पालन करण्यांत त्याचें कर्तव्य आहे व त्याचा धर्महि तोच आहे. विद्यमान कायदा जो असेल त्याला अनुसरून न्यायाधीशानें न्याय दिला पाहिजे. तो चुकीचा असेल, अनिष्ट असेल, तथापि त्याला बाजूला सारून न्यायाधीशाला न्याय देतां येणार नाहीं. मनाप्रमाणें न्यायाधीश न्याय देऊं लागला, तर समाजामध्यें निश्चिति राहणार नाहीं व कायदा काय आहे हें कोणालाहि खात्रीनें सांगतां येणार नाहीं. कायद्याप्रमाणें न्याय द्यावयाचा नसेल तर न्यायाधीशानें निवृत्त व्हावें. दिलेल्या आज्ञा पालन करावयाच्या नसतील, तर सैनिकानें निवृत्त झालें पाहिजे हें योग्य ठरतें. तथापि निवृत्त होण्याची मुभा दिल्यास समाजाच्या दृष्टीनें तेंहि अयोग्य ठरतें. संरक्षणासाठीं वर्षानुवर्षें

तयार केलेले सैनिक संरक्षणाची वेळ येतांच निवृत्त होऊं लागले, तर कठीण अवस्था होईल, म्हणून तोहि हक्क सैनिकांना असूं शकत नाहीं. तात्पर्य, मतस्वातंत्र्य म्हणजे वाटेल तें ऐकण्याचा, वाटेल तें लिहिण्याचा, वाटेल तें बोलण्याचा हक्क हें जरी खरें असलें तरी त्याला समाजाच्या दृष्टीनें इष्ट अशी मर्यादा असली पाहिजे व त्या दृष्टीनें सैनिकांना राजकीय सभांना जाण्याची मुभा नसली पाहिजे. विचारस्वातंत्र्याच्याबाबत सैनिकांच्या दृष्टीनें मर्यादा असली पाहिजे. एवढेंच नव्हे, तर एकत्र येण्याच्या व संघ-स्वातंत्र्याच्या हक्कावर मर्यादा असली पाहिजे. त्याचा विचार पुढें येईल.

कोणी असें म्हणेल कीं, केवळ भाषण ऐकल्यानें अगर एखादें पुस्तक वाचल्यानें काय होणार ? जगांतील अनुभव असा आहे कीं, विचार व कल्पना ह्या गोष्टी सामान्य नाहींत. विचार हे क्रांतीचे जनक असतात. कल्पना ह्या स्फोटक असतात. आणि म्हणून वाटेल त्या विचारांना व वाटेल त्या कल्पनांना मोकळीक दिल्यास, त्यांना कुठल्याहि प्रकारानें प्रतिबंध न केल्यास, समाजामध्यें अशांतता व संघर्ष यांना आमंत्रण दिल्यासारखें आहे, या विचारसरणींत कांहीं तथ्य आहे. पण त्याजबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, विचारांना बंदी केल्यास सामाजिक प्रगतीलाहि बंदी होते. कल्पनांना प्रतिबंध केल्यास समाजाच्या विकासाला प्रतिबंध केला असें होतें. अग्नि विधायकहि आहे व विध्वंसकहि आहे, त्याचप्रमाणें मनुष्याचे विचार व कल्पनाशक्ति हींहि विधायक व विध्वंसक अशीं दोन्ही आहेत. म्हणून विचारांना बंदी करणें इष्ट नाहीं. अमर्याद मुभा देणेंहि इष्ट नाहीं. तथापि कोणते विचार, कोणत्या कल्पना घातुक, नाश करणाऱ्या हें ठरविणें सोपें नाहीं. त्यांची व्याख्या करणें कठीण आहे. आणि व्याख्या करूं लागल्यास अनंत अडचणी उत्पन्न होतात व शेवटीं तो सर्व खटाटोप मूर्खपणाचा ठरतो. अमुक एक विचारसरणीनें राज्य धोक्यांत येणार आहे हें कोणी ठरवावयाचें ? जे सत्ताधीश आहेत त्यांच्याकडे हें काम दिल्यास त्यांच्या मनाप्रमाणें नसलेली प्रत्येक गोष्ट, प्रत्येक विचारसरणी राज्याला धोक्याची आहे असेंच ते मानतील. जेव्हां समाजामध्यें राज्याला धोका उत्पन्न करणारे विचार उत्पन्न होतात, तेव्हां ते कुणाची तरी कविकल्पना नसते. विचार हे मिळालेल्या व मिळत असलेल्या अनुभवांतून उत्पन्न होत असतात. आणि तसा कांहीं अनुभव आल्याशिवाय विचारांची जागृति व्यक्तीच्या मनांत होत नाहीं. कांहीं तरी प्रमाणांत लोकांना ती पटत असते आणि म्हणून तिचें महत्त्व असतें. त्या विचारसरणीला जन्म देणारा अनुभव समाजांत आला याचा अर्थ राज्यव्यवस्थेंत कुठें तरी कांहीं तरी न्यूनता अगर दोष आहे हें उघड आहे. सामान्यपणें मनुष्याची प्रवृत्ति उगाच यातायात न करतां, खटाटोप न करतां गुण्यागोविंदानें राहावें अशीच असते. जें मागील अंकावरून चालू आहे तेंच बरें, असें वाटत असतें. निष्कारण उपद्व्याप करावा अशी प्रवृत्ति सामान्य माणसाची नसते. आणि जेव्हां ह्या प्रवृत्तीला सोडून

माणसें कांहीं करूं लागतात, अगर त्याबाबत विचारप्रदर्शन करू लागतात, तेव्हां त्याचा अर्थ कांहीं तरी त्यांना असह्य झालें आहे असा केल्यास तें गैर होणार नाहीं. कांहीं मनाविरुद्ध झाल्याशिवाय मनुष्य रागावत नाहीं, हा सामान्य अनुभव आहे. आणि माणसें जेव्हां सरकारविरुद्ध अगर कारभाराविरुद्ध बोलूं लागतात त्यावेळीं तसेंच कांहीं राज्यांतील सरकारकडून झालें असलें पाहिजे असें अनुमान काढल्यास तें सर्वस्वी चूक नाहीं. सरकारविरुद्ध ज्यावेळीं असंतोष निर्माण होतो त्यावेळीं त्याचीं कारणें शोधणें व तीं दूर करणें हें शहाणपणाचें असतें. शक्तीचें प्रदर्शन करून जबरदस्तीनें जनतेच्या असंतोषाला दाबून टाकणें हें मुत्सद्दीपणाचें ठरत नाहीं. राज्याचें खरें स्वरूप हें ज्या प्रमाणांत त्या राज्यांतील नागरिकांना कारभारावर टीका करण्याचें स्वातंत्र्य आहे त्यावरून ठरवितां येतें. जर टीकेला बंदी असेल तर राज्यांत नागरिकांना खरें स्वातंत्र्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. टीकेची मुभा आहे, मतस्वातंत्र्याला पूर्ण वाव आहे, याचा अर्थ राज्य हें प्रजाजनांच्या दुःखनिवारणार्थ तत्पर आहे असा होतो. आणि लोकांचीं दुःखें दूर करण्यांत, त्यांचें निवारण करण्यांत जेवढी तत्परता राज्य दाखवील तेवढ्या प्रमाणांत लोकांची निष्ठा, प्रेम तें मिळवूं शकतें. टीका-स्वातंत्र्य आहे, आपलीं दुःखें, आपल्या तक्रारी जाहीरपणें मांडण्याची मुभा आहे, अशा परिस्थितींत जनता गडबड गोंधळ करीत नाहीं. कारण तें करण्याची आवश्यकता राहात नाहीं. तत्पर सरकार उपाय योजत असतें व केलेल्या टीकेची नोंद घेत असतें. जेथें ऐकलें जात नाहीं, जुमानलें जात नाहीं व जेथें अधिक टीका म्हणजे अधिक दुर्लक्ष, अधिक उद्दामपणा असें असतें त्या ठिकाणीं लोकांचा प्रक्षोभ वाढत जातो आणि त्याविरुद्ध दडपशाहीचा अवलंब केला गेल्यास चळवळ भूमिगत होते व परिणाम अधिक भयावह होतात. लोकांच्या गाऱ्हाण्यांचा व दुःखांचा आविष्कार बंद केल्यानें लोकांचा असंतोष बंद होत नाहीं. स्वातंत्र्याचे प्रयत्न दडपून टाकल्यानें ते दुप्पट होतात. भाषणाला बंदी केल्यानें एका सभेंत तें होण्याऐवजीं शेकडों सभांतून तें गुप्तपणें केलें जातें. जनतेच्या पुढाऱ्यांना बंदींत टाकल्यानें अगर निर्वासित केल्यानें त्यांचा प्रभाव कमी होत नाहीं. दुप्पट होतो. त्यांची विचारसरणी नाहींशी होत नाहीं, उलट सर्वत्र पसरते. टिळकांना तुरुंगांत टाकल्यानें स्वातंत्र्याची इच्छा अनेक पटीनें वाढली. सत्य चिरडलें गेलें म्हणजे तें चिरकालीन होतें. त्याला मारण्याचा प्रयत्न केल्यास तें अधिक मान्यता पावतें. म्हणून मतस्वातंत्र्य हें तत्त्वाच्या दृष्टीनें व धोरणाच्या दृष्टीनेंहि इष्ट ठरतें. जे स्पष्ट बोलतात, जे अप्रिय बोलतात, पण सत्य सांगतात तेच खरे मित्र होत. सत्ताधीशांना स्तुतिपाठकांची गरज असते हें खरें; पण त्यांचे खरे आप्त अगर मित्र हे कीं, जे त्यांना अप्रिय पण सत्य सांगतात तेच होत. सत्य दाबून टाकणें, टीका होऊं न देणें याचा परिणाम अंततो गत्वा, जे सत्ताधीश असतात ते विनाशाप्रत जातात.

विचार-स्वातंत्र्याचें प्रदर्शन लेखनाचेद्वारा म्हणजे प्रकाशनाचेद्वारा करणें व तें भाषणाचेद्वारा करणें यांत फरक आहे, हें सांगितलेंच आहे. मनुष्य जेव्हां एखादें चिटोरें का होईना वाचतो त्यावेळीं तो स्वतःच्या संदर्भांत असतो. तें वाचन मग तो ट्रामध्यें करीत असेल, आगगाडींत करीत असेल, बसस्टँडजवळ करीत असेल, पण त्याचें ज वाचन असतें तें वैयक्तिक असतें. इतरांना तें अवगत नसतें व जो कांहीं परिणाम त्याच्या मनावर होत असतो तो, जें तो वाचत आहे त्याचाच. उलट, सभेंत भाषण ऐकतांना श्रोत्यांवर जो परिणाम होत असतो तो भक्त्याच्या केवळ भाषणाचाच नसून अन्य श्रोत्यांच्या आविर्भावांचा, त्यांच्या टाळ्यांचा, त्यांच्या ओरडण्यांचा, आरोळ्यांचा, तसेंच वक्तव्याच्या आविर्भावाचाहि व त्याच्या अभिनयाचाहि परिणाम होत असतो. भाषणांतील वातावरण व संदर्भ हा सामूहिक असतो. जेव्हां मनुष्य वाचत असतो त्यावेळीं लेखकाचें व्यक्तित्व त्याच्यासमोर नसतें, तेथें आविर्भाव नसतो, अभिनय नसतो, लेखक तेथें वाचक ही एक व्यक्ति समजून त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करीत असतो, आपल्या कल्पना त्याला पटवून देण्याचा प्रयत्न करीत असतो. तेथें लेखक युक्तिवादानें वाचकांचीं मनें आपल्या लेखनाकडे व त्यांतील विषयाकडे ओढून घेत असतो आणि वाचकहि वाचल्याबरोबर अगर वाचत असतांना आरोळ्या ठोकत नाहीं. 'झालाच पाहिजे' म्हणून ओरडत नाहीं. वाचनानंतर मनन करण्याकडे सामान्यपणें वाचकाची प्रवृत्ति असते. मननानंतर त्याचा अभिप्राय काय आहे याचें दिग्दर्शन सामान्यपणें तो करीत असतो. उलट, सभेमध्यें भाषणांतील युक्तिवाद कानावर येतांच श्रोत्यांची प्रतिक्रिया तात्काळ दिसून येते. ते टाळ्या मारतात, अगर हुश् हुश् करतात. आपली पसंती, नापसंती ताबडतोब प्रदर्शित करीत असतात. आणि सामान्यपणें हें इतकें ताबडतोब होतें कीं, ऐकणें व अभिप्राय व्यक्त करणें, ऐकणें व मत प्रदर्शित करणें यांत स्वल्पविरामसुद्धां नसतो. सभांचा ज्यांना अनुभव आहे आणि विशेषतः समाजांत प्रक्षोभ निर्माण झाला असतांना होणाऱ्या सभांचा ज्यांना अनुभव आहे ते जाणतात कीं, कसलेला व हुशार वक्ता आहे तो सभेला भडकून देऊं शकतो. महाराष्ट्रांत हा अनुभव सर्वपरिचित आहे. सभा संपते आहे आणि श्रोते घरें जाळण्याच्या कार्यक्रमास सुरुवात करीत आहेत. सभा संपते आहे आणि रस्त्यांतील जाणाऱ्यायेणाऱ्यावर हल्ले होत आहेत, दुकानें लुटलीं जात आहेत, हा अनुभव परिचयाचा आहे. तसेंच होणारें भाषण कोठें झालें आहे हेंहि महत्त्वाचें असतें. हरिजनवस्तींत जाऊन वरच्या वर्गांनीं केलेल्या सामाजिक अन्यायाबद्दल प्रक्षोभपूर्ण बोलणें याचा परिणाम काय होणार हें निश्चित असतें. उलट, सामान्य वस्तींत त्याच विषयावर त्याच वक्त्यानें तसेंच भाषण केलें तरी परिणाम निराळा होतो. या परिस्थितींत वाटेल तें भाषण करण्याची, वाटेल तेथें भाषण करण्याची मुभा देणें, त्या कामीं संपूर्ण स्वातंत्र्य देणें, समाजाच्या दृष्टीनें इष्ट ठरत नाहीं. जमावानें जाण्याचा ( प्रोसेशन ) हक्क, मोर्चा नेण्याचा हक्क, हे सर्व हक्क अयोग्य

नाहींत. तथापि प्रक्षुब्ध परिस्थितींत मोर्चा अगर मिरवणूक यांचे परिणाम मारामारींत, डोकीं फोडण्यांत, जाळपोळ करण्यांत होतो हाहि अनुभव आहे. अशा स्थितींत सरकारला समाजाच्या दृष्टीनें व समाजाच्या संरक्षणार्थ कांहींहि करूं न देणें अगर तें करण्याचा हक्क नाकारणें हें समाजांतील स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अनिष्ट आहे. ज्या भाषणापासून हिंसात्मक कृत्यांना प्रोत्साहन मिळत असेल, अगर मिळणें जवळ जवळ निश्चित दिसत असेल, तर भाषणबंदी करणें हें योग्य. एवढेंच नव्हे, तर सरकारचें एक कर्तव्यकर्म ठरतें. तथापि वातावरण प्रक्षुब्ध आहे, लोक संतापलेले आहेत, व या स्थितींत भाषण होणार आहे, म्हणून त्या भाषणानें हिंसात्मक प्रकार निश्चित होतील असें गृहीत धरून चालणें योग्य होणार नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें परिस्थिति अशी असली पाहिजे कीं, अत्याचारी प्रकार अगदीं निश्चित आहेत, त्यांची त्या बाबतींतील संभाव्यता येऊन ठेपली आहे आणि बंदी न झाल्यास ती संभाव्यता सत्य होणार आहे (डिस्–आर्डर इन् इमिनंट) असें असेल तर सरकारनें भाषणबंदी करणें हें योग्य ठरेल. अशी परिस्थिति खरोखर आहे कीं नाहीं हें केवळ अधिकाऱ्यानें स्वतःच्या मतानें ठरविणें योग्य नाहीं. ज्या परिस्थितींत त्यानें प्रतिबंध केला असेल त्या परिस्थितीचा साकल्यानें विचार करून कोणाहि माणसाला बंदी करणें योग्य आहे असें वाटलें पाहिजे. इतका विचार करून ती प्रतिबंधक बंदी झाली पाहिजे. भाषण झाल्यानंतर बंदी करावी अगर अन्य कारवाई करावी हें म्हणणें वरवर विचार करतां ठीक दिसतें. केवळ एखादा वक्ता प्रक्षोभक भाषण करण्याचा संभव आहे म्हणून भाषणापूर्वीच बंदी करणें, तसेंच सभेंत गडबड होणार आहे व तसा संभव आहे एवढ्याच गोष्टीसाठीं सभा होऊं न देणें, हें सामान्यपणें अनिष्ट वाटतें. तथापि विशिष्ट परिस्थितींत वक्त्यावर व सभेवर आगाऊ बंदी घालणें समाजाच्या दृष्टीनें हितार्थ व आवश्यक ठरतें. वक्त्यानें भडकपणें भाषण केलें व दंगाधोपा झाला आणि मग कांहीं उपाययोजना केली, तरी ज व्हावयाचें तें होऊन गेलेलें असतें. म्हणून जेथें वक्त्याचें पूर्वचरित्र माहीत आहे, त्याचप्रमाणें सभेमध्यें ज्या विषयाची चर्चा होणार आहे अगर जे वक्ते बोलणार आहेत, तसेंच ज्या ठिकाणीं ती होणार आहे व जे लोक तेथें येणार आहेत, या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन दंगाधोपा होणें, भडक भाषणें होणें, याबाबत पुरी खात्री झाल्यास प्रतिबंध (प्रीव्हेंटिव्ह प्रोहिबिशन) अपरिहार्य ठरतात. जे अत्याचार होतात त्यामुळें अन्य प्रजाजनांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. समाजांतील मूठभर अगर अल्पसंख्याक चळवळ्यांना मुक्त मुभा ठेवणें हें समाजहिताच्या दृष्टीनें इष्ट ठरत नाहीं. भाषण केल्यानंतर त्या भाषणाबाबत तें हिंसेला प्रोत्साहन देणारें, त्याचप्रमाणें इतकें भडक कीं अव्यवस्था व दंगेधोपे निश्चित होतील, असें असलें तर त्याविरुद्ध कारवाई करणें व वक्त्याला शिक्षा देणें हें ठरतें. मात्र तें भाषण स्पष्टपणें दंग्याधोप्याला प्रोत्साहन देणारें असलें पाहिजे, अगर त्यांतून दंगाधोपा निर्माण होईल याची संभाव्यता असली पाहिजे. तें

भाषण तसें आहे कीं नाहीं याचा विचार करतांना वक्त्याच्या हेतूचा विचार करणें जरुरीचें नाहीं. वक्त्याचा हेतु चांगलाहि असेल, पण त्याच्या भाषणांतील शब्द, भाषणाची पद्धत, भाषणाच्या वेळचा अभिनय, या सर्वांतून दंगाधोपा होणार व हिंसात्मक प्रकार होणार, हें जर स्पष्ट असेल तर तें भाषण दोषी मानलें पाहिजे. सामान्यपणें त्या भाषणाचा परिणाम समाजामध्यें गडबड व अस्वस्थता उत्पन्न होईल एवढ्यानें तें भाषण दोषी ठरत नाहीं. अर्थात् कोणत्या संदर्भात तें दोषी ठरतें व न ठरतें हें न्यायाधीशानें ठरवावयाचें असतें व न्यायाधीशानें त्या भाषणाचा परिणाम सामान्य जनतेवर काय होईल हें लक्षांत घेऊन त्यानें आपला निर्णय द्यावयाचा असतो. सभेमध्यें कोणत्या स्थराचे लोक होते, याचा विचार त्यानें करावयाचा असतो. त्याचप्रमाणें भाषणाच्या वेळची समाजांतील स्थिति सामान्यपणें व सभेंतील स्थिति विशेषतः लक्षांत घेऊन निर्णय द्यावयाचा असतो. थोड्या लोकांना अगर कांहीं विशिष्ट लोकांना तें भाषण अप्रिय वाटत असेल, समाजविरोधी वाटत असेल, पण त्यांची दृष्टि ही न्यायाधीशाची दृष्टि असतां कामा नये. सामान्य जनतेला त्या भाषणाबद्दल काय वाटतें व सामान्य जनतेवर त्या भाषणाचा काय परिणाम होतो, हें लक्षांत घेतलें पाहिजे. भाषणानें सरकार अडचणींत आलें असेंहि असूं शकेल. भाषणाबाबत सरकार नाराज आहे असें असू शकेल. तथापि सरकारची अडचण वा नाराजी यावर न्यायाधीशाचा निर्णय अवलंबून नाहीं. भाषणस्वातंत्र्य हा नागरिकांचा हक्क व समाजाचें संरक्षण हें सरकारचें कर्तव्यकर्म या दोहोंचा विचार होऊन निर्णय झाला पाहिजे. भाषणांत प्रचलित राज्यसत्तेवर कडकडीत शब्दांत टीका आहे एवढ्यानें तें आक्षेपार्ह मानलें जातां कामा नये. समाजांत कित्येक लोक असे असतात कीं, जें चाललेलें आहे त्यावर यत्किंचित टीका झाली तरी गुरगुरायला लागतात. तसेंच कांहीं स्वयंमन्य व स्वतःला सर्वज्ञ मानणारीं हट्टी माणसें व मंत्री सरकारांत असतात आणि त्यांना केलेली टीका सहन होत नाहीं व अधिकार असल्यानें सदरहू टीका म्हणजे राज्यद्रोह ते मानतात. कांहीं नवे विचार तसेंच प्रयोगशीलता हीं त्यांना विषाप्रमाणें वाटतात. आणि अशा नवविचार-प्रवर्तकांना तुरुंगांत टाकण्यांत आपण समाजाचें हित करीत आहोंत अशी त्यांची प्रामाणिक समजूत असते. तथापि नागरिकांच्या मतस्वातंत्र्याचा विचार करतांना व त्यावरील मर्यादा सांगतांना जें मुख्य सूत्र सांभाळावयाचें असतें, तें म्हणजे समाजाचें आजचें व उद्यांचें हित हें होय. आणि तें हित म्हणजे मर्यादित व्यक्तींचें नव्हे, एखाददुसऱ्या गटाचें नव्हे, तर सर्वसामान्य जनतेचें.

वरील विचारसरणींत मुख्य मुद्दा हा आहे कीं, राज्यकर्त्यांना नागरिकांचें स्वातंत्र्य हिरावून घेणें सोपें नसलें पाहिजे. त्या कामीं कांहीं तरी संकेतरूपानें, कांहीं तरी प्रत्यक्ष संविधानानें त्या मर्यादा असल्या पाहिजेत व त्या राखल्या गेल्या पाहिजेत.

पुष्कळ वेळां असा दृष्टिकोन मांडण्यांत येतो कीं, नागरिकांच्या दृष्टीनें व राज्याच्या दृष्टीनें ज्या मर्यादा असाव्यात, त्यांचा विचार करतांना शांततेचा काळ व संकटाचा अगर संघर्षाचा काळ असा कांहीं भेद विचारांत घेतला जावा. दोन्ही परिस्थितींत सारखेंच बंधन सरकारवर व सारखेंच स्वातंत्र्य नागरिकाला अशी व्यवस्था असणें इष्ट नाहीं व न्याय्य पण नाहीं. समाज अगर राज्य हें व्यक्तीच्या सुखासाठीं आहे. समाज अगर राज्य व्यवस्थित आहे, तेथें शांतता आहे, तरच मग तेथें व्यक्तीच्या प्रगतीला वाव आहे. समाजाच्या प्रगतीला क्षेत्र आहे. राज्याचा मुख्य हेतु म्हणजे राज्यांतील नागरिकांना संपूर्ण संरक्षण मिळालें पाहिजे. परचक्रापासून तें मिळालें पाहिजे व राज्यांतील अंतस्थ दंगेधोपे यांपासूनहि मिळालें पाहिजे. संघटित संरक्षण हें केवळ राज्यापासूनच प्राप्त होतें व राज्याचें तें मुख्य लक्षण व मुख्य कर्तव्यहि असतें. जीवित व वित्त यांची शाश्वती नाहीं या स्थितींत नागरिक-स्वातंत्र्याचा उपयोग करणेंहि शक्य नसतें. शिर सलामत तर पगडी पचास हाच न्याय येथें लागू पडतो. म्हणून स्वातंत्र्य नांदावयाचें तर राज्यामध्यें शांतता व सुव्यवस्था असली पाहिजे. तीं राखण्याचें कार्य राज्याचें, म्हणून त्या कार्याला आवश्यक असणारी सत्ता राज्याला असली पाहिजे. आणि ज्यावेळीं अंतस्थ बंडाळी होईल, अगर परचक्र येईल, त्यावेळीं विचार-स्वातंत्र्यादि मौलिक हक्कांना कमी करण्याची अगर कांहीं काळ स्थगित करण्याची सत्ता मग राज्याला असली पाहिजे हें उघड आहे. तात्त्विक दृष्ट्या अंतस्थ बंडाळी, परचक्र आलें असतांना राज्यसत्तेला वर सांगितलेली सत्ता असली पाहिजे, हें अमान्य करतां येणार नाहीं. जेव्हां अंतस्थ बंडाळी सुरू झाली आहे, राज्यांत यादवी माजली आहे, उघड उघड राष्ट्र विभागलें गेलें आहे, समाजांत तीव्र दुफळी माजली आहे, व उभय विचारसरणीच्या लोकांनीं वैध मार्ग सोडून अन्य मार्गाचा स्वीकार केला आहे, त्यावेळीं भाषण अगर मुद्रणस्वातंत्र्य यांचा विचार तात्त्विक ठरतो. जें बोलावयाचें तें बोललेंच जात असतें. वैध मार्ग बाजूला सारलेले असतात. हिंसेनें जनमनाचा कब्जा घेतलेला असतो. या परिस्थितींत मौलिक हक्कांकडे कोणी लक्ष देत नाहींत. वस्तुतः हिंसा व स्वातंत्र्य या दोन्ही कल्पना एकमेकांशीं विसंगत आहेत आणि हिंसेनें जनमनाचा कब्जा घेतल्यानंतर खरें स्वातंत्र्य जनमनांतून निर्वासित होतें. समाजांत तरवारीच्या खणखणाटांत, क्रान्तीच्या आरोळ्यांत, त्याचा उच्चारसुद्धां कोणी करीत नाहीं. आणि जेव्हां दोन पक्षांपैकीं एक पक्ष विजयी होतो व सत्ताधीश होतो, तेव्हां त्याचें पहिलें कार्य म्हणजे पराभूत पक्षाला नेस्तनाबूद करणें. जें स्वातंत्र्य तो पक्ष विजयापूर्वी मागत होता तेंच स्वातंत्र्य विजयानंतर पराभूत पक्षाला तो नाकारीत असतो. यादवीमध्यें, यादवीच्या युद्धांत, जे पराभूत होतात ते परास्त होतात. त्यांना स्वातंत्र्य तर मिळतच नाहीं, पण जीवाचीसुद्धां शाश्वती राहत नाहीं. यशस्वी क्रान्तिकारक सत्ताधीश झाल्यानंतर टीकेला इतके हळवे

होतात कीं, कोणीहि यत्किंचित टीका केली तरी त्यांना ते प्रतिक्रियावादी मानतात, क्रान्तिविरोधक मानतात व त्यांना नेस्तनाबूद करतात. विजयानें धुंद झाल्यानंतर सत्तेचा दुरुपयोग होतो आणि विजयापूर्वीचे क्रान्तिकारक, विजयापूर्वीचे ध्येयदर्शी, विजयानंतर प्रतिक्रान्तिकारक, आग्रही, असहिष्णु बनतात. इतिहासाचा असा दाखला आहे कीं, क्रान्ति यशस्वी होतांच क्रान्तीचे जनक व पुढारी तिचेच प्रथम बळी बनतात. विजयी पक्षांतील कांहीं अतिरेकी बोलूं लागतात व सत्तेच्या प्राप्तीसाठीं लोकहिताचा, लोकानुनयाचा लिलांव बोलला जातो. आणि जे पुढारी जबाबदार असतात त्यांना क्रान्तिविरोधी मानलें जातें व सत्तेपासून ते ओढले जातात व त्यांची रवानगी परलोकीं अगर परदेशीं केली जाते. रॉबर्ट स्पीअरचें उदाहरण हेंच दाखवतें. १९१७ च्या मार्चच्या क्रान्तीचे रशियांतील जनक यांना जें भोगावें लागलें तेंहि हेंच दाखवितें. क्रान्तिकारक यशस्वी झाल्यानंतर पुन्हा समाजप्रस्थापनेच्या कामीं, राज्य सुप्रतिष्ठित करण्याच्या कामीं पुढारी झाले व यशस्वी ठरले, असा अनुभव फक्त भारतांतच आला आहे. आणि त्याचें मुख्य कारण सत्ताप्राप्तीनंतर नागरिकांना सर्व प्रकारचीं स्वातंत्र्यें उपभोगण्याची संधी मुक्तपणें देण्यांत आली हें आहे. शांततेच्या काळीं सुराज्याच्या दृष्टीनें राज्यकारभारावर टीका झाली पाहिजे. यादवीच्या काळांत टीकेचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. यादवी संपून सत्ता प्रस्थापित होऊं लागल्यावर टीकास्वातंत्र्य न राहिलें तर ती सत्ता हुकूमशाही सत्ता होते. क्रान्तीचा मूळ हेतु साधला जात नाहीं व हेंचि फल काय मम तपाला अगर त्यागाला असें म्हणण्याची पाळी येते. प्रत्यक्ष यादवी नाहीं, पण समाजांत गडबड आहे, राज्यसत्तेवर प्रखर टीका होत आहे, शांतताभंग होण्याचा संभव आहे, त्या स्थितींत नागरिकांच्या स्वातंत्र्यावर काय मर्यादा असाव्यात, याचा विचार मागेंच केला आहे. क्रान्ति जेथें जेथें झाली त्या त्या ठिकाणीं सत्ताधीशांनीं जेव्हां जेव्हां विरुद्ध टीका बंद केली, दडपशाहीनें दाबून टाकली, तेथें तेथें लोकमताला सत्ताधीशांना गमावून बसावें लागलें. यादवीमध्यें मुख्य प्रश्न सत्ता कोणाच्या हातांत असावी, कोणी राज्यावर यावें हा असतो. यादवी नाहीं, पण राज्यांत संघर्ष आहे त्यावेळीं कोणी सत्तेवर असावें हा मुख्य प्रश्न नसून राज्यसत्तेनें काय धोरण ठेवावें व कसें वागावें हा असतो. त्याजबरोबर हेंहि खरें कीं, हा यादवीपूर्वीचा संघर्ष संघटित पक्षानें निर्माण केला असल्यास क्रमाक्रमानें त्याचीं पावलें यादवीकडे वाटचाल करतात आणि मग वैध रीतीनें सत्ताप्राप्ति न झाल्यास आणि संबंधित पक्षानें अवैध मार्गांचा स्वीकार केल्यास राष्ट्र यादवीचा मुक्काम गांठतें. यादवीचा परिणाम सामान्यपणें निकाली कुस्तीसारखा लागतो. एक पक्ष सत्तारूढ होतो व दुसरा परास्त होतो, नष्ट होतो. सत्ताप्राप्तीनंतर नागरिक-स्वातंत्र्याचे प्रश्न उपस्थित होतात हें खरें. जे पराभूत झाले आहेत ते देशद्रोही ठरतात, जे बंडखोर होते ते यशप्राप्तीनें सत्ताधीश होतात, यशस्वी क्रान्तिकारकांपुढें त्यांच्याविरुद्ध बंड होऊं नये म्हणून काय उपाययोजना करावी, हा प्रश्न उपस्थित होतो

आणि जी उपाययोजना स्वीकारली जाईल त्यावरून अस्तित्वांत आलेलें राज्य कोणत्या स्वरूपाचें आहे हें ठरतें. वास्तविक दोन्ही पक्षांनीं शस्त्रास्त्रें उपयोगांत आणलेलीं असतात आणि म्हणून पराभूत पक्षानें हिंसेचा मार्ग स्वीकारला अगर शस्त्राचा उपयोग केला म्हणून सरसहा त्यांतील लोकांना फांशीं देणें अगर लष्करी कोर्टामार्फत गोळ्या घालून शिक्षा देणें हें न्यायाला धरून होत नाहीं. परंतु त्या परिस्थितींत असणारी सत्ता अगर सत्ताधीश न्यायाला अडगळ समजतात. ज्यांनीं त्या उठावांत भाग घेतला नाहीं अशांनाहि स्वातंत्र्य व मौलिक हक्क सत्ताधीश लाभूं देत नाहींत. नागरिक–स्वातंत्र्याच्या दृष्टीनें असें जेथें होतें तें अयोग्य. सत्तेवर आलेल्या लोकांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ज्यांनीं यादवींत भाग घेतला ते सर्व यादवीपूर्वी एकाच राज्याचे नागरिक होते, एकाच राष्ट्राचे सभासद होते व यादवीनंतरहि तीच परिस्थिति पुन्हां निर्माण करण्यांत न्याय असतो, औचित्य असतें व नूतन सत्ताधीशांना चिंतेपासून मुक्तता असते.

सामान्य अनुभव असा आहे कीं, क्रान्ति झाल्यानंतर ज्यांना सत्ता प्राप्त होते त्यांनीं सत्तेचा दुरुपयोग केला नाहीं असें क्वचितच. आधुनिक भारतामध्यें यादवीचे प्रसंग असे आले नाहींत. तथापि त्या पूर्वीच्या काळांत यादवी वारसाचा प्रसंग येई, व वारसावारसामध्यें झगडा उत्पन्न झाला म्हणजे दोन तट पडत आणि त्यांत लढाया होत व जो कोणी विजयी होई तो गादीवर येई व गादीवर आल्यानंतर पराभूतांना यमसदनीं तरी धाडलें जाई अथवा राज्याबाहेर तरी जावें लागे. त्या काळीं लोकशाहीचा अभाव असल्यानें सामान्य जनता यादवींत भाग घेत नसे. सरदार लोक व वारसा सांगणाऱ्याचे इष्टमित्र हेच त्यांत असत. शहाजहानच्या पुत्रांमध्यें झालेल्या लढाया त्यावेळच्या यादवीचें स्वरूप स्पष्टपणें दाखवितात. मातृहत्या, पितृहत्यापर्यंत उदाहरणें इतिहासांत आढळतात. सत्ता प्राप्त होतांच शिरकाण केलें जातें हा मराठ्यांच्या इतिहासाचा दाखला आहे. गादीवर असलेल्याचा अगर जो येणार असेल त्याचा वध करणें हें सर्रास चाले. नागरिक-स्वातंत्र्याच्या कल्पना त्या काळांत मान्यता पावलेल्या नव्हत्या. म्हणून सत्ताप्राप्तीनंतर जनतेच्या दृष्टीनें कोणाची कत्तल झाली; अगर कोण नागविले गेले याचें महत्त्व नसे. ज्याच्या नांवाची ग्वाही झाली, ज्याच्या नांवाचा डंका झाला, त्याच्यामागें प्रजा राही. पण एक गोष्ट निश्चित कीं, सत्ता प्राप्त झाल्यानंतर प्राप्त झालेल्या सत्तेचा दुरुपयोगच सत्ताधीश करतात. अमेरिकेच्या इतिहासांत गेल्या शतकाच्या मध्यांत उत्तरेकडील राज्यें व दक्षिणेकडील राज्यें यांच्यांत युद्ध झालें आणि त्या यादवींत जे यशस्वी झाले त्यांनीं प्राप्त झालेल्या सत्तेचा दुरुपयोगच केला आहे. त्याच-प्रमाणें असामान्य व संकटकालीन परिस्थिति निर्माण झाली असतां कायद्यानें दिलेली खास सत्ताहि दुरुपयोगापासून दूर राहिली नाहीं. १९१९ सालीं भारतांत व विशेषतः पंजाबमध्यें मार्शल लॉ पुकारल्यानंतर जें घडलें त्याचें तात्पर्य हेंच आहे कीं, सत्ता मिळा-

त्यानंतर मस्ती येते, उन्मत्तता येते, सारासार विचार राहात नाहीं आणि सत्तेचा दुरुपयोग होतो. कायद्याचाहि दुरुपयोग होतो. न्यायाचीं सामान्य तत्त्वेंहि बाजूला सारलीं जातात. क्षुल्लक आरोपाला कमाल शिक्षा दिली जाते. कामकाजाची रीत बाजूला सारली जाते. लष्करी कायद्याचा ह्याच अर्थ आहे. निदान अमृतसरला जें घडलें त्याहि वेळीं ह्याच अनुभव आला. १९३० सालीं सोलापूरला जें घडलें तेथेंहि ह्याच अनुभव आला. जेथें जेथें दडपशाही झालेली आहे, त्या त्या सर्व ठिकाणीं व त्या त्या सर्व घटनांत ह्याच अनुभव आपल्याला दिसून येईल. एकदां दडपशाही सुरू झाली म्हणजे व्यक्तीचे सर्व हक्क, त्याचें वित्त, त्याचें जीवित, त्याची प्रतिष्ठा हीं सर्व बेचिराख होतात. राज्यकर्त्यांना असें वाटत असतें कीं, तरवारीच्या जोरावर, शक्तीच्या जोरावर, आपण शांतता प्रस्थापित करूं, व्यवस्था कायम करूं व त्याजबरोबर लोकांची प्रीति पण मिळवूं. शांतता व व्यवस्था प्रस्थापित होतात, पण असंतोषाचा, द्वेषाचा, अग्नि वरवर शमला गेला तरी जनमनांतून धुमसत राहतो. सागरांत जसा वडवानल तसाच जनमन सागरांत द्वेष धुमसत राहतो; आणि राज्याबद्दलची निष्ठा कानसली जाते आणि राज्यकर्त्यांना जनतेचें प्रेम लाभत नाहीं. रशियन राज्यक्रांतीच्या आधीं झारशाहीनें हेंच केलें व झारशाहीला तोच अनुभव आला व शेवटीं १७ सालीं जगांत एक अभूतपूर्व अशी क्रान्ति तेथें झाली. तीच गोष्ट अमृतसर व सोलापूरच्या घटनेनंतर झाली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चळवळ पन्नास वर्षांच्या दडपशाहीनें दडपली गेली नाहीं. उलट, भारतांतील स्वातंत्र्याच्या चळवळीला दडपशाहीनें तेज व शक्ति दिली आणि आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा दिली. दडपशाहीमध्यें न्याय दिल्याचा बहाणा असतो, पण तो न्याय खऱ्या अर्थानें न्यायाधीशाकडून मिळत नाहीं, तर न्यायाधीशाच्या निर्णयाचे कान सरकारच्या हातीं असतात. कार्यकारिणी ( एक्झिक्युटिव्ह ) सत्तेनें न्यायदान करणें याचा अर्थ न्याय नाकारणें आहे. आणि शांतता व व्यवस्था राखण्याकरतां सरकारला हें करावें लागलें असें समर्थन जेव्हां केलें जातें तेव्हां त्याचा अर्थ एवढाच कीं, शांतता प्रस्थापित करण्याच्या कामीं न्यायबुद्धीचा बळी घेतला गेला.

येथपर्यंत शांततेच्या काळीं विचार-स्वातंत्र्याबाबत काय मर्यादा असाव्यात, शांतता नाहीं व समाजांत संघर्ष उत्पन्न झाला आहे; पण यादवीची परिस्थिति नाहीं त्या काळांत या स्वातंत्र्यावर काय मर्यादा असावी, प्रत्यक्ष यादवी सुरू झाली असतांना या बाबतींत काय मर्यादा असूं शकते, या तिन्हींचा विचार केला. आतां परचक्र आलें आहे, राज्य युद्धप्रसंगांत गुंतलें आहे, या स्थितींत विचारस्वातंत्र्य – मग त्याचें माध्यम प्रकाशन असो अगर भाषण असो – यावर काय मर्यादा असावी, याचा विचार करावयाचा आहे. युद्धप्रसंगीं जेव्हां व्यक्तिस्वातंत्र्याचा व व्यक्तीच्या नागरिकस्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित होतो, त्यावेळीं त्या प्रश्नाचें स्वरूप अगदीं वेगळें असतें. प्रथम जगावयाचें आहे हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असतो. राष्ट्र जगलें तर मग नागरिकत्व. राज्य शिल्लक राहिलें

तर मग नागरिकस्वातंत्र्य. तात्पर्य, शिर शिल्लक राहिलें तर शिरस्त्राणाचा विचार. परचक्र आलें आहे, राष्ट्राच्या सीमेवर अगर सीमेच्या आंत परकीय सैन्यानें प्रवेश केला आहे, अशा वेळीं त्या राष्ट्राचा नागरिक अहिंसेचा प्रचार करूं लागला, लढूं नका, सैन्यांत भरती होऊं नका, सरकारला पैशाची मदत करूं नका, असे विचार मांडूं लागला तर त्याला नागरिकस्वातंत्र्याच्या, विचारस्वातंत्र्याच्या नांवाखालीं प्रचार करूं द्यावयाचा कीं तुरुंगांत टाकावयाचें, हा प्रश्न उपस्थित होतो व त्याचें उत्तर एकच कीं, राष्ट्राच्या हितार्थ त्यास तुरुंगांत टाकलें पाहिजे. तसेंच सीमेवरील अगर सीमेच्या आंत परसैन्य शिरलें आहे एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष खेड्यामागून खेडीं जिंकली जात आहेत, शहरांना वेढे पडले आहेत, या स्थितींत कोणी आपल्या भाषण-स्वातंत्र्याचा उपयोग करून लोकांची हिंमत कमी करीत असेल, तर त्यालाहि तसें करूं देतां कामा नये, हें कोणीहि मान्य करील. शांततेच्या काळीं व्यक्तीचे अधिकार यांत व्यक्तिभाव असतो व त्याला मर्यादा घातली तरी ती व्यक्तीला घातली जाते. परकीय आक्रमणाच्या बाबतींत तशी व्यक्तिविषयक भावना नसते. आक्रमण आलें असतें तें सबंध राज्यावर आलें असतें, व्यक्तीवर नाहीं. जें संरक्षण करावयाचें असतें तें व्यक्तीचें संरक्षण नसून सबंध राज्याचें संरक्षण करावयाचें असतें. या परिस्थितींत राज्यांतील व्यक्ति या व्यक्ति राहत नसून तेथें राष्ट्र, राज्य हा संघटनेचा भाव असतो. असामान्य परिस्थिति असतें. जीवन-मरणाचा प्रश्न व्यक्तीच्या दृष्टीनें नव्हे, तर राष्ट्राच्या दृष्टीनें उत्पन्न झालेला असतो. त्या परिस्थितींत तात्त्विक चर्चा अर्थशून्य ठरते. वैयक्तिक हक्क व अधिकार अप्रस्तुत ठरतात. सर्वांचीं मनें एकाच गोष्टीवर केंद्रित झालेलीं असतात, अगर झालीं पाहिजेत. यामुळें शांततेच्या इतकेंच काय, यादवीच्या काळांतहि जे विचार प्रभावी असतात त्यांना येथें म्हणजे युद्धप्रसंगांत स्थान नसतें व नसलें पाहिजे. तथापि प्रत्यक्ष युद्ध झालें यावेळीं व्यक्ति-स्वातंत्र्याबाबत काय दृष्टिकोन असावा, युद्ध चालू असतां काय दृष्टिकोन असावा, युद्ध संपल्यानंतर काय दृष्टिकोन असावा व सर्वांत महत्त्वाचें म्हणजे युद्ध सुरू होण्यापूर्वी काय दृष्टिकोन असावा, यांचा विचार करणें जरूर आहे. एकंदर आंतरराष्ट्रीय परिस्थिति बिघडत चालली आहे व जवळ जवळ युद्ध होणार, असें निश्चित दिसत आहे. आकाशांत ढग जमले आहेत, वारे वाहूं लागले आहेत, विजाहि चमकूं लागल्या आहेत, अशा परिस्थितींत नागरिकांनीं गप्प बसावें, का आपले विचार मनांतच ठेवून स्वस्थ राहावें ? कित्येक नागरिकांच्या मतें विद्यमान सरकार जें धोरण आंखत आहे तें राष्ट्राच्या दृष्टीनें चुकीचें आहे अशीहि परिस्थिति असेल, युद्ध पेटल्यास राष्ट्राचा नाश हें निश्चित असेंहि अनेकांना वाटत असेल व त्याप्रमाणें त्यांनीं बोलावें कीं नाहीं असा प्रश्न उपस्थित होतो. आपलें मत प्रदर्शित केल्यानें राष्ट्राच्या शत्रूला पाठिंबा मिळतो, बरें वाटतें, एवढ्यासाठीं मतें प्रदर्शित करावयाचीं नाहींत असें जर मान्य केलें

तर विद्यमान सरकार अधिक बेजबाबदार होणें शक्य असतें. जे सरकारचे असतात त्यांचाहि कांहीं दृष्टिकोन असतो. त्यांचेहि कांहीं सिद्धान्त असतात आणि त्यांनीं जर संकट प्रत्यक्ष येण्यापूर्वी जनतेपुढें मांडलें नाहीं तर एका दृष्टीनें त्यांनीं आपलें कर्तव्य केलें नाहीं असें वाटणें स्वाभाविक असतें. नागरिकाचें कर्तव्य त्यावेळीं नक्की काय हें ठरविणें त्यालाहि कठीण असतें. कारण त्यानें कांहीं केलें तरी त्याचे परिणाम दूरवर होतात. देशांतच होतात असें नाहीं तर परदेशांतहि होतात. केवळ युद्धपरिस्थिति उत्पन्न होत आहे यासाठीं जे नागरिकत्वाचे हक्क आहेत ते सोडावयाचे, का त्यांना निष्प्रभ करावयाचे, का युद्ध सुरू झाल्यानंतर सर्व स्वातंत्र्यें स्थगित करावयाचीं ? या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण असतें. युद्ध सुरू झालें म्हणजे नागरिकत्व स्थगित झालें असें नाहीं. नागरिक म्हणून युद्धपरिस्थितीच्या नांवाखालीं राज्य माझ्याकडून अधिक सेवेची व सहकार्याची इच्छा करणार, एवढेंच नव्हे तर सक्ति करणार आणि त्याजबरोबर मी कांहीं बोलूं नये, कांहीं लिहूं नये, युद्धविरोधी असें कांहीं करूं नये, हीहि अपेक्षाच नव्हे तर प्रत्यक्ष सक्ति माझ्यावर सरकार करणार, ही स्थिति योग्य कीं अयोग्य, हें सांगणें कठीण असतें. जर एखाद्या नागरिकाला खरोखरच त्याच्या राष्ट्रानें जें युद्ध पुकारलें आहे तें अयोग्य असें वाटत असेल, तर त्यानें काय करावें ? युद्ध लहान राष्ट्राशीं असो अगर मोठ्या राष्ट्राशीं असो, लहान प्रमाणांत असो वा मोठ्या प्रमाणांत असो, प्रश्न असा आहे कीं, तें योग्य कारणासाठीं आहे कीं नाहीं हें ठरविण्याचा अधिकार युद्ध जाहीर झाल्यानंतर व्यक्तिगत नागरिकाला आहे कीं नाहीं ? केवळ सरकारनें युद्ध जाहीर केलें म्हणून नागरिकानें आपल्या मनावर बंदी घालावयाची व युद्धाबाबत विचारहि करावयाचा नाहीं असें झालें तर विद्यमान सरकारला कोऱ्या कागदावर सही करून वाटेल तें करण्यास मुभा दिली असेंच होतें. खरें म्हटलें तर संकटाच्या काळांत टीकेची सरकारला अधिक जरूर असली पाहिजे. तथापि इतिहासाचा अनुभव असा आहे कीं, जे तात्त्विक दृष्ट्या युद्धाला विरोध करतात, अगर व्यवहाराच्या दृष्टीनें विरोध करतात, त्यांच्या विरुद्ध विद्यमान सरकार जनमन कलुषित करीत असतें. ज्यांना युद्ध हें योग्य वाटतें अगर आपल्या सरकारची चूक नसतांना तें लादलें गेलें आहे असें वाटतें, त्यांच्याबद्दल प्रश्नच उपस्थित होत नाहीं. ते त्याप्रमाणें बोलून दाखवतात व यथाप्रसंगीं युद्धास साहाय्य करीत असतात. पण ज्यांना तसें वाटत नाहीं त्यांनीं काय करावें ? त्यांना प्रामाणिकपणें असें वाटतें कीं, होणारें अगर होत असलेलें युद्ध सर्व तऱ्हेनें अयोग्य आहे, राष्ट्राचा त्यांत नाश आहे. त्यांनीं मग त्याप्रमाणें मतप्रदर्शन करावें कीं नाहीं आणि केवळ मतप्रदर्शनावर थांबावें का युद्धविरोधी फळी उभारावी आणि तसें त्यांनीं कांहीं केल्यास राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीनें विद्यमान सरकारनें काय करावें ? पहिल्या महायुद्धाच्या वेळीं इंग्लंडमधील कित्येक मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांना युद्ध पसंत नव्हतें आणि युद्धाबाबत आपलीं मतें स्पष्टपणें मांडणें हें त्यांना आपलें नैतिक कर्तव्य

वाटलें व त्यांप्रमाणें ते वागलेहि. युद्ध सुरू झालें म्हणजे आपलीं सर्व मतें सोडून द्यावयाचीं व सरकारी धोरण मान्य करावयाचें यामध्यें देशभक्ति निःसंशय आहे. पण श्रेष्ठ नैतिकतेला कमीपणा येतो. कित्येकांना युद्ध म्हणजे मोठ्या प्रमाणावर व मोठ्या संख्येनें मानवी हत्या अगर खून असेंच वाटतें. एका व्यक्तीनें दुसऱ्या एका व्यक्तीला मारलें तर कायदा त्याला खून ही संज्ञा देतो, पण हजारों लोकांनीं हजारों लोकांना मारलें म्हणजे त्याला युद्ध अशी संज्ञा देतात व त्यांत भाग घेणाऱ्यांना देशभक्त, स्वार्थत्यागी वीरपुरुष, असें म्हणून गौरविलें जातें. एका माणसानें खाल्लें तर शेण, पण समारंभानें व समूहानें खाल्लें म्हणजे श्रावणी, असा त्याचा अर्थ होतो. जे तात्त्विक दृष्ट्या हिंसेच्या विरुद्ध आहेत त्यांनीं त्यावेळीं जर युद्ध म्हणजे हिंसेचें हिडीस स्वरूप असा आपला आवाज काढावयाचा नाहीं तर शांततेच्या काळींच केवळ काढावयाचा. समाजांत शांतता आहे त्यावेळीं अहिंसेच्या प्रचाराची एवढी गरज नसते, आणि जेव्हां युद्धाच्या तुताऱ्या वाजतात त्याच वेळीं लोकांना व राष्ट्राला अहिंसेचा उपदेश करणें समयोचित असतें आणि त्यावेळीं जर देशभक्तीनें प्रेरित होऊन मनुष्य गप्प बसला, तर त्याचें तें अहिंसाप्रेम खरें वाटत नाहीं. देशभक्तीच्या तीव्र भावनापुढें तें जर टिकूं शकलें नाहीं तर ती अहिंसा श्रद्धामय नसून नकली आहे असाच लोक सामान्यपणें आरोप करतात. गेल्या महायुद्धांत असाच प्रसंग भारतांतील अनेक विचारवंतांपुढें आला. कॉंग्रेसमध्येंहि दुफळी होण्याची वेळ आली. स्वातंत्र्य दिल्यास युद्धांत भाग घ्यावयाचा याचा अर्थ अहिंसेवर पूर्ण विश्वास नव्हता असेंच अनेकांचें मत होतें. आणि कुठल्याहि परिस्थितींत अहिंसा सोडावयाची नाहीं; मग त्यामुळें राष्ट्राला स्वातंत्र्य मिळालें नाहीं, अगर तें लांबलें तरी चालेल, असें वाटणाऱ्यांनाहि लोकांच्या टीकेस पात्र व्हावें लागलें. गांधीजींची अहिंसा ही श्रद्धामय असल्याकारणानें त्यांचा युद्धास विरोध स्पष्ट होता. युद्ध प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी प्रत्येक व्यक्तीला आपापलें मत सांगण्याची संधी असली पाहिजे आणि त्याप्रमाणें त्यानें न केल्यास आपलें कर्तव्यकर्म करण्यास तो चुकला असाच त्याचा अर्थ होतो.

आपण मतप्रदर्शन केलें, आपल्याला जें कांहीं सांगावयाचें तें सांगितलें, तथापि राष्ट्रानें युद्ध पुकारलें व मग त्या परिस्थितींत व्यक्तिगत नागरिकाचें काय कर्तव्य ठरतें, याचा विचार केला पाहिजे. युद्ध सुरू झालें याचा अर्थ राष्ट्र हें स्वसंरक्षणार्थ लढत आहे आणि मग राष्ट्राचें संरक्षण झालें तर आपलें संरक्षण होणार ही भावना अधिक स्पष्ट होते. या परिस्थितींत मग व्यक्तींनीं युद्धप्रयत्नाविरुद्ध कांहींहि लिहिणें, बोलणें अगर कांहीं करणें म्हणजे राष्ट्राच्या संरक्षणाच्या कामांत अडचण उत्पन्न करण्यासारखें असतें. युद्ध चालू झाल्यानंतर तें यशस्वी करण्यासाठीं राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीनें तन-मन-धनानें खटपट केली पाहिजे. विरोधी मतप्रदर्शन करून जनतेच्या मनांत विकल्प उत्पन्न करणें हें अनिष्ट असतें व त्याचा परिणाम

जनतेच्या निश्चयावर, धैर्यावर व हिंमतीवर अनिष्ट असा होतो. एकदां मनांत संशय उत्पन्न झाला म्हणजे मन निर्मळ होत जातें. निश्चय डळमळूं लागतो, श्रद्धा कासली जाते, म्हणून युद्धकाळांत जनतेच्या मनांत धैर्य, निश्चय व आशा या कायम राहतील असाच प्रयत्न सर्वांनीं केला पाहिजे. युद्ध सुरू झाल्यानंतर युद्ध सुरू करावयास नको होतें हें सांगणें मग अर्थशून्य असतें. जें प्राप्त झालें असेल त्याचा विचार करावयाचा असतो, तें निपटावयाचें असतें, तें झालें नसतें तर बरें झालें असतें ह्या म्हणण्यांत कांहीं स्वारस्य राहिलेलें नसतें. युद्धविरोधी मत प्रदर्शित केलें जाऊं नये अशी व्यवस्था करणें हें सरकारचें कर्तव्य ठरतें. याचा अर्थ असा नव्हे कीं, युद्धासंबंधीं विधायक दृष्टीनें केलेली टीकासुद्धां बंद करण्यांत यावी. युद्धप्रयत्न कसे चालवावे, कुठल्या क्षेत्रांत अधिक प्रयत्न केले जावे, युद्धाचीं ध्येयें काय आहेत, युद्धाच्या साधनाबाबतहि मर्यादेंत केलेली टीका त्याचप्रमाणें युद्धानंतर काय परिस्थिति व्हावी याचा विचार, याबाबत मतस्वातंत्र्य असलें पाहिजे. ज्या ठिकाणीं लोकशाही सत्ता आहे अर्थात् त्या ठिकाणीं हें सर्व होऊं शकतें. पण जेथें हुकूमशाही आहे तेथें शांततेच्या काळांतहि मतस्वातंत्र्य नसतें, तेव्हां युद्धकाळांत असण्याचें कारण नाहीं. अनेकांच्या मतें युद्ध यशस्वी होण्याच्या दृष्टीनें एकमुखी अधिकार असलेलें प्रभावी (ॲथॉरिटिव्ह) असें सरकार असलें पाहिजे. याच्या उलट जेथें सरकार लोकशाही स्वरूपाचें आहे तेथें यश निश्चित असतें असेंहि मानणारे लोक आहेत. आणि दोन्ही महायुद्धांत लोकशाही राज्यें यशस्वी झालीं असा इतिहासाचा दाखला आहे. लोकशाही राज्याचे निर्णय सामान्यपणें जनतेचेच निर्णय असतात आणि म्हणून जनतेला युद्धप्रसंगींसुद्धां जास्तींत जास्त त्याग करण्याची बुद्धि असते. कारण युद्धाचा निर्णय लोकमतानुसार झालेला असतो. म्हणून युद्ध सुरू झाल्यानंतर मत–स्वातंत्र्यावर, विचार–स्वातंत्र्यावर कांहीं मर्यादा असली पाहिजे हें जितकें इष्ट, त्याप्रमाणें विचार–स्वातंत्र्यहि असलें पाहिजे, तें संपूर्णपणें युद्धकाळांतसुद्धां स्थगित केलें जाऊं नये हेंहि तितकेंच इष्ट आहे. दोन्ही महायुद्धांत इंग्लंड व अमेरिका या राष्ट्रांतून नागरिक–स्वातंत्र्यें संपूर्णपणें स्थगित झालीं नव्हतीं. इतकेंच नव्हे, तर महायुद्ध ऐन रंगांत आलें असतांना मंत्रिमंडळ बदललें. आस्कीथ दूर झाले, लाईड जार्ज यांनीं प्रधानपद स्वीकारलें व युद्ध यशस्वीपणें चालविलें. दुसऱ्या महायुद्धांत तसेंच झालें. चेंबरलेन बाजूला झाले, चर्चिल प्रधान बनले व आपल्या प्रभावी व्यक्तित्वानें व वक्तृत्वानें युद्ध यशस्वीपणें चालविण्यास मदत केली. युद्धकाळांत मंत्रिमंडळ बदलणें ही सामान्य घटना नव्हे, लोकमताचा तो विजय आहे आणि जर लोकमत दाबून टाकलें असतें तर नालायक अथवा अयोग्य नेत्याच्या हातांत कारभार राहिला असता व यशहि मिळालें नसतें. म्हणून युद्ध सुरू झाल्यानंतर मतस्वातंत्र्य असणें हें राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें योग्य ठरतें. राष्ट्रामध्यें अशीं अनेक माणसें असतात कीं, ज्यांचें ज्ञान व अनुभव ही राष्ट्राची संपत्ति असते. विद्यमान परिस्थितींत ते अधिकारावर नसले तरी त्यांचीं मतें

विचारांत घेण्यासारखीं असतात आणि म्हणून त्यांनीं आपलीं मतें निर्भीडपणें राष्ट्राच्या कल्याणासाठीं सांगितलीं पाहिजेत व त्या गोष्टीला अनुकूल अशी परिस्थिति विद्यमान सरकारनें त्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे. वाटेल तें झालें तरी तडजोड करावयाची नाहीं, सोक्षमोक्ष करावयाचा, अशा वृत्तीचीं कांहीं माणसें राष्ट्रांत असतात. त्याचप्रमाणें सन्मान्य तडजोड होऊन मनुष्यहानि व वित्तहानि टळली तर इष्ट असें मानणारेहि कांहीं लोक असतात. कोणी तडजोड सुचवली तर तात्काळ तो देशद्रोही आहे असें म्हणणें बरोबर नाहीं, अगर निकाली कुस्ती व्हावी असें म्हणणारा व्यवहारशून्य आहे, असेंहि नाहीं. म्हणून मतस्वातंत्र्याला युद्धकाळांतसुद्धां वाव असला पाहिजे.

युद्धकाळामध्यें मतस्वातंत्र्याच्या मर्यादा काय असाव्यात व त्याला किती मुभा असावी याचा थोडा विचार वर केला आहे. सरकारच्या युद्धाच्या धोरणाला पाठिंबा देणारी तेवढीच टीका करण्याला मुभा असावी व तेवढेंच मतस्वातंत्र्य नागरिकांना असावें असें म्हणणारेहि लोक असतात. ह्या त्यांच्या दृष्टिकोनांत कांहीं अर्थ नाहीं असेंहि म्हणणें बरोबर नाहीं. तथापि, तेवढीच मर्यादा असावी, असें म्हणण्यामध्यें असा अर्थ ध्वनित होतो कीं, युद्ध चालू असतांना कार्यकारी सत्तेला म्हणजेच सरकारला कांहींहि धोरण असलें तरी तें जनतेला मान्य आहे व त्याप्रमाणें सरकारची समजूत झाल्यास एका दृष्टीनें तो धोका आहे. सैन्य रणांगणांत आहे व तेथें युद्ध जारी आहे आणि राष्ट्रांत अंतस्थ संघर्ष नाहीं व कुठलेहि मतभेद होऊं द्यावयाचे नाहींत असें झालें म्हणजे सरकारला स्वतःचें मत लोकमत वाटूं लागतें व ही गोष्ट कुठल्याहि दृष्टीनें इष्ट नसते. वास्तविक युद्धाचा प्रसंग म्हणजे राष्ट्रीय महत्त्वाचा व युद्धाचे परिणाम चालू पिढीपुरतेच मर्यादित नसतात. आणि अशा या प्रसंगीं प्रामाणिक टीका होऊं न देणें हेंहि बरोबर नाहीं. सरकारशीं मतभेद प्रदर्शित करणारी पण प्रामाणिक टीका बंद करणें म्हणजे सरकारकडून झालेल्या व होणाऱ्या चुकांच्या बाबतींत, गैरकृत्यांच्या बाबतींत आगाऊ बंदोबस्त करणें असाच होतो. युद्धांत पडलेल्या राष्ट्रांचा इतिहास असेंच सांगतो कीं, जेथें टीका प्रतिबंधित केली आहे तेथें निःसंशय चुका होतात. इतकेंच नव्हे तर सरकारची प्रवृत्ति मग हुकूमशाही होते आणि सत्ताधीशांना असें वाटतें कीं, विरोधी व टीका करणारे हे सर्वस्वीं देशद्रोही आहेत. टीकेच्या अभावीं जरूर ती व खरी माहिती लोकांच्यापुढें येत नाहीं आणि लोकांनाहि मग सरकारच्या धोरणावर योग्य अभिप्राय देतां येत नाहीं. सरकारचीं निवेदनें निर्भेळ सत्य म्हणून मानावीं लागतात, आणि सरकारी निवेदनांत सत्य तें गाळलें जातें अगर असत्य तें सूचित केलें जातें व प्रचाराच्या कलेमध्यें जर सरकार तरबेज असेल तर जनतेची फसवणूक तें करूं शकतें. युद्धाबाबत खरी परिस्थिति सरकार या पद्धतीनें स्वतःच्या नागरिकांपासून लपवूं शकतें. पण शत्रूला मात्र परिस्थितीचें पुरें ज्ञान असतें. आजकालच्या आकाशवाणीच्या युगांत पूर्वींइतकी फसवणूक जनतेची होत नाहीं. तथापि शत्रूच्या आकाशवाणीला अडथळा करण्याचेंहि

शास्त्रीय साधनांनीं व शोधांनीं कार्य केलें आहे. त्याचप्रमाणें युद्धकाळांत आपल्या राष्ट्राला अनुकूल असणारी बातमी अगर विचार जनतेला साहजिक आवडतात व त्यामुळें विरुद्ध असलेली परिस्थिति जनतेच्या मनांत भरत नाहीं आणि या दृष्टीनें सरकारचें प्रचार–संघटन आपलें कार्य करीत असतें. लोकांना आवडेल अशी वस्तुस्थिति नसली, तरी ती आहे असें सांगण्यास कमी केलें जात नाहीं. लहानसहान विजय व्यापक प्रमाणांत दाखवला जातो. झालेले पराभव हे पराभव नसून विजयाची पूर्वतयारी आहे असेंहि निगरगट्टपणें सांगितलें जातें. माघार घेतली तर युद्धफळी व्यवस्थित करण्यासाठीं, असा दावा सांगितला जातो. सैनिकांचे हाल लोकांच्या कानापर्यंत येऊं दिले जात नाहींत. सामुग्री कमी पडली तरी त्याबाबतची बातमी लपवली जाते. युद्धकाळांतील सरकार म्हणजे अहंमन्य, लवकर चिडणारें, व अप्रिय सत्याचें वावडें असणारें अशा स्वरूपाचें असतें आणि या परिस्थितींत त्या सरकारला युद्धाच्या विजयाच्या दृष्टीनें कार्यक्षम करावयाचें, त्याच्या कार्यांत समतोलपणा आणावयाचा हें इष्ट असतें. नव्हे, राष्ट्राच्या संरक्षणासाठीं अनिवार्य असतें आणि तें व्हावयाचें तर सरकारच्या धोरणाबाबत विशेषतः अंमलबजावणीच्या क्षेत्रांत अधिक लक्षपूर्वक टीका होणें जरूर असतें. आणि अशी टीका जर देशद्रोह ठरूं लागली तर राज्याची नैतिक प्रतिष्ठा कमी होते. आणि युद्धानंतर जीं मूल्यें राज्याच्या ऐक्याला व प्रगतीला आवश्यक व इष्ट मानलीं गेलीं होतीं, त्यांच्यावर वाईट परिणाम होतो. म्हणून युद्धकाळांतसुद्धां सामान्यपणें मतस्वातंत्र्य असलें पाहिजे. याचा अर्थ जेवढें शांततेच्या काळांत असतें तेवढें असलें पाहिजे असा नाहीं. युद्ध म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें राष्ट्रीय आपत्ति आहे आणि त्याप्रसंगीं प्रत्येक नागरिकानें आपलें कर्तव्य पार पाडलें पाहिजे. तें पार पाडण्याच्या बुद्धींत प्रामाणिकपणा असला पाहिजे. तथापि राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें नागरिकांच्या स्वातंत्र्यावर कांहीं मर्यादा बसल्या पाहिजेत हेंहि स्पष्ट आहे. आपलें सरकार प्रसंगीं चुकलें आहे असें सांगणें अगर प्रसंगीं अविचारानें वागलें असें सांगणें, याला हरकत नसावी. मात्र सरकारच्या प्रत्येक कृत्यावर सतत टीका केल्यानें राष्ट्राचा आत्मविश्वास नाहींसा होतो. राष्ट्राची हिंमत खचून जाते. अशी टीका करणें हेंसुद्धां एक धैर्याचें काम असतें. कारण युद्धकाळांत सामान्य जनता भावनावश झालेली असते. याचा परिणाम टीका दाबून टाकण्यामध्यें सरकारला फारशी अडचण पडत नाहीं. तथापि झालेल्या टीकेनें सरकारच्या कार्यावर कांहीं तरी परिणाम होतच असतो. पुष्कळ वेळां अशा टीकेंतून युद्ध संपण्याला मदतहि होते. हा अनुभव पहिल्या महायुद्धांत आलेला आहे. युद्धकाळांत राष्ट्रांत ऐक्य पाहिजे, एकमत पाहिजे हें मान्य, तथापि तें एकमत विचारांतीं झालें पाहिजे. तें आज्ञास्वरूपी नसावें, अगर रबरी शिक्क्याच्या थाटाचें पण नसावें. कोणतेंहि सरकार आपण जें करीत आहोंत तें सर्वस्वीं व शंभर टक्के बरोबर आहे, असा दावा करूं शकत नाहीं, तथापि तें युद्ध जिंकण्यासाठीं जे प्रयत्न करीत आहे त्या प्रयत्नांना

खंड पडणार नाहीं, देशामध्यें विपरीत भाव उत्पन्न केला जाणार नाहीं, कचखाऊ मनोवृत्ति निर्माण होणार नाहीं, एवढी काळजी टीका करणाऱ्यांनीं घेतली पाहिजे. क्रान्तिकारक कचखाऊपणा ( रिव्होल्यूशनरी ) अगर पराभूत वृत्ति ( डीफीटीझम ) याला लोकशाही राज्यव्यवस्थेंत स्थान नाहीं, अन्यत्र असेल. तात्पर्य, युद्ध सुरू झाल्या-नंतर व तें चालू असेपर्यंत सरकारला अनुभवी व विधायक टीकेनें मार्गदर्शन केलें जाईल एवढें मतस्वातंत्र्य राष्ट्रामध्यें असलें पाहिजे. युद्धकाळांत विधायक टीका करण्याला, प्रसंगीं निर्भीड टीका करण्यास वाव न मिळाल्यास राष्ट्राला युद्धांत जय मिळाला, तरी पुष्कळ वेळां पराभवापेक्षांहि तो महाग पडतो. आणि पुष्कळ वेळां युद्धानंतर निर्माण झालेली शांति अधिक स्फोटक असते. युद्ध संपलें पण युद्धानंतरच्या व्यवस्थेबाबत योग्य कल्पना नसल्यास युद्धांत भाग घेणाऱ्या सर्व राष्ट्रांना भयानक चिंता ग्रासत असते व तो शांततेचा काळ वस्तुतः शांततेचा न ठरतां आगामी युद्धाच्या तयारीचा ठरतो. मागल्या दोन्ही महायुद्धांचा अनुभव ह्या दृष्टीनें विचार करण्यासारखा आहे. युद्धकाळांत व युद्धाच्या सुरुवातीच्या काळांत युद्धाचे हेतु दोन्ही महायुद्धांच्या वेळीं जाहीर केले होते. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं अमेरिकेनें जी नैतिक भूमिका घेतली होती व जगामध्यें लोकशाही स्थापिली जावी, तिच्या संस्थापनेला व विकासाला योग्य तें वातावरण मिळावें, अशी घोषणा केली होती. आणि तिच्यावर विश्वास ठेवून युद्धांत सामील झालेल्या राष्ट्रांतील जनता युद्धप्रयत्नाला मदत करीत होती व आतुरतेनें युद्धाच्या अंताची वाट पाहत होती. रात्र संपेल, सूर्योदय होईल, प्रभा हंसत हंसत येईल, आणि कमलदल उमलेल अशी आशा करावी आणि कोण्या मदोन्मत्त हत्तीनें तें उखडून फेंकून द्यावें व आंतला भ्रमर आंतच राहावा, तशी अवस्था महायुद्धा-नंतर दिसून आली. लोकशाही लांबच राहिली आणि जगांत शांततेची परिस्थिति निर्माण करण्याच्या परिस्थितीनें जें कांहीं संटघन 'राष्ट्रसंघ' ( लीग ऑफ नेशन्स ) या नांवानें अस्तित्वांत आलें तेंच संघटन पुढील महायुद्धाचें निमित्त झालें. युद्धकाळांत युद्धाच्या हेतूचा व त्यावेळच्या घोषणेचा पूर्णपणें विचार विजयी राष्ट्रानें होऊं दिला नाहीं. उलट, प्रचाराची बंदूक शत्रूच्या द्वेषरूपी दारूनें ठांसून भरली होती. युद्धांत जय होतांच जया-बद्दल परमेश्वराचे आभार मानले गेले व त्याचबरोबर जर्मनीला नेस्तनाबूद करणाऱ्या कैसरला फांशीं देण्याच्या ( हँग दी कैसर ) घोषणा झाल्या आणि जो पक्ष अधिक सूड घेईल, पराजित जर्मनीला व त्याच्या सहकारी राष्ट्राला जो अधिक शिक्षा करण्याची घोषणा करील, त्याला लोकांनीं मतें देण्याकडे प्रवृत्ति निर्माण झाली. इंग्लंडमध्यें जी निवडणूक १९१९ सालीं झाली, तींत भावनावशता कमालीला पोहोंचली होती. जर्मन जनता, जर्मन सरकारच्या अपकृत्याबद्दल दोषी ठरली आणि जर्मन म्हणजे केवळ राक्षस असें मानण्यापर्यंत प्रवृत्ति गेली. सारासार विचार संपूर्णपणें लोपला गेला आणि राजकीय आकाश 'सूड सूड' या घोषणांनीं निनादून गेलें

होतें आणि ह्यामुळें जो तह झाला त्या तहांतून शांतता निर्माण झाली नाहीं, तर त्यांतून भावी युद्धाचीं बीजें पेरलीं गेलीं व त्यांतूनच दुसरें महायुद्ध निर्माण झालें. जर युद्धकाळांत सर्व युद्धमान राष्ट्रांतून लोकांना विचारस्वातंत्र्य उपलब्ध झालें असतें, तर अशा तऱ्हेचा तह झाला नसता, अशी विचारसरणी नामवंत राजकारणशास्त्रज्ञांनीं प्रतिपादली आहे. केवळ मतस्वातंत्र्य दिल्यानें हें सर्व टळलें असतें असें निश्चितपणें कोणी म्हणूं शकत नाहीं. पण इतकें म्हणतां येण्यासारखें आहे कीं, तहाच्या बैठकींत अधिक विवेकानें व समतोलपणें विचारविनिमय झाला असता त्या ठिकाणीं पराभूत राष्ट्रें सिद्ध गुन्हेगार अशा दृष्टीनें तेथें आलीं नसतीं. सूडाची व शिक्षा देण्याची प्रवृत्ति तितक्या प्रमाणांत दिसून आली नसती, त्याचप्रमाणें युद्धकाळांत मतस्वातंत्र्याला पुरा वाव असता, तर अनेक गुप्त तहनामे झाले नसते. आणि मोठमोठ्या राष्ट्रांची प्रतिष्ठा जेव्हां ते गुप्त तहनामे बोल्शेविकनें प्रसिद्ध केले, त्यावेळीं जी कमी झाली तशी झाली नसती. मतस्वातंत्र्याच्या अभावामुळें प्रस्थापित सरकार सर्व सत्य लोकांपुढें येऊं न देण्याच्या कामीं यशस्वी ठरलें. सत्य दडपलें गेलें आणि त्यामुळें सरकारला जें त्याच्या कर्तव्याबाबत मार्गदर्शन मिळावयास पाहिजे तें मिळालें नाहीं. तात्पर्य, युद्ध चालू असतांनासुद्धां युद्धांतील विजयासाठीं मतस्वातंत्र्य ही एक आवश्यक गोष्ट आहे. त्याचप्रमाणें युद्धानंतरच्या काळांत खरी शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनेंहि मतस्वातंत्र्य असणें तितकेंच आवश्यक आहे. न्यायबुद्धि ज्यांची जागृत आहे, जे भावनेनें वेडावलेले नाहींत, संभ्रमित झालेले नाहींत, तेच खऱ्या समतोल बुद्धीनें विचार करूं शकतात. तेच खरे राष्ट्राचें मार्गदर्शन करूं शकतात. विशेषतः संकटकाळीं, समरप्रसंगीं त्यांना विचारस्वातंत्र्य असलें पाहिजे.

मतस्वातंत्र्याच्या कल्पनेंत मतस्वातंत्र्य हें व्यक्तीप्रमाणें समूहालाहि पण असलें पाहिजे हें समाविष्ट असतें. व्यक्ति ही समाजामध्यें जन्मते त्यावेळीं अनेक संबंध तिच्या बाबतींत उत्पन्न होतात आणि त्या सर्व संबंधांचा व्यक्तीच्या जीवनावर परिणाम होत असतो. लहानपणापासून किंबहुना जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यक्ति निरनिराळ्या प्रसंगांत, निरनिराळ्या संदर्भांत आपला व्यवहार करीत असते, तिला अनुभव येत असतात, अडचणी भेटत असतात, त्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न ती सतत करीत असते; पुष्कळ वेळां ती स्वतःच्या प्रयत्नानें यश मिळवते अगर अपयश तिच्या वांट्याला येतें; पण अनेक वेळां तिला अन्य व्यक्तीच्या साहाय्यानें काम करावें लागतें. मग तें क्षेत्र सांस्कृतिक असो, औद्योगिक असो, व्यवसायांतील असो, किंबहुना व्यक्तीच्या व्यवहारांपैकीं, तिच्या कार्यांपैकीं मोठ्या प्रमाणांत तिचा संबंध समाजाशीं येत असतो. व्यक्ति स्वतःशीं एकाकी विचार करूं शकते, एकाकी विश्रांति घेऊं शकते, इत्यादि जीं कार्यें अन्याच्या संबंधांत न येतां केलीं जातात तीं सोडून देऊन व्यक्तीचें जीवन सामाजिक जीवनाशीं अनिवार्यपणें जोडलें गेलें आहे. मुलांची

समजूत घालण्यासाठीं त्याला पत्नीची मदत घ्यावी लागते. मालकानें घरदुरुस्ती करावी म्हणून शेजारीं राहात असलेल्या भाडेकरूंशीं चर्चा करावी लागते. नोकरींत बढती व्हावी म्हणून मजूरसंघाशीं त्यांचा संबंध येतो. कांहीं राजकीय मतांची चर्चा त्याला करावीशी वाटते. म्हणून एखाद्या संघाशीं अगर समितीशीं संबंध येतो. जर तो साहित्यिक असेल तर त्या संस्थांशीं संबंध येतो. किंबहुना निरनिराळे संघ व समूह संघटित व असंघटित यांचा आधुनिक जगांत व्यक्तीशीं, व्यक्तीच्या जीवनाशीं इतका संबंध येतो कीं, संघ व समूह हे व्यक्तीच्या जीवनाच्या दृष्टीनें अनिवार्य झाले आहेत. असें म्हणतात कीं, प्रत्येक इंग्रजाचा एक क्लब असतो, एक वर्तमानपत्र असतें, एक छंद असतो. भारतांतहि साठ सत्तर वर्षांपासून हळूहळू व्यक्तीच्या जीवनांत संघ व समूहाचें महत्त्व वाढत आहे आणि जेथें विचारस्वातंत्र्य आहे तेथें विचारविनिमय हा अवश्य येतोच. मला विचार-स्वातंत्र्य आहे याचा अर्थ मला काय वाटतें तें मी बोलून दाखविणार, लिहून दाखविणार; मग कोणी तरी श्रोता ऐकण्यास पाहिजे, कोणी वाचक लिहिलेलें वाचण्यास पाहिजे. मी जें बोलेन, मी जें लिहीन तें ऐकून वा वाचून श्रोत्याच्या मनावर कांहीं तरी परिणाम होतात व तेहि त्यांना काय वाटतें तें बोलून दाखवितात. याचा अर्थ असा कीं, मतस्वातंत्र्य हें समाजांत कार्यान्वित होतें. मतस्वातंत्र्यासाठीं समाजाची आवश्यकता असते. म्हणजे चार माणसें एकत्र आलीं कीं मग तीं विचारविनिमय करतात. तीं माणसें संघटित असतील, असंघटित असतील, पण दोन माणसें एकत्र आलीं म्हणजे सभा झाली. सभा म्हणजे किमान पक्षीं एक वक्ता व एक श्रोता होय. सभेला एका अर्थानें सार्वजनिक स्वरूप असतें. तथापि थोडीं माणसें एकत्र येणें, विशिष्ट गोष्टीबाबत सर्वसामान्य चर्चा करणें, हें लोकशाही समाजाचें किंबहुना आधुनिक समाजाचें एक जीवनतत्त्व मानलें गेलें आहे. व्यक्तीला तिचा विकास होण्यासाठीं समाजामध्यें पूर्ण वाव असला पाहिजे. आणि तो वाव समाजामध्येंच मिळत असतो. उत्तम गायक स्वतःच्या समाधानासाठीं गातो हें मर्यादेपर्यंत बरोबर आहे. तथापि त्याच्या कलेचा विकास, त्याच्या व्यक्तित्वाचा विकास, रसिक श्रोते असले म्हणजेच होतो. तीच गोष्ट साहित्याबाबतची. कलेसाठीं कला हें निरपेक्षपणें खरें नाहीं. तसें असतें तर कोणाहि साहित्यिकानें वाचकांची अपेक्षा केली नसती. कोणा चित्रकारानें प्रेक्षकांची अपेक्षा केली नसती. संत तुळशी यानें 'स्वांतः सुखाय' रामचरितमानस रचलें हें खरें; पण त्याला जें सुख झालें तेंहि सामाजिक संदर्भांत आपल्या रचनेनें जन-मन-रंजन होईल, जनमनांत भक्तिभाव वाढेल, या कल्पनेतून स्वांतः सुखाय या भावनेचा जन्म झालेला आहे. म्हणून कला, काव्य, शिल्प हें सगळें समाजांत व्हावयाचें असतें, म्हणून त्यांत सामाजिक भाव असतो व तसा भाव उत्पन्न होणें म्हणजे समाजांत माणसें एकत्र आलीं पाहिजेत हें उघड आहे. आधुनिक समाजांत एकत्र येणें याला पूर्ण मुभा पाहिजे आहे. भाषणस्वातंत्र्याचा, मतस्वातंत्र्याचा तो एक भाव आहे, भाग आहे.

किंबहुना ज्या मौलिक प्रेरणेनें व्यक्तीव्यक्तीच्या जीवनासाठीं समाज निर्माण झाला, त्या समाजामध्यें तीच भावना एकत्र येण्याच्या स्वातंत्र्यानें पोसली जाते. राज्य जितकें व्यक्तीला आवश्यक, समाज जितका अपरिहार्य तितकेंच हें एकत्र येण्याचें संघ-स्वातंत्र्य आवश्यक आहे. समविचाराच्या माणसांनीं एकत्र यावें व त्यांना ज योग्य वाटत असेल तें सांघिक दृष्टीनें करावें यांत समाजबुद्धीचा जितका विकास आहे, समाजाच्या स्थैर्याच्या दृष्टीनें जितकें आवश्यक आहे, तितकेंच या एकत्र येण्यापासून धोकेहि उत्पन्न होणें शक्य आहे. या दृष्टीनें या एकत्र येण्याच्या हक्कावर – संघस्वातंत्र्याच्या हक्कावर – राज्याच्या व समाजाच्या हिताच्या व संरक्षणाच्या दृष्टीनें काय मर्यादा आवश्यक आहेत हाहि विचार महत्त्वाचा आहे.

स्वातंत्र्य हें निरपेक्ष नाहीं हें पूर्वी सांगितलेंच आहे. स्वातंत्र्याच्या यथायोग्य उपभोगासाठीं राज्यानें मर्यादा घालणें हें अनिवार्य ठरतें. त्या मर्यादा राज्य कायद्यां-मार्फत घालील अगर अंमलबजावणीचे हुकूम काढून घालील. स्वातंत्र्य याचा अर्थ कायद्यानुसार स्वातंत्र्य ( लिबर्टी अंडर लॉ ) हें निश्चित म्हणून संघस्वातंत्र्याचा विचार करतांनाहि त्यावरील मर्यादांचा विचार अतिशय महत्त्वाचा ठरतो. व्यक्तीला साधारणपणें निर्बंध आवडत नाहींत. मग ते त्याच्या लिखाणाबद्दल असोत, भाषणाबद्दल असोत, कुठेंहि भटकण्याच्या स्वातंत्र्याबाबत असोत, तथापि त्याचबरोबर व्यक्तीला समाजांत वावरावयाचें आहे व समाजांतील प्रत्येक व्यक्तीला संबंधी व्यक्ती-इतकेच हक्क व अधिकार असतात आणि म्हणून स्वातंत्र्याचा यथोचित लाभ व्हावा या दृष्टीनें राज्याला त्यासंबंधींच्या मर्यादा घालाव्या लागतात, कायदे करावे लागतात. चार मंडळींनीं एकत्र यावें व संघ स्थापावा आणि त्या संघांत दाखल होणाऱ्या सभासदांवर अमर्याद सत्ता चालवावी, अगर त्यांना दंड व शिक्षा द्यावी व हें सर्व संघस्वातंत्र्याच्या नांवाखालीं व्हावें, हें कोणीहि योग्य मानणार नाहीं. संघाचें सभासदत्व ऐच्छिक असतें व संघाचे नियम मोडले तर संघानें कांहीं दंड केल्यास व सभासदानें तो देण्याचें नाकारल्यास संघाला त्याचें सभासदत्व रद्द करण्यापलीकडे कांहीं करतां येणार नाहीं. राज्य ही एक अशी संस्था आहे कीं, त्याचें सभासदत्व ऐच्छिक नसतें व राज्य हा असा संघ आहे कीं, ज्याचे नियम पालन न केल्यास शिक्षा अपरिहार्य असते. राज्यांत जे अन्य संघ निर्माण होतात व जे नोंदले जातात, त्या सर्वांचें सभासदत्व हें ऐच्छिक असतें व कुठल्याहि संघाला शिक्षा करण्याचा अधिकार नसतो व तसा अधिकार दिला गेल्यास हे सर्व संघ राज्याचे प्रतिस्पर्धी ठरतील व राज्यांत अराजक माजेल. हें सर्व टाळण्याच्या दृष्टीनें राज्य हें संघस्वातंत्र्यावर मर्यादा घालीत असतें. प्रश्न असा उपस्थित होतो कीं, या मर्यादा कशा असाव्यात ? त्या केव्हां घालण्यांत याव्यात ? व कशाप्रकारें घालण्यांत याव्यात ? समाजांत अनेक प्रकारचीं माणसें असतात. अनेक चक्रम एकत्र येतात. अनेक प्रकारचे संघ करतात व अनेक घोषणा करतात. त्यांचा कांहीं ना कांहीं परिणाम

होत असतो. त्यांना मर्यादा घालाव्यात तर स्वातंत्र्यावर आक्रमण केलें, असा आक्रोश केला जातो. मर्यादा न घालाव्यात तर समाजधारणेला जी एक किमान वैचारिक शिस्त आवश्यक असते, जें एक वर्तनक्रमाबाबत अनुशासन आवश्यक असतें तें नाहींसें होतें व सर्वत्र समाजांत गोंधळ निर्माण होतो. सामाजिक बाबतींत हे गोंधळ साधारणपणें फार काळ टिकत नाहींत. तथापि अन्य क्षेत्रांत त्यांचा परिणाम अनिष्ट होत जातो. एकपत्नीव्रताचा कायदा झाला तो अन्यायाचा आहे, समाजाच्या हिताच्या दृष्टीनें अयोग्य आहे म्हणून त्याच्याविरुद्ध चळवळ करण्यासाठीं संघ निर्माण करणें अवैध नाहीं, तथापि अयोग्य आहे. तसेंच समाजामध्यें नग्न अवस्थेंत फिरण्यास काय हरकत आहे, असें म्हणणारे नग्नसंघ काढूं लागले तर विचारस्वातंत्र्याच्या नांवाखालीं, संघस्वातंत्र्याच्या नांवाखालीं ते काढूं द्यावयाचे का? समाजांत मुक्त प्रेमाला वाव असला पाहिजे, म्हणून त्यासाठीं लोक संघ काढूं लागले तर तर त्याला परवानगी द्यावयाची का? अर्थात् क्षेत्रांतून मतस्वातंत्र्याच्या दृष्टीनें मर्यादा कांहीं एक परिस्थिति उत्पन्न होतांच घातली पाहिजे. त्याचप्रमाणें होईल तितकें करून असल्या विचारसरणीला विरोध करणाऱ्या विचारसरणीला तितकाच वाव दिल्यानें हा सामाजिक वेडगळपणा आपोआप कमी होतो असा अनुभव आहे. पण जेव्हां राज्यांतील मजदूर संघ संपाची घोषणा करतो अगर एखादें राजकीय कृत्य अगर एखादी राजकीय गोष्ट होऊं नये म्हणून संप पुकारतो, त्यावेळीं काय मर्यादा राज्यानें घालाव्यात हा प्रश्न अधिक महत्त्वाचा होतो. पगार-वाढीसाठीं केलेला संप, एखाद्या युनियनच्या सभासदाला अन्यायानें काढून टाकल्या-बद्दलचा संप, अमुक एक मॅनेजर नको म्हणून जाहीर केलेला संप, म्हणून एका अर्थानें कामगारांच्या जीवनाशीं ज्या प्रश्नांचा प्रत्यक्ष संबंध येतो त्या बाबतींतील संपास किती मर्यादा असावी व एखाद्या राजकीय प्रश्नाबाबत, उदाहरणार्थ; संयुक्त महाराष्ट्र अगर सीमासंबंधीं प्रश्न, याबाबत केलेला संप याला काय मर्यादा असावी, याचा विचार एका दृष्टीनें करावयाचा, का त्याबाबत भिन्न दृष्टिकोन ठेवावयाचे, याचाहि विचार झाला पाहिजे. आणि त्याचबरोबर कांहीं संघांनीं देशामध्यें जरूर पडल्यास हिंसेनें पण क्रान्ति घडून आणावयाची असें जाहीर केल्यास अगर तत्सम कृत्य केल्यास त्यावर काय उपाययोजना करावी, याचाहि विचार केला पाहिजे. देशांत औद्योगिक क्षेत्रांत गडबड उत्पन्न करावयाची व त्यांतून निर्माण झालेल्या गोंधळांत क्रान्तीचा सौदा करावयाचा अशी मनीषा धरणारे लोक नसतातच असें नाहीं.

वर उपस्थित केलेले प्रश्न केवळ वादविवादासाठीं नाहींत, केवळ अर्थशून्य चर्चेसाठीं नाहींत. आज भारतापुढें हे सर्व प्रश्न विविध स्वरूपांत पण परिणामीं भयावह अशा रीतीनें उभे आहेत. केंद्रीय सरकारचे नोकर त्याचप्रमाणें घटक राज्यांचे नोकरहि पगारवाढीसाठीं सार्वत्रिक संपाचें हत्यार परजवीत आहेत. कितीहि दिलें तरी कधींहि प्रसन्न न होणारी अशी एक विलक्षण प्रवृत्ति आज भारतांत उत्पन्न झाली आहे. या

प्रवृत्तीला उत्तेजन देणारी अशी परिस्थिति कांहीं प्रमाणांत अधिकारावर असलेल्या सरकारनें उत्पन्न केली आहे हें नाकबूल करतां येणार नाहीं. कुठल्याहि धोरणाबाबत निश्चितपणा नसणें व स्वीकारलेलें धोरण नेटानें व निश्चयानें पार न पाडणें हीं लक्षणें विद्यमान सरकारचीं आहेत. समाजसत्तावादी ध्येय स्वीकारल्यानंतर जें कांहीं स्पष्ट व अध्याहृत असतें तें स्वीकारल्यावांचून गत्यंतर नसतें. संन्यास घ्यावयाचा तर सुखाचा त्याग करावा लागतो. पूर्वीचें सर्व आयुष्य कायम, फक्त कपडे भगवे करून संन्यासदीक्षा सार्थ होत नाहीं. या दृष्टीनें विचार करतां समाजसत्तावाद स्थापन करावयाचा तर संपत्तीच्या निर्मितीचीं साधनें सरकारच्या मालकीचीं अगर सरकारी नियंत्रणाखालीं असलीं पाहिजेत. अन्यथा खाजगी भांडवलवाले हे खरे सत्ताधीश असतात व मजूर व अन्यवर्ग घोषणा करीत राहतात आणि मग संघर्ष अपरिहार्य होतो. नापसंती मग संपाच्या द्वारें प्रदर्शित केली जाते. मोठ्या प्रमाणांत संप यशस्वी होत नाहींत, तथापि जें कांहीं यश मिळतें त्यांतून त्या शस्त्राची उपयुक्तता समाजाला पटत जाते. अपयश आल्यास विफलतेची भावना वाढत जाते व पुष्कळ वेळां अवैध मार्गांचा स्वीकार करण्यापर्यंत परिस्थितीला कलाटणी मिळते. त्याचप्रमाणें राज्यकर्तेंहि मिळालेल्या अनुभवाचा सदुपयोग करतातच असें नाहीं. उलट, मजुरांच्या व अन्य जनांच्या एकत्र येण्याच्या संघस्वातंत्र्यावर आक्रमण करतात. सामान्यपणें आधुनिक जगांत संघस्वातंत्र्याचा हक्क वादातीत आहे असें मानण्यास हरकत नाहीं, याचा अर्थ कधींहि त्यावर आक्रमण होत नाहीं असें नाहीं. संघस्वातंत्र्याचा हक्क म्हणजे हा समूहानें संघटित रीतीनें मतस्वातंत्र्याचा उपयोग करण्याचा हक्क होय. हे संघ, लोक खुषीनें एकत्र येतात, म्हणून निर्माण होतात. एकत्र येण्याचा उद्देश अर्थात् विद्यमान कायद्यांना धरून असला पाहिजे व तो उद्देश समाजाच्या शाश्वत मूल्यांविरुद्ध नसावा आणि जोंपर्यंत या मर्यादा पाळल्या जात आहेत तोंपर्यंत सरकारनें त्यांच्या कार्यांत हस्तक्षेप करणें योग्य होणार नाहीं. एखाद्या संघाचे उद्देश अयोग्य असतील, प्रचलित नीतिमूल्यांविरुद्ध असतील, तथापि तेवढ्यासाठीं विद्यमान सरकारनें त्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालणें इष्ट नाहीं आणि केवळ कायद्याच्या जोरावर नीतियुक्त वर्तन घडवून आणणें शक्य आहे. सार्वजिनिक क्षेत्रांतील प्रदर्शनें सरकार बंद करूं शकेल. अश्लील गाणीं, अश्लील चित्रपट यांवर सरकार बंदी घालील. तथापि खाजगी रीतीनें तसें कांहीं होत असल्यास कायद्याचा हात तेथपर्यंत पोंचूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें वेडगळ धर्मसमजुतींचें जाहीर प्रदर्शन सरकार बंद करूं शकेल, तथापि व्यक्तिगत जीवनांत तसें कांहीं कोणी केलें तर सरकारला हस्तक्षेप करणें कठीण असतें. या दृष्टीनें समाजांतील सुधारणा विचारपरिवर्तनानें व तत्संबंधींच्या प्रचारानें होत असते. दारूबंदीची आजची स्थिति हेंच दर्शवीत आहे. दारूला सामान्यपणें सर्व धर्मांनीं बंदी केली आहे. तथापि कायद्यानें जेव्हां ती बंद करण्याचा प्रयत्न झाला, अगर होत आहे तेव्हां जेवढें यश

अपेक्षिलें होतें तेवढें आलेलें नाहीं. जसें दारूबंदीच्याबाबत तसेंच सर्व सामाजिक सुधारणे-बाबत आहे. द्विभार्याप्रतिबंधक कायदा लोकांना मान्य होण्यासाठीं जवळ जवळ चाळीस वर्षें लोकमताला वळण देण्यासाठीं समाजसुधारकांना खर्चावीं लागलीं. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत सामान्यपणें बहुसंख्याक लोक अनुकूल आणि अल्पसंख्याक उदासीन, पण तीव्रतेनें विरुद्ध नाहींत, अशी परिस्थिति असेल तर समाजसुधारणेचा कायदा यशस्वी होतो व लोकांच्या आचरणांत मान्यतेमुळें प्रतिबिंबित होतो. विवाहविषयक क्षेत्रांत असाच अनुभव आहे. सारडा कायदा १९२९ च्या सुमारास झाला; तथापि अनुकूल तेवढें लोकमत त्यावेळीं झालें नव्हतें व त्याचा परिणाम असा झाला कीं, सदरहू कायदा पास होऊन न झाल्यासारखा ठरला. हळूहळू लोकमत अनुकूल होत गेलें व मोठ्या प्रमाणांत बालविवाह आतां बंद झाले आहेत. तथापि याविषयीं लोकमत तयार करणाऱ्या ज्या व्यक्ति अगर संस्था होत्या त्यांवर निर्बंध घातले नाहींत. पूर्ण मतस्वातंत्र्य दिलें म्हणूनच आजची प्रगति दिसून येत आहे. एके काळीं संतति-नियमनाबाबत लोकमत एवढें विरुद्ध होतें कीं, त्या विषयाचा ऊहापोह अगर चर्चा करणेंसुद्धां असभ्य ठरलें होतें आणि संततिनियमनाच्या अनेक पुरस्कर्त्यांना कायद्याच्या कचाट्यांत धरलें गेलें होतें आणि आज आतां संततिनियमनाचीं साधनें, त्यांचा पुरवठा यासंबंधींचा प्रचार सर्रास चालू आहे. तात्पर्य हें कीं, समाजामध्यें मतस्वातंत्र्य प्रदर्शित करतां करतां जें लोकमत तयार होतें तेंच कायद्याला खरें वैधपण प्राप्त करून देतें. त्या कायद्याची नैतिक प्रतिष्ठा मग सर्वमान्य ठरते.

जें मतस्वातंत्र्य सामाजिक क्षेत्रांत असावें तें व तितकें मतस्वातंत्र्य आर्थिक क्षेत्रांतहि असलें पाहिजे. सामाजिक क्षेत्रांत ज्याप्रमाणें व्यक्तींना व संस्थांना संघटितपणें एखादी गोष्ट घडवून आणण्याची मुभा असते, त्याचप्रमाणें आर्थिक क्षेत्रांतहि असली पाहिजे. सामाजिक क्षेत्रांत जें निश्चितपणें कायद्यानें प्रतिबंधित केलें नसेल तें करण्याची पूर्ण मुभा असते. जें कायद्यानें प्रतिबंधित केलें आहे, तें करतां येणार नाहीं हें खरें तथापि त्याहि बाबतींत विचार करण्याची, तें बोलून दाखविण्याची, त्यासंबंधीं प्रचार करण्याची मुभा असली पाहिजे हें उघड आहे. याचा अर्थ विचारस्वातंत्र्य आहे, आचारस्वातंत्र्य नाहीं. सर्व संपत्ति समाजांत निर्माण होते म्हणून ती सर्वांच्या मालकीची, असा विचार मांडणें गैर नाहीं. संपत्तीचें मूळ चोरी व अन्याय हें आहे असें सांगणें, असा दृष्टिकोन मांडणें, हें गैर नाहीं. आवश्यकतेपेक्षां किंवा जरुरीपेक्षां कुणाहि व्यक्ती-जवळ अधिक असल्यास ती चोरी, हा उपनिषदाचा उपदेश करण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें 'तेन त्यक्तेन भुंजीथाः' हेंहि सांगण्यास हरकत नाहीं. मात्र या उपदेशाच्या नांवाखालीं 'अ' नें 'ब' जवळ असलेली अधिक संपत्ति हिसकावून घेणें हें योग्य नाहीं. समाजसत्तावाद हा कायद्यानें अंमलांत आणावयाचा असतो, जबरदस्तीनें नव्हे. संपत्तीची विषम वांटणी कर बसवून कमी करावयाची असते. चोरी व दरोडे या

मार्गानें नव्हे. समाजामध्यें नव्या कल्पनेचा प्रचार करण्यास मोकळीक असणें याचा अर्थ त्या कल्पनेप्रमाणें वागणें असा होत नाहीं. म्हणून समाजामध्यें जें वर्तन व्यक्तींनीं करावयाचें तें विद्यमान कायद्याला धरून असलें पाहिजे. जो कायदा अनिष्ट असेल, कदाचित् अनेकांना तो अनिष्ट व अनैतिक वाटत असेल, तथापि त्याविरुद्ध वर्तन करणें ही गोष्ट समाजाच्या दृष्टीनें अनिष्ट आहे. तो कायदा बदलून घेणें व तो बदलण्याच्या दृष्टीनें जास्तींत जास्त प्रचार करणें, संघटित प्रचार करणें हें योग्य ठरतें. जें हवें आहे, जें इष्ट आहे, तें घडवून आणण्यासाठीं संघटित प्रयत्न करणें याचा अर्थ संप करणें हाहि होऊं शकतो. जें व्यक्तीला करतां येण्यासारखें आहे तें संघटनेलाहि करतां आलें पाहिजे, या म्हणण्यांत सुसंगति आहे. तथापि व्यक्तीनें ओरडणें व समूहानें ओरडणें यांतील फरक महत्त्वाचा असतो. त्याचप्रमाणें व्यक्तीनें कामावर न जाणें व हजारों व्यक्तींनीं कामावर न जाणें यांत फरक असतो. समूहानें एखादें कृत्य केल्यास त्याचे परिणाम सामाजिक असतात, हें विसरून चालणार नाहीं. म्हणून संघटित व सामुदायिक वर्तनाची दखल समाजाच्या दृष्टीनें घेतली पाहिजे. समाजाचें स्थैर्य व संरक्षण या दृष्टीनें त्या वर्तनाकडे पाहिलें पाहिजे हें स्पष्ट आहे. या दृष्टीनें विचार करतांना, जे मजूर संघ अगर सरकारी नोकरांचे संघ संघटित प्रयत्न करतात, संपाचा विचार करतात, संपावर जातात, तें त्यांचें वर्तन चारसहा व्यक्तींच्या वर्तनासारखें नसतें. सार्वत्रिक हरताळ पुकारला गेला अगर ज्या सोयी ( सर्व्हिसेस ) सार्वजनिक महत्त्वाच्या आहेत, त्या बाबतींत व त्या क्षेत्रांत संप पुकारला गेल्यास विद्यमान सरकारनें त्याची दखल समाजाच्या हिताच्या दृष्टीनें घेतली पाहिजे. सार्वत्रिक संप करून समाजाचें जीवन अडवून धरणें म्हणजे क्षुल्लक गोष्ट आहे, सामान्य गोष्ट आहे, असें मानणें चूक आहे. संप म्हणजे संघटितपणें सक्ति अगर जबरदस्ती हें उघड आहे. रेल्वेवाहतुकींत असणाऱ्या नोकरांनीं संप करणें याचा अर्थ समाजाच्या व्यवस्थेविरुद्ध बंड करण्यासारखेंच आहे. 'आम्ही जें मागतों तें द्या; नाहीं तर एकहि एंजिन शिटी देणार नाहीं' याचा अर्थ स्वतःच्या मागण्यांच्या योग्यतेबद्दल सरकारची खात्री न करतां दडपणाच्याद्वारें, धमकीच्याद्वारें आपल्या मागण्या मान्य करून घेणें हा आहे व जें सर्वसामान्य जनाच्या हिताचें नाहीं, न्यायबुद्धीला पटत नाहीं तें धमकीला भिऊन मान्य करावें असा त्याचा अर्थ होतो. रेल्वेचा संप झाला म्हणजे देशांतील वाहतूक थांबली. पोस्ट व तार यांचा संप झाला म्हणजे सुव्यवस्थित व्यवहार बंद पडला व समाजांत गडबड व गोंधळ सुरू झाला आणि ह्या गडबड व गोंधळांतून अराजक निर्माण होणें अशक्य नसतें, असा इतिहासाचा अनुभव आहे. सरकारी नोकरांनीं संप करणें याचा अर्थ सरकारला कारभार करणें अशक्य करणें हा आहे. सामान्यपणें वाहतूक, विजेचा पुरवठा, अन्नधान्याचा पुरवठा इत्यादि गोष्टी अशा आहेत कीं, त्यांबाबत योग्य व्यवस्था नसल्यास समाज कोलमडून पडेल आणि सर्वत्र अराजक माजेल. म्हणून

समाजाच्या जीवनाला जें अत्यंत जरुरीचें त्याबाबत सरकारनें संपाविरुद्ध अगर संघटित प्रयत्नाविरुद्ध कांहीं कारवाई केल्यास ती योग्य असें मानण्यास हरकत नाहीं.

ज्यावेळीं समाजामध्यें यंत्रयुग आलें नव्हतें व आधुनिक तऱ्हेनें उद्योगव्यवस्था अंमलांत आली नव्हती, त्यावेळीं संघटितपणें कामगारांतर्फे चळवळ होत नसे. कामगार व निर्माता हे सामान्यपणें एकच असत, आणि त्यामुळें आजच्या उद्योगधंद्यांना जे प्रश्न भेडसावतात, तसे प्रश्न त्यावेळीं निर्माण होत नसत. शेतकऱ्यानें धान्य पिकवावें, बाजारांत नेऊन त्याची विक्री करावी. कुंभारानें मडकीं, विटा घडवाव्यात व त्यानेंच त्याची विक्री करावी. विणकऱ्यानें वीण विणावें व त्यानेंच स्वतः बाजारांत जाऊन विकावें अगर घाऊक व्यापाऱ्यास विकावें असें होतें. आधुनिक उद्योगव्यवस्थेंत श्रम करणारे हे केवळ आपल्या श्रमालाच जबाबदार असतात. त्यांना म्हणजे मजुरांना कांहीं कच्चा माल विकत घ्यावा लागत नाहीं, पक्का माल विकावा लागत नाहीं. त्यांचा संबंध फक्त मजुरीशीं येतो. तयार केलेल्या मालाला किंमत कमी आली त्याची दखल मजूर घेत नाहीं. कच्चा माल महाग किंमतीला घ्यावा लागला तरी त्याची दखल मजूर घेत नाहीं. त्याचा संबंध फक्त मजुरीशीं येतो. उत्पादनाचीं साधनें त्याचीं नाहींत. उत्पादनाच्या विक्रीशीं त्याचा संबंध नाहीं. कच्च्या मालाशीं त्याला कांहीं कर्तव्य नसतें. एका शब्दांत तो आपले श्रम ठराविक दरानें मालकाला विकत असतो आणि सर्वस्वीं त्याचें जीवन मालकाच्या मर्जीवर अवलंबून असतें. आधुनिक उद्योगधंद्यांत मालकी पण संघटित झालेली आहे. उद्योगधंद्यांचें स्वरूप पण संघटित झालें आहे. जसा मजुरांचा संबंध त्या धंद्याशीं उद्योगापुरताच येतो, त्याचप्रमाणें उद्योगधंद्याला भांडवल पुरविणारे मालक म्हणजे भागीदार यांचा संबंधहि नफ्या ( डिव्हिडंड ) पुरताच येतो. धंदा उभारण्याची, धंदा सुव्यवस्थित करण्याची, तो फायदेशीर करण्याची सर्व जबाबदारी व्यवस्थापक वर्गावर येते. जो व्यवस्थापक वर्ग आहे तो अतिशय महत्त्वाचा भाग असतो. संचालक मंडळ सामान्य देखरेखीपलिकडे कांहीं बघत नाहीं व सर्व सत्ता व्यवस्थापकाची असते. सामान्यपणें आजच्या युगांत लहानमोठे उद्योग यांची मागणी व्यक्तीची फारशी नसते, तर कंपनी-कायद्याखालीं नोंदविलेल्या मर्यादित भांडवलाच्या खाजगी अगर सार्वजनिक कंपन्यांची असते. एकंदर आधुनिक उद्योगक्षेत्रांत व्यवस्थापक वर्ग, संचालक मंडळ व त्यांना निवडून देणारे भागीदार हे मालक असतात व ते सर्व संघटित असतात व त्यामुळें ते मजुरांना जे असंघटित असतात त्यांच्यावर आपला अंमल प्रभावी करू शकतात आणि मजूर संघटित असले, तरी त्यांच्या संघटनेच्या शक्तीला निश्चित मर्यादा असते. मजूर संघटित असल्यास सामान्यपणें मालक वचकून वागतात. शिवाय देशांतील राज्यसत्ता अनेक कायदे करून मजूर-मालक-संबंधांत नियमन व नियंत्रण प्रभावी करतात. मजूर-मालक-संबंधाच्या क्षेत्रांत सरकारनें

मध्यें पडूं नये व आपापसांतील तंटे त्यांनींच सोडवावे हें इष्ट अशी एक विचारसरणी आहे; पण मजूर व मालक यांच्यांत करार झाले आहेत त्याप्रमाणें मजूर व मालक यांनीं वागलें पाहिजे व कराराची पवित्रता राखली पाहिजे हें म्हणणें बरोबर दिसतें, पण त्यांच्यांत करार व्हावयाचा त्या दोन्ही व्यक्ति एका अर्थानें समें भूमिकेवर असल्या पाहिजेत. उद्यां चूल बंद पडणार या भीतीनें मजूर वाटेल ती मजुरी घेऊन काम करण्यास तयार होतो. राजीखुषीनें तयार होतो. याचा अर्थ त्यानें केलेला करार कायदेशीर असेल पण न्याययुक्त असेल असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून ज्या ठिकाणीं समान स्तरावर राहून उभय पक्षांत करार झाले नाहींत, तेथें जे कांहीं करार झाले असतील ते वैध असले तरी ते न्यायपूर्ण आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. तसेंच पुष्कळ वेळां संघटित मजूर मालकवर्गाला आपल्या मागण्या संघटनेच्या जोरावर मान्य करावयास लावतात व मालकहि अगतिक होऊन त्यांच्या मागण्या मान्य करतात. तथापि तेथें झालेला करार स्वखुशीचा असला, तरी वस्तुतः तो शक्तीच्या जोरावर झालेला असतो. म्हणून तेथेंहि तो कायदेशीर दिसत असला तरी न्यायपूर्ण आहे असें म्हणतां येणार नाहीं. या परिस्थितींत न्यायपूर्ण कोणतें, योग्य कोणतें हें पाहण्याचा हक्क – पुन्हां प्रश्न उपस्थित झाल्यास – सरकारला असला पाहिजे. म्हणून एका दृष्टीनें समाजांत जेथें कोठें संघर्ष निर्माण होईल तेथें समाजाच्या दृष्टीनें समाजाच्या संरक्षणासाठीं सत्तेचा उपयोग करणें हा सरकारला हक्क आहे, हेंहि मान्य केलें पाहिजे. संघस्वातंत्र्य असलें पाहिजे. मजुरांना व मालकांनाहि. व्यक्तीव्यक्तींतील तंटा जर सरकारी कोर्टामार्फत तोडला जातो तर समूहासमूहांतील संघटना-संघांतील तंटे सरकारनें तोडले पाहिजेत, हें त्या सरकारचें कर्तव्यकर्म ठरतें. मान्य पावलेल्या तत्त्वानुसार व्यक्तीव्यक्तींतील संबंधांत राज्यांतील कोर्टें न्याय देतात. त्याचप्रमाणें औद्योगिक क्षेत्रांत औद्योगिक न्याय सरकारनें दिला पाहिजे. स्वातंत्र्यावर औद्योगिक क्षेत्रांत मर्यादा जेव्हां सरकार घालतें त्यावेळीं समाजाच्या हिताच्या दृष्टीनें ती जरूर आहे व तशी मर्यादा न घातल्यास समाजामध्यें व्यवस्था राहणार नाहीं हें सरकारला स्पष्टपणें दाखवितां आलें पाहिजे. प्रत्येक राज्यांत सत्तेवर असणाऱ्या राज्यसत्तेला निर्णायक अशी शक्ति व अधिकार असतो व त्या अधिकाराचा उपयोग ज्यावेळीं समाजाचें स्थैर्य व संरक्षण धोक्यांत असेल त्यावेळीं करावयाचा असतो. याचा अर्थ केवळ मालकवर्गाला धोका आहे म्हणून समाजाला धोका आहे, असें मानण्याचें कारण नाहीं; अगर केवळ मजुरांना धोका आहे म्हणून सर्व राज्याला धोका आहे असेंहि मानण्याचें कारण नाहीं. जो धोका असेल तो सर्व राज्याला असला पाहिजे. कुठल्याहि एका वर्गाला अगर विवक्षित भागाला असला म्हणून तो सर्व समाजाला आहे असें मानतां येणार नाहीं. अनुभव असा आहे कीं, सरकारची निर्णायक शक्ति मालकाच्याकडे झुकलेली असते व मालकाच्या हितार्थ तिचा उपयोग केला जातो.

सामान्यपणें प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें समाजांतील कोणा व्यक्तीनें अगर समूहानें संघटित रीत्या अगर अन्यथा सरकारवर सक्ति करणें हें योग्य नाहीं. व्यक्तीला अगर समूहाला जें कांहीं आपल्याला हवें आहे तें वैध मार्गानें, शांततेच्या मार्गानें घडवून आणलें पाहिजे आणि अशा मार्गांपैकीं सर्वांत प्रशस्त व परिणामकारक मार्ग म्हणजे निवडणुकींत मतदान करणें हा होय. आपल्या संघटनेच्या जोरावर संप करणें अगर हरताळ करणें अशा तऱ्हेची सीधी कारवाई ( डायरेक्ट ॲक्शन ) योग्य नव्हे. ही विचारसरणी सामान्यपणें बरोबर आहे. संप सुरू झाला म्हणजे एक प्रकारें अप्रत्यक्ष दबाव सरकारवर टाकला जातो आणि मग सर्वसामान्यपणें समाजहिताच्या दृष्टीनें वागणें व त्यासाठीं आवश्यक ते उपाय योजणें हें सरकारचें आद्य कर्तव्य ठरतें. सार्वत्रिक संप याचा अर्थ खरोखर कांहीं गोष्टींच्या, कांहीं मागण्यांच्या सिद्धीसाठींच आहे व एवढाच आहे असा होत नाहीं व सामान्यपणें सार्वत्रिक संप अगर सहानुभूति दाखविणारा संप हें एक क्रान्तीचें शस्त्र बनतें. संविधानांत म्हणजे घटनाकायद्यांत सामाजिक रचना अगर आर्थिक रचना बदलण्याचा जो मार्ग आहे तो न स्वीकारतां घटनाबाह्य मार्गानें परिवर्तन करून आणण्याचा संप हें एक शस्त्र बनतें. जें घटनाबाह्य आहे तें अर्थात् अवैध व अयोग्य असल्यानें तें दडपून टाकणें, त्याविरुद्ध उपाययोजना करणें, हें मग राज्यकर्त्यांचें कर्तव्य बनतें. तथापि संपाचा व सार्वत्रिक संपाचा विचार करतांना वर सांगितलेली विचारसरणी सामान्यपणें मान्य करूनहि सरकारला कांहीं उपाययोजना करतांच दोष देणारे भेटतातच. त्याचप्रमाणें संपवाल्यांनाहि दोष देणारे भेटतातच. मुख्य प्रश्न असा आहे कीं, संपासाठीं जीं कारणें दाखविलीं जातात तीं बरोबर आहेत का व त्या कारणासाठीं संप करणें हें उचित आहे का ? संप हें हत्यार साधें नाहीं. बारक्यासारक्या गोष्टीसाठीं त्याचा उपयोग होऊं नये हेंहि कोणी मान्य करील. आणि संप ही एक अशी क्रिया आहे कीं, तिचा मंत्र व तंत्र यांत किंचित् चूक झाल्यास तो मंत्र संप करणाऱ्यांवरहि उलटतो व समाजावरहि. आणि सार्वत्रिक संप असेल तर त्यांतून अनपेक्षित असें कांहीं तरी निर्माण होतें. व एक करावयाचें, एक साधावयाचें याच्याऐवजीं भलतेंच घडतें. विनायकाऐवजीं वानर निर्माण झाल्याचें दिसून येतें. म्हणून एकत्र येण्याचें स्वातंत्र्य, त्याच्यांतून निर्माण होणारें संघस्वातंत्र्य याचा उपयोग करतांना जास्तींत जास्त दक्षता व जबाबदारी दाखविली पाहिजे. संप करण्याचा हक्क घटनेनें दिला आहे असें मानलें तरी तो हक्क दैनंदिन वापरण्याचा नाहीं आणि त्याचप्रमाणें संप केला नाहीं, म्हणून कामगार अगर संबंधित समूह गुलामींत आहे असेंहि मानण्याचें कारण नाहीं. संपाचा विचार करतांना संप खाजगी उत्पादनक्षेत्रांत आहे, का सरकारी क्षेत्रांत आहे, याचाहि विचार केला पाहिजे. खाजगी क्षेत्रांत उत्पादनाचा हेतु जास्तींत जास्त नफा हा असतो. सरकारी उत्पादनांत समाजाची सेवा हा मुख्य उद्देश असतो. खाजगी उत्पादनांत जास्तींत जास्त नफा काढावयाचा व कमींत कमी खर्चांत उत्पादन करावयाचें व जास्तींत जास्त किंमतीस

तें विकावयाचें अशी स्थिति असल्यानें तेथील कामगारांनीं संप केल्यास त्या संपाचा परिणाम अप्रत्यक्षपणें समाजावर होत असतो, हें खरें. तथापि त्याचा मोठा परिणाम त्या उद्योगधंद्यांतील खाजगी मालकांच्या नफ्यावर होत असतो. म्हणून खाजगी क्षेत्रांत संप झाल्यास तावडतोब तो बेकायदेशीर ठरविणें अगर सरकारनें आपली शक्ति खर्च करून तो नेस्तनाबूद करणें हें योग्य ठरणार नाहीं. सामान्यपणें खाजगी क्षेत्रांत संपाचा हेतु व कारण कामगारविषयक परिस्थितीबाबत असतें. वेतन, कामाचे तास, बदल्या, पाळ्या, बढत्या, अधिकाऱ्यांचें उर्मट वर्तन इत्यादि बाबींबद्दल संप होत असतात आणि सहानुभूतीचे संपहि असल्याच कांहीं कारणासाठीं अन्य ठिकाणच्या मजुरांनीं केलेला असतो, म्हणून सहानुभूति दर्शविणारे संप होत असतात. कामगार-विषयक बाबीसंबंधीं संप असल्यास व त्यांच्या सहानुभूतीसाठीं अन्यत्र संप झाल्यास अगर कामगारविषयक बाबीसंबंधीं सार्वत्रिक संप झाल्यास जर तो खरोखरच तसा असेल तर सरकारनें आपली शक्ति उपयोगांत आणून बंद करणें नेहमींच योग्य ठरतें असें नाहीं. बेकारी भत्ता, कामाचे तास, इत्यादि गोष्टींबाबत सार्वत्रिक संप झाल्यास त्यांतील थोडासा दोष सरकारवरहि येतो. मजूरविषयक कायदे सरकारनें केले पाहिजेत व त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. मालकांच्या नफ्यावर मर्यादा असली पाहिजे. मालक व मजदूर यांच्यांत तंटे उपस्थित झाल्यास त्यांचा निकाल लावण्यासाठीं योग्य यंत्रणा असली पाहिजे. हें सर्व सरकारच्या कर्तव्यक्षेत्रांत येतें म्हणून खाजगी धंद्यांतील परिस्थितीबाबत करण्यांत आलेला सार्वत्रिक संप हा केवळ सार्वत्रिक आहे व त्यामुळें समाजाच्या जीवनाला अथडळे उत्पन्न होण्याचा संभव आहे, एवढ्यावरून तो अवैध व अयोग्य ठरत नाहीं. आणि हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, सार्वत्रिक संप जेव्हां पुकारण्यांत संघटित कामगार तयार होतात त्यावेळीं ते आपलें सर्वस्व पणाला लावतात व त्यांतून निर्माण होणारे धोके पत्करीत असतात. वाटेल तेव्हां वाटेल त्या कारणासाठीं संप पुकारणें, सार्वत्रिक संप पुकारणें, हें सोपें नसतें. म्हणून कुठलाहि सार्वत्रिक संप झाल्यास व त्या संपाचा हेतु कामगारविषयक परिस्थिति सुधारण्याचा असल्यास व जोंपर्यंत त्याच्या चालू राहण्यापासून समाजजीवनास अगर संरक्षणास प्रत्यक्ष धोका निर्माण झाला नाहीं तोंपर्यंत सरकारनें आपली शक्ति उपयोगांत आणूं नये. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे केवळ सार्वत्रिक संप पुकारला, त्यापासून सार्वजनिक जीवनाला धोका होण्याचा संभव आहे, एवढी परिस्थिति सरकारी हस्तक्षेपासाठीं पुरेशी नाहीं आणि तशी परिस्थिति नसतांना सरकारनें हस्तक्षेप करणें म्हणजे मजूरविरोधी भांडवलशाहीला मदत करण्यासारखें होतें व मजुरांना जो न्याय मिळावयास पाहिजे तो नाकारला जातो. याचा अर्थ सरकारनें केव्हांहि हस्तक्षेप करावयाचा नाहीं असा नव्हे. तंटा जरी खाजगी क्षेत्रांतील असला तरी सरकारनें केवळ तटस्थ राहून शांततामंग होऊं न देण्यापुरतेंच लक्ष घालणें हेंहि योग्य नाहीं.

आखाड्यांतील कुस्ती, आखाड्याबाहेर येत नाहीं व दोन्ही पेहेलवान आखाड्यांत लढत आहेत एवढें पाहाण्यापुरती सरकारी दृष्टि मर्यादित नसली पाहिजे. मजूर संघटित असले तरी त्यांची आर्थिक परिस्थिति अशी असते कीं, फार वेळ ते संपावर राहूं शकत नाहींत. त्याचप्रमाणें मालकवर्गाहि अनंतकाळपर्यंत कारखाने बंद करून होणारा नाश स्थितप्रज्ञ राहून पाहूं शकत नाहींत. अशा तऱ्हेच्या परिस्थितींत लोकशाही सरकारचें असें कांहीं कर्तव्य असतें. केवळ मतस्वातंत्र्य आहे, करारस्वातंत्र्य आहे, असें म्हणून सरकार स्वस्थ बसेल, तर तें बरोबर ठरणार नाहीं आणि त्या परिस्थितींत तंटा सोडवण्याच्या दृष्टीनें, तडजोड घडवून आणण्याच्या दृष्टीनें सरकारनें हस्तक्षेप केल्यास तो योग्य ठरणार आहे. मजुरांनीं संपावर जाऊं नये हें म्हणणें बरोबर, पण तडजोडीचीं बोलणीं केलीं, ठराव पास केले; पण मालक जर कुठल्याहि परिस्थितींत कांहींहि योग्य करण्यास तयार नसला, तर मजुरांनीं संपाचें हत्यार उगारणें कोणीहि अयोग्य मानणार नाहीं. गरीब म्हणून, गरिबीनें घेतात म्हणून, शांत म्हणून, शांततेनें घेतात म्हणून, न्याय मिळत नाहीं ही स्थिति जर समाजाच्या नित्याच्या अनुभवाची झाली तर तें राज्य लोकशाही असूनसुद्धां वस्तुतः धनिकांची, भांडवलवाल्यांची ती राज्यसत्ता बटीक बनते. कोणत्या वेळीं सरकारनें हस्तक्षेप करावा, तडजोड घडून आणावी अगर कोणत्या परिस्थितींत निर्णायक सत्ता उपयोगांत आणून संपाला दडपून टाकावें हें त्या प्रत्येक संपाची परिस्थिति लक्षांत घेऊनच सरकारनें ठरविलें पाहिजे. संप योग्य असतांना तो सार्वत्रिक म्हणून अगर तो सहानुभूतीचा म्हणून तो बेकायदेशीर ठरविणें वा दडपून टाकणें याचा अर्थ संघस्वातंत्र्यावर जबरदस्त हल्ला करणें असाच ठरतो आणि न्याय मिळविण्यासाठीं जें एक वैध शस्त्र आहे तें निष्फळ आहे असें सरकारच्या अयोग्य हस्तक्षेपानें ठरतें. केवळ समाजांत व विशेषतः औद्योगिक क्षेत्रांत शांतता राहिली पाहिजे असा हट्ट धरून कुठल्याहि सरकारला कारभार चालवितां येणार नाहीं. अन्याय होत असेल तर व्यक्ति नोकरी सोडून देते. स्वाभिमानासाठीं राजिनामा देते. या व्यक्तीच्या कृत्यामागील श्रेष्ठ भूमिका जेव्हां मजूरसंघ सार्वत्रिक संप पुकारतात त्याहि वेळीं असते व सारासार विचार न करतां संप झाला म्हणून मोडून काढणें, तो बेकायदेशीर ठरविणें म्हणजे समाजाच्या नैतिक व श्रेष्ठ प्रवृत्तींना वाव न देणें व त्यांना खंडित करणें असा आहे.

संपापासून अगर सार्वत्रिक संपापासून समाजाला नुकसान पोहोंचत नाहीं असा कोणीहि दावा करणार नाहीं. व्यक्तिगत जीवनांतसुद्धां किंचित् कमीजास्त झालें व नित्यापेक्षां कांहीं निराळें घडलें तर मनुष्य त्रासतो, रागावतो; मग जेव्हां सबंध समाज अगर समाजांतील अनेक व्यक्तींना अन्य व्यक्तींच्या संघटित कृत्यापासून त्रास झाल्यास ते रागावणें स्वाभाविक आहे. पण ज्याच्यामुळें त्रास झाला त्यांचें म्हणणें काय, त्यांच्या म्हणण्यांत न्याय किती याचा विचार सहानुभूतीनें करणारे समाजांत विरळा असतात. तथापि समाजाची न्यायबुद्धि आळवून आळवली जात नाहीं. लेख लिहून, साधेभोळे

९२३४८

ठराव पास करून, अन्यायाखालीं दडपल्या जाणाऱ्या लोकांची कोणी दाद घेत नाहीं. पण गांवांत निदर्शनें होऊं लागलीं, मोर्चे निघूं लागले, घोषणा होऊं लागल्याबरोबर अनेक लोक, ही काय भानगड आहे हें जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. एका दृष्टीनें लोकमत जागृत करण्यासाठीं कांहीं ना कांहीं तरी अचाट, अनपेक्षित व अलौकिक केलें तरच लोकमत जागृत होतें असा अनुभव आहे. शहरांत हरताळ पडला, ट्रामगाड्या बंद पडल्या, टॅक्सीवाले भाडेकरू घेईनात, अशी स्थिति झाली म्हणजे समाजाच्या मनाला धक्का बसतो व ज्या बाबतींत ते अज्ञानी अगर उदासीन होते. त्या बाबतींत विचार करूं लागतात. या दृष्टीनें विचार करतां कांहीं तरी प्रमाणांत समाजाला अडचणींत टाकल्याशिवाय समाजाला अन्यायाची जाणीव होत नाहीं व समाज त्याची दखल घेत नाहीं. पुरुषाला प्रसिद्धीसाठीं घट फोडावे, पट फाडावे, कांहीं तरी विलक्षण स्वर काढावा, हा उपाय व्यवहारज्ञांनीं सांगितला आहे. त्याचीच योजना आवश्यक ते फेरफार करून आधुनिक जगांत अन्यायाखालीं दडलेले लोक करीत असतात. आणि त्यांत आमूलाग्र कांहीं वाईट आहे असें म्हणवत नाहीं. सर्व कांहीं शास्त्रोक्त व वेदोक्त केल्यानंतर फलप्राप्ति होत नसेल, तर कांहीं तरी पुराणोक्त करावें लागतें. त्याशिवाय फलप्राप्ति नसते. तसेंच थोडेंसें आजकालच्या राजकारणांत सार्वजनिक जीवनांत हक्कासाठीं झगडतांना करावें लागतें. वाटेल तें झालें तरी, वाटेल तितका अन्याय झाला तरी, सहन केला पाहिजे. कुठल्याहि परिस्थितींत संपाचा मार्ग स्वीकारूं नये हें सांगणें योग्य दिसतें हें खरें. तथापि ज्यांना न्याय मिळत नाहीं, पोटाची आग स्वस्थ बसूं देत नाहीं, जीवनांतील सुखें थोड्या प्रमाणांतसुद्धां ज्यांना भेटत नाहींत, त्यांना हा वेदान्त पटत नाहीं, ही गोष्ट स्पष्ट आहे. म्हणून केवळ डोकें नमवून कांहीं होत नाहीं असा अनुभव आल्यानंतर डोकें ताठ होतें. हात जोडून कांहीं मिळत नाहीं असा अनुभव आल्यानंतर मुठी वळतात. या परिस्थितींत संपाचा हक्क नाकारणें अगर त्यावर अन्याय-मूलक मर्यादा घालणें म्हणजे औद्योगिक क्षेत्रांत मजुरांना गुलामगिरींत ठेवण्यासारखें आहे. सामान्य समाजाला अडचण उत्पन होते, समाजाचें जीवन व्यस्त होतें, म्हणून संपाचा हक्क नाकारणें हें सर्व परिस्थितींत उचित व न्यायाचें ठरत नाहीं. कांहीं परिस्थितींत संपाचा हक्क न नाकारतां त्यावर प्रभावी मर्यादा घालणें हें समाजाच्या दृष्टीनें त्याच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीनें सरकारचें कर्तव्य ठरतें. सार्वत्रिक संप अगर साधा संप अगर सहानुभूतीचा संप हा जेव्हां कारभारविषयक बाबींसंबंधीं न पुकारतां राजकीय हेतूसाठीं पुकारला जातो, अगर पुकारल्यानंतर त्याचें स्वरूप अगर त्याचा उपयोग राजकारणासाठीं होत आहे असें आढळून आल्यास सरकारला याविरुद्ध कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार आहे व असला पाहिजे. तथापि झालेला संप नक्की राजकीय कारणासाठीं आहे, अगर त्या दृष्टीनें त्याचा उपयोग होत आहे हें सांगणें सोपें नाहीं. कांहीं प्रसंगीं संप हा उघड उघड अगर हरताळ हा उघड उघड राजकीय कारणासाठीं

असतो. राजकीय कारणासाठीं सत्याग्रह अगर सीधी कारवाई ही प्रस्तुत लेखकाच्या मतें अवैध व अयोग्य आहे. राजकीय हेतूसाठीं राजकीय संप योग्य, हें मान्य केल्यास कुठलेंहि सरकार टिकूं शकणार नाहीं. लोकशाही राज्यव्यवस्थेंत सार्वत्रिक निवडणुकींत बहुमतानें निवडून आलेला पक्ष सत्ताधीश होतो तो कदाचित् ५१ टक्के असेल व विरोधी ४९ टक्के असतील. तथापि ४९ टक्क्यांनीं विद्यमान स्थितींत ५१ टक्के यांचें ऐकलें पाहिजे. आणि सार्वत्रिक निवडणूक होईपर्यंत जें अनिष्ट होत असेल त्याविरुद्ध जरूर टीका केली पाहिजे. पण तें दूर करण्याचा मार्ग देशांत सत्याग्रह अगर सीधी कारवाई करणें हा नाहीं. लोकांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न करीत रहावें व निवडणुकीमध्यें आपलें बहुमत करून घेऊन सत्ताधीश होणें व कायद्यानें नको असलेलें बदलून घेणें हाच मार्ग लोकशाहींत श्रेष्ठ असतो. किंबहुना हा मार्ग स्वीकारणें यांतच लोकशाही व्यवस्था स्थिर होते. अल्पमत झाल्याबरोबर देशामध्यें प्रक्षोभ निर्माण करणें, संप, हरताळ, मोर्चे, मिरवणुका या सर्वांनीं एक अराजक निर्माण करून निवडून आलेल्या सत्ताधीश पक्षाला खालीं ओढणें हें गैर, अवैध व अंतीं भयानक असतें. एका पक्षानें हा मार्ग स्वीकारून यश मिळविलें म्हणजे तोच मार्ग अपयश मिळालेल्या पक्षालाहि मोकळा असतो व त्या पक्षानें तो मार्ग स्वीकारल्यास देशामध्यें सतत अशांतता राहते. वातावरण अनिश्चित राहतें. प्रगतीचीं पावलें जागच्या जागीं थंड होतात. म्हणून या दृष्टीनें निवडणूक होईपर्यंत जें कायद्यानें ठरविलें असेल तें मान्य केलें पाहिजे. निवडणुकीपर्यंत थांबावें लागतें हें खरें असलें, तरी हा संयम अंतिम यशाच्या दृष्टीनें अवश्य असतो. किंबहुना हा संयम लोकशाहीचें महान् तत्त्व आहे, म्हणून राजकीय कारणासाठीं संपाचें हत्यार उगारणें हें अयोग्य. गिरणींतल्या मजूरसंघानें संयुक्त महाराष्ट्रासाठीं संप करणें हें अयोग्य आहे. त्याचप्रमाणें बारीकसारीक राजकीय प्रश्नावर संप पुकारणें हेंहि अयोग्य आहे. राजकीय क्षेत्रांत परिवर्तन घडवून आणण्यासाठीं घटनेप्रमाणें निवडणूक हा एकच उपाय आहे व असला पाहिजे. लोकमत जागृत करावें, तें तसें टेवावें, किंबहुना विद्यमान सत्ताधीश सरकारचें प्रत्येक अन्यायाचें कृत्य वेशीवर टांगावें. त्याविरुद्ध लिहावें, बोलावें, आणि एका दृष्टीनें निवडणुकीसाठीं आपल्या बाजूनें प्रचंड लोकमत निर्माण करीत जावें, ही कार्याची दिशा असली पाहिजे. राजकीय बाबतींत मजूरवर्गानें, संघटित समूहानें अगर संघानें संप करणें याचा अर्थ जें स्वातंत्र्य संविधानानें व संकेतानें सर्वसामान्य जनतेला दिलें आहे, त्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग आहे. प्रश्न असा उपस्थित होतो कीं, सामाजिक रचना बदलण्यासाठीं, घटना बदलण्यासाठीं राजकीय संप करूं नये हें मान्य केलें तर असे कांहीं राजकीय प्रसंग येतात कीं, ज्यावेळीं संघटित मजुरांनीं संप करणें राष्ट्राच्या स्थैर्यासाठीं आवश्यक असतें, असें प्रतिपादतात. उदाहरणार्थ, विद्यमान सरकार राष्ट्राला युद्धाच्या खाईत नेण्याच्या बेतांत आहे व लोकशाही पद्धतीनें त्याबाबत केलेला विरोध अपुरा पडतो आहे व त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं; अशा

वेळीं समाजांतील संघटित संस्थांनीं, मजूर व अन्य संघांनीं संप पुकारावा का ? त्या स्थितींत संप पुकारणें अयोग्य नाहीं असें मत प्रो. लास्की यांचें आहे. तथापि देशामध्यें युद्धाविरुद्ध एवढी प्रचंड विरोधाची भूमिका असल्यास सामान्यपणें सरकार त्याकडे दुर्लक्ष करणार नाहीं. तथापि एकदां विद्यमान सरकारनें युद्ध जाहीर केल्यानंतर देशांत त्याविरुद्ध संप पुकारणें म्हणजे युद्धांत पराजयाला आमंत्रण देण्यासारखें आहे. सबंध देशाचें संरक्षण धोक्यांत आणण्यासारखें आहे व इच्छा व उद्देश नसतांना शत्रूला नैतिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासारखें आहे, शत्रूचे हात बळकट करण्यासारखें आहे व त्या संपाचे परिणाम देशांत निश्चितपणें यादवी निर्माण करण्यांत होतो. राष्ट्र जेव्हां युद्धपरिस्थितींत असतें त्या वेळेला देशांत यादवी निर्माण होणें म्हणजे युद्धांत पराभव होण्याची ती नांदीच ठरते. तात्पर्य, राजकीय कारणासाठीं व तें कारण युद्धाइतकें महत्त्वाचें असलें तरी संप करणें हें अयोग्य व अवैध म्हणून तसा संप झाल्यास सरकारनें तो दाबून टाकला पाहिजे, बेकायदेशीर ठरवला पाहिजे व सरकारचें तें करणें योग्य किंबहुना तसें न केल्यास सरकारनें कर्तव्य बजावलें नाहीं असें ठरेल. सरकारनें त्याबाबत कारवाई केली तर जनतेच्या मतस्वातंत्र्यावर अगर संघस्वातंत्र्यावर अगर कुठल्याहि स्वातंत्र्यावर आक्रमण केलें आहे असें ठरत नाहीं. राज्य राहिलें तरच स्वातंत्र्य आहे, म्हणून राज्य राखण्याच्या दृष्टीनें आवश्यक तें सरकारनें केलें पाहिजे हें कोणीहि मान्य करील.

राजकीय बाबीसंबंधीं संप पुकारण्यांत आला म्हणजे केवळ कोर्टामार्फत केलेली त्याविरुद्धची कारवाई ही कधींहि पुरी पडत नाहीं. ज्यावेळीं राजकीय दृष्टीनें संप करण्यांत येतो त्यावेळीं कोर्टाच्या भीतीच्या पलीकडे वातावरण गेलेलें असतें. कोर्टानें कांहींहि सांगितले तरी कोर्टाच्या निर्णयाची पर्वा संपावर गेलेले लोक व त्यांना प्रेरित करणारे त्यांचे नेते कायद्याला जुमानत नाहींत. कायदा मानला तर सबंध संपाचें नैतिक अधिष्ठान नाहींसें होतें म्हणून कायद्याला बाजूस सारूनच यशाचा मार्ग त्यांना गांठावा लागतो. कायदा कांहींहि असला तरी आपण करीत आहोंत, केलेलें आहे, तें बरोबर आहे. विद्यमान कायद्यापलीकडे असें एक नैतिक तत्त्व आहे, असें एक नैतिक दर्शन आहे, त्याला आमची निष्ठा आहे, असेंच ते सांगतात आणि विद्यमान कायद्याला कमी लेखतात व क्षुद्र मानतात. कायदेभंग अथवा सत्याग्रह हा त्यांचा धर्म बनतो. कायदा म्हणजे केवळ शब्द राहतात आणि प्राप्त झालेल्या परिस्थितीशीं त्याचा संदर्भ राहात नाहीं. सत्ताधीश वारंवार त्याचा उल्लेख करीत असतात तथापि ज्यांनीं तो पालन करावयाचा त्यांच्या मनावर त्यांतील नैतिकतेचा अगर त्यांतील दंडविषयक भावांचा कांहींहि परिणाम होत नाहीं. सार्वत्रिक संप बेकायदेशीर जाहीर केल्यानें तो बंद होत नाहीं. उलट तो बेकायदेशीर असें जाहीर केल्यानें वातावरण अधिक चिघळतें. सार्वत्रिक संप होऊं नये यासाठीं श्रेष्ठ उपाय म्हणजे तो ज्या परिस्थितींत होतो तीच परिस्थिति होऊं न देणें हा होय. पण सार्वत्रिक संप झाल्यानंतर केवळ कोर्टाच्या भरंवशावर संपाविरुद्ध पूर्णपणें उपाययोजना

होईल हें शक्य नसतें आणि म्हणून राज्यांतील निर्णायक शक्तीचा उपयोग करावा लागतो. केवळ संप बेकायदेशीर आहे एवढी घोषणा करून ज्या समाजाच्या हितासाठीं ही घोषणा केली जाते, त्याच्या हिताचें संरक्षण होत नाहीं. संप बेकायदेशीर ठरविला म्हणून संपवाले कारकून ताबडतोब कचेरींत जातील असें होत नाहीं. बंद पडलेल्या गाड्या पुन्हां चालू होतील असें घडत नाहीं. एकदां संप बेकायदेशीर ठरल्यानंतर त्यांतून उत्पन्न झालेल्या परिस्थितीला सरकारनें प्रभावीपणें तोंड दिलें पाहिजे व त्या कामीं आपली सर्व सत्ता व शक्ति कामास लावली पाहिजे. आणि जर केलेला संप अयोग्य कारणासाठीं आहे याची खात्री जनतेला होत गेली, तर संप झपाट्यानें कोलमडूं लागतो. संपाच्या नेत्यांना पूर्ण जाणीव असते कीं, जनतेच्या सहानुभूतीशिवाय संप चालणार नाहीं. संपाचा उद्देश जनतेची सहानुभूति आपल्याकडे ओढून घेऊन विद्यमान सरकारला संपाच्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडणें हा असतो. सरकार जर लोकांची खात्री करूं शकलें कीं, संप अयोग्य कारणासाठीं आहे अगर संपाचा परिणाम समाजाच्या जीवनाला धोका देणारा होत आहे, तर सरकार झपाट्यानें संप मोडण्याच्या कामीं यशस्वी होतें. प्राथमिक सहानुभूति ही नेहमींच संपवाल्याच्या बाजूस असते. कारण संप करणें ही साधी गोष्ट नाहीं. त्यांत त्यागाची भूमिका असते व प्रसंगीं आपलें भविष्य व प्राण पणाला लावावे लागतात. म्हणून जनमत ज्याच्या बाजूनें शेवटीं होईल त्याचा जय हें स्पष्ट असतें आणि जनता ही भावनावश असली तरी कांहीं तरी सारासार विचार जनतेमध्यें असतो. विवेकाशीं तिचा परिचय असतो. उशिरां का होईना, सत्य व प्रचार यांतील फरक तिला कळतो. व्यक्तिगत अन्याय अगर कांहीं समूहावरील अन्याय व समाजाचें आत्यंतिक हित यांतील फरकहि कळतो. या दृष्टीनें सरकारच्या जीवावर जेव्हां संप उठतो त्यावेळीं सरकारनें प्रथम संपविषयक हेतूची माहिती जनतेला देणें जरूर असतें. केवळ कोर्टावर विसंबून राहून, केवळ संप बेकायदेशीर आहे असें पुकारून संपाचा बंदोबस्त होत नाहीं. पोलिसांनीं जरूर तेथें लाठ्यांनीं अगर गोळ्यांनीं काम करावें हें जरी जरूर असलें तरी अधिक जरुरी सरकार करीत आहे तें योग्य आहे अशी लोकांची खात्री पटविण्याची असते. संप करणाऱ्यांना संपाशिवाय आपल्याला दुसरा मार्ग राहिला नाहीं हें सांगणें सोपें असतें आणि सामान्यपणें प्रथम प्रथम तरी लोक त्यांच्याकडे सहानुभूतीनें पाहतात. संप करण्याचा त्यांचा हक्क आहे याची जाणीव त्यांच्याइतकीच समाजालाहि असते. परंतु संपाचे परिणाम काय होत आहेत अगर होतील, याची जाणीव ताबडतोब समाजाला होत नाहीं. आग दिसून येईपर्यंत आगीचा बंब केवळ वाहतुकीला त्रास देत आहे असेंच लोकांना वाटतें. या परिस्थितींत जनमनांतील अज्ञान पद्धतशीर रीतीनें दूर केलें पाहिजे आणि मूठभर लोकांनीं सबंध समाजाचें जीवन धोक्यांत टाकावें हें इष्ट नाहीं म्हणून संपवाल्यांचें आव्हान जनतेनें स्वीकारलें पाहिजे आणि जनतेनें तसें आव्हान स्वीकारण्यास व सरकारशीं सहकार्य केल्यास योग्य असेंच होतें. व्यक्तीप्रमाणें समा-

जालाहि आपल्या हक्काचें संरक्षण करण्याचा अधिकार आहे. वाटेवरच्या चोरानें पिस्तूल रोखून मुकाट्यानें दिल्यास धन, व तसें न केल्यास धन व प्राण दोन्ही द्यावें, ही परिस्थिति जशी व्यक्तीच्या जीवनांत असह्य व अनिष्ट, तसेंच संघटित मजुरांनीं अगर अन्य वर्गीयांनीं समाजाला आपल्या संघटनेच्या जोरावर नाडावें, भीतिग्रस्त करावें, आणि न्याय-अन्यायाचा विचार न करतां समाजाला तें मान्य करावयास लावावें हें अनिष्ट आहे व असें होऊं लागलें तर समाजांत अराजकता, अव्यवस्था, माजल्यावांचून राहणार नाहीं व समाजानें संघटित होऊन संपाला तोंड दिलें म्हणजे संघटित संघाच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण झालें हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. स्वातंत्र्याचा दुरुपयोग होतो म्हणून तें नाकारणें हें जसें अयोग्य त्याचप्रमाणें दुरुपयोग झाला म्हणजे समाजानें अगर राज्यसत्तेनें स्वस्थ बसणें हेंहि अयोग्य. स्वातंत्र्याचा दुरुपयोग व्यक्ति व समूह करतात, पण स्वातंत्र्याचा दुरुपयोग देशांतील विधानसभा अगर पार्लमेंट हीहि करूं शकतें आणि पुष्कळ वेळां संकटानें संभ्रमित होऊन स्वातंत्र्याच्या आद्य तत्त्वांना हरताळ फांसणारे कायदेहि मग केले जातात. तथापि पार्लमेन्टनें, विधानसभेनें केलेले कायदे बदलण्याचे मार्गहि घटनेंत असतात आणि त्या मार्गानेंच चुकीचे कायदे दुरुस्त केले जातात, अपुरे पुरे केले जातात. अयोग्य ते योग्य केले जातात. तात्पर्य, सत्ता आहे म्हणून सरकारनें अगर पार्लमेन्टनें वाटेल तें करावें हें अनिष्ट आहे. त्याचप्रमाणें संघटनेच्या जोरावर समाजाच्या मुळावर घाव घालणें, समाजाचें जीवन अशांत करणें व अराजकतेला आव्हान देणें हेंहि अनिष्ट. सरकारच्या व संघाच्या दोघांच्या स्वातंत्र्यावर एकमेकांनीं आक्रमण करूं नये व तसें झाल्यास अवश्य ती उपाययोजना केली पाहिजे व तशी उपाययोजना केल्यास ती समाजानें सहन केली पाहिजे.

येथपर्यंत ज्या संपाचा विचार केला ते संप सामान्यपणें समाजांतील खाजगी क्षेत्रांत वावरणाऱ्या, व्यवहार करणाऱ्या, रोजगार करणाऱ्या, व्यक्तींनीं केलेले संप होत. आधुनिक राज्यांत सरकारी नोकरांची संख्या सारखी वाढत आहे आणि आधुनिक राज्याचें स्वरूप जसजसें कल्याणस्वरूपी होत आहे (वेल्फेअर स्टेट) तसतसें राज्याचें कार्यक्षेत्रहि वाढत आहे. नागरिकाबद्दलची जबाबदारी आतां अधिकाधिक प्रमाणांत सरकारवर येऊन पडत आहे. जन्मासाठीं मातृगृहें, शिक्षणासाठीं शाळा, रोजगार मिळावा म्हणून तंत्रशिक्षण देणारीं केंद्रें, प्रत्यक्ष सरकारी कारभारामध्यें मिळणारा रोजगार, आजारीपणांत अगर बेकार परिस्थितींत सरकारी मदत, वृद्धपणीं निवृत्त झाल्यानंतर पेन्शन व अन्य मदत, किंबहुना मृत्यूनंतर दहन अगर दफनाची पण व्यवस्था, या सर्व गोष्टी आतां सरकारच्या कार्यक्षेत्रांत येतात. व्यक्तीचा जन्म वा मृत्यु हे वैयक्तिक असले, तरी त्याबाबतची जबाबदारी सरकारी व सामाजिक हा सिद्धान्त आतां मान्यता पावला आहे. आईबापांची जबाबदारी व जागा आतां

सरकार घेत आहे. या कारणानें प्रत्यक्ष सरकारी नोकरींत असणारे नागरिक सारखे वाढत आहेत. वाहतूक त्याचप्रमाणें तार व टपालखातें, शिक्षणखातें इत्यादि अनेक क्षेत्रांत होणारें कार्य सरकारी नियंत्रणाखालीं होतें आणि यामुळें सरकारी नोकरींत असणाऱ्या माणसांचें प्रमाण वाढत आहे. जेथें साम्यवादी व्यवस्था आहे तेथें अर्थात् खाजगी क्षेत्र जवळ जवळ नाहीं असेंच आहे. व्यापार, उद्योग, उत्पादन, विभाजन सर्व क्षेत्रांत साम्यवादी राज्यव्यवस्थेंत काम करणारे सर्व सरकारी नोकर होत. तेथें संपाचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. सरकार व कामगार अगर प्रजा यांच्यांत पूर्ण हितैक्य असतें. वर्गकलह तेथें नसतो आणि त्यामुळें संप सहसा होत नाहीं आणि कुठें त्याची चाहूल लागतांच तत्संबंधींचे विचार मुखावाटे बाहेर पडण्यापूर्वीच मुखाचा बंदोबस्त केला जातो. संपाचे जे कांहीं प्रचारक आहेत ते हुकूशाहीविरहित राज्यांतून दिसून येतात. लोकशाही राज्यांत सरकार व बिनसरकारी संस्था सर्वसामान्यपणें कार्य करीत असतात आणि लोकशाही यशस्वी व्हावयाची तर चर्चेला, विचार–स्वातंत्र्याला वाव असला पाहिजे. हुकूमशाहींत चर्चा नाहीं, विचार-स्वातंत्र्य मनाची मर्यादा ओलांडूं शकत नाहीं व जें कांहीं विचारस्वातंत्र्य असेल तें मातीच्या फळाप्रमाणें असतें. अस्तित्व आहेसें वाटतें पण अनुभव येत नाहीं. तात्पर्य, सरकारी नोकरांचा संप याचा अर्थ समाजाची सर्व रचना अद्यापि साम्यवादी स्वरूपाची झाली नाहीं आणि म्हणून विचार–स्वातंत्र्याला वाव आहे. आपल्या दुःखांना वाचा फोडतां येते. या परिस्थितींत सरकारी नोकरांच्या संपाचा विचार करावयाचा आहे. सरकारला सरकारी नोकरांच्या बाबतींत नियमन व नियंत्रण करण्याच्या दृष्टीनें अधिक अधिकार असले पाहिजेत हें कोणीहि मान्य करील आणि त्या अधिकारान्वयें सरकारी नोकरांच्या अनेक स्वातंत्र्यांवर खास बंधनें आलीं तर तींहि मान्य असलीं पाहिजेत. आरमार अगर सैन्य अगर विमानदल त्याचप्रमाणें पोलीस या खात्यांतील सरकारी नोकरांवर अधिक बंधनें असलीं पाहिजेत. याची इष्टता अमान्य करतां येणार नाहीं. जर या सरकारी नोकरांना सर्वसामान्य नागरिकांप्रमाणें स्वातंत्र्य दिलें आणि त्याला अनुसरून समित्या व संघ काढण्याची मुभा दिली व त्यांतून निघणारे संप करण्याचें स्वातंत्र्य दिलें तर राज्याचा आधार म्हणजे त्याची निर्णायक शक्ति तीच काढून घेतल्यासारखें होईल. पोलिसाचा हात आडवा पाहतांच मोटार थांबते, याचा अर्थ पोलिसाची आज्ञा ही राज्याची आज्ञा आहे व ती अमान्य केल्यास राज्याची सर्व शक्ति अमान्य करणाऱ्यावर रोखली जाईल. म्हणून पोलिसाला दिलेली आज्ञा पोलिसानें जशी निमूटपणें ऐकली पाहिजे, तशीच त्याची आज्ञा सामान्य नागरिकानें निमूटपणें ऐकली पाहिजे. पोलीसच जर आज्ञाधारक नसेल तर त्याच्या आज्ञा पण फारशा पाळल्या जाणार नाहींत. सबंध राज्याची व्यवस्था ‘अंततो गत्वा’ दंड योजनेवर अवलंबून आहे. प्रजेची मान्यता असावी, प्रजेची संमति असावी हें खरें व योग्य, तथापि कांहीं माणसें अशीं गणंग असतात कीं, अशीं टगीं

असतात कीं, तीं कुणालाहि मानीत नाहींत. विवेकाचें व त्यांचें वांकडें असतें. गुंडगिरी हा त्यांचा सहजधर्म असतो. अशांचें पारिपत्य व अशांना प्रायश्चित्त देण्याचें साधन म्हणजे राज्याची निर्णायक शक्ति व जी पोलीस, सैन्य, लष्कर इत्यादि द्वारा आविष्कृत होते. सरकारी नोकर व सरकारी नियंत्रणा हें राज्याचें साधन आहे आणि म्हणून तें पूर्णतया निर्विकल्प असलें पाहिजे. तलवारीनें हत्या करावयाची आहे त्या तलवारीला स्वयंप्रज्ञा नाहीं. शक्ति अगर सत्ता ही तटस्थ असली पाहिजे, व तिचा उपयोग, तिचा वापर करणारा जसा इच्छील तसा झाला पाहिजे. सैन्य, पोलीस हीं सर्व माणसें खरीं, तथापि त्यांना स्वयंप्रज्ञेचा अधिकार बहाल केल्यास राज्याचें तें शस्त्र निरुपयोगी होईल. म्हणून सरकारी नोकर – मुलकी व लष्करी – हे सरकारी नोकर आहेत, ते नागरिक आहेत हें जरी खरें असलें तरी अन्य नागरिकांप्रमाणें त्यांच्या कर्तव्यकर्मांत वाटेल तसें वागण्याची त्यांना परवानगी नाहीं. जर त्यांना संघस्वातंत्र्याखालीं संघ करण्याची व त्याचप्रमाणें संप करण्याची मोकळीक ठेवली, तर सरकारचें कार्य होणार नाहीं. किंबहुना सरकार असें कांहीं शिल्लक राहणार नाहीं. सरकारचें कार्य उर्दू कवीच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ' न कसीदेसे चलती है। न दोहेसे चलती है। कारे सल्तनत लोहेसे चलती है।' भावगीतें गाऊन अगर प्रेमाचे राग आलापून राज्यकार्य होत नसतें. राज्याचें कार्य तलवारीच्या जोरावर होत असतें. किंबहुना राज्य म्हणजे संघटित शक्ति, संघटित हिंसा होय. हें त्याचें अपरिहार्य स्वरूप असतें. म्हणून सरकारी नोकराबाबत नियमन व नियंत्रण दरोबस्त करणें हें राज्याचें आद्य कर्तव्य ठरतें. हे नियम व नियंत्रण करतांना संबंधित नोकरांशीं विचारविनिमय करावा हें म्हणणें ठीक. या नियमांना अखेरचें स्वरूप शेवटीं सरकारनें दिलें पाहिजे व त्याबाबत कोर्टाला ढवळाढवळ करण्याचा अधिकार नसावा हेंहि युक्त ठरतें. जे मुलकी नोकर आहेत, त्यांना संघ काढण्याचा हक्क बहाल करावा हेंहि ठीक, पण तो अधिकार आपल्या तक्रारी सांगण्यापुरता असावा. मजदूर-संघाप्रमाणें वाटेल त्या बाहेरच्या इसमाला सरकारी नोकरांच्या संघांत जागा नसावी. त्याचप्रमाणें राजकारणांत लुडबुड करणाऱ्या मध्यवर्ती मजूरसंघांत त्यांनीं जाऊं नये. आपल्या संस्था तेथें नोंदवूं नयेत हेंहि योग्य ठरतें. सरकारनें सरकारी नोकरांना वेतन, नेमणूक, निवृत्ति, बढती, बहाली, याबाबत समंजसपणें नव्हे औदार्यानें वागवलें पाहिजे हेंहि मान्य. संपाचें स्वातंत्र्य दिलें नसलें तरी संतुष्ट राहतील इतकी परिस्थिति त्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे. सरकार व त्याचे नोकर यांत उपस्थित होणारे तंटे विचारविनिमयानें व शांततेनें सोडविण्याची योजना असली पाहिजे.

वरील विवेचनांत सरकारी नोकरांचे दोन भाग कल्पिले आहेत. एक मुलकी (सिव्हिल एम्प्लॉईज्) व एक संरक्षक नोकरवर्ग. यांत लष्कर, आरमार, विमानदल त्याचप्रमाणें पोलीस यांचाहि समावेश होतो. जे मुलकी नोकर आहेत, त्यांना संघस्वातंत्र्य असलें पाहिजे. पण त्यांना संप करण्याचा अधिकार नसावा, असें प्रस्तुत लेखकाचें मत

आहे. सरकार व त्यांच्यांत उत्पन्न होणारे तंटे यांचें स्वरूप फक्त त्यांच्या प्रश्नाबाबत असलें पाहिजे. राजकीय कारणासाठीं त्यांनीं संप केल्यास अगर अन्य कुठल्याहि संपाशीं सहानुभूति दाखविणारा संप केल्यास सरकारनें त्याविरुद्ध तावडतोब कारवाई केली पाहिजे. त्याबाबत नरमपणा दाखविणें म्हणजे समाजासंबंधीं स्वतःचें कर्तव्यकर्म सरकारनें न करण्यासारखें आहे. मुलकी नोकर संतुष्ट राहिले पाहिजेत हें मान्य. तथापि त्यांच्या वेतनादि बाबतींत ते मागतील तें मान्य करावें असें नाहीं. समाजामध्यें त्या त्या प्रकारचीं कामें करणारी जी मंडळी आहेत त्याच्या मानानें सरकारी नोकरींत पगाराचें मान असलें पाहिजे. याचा :अर्थ नोकरीच्या दृष्टीनें सरकारी नोकरींतील प्राप्ति, खाजगी नोकरींत टायपिस्टला रु. १०० पगार असल्यास सरकारी नोकरींतील टायपिस्टला त्याहून अधिक असल्यास चालेल. पण त्याचा अर्थ दुपटीनें असावा, असा होत नाहीं. सरकारी नोकरींत शाश्वती अधिक, रजा व अन्य सोयी अधिक या लक्षांत घेतां वेतनश्रेणी ठरली पाहिजे. सरकारी नोकरी करणाऱ्यांचा खास सवलतीदारांचा वर्ग होतां कामा नये. भारतांत राजे, महाराजे नामशेष झाले. जहागिरदार, इनामदार नेस्तनाबूद केले गेले. पण सरकारी नोकरांचा असा एक मिरासदार वर्ग होऊं पाहात आहे ( प्रिव्हिलेज क्लास ) हें लोकशाहीच्या दृष्टीनें, सम समाजाच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. सरकारी नोकरींतील प्राप्ति व खाजगी नोकरींतील प्राप्ति यांत सापेक्षता असली पाहिजे. 'जेणें विठ्ठलमात्रा घ्यावी तेणें पथ्यें सांभाळावीं' म्हणून सामान्य नागरिकाला उपलब्ध होणारीं सर्व स्वातंत्र्यें सरकारी नोकरानें अपेक्षूं नयेत ही विचारसरणी सरकारच्या मुलकी नोकरीबाबत अमान्य होऊं नये. पोलीसखात्यांतील नोकरीबाबत तर अधिक नियमन व नियंत्रण त्या खात्यांतील नोकरांवर असलें पाहिजे. पोलिसांना संपावर जाण्याचा अधिकार नसावा, पण संघ करून आपलीं गाऱ्हाणीं सरकारपुढें मांडण्याचा हक्कहि मर्यादित स्वरूपाचा असावा. सरकारनें ठराविक वेळीं पोलीस-नोकरींत असलेल्या लोकांचीं गाऱ्हाणीं ऐकावीं. त्यांच्या ज्या संस्था असतील त्यांमध्यें नोकरींत नसलेल्या कोणाहि माणसाला स्थान नसावें. त्यांच्या संस्थांनीं आपल्या नोकरीविषयक बाबींपलीकडे कोठल्याहि गोष्टींचा विचार करूं नये. योग्य मागण्या मान्य झाल्या नाहींत तर काय करावें? संप बंद, गाऱ्हाणीं ऐकलीं जात नाहींत, या स्थितींत त्यांनीं काय करावें, असा प्रश्न विचारला जातो. त्याला उत्तर हेंच कीं, पुनः पुनः विनंत्या करीत जाव्या आणि कुठलेंहि लोकशाही सरकार त्यांच्या योग्य मागण्या फार काळ नाकारूं शकत नाहीं. कुठल्याहि परिस्थितींत पोलीसखात्यांतील नोकरांच्या संस्थांनीं संप करणें, सीधी कारवाई करणें हें क्षम्य ठरतां कामा नये व तसें कांहीं होत असल्यास त्याकडे सरकारनें दुर्लक्ष करतां कामा नये. दुर्लक्ष करणें याचा अर्थ कर्तव्यविन्मुख होणें हा आहे. संरक्षक नोकरींतील म्हणजे लष्कर, विमानदल अगर आरमार यांतील सरकारी नोकरांना संघ करण्याचासुद्धां हक्क असतां कामा नये. क्रीडा, मनोरंजन इत्यादि गोष्टींसाठीं सांस्कृतिक

कार्याच्या संबंधांत थोडीशी सवलत देण्यास हरकत नाहीं. संरक्षक खात्यांतून जे बिनलढाऊ नोकर असतात, त्यांना सरकारच्या मुलकी नोकरांइतके अधिकार दिल्यास हरकत नाहीं. तथापि त्याहि बाबतींत दक्षता घेतली पाहिजे. आधुनिक युद्धांत प्रत्यक्ष रणांगणावर जे सैनिक लढत असतात, त्यांच्याइतकेंच महत्त्व दारूगोळा तयार करणाऱ्या सरकारी कारखान्यांतील मजुरांना असतें. किंबहुना सैन्याला पुरवठा करणारीं, दारूगोळा अथवा अन्य वस्तूंचा पुरवठा करणारीं जीं जीं खातीं आहेत तीं तीं सर्व प्रत्यक्ष लढणाऱ्या फलटणीइतकीच महत्त्वाचीं आहेत. म्हणून तेथेंहि जें संघस्वातंत्र्य दिलें जाईल तें मर्यादित असलें पाहिजे व त्या बाबतींत सरकारनें दक्ष राहिलें पाहिजे. सरकारी नोकरी – मग ती मुलकी असो अगर संरक्षणखात्यांतील असो – म्हणजे जबाबदारीची नोकरी आहे आणि म्हणून या क्षेत्रांत सामान्य जनांना जें स्वातंत्र्य असतें – संघ व भाषण यांच्या बाबतींत – तितकें असणार नाहीं. कारण कामाचें स्वरूपच तसें असतें. सरकारच्या मुलकी नोकरांना अधिक स्वातंत्र्य असावें हें म्हणणें केवळ सिद्धान्ताच्या दृष्टीनें बरोबर आहे. तथापि मुलकी नोकरींतसुद्धां कांहीं खात्यांमध्यें याबाबत अधिक नियंत्रण असलें पाहिजे. अधिक दक्षता घेतली गेली पाहिजे. पोस्ट, तार, रेल्वे व विमान-वाहतूक यांचा संबंध देशाच्या शांततेशीं व संरक्षणाशीं येतो आणि या खात्यांतील व इतक्याच महत्त्वाच्या अन्य खात्यांतील मुलकी नोकरांना सामान्य नागरिकाइतकें स्वातंत्र्य दिल्यास त्याचा दुरुपयोग होणार नाहीं असें नाहीं. १९४६ मध्यें पोस्ट व तार-खात्याचा संप झाला, त्यावेळीं स्वराज्य आलें नव्हतें आणि त्यामुळें अनेक राजकीय नेत्यांनीं त्यांना पाठिंबा दिला. १९५७ सालीं तशीच संपाची परिस्थिति आली होती व त्या बाबतींत जी परिस्थिति लोकांपुढें आली त्यांत दिलेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग केल्याचें आढळून आलें. १९६० मध्यें स्टेट बँकेच्या नोकरांनीं केलेला संप अकारण होता व स्वातंत्र्याचा दुरुपयोग तेथें स्पष्ट दिसून येत होता. आणि आजहि केन्द्रीय सरकारच्या मुलकी खात्यांतील नोकरांनीं संपाचा डाव मांडला आहे, आणि हा प्रकार संघस्वातंत्र्याच्या दुरुपयोगाचा आहे. मूठभर सरकारी नोकरांनीं कोट्यवधि नागरिकांच्या जीवनांत गोंधळ उत्पन्न करणें व राष्ट्राला अडचणींत टाकणें आणि कदाचित् त्यांतून अराजक उत्पन्न होण्याची परिस्थिति उत्पन्न करणें हें राष्ट्रविरोधी कृत्य आहे. जें वेतन त्यांना आज मिळत आहे तें खाजगी क्षेत्रांतील मिळणाऱ्या वेतनाशीं तुलना केल्यास अधिक आहे. आज संपवाल्यांचें कृत्य म्हणजे जें न्यायाला पटत नाहीं, व्यव-हाराला सोडून आहे, तें छातीवर पिस्तूल रोखून मागण्यासारखें आहे. सरकारी नोकरींतील मुलकी नोकर स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणार नाहींत असें वारंवार सांगितलें जातें, पण अनुभव मात्र निदान भारतांत निराळा आहे. सरकारी कार्य जनसेवेच्या दृष्टीनें होत असतें. कुणा व्यक्तीच्या नफ्यासाठीं नाहीं. म्हणून खाजगी क्षेत्रांत नोकरांना राबवलें जातें व त्यांच्या श्रमाचा गैरफायदा घेतला जातो तसें कांहीं सरकारी

नोकरींत नसतें. शिवाय आजकालच्या आधुनिक राज्यांतून सरकार व सरकारी नोकर यांच्यांत वाद उपस्थित झाला असतां त्यांचा निर्णय करण्यासाठीं यंत्रणा असते. नोकर स्वातंत्र्याचा दुरुपयोग करतात, सरकार कधींच करत नाहीं, असा दावा कोणी करणार नाहीं. सरकार चुकत असेल पण सरकारला दुरुस्त करण्याचे मार्ग निराळे. संपाचें हत्यार पाजळून अगर सरकारी काम कसें तरी अळम्टळम् ( गो स्लो ) करीत करणें हा तो मार्ग नव्हे.

सरकारी नोकरींत नागरिक शिरला म्हणून त्याचे नागरिकहक्क नाहींसे होतात असें नाहीं. सामान्यपणें जे नागरिकहक्क खाजगी नोकरींत असलेल्या सर्व लोकांना असतात, तेच सरकारी नोकरांना असावे हें म्हणणें अयोग्य नाहीं, तर्कशुद्ध आहे. तथापि सरकारी नोकरी म्हणजे सामान्य नोकरी नव्हे. त्यांत मान व पैसे मिळत असले तरी सेवेची व त्यागाची भावना तेथें आहे आणि म्हणून कांहीं स्वातंत्र्याचा त्याग सरकारी नोकरींत शिरतांना करावा लागतो. सरकारी नोकरींत असतांना निवडणुकीला उभें राहतां येत नाहीं. ही व्यवस्था बहुतेक राज्यांच्या संविधानांत आहे, कांहीं राज्यांतून निवडणुकीस उभें राहाण्याची परवानगी आहे व अयशस्वी झाल्यास त्यांना पुन्हां नोकरींत घेण्यांत येतें. आपल्याला निवडणुकीस उभें राहण्याची परवानगी मिळावी अशी साहजिक अनेक सरकारी नोकरांची इच्छा असते. पण अशी परवानगी देणें हें इष्ट नाहीं. ही परवानगी नाकारण्यांत वर वर स्वातंत्र्यावर आक्रमण केलें आहे असें दिसतें. तथापि सरकारी नोकरांना राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेण्यास त्याचप्रमाणें निवडणुकीस उभें राहण्यास मोकळीक दिली तर कटकटी निर्माण होतील. मंत्री निवडून आलेला असेल आणि त्याचा चिटणीस निवडून आला असेल आणि या दोघांनीं सभागृहांत एकमेकांविरुद्ध दृष्टिकोन मांडले तर त्याचे काय परिणाम होतील, याचा शांतपणें विचार केला पाहिजे. शासनांतील एक अधिकारी म्हणून अनुशासनाचें बंधन, शिस्तीचें बंधन, त्याच्यावर असणार. तें त्यानें पाळलें तर जनतेचें खरें प्रतिनिधित्व त्याला करतां येणार नाहीं. आणि न पाळलें तर निष्ठावंत शासक तो राहू शकत नाहीं. गुप्ततेची त्याची शपथ त्यानें पाळली तर सत्य सांगितलें नाहीं असा त्याच्यावर आक्षेप येईल आणि पाळली नाहीं तर सरकारचें शासन सुरक्षितपणें व कार्यक्षमतेनें चालणार नाहीं. निवडणुकींत पडल्यावर तो आपल्या जागेवर परत येणार आणि मग जें विधिमंडळद्वारा करावयाचें तें तो सरळ अंमलबजावणीच्या द्वारा करण्याकडे त्याचें मन वळेल. तात्पर्य, सरकारी नोकरींत प्रवेश केल्यानंतर त्याच्या राजकीय महत्त्वाकांक्षा त्यानें सोडल्या पाहिजेत. ज्या ठिकाणीं शासनांत जास्तींत जास्त कार्यक्षमता असणें इष्ट आहे त्या ठिकाणीं काम करणाऱ्या नोकरानें राजकारणांत भाग घेतां कामा नये. त्यांनीं राजकारणापासून अक्षरशः अलिप्त राहिलें पाहिजे. राजकीय जीवन व त्यांतील प्रतिष्ठा याची आशा सोडली पाहिजे. आणि जर एखाद्या शासकाला अगर सरकारी नोकराला राजकीय क्षेत्रांत प्रवेश करावयाचा असेल, प्रतिष्ठा मिळवावयाची

असेल, तर त्यानें नोकरी सोडली पाहिजे व त्याचा निवडणुकींत पराभव झाला तर त्याला पुन्हां नोकरींत ठेवतां कामा नये. म्हणून सरकारी नोकरांनीं त्यागाची भूमिका घेतली पाहिजे व सरकारी नोकरींतील प्रतिष्ठा व त्यांतील सेवाभाव यासाठीं राजकीय महत्त्वाकांक्षेला तिलांजलि दिली पाहिजे. तसें न झालें तर शासक वर्गावर, त्याच्या निःपक्षपातीपणावर, लोकांचा विश्वास राहाणार नाहीं. राजकारणांत पडणारे पुरुष समाजाच्या दृष्टीनें तेवढे विश्वासार्ह नसतात, तर शासकावर जनतेचा थोडाअधिक विश्वास असतो. पण शासक प्रत्यक्ष राजकारणांत येऊं लागले तर हा विश्वास नाहींसा होईल. सरकारी नोकरांना राजकारणांत भाग घेऊं न देणें हें स्वातंत्र्याच्या कल्पनेविरुद्ध असलें तरी देशांतील राजकीय स्थैर्याच्या दृष्टीनें लोकांना यथायोग्य न्याय मिळण्याच्या दृष्टीनें तें आवश्यक आहे. मुलकी नोकरांबाबत ही मर्यादा असली पाहिजे. पण लष्करांतील, विमानदलांतील आणि आरमारांतील त्याचप्रमाणें संरक्षणखात्यांतील मुलकी नोकरांवर, त्यांच्या स्वातंत्र्यावर ही मर्यादा न घातल्यास त्यांची निष्ठा मग विविध पक्षांना राहील, राज्याला राहात नाहीं. शासनामध्यें शासनकार्यांत काम करणारी मंडळी ही तटस्थ असली पाहिजे व जर शासन हें तटस्थ नसेल व सरकारी नोकर हे राजकारणांत भाग घेऊं लागले तर राज्यांत शाश्वती राहाणार नाहीं–सुव्यवस्था राहाणार नाहीं आणि जो एक पद्धतशीरपणा सुराज्यासाठीं आवश्यक असतो तोहि राहाणार नाहीं, मग सुराज्याची व्यवस्था हीन झाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

सरकारी नोकरींत असणाऱ्यांनीं पूर्णपणें तटस्थ असलें पाहिजे, याचा अर्थ स्वतः निवडणुकीसाठीं तर त्यांनीं उभें राहातां कामा नये; पण सक्रिय राजकारणांतसुद्धां त्यांनीं भाग घेऊं नये. जर शासनांतील लोक पक्षनिष्ठ झाले तर राज्यकर्त्यांना त्यांच्यावर विश्वास टाकून काम करणें शक्य होणार नाहीं व याचा परिणाम असा होईल कीं, जो पक्ष अधिकारावर येईल तो पक्ष आपल्या पक्षांतील मंडळी अधिकारावर नेमील आणि असें झालें म्हणजे केवळ मंत्रिमंडळ बदलेल असें नव्हे, तर सरकारी नोकरी करणारेहि निवडणुकीच्या निकालाप्रमाणें राहातील अगर बदलतील. म्हणून सरकारी नोकरांना राजकारणांत भाग घेण्यास प्रतिबंध करणें हें कार्यक्षम प्रामाणिक कारभाराच्या दृष्टीनें इष्ट आहे. आणि एवढी मर्यादा या नोकरांच्या स्वातंत्र्यावर घालणें देशांतील स्वातंत्र्याच्या दृष्टीनें इष्ट आहे. सरकारी नोकरी स्वीकारण्यासाठीं ही अशी मर्यादा स्पष्ट एकशर्त असली पाहिजे. आणि विशेषतः पोलीस, लष्कर, आरमार, विमानदल यांत काम करणाऱ्या सैनिकांना व शिपायांना हें बंधन जास्तींत जास्त कडक असलें पाहिजे. मुलकी नोकरींतसुद्धां बंधन असलें पाहिजे. पण तेथें एखाद वेळेला ढिलाई क्षम्य ठरेल. पण सैनिकांच्या, शिपायांच्याबाबत कुठल्याहि प्रकारची ढिलाई झाल्यास ती अनर्थावह ठरते. सैन्यांत व शिपायांत पक्षीय राजकारण शिरलें म्हणजे त्यांची तटस्थता व राज्यविषयक निष्ठा मलिन व भ्रष्ट होते. आणि मग सैन्य व शिपाई

हे जर राजकीय दृष्ट्या तटस्थ राहिले नाहींत तर राज्य टिकत नाहीं. सैन्यांत बेदिली झाली अगर राजकारण सैन्यांत खेळूं लागलें म्हणजे मग सैन्य राजकारण खेळूं लागतें आणि तसें झालें म्हणजे लोकशाही राज्य संपतें. हुकूमशाही, लष्करशाहीच्या जोरावर उदयाला येते. सबंध राज्यव्यवस्था जरी कोलमडली नाहीं तरी मोठ्या प्रमाणांत राज्यांत अनास्था उत्पन्न होते, सैनिक व शिपाई हे तटस्थ न राहिल्यास प्रत्येक पक्ष त्यांना बगलेंत मारण्याचा प्रयत्न करतो. इतकेंच नव्हे, तर भांडवलवालावर्गहि त्यांना आपल्या जाळ्यांत ओढण्याचा प्रयत्न करतो. सैन्यामध्यें राजकारण शिरलें म्हणजे काय घडतें हें पाकिस्तानच्या उदाहरणावरून दिसून येण्यासारखें आहे. नुकत्याच ज्या घटना तुर्कस्तानांत घडल्या, त्यांवरूनहि तेंच दिसून येतें. कर्नल नासेरचा उदय त्याच गोष्टीची साक्ष देतो. राजकीय जीवन विशेषतः लोकशाही जीवन हें सैन्यानें राजकारणांत लक्ष दिलें म्हणजे अशक्य होतें. सैन्यांतील लोक, पोलीसव्यवस्थेंतील लोक यांना राजकारणांत भाग घेऊं द्यावा असें म्हणणारे लोक इतिहासाचा अनुभव असूनसुद्धां स्वस्थ बसत नाहींत. एकदां लष्करानें राजकारणांत भाग घेण्याचें सुरू केलें म्हणजे राज्य करणारे मग लष्कराच्या इशाऱ्याप्रमाणें वागतात आणि मग लष्करी अंमल फार दिवस टाळला जात नाहीं आणि लष्करी अंमल एकदां प्रभावी होऊं लागला अगर प्रत्यक्ष सुरू झाला म्हणजे राजकीयस्वातंत्र्य मग शिल्लक राहात नाहीं.

सैनिक व शिपाई यांना राजकारणांत तटस्थ राहण्याची व त्यांत भाग न घेण्याची सक्ति समाजाच्या व स्वातंत्र्याच्या दृष्टीनें कां आवश्यक आहे याचें विवेचन वर केलें आहे. लष्कर व पोलीस यांच्याइतकेंच महत्त्व राष्ट्रांतील कांहीं उद्योगधंद्यांना असतें आणि हे उद्योगधंदे कटीचे उद्योगधंदे मानले जातात आणि ज्याप्रमाणें चौपटांत कटीचें महत्त्व असतें, त्याचप्रमाणें देशाच्या संरक्षणव्यवस्थेंत व देशाच्या सामाजिक व्यवस्थेंत या धंद्यांचें तितकेंच महत्त्व असतें. आधुनिक जगांत युद्धाचें तंत्र संपूर्णपणें बदललें आहे. एक शिपाई युद्धक्षेत्रांत कार्यक्षम राहण्यासाठीं राष्ट्रांत चारशें माणसांना खपावें लागतें. अन्नाचा पुरवठा करणारा शेतकरी, गणवेष तयार करणाऱ्या गिरण्या व शिंपी, दारूगोळा करणारे कारखानदार, त्याच्या प्रकृतीची काळजी घेणारी डॉक्टरीव्यवस्था, त्याला तळावरून युद्धक्षेत्रावर नेणारी वाहतूकव्यवस्था, या सर्व ठिकाणीं भरपूर माणसें काम करीत असलीं व ते ते उद्योग व व्यापार व्यवस्थितपणें चालले असतील तरच युद्धक्षेत्रांतील सैनिक कार्यक्षम ठरतो. म्हणून युद्धाच्या दृष्टीनें हे सर्व उद्योगधंदे अत्यंत महत्त्वाचे बनतात, आणि या उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या लोकांना जर अमर्याद संपस्वातंत्र्याचा, विचारस्वातंत्र्याचा, संप करण्याचा अधिकार दिला, तर राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें तें योग्य होणार नाहीं, अशी विचारसरणी चूक म्हणतां येणार नाहीं. प्रत्यक्ष लष्कर व शिपाई यांच्याइतकें महत्त्व नसलें तरी युद्धकाळांत तरी निदान या क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांच्यावर राज्याचें नियंत्रण असलें पाहिजे हें स्पष्ट आहे.

युद्धाच्या दृष्टीनें या सर्व उद्योगधंद्यांना जरुरीचे उद्योगधंदे (इसेन्शियल इंडस्ट्रीज) असें ठरविण्यांत येतें व तेंहि योग्य आहे. पण प्रश्न अधिक महत्त्वाचा हा आहे कीं, शांततेच्या काळीं युद्धस्थिति नसतांना समाजजीवनाला आवश्यक असणारे उद्योगधंदे जरुरीचे उद्योगधंदे म्हणून जाहीर करण्याचा अधिकार सरकारला असावा कीं नाहीं ? जरुरीचे उद्योगधंदे अगर सार्वजनिक सेवाक्षेत्र (पब्लिक युटिलिटी कन्सर्न) असें सरकारनें जाहीर केलें म्हणजे त्या क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येते, संप करण्याचा अधिकार मर्यादित केला जातो आणि संप बेकायदेशीर ठरविल्यानंतर तो चालू ठेवणें गुन्हा ठरतो. विजेचा पुरवठा, वाहतूक व्यवस्था, स्थानिक स्वराज्यांतील स्वास्थ्य या सगळ्या क्षेत्रांत अव्यवस्था झाल्यास, संप झाल्यास सामाजिक जीवन व्यस्त होऊन जातें. गॅसचा पुरवठा, विजेचा पुरवठा, ही नित्याची गरज आहे. त्यांत अडथळा आल्यास समाजांत हाहाःकार उडतो. रेल्वे बंद झाली तर केवळ ऐषारामाच्या गोष्टींचा पुरवठा बंद होतो असें नाहीं, तर नित्याच्या व मौलिक गरजांचा पुरवठासुद्धां बंद होतो. गोदीवरील कामगारांनीं संप केला म्हणजे धान्याचीं पोतीं उतरलीं जात नाहींत, बंदरामध्यें बोटींची गर्दी होते. अन्य वाहतुकीला अडथळा उत्पन्न होतो. तात्पर्य, जे उद्योग व ज्या सार्वजनिक सेवा (पब्लिक सर्व्हिस) या दैनंदिन जीवनाला आवश्यक आहेत, त्यांत अडथळा होणें म्हणजे व्यक्तीचें व समाजाचें जीवन परास्त करणें आहे, जीवनाच्या मौलिक व्यवस्थेवर हल्ला करण्यासारखें आहे. जास्तींत जास्त या क्षेत्रांत काम करणाऱ्यांना सवलती मिळाव्या हें मान्य, तथापि त्यांचें समाधान न झाल्यास त्यांना संप करून समाज-जीवनाच्या नाड्या आंखडण्यास मुभा ठेवली तर समाज समाज म्हणून राहाणार नाहीं. जर हे उद्योगधंदे व या सार्वजनिक सेवा खाजगी मालकीच्या असतील तर तेथेंहि नियंत्रण पाहिजे व सरकारी मालकीचे असतील तर तेथेंहि नियंत्रण पाहिजे. खाजगी क्षेत्रांत गडबड उडाली तर सरकारनें हस्तक्षेप केला पाहिजे. आणि मालक व मजूर यांच्यामधील तंट्याचा निवाडा करण्यासाठीं लवाद नेमला पाहिजे. केवळ मालक व मजूर यांनीं आपापसांत मिटवावें एवढें म्हणून चालणार नाहीं. स्वखुषीनें करार करावे, तडजोड करावी (व्हॉलंटरी आर्बिट्रेशन) हें म्हणणें योग्य, तथापि ती न झाल्यास कुस्ती चीतपट व्हावी असें म्हणून, अगर खाजगी क्षेत्रांत हस्तक्षेप करण्याचें कारण नाहीं असें म्हणून फक्त शांतता व सुव्यवस्था एवढेंच कार्य सरकारनें करावें ही विचारसरणी आधुनिक जगांत, आधुनिक राज्यांत चालणार नाहीं; म्हणून योग्य तो क्षण येतांच सरकारनें सक्तीचा लवाद त्या कामीं लादला पाहिजे व त्यानें दिलेला निकाल उभय पक्षांवर बंधनकारक ठरवून त्याप्रमाणें सरकारनें अंमलबजावणी करवून घेतली पाहिजे. जो उद्योग अगर जी सार्वजनिक सेवा समाजाच्या जीवनाला आवश्यक गरजेइतकी आहे, त्या बाबतींत सरकारनें ढिलाई करणें क्षम्य नसतें. पुष्कळ वेळां साधारण

उद्योगधंदेसुद्धां परिस्थितीमुळें समाजाच्या जीवनाला, आवश्यक गरजेच्या स्वरूपाचे ठरतात आणि म्हणून तशा परिस्थितींत, तशा असामान्य परिस्थितींत साधारणपणें कमी महत्त्वाचा असलेला उद्योगधंदा अगर सार्वजनिक सोय आवश्यक गरजेची म्हणून जाहीर करण्याचा अधिकार सरकारला असला पाहिजे. आणि अशा सर्व परिस्थितींत म्हणजे संकटकालीन परिस्थितींत (इमर्जेन्सी) समाजाच्या हिताच्या दृष्टीनें सरकारनें कांहीं केलें तर तें क्षम्य ठरतें व सरकारचें तें कृत्य जनतेच्या स्वातंत्र्यावर आक्रमण आहे असा आरोप करणें चुकीचें आहे. जर उद्योगधंदे जरुरीच्या स्वरूपाचे पण सरकारी क्षेत्रांत असतील, तर जी मर्यादा मुलकी क्षेत्रांत काम करणाऱ्या नोकरांवर लादली जाते तितकी मर्यादा येथेंहि लादली गेली पाहिजे. जर आवश्यक गरजेचे उद्योगधंदे खाजगी लोकांच्या हातांत असतील तर तेथेंहि आपसांत तंटे मिटविण्याची संधी द्यावी व तिचा उपयोग होत नाहीं असें आढळून आल्यास सक्तीचा लवाद लादणें ही मर्यादा सरकारनें घातली पाहिजे. मालक तंटा तोडण्यास तयार नाहीं, अथवा मालक तयार आहे तर मजदूर तयार नाहीं; किंवा दोन्हीहि हट्टास पेटले तर त्या परिस्थितींतून होणारें जनतेचें नुकसान व त्रास याला सरकारनें केवळ साक्षीदार म्हणून पाहात राहावयाचें काय? सक्तीच्या लवादाला खरोखरच विरोध असण्याचें कारण नाहीं. आणि विरोध जरी असला तरी त्याचा योग्य परिस्थितींत अवलंब करणें हें जनतेच्या संरक्षणाचा पहारेकरी म्हणून सरकारचें कर्तव्य ठरतें. संपाला सरसहा बंदी करावी असें कोणीहि म्हणत नाहीं. संप होऊं नये, तो होतो आहे असें दिसतांच तो मिटण्यासाठीं प्रयत्न करावा, हेंहि ठीक; पण तो झाल्यानंतर सरकारनें 'शांतिब्रह्म' बनणें हेंहि अयोग्य. सरकारनें मध्यें पडलेंच पाहिजे व जनतेवर येणारी आपत्ति टाळलीच पाहिजे. संप हें अखेरचें हत्यार आहे. सुरुवातीचा तो पवित्रा नाहीं, हें मान्य करूनहि शेवटचें म्हणून जरी हें शस्त्र उगारलें असलें तरी समाजहितार्थ त्याचा बंदोबस्त करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे.

संप झाल्यानंतर सर्व सरकारी यंत्रणा कामीं आणण्यापेक्षां तो होण्याच्या आधींच सरकारनें कांहीं केलें पाहिजे व करावें हें म्हणणें सयुक्तिक आहे. हा प्रश्न व्यापक स्वरूपाचा आहे व त्याचा विचार करतांना समाजाची आर्थिक व्यवस्था व राजकीय संघटन या दोन्हींचा विचार केला पाहिजे. देशांत राजकीय संघटनेच्या दृष्टीनें लोकशाही राज्यव्यवस्था आहे या स्थितींत सरकारला प्रत्येक गोष्ट लोकशाही मार्गानें करावी लागते. धोरण आंखण्यापूर्वी जनमत काय आहे हें समजून घ्यावें लागतें. तज्ज्ञांच्या कमिट्या नेमाव्या लागतात. मग बिल तयार करावें लागतें व पार्लमेंटरी कामकाजाच्या रीतीप्रमाणें कायदेमंडळांत तें पास करून घ्यावें लागतें. पार्लमेंटमध्यें विविध हितसंबंधाचे गट असतात. त्यांचे प्रतिनिधि आपापली बाजू मांडत असतात. कायदेमंडळाबाहेरहि संबंधित हितसंबंधी चळवळ करीत असतात, लोकमतावर प्रभाव पाडीत असतात.

एवढ्या खटपटींतून तें बिल पास व्हावयाचें असतें व पास झाल्यावर अंमलांत आणतांना येणाऱ्या अडचणी पुष्कळ वेळां अनपेक्षितपणें उभ्या राहतात. एवढ्यानेंच भागतें असें नाहीं. पुष्कळ वेळां कोर्टाकडे प्रकरणें जातात व पास झालेला कायदा घटनात्मक दृष्टीनें योग्य का अयोग्य याची चर्चा कोर्टामार्फत होते. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, लोकशाहीनें कार्य व्हावयाचें म्हणजे त्यांत दिरंगाई आलीच. एखाद्या 'हिटलर'नें हुकूम काढला व त्याप्रमाणें एकदम अंमलबजावणी झाली असें लोकशाहींत नसतें. कायदा झाला, अंमलबजावणी सुरू झाली, तरीसुद्धां निवडणूक आली व त्यांत विद्यमान सत्ताधीश पक्ष पराभूत झाला तर मग सगळी उतरंड उतरावी लागते. पुन्हां पाटी पुसून लिहावें तसें करावें लागतें. गेल्या पंधरा वर्षांचा इंग्लंडमधील इतिहास असें दाखवितो कीं, राष्ट्रीयीकरणाचें धोरण (नॅशलायझेशन) मजूर पक्षानें गादीवर येतांच सुरू केलें व त्या पक्षाचा ५२ मध्यें पराभव झाल्यानंतर सर्व चक्र फिरलें. राष्ट्राच्या मालकीचे झालेले धंदे पुन्हां खाजगी मालकीचे झाले. भारतांतहि राष्ट्रीयीकरणाचें धोरण एके काळीं स्पष्टपणें स्वीकारलें होतें. तथापि एकंदर भारतांतील आर्थिक धोरण हें लवचिक आहे, व असावें असें भारतांतील सत्ताधीश पुढारी सांगत आले आहेत व त्यामुळें हा लवचिकपणा संबंधित हितसंबंधांची ओढाताण करण्याला प्रेरणा देतो आणि भारतांत लोकशाही असल्यानें कुणालाहि टीका करण्याला वाव आहे व त्याचा परिणाम असा होत आहे कीं, निश्चित धोरण कोणतें आहे, निश्चित कर-व्यवस्था कोणती आहे हें कळत नाहीं. गेल्या बारा वर्षांत प्रत्यक्ष कर कमी होत आले आहेत व अप्रत्यक्ष कर वाढत आहेत. नफ्यावरील कर, उत्पन्नावरील कर अगर प्रत्यक्ष कर यांच्याऐवजीं आतां अप्रत्यक्ष कर बसविण्याकडे प्रवृत्ति दिसून येत आहे आणि त्याचा परिणाम सर्वसामान्य जनतेला करांचा भार अधिक सोसावा लागत आहे. म्हणून उद्योगक्षेत्रांत अर्थात् खाजगी उद्योगक्षेत्रांत कामगारांना न्याय मिळावा अशी कांहीं व्यवस्था करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न व्हावेत हें इष्ट; पण हे प्रयत्न यशस्वी होण्याच्या मार्गांत देशाचें राजकीय संघटन किती अडचणी उत्पन्न करतें हें गेल्या दहा वर्षांचा भारतांतील इतिहास साक्ष देत आहे. कामगारांना अधिक मिळावें व ते संतुष्ट राहावेत याचा अर्थ भांडवलवाल्यांना कमी मिळावयाचें अथवा गिऱ्हाइकांना अधिक द्यावयास लावावयाचें हा स्पष्ट आहे. मजूर संघटित, मालक संघटित, संघटित नाहीं फक्त उपभोक्ते गिऱ्हाईक (कन्झुमर्स). त्याला कोणी वाली नसतो. त्यांचें असें संघटन होऊं शकत नाहीं आणि म्हणून त्यांच्या हिताचें संरक्षण सरकारनें करावयाचें असतें. नफ्यावर मर्यादा ठेवावी असें म्हणतांच आसेतुहिमाचल आरडाओरड झाली. मजुरांनीं जास्त मागणी करतांच त्यांच्या वांट्याला जनतेची सहानुभूति आली, पण गिऱ्हाइकाला जास्त द्यावें लागतें याच्याकडे सरकार फारसें लक्ष देत नाहीं. या स्थितींत उद्योगधंद्यांना अर्थात् सरकारी व खाजगी या दोन्ही क्षेत्रांत कामगार संतुष्ट राहावे अशी परिस्थिति

उत्पन्न करणें कठीण आहे. तथापि उद्योगधंद्यांतील नफ्यावर मर्यादा घातली पाहिजे. त्याच्याशिवाय कामगारांना योग्य वेतन व गिन्हाइकाला योग्य किंमत अशी परिस्थिति उत्पन्न होणार नाहीं. नफ्यावर नियंत्रण केलें म्हणजे कामगारांच्या संपाच्या हक्कावर नियंत्रण केल्यास सरकार न्यायानें वागत आहे असें लोकांना पटतें. नफ्यावर नियंत्रण घातल्यास अगर कामगारांना संपावर जाण्यास प्रतिबंध केल्यास कोणाच्याहि स्वातंत्र्या-वर व संघस्वातंत्र्यावर कांहीं आक्रमण होतें असें मानण्याचें कारण नाहीं. तंटे आपसांत तोडण्याची यंत्रणा असली पाहिजे व त्यामध्यें विचारविनिमयावर भर असला पाहिजे. कांहीं वर्तनक्रमाबाबत संहिता पाहिजे ( कोड ऑफ कॉन्डक्ट ). आणि आपसांत तंटे न मिटल्यास, आपसांत तडजोड न झाल्यास सर्व प्रकरण कोर्टाकडे सोंपविण्याचा अधिकार सरकारला असला पाहिजे. योग्य परिस्थितींत सक्तीचा लवाद नेमणें हा खरोखर वर ठरतो. या सर्व गोष्टी करूनहि कामगारवर्गाचें समाधान न झाल्यास त्यांना संप करण्याचा अधिकार असला पाहिजे, हें मग क्रमप्राप्त होतें. तथापि त्यांनीं संप करावाच असा याचा अर्थ नाहीं आणि तो केल्यास सरकारनें तो बेकायदेशीर ठरवावा असाहि त्याचा अर्थ नाहीं. त्या परिस्थितींत समाजाच्या हिताच्या दृष्टीनें जें योग्य असेल तें सरकारनें केलें पाहिजे. आजहि मजूरविषयक तंट्याबाबत विविध कायदे आहेत, विविध यंत्रणा आहेत. बरेचसे तंटे समाधानकारक या यंत्रणेमार्फत सुटले जातात. तथापि संपाचें वातावरण गेलीं बारा वर्षें या देशांत कायम आहे. आणि त्याचें मुख्य कारण हें कीं, मोठ्या प्रमाणांत उद्योगधंदे खाजगी क्षेत्रांत आहेत आणि तेथील हितसंबंधियांना लोकशाही व्यवस्था आपल्या संकुचित व स्वार्थी हितसंबंधांचें संरक्षण करण्याचें एक साधन वाटतें व त्याप्रमाणे कायदेमंडळाचा व अन्य साधनांचा ते उपयोग करीत असतात. जर औद्योगिक क्षेत्रांत तंटे नको असतील, तर औद्योगिक क्षेत्र सरकारी मालकीचें झालें पाहिजे, अगर सरकारी नियंत्रणाखालीं आलें पाहिजे. सरकारी मालकी अगर नियंत्रण म्हणजे गुलामगिरी अशी विचारसरणी भारतांत जोरजोरानें मांडण्यांत येत आहे. भांडवलवाल्यांना व धनिकांना प्रतिबंध नसणें याचा अर्थ समाजामध्यें स्वातंत्र्य आहे असा करण्यांत येत आहे. समाजामध्यें कुठेंहि उत्पादन, विभाजन अगर उपभोग यांवर निर्बंध असतां कामा नये, अशी परिस्थिति म्हणजे खरें स्वातंत्र्य. या व्यवस्थेंत गरिबांना व पददलितांना लौकर मरण्याचें स्वातंत्र्य मिळतें, पण या स्वातंत्र्यवाद्यांच्या सृष्टींत गरिबांना कोणी विचारीत नाहीं. प्रत्येकजण स्वतंत्र असला पाहिजे, याचा अर्थ थोड्यांनीं अनेकांवर सत्ता चालवावी हा होतो आणि दारिद्र्यांत राहावें लागलें, दुःख सोसावें लागलें, तर त्यांत समाजाचा कांहीं दोष नाहीं, असा दैववाद सांगण्यांत येत आहे. खऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ असा नाहीं. देशांतील सर्वांना स्वातंत्र्य लाभावें यासाठीं स्वातंत्र्यावर कांहीं निर्बंध असणें आवश्यक ठरतें. आणि म्हणून समाजांतील धनिकवर्गावर, भांडवलवाल्यांवर, भांडवलशाही उत्पादनावर

नियंत्रण असणें जरूर आहे आणि प्रभावी नियंत्रण व्हावयाचें तर सर्व औद्योगिक क्षेत्रांत तें नियंत्रण असलें पाहिजे. याचाच अर्थ औद्योगिक तंटे नको असतील, तर भांडवलशाही अर्थव्यवस्था आमूलाग्र बदलली पाहिजे.

सरकार हें समाजाच्या हितासाठीं आहे व समाज म्हणजे मूठभर धनिकांचा अगर वरच्या लोकांचा नाहीं हें मान्य केल्यानंतर समाजामधील संपत्तीच्या निर्मितीवर संपूर्णपणें नियंत्रण घालणें अपरिहार्य ठरतें. समाजाला ज्या गोष्टींची जरुरी असते, त्या गोष्टींचें उत्पादन, त्या गोष्टींचें न्याय्य विभाजन झालें पाहिजे व ही व्यवस्था केवळ मागणी व पुरवठा या तत्त्वानें होत नाहीं. ज्याला भाव येईल, ज्याला मागणी असेल, त्याचा पुरवठा होईल, हा जुन्या अर्थशास्त्राचा सिद्धान्त नव्या परिस्थितींत गैरलागू ठरतो. करारस्वातंत्र्याच्या नांवाखालीं जो पगार मालक देईल तो घ्यावा व त्यांत सरकारनें ढवळाढवळ करूं नये हें आतां चालणार नाहीं. राज्यानें आतां प्रत्येकाला शिक्षण, रोजगार देण्याची ग्वाही दिली आहे, या संदर्भांत कुणालाहि नोकरीवर ठेवावें व कुणालाहि काढून टाकावें हें स्वातंत्र्य मालकवर्गास दिल्यास सरकारला आपलें कर्तव्य पार पाडतां येणार नाहीं. नोकरींतून काढून टाकल्यास प्रत्येकाला नोकरी मिळणें शक्य नसतें. किंबहुना वाटेल त्या माणसाला वाटेल तें काम करतां येत नाहीं. इंजिनियर एका क्षणांत वकील होऊं शकत नाहीं. तसेंच वकील तावडतोब कथालेखक होऊं शकत नाहीं. सिनेमा नटी नोकरी गेल्यावर लगेच नर्स होऊं शकत नाहीं. म्हणून ज्याची जी योग्यता असेल त्याप्रमाणें त्याला उत्पादनक्षेत्रांत, रोजगाराच्या क्षेत्रांत स्थान मिळालें पाहिजे व नोकरीची शाश्वती पाहिजे. याच्यांतच त्याला खरें स्वातंत्र्य लाभत असतें. वाटेल तिकडे नोकरी करण्याची मोकळीक आहे, पण ती मिळत नाहीं, या परिस्थितींत त्याला, तूं स्वतंत्र आहेस हें सांगणें म्हणजे त्याचा अपमान करण्यासारखें आहे. म्हणून समाजांत कुणाचीहि गुणसंपदा वायां जाणार नाहीं. कुणालाहि बेकार रहावें लागणार नाहीं. गायकाला ड्रीलमास्तरचें काम व मास्तरला ट्रामकंडक्टरचें काम अशा तऱ्हेची अव्यवस्था राहणार नाहीं यासाठीं राज्यसत्तेनें सबंध आर्थिक जीवनांत नियोजन केलें पाहिजे. त्या नियोजनाच्या कामीं ठिकठिकाणीं नियंत्रणें उभारावीं लागतील. पण हीं नियंत्रणें राष्ट्रांतील व्यक्तिमात्राचें स्वातंत्र्य अर्थपूर्ण होण्यासाठीं आवश्यक आहेत. समाजाचें हित हें प्रथम, व्यक्तीची गरज अगर व्यक्तीचें स्वातंत्र्य हें दुय्यम, हा विचार प्रभावी असला पाहिजे. नियोजनपूर्ण अर्थव्यवस्था म्हणजे नागरिकस्वातंत्र्याचें अपहरण हें चूक आहे. किंबहुना वर सांगितल्याप्रमाणें स्वातंत्र्य अर्थपूर्ण करण्यासाठीं समाजांत नियोजनपूर्ण अर्थव्यवस्था असली पाहिजे. नियोजनपूर्ण अर्थव्यवस्थेंत खाजगी क्षेत्रालाहि वाव आहे, पण नियोजनाच्या तत्त्वप्रणालीला धरून व त्याच्या चौकटींत त्याचप्रमाणें मजूरसंघ अगर अन्य व्यवसायांचे संघ यांनाहि वाव आहे. त्यांना जें स्वातंत्र्य आहे त्या स्वातंत्र्यावर नियोजनव्यवस्थेनें मर्यादा बसत नाहीं. उलट, नियोजनव्यवस्थेमध्यें समाजांतील

सर्व हितसंबंधियांना विचारलें जातें. नियोजनाच्या धोरणांत व अंमलबजावणींत सर्व हितसंबंधांना स्थान असतें. मजूरसंघ किंबहुना सर्व संघटित संघांना आपल्याला जें काय वाटतें आहे हें सांगण्याची मोकळीक असते. एवढेंच नव्हे, तर नियोजित अर्थव्यवस्थेंत त्यांच्या म्हणण्याला अधिक मान मिळतो. सामान्यपणें मजूरसंघ मजूरविषयक बाबतींत विचारविनिमय करतील, अगर आपलें कार्य मर्यादित करतील, तर अधिक चांगलें. एक तर त्यांच्या त्या क्षेत्रांत ते तज्ज्ञ असतात, त्यांच्या क्षेत्रांतील अडचणी योग्यप्रकारें ते जाणतात आणि म्हणून त्यांच्या म्हणण्याला नियोजनव्यवस्थेंत अधिक मान मिळतो. सामान्यपणें मजूरसंघांनीं आपल्या उद्योगाबाबत, अन्य व्यवसायसंघांनीं आपापल्या व्यवसायाबाबत बोलावें, ठराव करावेत, कार्य करावें हें ठीक. संघस्वातंत्र्य दिलें म्हणून वाटेल त्या संघानें वाटेल त्या विषयावर ठराव करावे हें बरोबर नाहीं. उद्यां नाट्यसंघानें आंतरराष्ट्रीय नीतीवर ठराव करावा हें हास्यास्पद दिसतें. साहित्यसंघानें लष्करी बाबीवर ठराव करावे हेंहि वेडेपणाचें होय. त्याचप्रमाणें मजूरसंघानेंहि चालू राजकीय प्रश्नांत ज्याचा मजूरविषयक गोष्टीशीं संबंध नाहीं अशाबाबत ठराव करणें योग्य नव्हे. ज्यावेळीं खरोखर राष्ट्रासमोर अगदीं जिव्हाळ्याचा प्रश्न असेल त्यावेळीं राष्ट्रांतील विविध क्षेत्रांतील संघटित संघांनीं मतप्रदर्शन केलें तर तें क्षम्य ठरेल. पण उठल्यासुटल्या आपल्या उद्देशांशीं प्रस्तुत नसलेल्या बाबीबाबत ठराव करणें, मतप्रदर्शन करणें अगर कांहीं तरी सक्रिय गोष्टी करणें हें योग्य ठरणार नाहीं. आणि त्या दृष्टीनें राज्यानें कांहीं मर्यादा घातल्यास तें अगदीं अयोग्य होणार नाहीं. अशा मर्यादांनीं त्यांच्या स्वातंत्र्यावर कांहीं अनिष्ट परिणाम होतो असें मानण्याचें कारण नाहीं.

संघाचे उद्देश लक्षांत घेतां, कोणतें कार्य प्रस्तुत आहे कीं नाहीं हें ठरविणें सोपें नाहीं. तथापि संघ संघटित झाला आहे, कायद्याप्रमाणें तो नोंदला आहे, त्याचे हिशेब व्यवस्थित ठेवले आहेत, एवढ्यामुळें वाटेल तो ठराव करण्याचा अगर वाटेल त्या गोष्टींत पडण्याचा अधिकार प्राप्त होतो असें नाहीं. किंचित् दुरान्वय करून एखाद्या गोष्टीबाबत कांहीं केल्यास तें क्षम्य मानलें जावें. मजूरसंघाचा उद्देश मजुरांची स्थिति चांगली राहावी या हेतूनें कार्य करणें हा आहे. जर उद्योगधंद्यांची स्थिति चांगली राहील तर मजुरांची स्थिति चांगली राहील. उद्योगधंद्याची स्थिति देशाच्या आर्थिक धोरणाशीं जोडलेली असते आणि देशाचें आर्थिक धोरण आजकालच्या जगांत देशाच्या परराष्ट्रीय धोरणाशीं निगडित असतें व त्या दृष्टीनें देशाच्या परराष्ट्रीय नीतीवर एखाद वेळेस मजूरसंघानें ठराव केल्यास त्याला अगदींच अप्रस्तुत मानतां येणार नाहीं. तथापि एखाद्या नाट्यसंघानें परराष्ट्रनीतीवर अभिप्राय व्यक्त केला, तर तर तो अयोग्य मानला पाहिजे. उद्यां जर एखाद्या मजूरसंघानें प्रतिमापूजा ही वाईट आहे म्हणून सर्व देवस्थानें सरकारनें ताब्यांत घ्यावीं असा ठराव केला, तर मजूरसंघाच्या उद्देशाला तो सोडून आहे, अप्रस्तुत आहे व वेडेपणाचा आहे. देशांत नानातऱ्हेचे क्लब असतात व

त्यांचा उद्देश मनोरंजनाचा असतो. राजकारणांत विविध मतें असणारेसुद्धां मनोरंजनासाठीं, क्रीडेसाठीं एकत्र येतात. तेथें चालू राजकारणाच्या प्रश्नांबाबत कांहीं ठराव करणें हें अयोग्य असतें. किंबहुना क्लबच्या दृष्टीनेंसुद्धां हानिकारक असतें. तात्पर्य, संघाचे जे उद्देश असतील त्यांच्यापलीकडे अगर त्याला विसंगत असें त्या संघानें करणें हा त्याला घटनेनें दिलेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग आहे. म्हणून तसा दुरुपयोग न होण्यासाठीं सरकारनें दक्षता घेतली पाहिजे. सरकार ज्या मर्यादा घालील त्या कधींच कायमच्या असूं शकत नाहींत. परिस्थितीप्रमाणें त्यांत बदल करावा लागतो. आजचा स्वेच्छाचार उद्यांचा सदाचार बनतो. आजचें अप्रस्तुत उद्यांला प्रस्तुत ठरतें. समाज हा अखंड वाहणाऱ्या प्रवाहाप्रमाणें असतो. समाजजीवन हें निर्जीव नसतें. क्षणाक्षणाला समाजाला अनुभव येत असतो व अनुभवाला धरून नवे संकेत निर्माण होत असतात. नवे वर्तनक्रम सुस्थापित होत असतात. म्हणून संघस्वातंत्र्यावर मर्यादा घालतांना सरकारनें व्यापक दृष्टि ठेवली पाहिजे, प्रागतिक दृष्टि ठेवली पाहिजे, हें उघड आहे. समाजाच्या आत्यंतिक हितासाठीं मर्यादा घातल्या पाहिजेत व समाजाच्या आत्यंतिक हितासाठीं त्यांत बदल केला पाहिजे हेंहि तितकेंच खरें. संविधानानें दिलेल्या स्वातंत्र्यांत फाजील हस्तक्षेप नसावा, तसेंच ढिलाई पण नसावी.

वरील विवेचनांत सामान्यपणें संघस्वातंत्र्याच्या मर्यादा काय असाव्या, संघस्वातंत्र्याला काय वाव असावा, याचा विचार केला आहे. त्याजबरोबर कुठल्या परिस्थितींत सरकारनें हस्तक्षेप करावा याचेंहि विवरण केलें आहे. तथापि असा प्रश्न उपस्थित होतो कीं, संघाच्या अंतर्गत बाबींत सरकारनें हस्तक्षेप करणें योग्य आहे का व तो करणें झाल्यास कोणत्या परिस्थितींत तो करावा ? सामान्यपणें प्रत्येक संघाला त्याच्या अंतर्गत बाबतींत पूर्ण स्वतंत्रता असावी. शंकराचार्यांचा मठ हाहि एक संघटित संस्था आहे. तिच्या व्यवस्थेंत सरकारनें हस्तक्षेप करणें योग्य होईल का ? त्याचप्रमाणें अन्य धार्मिक संस्था व देवस्थानें यांच्यांत सरकारनें हस्तक्षेप करणें योग्य होईल का ? देवस्थानाची व्यवस्था परंपरागत कल्पनेप्रमाणें चालू असते. देवाचें दर्शन कुणाला कोठपासून व्हावें, तें हरिजनांना खुलें असावें कीं नाहीं, देवतेची पूजा कोणी करावी, देवस्थानच्या उत्पन्नाची व्यवस्था कोणी करावी, असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. एक काळ असा होता कीं, सरकार त्याबाबत हस्तक्षेप करीत नसे व जें परंपरागत व्यवस्थेनें संघटन असेल तेंच प्रभावी मानलें जाई. पण ब्रिटिशांच्या अंमलानंतर एक नवीन जागृति झाली व अनेक देवस्थानांच्या व्यवस्थेंत सरकारनें हस्तक्षेप केला आहे. किंबहुना हा हस्तक्षेप जनतेच्या इच्छेनें प्रेरित होऊन सरकारनें केला आहे. अनेक ठिकाणीं देवस्थानविषयक कायदे झाले आहेत. व्यवस्थापक कमिट्या नेमल्या आहेत. त्याबाबत नेमणूक व निवडणूक यांची व्यवस्था कायद्यानुसार होत आहे. सामाजिक सुधारणेचें युग उजाडल्यापासून जातिविषयक व्यवस्था पूर्वीइतकी

कडक राहिली नाहीं. सामाजिक समतेचा आवाज सदसद्विवेकबुद्धीला आव्हान करता झाला व आज सार्वजनिक मंदिरें सर्वांना खुलीं झालीं आहेत. सार्वजनिक मंदिर नसलें तर सरकार त्यांत हस्तक्षेप करणार नाहीं हें उघड आहे. तथापि खाजगी मालकीबाबत जे कायदे सरकार करील ते खाजगी देवळांना लागू पडतील व पडतात हेंहि तितकेंच खरें आहे. सार्वजनिक देवस्थानावर सरकारी नियंत्रण आलें याचा अर्थ संबंधित संघटनावर अगर संघावर स्वातंत्र्याच्या दृष्टीनें कमीपणा आला असें नाहीं, त्याचप्रमाणें सार्वजनिक संघांतून अगर ज्या सार्वजनिक संस्थांना सरकारी मदत मिळत आहे त्या संस्थांतून सर्वांना सर्रास प्रवेश असला पाहिजे. त्याचप्रमाणें त्या संघांतून शिक्षणाची व्यवस्था असल्यास तें सर्वांसाठीं खुलें असलें पाहिजे. त्याचबरोबर कुठल्याहि विविक्षित धर्माचें अगर सांप्रदायाचें शिक्षण तेथें देण्याची परवानगी नसते आणि असा निर्बंध जें सरकार घालीत असतें त्यामुळें धार्मिकस्वातंत्र्यावर अगर संघस्वातंत्र्यावर आक्रमण झालें असें होत नाहीं. वरील बाबीमध्यें सरकार हस्तक्षेप करतें त्याचा संबंध समाजाच्या जीवनाशीं येतो म्हणून सरकारचा हस्तक्षेप क्षम्य ठरतो. परंतु ज्या बाबी सार्वजनिक स्वरूपाच्या नाहींत, केवळ त्या संघाच्या अगर संस्थेच्या अंतर्गत व्यवस्थेबाबत असतील तर सरकारनें हस्तक्षेप करणें बरोबर नाहीं. टेनिस क्लबमध्यें कोणाला खेळायला बोल-वावें ही अंतर्गत बाब आहे, त्यामध्यें सरकारनें पडणें बरोबर नाहीं. अनेक शिक्षणसंस्था असतात, त्यांच्या अंतर्गत व्यवस्थेबाबत अनेक तंटे उत्पन्न होतात, पण त्या ठिकाणीं हस्तक्षेप करणें बरोबर नाहीं. कोणी सभासदानें अंतर्गत व्यवस्थेबद्दल तक्रार केल्यास कोर्ट निवाडा देईल. पण त्यास सरकारचा हस्तक्षेप म्हणतां येणार नाहीं. गाडींत बसल्यानंतर तिकीट घ्यावें लागेल, पण गाडींत बसलें नाहीं तरी तिकीट घ्यावें लागेल असें कधीं होत नाहीं. कोर्टाकडे तंटा न गेल्यास अगर सरकारकडे तक्रार न गेल्यास अंतर्गत बाबतींत सरकारनें हस्तक्षेप न करणें हें मुख्य सूत्र असलें पाहिजे. सामान्यपणें आधुनिक राज्यांतून काम करणाऱ्या सर्व संस्था कायद्याप्रमाणें नोंदलेल्या असतात. त्यांच्या कामकाजासंबंधीं संस्थेच्या घटनेंतच नियम दिलेले असतात. अगर जेथें ते दिलेले नसतील तेथें सर्वसामान्य कामकाजाचे जे नियम असतात, ते लागू पडतात. संस्था नोंदलेल्या असल्याकारणानें त्यांचे उद्देश उघड उघड तरी राज्याविरुद्ध नसतात. राज्य उलथून पाडावयाचें, समाजरचनेंत उलथापालथ करावयाची, असा उद्देश धरून संस्था अस्तित्वांत येत नाहींत असें नाहीं. पण असल्या संस्था त्या उद्देशासाठीं आहेत असें म्हणत नाहींत, अगर अशा उद्देशानें त्या नोंदविल्याहि जात नाहींत, अशा संस्था न नोंदलेल्या व सामान्यपणें गुप्तपणें काम करणाऱ्या असतात. माणसें एकत्र आलीं आहेत, त्यांनीं संघटन केलें आहे व त्या संस्थेचे उद्देश समाजविरोधी आहेत, राज्यविरोधी आहेत, हें कळल्यानंतर केवळ संघस्वातंत्र्य आहे म्हणून सरकारनें त्याबाबत स्वस्थ बसावें का ? पांच दरोडेखोर हॉटेलमध्यें जमले आहेत व त्यांना पोलीस पकडावयास

गेले असतां आमच्या संघस्वातंत्र्यावर हल्ला होत आहे अशी जर ओरड त्यांनीं केली तर तें कसें योग्य ठरेल? उद्देश तरी अवैध असले पाहिजेत अगर उद्देश वैध आहेत पण साधण्याचा मार्ग उघड उघड बेकायदेशीर अगर अवैध आहे. या दोन्ही परिस्थितींत समाजाच्या संरक्षणासाठीं हस्तक्षेप करण्याचा सरकारला संपूर्ण अधिकार आहे. सभा चालली आहे व मध्येंच कोणी साप साप म्हणून ओरडण्यास सुरुवात केली व त्याचा परिणाम सभेंत गोंधळ व प्रसंगीं मारहाण झाली व त्या ओरडणाऱ्या व्यक्तीस, तूं कां ओरडलास, असें विचारलें व त्यानें जर आपण आपल्या भाषणस्वातंत्र्याचा हक्क बजावला असें म्हटलें, तर कोणी त्याला क्षमा करील का? म्हणून अनेक प्रसंगीं गैरकायदा कृत्य होण्यापूर्वीं प्रतिबंधक प्रतिबंध करणें योग्य ठरतें. दरोडा घालण्यापूर्वी हॉटेलमध्यें बसलेल्या त्या दरोडे-खोरांच्या समूहाला पकडणें हें न्यायाचें आहे, योग्य आहे. व त्यांत व्यक्तिगत स्वातंत्र्यावर, संघस्वातंत्र्यावर हल्ला होत नाहीं. तीच गोष्ट प्रतिबंधक अगर प्रतिबंध करण्यांत दिसून येते. व्यक्तीनें प्रत्यक्ष कांहीं कृति करावी व मग त्याला पकडावें हें म्हणणें वर वर ठीक दिसतें, तथापि ताबडतोब पकडलें नाहीं तर व्यक्तीनें योजलेलें कृत्य निश्चित होणार ही खात्री झाल्यानंतर अटक झाली पाहिजे. हातांत पलिता घेऊन दारूच्या कोठाराकडे मनुष्य वेगानें जात आहे, त्याला आग लावण्याचें कृत्य केल्यानंतर पकडावयाचें असें म्हटलें, तर तें कृत्य मूर्खपणाचें ठरेल. चूड पेटवतांच अगर पेटवत असतांना त्याला पकडलें पाहिजे. सभेंत दंगल होणार हें निश्चित व ज्यांचीं भाषणें भडकपणें होतात हा अनुभव असतांना, यांना बोलूं देणें व नंतर पकडणें, याचा अर्थ घोडा तबेल्यांतून निघून गेल्यानंतर तबेल्याचें दार बंद करण्यासारखें आहे. योग्य परिस्थितींत प्रतिबंधक स्वरूपाची कारवाई सरकारनें केली पाहिजे व तसें करण्यांत सरकार योग्य तेंच करीत असतें. म्हणून राज्य उलथून पाडणाऱ्या संस्थांना, समाजांत हिंसात्मक पद्धतीनें बदल घडवून आणणाऱ्या संस्थांना, अगर व्यक्तींना पाय रोंवण्याची संधी देणें याचा अर्थ अराजकतेला सुपारी देण्यासारखें आहे. व्यक्तीप्रमाणें राज्यालाहि संरक्षणाचा हक्क आहे व संरक्षणाच्या दृष्टीनें वार केल्यानंतर ढाल पुढें करण्याइतकाच हक्क, जरूर पडल्यास आपण होऊन आगाऊ वार करण्याचा पण हक्क आहे. भाषण व संघस्वातंत्र्याच्या नांवाखालीं राज्य बुडविण्याचें अगर समाजाच्या ठिकऱ्या करण्याचें स्वातंत्र्य नाहीं व म्हणून अशा प्रयत्नांना वेळींच खरडून काढणें हें योग्य ठरतें. वाढता शत्रु व वाढता रोग यांची उपेक्षा करणारे विनाशाप्रत जातात, हा अनुभव सर्वत्र प्रसिद्ध आहे.

राज्याच्या अस्तित्वाविरुद्ध अगर त्याच्या विद्यमानस्वरूपाविरुद्ध उठणाऱ्या व्यक्ति अगर संस्था यांना पायबंद घालणें याची इष्टता कोणीहि नाकारणार नाहीं. आज जगामध्यें अनेक देशांतून विशिष्ट वृत्तीच्या अगर विशिष्ट ध्येय असलेल्या संस्थांना अगर पक्षांना बंदी आहे. पक्ष जर उघडपणें काम करीत असेल, विद्यमान कायद्याप्रमाणें नोंदला गेला असेल, तर त्याबाबत कारवाई करण्यास अडचण पडत नाहीं. ज्या क्षणीं

त्या संस्थांचीं कृत्यें आक्षेपार्ह होत आहेत असें दिसून येईल, त्याक्षणीं विद्यमान सरकार त्यांचा बंदोबस्त करील. त्या संस्थांचें कायदेशीर अस्तित्व निकालीं लावील. तथापि अनेक देशांतून भूमिगत काम करणाऱ्या, हिंसेच्या मार्गानें समाजांत क्रान्ति घडवून आणणाऱ्या संस्था वावरत आहेत, त्यांच्या कार्याला अगर त्यांनीं चालू केलेल्या चळवळींना पायबंद घालणें सोपें नाहीं. सामान्यपणें जोंपर्यंत संस्थेचे उद्देश वरवर तरी सरळ व वैध आहेत तोंपर्यंत सरकारनें त्यांच्यावर निर्बंध घालूं नयेत, हें म्हणणें रास्त आहे. उद्देश कागदावर एक आहे, पण प्रत्यक्ष कार्य निराळें करीत आहेत याचा प्रत्यक्ष पुरावा हातीं असेल, तर सरकारनें कारवाई करणें योग्य ठरतें. पण प्रत्यक्ष पुरावा नाहीं, साधारणपणें संशय वाटत आहे व कदाचित् तसें घडूनहि येईल असेंहि मानण्यास जागा आहे असें जरी असलें तरी तेवढ्यावरून कारवाई करणें अगर खटले भरणें योग्य नाहीं. खटले अगर कारवाई ही केवळ अमुक एक मत प्रतिपादलें जातें यावर आधारलेली नसावी. विचारस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य याचा अर्थ कुठल्याहि विचारसरणीवर अगर मतावर प्रतिबंध नाहीं त्या मतासाठीं, त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठीं कोणत्या मार्गाचा प्रचार केला जात आहे हें महत्त्वाचें आहे. जर अवैध मार्गाचा, हिंसामय मार्गाचा प्रचार केला जात असेल, तर सरकारनें त्याबाबत कारवाई करणें योग्य ठरेल. देशामध्यें कुठेंहि सैन्य अगर पोलीस नसावे, कोर्टें नसावीं आणि सर्वत्र एकमेकांच्या सौजन्यावर व सद्भावनेवर विसंबून समाज चालावा असें कोणी प्रतिपादल्यास त्याला बंदी नसावी. या प्रतिपादण्यानें समाजामध्यें अराजकता माजेल हें संभवनीय असलें, तरी प्रतिपादणाऱ्याचा उद्देश सर्वोदय समाज स्थापन करण्याचा आहे असें दिसून आल्यास त्याविरुद्ध सरकारनें कांहीं करणें, याचा अर्थ मनाला बंधनांत टाकल्यासारखा आहे. पण अशी समाजव्यवस्था आणण्यासाठीं हिंसात्मक मार्ग स्वीकारावे असा जर प्रचार सुरू झाला तर तो बंद केला पाहिजे. आर्थिक व्यवस्थेबाबत ज्याच्याजवळ अधिक आहे तें त्यानें द्यावें, दान म्हणजे समविभाग; म्हणजे सारखी अगर समाधानकारक वांटणी असें कोणीं प्रतिपादन केल्यास तें गैर नाहीं. प्रस्थापित अर्थव्यवस्थेच्याविरुद्ध हा विचार आहे म्हणून तो नेस्तनाबूद केला पाहिजे, उखडून टाकला पाहिजे, हें म्हणणें योग्य नाहीं. संपत्तीची वांटणी समान व्हावी, न्यायाची व्हावी व त्यासाठीं ज्याच्याजवळ जरुरीपेक्षां अधिक आहे त्याच्याकडून तें काढून घेतलें पाहिजे हें तत्त्वज्ञान मांडणें गैर नाहीं. दानानें तसें घडून न आल्यास कररूपानें अधिक तें घ्यावें असें म्हणण्यांत अवैध कांहीं नाहीं. पण दानाऐवजीं दमपट्टीनें काढून घ्यावें, कर व कायद्याऐवजीं लाठीकाठीनें तें करावें असें म्हणणें निःसंशय गैर आहे. तात्पर्य, जोंपर्यंत कुठल्याहि नवविचाराचा, क्रान्तिकारक विचाराचा, विद्यमान व प्रस्थापित राज्यव्यवस्थेच्या अगर अर्थव्यवस्थेच्या विरोधी असलेला विचार मतपरिवर्तनाच्या संदर्भात मांडला जात आहे, तोंपर्यंत सरकारनें कांहीं करूं नये. पण तो विचार अगर ती तत्त्वप्रणाली विचाराच्या अवस्थेंतून, उच्चाराच्या अवस्थेंतून, प्रत्यक्ष क्रियेला जेव्हां जन्म

देते त्यावेळीं ती क्रिया विद्यमान हितसंबंधांच्या मुळावर येते आणि जर त्या क्रियेमध्यें प्रचलित व्यवस्थेला हाणून पाडण्याचा, उपटून टाकण्याचा निश्चय दिसून आला, तर सरकारनें त्या क्रियेविरुद्ध हत्यार उपसणें हें योग्य ठरतें. पुष्कळ वेळां असें दिसून येतें कीं, अनेक संस्था दुआंगी राजकारण करीत असतात. वर वर कायद्याच्या चौकटींत राहून चळवळीचे धागेदोरे नीट करून संघटनेचें जाळें व्यापक करीत असतात, आणि गुप्तपणें अगर भूमिगत पद्धतीनें एक निराळें असें संघटन तयार करीत असतात व प्राप्त घडीची वाट पाहात असतात. वर वर समाजाची सेवा करण्यासाठीं स्वयंसेवक तयार करीत असतात, लष्करी पद्धतीचें शिक्षण देत असतात. तथापि ते समाजसेवेसाठीं हें सर्व करीत आहेत असें दाखवीत असले, तरी त्या संघटनेचा उपयोग विशिष्ट क्षण येतांच राज्यतंत्र अगर त्याच्या कटीच्या जागा यांचा कबजा घेण्यासाठीं ती तयारी असते. मग अशा तऱ्हेची स्वयंसेवक—रचना तयार होत असतांना सरकारनें तें मुकाट्यानें पाहावें कीं आगाऊ त्यांचा बंदोबस्त करावा आणि आगाऊ बंदोबस्त केल्यास सरकारजवळ उपलब्ध पुरावा पुष्कळ वेळां खरा असूनसुद्धां कोर्टापुढें तो पुरेसा मानला जात नाहीं, या स्थितींत सरकारनें काय करावें? जर प्रत्येक बाबतींत पुराव्याच्या कायद्याप्रमाणें प्रत्येक गोष्ट शाबीत केली पाहिजे असा आग्रह धरल्यास कठीण काम होईल. पक्षाच्या ध्येयांत हिंसेचा वास येत नाहीं, पक्षाच्या धोरणांत, त्याच्या कार्यपद्धतींत, हिंसेचा निर्देश दिसून येत नाहीं, किंबहुना तोंडानें अहिंसेचा, वैध मार्गाचा घोष करीत आहेत, पण त्याच्या हृदयामध्यें हिंसेचें हलाहल आहे याची सामान्यपणें खात्री झाल्यानंतर सरकारनें त्या कामीं प्रतिबंधक उपाययोजना करणें हें इष्ट ठरतें. एक गोष्ट मात्र निश्चित असली पाहिजे कीं, संबंधित पक्षाचा उद्देश, पक्षाचा इतिहास लक्षांत घेतां, राज्य उलथून पाडण्याचा आहे, समाजांत क्रांति करण्याचा आहे, हें स्पष्ट झाल्यानंतर गप्प बसणें हें गैरमुत्सद्दीपणाचें असतें. केवळ एखादा कायदा मानूं नका, एखादा कर देऊं नका, मोर्चा व मिरवणुकीविरुद्ध बंदी केल्यास ती मोडा, असें सांगण्यानें त्या पक्षाविरुद्ध कांहीं कारवाई करणें हें योग्य नाहीं. तथापि पक्ष कायदेभंग करा म्हणून सांगत आहे, करबंदी करा म्हणून सांगत आहे व हें सर्व सांगणें विशिष्ट दृष्टीनें होत आहे, एका विशिष्ट कार्यक्रमाचा तो भाग आहे, असें जर आढळून आलें तर सरकारनें गप्प बसावें हें योग्य ठरत नाहीं. केवळ एखादा पक्ष सरकारविरुद्ध आहे, सरकारच्या धोरणाविरुद्ध टीका करीत आहे, संघटितपणें प्रचार करीत आहे, म्हणून त्या पक्षाविरुद्ध कारवाई करणें चुकीचें आहे व तसें कांहीं केल्यास कायद्याचा व सत्तेचा दुरुपयोग आहे हें स्पष्ट आहे. लोकशाहीमध्यें विरोधी पक्षाला टीका करण्याला, सरकार-विरुद्ध प्रचार करण्याला पूर्ण अधिकार असतो व असला पाहिजे. सरकार नालायक आहे, मंत्री भ्रष्ट आहेत, मंत्र्यांचें धोरण राष्ट्रविरोधी आहे, ही व असली टीका राज्यद्रोह होऊं शकत नाहीं किंवा असली टीका करणारा पक्ष राष्ट्रविरोधी पक्ष असें म्हणतां येणार नाहीं.

जें आपल्याला आवडत नाहीं तें वाईट व अनिष्ट हें गणित व्यक्तीच्या जीवनांत जसें चुकीचें त्याचप्रमाणें राष्ट्राच्या जीवनांतहि चुकीचें आहे. कधींहि चूक करणारी व्यक्ति आढळून येत नाहीं, तसेंच कधींहि चूक न करणारा पक्ष अजून जन्माला आला नाहीं. म्हणून पक्षाच्या स्वातंत्र्यावर अगर व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर ते अप्रिय बोलतात, लिहितात व वागतात एवढ्या कारणासाठीं सरकारनें कारवाई करणें हें अयोग्य व गैरजबाबदारीचें ठरतें. सत्ताधीशांना त्यांच्या विचारसरणीविरुद्ध कोणी बोलल्यास तें राष्ट्राविरुद्ध आहे असें त्यांना वाटतें. जे त्यांच्याशीं जुळवून घेत नाहींत ते राष्ट्राच्या विरुद्ध आहेत असें ते समजतात. सत्तेला असें वाटतें कीं, तिचें सर्वांनीं ऐकलें पाहिजे व तिला कोणी विरोध केल्यास तिची अप्रतिष्ठा होते असा तिचा समज असतो. लोकशाहीव्यवस्थेमध्यें सत्ता जबाबदार असली पाहिजे. वारंवार तिची उलटतपासणी झाली पाहिजे. तिची स्वतःची खात्री तिनें विरोधकांना पटवून दिली पाहिजे. तात्पर्य, लोकशाहीव्यवस्थेंत विचार-प्रदर्शनाच्या दृष्टीनें अगर संघटित काम करणाऱ्या संघस्वातंत्र्याच्या दृष्टीनें सरकारनें कमींत कमी हस्तक्षेप केला पाहिजे आणि जो कांहीं हस्तक्षेप होईल तो समाजाच्या आत्यंतिक हिताच्या दृष्टीनें आवश्यक होता याची खात्री जनतेला करून देतां आली पाहिजे. विद्यमान कायद्याविरुद्ध टीकाकारांनीं व पक्षांनीं कांहीं केलें असेल तर तेवढेंच कारण धरून व्यक्तीच्या व संघाच्या स्वातंत्र्याला घोपटून काढणें योग्य ठरणार नाहीं. तर संबंधित टीका वा संबंधित कृत्य समाजाला, राष्ट्राला धोक्यांत आणणारें, अराजकतेस आणणारें असलें पाहिजे.

लोकांचा एकत्र येण्याचा व स्वखुषीनें संघटित होण्याचा हक्क अगर स्वातंत्र्य हें मौलिक आहे. लोकांनीं एकत्र यावें, आपल्या विचारांना बोलून दाखवावें, आपल्या मनांत आलेल्या कल्पनांबाबत विचारविनिमय करावा, आपल्या विचारसरणीला पाठिंबा मिळावा यासाठीं प्रचार करावा. आपल्या दुःखाकडे लक्ष वेधण्यासाठीं जरूर तो आवाज काढावा व जरूर तें करावें, ही सामान्य स्थिति राष्ट्रांत असली पाहिजे. पण त्याचबरोबर ज्यायोगें राज्यांत अस्वस्थता माजेल, शांति नाहींशी होईल, अशीं व राज्यांत व त्यांच्यांत संघर्ष उत्पन्न होईल, अशीं कृत्यें करण्याचा मौलिक अधिकार पण लोकांना व्यक्तिशः अगर संघशः नाहीं. लोकांनीं काय करावें, कोणत्या मर्यादेपर्यंत वागावें, हेंहि निश्चित असणें समाजाच्या दृष्टीनें इष्ट आहे. सरकार-कडून जबरदस्तीनें, सक्तीचें कांहीं करून घेण्यासाठीं मिरवणूक अगर मोर्चा काढणें अगर हरताळ पुकारून समाजाची रसद तोडणें हें नागरिकस्वातंत्र्यांत बसत नाहीं. आणि असें करण्यापासून हिंसात्मक वातावरण प्रत्यक्ष पैदा होतें अगर होण्याचा संभव असतो. म्हणून जबाबदार नागरिक, जबाबदार संस्था, यांनीं तें करूं नये. ज्या कारणासाठीं हें केलें गेलें असेल तें कारण क्षुल्लक असो, अगर महत्त्वाचें असो. एखाद्याला पोलिसानें पकडलें आहे, त्याच्या सुटकेसाठीं मोर्चा वा मिरवणूक असो वा एखाद्या सभेसाठीं तो मोर्चा असो, जर त्या मोर्चापासून अशांतता

निर्माण होणें निश्चित असेल तर तो बंद केला पाहिजे. समाजांतील नागरिकांना आपलें जीवन शांततेनें व्यतीत करतां येईल, कुठेंहि त्याला खंड पडणार नाहीं, कुठेंहि तें व्यस्त होणार नाहीं याची शाश्वती देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे. जर त्याला घराबाहेर पडलें तर सुरक्षित वाटणार नाहीं व घरांत राहिलें तर दंगेखोरांपासून आपण वांचलें जाऊं असें वाटणार नाहीं, अशी परिस्थिति झाल्यास राज्यानें आपलें आद्य कर्तव्य बजावलें नाहीं असाच अर्थ नागरिक त्यांतून काढतो. त्याबरोबर शांतताभंग होणार नाहीं, गडबड होणार नाहीं, मोर्चापासून कोणालाहि त्रास होणार नाहीं, अशी परिस्थिति असल्यास सभाबंदी, भाषणबंदी अगर मोर्चाबंदी करणें हेंहि युक्त ठरणार नाहीं. केवळ मतप्रदर्शन आहे, विरोधी मतप्रदर्शन आहे, म्हणून त्याला बंदी केल्यास परिणामीं ज्या विचारप्रणालीला कोणी विचारलें नसतें त्याकडे हजारोंचें लक्ष वेधलें जातें. मुस्कटदाबी केल्यानें लोकांचें दुःख दूर होत नाहीं. त्यांचे विचार दडपले जात नाहींत. उलट, समाजांतील अन्य लोकांत कुतूहल निर्माण होतें व सहानुभूतीहि वाटते. समाजामध्यें प्रचलिताचे व प्रस्थापिताचे मालदार व चोपदार असतात. त्यांविरुद्ध कोणी बोलल्यास त्यांच्या रागाला पारावार नसतो. प्रचलिताविरुद्ध किंचित् मतभेद दर्शविल्यास या मंडळींना तो गुन्हा वाटतो आणि केवळ मताबद्दल खटले केले तर तें मत मारलें तर जातच नाहीं, उलट ते अधिक व्यापकपणें समाजांत पसरलें जातें. अलीबंधूंनीं विशिष्ट ठराव मांडला व त्यावर भाषणें केलीं म्हणून २१ सालीं त्यांच्यावर खटला झाला आणि परिणाम असा झाला कीं, तो आक्षेपार्ह ठराव हिंदुस्थानांत हजारों सभांतून लक्षावधि लोकांनीं मोठमोठ्या घोषणा करून पास केला. स्वराज्य शब्द उच्चारल्याबरोबर कोर्टांत खटला होत असे, शिक्षाहि होई. पण परिणाम असा झाला कीं, त्यांतून ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे’ अशा घोषणा लक्षावधि मुखांतून निघूं लागल्या. क्रान्तीचें पोषक द्रव्य क्रांतिकारकांची तळमळ यापेक्षां विरोधकांची तडफड ही अधिक आहे. ज्याकडे समाजानें दुर्लक्ष केलें असतें तीच गोष्ट सरकारनें दडपशाही केल्यास सर्वांचें लक्ष आकर्षून घेते. कोर्टापुढें जोंपर्यंत कांहीं येत नाहीं तोंपर्यंत ती बाब सार्वजनिक चर्चेचा विषय होत नाहीं आणि एकदां कोर्टांत आल्यानंतर जेवढें आक्षेपार्ह तें लोक साक्षेपानें वाचतात, त्यामध्यें रस घेतात आणि शिक्षा देऊन जें साधावयाचें होतें तें न साधतां अगदीं उलट फळ सरकारच्या पदरीं येतें आणि जर सामान्य कोर्टाऐवजीं खास कोर्टें नेमून न्याय देण्याची व्यवस्था झाली, तर क्रान्तिकारकांचा प्रचार अधिक होत जातो. म्हणून ज्या ठिकाणीं केवळ मतप्रदर्शन झालें आहे त्या ठिकाणीं सरकारनें कांहीं कारवाई करूं नये व कोर्टाकडे प्रकरण नेऊन फजिती करून घेऊं नये. समाजांत केवळ एकाच्या मनांत अन्यायाची भावना उत्पन्न झाली कीं, तो मनुष्य त्याला काय वाटतें हें बोलण्यास कचरणार नाहीं. पण जसे विचार त्याच्या मनांत आले तसे विचार अनेकांच्या मनांत

आले म्हणजे मनुष्य तीव्रतेनें बदलत असतो. त्याचा संताप, त्याला वाटणारी अन्यायाबाबतची तळमळ, तडफड, हीं मग सामाजिक बनतात. त्याची भावना मग वैयक्तिक न राहातां सामाजिक बनते आणि मग तिच्याबाबत कारवाई करतांना समाजावर काय परिणाम होईल याचाहि विचार केला पाहिजे. राजकीय दडपशाहीनें समाजामध्यें राजकीय शांतता प्रस्थापित होत नाहीं.

जेव्हां प्रामाणिकपणें पण भावनावेगानें मत प्रदर्शित केलें जातें त्यावेळीं त्या भावना सरकारनें समजून घेतल्या पाहिजेत व त्या भावनांना यथायोग्य आविष्काराला मार्ग देऊन आपलें वर्तन निश्चित केलें पाहिजे. भावनेची कदर करावयाची नाहीं व त्याबरोबर विचारस्वातंत्र्याच्या हक्कावर गदा आणावयाची, असा दुहेरी अन्याय झाल्यास मग उत्पन्न झालेला सामाजिक असंतोष भयानक स्वरूप घेत जातो. समाजामध्यें व्यक्तींना एकत्र येण्याचें, संघ करण्याचें स्वातंत्र्य नसेल तर सरकार ही एकपक्षीय संस्था मग होईल आणि एकपक्षीय संस्था ही शेवटीं हुकूमशाही स्वरूपाची होते. समाजामध्यें ज्या व्यक्ति असतात, समाजामध्यें ज्या संस्था असतात, त्या सरकारच्या मर्जीप्रमाणें चालाव्यात या शर्तीवर अस्तित्वांत आलेल्या नसतात. किंबहुना त्यांचें अस्तित्व सरकारच्या कृपेवर अवलंबून असतें हें खरें नाहीं. व्यक्ति तर निःसंशयपणें राज्याच्या आधींपासूनच्या आहेत व समाज हाहि राज्याचा अग्रज अगर आधीं जन्मलेला असा आहे. राज्य येईल जाईल, व्यक्ति कायम आहे. सरकार येईल व जाईल, राज्य कायम आहे. म्हणून सरकारनें समजलें पाहिजे कीं, व्यक्तीचें जीवन त्याच्या मर्जीवर नाहीं आणि म्हणून अमर्यादपणें, अनिर्बंधपणें असें कांहींहि सरकार अगर राज्य व्यक्तीवर व त्याचप्रमाणें संघावर लादूं शकत नाहीं. समाजमध्यें व्यक्तीव्यक्तींत समाधानकारक संबंध असावे, यासाठीं राज्य ही व्यवस्था असते. राज्य हें व्यक्तीच्यासाठीं आहे आणि व्यक्ति ही राज्यासाठीं सर्वस्वीं नाहीं. राज्य असलें म्हणजे व्यक्तीचा विकास होतो. व्यक्तीव्यक्तींत सहकार्य व्हावें, त्यांच्या कार्यांत संकलन व्हावें, हा एक राज्याचा प्रमुख उद्देश असतो. पुष्कळ गोष्टी व्यक्तींना अलग अलगपणें करतां येत नाहींत, म्हणून व्यक्तींच्यातर्फें संघटितपणें तें करण्याचें कार्य राज्य करीत असतें. तथापि जें कार्य राज्य व्यापक क्षेत्रांत करतें तें मर्यादित क्षेत्रांत व्यक्तीव्यक्तींचे संघ करीत असतात. या संघांनीं कोणत्या क्षेत्रांत कार्य करावें याचें नियमन राज्यानें करावयाचें हें खरें, पण त्याचा अर्थ असा नव्हे कीं, राज्याचें चौफेर नियंत्रण त्यांच्यावर असावें. साधनाबाबत मात्र राज्याचें नियंत्रण अवश्य व योग्य असतें आणि जोंपर्यंत संघाचे हेतु राज्याच्याविरुद्ध नाहींत तोंपर्यंत संघकार्यांत राज्यसत्तेनें हस्तक्षेप करतां कामा नये. संघाचीं कार्यें अमुक एक असावींत असें सरकारनें सांगणें याचा अर्थ त्याचें स्वातंत्र्य वस्तुतः नियंत्रित करण्यासारखें आहे. प्रत्येक व्यक्ति आपापल्या इच्छेनुसार कांहीं हेतु धरून संघामध्यें येते व त्या संघाच्या जीवनांत, त्याच्या कार्यांत व्यक्तीला

समाधान वाटत असतें. आपला जीवनहेतु पुरा झाला आहे असें वाटतें, त्याला सांगता झाली असें वाटतें. भक्तिमार्गी माणसाला दिंडींत सामील होऊन पंढरपूरला जावेंसें वाटतें. कुणाला भजनमंडळांत सामील व्हावेंसें वाटतें. कुणाला एकाद्या संशोधनमंडळांत सामील व्हावेंसें वाटतें आणि त्या दृष्टीनें त्याला सामील होण्यास पूर्ण संधी असली पाहिजे. त्याच्या ह्या व्यक्तिविकासाच्या क्रियेंत अडथळा आणूं नये, असें त्याला वाटतें. व्यक्तीला अमुक संघांत तूं सामील हो, हें सांगणें सरकारनें करूं नये. त्याला त्याच्या इच्छेनुसार, त्याला योग्य वाटेल त्या मंडळींत मिसळण्याचा, संघ करण्याचा पूर्ण वाव असला पाहिजे, कारण असल्या संघांत सामील झाल्यानें त्याचें मन खुलत असतें. त्याची गुणसंपदा वाढत असते. त्याच्या कौशल्याला, त्याच्या रसिकतेला त्या संघाच्या वातावरणांत बहर येत असतो. मनुष्य हा सहवासासाठीं सामान्यपणें हपापलेला असतो. या नाहीं त्या कारणासाठीं चार मंडळींत यावें, त्यांचा सहवास घ्यावा, असें त्याला वाटत असतें. ही त्याची गरज अन्नपाण्याइतकी मौलिक असते. एखादे दिवशीं उपाशी राहण्याचें तो पत्करील, पण आपल्या मंडळांत अगर आपल्या क्लबांत जाण्याचें टाळणार नाहीं. म्हणून राज्यानें व्यक्तीला अमक्या मंडळींत जा, अगर तमक्या मंडळींत जाऊं नको, अशा तऱ्हेची आज्ञा करणें हें राज्यानें करूं नये, आणि राज्याला तसा अधिकारहि नाहीं. ज्याच्यांत त्याला रस आहे, ज्याच्यायोगें त्याच्या बुद्धीला स्थिरता येते, तें तें करण्यास व्यक्तिशः अगर संघशः त्याला मोकळीक असली पाहिजे. राज्याचें पाहणें एवढें असावें कीं, आपल्या इच्छापूर्तीसाठीं तो व्यक्तिशः अगर संघशः वाम मार्गाचा म्हणजे अवैध मार्गाचा स्वीकार करीत नाहीं ना ? त्याला आलेला अनुभव त्यानें बोलून दाखविल्यास व तो राज्याला कितीहि अप्रिय असला, तरी राज्यानें त्याच्यावर बंदी घालतां कामा नये. जें राज्याला अनुकूल नाहीं तें अयोग्य असें गणित मांडणें चूक आहे. शिवाय राज्याला जें अनुकूल तें जरी राज्याच्या व्यक्ति सांगत असतात तरी येथून तेथून व्यक्तीच असल्याकारणानें कोठें चूक न होणें हें असंभवनीय नसतें. सत्ताधीश म्हणजे शहाणे असें आजकालच्या जगांत तरी कोणी मानणार नाहीं. म्हणून सरकारनें विवेकानें काम घ्यावें आणि संघाच्या अंतर्गत कारभारांत शक्य तितका हस्तक्षेप टाळावा. आपण सत्तेवर आहोंत म्हणून आपण करूं तें बरोबर, आपण बोलूं तें धोरण, आपण बांधूं तें तोरण, असा आग्रह व अभिमान सरकारनें धरणें म्हणजे वस्तुतः सत्ताधीश झालेल्या व्यक्तींनींच तो धरणें असा आहे व त्याप्रमाणें बोलणें याचा अर्थ सर्वज्ञतेचा दावा सांगणें हा आहे. लोकशाहीचें आम तत्त्व हें आहे कीं, कोणीहि व्यक्ति सर्वज्ञ नाहीं, म्हणून ती सर्वसत्ताधीश होतां कामा नये.

जगाच्या इतिहासाकडे नजर फिरवली असतां जेथें जेथें सत्ताधीश सर्वज्ञतेचा, शहाणपणाचा दावा सांगतात, तेथें तेथें त्यांच्या शहाणपणाचा परिणाम दडपशाहींत व हुकूमशाहींत झालेला आढळून येतो व त्या हुकूमशाहींतून, त्या दडपशाहींतून क्रांति

उदयाला येते आणि त्यांच्या सर्वज्ञतेचा बोजवारा झालेला दिसून येतो. खिस्ती धर्माची स्थापना व त्याची वाढ हेंच दर्शवितें. रोमन राज्यानें नवीन धर्माच्या प्रेषिताला क्रूसावर चढवलें, पण वस्तुतः ती सत्ता प्रचलित धर्मसमजुतींना व समाजव्यवस्थेला दिली गेली असें आढळून आलें. युरोपच्या इतिहासांत जेथें जेथें नवविचारांना दाबून टाकण्याचा प्रयत्न केला तेथें तेथें क्रांति झाली. फ्रान्सचा इतिहास तेंच सांगतो. इंग्लंडनें अमेरिकन वसाहतीबाबत तीच दृष्टि दाखविली आणि परिणामीं अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्या. सबंध एकोणिसाव्या शतकांतील जगाच्या इतिहासांत जें घडून आलें तें सर्व वरील अनुभवाला जुळून असणारें आहे. चालू शतकांत व विशेषतः पहिल्या महायुद्धानंतर दडपलीं गेलेलीं राष्ट्रें उदयास आलीं, त्यांनीं स्वातंत्र्य मिळविलें आणि गेल्या दहा वर्षांत एशिया खंडांत व आतां आफ्रिका खंडांत राजकीय क्षेत्रांत जीं परिवर्तनें होत आहेत व खवळलेल्या जनसागरांत ज्या लहरी उचंबळत आहेत, त्या सर्वांचा अर्थ हाच आहे कीं, सत्याला दडपून टाकण्याचा प्रयत्न, स्वातंत्र्याला दडपून टाकण्याचा प्रयत्न, कांहीं काळ यशस्वी दिसला तरी शेवटीं तो अपेशी ठरतो. मतप्रदर्शन दडपलें जातें, संघस्वातंत्र्य नाकारलें जातें, येथून तेथून एकसारखेपणा आणण्याचा प्रयत्न केला जातो, क्षणभर शांतता प्रस्थापित केली जाते, पण स्वातंत्र्याच्या प्रयत्नाची गंगा खडकांना फोडून, अडचणींवर मात करून, वेगानें पुढेंच जात असते व शेवटीं स्वातंत्र्याचा मुक्काम गांठते. या सर्वांचा बोध हाच आहे कीं, व्यक्तीला जें वाटतें तें बोलून दाखविण्याचा, संघशः बोलून दाखविण्याचा व मनाप्रमाणें करण्याचा हक्क निरपेक्षपणें व कायमपणें कुठल्याहि राज्यांत नाकारतां येत नाहीं व कुठलेंहि राज्य त्याचा प्रतिबंध करूं शकत नाहीं. राज्याचें कार्य समयानुसार जे विचार राज्यांत प्रदर्शित केले जातात, त्यांना बेताबेतानें, विवेकानें मोकळीक देणें हेंच असतें. कायदे पुष्कळ केले असतील व योग्य त्या संस्थांनीं ते मान्य केलें असतील, पण तेवढ्यानें कायद्याला लोक मान देतात असें नव्हे. कायद्याचा कांहीं तरी हेतु असतो. केवळ कायद्यासाठीं कायदा असें कधींच नसतें. कायदेमंडळानें कायदा पास केला एवढ्यानें जनतेची संमति त्याला प्राप्त होत नाहीं. कायद्याला तो कशासाठीं आहे, यावर त्याला मान्यता मिळत असते. आणि मागें सांगितल्याप्रमाणें सर्वसामान्य जनतेला आपल्या अनुभवाचें प्रतिबिंब त्या कायद्यांत दिसलें पाहिजे व मगच जनता त्याला मान्यता देते हें आद्य तत्त्व सरकारनें लोकांना आज्ञा देतांना, आदेश देतांना पाळलें पाहिजे. लोकांच्या शंकांना पोलिसी दंडा हें उत्तर नव्हे, तर पटणारा युक्तिवाद हें उत्तर आहे. मुद्द्याला मुद्द्यानें उत्तर द्यावयाचें असतें, गुद्द्यानें नव्हे. युक्तीला शक्तीनें उत्तर देणें याचा अर्थ जनतेच्या शक्तीला आव्हान देण्यासारखें आहे. मनाला पटवून दिल्याशिवाय जनतेची निष्ठा केवळ औपचारिक असते. दंडाला भिऊन जनता कांहीं करणार नाहीं, पण जनतेचें मन युक्तिवादानें राज्यानें जिंकून घेतलें तरच राज्य व

जनता यांत इष्ट ती सायुज्यता येते. तात्पर्य, खऱ्या स्वातंत्र्याच्या वातावरणांत राज्य असण्यासाठीं ही सायुज्यता अवश्य असली पाहिजे.

संघस्वातंत्र्य व तत्संबंधींचें मतस्वातंत्र्य यांचा अनेक दृष्टिकोनांतून वर विचार केला व मतस्वातंत्र्याबरोबर आचारस्वातंत्र्याचाहि थोडासा विचार केला. सामान्यपणें मनुष्याला जें योग्य वाटतें तें करण्याचा अधिकार अगर स्वातंत्र्य असलें पाहिजे हें स्वाभाविक वाटतें. त्यानें काय खावें ह्याचें त्याला स्वातंत्र्य असलें पाहिजे. त्यानें कोणते कपडे घालावे, कोणता पोषाख घालावा, याचेंहि स्वातंत्र्य असलें पाहिजे. अनेकांना अनेक छंद असतात त्याप्रमाणें ते पुरे करण्याची मुभा त्यांना असली पाहिजे, हेंहि सामान्यपणें बरोबर वाटतें. समाजांत कित्येकांना विविध तऱ्हेचीं व्यसनें असतात. त्याबाबत किती मुभा असावी असा प्रश्न उपस्थित होतो. खाण्यापिण्याच्या बाबतींत, पोषाखाच्या बाबतींत ज्या मर्यादा असतात त्या अभिरुचीच्या, सामाजिक परंपरेच्या व समाजाच्या त्या बाबतींतील विद्यमान मूल्यांच्या दृष्टीनें असतात. एके काळीं कांदा—लसूण निषिद्ध मानला जाई व त्याचप्रमाणें टमाट्याबाबत स्थिति होती. आतां कांदा, लसूण, टमाटे याशिवाय जेवणास लज्जत येत नाहीं. एके काळीं कांहीं वर्ग संपूर्णपणें शाकाहारी होते. त्या वर्गात सुद्धां शाकाहारी–निर्भेळ शाकाहारी–अपवादासम दिसून येतात. आणि ही सर्व प्रगति अगर बदल म्हणा, समाजांतील विचार बदलत गेले त्यामुळें झाला. पोषाखाबाबत अंगरख्याचे शर्ट झाले, शर्टचे बुशशर्ट झाले. धोतरानें केव्हांच रजा घेतली. आतां पायजमे अगर पॅन्ट आल्या. पूर्वी डोक्यावर कांहींतरी पागोटें, टोपी, रुमाल यांपैकीं घातल्याशिवाय बाहेर जाणें व सार्वजनिक ठिकाणीं हिंडणें असभ्यपणाचें मानलें जाई. आतां डोक्यावर टोपी असलेला दशसहस्रेषु एक दिसतो. पागोटें आतां वस्तुसंग्रहालयांत दिसून येतें. स्त्रियांच्या बाबतींत नऊवारी लुगडीं गेलीं, गोल पातळें आलीं. चोळीचे आकार आकसले. केशभूषा जी पूर्वी सभ्य स्त्रियांच्या ठिकाणीं दिसून येत नसे, ती आतां सभ्यतेचें मुख्य लक्षण बनली आहे. खाण्यापिण्याच्या, पोषाखाच्या बाबतींत सदाचार कोठें संपतो व स्वैराचार कोठें सुरू होतो हें सांगणें कठीण. पूर्वी आपण तिला चाल-रीत म्हणत होतों, ती आतां राहिली नाहीं. सभ्यतेनें नवें नवें रूप घेतलें आहे. किंबहुना, क्षणाक्षणाला जी नवस्वरूप घेते तिला आतां सभ्यता म्हणावें लागतें. कवीच्या प्रतिभेप्रमाणें नावीन्यांत तिचें मुख्य लक्षण मानलें जात आहे. पन्नास—साठ वर्षांपूर्वी मोठमोठे शास्त्रीपंडित शांभवी पिऊन विद्वत्ताप्रचुर प्रवचनें करीत, कीर्तनें करीत. त्या काळीं शांभवीचें व्यसन हें व्यसन मानलें जात नसे. उत्तर हिंदुस्थानांत अफूचें व्यसन अगर शांभवीचें व्यसन व्यसन मानलें जात नसे. गांजा पिणारे पन्नास वर्षांपूर्वी सुशिक्षित समाजांत कांहीं कमी होते असें नाहीं. तंबाखू खाणारे अगर ओढणारे हेहि मोठ्या प्रमाणांत होते. पण आज सिगारेटचें व्यसन लोकशाही समाजाचें व सभ्य समाजाचें भूषण बनलें आहे. दारू, गांजा व भांग यांवर सरकारनें बंदी घातली आहे. निदान मोठ्या प्रमाणांत नियंत्रण केलें आहे. प्रश्न

असा उपस्थित होतो कीं, सामाजिक वागणुकींत व वैयक्तिक वागणुकींत राज्यानें किती ढवळाढवळ करावी ? कांहीं गोष्टी निःसंशय वाईट, त्यांपासून शरीर व मन या दोन्हींच्या स्वास्थ्याला हानि होते, मग त्या व्यक्तीच्या हितार्थ बंदी करावी हें योग्य कीं अयोग्य ? अफू, गांजा यांची बंदी झाली तेव्हां कोणी फारशी तक्रार केलेली नाहीं. पण धूम्रपानावर जर बंदी झाली तर शाळेंतल्या विद्यार्थ्यांपासून ते हिमालयांतील स्वामी-पर्यंत निषेधाचें वातावरण उत्पन्न होईल, यांत शंका नाहीं. धूम्रपान म्हणजे व्यसन नाहीं असें समाजाचें मत झालें आहे आणि म्हणून सरकार त्यांत हस्तक्षेप करणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याचा तो एक भाग आहे. खाणेंपिणें, पोषाख व कांहीं मामुली संवयी यांत सरकारनें कांहीं मर्यादा घालणें म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावर हल्ला आहे असें लोक मानतात. [मदिरापान हें पाप आहे. पंचमहापापांपैकीं तें एक आहे, असें स्मृति सांगते. इस्लामच्या धर्मांतील हिदायतेंहि तेंच सांगतात. सुरापान हें कांहीं धर्मांच्या मतें अधार्मिक नसलें, तरी मनुष्याच्या जीवनाला तें हानिकारक आहे, या बाबतींत मतैक्य आहे. तथापि, सद्गुण म्हणजेच मार्ग व व दुर्गुण म्हणजे अतिरेक या दृष्टीनें विचार करणारे, बेतानें मदिरापान केलें तर तें व्यसन नाहीं व अशा मदिरापानाला बंदी करणें म्हणजे स्वातंत्र्याच्या मौलिक हक्कावर आक्रमण करण्यासारखें आहे, असा दृष्टिकोन ठेवतात. या असल्या बाबतींत समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें, समाजाच्या नैतिक जीवनाच्या दृष्टीनें हस्तक्षेप करणें हें सरकारचें कर्तव्य ठरतें, असाहि एक दृष्टिकोन आहे. वैयक्तिक व सामाजिक वर्तनाच्या बाबतींत कोणीहि आग्रहानें अमुक एक बरोबर, अगर अमुक एक चूक असें सांगूं शकत नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें सदाचार व स्वैराचार यांतील फरक समजणें सोपें नाहीं. कोठें चांगला वर्तनक्रम संपतो व व्यसन सुरू होतें, हें सांगणें कठीण आहे. किती वेळां आठवड्यांतून सिनेमा पाहिला म्हणजे तें करणें ज्ञानाचें अगर मनोरंजनाचें साधन, व किती वेळां, पाहिला म्हणजे तें व्यसन हें सांगणें सोपें नाहीं. तथापि, कांहीं बाबतींत वर्तनक्रम अतिरेकी नसला तरी समाजाला तो अप्रिय असतो. मग केवळ समाजाला अप्रिय आहे म्हणून त्याला सरकारनें बंदी करावी का ? जेथें एखादें कृत्य अतिरेकानें केल्यास तें व्यसन ठरतें व समाजाला त्यापासून उपद्रव होतो व व्यक्तीच्या दृष्टीनेंहि तें घातुक ठरतें, त्या ठिकाणीं समाजानें अतिरेक होऊं नये या दृष्टीनें निर्बंध घालणें समाजहिताच्या दृष्टीनें इष्ट ठरतें; यामुळें कोणाच्या स्वातंत्र्यावर हल्ला होत नाहीं. स्वातंत्र्याचा अर्थ वाटेल तें करण्याची, वाटेल तसें वागण्याची मुभा हा कोणीहि मान्य करणार नाहीं. या दृष्टीनें संपूर्ण दारूबंदी लोकमताला पसंत असेल तर ती झाली पाहिजे; पण लोकमताला पसंत नसेल तर तिच्यावर नियंत्रण बसलें पाहिजे. प्रत्येक व्यक्ति असें म्हणूं लागेल कीं, अमर्याद दारू पिण्यानें वाईट होतें, तथापि मला तसा अनुभव येईपर्यंत मोकळीक असावी. तर राज्यानें तें मान्य करतां कामा नये. प्रत्येकानें अनुभव

मिळवावा व त्यासाठीं किंमत द्यावी हें अयोग्य नाहीं, पण कांहीं क्षेत्रांत पूर्वींचा व इतरांचा अनुभव राज्यानें लक्षांत घेऊन कांहीं प्रमेयें सिद्ध:झालीं असें ठरविलेलें असतें व त्या दृष्टीनें मर्यादा सांगितलेल्या असतात. प्रत्येकानें अनुभव घेतांघेतांच सर्वस्व गमावलें तर त्याचा थोडासा दोष समाजव्यवस्थेकडे व राज्यसत्तेकडे येतो, म्हणून प्रत्येकाला त्याबाबत अनुभव घेण्याची संधी न दिल्यास तें वावगें होत नाहीं. ज्या बाबतींत समाजाची नापसंती उघड उघड सामाजिक जीवनांत दिसून येत असते, त्याबाबत सरकारनें पूर्ण विचार करून प्रतिबंध केला पाहिजे. सामान्यपणें जुगार एक व्यसन मानलें आहे. द्यूत हें एक महापातक स्मृतीनें मानलें आहे. पण त्याचबरोबर खरा क्षत्रिय द्यूताला व युद्धाला नाहीं म्हणत नाहीं हेंहि सांगितलें आहे. सरळ जुगाऱ्यांच्या अड्ड्यांत जाऊन आंकडे लावणें अगर अन्य तऱ्हेनें जुगार खेळणें हें स्पृहणीय नाहीं. तथापि, घोड्यांच्या शर्यतींना परवानगी देऊन तेथील जुगाराला अनेक देशांतून सरकारनें मनोरंजनाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. क्लबांतून पत्ते खेळण्यांत येतात व तेथ पैसे लावले जातात तेथें बंदी करावी का ? तेथें बंदी केल्यास खाजगी घरांतून तेंच होऊं लागेल. तात्पर्य, सामाजिक वर्तनाबाबत अमुक एक निश्चितपणें दोषार्ह हें सांगणें कठीण, म्हणून जें स्वभावतःच वाईट आहे व तें केलें गेलें तर शिक्षा व्हावी हें योग्य. त्याचप्रमाणें अतिरेकानें केलें गेलेलें हेंहि शिक्षेस पात्र असतें हें खरें ; तथापि, मर्यादा घालतांना सारासार विचार, मनुष्यस्वभाव, सामाजिक इतिहास व परंपरा याहि लक्षांत घेतल्या पाहिजेत. ते कित्येक धर्मांतून लग्नप्रसंगीं मदिरापान करणें हें आवश्यक समजलें जातें. कित्येक सांप्रदायांतून मदिरापान करणें हा एक पूजेचा भाग असतो. म्हणून सर्व गोष्टींचा विचार करून मर्यादा घातल्या गेल्या पाहिजेत व जी मर्यादा घातली जाईल तिची अंमलबजावणी नीटपणें झाली पाहिजे.

योग्य सेवन व अतिरेकी सेवन यांतील मर्यादा निश्चित करणें कसें कठीण हें वर सांगितलें. सामान्यपणें किती योग्य व किती अतिरेकी याबाबत कांहीं प्रमाण निश्चित करणें अशक्य नसतें, पण अवश्य असतें. उदाहरणार्थ, मदिरापान किती करावें म्हणजे मनुष्य बेहोष होत नाहीं, अगर त्याच्या स्वास्थ्याला हानि पोंचत नाहीं, या बाबतींत कांहीं प्रमाण निश्चित करतां येतें, पण त्याबरोबर हेंहि खरें कीं, त्या मनुष्याची प्रकृति पण लक्षांत घेऊन साधारण प्रमाणांत कमीजास्त करणें न्यायाचें ठरतें. आज भारतांत अनेक क्षेत्रांतून मदिरापानाला पूर्ण बंदी आहे, पण अपवाद म्हणून डॉक्टरच्या शिफारशीवरून परमीट दिलें जातें व तें पिणाऱ्याची प्रकृति बघून दिलें जातें. तथापि कुणाला सेवन योग्य प्रमाणांत आहे, योग्य प्रमाणांत नाहीं हें संबंधित व्यक्तीनेंच ठरविणें अधिक इष्ट असतें. कमी दिल्यास तडफडतो, प्रसंगीं वेडा होतो. जास्त दिल्यास बेहोष होतो व समाजाला एक त्रासदायक व्यक्ति बनतो. व्यक्तीच्या जीवनांत बऱ्याचशा क्षेत्रांत योग्य काय, अयोग्य काय, हें ठरविण्याची त्याला मुभा

असते. किती खावें, किती कप चहा प्यावा, याला सरकार मर्यादा घालूं शकत नाहीं. खूप आईस्क्रीम खाऊन कांहीं व्यक्ति मेल्या म्हणून सरकारनें आईस्क्रीमला बंदी करणें अगर मर्यादा घालणें हें बरोबर होणार नाहीं. खाण्याबाबत, पोषाखाबाबत, मनोरंजनाबाबत, अखेरीस व्यक्ति हीच स्वतःसंबंधाचा निर्णय घेऊं शकते. सर्वसामान्य समाजामध्यें जें योग्य मानलें जातें, सभ्यतेचें मानलें जातें, तेवढ्याच मर्यादा तेथें असल्या पाहिजेत. एक काळ असा होता कीं, घराघरांतून व विद्यार्थ्यांच्या खोल्यांतून देव-देवतांचीं चित्रें होतीं. नंतर असा काळ आला कीं, देशभक्तांचीं चित्रें त्या ठिकाणीं दिसूं लागलीं व आतां चित्रपटांतील नायक–नायिका यांचें सकाळींच चित्ररूपानें दर्शन झालें नाहीं तर अनेकांना दिवसभर सुचत नाहीं. यावरून देशभक्त अगर पुढारी यांचा लोकप्रियतेच्या बाजारांत भाव कमी झाला असा त्याचा अर्थ नाहीं, पण नटनटींचा भाव वाढला हें निश्चित आहे. वर्तमानपत्राचा अंक त्यांच्या फोटोशिवाय खपत नाहीं. आठवड्यांतून एकदां तरी चित्रपटांबाबत व नट्यांबाबत खुसखुशीत मजकूर आला नाहीं, तर वाचकवर्ग रोडावतो असा वर्तमानपत्रकारांचा अनुभव आहे. हें सर्व चांगलें लक्षण नाहीं हें खरें असलें तरी सरकारद्वारा त्यावर मर्यादा घालणें हें अनिष्ट व त्याचा परिणाम विपरीत होतो हेंहि तितकेंच खरें आणि सरकारनेंहि जेव्हां सामाजिक वर्तनाबाबत कांहीं मर्यादा घालावयाची असेल, तर पुरा विचार केला पाहिजे. आणि अशा मर्यादा घालण्यांत जे हेतु चिंतिले असतील ते खरोखरच साध्य होतील का नाहीं, याची खात्री करून घेतली पाहिजे. मर्यादा घातल्यानें व्यक्तिवरील जबाबदारी मग कमी होते. त्याला मग अधिक विचार करण्याचें कारण पडत नाहीं. जें प्रतिबंधित नसेल तें खावें, तें प्यावें, तें पहावें, तें वापरावें, एवढेंच मग त्यांचें काम असतें. पण त्याबरोबर माणसाची बुद्धि चौकस असते, त्याच्या मनांत जें लपविलेलें असेल तें पाहाण्याचें कुतूहल उत्पन्न होतें, जें वाङ्मय आक्षेपार्ह ठरलें असेल तेंच वाचण्यास तो अधिक उत्सुक होतो. त्याच्या जीवनपथावर कधींहि जें आलें नसतें तें नेमकें प्रतिबंध केल्यानें येतें. त्याचें लक्ष मग आकर्षिलें जातें व पुष्कळ वेळां जें प्रतिबंधित असतें त्याविरुद्ध वागावें अशीहि भावना त्याच्या मनांत येते व तें करणें स्वाभाविक असतें. माणसाचें चारित्र्य त्याला अनेक प्रलोभनांपासून दूर ठेवल्यानें, अनेक गोष्टींच्या अनुभवाबाबत प्रतिबंध केल्यानें उमलत नाहीं, वाढीस लागत नाहीं; तर प्रलोभनें असून त्याबाबत संयम दाखविण्याची बुद्धि त्याच्यांत उत्पन्न केल्यानें चारित्र्य वाढीस लागतें. संधीच मिळाली नाहीं म्हणून चोरी केली नाहीं यांतील सौजन्य अभावात्मक आहे. कोणीच प्रेम केलें नाहीं म्हणून ब्रह्मचारी राहिला यांतील नैतिकता अभावात्मक आहे. याच्या उलट प्रलोभनाचे प्रसंग आले असतांना ज्यानें ते संयमानें टाळले, प्रवृत्तीला वाव असून जेथें त्यानें निवृत्ति दाखविली, त्या ठिकाणीं त्या माणसाचें शील खरें कसाला लागलें, श्रेष्ठ ठरलें, असें म्हणतां येईल. म्हणून समाजानें व्यक्तीवर कांहींतरी जबाबदारी टाकली पाहिजे. श्रेष्ठ नीतीमूल्यांची

त्याच्या मनाला जाणीव करून दिली पाहिजे व प्रतिबंधव्यवस्था रचतांना सारासारविवेक केला पाहिजे. व्यक्तीला योग्य प्रमाणांत अनुभवाचें स्वातंत्र्य दिलें पाहिजे व स्वतःच्या शीलाची इमारत उभारण्याचें कार्य त्याचें आहे याची जाणीव त्याला करून दिली पाहिजे. बँकांच्या व्यवहारांत लबाड्या होतात, म्हणून बँका कोणी बंद करीत नाहीं. बाजारांत खोटीं वजनें व मापें असूं शकतात, म्हणून तीं कोणी बंद केलीं नाहीं. पुष्कळ लोक चेकबुकांचा दुरुपयोग करतात म्हणून ती पद्धत कोणी बंद करीत नाहीं. यांतील रहस्य समजून घेतलें पाहिजे. मनुष्य जें अपकृत्य करतो तें परिस्थितीच्या सुलभतेनें अगर अनिवार्यतेनें. आणि या दोन्ही ठिकाणीं सरकार मर्यादा घालूं शकत नाहीं. व्यक्ति तेथें जें काय करील तो व्यक्तीचा निर्णय असेल व जर व्यक्तीच्या मनांत नैतिक मूल्यांनीं स्थान घेतलेलें असेल, तरच व्यक्तीचा निर्णय योग्य असा ठरतो. कोणत्या बाबतींत निर्धास्तपणें सरकारनें मर्यादा घालावी, याचें विवेचन पूर्वीच केलें आहे. जे अंमली पदार्थ आहेत त्यांवर बंदी घातली पाहिजे. जे रोग निश्चितपणें हानिकारक आहेत, त्याबाबत योग्य ते इलाज केलेच पाहिजेत. कॉलरा–प्रतिबंधक टोंचून घेतलें नाहीं तर यात्रेच्या वेळीं पंढरपूरला जातां येणार नाहीं, अशी व्यवस्था सरकारनें केल्यास त्यांत व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घातली असें म्हणतां येणार नाहीं. गांवामध्यें ' देवीची, कॉलऱ्याची अगर अन्य कांहीं सांथ आहे त्या प्रसंगीं टोंचण्याची सक्ति केल्यास व्यक्तिगत स्वातंत्र्यावर हल्ला होतो हें म्हणणें योग्य नाहीं. सार्वजनिक हितार्थ जें नाहीं तें करण्यास सरकारनें आपली शक्ति खर्च करणें शहाणपणाचें ठरत नाहीं. सामान्यपणें सामाजिक वर्तनाबाबत सरकारनें ढवळाढवळ करूं नये व जी करावी लागेल ती व्यक्तीच्या व समाजाच्या हितार्थ आहे याची खात्री सरकारला करतां आली पाहिजे.

व्यक्ति समाजांत जन्म घेते, समाजांतच ती राहते, म्हणून समाजाचे संकेत, समाजाच्या परंपरा व समाजासाठीं केलेले कायदे त्यानें सामान्यपणें मानले पाहिजेत हें खरें. वेलीवर आलेलें फूल वेलीपासून अलग राहूं शकत नाहीं हें खरें. तथापि व्यक्तिगत फुलालाहि कांहीं स्वातंत्र्य असतें, त्याप्रमाणें व्यक्ति ही सामाजिक वस्तु आहे हें खरें असलें तरी प्रत्येक व्यक्तीला तिचें असें कांहीं खास क्षेत्र असतें. तिचा असा खास स्वभाव असतो. अगदीं शिक्क्याच्या रुपयाप्रमाणें एकसारखेपणा समाजांतील व्यक्तीमध्यें नसतो. ज्याप्रमाणें प्रत्येक कुटुंबाचें जसें वैशिष्ट्य असतें त्याचप्रमाणें कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीचें वैशिष्ट्य असतें. कोणी जेवतांना बोलत नाहीं, कोणाला बडबड केल्याशिवाय बरें वाटत नाहीं, कोणाला गांवाबाहेर फिरण्यांत मजा वाटते, कुणाला लक्ष्मी रोडवर फिरल्यानें मजा वाटते, कुणाला प्रवास करावासा वाटतो, तर कुणाला कोतवाल चावडीपासून किर्लोस्कर थिएटरपर्यंत सर्व जग पाहावयास मिळतें! याचा अर्थ व्यक्तीव्यक्तीचें सांस्कृतिक व नैतिक जीवन हें निरनिराळें असतें व त्याचा आविर्भाव त्याच्या वागण्यांत, त्याच्या बोलण्यांत, वाचण्यांत, त्याच्या सर्व सामाजिक क्रियेंत दिसून येतो. व तो जर वयांत आलेला असेल तर त्याला

हें करूं नको, तें करूं नको, येथें बघूं नको, तेथें फिरकूं नको, अशा तऱ्हेच्या प्रतिबंधक-स्वरूपी पाट्या त्याच्या जीवनाच्या क्षेत्रांत लावणें म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला मारणें आहे, कोंडून टाकणें आहे. 'भणे ते भुले' या गुजराथी म्हणीप्रमाणें जो शिकेल तो चुकेल एवढी संधी त्याला मिळाली पाहिजे. जो चालेल त्याला ठोकर लागेल, म्हणून चालण्याची परवानगी असली पाहिजे. कांचेच्या घरांतील रोपट्याप्रमाणें त्याचें सामाजिक जीवन नसलें पाहिजे. मनुष्य खातो, पितो, एवढ्यानें तो जगतो असें होत नाहीं. त्याचें जिवंतपण केवळ त्याच्या जगण्यावर नसतें. तो जगला पाहिजे याचा अर्थ तो जिवंत असला पाहिजे. त्याचें मन उल्हसित असलें पाहिजे. त्याच्या विचाररूपी पंखांवर कुठलें नियंत्रण असतां कामा नये. आणि त्याच्या विचारांवर जी मर्यादा असेल ती त्यानें अनुभवानेंच शोधून काढावयाची असते. इतरांच्या अनुभवाला धरून सर्वस्वीं व्यक्तीनें आपलें जीवन घालविणें हें त्याच्या प्रगतीला हानिकारक ठरतें. स्वतः प्राप्त करून घेतलेल्या अनुभवाला धरून जेव्हां तो वागतो तेव्हां त्याच्या कार्यांत जबाबदारीचा भाग येतो व त्याच्या वागण्यांत गौरवाची प्रतिष्ठा येते. इतरांप्रमाणें वागलें पाहिजे, इतरांप्रमाणें विचार केला पाहिजे, असें सांगणें म्हणजे एकप्रकारें त्या व्यक्तीला गुलाम बनविणें आहे. मनुष्याला वाटेल त्या देवतेचें तो भजन करील; पण त्याला जर प्रत्येक एकादशीला सक्तीनें देवळांत गेलें पाहिजे, असा दंडक घातला गेल्यास तो तेथें जाईल, त्याचें शरीर तेथें असेल, पण त्याच्या मनांत दुसऱ्याच देवतांनीं प्रवेश केला असेल. बाहेरच्या दंडकांनीं त्याच्या मनावर सक्ति केल्यास मनाचा विचार करण्याचा धर्मच मग नाहींसा होतो. प्रत्येकाला स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय असली पाहिजे व ती संवय जागोजाग दंडक व प्रतिबंध निर्माण केल्यानें उत्पन्न होत नाहीं, अगर वाढीस लागत नाहीं. व्यक्तीनें आलेल्या अनुभवानें जे संयम स्वतः स्वीकारले असतील, तेच खरे उपयोगी पडतात. ज्याच्या मनांत चोरी हें पाप आहे, याची खात्री झाली असेल तर तो ती करणार नाहीं. याच्या उलट एखाद्याच्या मनाची प्रवृत्ति असेल तर समोर पोलीस दिसत आहे अगर अन्य कोणी पाहात आहे, तोंपर्यंत तो कांहीं करणार नाहीं, पण संधी मिळतांच तो चोरी करील हें उघड आहे. म्हणून व्यक्तीला अनुभव घेण्याला वाव मिळाला पाहिजे. त्याच्यांतील विवेक मग जागृत होतो. त्याच्यांत मग जबाबदारीची वृत्ति येते. त्याच्या जीवनानें काय दृष्टिकोन ठेवावा, कसा आकार घ्यावा, हें त्याला ठरवूं देण्यामध्यें व्यक्तीला व समाजाला जास्तींत जास्त त्यापासून फायदा होतो.

व्यक्तीला त्याच्या जीवनांत व सामाजिक जीवनांत जास्तींत जास्त मुभा असावी म्हणजे तो अधिक जबाबदार नागरिक बनतो हें वर सांगितलें आहे. त्याचबरोबर कायद्यानें सामाजिक वर्तनाबाबत कांहीं नियमन करणें व ते यशस्वी करणें हें फार विचारपूर्वक करावयास हवें. पाहिली गोष्ट अशी कीं, हें नियमन सामान्यपणें सर्व लोकांना पसंत

असलें पाहिजे. ज्यांच्या जीवनावर असल्या नियमनानें अगर निर्बंधानें परिणाम होणार असेल, त्यांना हें नियमन व हे निर्बंध निदान सामान्यपणें योग्य आहेत असें तरी वाटलें पाहिजे. ज्या कायद्यामागें लोकांची संमति नाहीं, म्हणजे स्वखुशीची संमति नाहीं व ज्यांतील तत्त्वाबाबत जनता उदासीन अगर विरुद्ध आहे, त्या कायद्याचें पालन केवळ दंडाच्या भीतीनें जनता करील असें गृहीत धरून चालणें धोक्याचें आहे. भीतीमुळें कांहीं लोक तो कायदा मानतील, पण जो कायदा उघड उघड अयोग्य आहे, ज्यांत सारासार विचार नाहीं तो कायदा मग हळूहळू मोडण्याकडे लोकांची प्रवृत्ति होते. कायदापालनाची प्रतिष्ठा कमी होऊन कायदेभंगाची प्रतिष्ठा वाढते. शिवाय समाजामध्यें कायदे मोडणाऱ्याचें जर कौतुक होऊं लागलें तर समाजांत कायद्याविषयीं जी एक आदराची भावना असते, ती नाहींशी होते व समाजधारणेचे जे अनेक बंध असतात त्यांपैकीं कांहीं तुटले जातात. कायदेभंग करून आपण कांहीं चांगलें कार्य करीत आहोंत, कांहीं शौर्याचें काम करीत आहोंत, अशी भावना कायदेभंग करणाऱ्या लोकांत उत्पन्न होते. समाजाची उत्पत्ति, समाजाची स्थिति, समाजाची प्रगति ही कायद्यावर आधारलेली असते. कायदा या सर्व बाबतींत संरक्षक व प्रेरक असतो आणि याच्यावर जर हल्ला झाला तर समाजाच्या मुळावरच हल्ला होतो, समाज मुळापासून हादरला जातो. समाज कायद्याच्या पालनावर जगत असतो व समृद्ध होत असतो. कायद्याचा प्रतिनिधि म्हणजे पोलीस. त्याच्याबद्दल जो आदर व जी भीति असते ती नाहींशी झाल्यास पोलीस म्हणजे नागरिकाचा शत्रु, त्याच्या स्वातंत्र्यावर हात उगारणारा दुष्मन् हा भाव समाजांत निर्माण होतो व तो होणें इष्ट नसतें. आज दारूबंदीच्या कायद्याविरुद्ध वागणाऱ्याचें कांहीं ठिकाणीं कौतुक होतें. हातभट्टी लावणें ही एक कला मानली गेली आहे व हातभट्टीची दारू गाळणें, तिची विक्री करणें या कामीं अनेक लोक आपलें कौशल्य खर्च करीत आहेत, पराक्रमाचें तें क्षेत्र मानीत आहेत व या योगानें होणारा कायदेभंग समाजाच्या सेवेसाठीं केला जात आहे व व्यक्तिस्वातंत्र्यासाठीं तें होत आहे अशी प्रशस्ति पण त्यांना मिळत आहे. जी प्रशस्ति क्रान्तिकारकांना मिळावयाची, जी प्रशस्ति स्वातंत्र्य इच्छिणाऱ्या सत्याग्रहींना मिळावयाची, ती प्रशस्ति व प्रसिद्धि दारूबंदीचा कायदा मोडणाऱ्यांना गटारी वर्तमानपत्रें देत आहेत. हातभट्टीच्या बातम्या व पोलिसांची त्या कामीं झालेली फजिती यांचीं भडक वर्णनें वाचलीं म्हणजे समाजांतील एक वर्ग तरी या दारूबंदीच्या कायद्याविरुद्ध होणाऱ्या वर्तनाला चांगलें समजतो हें स्पष्ट आहे. चोरून दारू पिणें ही आतां पराक्रमाची बाब झाली आहे. तथापि, हा कायदा करण्यापूर्वी तो समाजाला कितपत मान्य होईल याची दखल घेतली गेली नाहीं. हें दारूबंदीचें कार्य थोड्या विवेकानें घेतलें असतें तर त्या कामीं पुष्कळ यश मिळालें असतें. आज गांवोगांवीं बेकायदेशीर दारू गाळण्याच्या भट्टया झाल्या आहेत, त्या होत्या ना; व या बेकायदेशीर धंद्यांत पडल्यानें अनेक साधीं माणसें गुंड झालीं. सरळ दारू प्यावयास न मिळाल्यानें अनेक

व्यसनी मंडळी वाममार्गी बनली. दारूबाजाला संयमी करावयाचें, त्याला व्यसनापासून मुक्त करावयाचें, या कामीं त्याचें सहकार्य नसेल तर कांहीं होणार नाहीं. म्हणून त्याच्या सहकार्यानें, प्रमाणानें कमी कमी दारू त्याला देण्याची व्यवस्था करून त्यास मुक्त करतां आलें असतें. आठवड्यांतून एक दिवस दारू नाहीं, नंतर दिवसांतून ठराविक वेळेला ती मिळेल व ठराविक ठिकाणीं ती मिळेल, अशी व्यवस्था करून त्याला व्यसनापासून वांचवतां आलें असतें. पण एकदम अविवेकानें अव्यवहार्यपणें दारूबंदी केल्यानें कांहीं चांगले परिणाम झाले असले, तरी कांहीं वाईट परिणाम निश्चित झाले आहेत. अनेक सामान्य लोक गुन्हेगार बनले आहेत. आज मुंबईंत ज्याला 'अंडर वर्ल्ड' म्हणतात असें भूमिगत जग निर्माण झालें आहे, संघटित गुन्ह्यांचें प्रमाण वाढलें आहे, हें सर्व टाळतां आलें असतें. दारूबंदीनें सद्‌गुणांची वृद्धि व्हावी, जीवन अधिक सुखी व संयमी व्हावें, हा उद्देश फार थोड्या प्रमाणांत सफल झाला आहे. समाजांत जो एक व्यसनासंबंधींचा नैतिक भाव असावा लागतो, तो कमी झाला आहे व सर्वसामान्य वातावरण असंयमी जीवनाकडे नेणारें झालें आहे. समाजांतील नैतिक कणा वांकला गेला आहे व समाजाचा नैतिक दृष्ट्या तोल ढळला आहे.

समाजामध्यें वरील स्थिति उत्पन्न होण्याचीं कारणें कोणतीं याचा समाजांतील नेत्यांनीं विचार करावयास पाहिजे. सरकारनें खाजगी जीवनांत ढवळाढवळ करूं नये व तसें सरकारनें केलें म्हणून असें झालें आहे, हें सर्वस्वीं खरें नाहीं. पहिल्या महायुद्धानंतर एक नवीन विचाराची लाट जगभर पसरली आणि नवीन पिढीवर एक नव्या विचाराची छाप बसली. जुने पुढारी व जुनी मंडळी राष्ट्राचा उपयोग वर्गस्वार्थासाठीं करतात. देशांतील तरुणांची प्रेरणा मूठभर लोकांच्या स्वार्थासाठीं खर्ची टाकली जाते. समाजांतील बहुसंख्याक हे वस्तुतः भांडवलशाही समाजव्यवस्थेंत गुलाम असतात व त्यांना गुलामगिरींत ठेवण्याच्या दृष्टीनें संस्कृति, तत्त्वज्ञान व साहित्य यांचा उपयोग केला जातो. समाजांतील आर्थिक विरोध, सांस्कृतिक विरोध अधिकाधिक ढोबळ होत जातात. सर्वतंत्र-स्वतंत्र या आर्थिक व्यवस्थेमध्यें श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातात. दरिद्री अधिक दरिद्री होत जातात. त्यांच्यांत समन्वय साधील असा कांहीं विचार समाजांत शिल्लक उरत नाहीं. श्रमजीवी यांना सतत राबवणें व पुंजीपतींच्या हातीं अफाट संपत्ति देणें ही परिस्थिति घडवून आणली जाते. संपत्ति म्हणजे सत्तेवरती हक्क सांगणारी सनद होते आणि अशा रीतीनें समाजामध्यें अन्याय वाढत जाऊन संघर्ष वाढत जातो. जें विद्यमान आहे तें उलथून लावण्याकडे प्रवृत्ति वाढते व मग ती प्रवृत्ति जुन्या सामाजिक संयमाला, अनुशासनव्यवस्थेला जुमानीत नाहीं. जुन्याबद्दल आदर कमी होतो. जुनें जग मार्गदर्शक ठरत नाहीं. आहे याची बाजू घेणें याचा अर्थ अन्याय कायम करणें आहे. तो दूर होण्यासाठीं मनें बेधडक झालीं पाहिजेत. पण तीं मग बेजबाबदार होतात व या स्थितींत खाजगी जीवनांत सरकारनें लोकमताविरुद्ध थोडें जरी केलें तरी त्याचा

परिणाम समाजांतील नैतिक बंधनें, सामाजिक अनुशासन यांचा नाश करण्यांत होतो. म्हणून संक्रमणाच्या काळांत जेव्हां नव्या विचारांचें पाणी जोरानें वाहात आहे, अशा काळांत कायद्याची अंमलबजावणी करावयाची म्हणजे तो कायदा जास्तींत जास्त प्रमाणांत जनमतानें संमत केला असला पाहिजे. सरकार अपराधाचें स्वरूप लक्षांत न घेतां शिक्षेचें प्रमाण ठरवूं लागलें म्हणजे परिस्थिति अधिकच चिघळते. न्यायाबद्दल मग समाजांत आदर राहात नाहीं व दिलेल्या शिक्षेच्या अयोग्यपणाबद्दल तीव्र संताप उत्पन्न होतो. अशी स्थिति समाजामध्यें असणें इष्ट नाहीं. अप्रिय कायदा दामटीत नेला, त्याची कसोशीनें अंमलबजावणी झाली, म्हणजे त्याला असलेला विरोध अधिकाधिक वाढतो आणि मग शहीदबाजी, हुतात्मेबाजी, मोठ्या प्रमाणावर समाजांत उत्पन्न होते. निदान उत्पन्न केली जाते आणि मग कायद्याची अंमलबजावणी अधिक कठीण होत जाते. हा सर्व अनुभव लक्षांत घेऊन कायदा करतांना सरकारनें जनतेच्या भावनांची अधिक कदर केली पाहिजे. कायदा न केल्यास स्वातंत्र्याचा दुरुपयोग किती होतो व कायदा केल्यानें कोणते दुष्परिणाम होतात याचा विचार करून सरकानें पाऊल टाकलें पाहिजे. पुष्कळ वेळां कायद्याची थट्टा होते. प्रत्यक्ष विरोध होत नसला तरी त्याला इतकें तुच्छ लेखलें जातें कीं, प्रत्यक्ष कायदा मोडल्यापासून जी भावना व जे परिणाम समाजांत घडून येतात, तितकेच कायद्याची थट्टा केल्यानें, त्याला तुच्छ मानल्यानें होते. त्याच-प्रमाणें सरकारनेंहि व्यक्तीचीं कांहीं कृत्यें केवळ तांत्रिक दृष्टीनें दोषार्ह ठरतात म्हणून लागलींच शिक्षेचा हातोडा अपराध्याच्या डोक्यावर घालूं नये. पुष्कळ वेळां उपेक्षा करून, तुच्छता दाखवून, शिक्षेपेक्षां अधिक चांगले परिणाम होतात. ऐन सत्या-ग्रहाच्या काळांत स्वतःच्या प्रतिष्ठेसाठीं विश्वास नसतांना कित्येक महाभागांनीं सत्याग्रह करण्याचें नाटकी धाडस केलें व मख्ख सरकारनेंहि १ रु. दंड; अगर पुन्हां असें करूं नका, असा पोक्त उपदेश करून त्यांना सोडून दिलें. परिणाम असा झाला कीं, तीं माणसें लोकांच्या मनांतून पार उतरलीं. तात्पर्य, कायद्याची अंमलबजावणी केव्हां करावी, किती दक्षतेनें करावी, याचा विचार विवेकानें केला पाहिजे. व्यक्तीचें स्वातंत्र्य हें महत्त्वाचें आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा ही राज्याच्या प्रतिष्ठेचा एक भाग आहे. आजकाल बारक्यासारक्या गोष्टींबाबत आमरण उपवासाची घोषणा केली जाते. अशा घोषणांना पुष्कळ वेळां उपेक्षेनें उत्तर दिलें पाहिजे. पण त्याचा हेतु जर महत्त्वाचा असला तर त्याबाबत अधिक दक्षता घेतली पाहिजे. अन्नसत्याग्रहानें जें पसंत नसेल तें करण्यास लावणें याचा अर्थ एकप्रकारें हिंसेचा स्वीकार करण्यासारखें आहे. आणि पुष्कळ वेळां कायद्याची प्रतिष्ठा अन्नसत्याग्रहानें मान्य केल्यास कमी होते व तसें झालें म्हणजे बहुसंख्याकांच्या स्वातंत्र्याला एखादद्दुसऱ्या व्यक्तीच्या हट्टासाठीं वा चक्रमपणासाठीं कमीपणा आणण्यासारखें होतें. जर सामान्यपणें बहुमतानें कायदा पास झाला आहे, तर अन्नसत्याग्रहाचें आव्हान सरकारनें स्वीकारलें पाहिजे. वारंवार अन्नसत्या-

ग्रह होऊं लागले म्हणजे लोकहि त्याची चेष्टा करूं लागतात व त्या शस्त्राची प्रतिष्ठा व पावित्र्य पण नष्ट होते. अन्नसत्याग्रहाचें स्वातंत्र्य कुणालाहि आहे, तथापि त्या स्वातंत्र्याचे परिणाम सामाजिक होणार असतील तर सरकारनें त्याबाबत योग्य तें केलें पाहिजे. समाधान करावें, तर ती नैतिक चूक ठरते व वैधानिक दृष्ट्या ती अयोग्य ठरते. तसेंच मरूं दिलें तर अज्ञानी पण भावात्मक लोकमत चिडतें व अनपेक्षित असें कांहीं तरी त्यांतून निर्माण होतें. आणि एकंदर परिणाम समाजांत असमाधान उत्पन्न करण्यांत होतो. तात्पर्य हें कीं, लोकमताबरोबर जास्तींत जास्त जुळणारे असे कायदे असले पाहिजेत. लोकांच्या भावनेला मोठ्या प्रमाणांत धक्का न देणारें असें सरकारचें धोरण व अंमलबजावणी असली पाहिजे.

सामाजिक क्षेत्रांत ज्या गोष्टी सरकारनें बंद केलेल्या असतात अगर मर्यादित केलेल्या असतात, त्याबाबत लोकमत बऱ्याच प्रमाणांत विरोधी असल्यास त्या गोष्टी जनतेला पुरविण्याच्या दृष्टीनें मग वाममार्गाचा स्वीकार केला जातो. दारू सरळ मार्गानें सरकार देत नाहीं ना, तर मग हातभट्ट्या सुरू करा; याप्रमाणें वाममार्गानें प्रतिबंधित गोष्टीचा पुरवठा करणें हा एक किफायतशीर धंदाच होऊन बसतो आणि मग ह्या धंद्यांत येणारे साधे लोकसुद्धां वर सांगितल्याप्रमाणें धाडसी बनतात, ठगे बनतात. चांगल्या कार्यासाठीं होणारा कायदेभंग याला वेळीं अवेळीं लोकांनीं उचलून धरलें म्हणजे त्या मार्गाचा अवलंब करण्याकडे लोकांची प्रवृत्ति होते. तें शस्त्र मग लोकप्रिय होतें. प्रसिद्धि देणारें होतें. त्याच्यांतील चांगला भाव तेवढा बाजूला सारून सरकारविरुद्ध त्याचा उपयोग करण्याची, समाजांतील जी गुंड मंडळी असतात त्यांचीं प्रवृत्ति होते. कायदेभंग मग संघटित पद्धतीनें होतो. दारूबंदीनंतर दारूपुरवठा करण्याचा धंदा. अर्थात् बेकायदेशीर धंदा-किती संघटित झाला आहे, याचा अनुभव मुंबई प्रांतांतील जनतेला चांगलाच आहे. औषधाच्या नांवाखालीं दारूचा पुरवठा होतो. कित्येक मनोरंजनाच्या संस्था बाहेरून मनोरंजन-पण आंतून मदिरापान-अशा स्वरूपाच्या असतात. दारूबंदी नसती तर जी किंमत दारूच्या बाटलीला पडली असती, त्याच्या कितीतरी पटीनें तिचा पुरवठा अवैध झाल्यानें तिला येते. अधिक नफा म्हणून अधिक धोका पत्करण्यास लोक तयार होतात. इंग्लंड व अमेरिकेमध्यें प्रतिबंधित वस्तूंचा व्यापार व पुरवठा करणारे लक्षाधीश झालेले आहेत. शिक्षा त्यांना होत नाहीं असें नाहीं, पण तुरुंगांत जाणें त्यांना कांहीं विशेष वाटत नाहीं. किंबहुना त्या धंद्यांतील एक सामान्य अवस्था ती मानली जाते. न नोंदलेल्या पण तितक्याच कार्यक्षम व संघटित अशा या अवैध व्यापार करणाऱ्यांच्या संस्था असतात. व आळीपाळीनें तुरुंगांत जाण्याची त्यांची तयारी असते आणि पोलीसहि हें सर्व जाणत असतात व राज्यांतील अधिकारी या चोरट्या व्यापारांचे बांधलेले असतात. करारमदार त्यांच्यांत झालेले असतात. या सर्व उद्योगधंद्याचा परिणाम सामाजिक नीतीवर होतो आणि सरळ मार्गानें चालणारे अनेक या धाडसी जीवनानें आकर्षिले

जातात. जे कायद्याविरुद्ध केलें जात आहे त्याचा पाठपुरावा समाजानें अविवेकानें केला म्हणजे हेंच व्हावयाचें हें निश्चित. समाजामध्यें अनेक गोष्टी प्रतिबंधित केल्या जात आहेत. उघडपणें वेश्या आपला धंदा करूं शकत नाहींत, त्याचा परिणाम इंग्लंडमध्यें काय झाला आहे, पाहाण्यासारखें आहे. रस्त्यांत हिंडावयाचें नाहीं मग कांहीं तरी प्रसाधनांचीं दुकानें काढावयाचीं, मसाज संस्था काढावयाच्या व सभ्य आच्छादना-खालीं सर्व तऱ्हेचे अनैतिक व्यापार सुरू करावयाचे, हा इंग्लंडकडील ताजा अनुभव आहे. वेश्याव्यवसाय चांगला असें कोणी म्हणत नाहीं. तथापि लोकमताला अनुकूल करून घेत घेत त्याप्रमाणें एतद्विषयक सामाजिक दृष्टिकोन बदलत बदलत हें कार्य व्हावयास हवें असतें. तथापि प्रत्येक राष्ट्रांत अगर समाजांत अशी कांहीं शिष्ट मंडळी असतात कीं, त्यांच्या नजरेला जें वाईट दिसेल तें बंद झालें पाहिजे, लिखाण त्यांच्या मनाला अश्लील वाटत असेल, तें जप्त झालें पाहिजे. पोषाखांतील थोडा अधिक नीटनेटकेपणा त्यांना छचोरपणा वाटतो, तो बंद झाला पाहिजे. पुष्कळ वेळां या तळमळणाऱ्या, तडफडणाऱ्या, तात्त्विक मंडळींच्या आग्रहाला सरकार बळी पडत असतें. तथापि पुष्कळ वेळां खुर्चीवर बसून नीतिमत्ता शिकविणारे स्वतःच घोडचुका करीत असतात व जें नको आहे तेंच समाजांत आकर्षणाचें केंद्र बनवीत असतात. दारूबंदी झाली कीं चहाबंदीकडे त्यांचें लक्ष लागतें. विडीचा झुरकासुद्धां त्यांना समाजाची नीतिमत्ता बिघडविणारा वाटतो. २०–२१ च्या चळवळींत ‘ शराब पीना हराम है ’ याबरोबर ‘ चहा पीना हराम है ’ म्हणून कित्येक उपाहारगृहांतून चहाच्या कपबश्यांचा नायनाट करण्यांत आला. याच आग्रही लोकांच्या, विद्याभ्यासजड लोकांच्या सांगण्यानें लैंगिक शिक्षण देणारीं सरळ व साधीं पुस्तकेंहि पटापट जप्त होऊं लागलीं होतीं. मुलींनीं नाटकांत काम करूं नये व काम केलें तर त्या बिघडतात, अशी त्यांची एके काळीं श्रद्धा होती आणि एका राजकीय संस्थेच्या मदतीसाठीं मुलींनीं ‘सौभद्र’ हें नाटक करावयाचें ठरविलें असतां अर्जुनाची भूमिका करणाऱ्या मुलीलाच या सनातनी मंडळींनीं पळवून नेलें होतें व सुभद्राहरणाऐवजीं अर्जुनहरणाचें प्रहसन झालें. आतां महाराष्ट्रांत गृहस्थी स्त्रियांनीं नाटकांत काम करणें, स्त्री-पुरुष-संमिश्रित नटसंच असतांना काम करणें ही एक व्यापक व मोकळ्या मनाची संस्कृतिनिदर्शक गोष्ट ठरली आहे. कालचा स्वेच्छाचार आजचा सदाचार झाला आहे. कालचा अपवादित वर्तनक्रम आज सर्वसामान्य झाला आहे. तथापि, ही सनातनी वेदाभ्यासजड प्रवृत्ति समाजांतून नाहींशी झालेली नाहीं व समया-नुसार त्या प्रवृत्तीचा आग्रह, हें व्हावें हें होऊं नये, असा चालूच असतो. प्रचलितापेक्षां, चालू रिवाजापेक्षां जरासें निराळें झाल्याबरोबर समाज बुडाला, नीतिमत्ता निर्वासित झाली, संस्कृति देशोधडीला लागली, हे आरोप अजूनहि केले जात आहेत. ‘ चालरीत सारी गेली नित्य नवीं सोंगें आलीं ’ हें मेळ्याचें पद पन्नास वर्षांपूर्वी रचलेलें मला वाटतें सनातन झालेलें आहे. आजहि त्याचा उपयोग केला जातो व अनंतकालपर्यंत केला

जाईल. पण लोकशाहीच्या युगांत चार माणसांना एकत्र येण्याची मुभा आहे. संघटित प्रयत्न मातीवर शेण पडल्यानंतर थोडी तरी माती घेऊन उठतें त्याप्रमाणें या मंडळीचे प्रयत्न प्रत्यक्ष यशस्वी झाले नाहींत, तरी प्रसिद्धीची माती त्यांच्या प्रयत्नाला लागते. समाजांतून चर्चा होते, वर्तमानपत्राच्या आखाड्यांतून चकमकी घडतात. येनकेन प्रकारेण या महाभागांनीं नको म्हटलेल्या गोष्टी सर्वसामान्य जनतेच्या डोळ्यांपुढें येतात. ज्ञानक्षेत्रांत लागलेले नवे नवे शोध त्यांच्या दृष्टीला उत्पात करणारे वाटतात व धार्मिक बाबतींत तर युक्तिवादाला थोडेंसें जरी स्थान दिलें तरी तीव्र संताप या लोकांचा होतो. देवतांविषयीं विनोदानें लिहिलेलें हे समजूं शकत नाहींत व सरळ त्याच्यावर सरकारनें कारवाई करावी, असें ते म्हणण्यास नेहमीं तत्पर असतात. कम्युनिस्ट लोकांचें तत्त्वज्ञान यांना पटणार नाहीं. समाजवादी लोकांचें तत्त्वज्ञान यांना पटणार नाहीं. प्रयत्नवादाची तडफदारी यांना मानवणार नाहीं. जुन्या हिंदु धर्माच्या कल्पनेप्रमाणें समाजांतील सर्वांनीं पायरीप्रमाणें वागलें पाहिजे, असें ते म्हणतात. हरिजनांनीं मंदिरांत जावें हें ते सहन करूं शकत नाहींत व सहभोजन म्हणजे महापाप ते मानतात आणि जेव्हां त्यांच्या मनाप्रमाणें होत नाहीं तेव्हां कालचक्रच उलटलें, आतां कलियुग मानलें असा डोक्यावर हात मारून जें प्राप्त झालेलें आहे त्याच्याशीं जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. ही सनातनी प्रचलितवादी बुरसटलेली मनोवृत्ति भारतांतच आहे असें नव्हे, तर सर्व देशांत सर्वकाळीं सापेक्षतेनें ती असते. नव्या विचाराचें शत्रुत्व, नव्या प्रयोगाचें शत्रुत्व, हेंच तिचें मुख्य लक्षण असतें व म्हणून असल्या ह्या मंडळींच्या आग्रहाला बळी पडून राज्यसत्तेनें कांहीं तरी करणें अयोग्य व प्रागतिक स्वातंत्र्याच्या दृष्टीनें अनिष्ट असतें.

समाजामध्यें व्यक्तिमात्राला मतस्वातंत्र्य असलें पाहिजे, विचारस्वातंत्र्य असलें पाहिजे व तें जर नसेल तर मानव ही पदवी, मनुष्य ही पदवी यथार्थ होत नाहीं. दोन्ही शब्दांत मनू हा धातु आहे व त्याचा अर्थ विचार करणें हा आहे. विचार करतो तो मनुष्य, विचार करतो तो मानव, म्हणून मानवाचें मुख्य लक्षण जें विचार करणें त्याबाबत कुठलेंहि विसंगत असें वातावरण समाजांत असतां कामा नये. मनुष्याच्या मनांत जे विचार येतात, त्यांचा संबंध त्याच्या भोंवतालच्या परिस्थितीशीं असतो. कांहीं तरी पोकळींत मनुष्य विचार करीत नाहीं. त्याच्या विचाराचा जन्म त्याच्या भोंवतालीं उपलब्ध होणाऱ्या परिस्थितींतून होतो व समाजांतील परिस्थिति विविध प्रकारची असते. कोणी सुखांत लोळत असतात, कोणी दुःखाचे वांटेकरी असतात, कुठें किती खावें, किती ल्यावें, याला मर्यादा नसते, तर कुठें दुपारची भ्रांत असते व गुडघ्यांत मान घालून थंडींत रात्र काढावी लागते. भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें विरोधानें भरलेलें हें जग सुखमय आहे का दुःखमय आहे, हें कोणी सांगूं शकत नाहीं. आणि ज्याला जसा अनुभव आला असेल व ज्या राहणींत तो जीवनाचा उपयोग घेत आहे, त्या राहणीला

अनुसरून ती व्यक्ति विचार करीत असते. म्हणून सर्व लोकांना एकाच मापानें मोजणें योग्य नाहीं. अमुक एक वरच्या वर्गाला आवडतें, म्हणून सर्वांना तें आवडलें पाहिजे, सर्वांना तशीच अभिरुचि असली पाहिजे, अशी शिक्केबाजी जीवनांत चालत नाहीं. कुणाला स्वयंवर नाटकांतील रुक्मिणीचे शालीन व ललितपूर्ण हावभाव आवडतील तर कुणाला तमाशांत नाचणाऱ्या एखाद्या कौसल्येचा ओबडधोबड अभिनय आवडेल आणि अशी ज़र एखाद्याची आवड असली तर ती चांगली अगर वाईट असें निरपेक्षपणें ठरवणें हें शिष्टपणाचें आहे. त्यांत भंपकपणा आहे. म्हणून असल्या शिष्टमंडळींचें प्रस्थ अगर असल्या शिष्टप्रवृत्तीचा प्रभाव समाजावर पडला म्हणजे त्या समाजांत कला अगर साहित्य श्रेष्ठ दर्जाचें निर्माण होणार नाहीं. मानसिक स्वातंत्र्याच्या वातावरणांत कला खुलत असते. साहित्य क्षणाक्षणाला रमणीयता व रसोत्कर्ष दाखवीत असतें. फाजील सोज्वळपणा हा प्रागतिक समाजाला अडथळा असतो. फाजील लांबनाके टीकाकार साहित्य-क्षेत्रांत धुडगूस घालीत असले म्हणजे रसिकता तेथें संकुचित होते व प्रसंगीं लुप्तहि होते. श्रेष्ठ साहित्यिकांच्या जीवनाला, श्रेष्ठ कलाकारांच्या कलेला, असल्या प्रवृत्तीचीं माणसें राहूकेतूसारखीं असतात. म्हणून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीनें समाजामध्यें मानसिक स्वातंत्र्य असलें पाहिजे. विचारस्वातंत्र्याला प्रोत्साहन मिळालें पाहिजे. त्याचबरोबर वरील विचारसरणीचीं भुतें समाजानें व सरकारनें उपेक्षेनें व दुर्लक्ष करून शांत केलीं पाहिजेत. सामान्यपणें व्यक्ति आपापल्या व्यवसायापलीकडे फारसें पहात नाहीं. नव्या विचारांचे ते स्वागत करीत असतात, तथापि त्यासाठीं कांहीं त्याग करावयास पाहिजे, अगर विशेष जागृत असलें पाहिजे असें सर्वांना वाटत नाहीं. घरचें खाऊन लष्कराच्या भाकरी भाजण्याचा धंदा सामान्यपणें उपद्यापी लोकच करतात असें मानलें जातें. म्हणून सरकारनेंच दक्षता घेतली पाहिजे. लोकांच्या मनावर जीं परंपरागत दडपणें आहेत तीं बाजूला सारण्यासाठीं केलेले सर्व प्रयत्न सरकारनें स्वागतार्ह मानले पाहिजेत व प्रतिक्रियावादी ओरडण्याला बळी पडून मतस्वातंत्र्यावर, विचार-स्वातंत्र्यावर बंधनें घालूं नयेत. स्वातंत्र्य ही मौलिक प्रवृत्ति व मौलिक अवस्था असल्यानें त्याचा सदुपयोगच होत आहे असें गृहीत धरलें पाहिजे. स्वातंत्र्य हें स्वैराचार नाहीं, हें दाखविण्याचें काम जे त्याला विरोध करीत आहेत त्यांनीं दाखविलें पाहिजे. जे स्वातंत्र्य मर्यादित करा असें म्हणतात, त्यांच्यावर जो स्वातंत्र्याचा उपयोग होत आहे तो दुरुपयोग आहे हें सिद्ध करण्याची जबाबदारी असली पाहिजे. आणि खरोखरच तो दुरुपयोग आहे अशी जोंपर्यंत सामान्य जनाची खात्री होण्याइतकी परिस्थिति नसेल तोंपर्यंत मर्यादा सरकारनें घालूं नये. सरळ विचारस्वातंत्र्याविरुद्ध अगर मतस्वातंत्र्याविरुद्ध आपण आहोंत असें स्वातंत्र्याचे विरोधक कधींहि म्हणत नाहींत. कारण, तें स्वातंत्र्य त्यांनाहि हवें असतें. तथापि, समाजाच्या हितार्थ त्यांना त्या मर्यादा हव्या असतात. जणूं कांहीं समाजाच्या हिताचा मक्ता त्यांनींच घेतलेला असतो. ते मोठ्यानें ओरडतात म्हणून

त्यांचें म्हणणें खरें मानण्याचें कारण नाहीं. अगर त्यांचें म्हणणें हें सर्वसामान्य समाजाचें म्हणणें मानण्याचें कारण नाहीं. देशांतील वर्तमानपत्रें संघटित रूपानें एखाद्या विचार-सरणीवर अगर वर्तनक्रमावर तुटून पडलीं म्हणून सरकारनें ताबडतोब तशी वस्तुस्थिति आहे असें मानून कारवाई करणें इष्ट नाहीं. संबंधित गोष्ट असामाजिक आहे, अयोग्य आहे, याची खात्री स्वतंत्रपणें सरकारनें करून घेतली पाहिजे व तशी झाल्यास मग कांहीं उपाययोजना केल्यास ती योग्य ठरते. सगळ्या जगाचा अनुभव असा आहे कीं, विचारस्वातंत्र्यांतूनच ज्ञानाची प्रगति झाली आहे. राजकीय व राष्ट्रीय स्वातंत्र्य याच स्वातंत्र्यांतून निर्माण झालें आहे व तें जर नसेल तर लोकशाही राज्याचें भविष्य उज्ज्वल नाहीं. इतकेंच काय, जगाचें भविष्यहि उज्ज्वल राहाणार नाहीं. मतप्रदर्शनाचा अधिकार व संघ करण्याचा अधिकार हे दोन्ही स्वातंत्र्याच्या श्वासनलिका ( लंग्ज् ऑफ फ्रीडम् ) आहेत, हें गांधीजींचें वर्णन यथायोग्य आहे.

## : ३ :

# स्वातंत्र्य व सामाजिक मर्यादा

पहिल्या प्रकरणांत स्वातंत्र्याच्या अर्थासंबंधीं सामान्यपणें निरूपण केलें. स्वातंत्र्य हें व्यक्तीच्या उन्नतीसाठीं, तिच्या मानसिक विकासासाठीं, जितकें आवश्यक आहे तितकेंच समाजाच्या धारणेसाठीं आवश्यक आहे हें विशद करून सांगितलें. दुसऱ्या प्रकरणांत स्वातंत्र्य या व्यापक कल्पनेंत विविध क्षेत्रांतील स्वातंत्र्यें येतात त्यांपैकीं विचारस्वातंत्र्य व त्याचा आविष्कार ज्यायोगें होतो तें व्यक्तिगत मतस्वातंत्र्य व संघस्वातंत्र्य यांचा विचार केला. यानंतर स्वातंत्र्याचा विचार सामाजिक व्यवस्थेच्या दृष्टीनें आधीं करण्याचें योजलें आहे. स्वातंत्र्य हें व्यक्तीच्या सुखासाठीं, व्यक्तीला आपलें जीवन सार्थ झालें, त्याला सांगता आली, असें वाटावें म्हणून इष्ट व आवश्यक ठरतें. म्हणून स्वातंत्र्याचा अर्थ सांगतांना मनुष्याच्या सुखाच्या आड जे प्रतिबंध, ज्या मर्यादा येतील, त्यांचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य असें सामान्यपणें विवरण करतांना सांगितलें. व्यक्तीचें सुख याचा अर्थ जें त्याला स्वतःला आहे असें वाटतें, ही कसोटी योग्य नाहीं. त्याचें सुख निश्चित करतांना, त्याची चर्चा करतांना, समाजाचा संदर्भ व परिस्थिति लक्षांत घ्यावी लागते. मनुष्याचा प्रत्येक विचार कार्यान्वित होणार असेल, त्याची प्रत्येक इच्छा परिपूर्ण होणार असेल, तर समाजामध्यें गोंधळ निर्माण होईल. कारण, अनेकांच्या इच्छा दुसऱ्या अनेकांच्या इच्छेविरुद्ध असतात. म्हणून विविध जनांच्या इच्छेंत समन्वय करावा लागतो व कांहीं मानकें, कांहीं प्रमाणें ठरवावीं लागतात. भाषणस्वातंत्र्य नसेल तर स्वातंत्र्य :नाहीं हा सिद्धान्त आधुनिक जगांत सर्वमान्य झाला आहे. त्याचप्रमाणें थोड्याच व्यक्तींना अगर समाजांतील विवक्षित लोकांना खास अधिकार देऊन इतरांना ते नाकारणें हें स्वातंत्र्याच्या कल्पनेला विसंगत आहे. त्याचप्रमाणें ठराविक लोकांनीं जें ठरविलें असेल त्याच्या तंत्रांत लोकांनीं चाललें पाहिजे. त्याप्रमाणें एखाद्या विशिष्ट विचारसरणीप्रमाणें सर्वांनीं वागलें पाहिजे, अगर एखादी विचारसरणी परंपरेनें का होईना, समाजाच्या विचारसृष्टींत एकमेवपणें प्रभावी झाली तर त्या ठिकाणीं स्वातंत्र्य आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. तळ्यामध्यें पुष्कळ पाणी आहे, पण पिणाऱ्याच्या ओंजळींत जें येईल तेंच खरें व त्यावरच तो आपली तहान

भागवणार. हाच न्याय सामाजिक जीवनांत असतो. मनुष्य आपापल्या परीनें त्याला येत असलेला अनुभव विचारांत घेत असतो आणि त्याला अनुसरून आपलें मत अगर आपला अभिप्राय बनवीत असतो व हा अनुभव घेण्यास, आपला अभिप्राय व्यक्त करण्यास, त्याला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे आणि जर या क्षेत्रांत ठराविक मतांचाच्र प्रभाव पडला व त्याविरुद्ध बोलणें अगर मत व्यक्त करणें कायद्यानें जरी नसलें तरी समाजांत असलेल्या प्रथेनें अगर परंपरेनें कठीण वाटत असलें तर व्यक्तींना तेथें पूर्ण स्वातंत्र्य नाहीं, असाच्र त्याचा अर्थ होतो. कोणी नाक बंद केलें नाहीं, कोणी तोंड बंद केलें नाहीं, पण कोंडलेलें वाटतें हें निश्चित. रस्ता बंद नाहीं पण मन पावलें टाकतच नाहीं ही परिस्थिति तेथें दिसून येते. आणि या दृष्टीनें विचार करतां राजसत्तेप्रमाणें सामाजिक सत्ता ही पण आपल्या सिंहासनावर बसून आपला अंमल गाजवीत असते. राज्यसत्ता कांहीं करीत नाहीं, कुठलाहि अडथळा ती आणीत नाहीं, तथापि गणवेष नसलेला लोकमताचा फौजदार दमदाटी देतच असतो व लोक त्याला भीत असतात. सामान्य लोकांची नसली तरी मनाची लाज असावी ही म्हण ह्या संदर्भांत उलटी होते. मन निर्लज्ज नसलें तरी निश्चित झालेलें असतें. पण लोकमताचा बागुलबुवा त्याच्यापुढें उभा असतो व बहुसंख्याक लोक त्याच्यापुढें गांगरतात, गडबडतात, व गचाळ बनतात. आणि मनुष्य हा एक सामाजिक वस्तु असल्यानें त्याचें सर्व जीवन समाजाशीं संबंधित असतें, समाजाच्या वातावरणाशीं संलग्न असतें. त्यानें कितीहि मनांत आणलें तरी आपल्या इच्छेप्रमाणें त्याला बोलतां येत नाहीं, त्याला चालतांसुद्धां येत नाहीं. याकामीं, त्याला कोणी राज्यातर्फे मना करीत नाहीं. जी मनाई होते ती न दिसणाऱ्या पण तितक्याच प्रभावी लोकमताच्या शिपायामार्फत होते. रस्त्यावर जातांना वाहतुकीचें नियंत्रण करणारा पोलीस नसूनसुद्धां वाटेल त्या दिशेनें तो जाऊं म्हणेल तर तो जाऊं शकत नाहीं. सभेला बंदी नाहीं. तथापि जमलेल्या सभेपुढें तो वाटेल तसें बोलूं शकत नाहीं. आणि त्याचें मन सामाजिक मर्यादांना भीत असतें असें म्हटलें तरी चूक होणार नाहीं. याचें कारण त्याचें जीवन अन्यांच्या जीवनाशीं मिसळलेलें असतें व अन्यांचें जीवन त्याच्या जीवनाशीं मिसळलेलें असतें व मनुष्य आणि वाघ जवळ जवळ येत असतांना आपापल्या परीनें एकमेकांना भीत असतात, तसेंच थोडेंसें येथें होतें. समाजाचें जीवन शांत रहावें, निष्कारण खळबळ होऊं नये व ती खळबळ उत्पन्न करण्याच्या कामीं आपण आपली जबाबदारी सांभाळली पाहिजे, याची जाणीव न कळत पण निश्चितपणें प्रत्येक व्यक्तीच्या मनांत साधारणपणें वावरत असते. ही जाणीव म्हणजे खरोखर व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा असते आणि म्हणून व्यक्तीचें स्वातंत्र्य निरपेक्ष नसतें, ही जी जाणीव उत्पन्न होते, ती समाजाला आलेला अनुभव व येत असलेल्या अनुभवांतून समाजांत उत्पन्न होते व व्यक्ति ही समाजांत वावरत असल्यानें त्याच्याहि मानसिक सृष्टींत तिचे परिणाम होत असतात. दुधाच्या प्याल्यांत साखर टाकल्यानें प्याल्यांतील दुधाच्या

प्रत्येक बिंदूला गोडी येते; अगर पाण्यांत लिंबू पिळल्यानें त्या प्याल्यांतील पाण्यांतील प्रत्येक बिंदूला लिंबाचा आंबटपणा येतो. त्याप्रमाणें समाजांत जें कांहीं घडतें — चांगलें अगर वाईट, इष्ट अगर अनिष्ट — त्या सर्वांचा परिणाम समाजांतील प्रत्येक व्यक्तीवर होत जातो व समाजामध्यें अशा रीतीनें ज्या परंपरा उत्पन्न होतात, जीं मूल्यें आकार घेतात, तीं साहजिकच प्रत्येक व्यक्तीवर नैतिक दृष्ट्या बंधनकारक असतात. बरीचशीं बंधनें जीं समाज मान्य करीत असतो, तीं मग कायद्यांत प्रवेश करतात आणि मग तीं आज्ञास्वरूपी बनतात. याचा अर्थ सरकारनें अगर राज्यसत्तेनें कायद्यांत स्वीकारलेल्या सर्व परंपरा अगर सर्व मूल्यें हीं योग्य अगर श्रेष्ठ आहेत असा नव्हे. आज्ञापिलें म्हणून योग्य असें निःसंदेहपणें मानणें योग्य ठरत नाहीं. पण स्वातंत्र्याची निश्चिति, त्याच्या मर्यादेची निश्चिति त्यांतील भावात्म अर्थ हा स्पष्ट होतो. सूत्राचा अर्थ टीकेनें स्पष्ट व्हावा, तसा थोडासा प्रकार येथें होतो.

तसें पाहिलें तर स्वातंत्र्य व त्याला मर्यादा यामध्यें विरोधाभास दिसतो. तथापि, हेंहि मानलें पाहिजे कीं, — व तसें मागें सांगितलें आहे — स्वातंत्र्य हें मर्यादा असतील तरच यथार्थ ठरतें. 'बंधनांत मोक्ष आहे' असें सांगण्यासारखें हें आहे. तथापि, जसें व्याकरण हें अर्थनिश्चितीसाठीं आवश्यक असतें, त्याप्रमाणें स्वातंत्र्याच्या अर्थानुभवाच्यासाठीं बंधनाचीं क्रियापदें मानलीं पाहिजेत, जें बंधन अगर जी मर्यादा समाज आपण होऊन निर्माण करतो, तिच्यामागें अनुभवाचा मोटा सांठा असतो. अनुभवाची मोठी पार्श्वभूमि असते. आणि मग तीं बंधनें व त्या मर्यादा मानण्यांत कांहीं नैतिकपणा आहे अगर त्यांत कांहीं स्वाभिमानाला बाध येतो असें नाहीं. ज्याप्रमाणें शास्त्रीय जगांत प्रयोग करून जीं प्रमेयें सिद्ध झालेलीं आहेत, त्याबाबत पुनः पुन्हां शंका प्रदर्शित करणें योग्य ठरत नाहीं व तीं प्रमेयें सिद्ध मानून पुढील विचार करावयाचे असतात. पुढील प्रयोग योजावयाचे असतात. त्याचप्रमाणें समाजाच्या अनुभवांत कांहीं कांहीं मूल्यें जवळ जवळ निरपेक्षपणें मानलीं जातात. कारण समाजाच्या जीवनांत तीं पूर्णतया स्थापित झालेलीं असतात. एका दृष्टीनें तीं शाश्वत मूल्यें झालेलीं असतात, आणि तीं मान्य आहेत, त्यांना आतां विरोध शक्य नाहीं, हें गृहीत धरून नागरिक आपल्या जीवनामध्यें वाटचाल करीत असतो. रस्त्यानें जातांना एखाद्या ठिकाणाहून तीनचार रस्ते फुटत असले, तर त्या ठिकाणीं कोणता रस्ता कुठें जातो हें दाखविणारी पाटी असेल तर पथिकाला मोठी मदत होते. त्याला अमुक रस्ता अमुक ठिकाणीं नेतो याबद्दल शंका राहात नाहीं व त्याचें काम मग रस्त्यावर जर कांहीं अडथळे असतील तर त्यांचा विचार करावयाचा, त्वरेनें अथवा मंदगतीनें जावयाचें याचा निर्णय घ्यावयाचा, कसें जावयाचें, पायीं का सायकलगाडी का मोटारींतून, हें ठरवावयाचें. पण रस्ता कोठें नेतो याबद्दल त्याला शंका राहात नाहीं. कारण प्रत्यक्ष अनुभवावरच तो रस्ता कोठें जात आहे हें सांगितलेलें असतें.

त्याचप्रमाणें संसाराच्या व जीवनाच्या रस्त्यावर व्यक्तीच्या दृष्टीनें परिस्थिति असते. मागें आलेले अनुभव व त्यांवर आधारलेलीं मूल्यें व परंपरा रस्ता कोठें जाणार हें त्याला स्पष्ट सांगत असतात. इतकेंच नव्हे, तर त्यानें कोठें जावें हेंहि या मूल्यांमार्फत सुचविलें जात असतें. त्याची बुद्धि या मूल्यांना मानील अगर मानणार नाहीं. अगर आपण स्वतःचें कांहीं तरी विशिष्ट करावें ही प्रेरणा त्याला होईल. आपण जें करावयाचें योजलें आहे त्याचा अंत काय होईल याचीहि कल्पना त्याला मिळते. त्यानें ठरविलेला मार्ग अंतीं त्याला कोठें नेईल याचीहि कल्पना तो करूं शकतो. अन्यांना आला तसा अनुभव त्याला सामान्यपणें येईल. तथापि अन्य तऱ्हेचा अनुभव त्याला येणार नाहीं असें नाहीं. कायद्यानें प्रतिबंधित केलेला मार्ग त्यानें चोखाळल्यास समाजांतील लोकांनीं केलेल्या पुरस्काराऐवजीं कायद्याच्या पोलिसाचा दंडुका त्याला मिळेल. लोकांचा अनुभव न मानला तर त्याला आलेल्या अनुभवाची किंमत त्याला द्यावी लागेल. समाजाची उपेक्षा, समाजाचा विरोध, समाजांत अपकीर्ति हेंहि त्याच्या वांट्याला येईल. केवळ कायदा न मानल्यानें घ्याव्या लागणाऱ्या प्रायश्चित्तावरच भागेल असें नाहीं; म्हणून कायद्याशीं जुळवून राहण्यांत म्हणजे मार्गांत सरळ चालण्यांत त्याचें हित अधिक आहे. समाजाच्या विरोधाला तो जुमानणार नाहीं, समाजाच्या लोकमताच्या मर्यादा तो मानणार नाहीं व आपल्या मौलिक हक्काच्या प्रेरणेनें स्वातंत्र्याचा उपयोग तो करूं म्हणेल, तर कांहीं काळपर्यंत समाजाला विरोध करूनहि तो तें करूं शकेल. तथापि, त्याचें स्वातंत्र्य व कायदा यांच्यांत विरोध आल्याबरोबर कायद्याच्या मर्यादा त्याला मग निष्क्रिय करतील हें उघड आहे. स्वातंत्र्य म्हणजे एका अर्थानें कायद्याला धरून कायद्याच्याविरुद्ध न जातां जें उपलब्ध होईल तेवढेंच, हा मग स्वातंत्र्याचा अर्थ होतो.

खरें स्वातंत्र्य जितक्या प्रमाणांत तें विद्यमान कायद्याला धरून असेल तेवढें इष्ट. इतकेंच नव्हे, तर कायदा व स्वातंत्र्य यांच्यांत जितकी सुसंगति असेल, तेवढें अधिक स्वारस्य स्वातंत्र्याच्या उपभोगांत असतें. पण येथें कायदा याचा अर्थ तो अधिकृत संस्थेनें केलेला आहे, अधिकृत व्यक्तीनें तो केलेला आहे, असा संकुचित अर्थ नाहीं. येथें कायद्याचें महावस्त्र व्यक्तीचा व समाजाचा अनुभवरूपी ताणा व बाणा यांनीं विणलें आहे असा व्यापक अर्थ आहे. कायद्याचें स्वारस्य कोणी जाहीर केलें यांत नसून, काय जाहीर केलें आहे यांत आहे. जनतेची संमति त्यांत असली पाहिजे, हें मुख्य सूत्र आहे. जर त्या कायद्याच्यामागें जनतेच्या संमतीचा मंगल भाव नसेल, तर त्यांत व लोकांच्या स्वातंत्र्यांत सुसंगति राहणार नाहीं हें उघड आहे. समाजांतील नानाविध पूर्वग्रह, विविध अनुभव व अभिप्राय, परस्परांशीं न जुळणारे हितसंबंध या सर्वांच्या क्रिया-प्रतिक्रियांतून ज्याला सार्वजनिक लोकमत ही संज्ञा आहे, तें निर्माण होत असतें आणि असा सार्वजनिक लोकमताचा स्वातंत्र्याशीं संबंध येत असतो अशा लोकमतांत

व स्वातंत्र्याच्या मौलिक कल्पनेंत जितके सुसंगत व जुळणारे संबंध राहतील तेवढे चांगले. नागरिक आणि विशेषतः लोकशाहींतले नागरिक यांचें स्थान राज्यव्यवस्थेंत व समाजव्यवस्थेंत महत्त्वाचें असतें. त्यानें केवळ राज्याच्या आज्ञा व समाजाच्या परंपरा निमूटपणें मानावयाच्या एवढेंच त्याचें कर्तव्यकर्म असत नाहीं. त्यानें समाजांत निर्माण होणाऱ्या नाना तऱ्हेच्या सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष दिलें पाहिजे. त्याबाबत विचार केला पाहिजे. आणि आपल्या विचारपूर्ण अभिप्रायानें समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीनें मार्गदर्शन केलें पाहिजे. किंबहुना, असें जर तो न करील तर नागरिकाचें कर्तव्य त्यानें पूर्णपणें बजावलें असें होणार नाहीं. आणि त्याच्या दृष्टीनें त्याच्या मताला जें योग्य वाटतें तें करणें मग क्रमप्राप्त कर्तव्य ठरतें. म्हणून त्याला विचार करतां येण्यासाठीं योग्य अभिप्राय देण्यासाठीं अवश्य ती परिस्थिति समाजांत उपलब्ध असली पाहिजे. त्यानें विचारपूर्वक व्यक्त केलेला अभिप्राय याचा अर्थ कांहीं तरी तत्कालीन परिस्थितीला धरून दिलेला अभिप्राय नव्हे. किंवा कांहीं तरी भावनावश होऊन दिलेला अभिप्राय नव्हे, तर दीर्घ दृष्टीनें विचार करून दिलेला अभिप्राय होय. हा अभिप्राय देण्याच्या क्रियेंत त्यानें सखोल दृष्टीनें पाहिलेलें असतें, त्याची विचारसरणी उथळ नसते. खरें सत्य काय आहे, महत्त्वाचें काय आहे, याचा विचार त्यानें केलेला असतो. कोणी तरी सांगितलें, कोणी तरी लिहिलें तेवढ्यावर विसंबून दिलेला अभिप्राय विचारयुक्त अभिप्राय नव्हे. मनन न करतां दिलेलें मत हें खरें मत नव्हे. सत्य काय आहे हें पाहण्यासाठीं कांहीं सूक्ष्म रीतीनें त्यानें चौकशी केलेली असते. त्याच्यापुढें आलेले किंवा त्याच्या मनांत असलेले पूर्वग्रह यांची त्यानें छाननी केलेली असते. जें विकृत अगर आग्रहीपणें दाखविलेलें असेल त्याच्यांत त्यानें खरें व प्रमाणबद्ध काय आहे, याची पाहणी केलेली असते व मग एखाद्या न्यायाधीशा-प्रमाणें सत्य काय आहे हें पाहून तो आपलें मत बनवीत असतो. वास्तविक याप्रमाणें प्रत्येक व्यक्ति विचार करून वागूं लागली, तर समाजांत दुःखाला जागा राहणार नाहीं. तथापि, नागरिकानें असें वागावें हा आदर्श पुनः पुन्हां लोकांच्या डोळ्यांपुढें आणला पाहिजे हेंहि तितकेंच महत्त्वाचें आहे. समाजामध्यें केवळ बाह्य शांतता व सुव्यवस्था आहे, एवढ्यानें समाजांत शांतता अगर सुव्यवस्था आहे असें म्हणणें चूक आहे. खरी शांतता म्हणजे समाजाच्या मानसिक क्षेत्रांत जी शांतता असेल ती. त्याचप्रमाणें समाजामध्यें समाजाचें असें एक बौद्धिक जीवन असतें. त्यामध्यें समतोलपणा, समंजस-पणा असणें म्हणजे समाजांत सुव्यवस्था आहे असें मानलें पाहिजे. सर्वत्र परस्पर विचार प्रगट केले जात आहेत, विचारांचा गोंधळ निर्माण झालेला आहे, शक्याशक्यतेचा विचार न करतां कांहींहि बोललें जात आहे, 'वचने किम् दरिद्रता' हा न्याय प्रभावी आहे, असें झालें म्हणजे समाजामध्यें प्रथम वैचारिक अराजक माजतें व नंतर जें आज चिंतावें तें उद्यां व्हावें असा अनुभव येतो. या दृष्टीनें विचार करतां समाजांतील प्रत्येक

व्यक्तीनें पुढें आलेल्या घटनेंतील वस्तुस्थिति न्याहाळून पाहिली पाहिजे, सूक्ष्मपणें निरीक्षिली पाहिजे. सत्य व प्रचार एकत्र मिसळलेले असतात, ते पारखून प्रचाराच्या कोंड्याला दूर करून सत्याचे दाणे गोळा केले पाहिजेत. एवढी मोठी जबाबदारी नागरिकावर आहे. केवळ स्वातंत्र्याचा हक्क सांगणें हें सोपें; पण त्याबरोबर येणारी जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

वर सांगितलेली जबाबदारी पार पाडणें हें कठीण आहे. समाजामध्यें सत्य काय, असत्य काय, प्रस्तुत काय व भोंगळ काय, क्षणिक काय व युगाचें काय, या सर्वांतून जें प्रस्तुत आहे, जें सत्य आहे, जें दीर्घ दृष्टीनें उपयुक्त आहे तें बाजूला काढून त्यावर आपली बुद्धि स्थिर करणें व त्याला धरून आपले आदर्श निर्माण करणें अगर पोसणें, यामध्यें नागरिकाच्या व्यक्तित्वाला व कर्तृत्वालाहि वाव असतो. पुष्कळ गोष्टी मागें सांगितल्याप्रमाणें सिद्ध प्रमेयें म्हणून स्वीकाराव्या लागतात. प्रसंगीं जुन्या दागिन्यांना उजाळा द्यावा लागतो, त्याप्रमाणें या गृहीत धरलेल्या गोष्टींना, सिद्ध प्रमेयांना सुद्धां आधुनिकतेच्या निकषांवर तपासून घ्यावें लागतें. पूर्वग्रह कसे बनतात हें सांगणें कठीण. तथापि, ते बनतात--प्रसंगीं कळत, प्रसंगीं न कळत, हा प्रत्येकाचा अनुभव आहे. आणि बनलेल्या पूर्वग्रहाविरुद्ध त्याला कोणी सांगूं लागला तर साहजिकच मनुष्य रागावतो व वारा लागूं लागला म्हणजे मनुष्य जसा अंगावरील शाल अधिकाधिक घट्ट करतो, त्याप्रमाणें त्याच्या मनाची क्रिया होते. आणि त्या पूर्वग्रहाविरुद्ध सामान्य पुरावा कोणी दाखल करूं लागला तर त्या पुराव्याची टिंगल करण्याकडे प्रवृत्ति होते. तळहातावर ठेवलेल्या आंवळ्याप्रमाणें ज्या ठिकाणीं वस्तुस्थिति शाबीत करतां येत नाहीं, तेथें पूर्वग्रह वितळत नाहींत, बदलत नाहींत व पूर्वग्रहांचा संबंध जेवढा मतविषयक, दृष्टिकोनविषयक (सब्जेक्टिव्ह) तेवढा तो पूर्वग्रह दूर करणें कठीण होतें. कांहीं पूर्वग्रह थोडेसे सत्य व बराचसा प्रचार या मिश्रणानें झाले असले, तर विरोधी प्रचार सतत व जास्त होत गेल्यास नाहींसे होतात आणि मग सत्याच्या प्रमाणांत, वस्तुस्थितीच्या प्रमाणांत मर्यादित होत जातात. पण जेथें पूर्वग्रह प्रचारांतूनच निर्माण झालेले असतात त्या ठिकाणीं नुसत्या विरुद्ध प्रचारानें ते दूर होत नाहींत आणि मनुष्य मग आपण प्रचाराला बळी पडलों हें म्हणण्यास तयार नसतो. सत्यनिष्ठेपेक्षां अभिमान अधिक प्रभावी ठरतो. न्याय देण्यापेक्षां आपलें अज्ञान झांकण्याकडे अधिक प्रवृत्ति होते. असल्याप्रसंगीं खोट्या प्रचाराचा फुगा यत्किंचित् पण दृष्टीची खात्री करणारें सत्य पुढें आल्यास तो फुटतो. या गोष्टीचा अनुभव जेव्हां समाजामध्यें एखाद्या घटनेबद्दल तीव्र मतभेद होतात, अगर मोठमोठ्या राजकीय वा सामाजिक प्रश्नांबाबत प्रक्षोभ उत्पन्न होतो, त्यावेळीं येतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळीं साध्या गोष्टी विकृत कशा सांगितल्या गेल्या, सरळ मार्गानें चालणारे विकृत बुद्धीचे कसे रंगविले गेले, हा अनुभव ताजा आहे. आधुनिक जगामध्यें जाहीर रीत्याहि प्रचार होतो. वर्तमानपत्रें, सभा

यांमार्फत तर प्रचार होतोच होतो, पण त्याबरोबर ट्राममधून, लोकल गाड्यांतून, हॉटेलांतून, पानगृहांतून, विडीवाल्यांच्या दुकानांतून, केशकर्तनालयांतून, वाचनालयांतून जो प्रचार होत असतो तो अधिक जहरी असतो. आणि कुठेंहि असत्य प्रचाराला कोणी प्रामाणिकपणें खोटें ठरविण्याचा प्रयत्न:केल्यास तोच खोटा ठरला जातो. कोणीहि मनुष्य प्रामाणिकपणें सत्य काय आहे, वस्तुस्थिति काय आहे, याचा विचार करीत नाहीं. कारण जें वर्तमानपत्रांत येतें, तें सत्य असल्याशिवाय कसें येईल, असें प्रामाणिकपणें सर्वसामान्य लोकांना वाटत असतें. हेतूचा विपर्यास व सत्य दडपून टाकणें, असत्य सूचित करणें या गोष्टी तत्त्वतः समाजांतील बहुसंख्याकांना अयोग्य व अनैतिक वाटत असतात. तथापि, त्यावर विश्वास ठेवणारे मोठ्या संख्येनें समाजांत आढळून येतात. प्रत्येकानें प्रत्येक गोष्टीची चौकशी करून आपलें मत बनवावें हें इष्ट असलें तरी घडून येत नाहीं. अमुक बातमी अमक्या अमक्या वर्तमानपत्रांत आली आहे, अमुक मत अमक्या अमक्या माणसानें दिलें आहे, तें गृहीत धरून लक्षावधि माणसें समाजामध्यें वागत असतात व स्वतः विचार करण्याचा त्रास, अगर मनस्ताप म्हणा, स्वीकारण्यास तयार नसतात. त्याचबरोबर हेंहि खरें कीं, जर त्यांच्यापुढें सत्य काय आहे हें पुनः पुनः येत गेलें तर मतपरिवर्तन होतें. म्हणून समाजामध्यें जास्तींत जास्त भाषण व लेखनस्वातंत्र्य असलें पाहिजे. आणि जेव्हां विरोधी मतामागील सत्य कानावर येतें, त्याबद्दलचें लिखाण वाचण्यांत येतें, मग कितीहि मनुष्य आग्रही असला तरी, हट्टी असला तरी, त्याच्या आग्रहाला व हटवादीपणाला हळूहळू मुरड बसते. मोठ्या तुळवटाला एकदां वाळवी लागली म्हणजे हळू हळू तुळवट पोखरली जाते व अखेरचा धक्का बसतांच ती कोलमडते, हाच अनुभव विचारसृष्टींतहि येतो. आपण जी गोष्ट पूर्णतया खरी मानून जिला कवटाळून बसलों आहोंत त्याबाबत किंचित् शंका उत्पन्न झाली म्हणजे मग तें मन त्या शंकेच्या जाळ्यांत सांपडतें. मनाचा भक्कमपणा हळूहळू कमी होत जातो आणि जसजशा विविध विचारांच्या लहरी त्याच्या मनामध्यें उत्पन्न होतात, तसतसें जें त्यानें अखेरचें सत्य म्हणून मानलें असेल, जें अढळ म्हणून मानलें असेल, तें सापेक्ष व अस्थिर बनतें आणि जेव्हां समाजामध्यें प्रक्षोभ निर्माण होतो, कडाक्याचा वादविवाद सुरू होतो, त्यावेळीं आपण खांद्यावर घेतलेली खरोखरीच शेळी आहे का कुत्रा आहे, याचा संभ्रम पंचतंत्राच्या गोष्टींतील ब्राह्मणाप्रमाणें व्यक्तीला गोंधळून टाकतो आणि कांहीं तरी अनपेक्षित तेंथें घडून येतें. निवडणुकीच्या वेळीं संध्याकाळीं निश्चित झालेलीं मनें सकाळीं कांहीं तरी निराळींच रूपें धारण केलेलीं दिसतात. हिमालयाकडे तोंड करून निघालेला प्रवासी स्वतःला रामेश्वरीं पाहातो, अशी विचित्र परिस्थिति समाजामध्यें घडून येते. म्हणून सत्य काय आहे, असत्य काय आहे, याचा विचार अधिक गंभीरतेनें समाजांत केला जावा व त्या कामीं इष्ट तें वातावरण सरकारनें उपलब्ध करून द्यावें, व तसें घडवून आणलें पाहिजे. द्विभाषिक राज्याचें विभाजन होतांना महाराष्ट्रानें गुजराथला हिशेबाअंतीं

कांहीं द्यावें हें तत्त्व रास्त, तथापि जें गुजराथला द्यावयाचें त्याला महाराष्ट्रानें दिलेली खंडणी असा शब्दप्रयोग करून सत्याला कसें विकृत केलें गेलें याचें उदाहरण ताजें आहे. शब्द लहान असेल; पण त्याच्या आंतील निर्दयता, विकृतता, विस्फोटकता कल्पनेच्या बाहेर असते, हें विसरून चालणार नाहीं. शब्दांना योग्य मर्यादेंत ठेवीत ठेवीत त्यांचा संदर्भ ध्यानांत धरून समाजामध्यें सत्याचें शोधन करावयाचें असतें. आणि जर त्या कामांत सर्व वातावरण द्वेषानें बिघडलेलें असेल, पूर्वग्रहामुळें ग्रासलें गेलें असेल, तर सत्यशोधन हें एक अवघड काम बनतें. तथापि, समाजाच्या श्रेयाच्या दृष्टीनें हें सत्यशोधन करावें लागतें. समाजाची शक्ति जें तयार झालेलें असेल अगर जाणूनबुजून तयार केलें असेल तें सर्वांच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न करते. गुजराथी लोक पक्के व्यापारी म्हणून प्रत्येक क्षेत्रांत ते सौदा करणारच असें गृहीत धरून त्यांचें प्रत्येक कृत्य, त्यांचा प्रत्येक विचार तपासला जातो. महाराष्ट्रीय लोक भांडकुदळ, लुटारू प्रवृत्तीचे परक्याच्या भावना न जाणणारे म्हणून त्यांनीं जें जें केलें असेल तें या पूर्वग्रहाच्या, मापानें मोजलें जातें व असें झालें म्हणजे जो एक वैचारिक समतोल समाजाच्या धारणेसाठीं हवा, तो नाहींसा होतो. म्हणून जितके विचारी नागरिक, समतोल बुद्धीचे नागरिक, प्रत्येक गोष्टीची पारख करून विचार करणारे नागरिक, किंबहुना नाणें वाजवून घ्यावें एवढी काळजी विचारांच्या बाबतींतसुद्धां घेऊन वागणारे नागरिक, ज्या समाजांत अधिकाधिक प्रमाणांत असतील त्या त्या प्रमाणांत तो समाज अधिक सुस्थिर, अधिक समतोल व अधिक प्रगतिपर असतो.

अमक्यातमक्या वर्तमानपत्रांत आलें, अमक्यातमक्यानें विधान केलें तें मी मानतों, या प्रवृत्तीबरोबर अमक्याअमक्या वर्तमानपत्रांत आलें आहे, अमका गृहस्थ त्यावर विधान करीत आहे, त्यावर मी विश्वास ठेवणार नाहीं, अशा दोन्ही वृत्तींचीं माणसें समाजांत असलीं म्हणजे वैचारिक समतोल राहण्याला अनुकूल असें वातावरण निर्माण होतें. सर्वसाधारणपणें समाजापुढें वस्तुस्थिति येत आहे आणि त्याच वस्तुस्थितींतून कांहीं लोक त्याबाबत एक निष्कर्ष काढतील, त्याच वस्तुस्थितींतून कांहीं दुसरे लोक कांहीं दुसरा निष्कर्ष काढतील, अशी स्थिति म्हणजे, सत्य समाजापुढें येणें; पण सत्याचा अन्वयार्थ लावण्याच्या बाबतींत मतभेद असणें, अशी असतें. पण जेथें सत्यच काय आहे, वस्तुस्थितीच काय आहे, याबाबत निश्चिति नाहीं व गोंधळ आहे, या परिस्थितींत मत बनविण्याला स्वातंत्र्य आहे हें म्हणणें जरा कठीण वाटतें. जेथें वर्तमान-पत्रांतून साधी गोष्टसुद्धां विकृत केली जाते, प्रसंगीं अतिरंजित केली जाते, प्रसंगीं कमी लेखली जाते, तेथें सत्याचें मोजमाप योग्य प्रमाणांत होत नाहीं. जाणूनबुजून केलें जात नाहीं. मग अशा वातावरणांत मतप्रदर्शनाला स्वातंत्र्य आहे हें औपचारिकपणें खरें असतें; पण वस्तुतः तें बरोबर नसतें. म्हणून समाजानें वस्तुस्थिति अथवा सत्य यथा-स्वरूप लोकांपुढें येईल अशी व्यवस्था केली पाहिजे. जें हल्लीं होत आहे तें सत्य हें एका

गटामार्फत सजविलें जातें व जसा एखादा कुंभार मातीच्या गोळ्याला त्याच्या इच्छे-प्रमाणें स्वरूप देतो त्याप्रमाणें केलें जातें. आजच्या वृत्तपत्रसृष्टींत असले कलाल मोठ्या प्रमाणावर वावरत असतात व त्यांची कदर समाज करीत असतो. खरें म्हणजे असत्याचे हे घाऊक व्यापारी असतात. 'अगा जें घडलेंचि नाहीं, त्याची वार्ता पुससी काई' असें होत असतें. सभा झालीच नाहीं अशा स्थितींत सभा झाली व समितिवाल्यांच्या भीतीनें ती ताबडतोब विसर्जन झाली, असल्या बातम्या महाराष्ट्रीय जनतेच्या अनुभवास आलेल्या आहेत. ज्या शहराची वस्ती लाखाच्या आंत आहे व ज्या सभेच्या जागेंत जास्तींत जास्त दहा हजारांशिवाय लोक बसणार नाहींत, त्या ठिकाणीं लाख श्रोते आले असें ठांसून सांगून कलकत्त्याच्या ब्लॅकहोलच्या प्रयोग करण्याची किमया मराठी वर्तमानपत्रांनीं करून दाखविली आहे. खोट्या बातम्या देऊन लोकमनावर भावनावशतेच्या प्रक्षोभानें एवढा परिणाम करावयाचा कीं, सामान्य लोकांना विचार करण्यासाठींसुद्धां वाव द्यावयाचा नाहीं, हाहि अनुभव जनतेला आहे. १९२४ च्या इंग्लंडमधील निवडणुकींत व्हीफचें पत्र असेंच सबंध निवडणुकीच्या निकालावर परिणाम करतें झालें. वस्तुतः, तें पत्र म्हणजे खोटा कागद होता. तथापि, त्याचा परिणाम किती झाला हें प्रसिद्ध आहे. म्हणून समाजामध्यें जें बातमी म्हणून प्रसिद्ध होतें, अगर केलें जातें, त्याचा व विचार-स्वातंत्र्याचा, मतस्वातंत्र्याचा घनिष्ठ संबंध आहे. लोकांपुढें असें गटनिर्मित सत्य आलें अगर सजविलेलें सत्य आलें म्हणजे सामान्य लोक गांगरून जातात अगर बनतात. महाभारतांत 'सत्यं न यत् छलयुभ्यैति' तें सत्य नव्हे कीं ज्यांत कपटाचा भाग आहे, असें म्हटलें आहे. तें सत्य याप्रमाणें कपटसहित आहे तें समाजापुढें न येईल, त्याला बंदी होईल असें झालें पाहिजे. त्याप्रमाणें वर्तमानपत्रांतून खास पुरावा म्हणून जें सांगितलें जातें तें पुरावा नसून, कुणाच्या तरी डोक्यांतून मीठमसाला घालून न झालेलें, पुरविलें जातें. मनुष्य किती विकृतपणें लिहूं शकतो याचें उदाहरण मेयोचें पुस्तक आहे व अशा तऱ्हेचें वाङ्मय समाजांत संघटित हितसंबंध पसरवीत असतात. त्यांचा प्रचार मोठ्या प्रमाणांत केला जातो. लहान लहान कारखानदारांना भांडवलवाले ठरवून त्यांच्याविरुद्ध वातावरण निर्माण केलें जातें. त्याचप्रमाणें साधी वेतनाची मागणी क्रांतीची घोषण-अशी रंगवली जाते आणि असें झालें म्हणजे मनुष्यानें ज्या गोष्टीवर आपलें मत बनवा-वयाचें त्याच गोष्टी सत्य नसल्यानें त्याचें मत मग विचारस्वातंत्र्यानें दिलेलें मत असें होत नाहीं. आणि आजकालच्या जगांत वृत्तपत्र एक व्रत राहिलें नसून तो एक व्यापार झाला आहे. पदार्थांत ज्याप्रमाणें मिलावट (ॲडल्टरेशन) केलें जातें त्याप्रमाणें वृत्तपत्रें हीं वैचारिक सृष्टींत मिलावट करणारे व्यापारी बनतात. सत्य तेंच सांगेन, न्याय्य तेंच उचलून धरीन, सत्याचीच प्रतिष्ठा मानीन, प्रचाराचा दास बनणार नाहीं, ही श्रेष्ठ भूमिका आजच्या जगांत बाळगणारे वर्तमानपत्रकार 'मनुष्याणाम् सहस्रेषु' असेच आढळून येतात. वस्तुस्थिति ही पवित्र आहे व टीका मुक्त आहे (फॅक्टस् आर सिक्रेट

कॉमेन्टस् आर फ्री ) हें जें वर्तमानसृष्टींतील उपनिषदाचें महावाक्य आहे तें दुर्लक्षिलें जात आहे. वर्तमानपत्र हा एक व्यापार झाल्यानें अनेक भांडवलवाले या धंद्यांत भाडवल गुतवितात आणि गुंतविलेल्या भांडवलावर नफ्याची अपेक्षा करीत असतात. आणि मग जें खपेल तें लिहिण्याकडे वर्तमानपत्रकारांचा कल असतो. त्याचप्रमाणें मालक सांगतील त्याप्रमाणें लिहिण्याची त्याचेवर सक्ति असते. ज्याप्रमाणें तयार कपडे विकत घेणें ही आजकालची रीत झाली आहे, तसेंच थोडेसें मतांच्या बाबतींत झालें आहे. तयार मतें आतां वाचकांसाठीं वर्तमानपत्रांतून पुरविलीं जातात. आणि प्रचारानें पोलिसापेक्षांहि जनतेचा जास्त कबजा हीं भांडवलवाल्यांचीं वर्तमानपत्रें घेत असतात. जें लोकांच्यापुढें येतें अगर आणलें जातें तें इतकें आकर्षक असतें अगर इतकें भयानक दाखविलेलें असतें कीं, सामान्य मनुष्य संभ्रमित होतो आणि अधिक विचार न करतां जें वर्तमानपत्रांतून सांगितलें असेल, तें घेत जातो. पूर्वी जादुटोणा करून मनें काबूंत आणावयाची जी विद्या होती, तिचेंच आधुनिक स्वरूप म्हणजे संघटित व पद्धतशीर असा प्रचार, असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वतःचें असें कांहींहि मनुष्य मग सांगूं शकत नाहीं, आणि गोलघुमटांत ज्याप्रमाणें एके ठिकाणीं एक आवाज काढला म्हणजे सर्वत्र व सर्वांच्या कानाला तोच ऐकूं येतो, त्याप्रमाणें एका मालकीखालीं असलेल्या अनेक वर्तमानपत्रांतून एकच विचारसरणी मांडली जाते व लोकांच्या कानाला अन्य कांहीं ऐकूं येणार नाहीं, अशी व्यवस्था मग निर्माण होते. अनेक दृष्टिकोन, अनेक विकल्प, लोकांपुढें येत नाहींत. निवड करण्याचें क्षेत्र मर्यादित होत जातें. किंबहुना निवड करण्यासाठीं कांहींच नसतें. जें पुढें येतें तें आपोआप स्वीकारलें जातें. अशा परिस्थितींत समाजांतील नागरिकांना विचारस्वातंत्र्य आहे, मतस्वातंत्र्य आहे, हें खरें नाहीं. त्यांचीं मनें विचारविन्मुख होतात. जें ताटांत वाढलें असेल तें कैद्यांना खावें लागतें, अगर उपाशी राहावें लागतें. तीच स्थिति मग समाजांत होते. ज्ञानाच्या साधनांत न कळत मक्तेबाजी उत्पन्न होते. म्हणून समाजामध्यें लोकांपुढें वस्तुस्थिति मांडण्याची व्यवस्था एका हातीं असतां कामा नये. वर्तमानपत्रें सरकारी मालकीचीं असलीं अगर त्यांच्या नियंत्रणाखालीं असलीं तरी तसेंच होतें. म्हणून वर्तमानपत्रें हीं भांडवलवाल्यांचींहि नसावीं व सर्वच्या सर्व सरकारचीं पण नसावीं. जें काय बोलावयाचें आहे त्याला खरें स्वातंत्र्य असावें. म्हणून वर्तमानपत्र हें व्यापार म्हणून होतां कामा नये, अगर सरकारचें खातें पण होऊं नये. यांपैकीं कांहींहि झाल्यास समाजांत निर्माण होणाऱ्या घटनांवर, त्यांच्या बातम्यांवर संपूर्णपणें नियंत्रण होतें आणि लोक स्वतःला स्वतंत्र समजत असले, तरी वस्तुतः तें स्वातंत्र्य अर्थशून्य असतें.

समाजामध्यें ज्ञानप्रचाराचीं साधनें खाजगी पण भांडवलशाहीनें नियंत्रित केलेलीं असलीं म्हणजे लोकमत एकसांचीव आकार घेतें व तेंच तें सगळ्या वर्तमानपत्रांतून येत गेल्यानें जसा एक नंबरी माल बनतो, त्याप्रमाणें सत्याला स्वरूप प्राप्त होतें. आणि मग

ज्या मौलिक श्रद्धा जीवनविषयक असतात, त्या आकसूं लागतात. स्वतंत्रपणें विचार करतांना मानवी मन विकसत असतें, त्याच्या श्रद्धा सखोल होत असतात आणि एकंदर व्यक्तिविकासाला चालना मिळत असते. पण जेथें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें जें व्यक्तीच्या पुढें येतें तें खरें न येतां सजवलेलें, ठाकठीक करून आकर्षक केलेलें येत असेल तेथें सामान्यपणें तें तो स्वीकारतो, व स्वतंत्रपणें सत्याचा शोध अगर तद्विषयक विचार करण्याचे श्रम तो घेत नाहीं. पोपटाला जसें शिकवलें जातें त्याप्रमाणें तो बोलतो, त्याप्रमाणें व्यक्तीच्या मनाचा राघू जे शब्द सारखे त्यानें समाजांत ऐकले असतील तेच तो मग बोलत राहतो. आणि व्यापारी वृत्तीनें चालविलेलीं वर्तमानपत्रें व पक्षनिष्ठ वर्तमानपत्रें त्याच्या मनाभोंवतीं आपल्या :प्रचाराचा .वेढा दृढ करीत असतात. मग समाजामध्यें जीं शब्दांचीं नाणीं सारखीं हाताळलीं जातात, तींच तो खऱ्याखोट्याची परीक्षा न करतां, अनुभवावर न वाजवून घेतां स्वीकारीत असतो. तेच तेच शब्द, तेच तेच वाक्प्रयोग, त्याच त्याच घोषणा सतत कानांवर येत असल्यानें त्याचीहि तीच भाषा होते. प्रत्येक काँग्रेसमन मग त्याला गुंड वाटूं लागतो. सरकारचें प्रत्येक कृत्य धनिकांसाठीं केलेलें आहे असें वाटतें. शांततेसाठीं सोडलेला कुठलाहि हुकूम त्याला मग हुकूमशाहीचा वाटतो. इतकेंच काय त्याचें मत त्याला अचूक वाटतें. त्याची घोषणा त्याला सत्य वाटते व त्याचें मत त्याला लोकमत वाटतें. त्याचप्रमाणें सरकारनें अगर सरकारमार्फत केलेल्या प्रचाराचा त्याच्या मनावर पगडा बसल्यास सरकारची आज्ञा तो वेदाज्ञा मानतो. सरकारचें कुठलेंहि कृत्य तो अयोग्य मानत नाहीं. मतस्वातंत्र्य दाखवून सरकारवर टीका केल्यास ती समाजांतील स्वास्थ्य बिघडविणारी, राज्यव्यवस्था उलटसुलट करणारी अशी क्रान्तिकारी त्याला वाटते व अशा टीकाकारांना 'ठीक' करणें मग तो समाजाच्या दृष्टीनें इष्ट समजतो. समाजामध्यें सत्य सांगण्याचा प्रयत्न कोणी केल्यास त्याला तो राजद्रोह मानतो. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, कुठल्या तरी पक्षानें व त्या पक्षाच्या तत्त्वज्ञानानें त्याच्या मनाला विचार करण्यासाठीं वाव न देतां त्याला आग्रही बनविलेलें असतें. म्हणून त्याला स्वतःचा असा अनुभव मिळविण्याचें जमत नसल्यानें मतस्वातंत्र्याचा, स्वतंत्रपणें विचार करण्याचा त्याचा अधिकार खरोखरच तो गमावून बसतो. याचा अर्थ विचार करण्याची संवयच मग त्याच्या मनाला राहत नाहीं. म्हणून समाजामध्यें ठराविक पद्धतीचीं सांचीव व आग्रही मतें मानणें म्हणजे खऱ्या विचारस्वातंत्र्याला तें विरोधी असतें. पक्षदृष्टीनें कांहींहि सांगण्यास हरकत नाहीं. तथापि जें सांगणें असेल त्याचा व सत्याचा कांहींतरी संबंध असला पाहिजे. भडक प्रचारानें अगर सत्याबद्दल संभ्रम उत्पन्न करणाऱ्या प्रचारानें सामान्य मनें गोंधळलीं जातात. असामान्य मनें नाराज होतात. पण सर्वच कांहीं विचार करण्याच्या भानगडींत पडत नाहींत. सर्वच कांहीं सत्यान्वेषी अगर सत्यशोधक नसतात. व त्यामुळें बरेचसे या कोटींतील लोक सुरक्षिततेच्या दृष्टीनें उदासीनतेच्या गुहेंत स्वस्थ बस-

तात. नुकत्याच झालेल्या शिरोमणि गुरुद्वार प्रबंधक कमिटीच्या निवडणुकींत जो प्रचार झाला व ज्याप्रकारें तो केला गेला त्यांत विचार करून मतदान करावें असें वातावरणच ठेवलें गेलें नाहीं. सरकार गुरुद्वारावर कबजा करणार, नानकांच्या व अन्य गुरूंच्या चित्रांऐवजीं नेहरूंचीं व अनेक अन्य लोकांचीं चित्रें लावणार हा प्रचार इतक्या मोठ्या प्रमाणांत झाला कीं, सामान्य मनुष्य खरें काय, खोटें काय याचा विचार करण्यासहि तयार होईना. हा व असाच अनुभव लक्षांत घेतां समाजामध्यें शांतपणें विचार करण्याची संधी मिळाली पाहिजे. प्रचार व थापेबाजी, पूर्वग्रह व अशक्य घोषणा यांच्या बाजारांत सत्य विकलें जात नाहीं आणि कोणी घेणारा आला तर त्याला मूर्खांत काढण्यांत येतें.

सध्यांच्या आधुनिक जगांत प्रचाराचें सामर्थ्य किती आहे याचीं थोडीं उदाहरणें वर दिलीं आहेत. यापेक्षांहि अधिक या जगांत सत्याला दडपून टाकण्याचे प्रयत्न पद्धतशीर होत असतात. बैलानें मस्ती करूं नये म्हणून ज्याप्रमाणें लहान वयांतच त्याला खची करतात, त्याप्रमाणें थोडेंसें व्यक्तीच्या मनाला लहानपणींच खची करण्याचे शिक्षणाच्या आदर्शांच्या नांवाखालीं प्रयत्न केले जातात. आधुनिक राज्य शिक्षणाचें महत्त्व जाणतें व म्हणून लहानपणींच बालकांच्यावर असे संस्कार उमटविण्याचे प्रयत्न करणें कीं, बालकें पुढें मोठीं झाल्यावर त्यांचीं मनें ठराविक चाकोरींतूनच जातील, त्यांचे विचार ठराविक नमुन्याचेच असतील. शिक्षणपद्धतींत असा दृष्टिकोन ठेवला जातो कीं, विद्यार्थ्यांचीं मनें विशिष्ट तऱ्हेनेंच आकार घेत जावीं. त्याला शिकविला जाणारा इतिहास हा एक तर निःपक्षपाती इतिहास नसतो व शिवाय त्यामध्यें सत्य लपविलें जातेंच. एवढेंच नव्हे तर असत्य सांगितलें जातें, सूचित केलें जातें. व्यापक शिक्षण देऊन मुलांच्यामध्यें ज्ञानाची लालसा उत्पन्न करावयाची व त्यांची बुद्धि चौकस करावयाची, याऐवजीं त्यांच्या बुद्धीला असें वळण दिलें जातें कीं, जें त्यांना सांगितलें जाईल तें तें सत्य मानतील व त्याबाबत ते एवढे आग्रही व कडवे बनतील कीं, जे शिकले आहेत, ज त्यांना सांगितलें गेलें आहे, त्याच्यापलीकडे कांहीं सत्य असेल याची शंकासुद्धां त्यांना येऊं नये. ज्या ज्ञानाच्या योगानें मनुष्याच्या मनामध्यें चाकस वृत्ति उत्पन्न होते, पुढें आलेलें पारखून घ्यावें असें वाटूं लागतें, अशा तऱ्हेचें ज्ञान दिलें जात नाहीं. 'बाबा वाक्यम् प्रमाणम्' हें मग एक श्रेष्ठ मूल्य ठरतें. वयांत आल्यानंतर स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घेण्याच्या दृष्टीनें वृत्ति असावी, हें मग घडून येत नाहीं. मतस्वातंत्र्याची किंमत, विचारस्वातंत्र्याची किंमत काय असते, याचें थोडेंसें शिक्षण तरी बालवयांत मिळालें पाहिजे. ज्या शिक्षणाच्या योगानें स्वातंत्र्याची गोडी मनाला लागेल, स्वतंत्रपणें विचार करण्याची मनाला संवय लागेल, प्रयोगशीलता मनामध्यें उत्पन्न होईल, स्वतःची अशी दृष्टि निर्माण होईल, असें शिक्षण मिळालें पाहिजे. या दृष्टीनें विचार करतां मुलांना देण्यांत येणारें शिक्षण कोणत्या

स्वरूपाचें आहे हें नागरिकस्वातंत्र्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें असतें. अगदीं लहानपणापासून मुलाच्या मनावर आपल्या देशांत जें कांहीं झालें तें श्रेष्ठच होतें, जें कांहीं होत आहे तेंहि श्रेष्ठच आहे, आपल्या देशाचा इतिहास म्हणजे श्रेष्ठ कर्तव्याचा इतिहास, आपल्या पूर्वजांनीं जें कांहीं केलें असेल तें संपूर्णपणें शहाणपणाचें, असें शिक्षणाचें स्वरूप झाल्यास त्यांतून तयार झालेला नागरिक हा एकप्रकारें यांत्रिक नागरिक झाला, तो निष्ठावंत राहील यांत शंका नाहीं, पण स्वतःचें असें कांहीं विचारद्रव्य समाजाच्या वैचारिक संपत्तींत तो टाकणार नाहीं. तो निःसंशय आज्ञाधारक बनेल, पण त्याच्याजवळ फारशी स्वयंप्रज्ञा राहणार नाहीं आणि ज्याला उपक्रमशीलता (इनिसिटी) म्हणतात ती त्याच्यांत फारशी येणार नाहीं. बदलणाऱ्या जगांत जें कांहीं होत असेल तें समजून घेणारी बुद्धि राष्ट्राच्या नागरिकांत नसेल व त्याच्याला अनुसरून जुळवून घेणारी व्यवहारकुशलता जर नसेल, तर तें राष्ट्र एक उदयाला तरी जाईल, किंवा रसातळाला तरी जाईल. चिवटपणा व दमदारपणा, संकटाशीं सतत झगडत राहणारी अशी बुद्धि त्या राष्ट्रांत फार कमी प्रमाणांत दिसून येईल. या दृष्टीनें राष्ट्रांतील शिक्षणव्यवस्था सुबुद्ध, सुविचारी, संयमी नागरिक तयार होतील अशी असावी. आणि त्यासाठीं लहानपणापासून स्वावलंबी मनाला उत्तेजित करणारें असें थोडें तरी शिक्षण दिलें पाहिजे. आज जर पाहिलें तर घांसून पुसून तयार केलेला पाठ्यक्रम मुलांना शिकवला जातो, आणि धनगर ज्याप्रमाणें शेळ्यांना ठराविक क्षेत्राबाहेर जाऊं देत नाहीं त्याप्रमाणें पंतोजी हा मुलांच्या मनाला सांभाळत सांभाळत शिक्षण देत असतो. राज्याचे नियमहि असे असतात कीं, शिक्षकाला नवीन असें विद्यार्थ्यांना सांगावें, त्यांच्या बुद्धीला धक्का देणारें, त्याला प्रयोगशील करणारें असें कांहीं करावें, असें वाटूं देत नाहीं. आणि असा कोणी ठरलेल्या मार्गापलीकडे जाणारा शिक्षक आढळल्यास त्याला आपल्या पदाला मुकावें लागतें. मुलांचीं मनें पूर्वग्रहांनीं जखडलीं जाऊं नयेत, नवीन नवीन ऐकण्याची त्यांच्या मनाची तयारी असावी, जें नवें येईल त्यासंबंधीं कुतूहलपूर्वक पाहाण्याकडे त्यांची वृत्ति असावी, असें वातावरण लहानपणापासून बालकांना न मिळत गेल्यास तरुणपणीं ते खरोखर जागरूक नागरिक होत नाहींत. आणि त्यांना मग जें सांगितलें जाईल, अधिकृतरीत्या सांगितलें जाईल, त्यावर विश्वास ठेवणें ही त्यांची प्रवृत्ति होते. मग ही त्यांची वृत्ति केवळ राजकीय क्षेत्रांतच राहते असें नव्हे, तर धार्मिक, सांस्कृतिक सर्वच क्षेत्रांत तीच वृत्ति राहाते. शरीर व्यायामानें कमवावें लागतें. म्हणून हा मनाचा व्यायाम बालपणापासूनच थोड्या थोड्या प्रमाणांत शिक्षणद्वारा बालकास घेण्यास संधी मिळाली पाहिजे व हें सर्वमान्य आहे कीं, आयुष्याच्या पहिल्या पंधरा वर्षांच्या आंत जे संस्कार मुलाच्यावर होतात ते आयुष्यभर त्याच्या मनावर परिणाम करीत राहतात.

मनुष्याला रटाळ जीवन जगणें आवडत नाहीं. त्याचबरोबर राजमार्ग सोडून अज्ञात व अनिश्चित मार्गानें त्याला जावेंसेंहि वाटत नाहीं. आयुष्यामध्यें कांहीं तरी

साहस करावें, कांहीं तरी अद्भुत करावें, निदान कुठें तरी, केव्हां तरी सामान्य जनापेक्षां विशेष कांहीं तरी करून दाखवावें असें अनेकांना वाटत असतें, व असें करण्यांत साहस असतें, प्रसंगीं धोकाहि असतो, हें ते जाणतात. ज्याला जीवनामध्यें कुठल्याहि भानगडी न करतां सरळ धोपट मार्गानें जावयाचें असेल त्यानें जें समाजांत सर्वमान्य झालेलें असेल, त्याच्या आश्रयालाच राहिलें पाहिजे. आणि सामान्यपणें अशाच तऱ्हेची वृत्ति समाजांत बालपणीं दिलेल्या शिक्षणानें जोपासली गेल्यास परंपरागतपणा व धोपट मार्ग स्वीकारण्याची वृत्ति अधिकाधिक समाजामध्यें दिसून येते. जें समाजाचें सर्वमान्य वर्तनक्रमाला विसंगत असेल असें करण्याची बुद्धि जेथें कोठें नजरेस आली तर लागलींच समाजाच्या टीकेचा ती विषय बनते आणि या भीतीनें सरळ मार्गानें जावें, अवघा प्रपंच सुखाचा करावा, अशीच प्रवृत्ति अधिकाधिक बळावत जाते. अर्थात् त्यांच्या कल्पनेप्रमाणें त्यांना सुखहि मिळतें. पण समाधानी डुक्कर होण्यापेक्षां संशयग्रस्त मनुष्य होणें अधिक सुखाचें असें जें प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञान्याचें मत आहे तें अगदींच खोटें नाहीं. मनाला चौकसपणाची संवय लागली, कां व कसें असे प्रश्न विचारण्याची संवय लागली, तर अनेकांना तें अयोग्य वाटतें, पण समाजाची प्रगति वैचारिक व अन्यथाहि असल्या चौकस मनाच्या माणसावर अवलंबून असते. जीं मनें विचार न करणारीं, ज्या मनामध्यें कुतूहल प्रवेश करूं शकत नाहीं, तीं मनें एकप्रकारें सुन्न असतात, निस्तेज असतात, आणि जें कांहीं त्यांनीं लहानपणीं स्वीकारलेलें असेल त्या शिदोरीवर त्यांच्या जीवनांतील प्रवास चालू असतो. जे दृष्टिकोन त्यांनीं मनामध्यें पक्के केलेले असतील त्याला जुळून अनुभव येत असेल तोंपर्यंत ते रेटत असतात. जरा निराळा अनुभव येतांच ही बांधलेली शिदोरी नाहींशी होते व कांहीं तरी नवा विचार करावा हें त्यांना जमत नाहीं आणि मग जुना अनुभव नव्या परिस्थितींत मनाला कष्टी करीत असतो व पायांखालची जमीन नाहींशी व्हावी त्याप्रमाणें बौद्धिक दृष्ट्या मग ती व्यक्ति संपते, असें म्हटल्यास हरकत नाहीं. म्हणून स्वतंत्र विचार करणारीं, स्वतंत्रपणें सत्य काय आहे हें शोधणारीं माणसें समाजांत हवीं असतात. ज्यांचीं मतें बनलीं आहेत, ज्यांनीं मनाच्या खिडक्या लावून घेतल्या आहेत, त्यांच्या मनांत नव्या युगाचा प्रकाश जाऊं शकत नाहीं. नव्या युगाच्या गर्जना कान असले तरी मनापर्यंत पोंचत नाहींत, आणि मग त्यांच्या जीवनाची एक शोकांतिका बनते. या दृष्टीनें विचार करतां नव्या गोष्टी आल्या तर त्यांचा विचार करण्याची पात्रता, ग्राह्यअग्राह्य निवड करण्याची दृष्टि ही नागरिकांमध्यें जितकी अधिक, जितके असे नागरिक अधिक, तितका समतोल समाजाच्या विचारांत व वागणुकींत राहतो. अनेक प्रश्न समाजांत निर्माण होत असतात व लोकशाही समाजव्यवस्था असल्यास प्रत्येक नागरिकाला त्यावर अभिप्राय द्यावयाचा असतो, मत द्यावयाचें असतें व म्हणून संबंधित प्रश्नांत ज्या कांहीं गोष्टी समाविष्ट झाल्या असतील त्यांचें पृथक्करण करून त्यांतील प्रत्येक विचाराचा धागा कोणत्या स्वरूपाचा आहे, त्यामध्यें

उपस्थित झालेलीं तत्त्वें समाजाच्या दृष्टीनें इष्ट आहेत किंवा नाहींत हें सर्व बारकाईनें त्यानें पाहिलें पाहिजे. अफवा म्हणजे बातमी नव्हे. भांग्या मारुति रेडिओवर म्हणजे चकाट्या पिटणाऱ्या अड्ड्यावर कांहीं ऐकलें म्हणजे तें खरें असें मानण्याची प्रवृत्ति जर समाजामध्यें मूळ धरूं लागली तर कुठलीहि गोष्ट स्थिरपणें विवेकानें करणें कठीण होईल. ज्या ठिकाणीं वर्तमानपत्रें बातमी व सत्य यांत सायुज्यता आणूं शकत नाहींत त्या ठिकाणीं कुठल्याहि प्रश्नासंबंधीं योग्य अभिप्राय देणें समाजांतील विचार करणाऱ्या लोकांनासुद्धां अवघड होतें. त्यासाठीं वर्तमानपत्रावर विसंबणें हें सर्वस्वीं इष्ट नाहीं. प्रत्यक्ष चौकशी व सत्याचा शोध प्रत्येक व्यक्ति करूं शकत नाहीं. प्रत्येक वाचक करूं शकत नाहीं. म्हणून वृत्तपत्रांतील मजकुराच्या सत्याबद्दल खुद्द वृत्तपत्रांनींच देशाच्या हितार्थ अधिक काळजी घेतली पाहिजे. वृत्तपत्रव्यवसाय हा आज व्यापार जरी झाला असला तरी त्याचींसुद्धां कांहीं मूल्यें, कांहीं मर्यादा असल्या पाहिजेत. वाटेल तें भडकपणें लिहिण्यानें नेहमींच जमतें असें नाहीं आणि अमुक एका वर्तमानपत्रावर विश्वास ठेवून वागणाऱ्या वाचकाला जेव्हां विरुद्ध अनुभव येतो त्याचा परिणाम त्या वृत्तपत्राच्या प्रतिष्ठेवर होतो. वृत्तपत्रें हीं राष्ट्रांतील शिक्षणाइतकींच महत्त्वाचीं असतात. म्हणून त्यांनाहि कांहीं मर्यादा समाजानें घातल्या पाहिजेत. देशांतील कायदा ज्या मर्यादा घालील त्या कायदा व सुव्यवस्था यांच्या दृष्टीनें असतील. पण समाज ज्या मर्यादा घालील त्या अभिरुचि, सामाजिक शांतता व मानसिक समतोल ह्या दृष्टीनें घालील. शिक्षणद्वारा कांहीं तरी आग्रही वृत्ति उत्पन्न करणें, तसेंच वृत्तपत्रद्वारा पूर्वग्रह उत्पन्न करणें या दोन्ही गोष्टी मानसिकस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य या दृष्टीनें गैर आहेत.

समाजामध्यें वाईट व चांगलें असें दोन्हीहि खपत असतें. कालांतरानें वाइटाचा त्याग केला जातो. चांगलें स्वीकारलें जातें. पण ही क्रिया सामान्यपणें अतिशय हळूहळू होते. जें भडक आहे व जें प्रचारानें मस्त केलें जातें, तें कुत्र्याच्या विषाप्रमाणें पसरतें आणि मानवी वृत्ति अशी आहे कीं, लोकांबद्दल कांहींहि वाईट किंवदंती स्वरूपाचें असेल तर तात्काळ तें खरें वाटतें. अफवा हत्तीच्या पायानें येतात व पसरतात, व सत्य मुंगीच्या पावलानें येत असतें. म्हणून एखाद्या व्यक्तीला कांहीं तरी टिंगल करून कांहीं तरी कुचेष्टेसाठीं टीकेचा विषय केल्यानंतर ती टीका खोटी आहे, अन्यायाची आहे, असें जरी पटलें, अर्थात् त्याला वेळ लागतो, तरी त्या व्यक्तीचें तें चित्र टीकाकारानें काढलेलें त्याच्या नांवाला चिकटूनच राहतें. चेंबर-लेनची छत्री, चर्चिलचें बुलडॉगी स्वरूप जें टीकाकारांनीं एकदां चिकटविलें तें फार काळपर्यंत तसेंच राहिलें. भारतांतील राजकारणी व्यक्तींबद्दलहि असे अन्याय झाले नाहींत असें नाहीं. महाराष्ट्रांतील राजकीय जीवनांत कोणीहि प्रमुख व्यक्ति विकृत प्रचार, निंदा व मत्सरयुक्त टीका यांपासून सुटली नाहीं. टिळकांना निम्में आयुष्य स्वतःच्या लोकांशीं झगडण्यांत खर्ची करावें लागलें. कै. गोखले यांना टीकाकारांनीं शेवटच्या

क्षणापर्यंत सोडलें नाहीं. विद्यमान पुढाऱ्यांपैकीं कुणाच्या विचाराऐवजीं पोषाखावर टीका कर, राजकारणामध्यें पुढें काय होईल हें विचार करून सांगितलें तर त्याला थापेबाज म्हण, कोणी कार्याच्या दृष्टीनें किंचित् विवेकानें वर्तन केलें तर त्याला पिसाळ म्हण; तात्पर्य, महाराष्ट्राच्या राजकारणांत मंबाजीचे वारस पुष्कळ आहेत व त्यांची परंपरा चालूच आहे. पराक्रम मानावयाचा नाहीं, यश मिळालें तर श्रेय द्यावयाचें नाहीं, अपयश प्राप्त झाल्यास परिस्थितीला दोषी न ठरवितां पुरुषाला दोषी ठरवावयाचें, ही वृत्ति महाराष्ट्रांतील राजकारणांत जवळ जवळ स्थायीभावाइतकी झालेली दिसते. तथापि वाइटाबरोबर चांगलें या दृष्टीनें सूक्ष्मदर्शी व्यापक अंतःकरणाची सद्भावनेनें केलेली गुणग्राहकता पण समाजामध्यें असते. पहिल्या वृत्तींत व या दुसऱ्या वृत्तींत कांहीं समतोल असला म्हणजे समाजाचें नैतिक जीवन चांगलें राहतें व आत्मसन्मानाची पण भावना तेथें वास करते. समाजामध्यें जीं गुणग्राही, विवेकी व बुद्धिमान माणसें असतात तीं जो विचार करतात, तीं जसें वागतात, याचाहि परिणाम समाजाच्या वर्तनक्रमावर होत असतो. आणि मग त्यांच्या उदाहरणामुळें यद् यद् आचरति श्रेष्ठः या न्यायानें विचारस्वातंत्र्याला उत्तेजन मिळतें. समाजामध्यें जेवढीं या दृष्टीनें अव्वल दर्जाचीं माणसें असतील तेवढें चांगलें. हीं माणसें मग जीवनाच्या कुठल्याहि क्षेत्रांत असोत, पण तेथें तीं श्रेष्ठ असलीं पाहिजेत. साधारण असून भागत नाहींत. श्रेष्ठ असलीं म्हणजे तीं जनमन आकर्षितात व आपला प्रभाव पाडतात. एरंडोपि द्रुमायते असें येथें होत नाहीं. खरोखरच तीं श्रेष्ठ असावीं लागतात. विक्षिप्त असलीं तरी विद्वत्तेमुळें, श्रेष्ठ चारित्र्यामुळें त्यांचा प्रभाव पडत असतो. संशोधनाच्या क्षेत्रांत राजवाडे यांनीं जें काम केलें व जी निःस्पृहता दाखविली, तिचा परिणाम समाजावर झालाच. केशवसुतांनीं तुतारी वाजविली आणि तिचा आवाज ते मेल्यानंतरहि अजून लोकांना ऐकूं येत आहे. संत अण्णासाहेब पटवर्धन यांच्या चारित्र्याचा परिणाम त्यांच्याशीं संबंध आलेल्या हजारों लोकांच्या जीवनावर झालेला आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचें समाजसेवेचें अखंड कार्य अनेकांना प्रेरणा देणारें झालें. प्रसिद्ध समाजसेवक अण्णासाहेब कर्वे यांचें जीवन म्हणजे समाज-सेवकांना अखंड संदेश देणारें आहे. तात्पर्य, समाजामध्यें मनाला पूर्वग्रह उत्पन्न करून निष्प्रभ व अविवेकी करणारे जसे लोक असतात, त्याजबरोबर सत्यासाठीं, मतस्वातंत्र्या-साठीं आत्यंतिक त्याग करण्याची प्रेरणा देणारे पण असतात. आगरकरांचा समाजानें छळ केला. पण आगरकारांचें कार्य अडलें नाहीं, तें चालूच राहिलें. त्यांचा जय झाला. अशी कार्यनिष्ठा दाखविणारे नंदादीप समाजांतील अंधारांतून प्रकाश देत असतात. सत्यासाठीं स्वतःचा बळी देऊन सत्याला अमर करणाऱ्या प्रत्येक समाजांत कांहीं तरी व्यक्ति असतातच. कलेच्या क्षेत्रांत, संगीताच्या क्षेत्रांत, साहित्याच्या क्षेत्रांत ध्येयाची पताका उंच धरून विरोधाच्या झंझावातांत खंबीरपणें चालणारे समाजाचें भूषण

असतात. सामाजिक शीलाचे ते प्रतिनिधि असतात व अशा लोकांच्या उदाहरणाचा समाजावर परिणाम होत असतो आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जाणारे अनेक असतात आणि एका अर्थानें ह्या श्रेष्ठ व्यक्ति विचारस्वातंत्र्याचे, मानसिक स्वातंत्र्याचे संरक्षक असतात.

शिक्षणव्यवस्था, वृत्तपत्रें, श्रेष्ठ जनांचें आचरण या तिन्ही गोष्टी समाजाच्या आध्यात्मिक जीवनाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असतात. शिक्षणाची व्यवस्था, स्वातंत्र्याचीं श्रेष्ठ स्तरावर राहतील या दृष्टीनें असलीं पाहिजेत, तथापि, या क्षेत्रांत ताबडतोब परिणाम ध्येयें कांहींहि सुधारणा केल्यास होत नाहीं. आज भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन बारा वर्षें झालीं व या बारा वर्षांत निदान बारा तरी लहानमोठ्या समित्या व आयोग नेमले गेले. त्यांनीं आपले रिपोर्ट हजर केले. तथापि, शिक्षणक्षेत्रांत जी अनिश्चितता व गोंधळ आहे तों पाहातां खेद वाटतो. भावी समाजाचें ध्येय याबाबत संविधानांत उल्लेखिलेलें आहे. भावी आर्थिक व्यवस्था कशी राहील, याचीहि कल्पना स्थूलमानानें संविधानांत आहे. राज्य कशासाठीं आहे, याचीहि कल्पना संविधानांत आहे. एकदां या गोष्टी निश्चित झाल्यानंतर त्याची रचना करण्याच्या दृष्टीनें समाजाच्या सर्व क्षेत्रांत रचना झाली पाहिजे. नियोजन झालें पाहिजे व जें कांहीं केलें जाईल, जें पाऊल उचललें जाईल तें या आदर्शांशीं व हेतूशीं विसंगत असतां कामा नये. बारा वर्षांनंतर आतां पुन्हां घटनेंतील संविधानांतील मौलिक गोष्टींबद्दलहि चर्चा सुरू झाली आहे. हें विचारस्वातंत्र्याच्या दृष्टीनें, मतस्वातंत्राच्या दृष्टीनें, औपचारिक दृष्टीनें बरोबर आहे; पण एका विटेवर दुसरी वीट रचली, कांहीं भिंत रचली गेली व तें सर्व चुकलें म्हणून ती पाडावयाची तर भिंत रचली जाणार नाहीं. विटा व चुना वायां जाईल. मनुष्याचे श्रम व काळ वायां जाईल. फक्त अहंकर्तृत्वाचा खोटा अभिमान शिल्लक राहील. म्हणून दीर्घ विचारांतीं संविधान तयार झालें, त्यांतील मुख्य मुख्य सिद्धान्त सर्व दृष्टीनें चर्चून संविधानाची रचना झाली, या परिस्थितींत पुनः पुनः मौलिक बाबींबाबत चर्चा करणें, याचा अर्थ समाजाची प्रगति अशक्य करणें आहे. म्हणून एकदां ध्येय ठरलें आहे, त्याच्याकडे जावयाचें आहे, त्याचा नकाशा तयार झाला आहे व त्याप्रमाणें काम सुरू झालें आहे, आणि मग जर ही खिडकी येथें नको, तो दरवाजा तेथें नको, असें सारखें करूं दिलें तर तें जें निर्माण होईल तें कोणाच्या सुखासाठीं होईल, याची खात्री राहाणार नाहीं. मनाजोगें होईल; पण सुखासाठीं होणार नाहीं. कारण, तें मन अस्थिर झालेलें असतें. म्हणून जें केलें आहे त्यांत स्थैर्य राहाणार नाहीं. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, कांहीं मौलिक गोष्टी ठरल्यानंतर जें कांहीं व्हावयाचें तें त्याला अनुसरून झालें पाहिजे. देशामध्यें आतां नियोजनपूर्ण अर्थव्यवहार होणार हें ठरल्यानंतर त्याला त्या व्यवस्थेशीं जुळवून घेणारीं मनें तयार करावयाचीं व त्या दृष्टीनें नागरिक तयार करावयाचे आणि म्हणून त्या दृष्टीनें शिक्षणव्यवस्था अंमलांत आली म्हणजे निदान वीस वर्षांनीं त्या

शिक्षणव्यवस्थेचा झालेला परिणाम जनमनाचे दृष्टिकोन बदलण्यांत झालेला दिसून येतो. म्हणून व्यवस्थेचें महत्त्व ओळखूनसुद्धां, त्यांत बदल करूनसुद्धां, परिणाम तावडतोब दिसून येत नाहीं. समाजामध्यें जीं श्रेष्ठ माणसें असतात तींहि कुठें तयार अशीं मिळत नाहींत. तेथेंहि क्रमवादाचाच आश्रय करावा लागतो. चारित्र्यसंपन्न व्यक्ति एकदम समाजाच्या मान्यतेला मिळूं शकत नाहीं. हा मोठेपणा पण हळूहळू उभा राहात जातो. श्रेष्ठ मनुष्यहि सामान्यांतूनच वर यावा लागतो. संघर्षांतूनच त्याला वाट काढावी लागते. विरोधांतून शांतपणें त्याला पावलें टाकावीं लागतात व मगच आसमंतांतील सृष्टीपेक्षां वरच्या वातावरणांत तो जात असतो. त्याच्या चारित्र्याचा परिणाम जनसमूहावर होतो. पण हीं असलीं माणसें वर सांगितल्याप्रमाणें एकदम निर्माण होत नाहींत. मजूर जसे बाजारांत मिळतात तशीं हीं माणसें मिळत नाहींत. त्यांच्यासाठीं कोणी शोध करीत नाहींत. पण ते वर आले म्हणजे लोकांपासून त्यांना लपून राहणें अशक्य होतें. या स्थितींत समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीनें करावयाच्या प्रयत्नांची बांधणी हळूहळू होत असते. आणि विद्यमान गरज अशी असते कीं, समाजांत जो विषारी प्रचार होत आहे, जो असत्याचा बाजार भरला आहे, तेथें काम करावयाचें. वृत्तपत्र हा राज्याच्या दौलतीचा चौथा खांब असें मानतात. राज्याच्या कारभाराचा मांडव ज्या खांबावर उभारलेला असतो ते म्हणजे संसदेचीं दोन गृहें लोकसभा, राज्यसभा व राज्यांतील कार्यकारी सत्ता म्हणजे मंत्रिमंडळ व चौथा खांब म्हणजे वृत्तपत्रें, अशी उपमा नेहमीं देण्यांत येते व वृत्तपत्रें हीं लोकशाही युगांत कशीं चालतात याचा अनुभव सर्वप्रसिद्ध आहे. जेथें हुकूमशाही आहे, तेथील वर्तमानपत्रें म्हणजे राज्यकर्त्यांचीं निःश्वसितें, प्रमेयें व्हावींत अशीं असतात. तेथें वर्तमानपत्रें म्हणजे राज्यकर्त्यांच्या मनांतील विचार बोलून दाखविणाऱ्या जिव्हा होत. तेथील वर्तमानपत्रें अन्य कांहीं बोलूं शकत नाहींत. किंबहुना, ज्या ठिकाणीं पक्षीय हुकूमशाही आहे तेथें सरकारी मालकी नसणारीं वर्तमानपत्रें असूं शकत नाहींत, म्हणून जेथें लोकशाही आहे, जेथें खाजगी मालकीचीं वृत्तपत्रें नांदूं शकतात, जेथें याप्रमाणें मुद्रणस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य हें पूर्णपणें आहे, तेथेंच वृत्तपत्रें मतस्वातंत्र्याचा, मुद्रणस्वातंत्र्याचा दुरुपयोग करूं शकतात व मग खोट्या बातम्या देणें, सत्य विकृत करणें, अगर तें न सांगणें, असत्य सांगणें, अगर सूचित करणें हे सर्व प्रकार होतात आणि खाजगी हितसंबंध पुरस्कारद्वारा वर्तमानपत्रांतील धोरणांचीं सूत्रें आपल्या हातीं ठेवीत असतात. मग ज्याचें खावें त्याची टाळी वर्तमानपत्रकारांना वाजवावी लागते. सिनेमाच्या जाहिराती मिळतात, म्हणून कसलाहि सिनेमा असला तरी टीका न करण्याची काळजी वर्तमानपत्रें घेत असतात. सत्य तेंच लिहिणार, न्याय्य त्याचाच पुरस्कार करणार, असें सांगत सांगत त्याचेविरुद्ध वर्तन वर्तमानपत्रकार करतांना दिसून येतात. म्हणून शिक्षण सुधारून श्रेष्ठ माणसांच्या सान्निध्यांत येऊन सत्य काय हें जाणण्याची संधी मिळण्यापूर्वीच समाजामध्यें असत्याचा

एवढा प्रचार होत जातो कीं, सत्याची तोंडओळखसुद्धां समाजांत कोणाला राहात नाहीं. माणसानें स्वतंत्रपणें विचार करावा, सत्य-असत्य पारखून घ्यावें असें झालें तर अनेक हितसंबंधांना नुकसान पोंचत असतें. त्यांना तें नको असतें. सर्व लोक सुशिक्षित झाले, शहाणे झाले, तर आपल्या संपत्तीची चौकशी करतील, आपली खोटी प्रतिष्ठा उघडी करून दाखवतील, अशी भीति समाजांतील संचितवाल्यांना वाटते. म्हणून जास्तींत जास्त प्रचार करून माणसांचीं मनें बधिर करण्याचा प्रयत्न करीत असतांना समाजांत खोट्या नाण्यांना उचलून भरीत असतात. खोट्या देवतांपुढें धूप जाळीत असतात व जनतेची बनवाबनवी करून आपलें स्थान बळकट करीत असतात.

समाजाच्या उन्नतीसाठीं समाजांतील आदर्श सतत जोपासले पाहिजेत. त्यांना कमीपणा आणणारी कोठलीहि गोष्ट समाजामध्यें दिसून आल्यास तिचा निषेध झाला पाहिजे. समाजाच्या आदर्शांत नागरिकस्वातंत्र्य ही एक प्रमुख बाब असते. म्हणून नागरिकस्वातंत्र्यावर सरकारतर्फे हल्ला होत नाहीं, याची दक्षता तर प्रत्येकानें घेतलीच पाहिजे. तथापि, समाजांतील खाजगी हितसंबंध संघटित असल्यानें व समृद्ध असल्यानें सर्वांत झटकन् फळ देणारें साधन म्हणजे वृत्तपत्र याचा ते उपयोग करतात. जशा कांहीं देवता पटकन् नवसास पावतात व त्यांच्यापुढें एखाददुसरें कोंबडें अगर बकरें ठेवून भागतें, त्याप्रमाणें आधुनिक जगांत वृत्तपत्र ही देवता झटकन् नवसास पावणारी आहे. थोड्या जाहिरातीं, थोड्या चहापार्ट्या, थोडीशी सोय 'पिण्याची' अगर 'राहण्याची' एवढ्यावर बहुतेक भागतें व त्याहीपेक्षां कांहीं अधिक लागल्यास कंपन्यांच्या हिशेबांतून तसलमात या सदराखालीं तें पुरें केलें जातें. मग जो प्रचार होतो तो इतका कीं समाजामध्यें जे प्रस्थापित असे अभिरुचीचे, सौजन्याचे संकेत असतात ते बाजूला पडतात आणि या उसळणाऱ्या असत्याच्या लाटेला प्रतिबंध न केल्यास, कांहीं बांध न घातल्यास समाजाची सर्व भूमि व्यापली जाऊन मोठी कठीण अवस्था उत्पन्न होते. आणि या प्रसंगांत पुष्कळ वेळां जें चांगलें असतें तें वाहून जातें. नीतिमत्तेचा किनारा या लाटेनें कापला जातो. आत्यंतिक ध्येय तर लांबच राहिलें; पण जी कांहीं थोडी प्रगति केली असते, तीहि ढांसळली जाते. समाजामध्यें स्वातंत्र्य असलें पाहिजे हें खरें असलें; तरी जें स्वातंत्र्य अनुभवाला येतें तें स्वातंत्र्याच्या जीवावरच उठलेलें दिसतें. या स्वातंत्र्यभक्षी स्वातंत्र्याला आळा घालण्यास विलंब केल्यास अगर खरें स्वातंत्र्य लोपत आहे त्या कामीं भक्कमपणें कारवाई न केल्यास स्वातंत्र्यविरोधी मोर्चा पक्का होत जातो. लाटेवर आलेला गाळ मग किनाऱ्याच्या भूमीचा भाग बनतो. इतिहास असें सांगतो कीं, ज्या ठिकाणीं समाजांतील स्वातंत्र्यविषयक निश्चिय दृढपणें या हल्ल्याचा विरोध करीत नाहीं, जेथें स्वातंत्र्यांत संपूर्ण श्रद्धा असणारे लोक गलितधैर्य होतात, त्या ठिकाणीं जें असत्य तें सत्य ठरतें, जें चुकीचें तें निर्दोष ठरतें व ज्यांनीं ती लाट उत्पन्न केली ते सत्ताधीश बनतात किंवा सत्ताधीशांना ते आपल्या हातांत ठेवतात. जे

सत्ताधीश आहेत, त्यांना मग लोकमताची कदर करावी असें वाटत नाहीं. जें खरोखर चूक आहे अशी त्यांची खात्री झाली असतांनासुद्धां लोकमताचें, प्रचारी लोकमताचें, दान पडल्यानें तें बरोबर आहे असें वाटूं लागतें. जें नैतिक दृष्ट्या हीन आहे त्याबद्दल त्यांचें मन त्यांना खात असतांना तुफानी लोकमताच्या प्रवाहांत त्यांतील अनैतिकता धुतली गेली असें त्यांना वाटतें आणि अशा घटनांचीं उदाहरणें आजच्या जगांत आपणांस दिसून येतात. लोकसभेंतून, विधानसभेंतून देण्यांत येणारीं उत्तरें हीं केवळ लोकमत बाजूचें आहे या गर्वांत दिलीं जातात व वस्तुस्थितीचा विपर्यास मग त्यांना विपर्याससुद्धां वाटत नाहीं. जर केलेलें पाप छपवितां आलें, केलेलें कृत्य लपवितां आलें, तर जास्तींत जास्त प्रयत्न सत्ताधीश करीत असतात व त्या कामीं नागरिकांना विचारस्वातंत्र्य नाकारतात. आणि सरकारच्या अंवतींभंवतीं वावरणाऱ्या हितसंबंधीयांचीं वर्तमानपत्रें हीं सरकारच्या या कृत्याला पाठिंबा देत असतात. तात्पर्य, वर्तमानपत्रें हीं अयोग्य प्रकारानें लोकांच्या स्वातंत्र्यावर हल्ला करतात. एवढेंच नव्हे तर सरकारच्या खोटेपणाला पाठिंबा देऊन खोट्याला सत्याची प्रतिष्ठा बहाल करीत असतात. ज्या राज्यांत स्वातंत्र्याची लालसा अव्यभिचारी नाहीं, त्या राज्यांत खरें स्वातंत्र्य नांदणार नाहीं. खरें स्वातंत्र्य हें मनाची प्रेरणा असतें. लोकमताशीं तिचा संबंध अपरिहार्य नसतो. अन्यायाला विरोध करण्याची संवय मनाला असल्याशिवाय लोकांच्या सांगण्यावरून विरोध करणें हें वकिलानें कज्जा मांडावा असें असतें. स्वातंत्र्याची तळमळ असली पाहिजे, तो मनाचा धर्म असला पाहिजे व तसा धर्म राज्यकर्त्यांचा नसल्यास त्यांची स्वातंत्र्यविषयक दृष्टि बाजारभावाप्रमाणें कमीजास्त होत असते.

समाजामध्यें वर सांगितल्याप्रमाणें हितसंबंध संघटित होतात. वृत्तपत्रासारखें प्रचारसाधन हातामध्यें घेऊन लोकमताला विशिष्ट विचारांची अफू देण्यांत यशस्वी होतात. पण हें सर्व करण्यांत त्याचे हेतु, हितसंबंध राखण्यांत असतो व हितसंबंध संरक्षणाचें हें कार्य ते राज्यसत्तेमार्फत करतात. राज्यसत्तेला लोकमताचा जो पाठपुरावा पाहिजे असतो तो वृत्तपत्रांच्या प्रचाराच्या मायाजालानें मिळतो व या सर्वांचा परिणाम म्हणजे समाजामध्यें जे गरीब आहेत, साधनविरहित आहेत, पण जे शीलवंत व श्रद्धावंत आहेत त्यांना खरें स्वातंत्र्य लाभत नाहीं. खऱ्या स्वातंत्र्यामध्यें समता ही समाविष्ट असते आणि खरें स्वातंत्र्य या अर्थानें संरक्षित व्हावयाचें तर त्याच्या संरक्षणार्थ प्रत्येकाला सारखी तळमळ असली पाहिजे. जर स्वातंत्र्याचा परिणाम विविध तऱ्हेनें होणार असेल तर मग तें स्वातंत्र्य अर्थशून्य होतें. समाजामध्यें सर्व-तंत्र-स्वतंत्र अर्थव्यवस्था आहे, ( लेझी अफेअर ) याचा अर्थ कुणालाहि कांहींहि निर्माण करण्याची, विभाजन करण्याची, उपभोग करण्याची स्वतंत्रता आहे व त्याचा परिणाम कोणी श्रीमंत, कोणी सामान्य व बहुसंख्य दरिद्री अशी परिस्थिति आणण्यांत होतो, आणि हे परिणाम स्वातंत्र्यांतून निर्माण झाले असल्याकारणानें ते कायम राहावेत या दृष्टीनें

जे त्यांत जास्तींत जास्त धनिक झाले असतील ते मग असल्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात व समतास्वरूपी स्वातंत्र्याचा विरोध करतात. खरें स्वातंत्र्य अन्यांना मिळावें असें त्यांना वाटत नाहीं. कारण तें खरें स्वातंत्र्य त्यांना मिळणें याचा अर्थ समाजांतील विषमता कमी होणें असा आहे. ज्याच्याजवळ नाहीं व ज्याच्याजवळ आहे असे दोन विषम वर्ग मग समाजांत अस्तित्वांत येतात. वास्तविक समाज हा सर्वांना सम असला पाहिजे. पण त्यांतूनच ही विषमता निर्माण होते व एकदां जे आहेरे असतात ते सर्वदा तसेच राहूं इच्छितात व मग समाजांतील सामाजिक सत्ता व राज्यांतील राज्यसत्ता या दोन्हींच्या साहाय्यानें विद्यमान विषमतेला कायम करण्याचा प्रयत्न करतात. इतकेंच नव्हे, तर विद्यमान विषमता ही स्वाभाविक स्थिति आहे असाहि वेदान्त सांगतात. जे दरिद्री आहेत ते त्याच लायकीचे आहेत. जर त्यांच्यांत योग्यता असती तर ते तसे झाले नसते आणि विद्यमान विषमता ही मनुष्यनिर्मित नाहीं, त्याचा दोष समाजव्यवस्थेंत नाहीं, या तत्त्वज्ञानाचा दाखला देण्यांत येतो. जे आहेरे आहेत, संचितवादी आहेत, हे सर्व असा कांहीं तरी वेदान्त सांगून आपल्या मनाचें समाधान करीत असतात व आपल्या सदसद्विवेकबुद्धीला फसवीत असतात. आणि कोरडी सहानुभूति इतक्या बेमालूमपणें पददलितांना दाखवीत असतात कीं, त्यांचे ते नक्राश्रु कांहीं वेळां व कांहीं जणांना खरे वाटतात. समाजांतील उपेक्षित व वंचित दडपलेले, दाबून टाकलेले, कांहीं काळ तरी या ढोंगी लोकांच्या साखरपेरी सहानुभूतीला खरें मानून चालतात आणि या आहेरे वर्गाचे प्रतिनिधि व त्यांचे हात ओले केलेले भाट पददलितांसाठीं वाटेल तें करण्यास ते तयार आहेत असें सांगत असतात. प्रत्यक्ष अन्यायाविरुद्ध या गरीब वर्गानें लढ्याची भाषा अगर विरोधाची भाषा सुरू केल्यास समाज उलथून पाडावयाचा आहे, राज्यक्रान्ति करावयाची आहे, असा आरोप त्यांचेवर करून राज्यसत्तेला त्यांचेविरुद्ध कारवाई करावयास लावतात. पुष्कळ वेळां तत्त्व मान्य करून तपशीलांत मतविरोध दाखवितात व ह्या वर्गाच्या गरीब नेतृत्वांत गोंधळ उत्पन्न करतात. आमच्यांत व तुमच्यांत कांहीं फरक नाहीं असें सांगत सांगत असलेले फरक कायम करण्याचा, नव्हे वाढविण्याचा प्रयत्न करीत असतात. कुठलाहि मालकवर्ग मजुरांची मागणी संपाचें ग्रहण लागेपर्यंत मान्य करीत नाहीं. संप फोडण्याचें कार्य न जमलें तर हिंसात्मक कृत्यें आपल्या बगलबच्चांकडून करून राज्यसत्तेला संप दडपून टाकण्याची संधी देत असतो. पुष्कळ वेळां कांहीं दिलेसें करून पुष्कळसें नाकारीत असतो. अनेक वेळां मागण्या योग्य; पण मिळविण्याचा मार्ग चुकीचा, असा पवित्रा घेऊन मजूरवर्गाचा निश्चय डळमळीत करण्याचा प्रयत्न करीत असतो. एक तर संघटित मालकशाहीविरुद्ध अगर संचितशाही (व्हेस्टेड इंटरेस्ट) विरुद्ध प्रभावी संघटन करणें अवघड काम असतें. सामान्यपणें माणसें साहस प्रवृत्तीचीं नसतात. संपांत सामील झालों तर काय परिणाम होतील याच्या विवंचनेनें अनेक सामील होत

नाहींत. त्याजबरोबर आपल्या सवंगड्यांची साथ सोडणें हेंहि त्याला अवघड वाटतें. त्यांची मैत्री त्याच्या जीवनाला आनंद देणारी प्रेरणा असते. कित्येक मानाच्या प्रलोभनानें स्वार्थत्याग करण्यास तयार होतात. कित्येक पराभव झाल्यास होणाऱ्या अपमानानें पुढें जाण्यास तयार होत नाहींत. तात्पर्य, त्याग करण्यास कोण तयार होतो, अगर त्यागापासून कोण विन्मुख होतो, हें त्या त्या व्यक्तीची परिस्थिति ठरवीत असते आणि ज्याप्रमाणें व्यक्तीचें मन विचार करीत जातें त्या त्या विचारांतून प्रत्येक व्यक्ति आपण कसें वागावें, काय करावें, याबाबत निर्णय घेत असते व आपल्या जीवनांत सुखी कसें व्हावें, दुःख कसें टाळावें, याची उपाययोजना निश्चित करीत असते.

मन हें परिस्थितीनुरूप वागत असतें याचा अर्थ समाजामध्यें जे कांहीं विचार-प्रवाह चालू असतात, ज्या मूल्यांची कदर केली जाते, या सर्वांचा परिणाम मनावर होत असतो. संपूर्णपणें ज्याचा संबंध समाजांतील परिस्थितीशीं बिलकूल येत नाहीं असा कांहीं विचार व्यक्तीच्या मनांत येत नाहीं व जें विचाराचें स्वातंत्र्य त्याला असतें तें याच मर्यादेंत आणि या दृष्टीनें पाहतां समाजांतील विचारप्रवाह जितके विविध व व्यापक व समाजांतील मूल्येंहि जितकीं सुविचारांना व सद्भावनांना आवाहन देणारीं तितकें व्यक्तीचें विचारस्वातंत्र्य सार्थ होतें. समाजांतील मूल्यांवर व विचारप्रवाहावर सामाजिक नियमन व प्रचारानें केलेला कोंडमारा अशी परिस्थिति झाल्यास तें विचारस्वातंत्र्य प्रमाणांत नसलें तरी प्रतीनें हिणकस होतें. मनुष्य समाजाचा घटक असतो, संघाचा अगर संस्थेचा सभासद असतो. तरी पण जो कांहीं अनुभव तो घेत असतो, तो त्याचा असा खास असतो. रस्ता सार्वजनिक आहे म्हणून सर्व कांहीं त्याला व्यापतां येत नाहीं. कुठें जरी चालत असला तरी त्याच्यांत पावलांशीं त्याची गति सीमित असते. त्याच्यापुरता रस्ता म्हणजे तो जेथें पावलें ठेवील तेवढाच. म्हणून समाजांत जेवढा अनुभव भरलेला असेल त्यांतील त्यानें जो घेतला, त्याच्या वांट्याला जो आला, त्यावर तो विचार करणार व त्यांतूनच तो आपल्या वर्तनक्रमाचा आराखडा तयार करणार. त्यांतूनच वागणुकीचे संकेत तो निर्माण करणार. त्याच्यावर झालेला अन्याय, त्याला वाटणारा कडवटपणा, त्याच्याशीं केलेली बेईमानी या सर्वांचा अनुभव त्याचाच असल्यानें व त्याच्या मनावर या गोष्टींचा जो परिणाम झाला असेल तो त्यानें आपल्या वागणुकीनेंच दूर करावयाचा असतो. या क्षेत्रांत कुठलेंहि संघटन अगर संघ कांहीं करूं शकत नाहीं. मित्रानें धोका दिला, मुलें बेफामपणें वागूं लागलीं, बायको भांडकुदळ झाली, याबाबत समाज काय करणार व राज्यहि काय करणार? तथापि, कांहीं जीवनाच्या क्षेत्रांतील अनुभव अनेक व्यक्तींना समान असे असतात. एकाच चाळींत राहणारे अनेक भाडेकरू असतात. त्यांचे व्यक्तिगत अनुभव त्यांच्या त्यांच्या जीवनाबाबत निरनिराळे असतात. पण चाळींतील अस्वच्छता, नळाच्या पाण्याची टंचाई, अपुरे संडास, या बाबतींतील अनुभव सर्वांना

समान असतात, सारखेच असतात. म्हणून जें कांहीं करावयाचें व ज्यायोगें हीं दुःखें दूर होणार, ज्या गैरसोयी कमी होणार, त्या बाबतींतील वर्तन अगर क्रिया हें सामाजिक स्वरूपाचें असतें. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ज्यांत सर्वांचे हितसंबंध आहेत, जें सर्वांना बाधतें त्यासंबंधीं कांहीं तरी करावें, कांहीं तरी व्हावें, असें सर्वांना वाटतें. एका दृष्टीनें त्या ठिकाणीं सर्वांचें हितैक्य असतें. ज्या ठिकाणीं हितैक्य नाहीं व प्रत्येकाची गरज ही दुसऱ्याच्या गरजेइतकी नाहीं, असें असलें म्हणजे कांहीं एकत्र येऊन करावें असें वाटत नाहीं. तेथें सामाजिक वर्तन अगर सामाजिक क्रिया शक्य नसते. व्यक्तीव्यक्तीच्या गरजा, व्यक्तीव्यक्तीचे हितसंबंध निराळे असले म्हणजे त्यांना येणारा अनुभव हा निराळा असतो व मग एकमेकांबद्दल विचार करावा, एकमेकांचीं दुःखें जाणून घ्यावीं असें वाटत नाहीं. सर्वच एका डब्यांत बसले आहेत व आधींच गर्दी आहे, मग सर्व मिळून नवीन उतारूंना आंत येऊं देत नाहींत. पण निरनिराळ्या डब्यांत माणसें आहेत पण या डब्यांतील माणसें त्या डब्यांत गर्दी आहे कीं नाहीं याची चौकशी करीत नाहींत. कारण तेथें हितैक्यता नाहीं. समान अनुभव नाहीं. एका आळींत निरनिराळ्या घरांतून माणसें राहात आहेत. निरनिराळ्या कचेऱ्यांतून काम करीत आहेत. तीं माणसें एकत्र येऊन नोकरीच्यासंबंधीं विचार करणार नाहींत, पगारवाढीसाठीं सामुदायिक रीतीनें कांहीं कार्यक्रम आंखणार नाहींत. पण गल्लींतील सडक वाईट आहे, तिची साफसफाई होत नाहीं, म्युनिसिपालटीनें करवाढ केली आहे, याबाबत हितैक्य असल्यानें तीं एकत्र येतील, कांहीं सामूहिक पाऊल उचलतील. निरनिराळ्या भागांत राहात असलेले, पण एका कारखान्यांत काम करणारे म्हणून हितैक्यतेमुळें एकत्र येतात व सामुदायिक रीतीनें समान दुःखासाठीं, समान कार्यासाठीं, कांहींतरी करतात. जेथें हितैक्य आहे तेथें सामुदायिक क्रिया व सामाजिक वर्तन (सोशल ॲक्शन) हें होतें. एका गिरणींतील मजुरांची अधिक पगाराबद्दलची मागणी, दुसऱ्या गिरणींतील मजुरांना समजून येते. त्यांना त्याबद्दल सहानुभूति वाटते व संप झाल्यास सहानुभूतीचा संपसुद्धां ते करतात. कारण तेथें हितैक्यता आहे. समान अनुभव आहे. म्हणून सामुदायिक सहानुभूति पण आहे. त्याप्रमाणें एका गिरणीमालकानें पगारवाढ करण्याचें नाकारल्यास त्याच्या त्या कृत्याला अन्य गिरणीमालक सहानुभूति दाखवितात. कारण तेथेंहि हितैक्य आहे. संपाचा मजकूर वर्तमानपत्रांत येतांच त्याची प्रतिक्रिया जी श्रीमंत व धनिक वर्गावर होईल ती, समाजांतील गरीब लोकांच्या मनावर जी होईल त्यापेक्षां निराळी असते. संप कुठेंहि झाला, कुठें जास्त पगाराची मागणी झाली, कीं धनिकलोकांना, मालकलोकांना तो संप अगर ती मागणी समाजविरोधी वाटते व मोठ्या प्रमाणावर संप झाल्यास त्याच्या कारणाचा विचार न करतां तो राष्ट्रविद्रोही आहे असाच अभिप्राय ते देतात. ज्या ठिकाणीं उघड उघड अगर सूक्ष्म रीतीनें हितैक्यता आहे त्या ठिकाणीं एक प्रकारचा भ्रातृभाव संबंधित व्यक्तींत अगर वर्गांत दिसून येतो आणि त्याकामीं कांहीं प्रयत्न झाल्यास

त्या प्रयत्नाबाबत सहानुभूति दाखविली जाते. कारण त्या प्रयत्नांतून होणारे परिणाम सर्वांवर सारखेच होतात. एकजुटीची व आपुलकीची भावना मग तेथें उत्पन्न होते.

जितकी हितसंबंधांत समानता तितका सामुदायिक प्रयत्नांना अधिक वाव असतो. समाज-हित-संबंध स्वातंत्र्याच्या वातावरणांत अधिक अधिक एकत्र येणें, हें क्रमप्राप्त असतें. विचारविनिमय होत असतो व त्यांतून साहजिकपणें सामुदायिक भाव निर्माण होतो. हितपरत्वें भ्रातृभाव निर्माण होतो व यांतूनच सर्वांना समानता असावी, समाजामध्यें समता असावी, हा भाव निर्माण होतो. मग कुणाला अधिक असावें, कुणाला खास अधिकार असावा, याविरुद्ध मनाची भावना होते. ज्यांना समाजामध्यें खास अधिकार मिळाले असतील अगर खास सवलती मिळाल्या असतील, त्यांना त्या सोडाव्याशा वाटत नाहींत. इतकेंच नव्हे तर समाजाच्या दृष्टीनें समाजाच्या उन्नतीसाठीं जे ते भोगत आहेत तें इष्ट आहे असा दावा सांगितला जातो व त्या दाव्याविरुद्ध लोकमत तीव्र होऊं नये म्हणून वस्तुस्थिति लोकांपुढें न येईल अशी ते खटपट करीत असतात. सत्य लोकांपुढें येऊं देणें व त्यावर मुक्त चर्चा होऊं देणें म्हणजे राष्ट्राच्या विनाशाला आमंत्रण देणें आहे असें त्यांना वाटतें. आपल्याजवळ संपत्ति आहे ती समाजाच्या चांगल्यासाठीं आहे असा प्रामाणिक समज त्यांचा असतो व म्हणून तिच्या रक्षणार्थ ते वाटेल तें करण्यास उद्युक्त होतात. ही परिस्थिति केवळ आर्थिक स्थितीबाबत आढळून येते असें नाहीं, सामाजिक क्षेत्रांतहि तेंच आढळून येतें. वेदविद्या फक्त वरच्या वर्गांनींच शिकावी, त्यांनाच तो अधिकार आहे, ही विचारसरणी समाजामध्यें विषमता पोसणारी आहे. ‘न स्त्री स्वातंत्र्यमर्हति’ हीहि गोष्ट समाजाच्या कल्याणासाठीं आहे असेंच प्रतिपादलें जात होतें. स्त्रियांना स्वातंत्र्य दिल्यास धर्म शिल्लक राहणार नाहीं ही भीति एके काळीं प्रामाणिकपणें अनेकांना वाटत होती. याहि गोष्टींत कुणा वर्गांना अगर कुणा व्यक्तींना जें कांहीं अधिक मिळालें आहे तें संरक्षण करण्याची भावनाच दिसून येते. विषमतेमुळें ज्यांना अधिक मिळालें आहे त्यांचा संपत्ति अगर प्रतिष्ठा राखण्याकडे कल असतो. किंबहुना, अट्टाहास असतो असें म्हटलें तरी चालेल व या विशेष अधिकाराविरुद्ध, या विषमतेविरुद्ध प्रयत्न करण्याची प्रेरणा समाजामध्यें खरें स्वातंत्र्य असेल तरच होतें. सामाजिक परंपरा व सामाजिक शक्ति ज्या स्वातंत्र्यांतून समतेचा भाव निर्माण होणार आहे त्या स्वातंत्र्याविरुद्ध उभ्या राहतात. नवें सत्य जें समाजांतील सर्व व्यक्तींना समान न्याय देऊं इच्छितें, त्याला मग समाजाची शक्ति विरोध करते. त्या विरोधाचे अनेक प्रकार असतील. साक्रेटिसाला विष दिलें जाईल, कोपर्निकसाला देशनिर्वासित केलें जाईल, एकनाथाला ब्रह्मवृंदाचा कोप सहन करावा लागेल, ज्ञानेश्वरादि भावंडांना धार्मिक संस्कारापासून वंचित केलें जाईल. तथापि फार काळपर्यंत समाजामध्यें विषमता नांदणार नाहीं. नागरिकस्वातंत्र्याचा

उपयोग जितका निर्भेळपणें केला जाईल, तेवढ्या प्रमाणांत समाजांतील विषमता कमी होते, स्वातंत्र्याचा परिणाम समतेच्या स्थापनेंत होतो, असा जगाचा इतिहास आहे.

सामान्यपणें राष्ट्रांतील संस्था कशाहि स्वरूपाच्या असोत, अगर समाजविषयक यंत्रणा कशीहि असो; ज्या ठिकाणीं लोकांच्यामध्यें जास्तींत जास्त हितैक्य आहे तेथें स्वातंत्र्य अधिक प्रमाणांत नांदतें. कारण स्वातंत्र्याचा परिणाम तेथें समतेचीं व समानतेचीं क्षितिजें वाढविण्यांतच होत असतो. हितैक्यता असल्यानें समान भावना असते आणि म्हणून ती समान भावना स्वातंत्र्यांत जोपासली जाते आणि म्हणून ती व त्या भावनेनें स्वातंत्र्यहि जोपासलें जातें आणि जेथें मोठ्या प्रमाणांत हितैक्य नाहीं व त्यामुळें विषमता अधिक आहे, त्या ठिकाणीं स्वातंत्र्य आकसतें. कारण ज्यांच्याजवळ आहे ते आपल्यापासून जाईल या भीतीनें स्वातंत्र्यावर मर्यादा घालीत असतात. संपत्ति ही सर्व दुःखांचें मूळ आहे, असें वेदान्त सांगतो आणि संपत्तीच्यापायीं इतिहासामध्यें काय गुन्हे घडले आहेत, किती लढाया लढल्या गेल्या आहेत, हें विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. ज्या ठिकाणीं मूठभर लोकांच्या हातांत बहुतेक संपत्ति असते व बहुसंख्याक लोक दरिद्री असतात, त्या ठिकाणीं शोषक आणि शोषित असे वर्ग समाजामध्यें अनिवार्यपणें उत्पन्न होतात आणि ज्या ठिकाणीं अशी परिस्थिति असेल तेथें शोषक वर्ग स्वातंत्र्याविषयीं बेफिकीर असतो. कारण, तो सत्ताधीश असतो. स्वातंत्र्याबद्दल त्यांनीं दक्षता घेणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या स्वार्थांवर अग्नि ठेवण्यासारखें असतें आणि आधुनिक जगांत संपत्तीचा त्याग करून वनवासांत जाणारे बुद्ध बिलकूल दिसून येत नाहींत. उलट, जिकडे तिकडे संपत्तीचे दास तिच्यासाठीं प्राण टाकणारे व प्राण घेणारे असेच लोक दिसून येतात. समाजांत समता असावी, स्वातंत्र्य असावें, भ्रातृभाव असावा या गोष्टी विषम समाजांत प्रभावी असत नाहींत अगर होतहि नाहींत. याचा अर्थ असा नव्हे कीं, समता, स्वातंत्र्य व भ्रातृभाव यांचा देखावा केला जात नाहीं. मतदानाचा हक्क सर्वांना देऊन सर्वांना राजकीय समता आहे हें ठळकपणें दाखविलें जातें. पण संपत्तीच्या वांटणीचा प्रश्न आल्याबरोबर एकदम असली मागणी करणें म्हणजे समाजाला उलथून पाडणें आहे, असा कांगावा केला जातो. ज्या गोष्टींत संपत्तीचा संबंध येत नाहीं त्या गोष्टींत स्वातंत्र्य दिल्याचें राज्यसत्ता तोऱ्यानें सांगत असते. आणि संपत्तीची विषमता फार काळ समाज सहन करूं शकत नाहीं. समाजामध्यें अनेक श्रम करीत असतात. थोडेसे आराम करीत असतात. अनेक खपत असतात. अनेक चैनींत बसून खात असतात. हें दृश्य जे श्रमणारे आहेत, ते फार काळ मुकाट्यानें पाहूं शकत नाहींत. समाजाची रचना एखाद्या पिरॅमीडसारखी असते व तळाशीं असलेले साहजिकपणें वरच्या थरांत जाऊं इच्छितात. आणि जितका धनिक वर्ग एकंदर समाजाच्या प्रमाणांत लहान, जितकी आर्थिक विषमता अधिक व मग जी विरोधी भावना सुरू होते, जी अन्यायाविरुद्ध क्रिया सुरू होते, ती अगदीं

तळापासून. ज्या वर्गाच्या हातांत संपत्ति आहे त्या वर्गाच्या हातांत सत्ता हा इतिहासाचा अनुभव आहे. ज्याच्याजवळ पैसा नाहीं त्याला या विषम समाजामध्यें राबण्यापलीकडे भूमिका नाहीं. संपत्ति अज्ञानाला, मूर्खाला वाटेल ती सामाजिक पदवी देऊं शकते. संपत्तीच्या साहाय्यानें विद्वत्तेला दास बनवितां येतें, नसलेले गुण संपत्तीच्या आश्रयाला येतात, ही परिस्थिति या विषम समाजांत नांदत असते. ती कायम राहावी म्हणून ज्यांच्याजवळ ती आहे ते धडपडत असतात. राज्ययंत्रणेचा उपयोग करीत असतात. संपत्तीचा व गुणाचा विषय यांचा समाजांत कांहीं संबंध असतो असें नाहीं. मग अपमानित विद्वत्ता, घृणित दारिद्र्य, विफल जीवन, हीं मग एकत्र येतात आणि समाजांतील विषमता घालविण्याच्या प्रयत्नाला सुरुवात करतात. त्यांना खरोखर इतरांच्यापेक्षां अधिक असावें, अधिक मिळावें, अशी इच्छा नसते. त्यांची मागणी एवढीच असते कीं इतरांच्या इतकें मिळावें, कमी मिळूं नये. जे मागणारे त्यांच्यावर मत्सरग्रस्त आहेत असा आरोप केला जातो. ज्यांच्याजवळ मागितलें जातें त्यांच्यावर सत्तेचा मद, संपत्तीची मदांधता आल्याचा आरोप केला जातो. ही समानतेची मागणी मग नाकारण्यांत येते, कारण मागणी मान्य करतांच असलेल्या सत्तेवर मर्यादा बसते व सत्तेच्या सामर्थ्यावर लाभणारीं सुखें दुरावतात. समता मान्य करणें म्हणजे सत्ता घालविणें आणि सत्ता घालविणें अगर कमी करून घेणें याचा अर्थ त्यांच्या गरजा ज्या प्रभावी असतात त्या मग प्रभावी राहात नाहींत. उत्पादनाचा हेतु बदलला जातो. उत्पादन मग केवळ नफ्यासाठीं होत नाहीं. केवळ थोड्या लोकांच्या गरजेसाठीं होत नाहीं, त्याचा हेतु मग सर्व समाजाची गरज पुरवणें हा होतो. समाजामध्यें कोणत्या शक्ति प्रभावी असाव्या हें नियंत्रण करण्याचा हक्क सत्ता जातांच जातो, अगर कमी होतो. जीवनाबद्दल त्यांच्या ज्या कल्पना होत्या, जीं मूल्यें त्यांना श्रेष्ठ वाटत होतीं तीं सर्व मग कोलमडतात आणि कोचावर बसून प्रेमकथा वाचण्याऐवजीं हातांत केरसुणी घेऊन काम करावें लागतें. उन्हाळ्यांत माथेरान, हिंवाळ्यांत आणखी कोणतें तरी रमणीय स्थान. उद्यांची चिंता जेथें नाहीं, हातानें काम करण्याचें कारण पडत नाहीं, या स्थितींतून दोन खोल्यांच्या फ्लॅटमध्यें राहावें लागतें. समाजांतील अन्य नागरिकांप्रमाणें काम करणें हें वांट्याला येतें आणि हें शक्य तितकें न व्हावें व टाळावें म्हणून जास्तींत जास्त प्रयत्न केला जातो. आजहि भारतामध्यें तसाच अनुभव येऊं लागला आहे. जगांतील मोठ्या विभागांत भांडवलशाहीप्रणीत लोकशाही नाहींशी झाली आहे. कांहीं राष्ट्रांतून तें चालू आहे व भारतांतहि आज लोकशाही आहे, लोकशाहीचा मुखवटा तर नक्कीच आहे. परंतु, भांडवलशाहीचें प्रस्थ, सुखशाहीचें प्रस्थ, भारतीय समाजांत व राजकीय क्षेत्रांत अद्यापि आहे.

ज्या समाजामध्यें विचारस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य आहे त्या समाजाचें ध्येय मग समाजांत असलेली विषमता घालविणें हें असतें आणि ज्या ठिकाणीं वर

सांगितल्याप्रमाणें मूठभर लोकांच्या हातांत सर्व संपत्ति व संपत्ति निर्माण करण्याचीं साधनें असतात, ते समतेच्या मागणीला सर्वप्रकारें विरोध करतात. कारण ती त्यांच्या मुळावर आलेली असते. मग समता नाकारतात. एवढेंच नव्हे, तर समता मागण्याचा हक्क पण नाकारला जातो. स्वातंत्र्य आहे आणि समता नाहीं, या परिस्थितींत स्वातंत्र्य आणि समता यांत संघर्ष निर्माण होतो. स्वातंत्र्याच्या नांवाखालीं तें मर्यादित करणें याविरुद्ध मग आवाज उठवला जातो. वाटेल तें निर्माण करण्याचा, वाटेल त्या प्रकारें वांटणी करण्याचा, वाटेल त्याचा उपभोग घेण्याचा हक्क अगर स्वातंत्र्य, समाजांत समता उत्पन्न करणारी व्यवस्था झाल्यास ती नाकारली जाते. याच्या उलट समाजांत समता नसेल तर स्वातंत्र्य हें अर्थहीन आहे याची जाणीव व अनुभव असल्यानें समतेसाठीं झगडणारे स्वस्थ बसत नाहींत. आणि मग समाजांत आहेरे व नाहींरे, धनी व निर्धनी, खाणारे व खपणारे, यांच्यामध्यें यादवी उत्पन्न होते. खुषीनें संपत्तीचा त्याग केला आहे अशा कांहीं व्यक्ति समाजांत असूं शकतात; पण श्रीमान् वर्गानें, सत्ताधीश वर्गानें संपत्तीचा अगर सत्तेचा त्याग खुषीनें केला असें उदाहरण इतिहासांत घडून आलें नाहीं. आपले विशेष अधिकार कोणी सोडत नाहीं. मुंगळा ज्याप्रमाणें गुळाच्या ढेपीला चिकटला म्हणजे तो तिला सोडत नाहीं, मुंडकें तुटलें तरी सोडत नाहीं, ती स्थिति समाजामध्यें दिसून येते. संपत्ति असो अगर सामाजिक संपत्ति असो; दीर्घकाळ किंवा पिढ्यान् पिढ्या तिचा उपभोग घेतल्यानंतर कोणी सोडायला तयार होत नाहीं. आपण संपत्तीचे विश्वस्त आहोंत असा आविर्भाव केला जातो. आपण केवळ सेवेकरी आहोंत अशी प्रतिष्ठा निर्भेळ स्वार्थाला दिली जाते. पिढ्यान् पिढ्या वर्णश्रेष्ठत्व असल्यानें शीलश्रेष्ठत्व आलें आहे, असा दावा सांगण्यांत येतो. जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी जगीं तो श्रेष्ठ, हें सांगण्यांत मनाला कमीपणा वाटत नाहीं. जें आपण सांगत आहोंत व करीत आहोंत तें न्यायाला धरून आहे, असेंच प्रतिपादण्यांत येतें. न्यायाची कल्पना व समाजहिताची कल्पना म्हणजे त्या संबंधित वर्गाची कल्पना होय. आपले अधिकार व संपत्ति कायम राहाण्यास साधनशुचिता पाळणें त्यांना युक्त वाटत नाहीं आणि स्वार्थाच्या संरक्षणासाठीं अंतिम स्वार्थत्यागापर्यंत जाणारे अनेक असतात आणि ज्या ठिकाणीं असा सारासार विचार न करतां हट्ट केला जातो, विवेकाला निर्बलतेची संज्ञा देण्यांत येते, त्या ठिकाणीं मग संघर्ष केवळ विचारविनिमयाच्या अगर अहिंसेच्या कक्षेंत न राहतां सरळ सरळ हिंसेचा स्वीकार केला जातो. ज्या समाजामध्यें आर्थिक व्यवस्थेचा परिणाम संपत्तीचें केंद्रीकरणांत होतो व बहुसंख्याकांच्या वांट्याला दारिद्र्य येतें, त्या ठिकाणीं बहुसंख्याकांना स्वातंत्र्य व समता नाकारल्याशिवाय संचितवादी व सधन समाज जिवंत राहूं शकत नाहींत आणि मग ज्या ठिकाणीं स्वातंत्र्य व समता यांचा समन्वय होण्याऐवजीं स्वातंत्र्य व समता यांत विरोध उत्पन्न होतो, संघर्ष उत्पन्न होतो व त्या संघर्षाचा परिणाम काय होतो हें इतिहासानें नमूद केलें आहे. आर्थिक व्यवस्था मग

क्रांतिकारक रीतीनें बदलली जाते. समाजांतील विशेष अधिकारी मग अधिकारवंचित होतात. कळसावर राहणारे तळाशीं येतात आणि थोडें थोडें दिल्यानें बाकी राहिलेलें अधिक काळ टिकलें असतें तें मग झपाट्यानें काढून घेतलें जातें. क्रमाक्रमानें थोडें विवेकानें व विचारानें घेतलें असतें, तर कांहीं निराळें झालें असतें, याची जाणीव होते. पण ती पश्चात्तापरूपानें. समाजाचें परिवर्तन हें अनिवार्य आहे हें समजून येतांच दीर्घ दृष्टीनें विचार करणारे योजना करीत शांत रीतीनें घडवून आणीत असतात. सबंध समाजाचें परिवर्तन व्हावयाचें ही साधी गोष्ट नसते. क्रॉमवेलच्या काळीं इंग्लंडमध्यें जें झालें, किंवा फ्रेंच राज्यक्रान्तीच्या वेळीं जें झालें यांतील फरक सहज दिसून येणार आहे. १९१७ सालीं झालेली रशियांतील क्रांति जगांतील सर्व लोकांना वास्तविक मार्गदर्शक व्हावयास पाहिजे, पण ती झालेली नाहीं. पण त्याचबरोबर स्वातंत्र्य व समतेसाठीं झालेल्या या घटना स्वातंत्र्य व समता प्रस्थापित करण्यांत झाल्या, असेंहि म्हणतां येत नाहीं. जें विद्यमान आहे तें रहावें म्हणून प्रयत्न झाले. वाटेल ती किंमत देऊन तें कायम ठेवण्याचा प्रयत्न झाला. वाटेल त्यापेक्षां अधिक किंमत देऊन तें राहिलें नाहीं. क्रांतीला सुरुवात करणाऱ्या सूत्रधारांच्या नांदींत कल्पना केलेलें नाटक प्रयोगांत दिसून आलें नाहीं, नांदी व नाटकाचा अंत यांत सर्व तऱ्हेची विसंगति साधारणपणें दिसून आली. इतिहासाच्या या सामान्य अनुभवाला भारत हा थोडासा अपवाद आहे. भारतांत सर्वस्वीं अहिंसात्मक क्रान्ति झाली नाहीं हें खरें; संपूर्णतया हिंसात्मक क्रान्ति झाली हेंहि खरें नव्हे. तथापि, भारताच्या स्वातंत्र्याला विरोध करणाऱ्यांनीं समय जाणला आणि सत्ता प्रदान केली आणि भारतांतील नेत्यांनीं पण सर्व पार्श्वभूमि लक्षांत घेऊन मिळालेलें स्वातंत्र्य बहुसंख्याक प्रजेच्या दृष्टीनें अर्थपूर्ण करण्यास सुरुवात केली व ती दृष्टि आजहि चालू आहे.

विषम समाजांत, आमूलाग्र समाजरचनेंत बदल करण्यास विरोध असतो. मग तेथें नांदत असलेल्या राज्यसत्तेचें स्वरूप कसेंहि असो. इंग्लंडच्या बाबतींत असें म्हणण्यांत येतें कीं, कायद्याचा स्वीकार करून वैध मार्गानें म्हणजे पार्लमेंटमार्फत सर्व कांहीं करतां येतें. पार्लमेंटची सत्ता एवढी प्रभुत्वपूर्ण आहे कीं, पार्लमेंटला फक्त पुरुषाला स्त्री बनवतां येत नाहीं. अन्यथा पार्लमेंट ही कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् समर्थ आहे. उद्यां पार्लमेंट मनांत आणील तर राजपद नष्ट करील, उमरावसभा नष्ट करील, तथापि हें होत नाहीं. याचें कारण इंग्रज समाजांतील कांहीं आदर्शांसंबंधींची जपणूक हें आहे. जर सत्ताधीश हे समाजरचनेच्या अगर अर्थव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांबाबत दृढनिश्चयी असले तर तेथें अमौलिक अगर मूलग्राही फरक अर्थव्यवस्थेंत अगर समाजव्यवस्थेंत होणार नाहीं हें निश्चित. कारण ज्या नीतिमूल्यांवर अगर राजनैतिक सिद्धान्तांवर सबंध संविधान अगर संकेत उभारले आहेत ते मग बाजूला सारले जातील व विद्यमान सामाजिक व राजकीय जीवनांतील स्थैर्य व समतोलपणा नाहींसा होईल. हितसंबंध केवळ आर्थिकच असतात

असें नाहीं. त्यांचें स्वरूप विविध असतें आणि कोठें स्पष्ट, कोठें अस्पष्ट ते वावरतच असतात. त्यांचें अस्तित्व बोट ठेवून अमुक एक जागीं आहे असें सांगतां येणार नाहीं, पण ते नाहींत असेंहि कोणाला म्हणतां येणार नाहीं. तात्पर्य, जर सत्ताधीशांनीं मौलिक गोष्टींत फरक होऊं देण्याविरुद्ध निश्चय केला तर राज्य लोकशाही असूनसुद्धां फरक होणार नाहींत आणि याचें कारण स्पष्ट आहे. जर आमूलाग्र व पायाभूत गोष्टींतील फरकानें प्रस्थापित हितसंबंध कमी होऊं लागले तर स्वातंत्र्याच्या नांवाखालीं त्याबाबत केलेले प्रयत्न चिरडले जातील. समाजामध्यें संपत्तीच्या संरक्षणार्थ संविधानाचा कोट म्हणून उपयोग केला जातो. वास्तविक संविधानांतील व्यवस्थेप्रमाणें सवंध संविधान संपूर्णपणें बदलून टाकणें शक्य असतें. पण तें विकृत भावनेनें समाजामध्यें विद्वेष उत्पन्न करून अशक्य केलें जातें. समाजांतील आर्थिक विषमता घालविण्यासाठीं जेव्हां वैध मार्गानें नवीन करयोजना सुचविली जाते, तेव्हां समाजामध्यें उल्कापात होत आहे, असा आक्रोश केला जातो. वारसाकर अगर मृत्युकर हे कांहीं माणसें जिवंत असतांना द्यावे लागत नाहींत. तथापि जिवंतपणींच त्याला विरोध केला जातो. विषम समाजांत संपत्ति व लायकी यांत कार्यकारण भाव नसतो व फुकटांत मिळालेलें, योग्यता नसतांना मिळालेलें, सोडून देण्यास कोणी तयार नसतो व जें मिळालें आहे त्याच्या संरक्षणार्थ सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब करण्यांत येतो. वास्तविक संपत्ति ही समाजांत निर्माण होते. समाज तिचें संरक्षण करीत असतो. खाजगी संपत्तिसुद्धां समाजांतून निर्माण होत असते व समाजांतील राज्यव्यवस्था तिचें संरक्षण करीत असते. ज्याला खाजगी मालकी आपण म्हणतों तिला समाजानें मान्यता दिली म्हणून ती असते, अन्यथा नाहीं. आणि समाजामधील विषमता जावी व समता यावी, याचा अर्थ ज्यांच्याजवळ आहे, त्यांच्याजवळून घ्यावयाचें, व ज्यांच्याजवळ नाहीं त्यांना तें द्यावयाचें, वर गेलेल्यांना खालीं आणावयाचें, जे खालीं गेलेले आहेत त्यांना वर करावयाचें. समाजांतील आर्थिक भूमि समतल करावयाची, आणि तशी समतल झाली तर ज्यांच्याजवळ अधिक आहे त्यांचें महत्त्व कमी होतें आणि अशा तऱ्हेनें समाजामध्यें आमूलाग्र फरक करणारी कांहीं योजना वैध मार्गानें अंमलांत आणण्याचा प्रयत्न केल्यास अनेक अडथळे त्या कामीं उभे केले जातात. आपल्याविरुद्ध बहुमत झाल्यास तिला पक्षनिष्ठ हुकूमशाही म्हणावयाचें व आपण बहुमतांत असल्यास ती शास्त्रोक्त लोकशाही म्हणावयाची, हा देखावा मग दिसून येतो. स्वातंत्र्याच्या नांवाखालीं विद्यमान विषमता कायम ठेवणें इष्ट, हें प्रतिपादलें जातें. विद्यमान विषमतेनें पीडित, वंचित व उपेक्षित हे समतेच्या नांवाखालीं प्रयत्न करीत असतात. त्यांचा दावा जमलें तर तात्त्विक दृष्ट्या नाकारावयाचा, न जमलें तर व्यवहाराच्या दृष्टीनें त्याला विरोध करावयाचा व दोन्ही दृष्टींनीं समाजांतील संस्था व समाजांतील शक्ति यांचा उपयोग करावयाचा. तात्पर्य हें कीं, लोकशाही समाजांतसुद्धां वैध मार्गानें आमूलाग्र फरक समाजरचनेंत करणें सोपें काम नसतें. भारतांत जमीन-

विषयक धोरण निश्चित झालें असूनसुद्धां गेल्या दहा वर्षांत कांहींहि प्रगति झाली नाहीं, अनेक राज्यांतून यासंबंधींच्या कायद्याची वाटचाल मुंगीच्या पायानें होत आहे. कांहीं ठिकाणीं पास केलेले कायदे घटनाबाह्य आहेत म्हणून कोर्टापुढें दाद मागितली जात आहे. कांहीं ठिकाणीं बुडत्याला काडीचा आधार म्हणून राष्ट्रपतीनें हस्तक्षेप करावा म्हणून टाहो फोडण्यांत येत आहे. गेल्या दहा वर्षांत भारतांतील आर्थिक धोरणाचा विचार करतांना धनिक वर्गाच्या कलाकलानें करण्यांत येत आहे अशी कोणी टीका केल्यास ती अगदीं अयोग्य आहे असें म्हणतां येणार नाहीं.

संविधानांतील व्यवस्थेनें आर्थिक रचना बदलून घेणें हें कठीण आहे. समाजांतील असह्य वाटणारी विषमता दूर न केल्यास भावी काळांत समाजाची काय स्थिति राहील, याची कल्पना जगांतील भांडवलप्रधान लोकशाहींतील लोकांना चांगली आहे. हिंदुस्थान-मध्यें लोकशाही समाजसत्तावाद आणावयाचा हें ध्येय संविधानांत सूचित केलें आहे. देशांतील बहुसंख्याक कॉंग्रेस पक्षानें तें स्वीकारलें आहे. साम्यवादी पक्ष व प्रजासोशलिस्ट पक्ष यांना तें अमान्य नाहीं. हिंदुसभेनें समाजसत्तावाद स्वीकारला आहे, पण हिंदु–समाजसत्तावाद अशी त्याला संज्ञा दिलेली आहे. पण या निरनिराळ्या नांवांखालीं निरनिराळा माल निवडणुकीच्या बाजारांत विक्रीला मांडला आहे हें खरें. आज नाहीं, उद्यां लोक शहाणे होतील, चौकशी करून तो खरेदी करतील, हेंहि खरें आहे. तथापि, या लोकशाही समाजवादांत ही लोकशाही, समाजवादाला उपयुक्त ठरत आहे, का समाजवादी घोड्याच्या पायांत लोकशाही हा एक पायबंध घातला आहे, हें सांगणें कठीण. लोकशाहीच्या नांवावर प्रत्येक बाबतींत लोकसभेंत अगर विधानसभेंत यथासांग सर्व कांहीं झालें पाहिजे. किंचित् कांहीं चुकलें तर कोर्टाकडे जाण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे. गेल्या बारा वर्षांत आर्थिक रचना बदलण्याच्या दृष्टीनें जें कांहीं लोकशाही मार्गानें करण्याचा प्रयत्न केला त्यांत तंत्र मोठें मंत्र लहान, असा अनुभव आला. व्याकरण बरोबर; पण वाक्य अर्थशून्य, असा अनुभव येत आहे आणि म्हणून पुष्कळ वेळां लोकशाहीच्या यमकी कवितेंत हवें तें काव्य निर्माण होईल का असा संशय येत आहे. जर लोकशाही बाजूला सारावयाची तर मग हिंसेचा स्वीकार करावा लागेल. कारण लोकशाहीला हिंसा वावडी आहे. लोकशाहीची माळ घातल्यानंतर शेंगदाणेच खाल्ले पाहिजेत, अन्य कांहीं खाणें पाप ठरतें, आणि लोकशाहीच्या मार्गानें सफलता लवकर येत नाहीं, पूर्णपणेंहि येत नाहीं. म्हणून हिंसेचा स्वीकार करावयाचा तर सफलता येईल, आर्थिक रचना पूर्ण होईल. स्वातंत्र्याचा बळी तेथ पडेल व नंतरच हें होईल आणि अशा या पेंचप्रसंगांत खऱ्या स्वतंत्र्यवादी लोकांना निर्णय द्यावयाचा आहे. जे आज समतेला विरोध करून स्वातंत्र्याला खच्ची करीत आहेत, त्यांच्याविरुद्ध लोकशाहीचें एकमेव हत्यार म्हणजे युक्तिवाद आणि युक्तिवादानेंच त्यांच्या मनांत परिवर्तन घडवून आणावयाचें आहे. सर्व जनांच्या मनांत समतेची भावना तीव्र

करावयाची आहे, संघटित करावयाची आहे व त्यांतून एक अहिंसामय पण प्रभावी शक्ति निर्माण करावयाची आहे. जो विजय मिळवावयाचा आहे तो आम्ही बहुसंख्य आहोंत म्हणून नव्हे; तर न्याय, सत्य आणि युक्ति ( रिझन्स ) आमच्या बाजूस आहेत, म्हणून स्वार्थानें जे अंध झालेले त्यांना प्रकाश द्यावयाचा आहे. त्यांना खऱ्या सत्याचा साक्षात्कार करून द्यावयाचा आहे आणि अपरिहार्य म्हणून त्यांची मान्यता मिळवावयाची नसून, मान्य न करण्यांत अन्याय आहे, अशा भावनेंतून ती मिळवावयाची आहे. समाजामध्यें सत्याचा व युक्तिवादाचा जय व्हावा यासाठीं मोठा प्रचार लोकशाहींत करावा लागतो. गोळ्यांनीं तो करणें अनिष्ट. तो गोड युक्तिवादानें करावयाचा असतो. लाठीनें मारहाण करून रस्ता काढावयाचा नसतो, तर युक्तिवादानें लोकांना पटवून लोकयमुनेला स्वखुषीनें वाट देण्याची परिस्थिति घडवून आणावयाची असते. प्रचाराचें कार्य सोपें नाहीं व फुकटचें नाहीं. जे सत्ताधीश आहेत त्यांच्यामागें लक्ष्मी आशीर्वादात्मक बाहु उभारून असते, त्यांना पैशाची कमतरता नसते. भाडोत्री कार्यकर्ते मिळत असतात, तथापि समतेसाठीं दृढसंकल्प केलेले, समाजांत न्यायाची प्रतिष्ठापना व्हावी म्हणून प्रयत्नांचें कंकण बांधलेले हजारों त्यागमूर्ति असतात व शेवटीं त्यांच्या प्रयत्नांना कांहींना कांहीं तरी यश मिळतेंच. वादविवादांत माथेफिरूपणा नसतोच असें नाहीं, तथापि जे माथें ठिकाणावर ठेवून वागतात तेच यशस्वी होतात. प्रचाराच्या कार्यांत हेतूंचा विपर्यास केला जातो. व्यक्तीच्या शीलावर हल्ले केले जातात. पुजाऱ्याच्या वर्तनानें देवतेला कमीपणा येतो असेंहि होतें. पुष्कळ वेळां समाजांत अशी परिस्थिति उत्पन्न होते कीं, लोकांना असें वाटतें कीं, हा वादविवाद, हा संघर्ष नको यापेक्षां कोणी तरी हुकूमशहा आलेला पत्करला. तथापि या सर्व मनोवृत्तींचा प्रबळ संग्राम हळूहळू कमी होत जातो व दोन अतिरेकी प्रचारांतून एक मध्यम मार्ग स्पष्ट होतो व तो मान्यताहि पावतो. अर्थात् हें एकदम घडून येत नाहीं, पण घडून येतें, हेंहि तितकेंच खरें आहे.

लोकशाही वातावरण कसें तापतें व कसें निवतें हें थोडेंसें वर सांगितलें आहे व स्वातंत्र्याचा अधिकार असल्या वातावरणांतच जिवंत व कार्यक्षम राहतो. ज्या गोष्टीला आर्थिक महत्त्व नाहीं त्याची चर्चा सतत लोकशाही समाजांत चालूच असते. परंतु जेव्हां चर्चेचा विषय आर्थिक संबंधाचा असतो, जेथें संपत्ति व स्वामित्व यांच्या नैतिकतेबद्दल अगर उपयुक्ततेबद्दल वाद सुरू होतो, त्यावेळीं मात्र वादाला रंग चढतो. वर्गहिताच्या दृष्टीनें मग तेथें पक्ष स्पष्ट होत जातात. एवढेंच नव्हे तर ते आग्रही होत जातात, हट्टी होत जातात, मग सारासारविचार, युक्तिवाद यांना तेथें भाव राहात नाहीं. तीच स्थिति राष्ट्र जेव्हां युद्धकार्यांत गुंतलें असतें तेव्हां दिसून येते. युद्धकालीन परिस्थितींत शांततेनें, युक्तिवादानें कोणी कांहीं सांगूं लागला, तर तो देशद्रोही ठरतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत कोणी विवेक सांगूं लागला तर तो महाराष्ट्रद्रोही ठरला जाई. जे जीवनभर सत्याला पारखे झालेले, सार्वजनिक शीलापासून दूर गेलेले, हे सर्व मग महा-

राष्ट्राचे अनन्यसाधारण भक्त झालेले दिसत होते. तात्पर्य, जेथें वर्गनिष्ठ स्वार्थाचा संबंध येतो, तेथें वादविवाद हा विद्वेषाचा विषय होतो. विचारविनिमय करून कांहीं मतपरिवर्तन होण्याची शक्यता तेथें नसते. मग तेथें काळ्या दगडावरील रेघ बनते. मग त्या स्थितींत सत्य किंवा न्याय्य याचा विचार होत नाहीं. जें आम्हीं म्हणतों तेंच बरोबर आणि तसेंच झालें पाहिजे, असा आग्रह धरला जातो. विवेकाला तेथें स्थान नसतें. ती स्थिति युद्धकालीन परिस्थितींत पण होते. युद्धकाळांत राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीनें विवेकाला वाव देणें सत्ताधीशांना धोक्याचें वाटतें आणि सत्ता व सत्य यांचा विरोध आल्यास सत्याला शरण जावें लागतें. व्यक्तीच्या संदर्भांत अगर वर्गाच्या संदर्भांत व्यक्ति व वर्ग हे सत्याला बाजूला ठेवून स्वार्थाला शरण जातात. जर प्रचलित हितसंबंधांना विरोध करणारे विचार, अथवा विवेक सांगणारे विचार समाजामध्यें मान्यता पावूं लागले तर तावडतोब प्रचलित हितसंबंधाचे संरक्षक म्हणजे सत्ताधीश त्यांच्या मदतीला धांवून जातात व सर्व राज्ययंत्राचा उपयोग त्या प्रभावी होणाऱ्या विचारसरणीला खच्ची करण्यांत होतो. मीरत–केसचा इतिहास हेंच दर्शवितो. साम्यवादाचे विचार बोलून दाखवणें हाच मीरत–खटल्यांतील आरोपींच्याविरुद्ध मोठा आरोप होता. अमुक एक करावें, अमुक एक कार्यक्रम असावा, असें जरी सांगितलें तरी कृति-विरहित विचारसुद्धां आक्षेपार्ह मानला जातो. तत्त्वज्ञान हें आरोपी असतें, तीच गोष्ट मीरत–केसमध्यें भारताच्या अनुभवास आली. आज भारतामध्यें विचारस्वातंत्र्य असल्यामुळें केवळ विचार मानणें अगर एकादें समाजविरोधी का होईना, तत्त्वज्ञान मांडणें अगर त्याची चर्चा करणें हा गुन्हा होत नाहीं. तथापि कांहीं कार्यक्रम समाजाच्या विद्यमान हितसंबंधांच्या कार्यकारणाबाबत असला तर त्याबाबत सर्रास मोकळीक आहे असें मात्र नाहीं. वास्तविक निरनिराळ्या धर्मांत काय तत्त्वें आहेत याचा विचार करण्यास व त्यांतील वेडगळ समजुतींची चर्चा केल्याबरोबर सरकारी कारवाई सुरू होते. नास्तिक मतें प्रतिपादलीं तर त्याला भारतांत मुभा आहे, पण हिंदूंच्या देवता अगर अन्यधर्मियांचीं पवित्र स्थानें याबद्दल कांहींहि टीका केल्यास कदाचित् कायदा दुर्लक्ष करील, पण संबंधित समाजाच्या भावना लाठ्याकाठ्यांच्या फिरविण्यांत आपला प्रभाव दाखवतील. तात्पर्य, राज्याची सत्ता व समाजाची शक्ति प्रचलित हित-संबंधांच्या बाबतींत नेहमींच तत्परता दाखविते. आणि विशेषतः धर्मापेक्षां, संस्कृतीपेक्षां, संपत्तीचा प्रश्न जेथें उत्पन्न झाला असेल, तेथ ही तत्परता तात्कालिक तळमळीची असते. समाजामध्यें समता स्थापन करावयाची, कारण त्याशिवाय स्वातंत्र्य पूर्ण नाहीं आणि आर्थिक समता संपन्न करण्याच्या कामांत सर्वांत जास्त विरोध होतो. आर्थिक विषमता आणि समाजाला अवश्य असणारें हितैक्य एकत्र नांदूं शकत नाहीं आणि ज्या ठिकाणीं आर्थिक हितैक्य नाहीं त्या ठिकाणीं अन्य क्षेत्रांतहि खरें हितैक्य उत्पन्न होत नाहीं. मलबारहिलवर राहणारे व परळच्या चाळींतून राहणारे यांच्यामध्यें समान फक्त

वरचें आकाशच असतें आणि मनुष्याचे विचार त्याच्या आर्थिक परिस्थितीला अनुसरून बनलेले असतात. समाजांतील वरचे दहा व तळांतील नव्वद यांच्यामध्यें समाजांत जी एक मानसिक शांतता असावी लागते, ती स्थापन करण्याच्या कामीं समान दृष्टिकोन नसतो, आणि मग समाजामध्यें शांतता राहात नाहीं. विषमतेमुळें सामाजिक विचारांत व वर्तनांत विकृति उत्पन्न होते, विद्वेष उत्पन्न होतो. कांहीं सवलती मग दिल्या जातात. जें नको असेल तें दान केलें जातें. अपरिहार्य परिस्थिति झाल्यास कांहीं सोडावें लागलें तर तेंहि संतोषानें सोडलें जात नाहीं आणि जें दान सद्बुद्धीनें दिलें जात नाहीं, शुद्ध हेतूनें दिलें जात नाहीं, ज्यांत सद्भावना दिसून येत नाहीं, तें दान संतोषाऐवजीं घृणा उत्पन्न करतें. तसेंच संपत्तिमान् वर्गापासून जें घेतलें जातें त्यांत संतोषाचा भाव नसतो व कृतज्ञतेला तेथें जागा नसते. समाजांत समता यावयाची तर स्वातंत्र्याची जोपासना निश्चित झाली पाहिजे. आणि स्वातंत्र्य व समता हीं दोन्ही यावयाचीं तर संबंधित राज्यव्यवस्था ही लोकशाही स्वरूपाची पाहिजे. लोकशाही नसेल तर समता निर्माण व्हावयाची नाहीं व समता निर्माण झाली नाहीं, तर लोकशाही पण हितार्थ होणार नाहीं.

लोकशाहीचें मुख्य लक्षण हें कीं, प्रत्येकाला सुख भोगण्याचा, चांगलें जीवन जगण्याचा, सारखा हक्क आहे. आणि हक्कांत सारखेपणा आणावयाचा तर हें कार्य राज्यांतील कायद्याप्रमाणें समाजांतील सामाजिक संस्था व संकेत यांनीं पण करावयाचें असतें. समाजामध्यें आर्थिक विषमता असल्यास समाजांतील कायद्याप्रमाणें सामाजिक संस्था व संकेत हेहि विषमतेचा भाव वाढविणारेच असतात. आर्थिक विषमतेमुळें साहजिकच मग ज्यांच्याजवळ संपत्ति कमी, त्यांना सुखाचीं साधनें कमी मिळतात व ज्यांच्याजवळ पैसा व संपत्ति त्यांना साहजिकच सुख उपभोगण्याचीं साधनें अधिक असतात. विषम समाजांत व्यक्तीच्या मागण्यांबाबत न्यायाची कसोटी फारशी लक्षांत घेतली जात नाहीं. समाजामध्यें जें उत्पादन होतें तें सामाजिक गरजेसाठीं उत्पन्न होत नाहीं, तर मागणीबरहुकूम पुरवठा या तत्त्वानुसार होतें. मागणी म्हणजे जिच्यामागें आवश्यक ती क्रयशक्ति आहे ती. तीच मागणी प्रभावी होते. दरिद्री जनांच्या लाख इच्छा असल्या, तरी त्यांना जें हवें आहे तें समाजामध्यें निर्माण केलें जात नाहीं. जें हवें आहे तें घेण्यासाठीं हवा असेल तितका पैसा तयार असेल, तर समाजांतील अर्थव्यवस्था त्या मागणीचा पुरवठा करते, अन्यथा नाहीं. मागणी व पुरवठा यांचा हा असा संबंध असल्यानें मागणी व पुरवठा यांच्या संबंधांत सामाजिक न्यायाचा विचार केला जात नाहीं व त्याचप्रमाणें सामाजिक हेतु व प्रयोजन यांचाहि विचार केला जात नाहीं. जेथें व ज्या प्रमाणांत आर्थिक शक्ति अगर क्रयशक्ति असेल, त्या प्रमाणांत पुरवठा होणार. याचा सरळ अर्थ असा कीं, ज्याच्याजवळ पैसा आहे, संपत्ति आहे ते मग उत्पादनाचे चौधरी बनतात. उद्योगक्षेत्रांत पाटिलकी गाजवतात आणि मग समाजामध्यें विविध विषमतेचीं दृश्यें दिसून येतात. राजविलासी

अशोक हॉटेलजवळ घाणेरड्या झोंपड्या त्याच सूर्यप्रकाशाखालीं नांदत असतात. सजविलेल्या इमारतींच्या बाजूला घाणेरड्या पत्र्यानें व जुन्या लाकडाच्या तक्त्यानें तयार केलेल्या झोंपड्या डोळ्यांपुढें येत असतात. समाजांतील सर्व क्षेत्रांतून ज्यांच्याजवळ संपत्ति आहे त्यांना ज्ञानाचे मार्ग मोकळे असतात. सामाजिक प्रतिष्ठेच्या मंडपांत त्यांचा प्रवेश सहज होतो. केलेलें कर्तृत्व त्याच्यावर बहाल केलें जातें. काव्यकृति व कलाकृति अन्यांनीं केलेल्या त्याच्या नांवावर छापल्या जातात अथवा त्यांना पुरस्काराची संधी देऊन अन्यथा सरस्वती मंदिरांत न मिळणारा प्रवेश त्यांना मिळतो. जे निर्धन आहेत, नाहीरे आहेत, त्यांचीं मनें फार काळ स्थितप्रज्ञ राहूं शकत नाहींत. समाजांत वावरणारा अन्याय त्यांच्या मनांतून मग चीड उत्पन्न करीत असतो. चिडींतून क्रोध उत्पन्न होतो व क्रोधांतून त्यांचीं मतें क्रान्तीकडे झपाट्यानें जात असतात. समाजांतील हा अन्याय अनैतिक आहे हें तर स्पष्ट होतेंच. प्रयत्न व सफलता यांत कार्यकारणभाव नसल्यानें देव अगर दैव यांच्याशीं पण सामना करण्यासाठीं चिडलेलीं मनें तयार होतात. ज्या तत्त्वावर समाज आधारलेला आहे असें सांगितलें जातें तींच तत्त्वें मग जाहीरपणें अमान्य केलीं जातात, ज्या देवता आतांपर्यंत पुजल्या जात होत्या, त्या खोट्या आहेत याचा साक्षात्कार मग जनतेला होतो, प्रतिष्ठेचीं नाणीं जेव्हां वाजवलीं जातात तेव्हां तीं खणखणीत नाहींत असा अनुभव येतो. केवळ शिक्क्यावरून मग मूल्य ठरलें जात नाहीं. तात्पर्य, प्रचलित समाजव्यवस्थेचा पाया डळमळीत होतो. कारण तळापासून ती हलवली जाते आणि मग स्वातंत्र्याच्या लालसेनें प्रेरित झालेली जनता समतेशिवाय खरें स्वातंत्र्य नाहीं हें जाणते आणि मग समानतेच्या प्रस्थापनेसाठीं होणाऱ्या प्रयत्नांत अधिकाधिक भाग घेत जाते. लोकशाहीची चळवळ वस्तुतः समता स्थापन करण्याची चळवळ असते. हाच दृष्टिकोन एकोणीसाव्या शतकांतील अनेक राज्यशास्त्रविशारदांनीं मांडला आहे. आणि त्यांच्या विचारसरणींत सामान्यपणें असें दिसून येतें कीं, ज्या समाजामध्यें कांहीं लोक संपत्तिमान् व सत्ताधीश व कांहीं निर्धन व दुर्बळ असतात, त्या ठिकाणीं जे निर्धन व दुर्बळ असतात ते विफलतेला व विमनस्कतेला बळी पडतात. ह्या बहुसंख्याक जनतेच्या उदासीनतेंत, विफलतेंत, समाजाची मोठी शक्ति व कर्तव्य हीं लुप्त होत जातात, कमी होत जातात. कारण, त्यांच्या शक्तीला व कर्तृत्वाला प्रोत्साहन मिळत नाहीं, वाव दिला जात नाहीं व त्यामुळें त्यांची शक्ति व त्यांचें कर्तृत्व मूर्च्छित अवस्थेंतच राहतें. ज्यांच्याजवळ सत्ता आहे तीं थोडीं माणसें आपला प्रभाव समाजांतील प्रत्येक क्षेत्रावर टाकतात. त्यांच्या इच्छा प्रभावी ठरतात. त्यांचीं मतें समाजाचीं मतें मानलीं जातात व बहुसंख्याक जनता उपेक्षिली जाते. जे अल्पसंख्य सत्ताधीश असतात ते स्वयंमन्य तर असतातच, पण आपल्या त्या मर्यादित गोतावळ्यांत अन्यांना येऊं न देण्याची सतत खटपट करीत असतात. ही अल्पसंख्याकांची संघटना जन्मावर आधारलेली असो, संपत्तीवर आधारलेली असो, संस्कृतीवर आधारलेली असो, अगर संप्रदायावर



मराठी ... 

आधारलेली असो, वर सांगितलेलें लक्षण समान असतें. जें आपल्या वर्तुळांतून निर्माण झालें नसेल त्याचा स्वीकार ते करणार नाहींत. त्यांच्या मानससृष्टींत अन्य विचारांना प्रवेश नाहीं. अन्य आदर्श तेथें जाऊं शकत नाहीं. कुणी नव्या विचारांचें अगर आदर्शांचें तीव्रतेनें प्रतिपादन करूं लागल्यास त्याला ही संघटित मंडळी समाजाला भयानक व विद्रोही असें मानतात. जर तेंच प्रतिपादन वेतावेतानें युक्तिवाद करून मांडलें गेलें तर तें महत्त्वाचें नाहीं असेंच त्यांना वाटतें आणि याचें कारण त्यांची वर्गनिष्ठ दृष्टि व वर्गश्रेष्ठत्वाचा अभिमान हेंच असतें. जनतेमध्यें जे मग वंचित आहेत, दरिद्री आहेत, त्यांच्याकडे न्याय देण्याच्या बुद्धीनें ते पहात नाहींत व थोडेंसें कांहीं औदार्य दाखविलें तरी त्यांत वर्गनिष्ठ अभिमानाची दुर्गंधी असते. दिलेलें दान उघड उघड जाहिरातीसाठीं असतें. मग ती जाहिरात संस्थेला दात्याचें नांव देण्यांत केलेली असो अगर शिलान्यासाच्या दगडांत केलेली असो. वर्गश्रेष्ठत्वाची त्यांची भावना एवढी तीव्र असते कीं, समाजांतील राजरस्त्यावर ती ठळकपणें दाखविली जाते आणि बहुजनसमाज जेव्हां त्याचा विरोध करूं लागतो, त्यावेळीं त्यांच्या वर्गीय अहंकाराला मर्माघात झाल्यासारखें वाटतें व मग प्राप्त परिस्थितींतून विवेकाचा मार्ग सांपडणें कठीण होतें.

विषम समाजांत जे संपत्तिमान् आहेत ते आपल्या हितसंबंधाच्या वर्तुळांतच विचाराचे घोडे नाचवीत असतात. बहुसंख्याक दरिद्री समाजाला दाबून टाकल्यानें व तुच्छ लेखल्यानें जी प्रतिक्रिया उत्पन्न होत जाते, ती परिणामीं याच श्रेष्ठ वर्गाला घातुक ठरते. स्वतःच्या मनसुभ्यांत दंग असल्याकारणानें बदलत जाणाऱ्या समाजाचा परिणाम प्रथम त्यांच्या लक्षांत येत नाहीं व तो आल्यानंतर दीर्घ दृष्टीनें विचार करून पावलें टाकण्याचें त्यांना जमत नाहीं. उलटपक्षीं जे दरिद्री आहेत त्यांच्यामध्यें हळूहळू जबाबी अशी वर्गभावना उत्पन्न होत जाते. सुरुवातीला अज्ञानामुळें व संघटनेच्या अभावीं आपल्याला काय हवें आहे हें निश्चितपणें त्यांना सांगतां येत नाहीं. त्याजबरोबर एका विशिष्ट मनोवृत्तींत दीर्घकाळ जीवन गेल्यानें या असंघटित वर्गांत हिंमत अशी दिसून येत नाहीं. आत्मविश्वास पार लोपलेला असतो. आणि मग हळू हळू संघटन होत असतांना उत्पन्न होणारा राग अगर द्वेष कुणाविरुद्ध कसा व कोठें प्रदर्शित करावा हें कळत नाहीं. एका अर्थानें समाजांतील प्रभावी असलेला श्रेष्ठ वर्ग ह्या बहुसंख्याक बहुजनसमाजाच्या शीलाला कानसून टाकीत असतो. त्याच्यांतील जबाबरीच्या भावनेला चिरडून टाकीत असतो. संपत्ति तर त्याच्यापासून दूर ठेवण्यांत येतेच, पण श्रेष्ठ असें मानसिक धन तेंहि पण त्यांना हा श्रेष्ठ वर्ग लाभूं देत नाहीं व याचा परिणाम असा दिसून येतो कीं, बहुजनसमाजाची प्रवृत्ति मग जें नको असेल तें तोडून टाकण्यांत, फोडून टाकण्यांत, खालीं ओढण्यांत, स्वतःला व्यक्त करीत असते. कांहीं तरी रचावें, उभारावें, अशी विधायक प्रवृत्ति तेथें सुरुवातीला तरी दिसून येत नाहीं. बहुजनसमाजाला सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांतहि संघटित रीतीनें

कर्तृत्व दाखविण्याला, विधायक कार्य करण्याला वाव नसल्यानें जे प्रयत्न मग होतात ते विध्वंसक व विघटनात्मक स्वरूपाचेच असतात. त्याचप्रमाणें लहानमोठीं सामाजिक कार्यें करण्याची संधी समाजांत मिळत असली म्हणजे समाजांतील प्रवृत्ति उमलूं लागते. आर्थिक क्षेत्रांत, स्थानिक स्वराज्यक्षेत्रांत काम करण्याला संधी मिळाली म्हणजे शिक्कामोर्तब झालेलें ज्ञान नसलें तरी अनेक माणसें प्रभावी कार्य करून दाखवीत असतात. पण अशी संधी, समता जर समाजांत नसेल तर कुणालाहि आपल्यांतील कर्तृत्व, आपल्यांतील जें श्रेष्ठ व भव्य आहे तें दाखविण्यास वाव मिळत नाहीं. केवळ संपत्तीनेंच आपण श्रेष्ठ आहोंत एवढ्यानेंच श्रेष्ठ वर्गाचें समाधान होत नाहीं, तर अन्य क्षेत्रांतहि आपल्याच माणसांना वाव देऊन इतरांना संधी नाकारण्यांत येते. ज्ञानांत, कार्यांत दोन्ही ठिकाणीं संधी न मिळाल्यानें साहजिकच श्रेष्ठ वर्गांतील लोकांची बुद्धिमत्ता उठून दिसते व त्याचप्रमाणें कार्यहि उज्ज्वल असेंच दिसतें. वास्तविक राष्ट्राची खरी संपत्ति म्हणजे त्या राष्ट्रांत असलेली बुद्धिमान् माणसें, कर्तृत्ववान् माणसें, ही होय. राष्ट्राचें खरें संरक्षण तीक्ष्ण शस्त्रें करूं शकत नाहींत अगर क्षणांत भस्म करणारे एच बॉम्बहि करूं शकत नाहींत. तर नागरिकांत असलेलें धैर्य व त्यांची निधडी छाती हींच राष्ट्राचें खरें संरक्षण करीत असतात. राष्ट्राची खरी प्रगति चार-दोन शास्त्रज्ञ अगर पांचदहा उद्योगपति यांच्या कर्तृत्वावर अवलंबून नसते, तर सर्वसामान्य नागरिकांच्या ज्ञानाचा स्तर व त्याचप्रमाणें सर्वसामान्य नागरिकांची उपक्रमशीलता व प्रयत्न-परायणता यांवर अवलंबून असते. म्हणून बहुसंख्याक जेवढें ज्ञान मिळवतील, कर्तृत्व दाखवतील, तेवढें राष्ट्राच्या उन्नतीला आवश्यक असतें आणि मग ज्यावेळीं राष्ट्राला कर्तृत्वाची जरुरी असते, दृढनिश्चयी नागरिकांची जरुरी असते, त्यावेळीं ती गरज मग भागली जाते. हिंदु समाजामध्यें चातुर्वर्ण्यव्यवस्थेनें तीनचतुर्थांश समाजाला दुर्बल केलें होतें यांतील रहस्य समजलें पाहिजे. जर थोड्याच लोकांच्या हातांत संपत्ति व त्यामुळें सत्ता असल्यास ही थोडी मंडळी आमजनतेनें महत्त्वाचीं कामें करावीं असें कधींहि होऊं देणार नाहीं व मग साहजिकच जनतेची इच्छा म्हणजे या थोड्या लोकांची इच्छा असें ठरतें व त्याप्रमाणें समाजांतील संपत्तीच्या निर्मितीचीं साधनें अशाच तऱ्हेनें वापरलीं जातात कीं, त्यापासून जे संपत्तिमान् वर्ग आहेत त्यांच्या सुखांत व संपत्तींत भर पडते. अन्य मग बुद्धीनें कमी, साधनानें कमी, धनानें कमी व मग हिंमतीनेंहि कमी असे बनतात. राष्ट्राची शक्ति त्यामुळें क्षीण होते. प्रबल व प्रभावी राष्ट्र म्हणजे ज्या राष्ट्रांत सामान्यपणें सर्व नागरिक प्रबल व प्रभावी असतात तें होय.

वरचा वर्ग अगर श्रेष्ठ वर्ग संपत्तीमुळें सत्ताधीश होतो व सत्ताधीश असल्याकार-णानें त्याच्या प्रतिष्ठेंत भरच पडत असते. ज्या राष्ट्रांत हा वर्ग थोडा तरी प्रगतिशील राहिला, थोडी तरी त्याची दृष्टि लोकाभिमुख राहिली, तेथें तो बराच काळ प्रभावी राहिला, असें दिसून येतें. पण जेथें हा वर्ग अहंकारी, स्वार्थलोलुप राहिला, सर्व सुखाच्या

किल्ल्या आपल्यालाच खिशांत त्यानें ठेवल्या, त्या ठिकाणीं त्याचा विनाश जेव्हां झाला, तो कल्पनातीत झाला. घराला जसें नवेंजुनें करावें लागतें, शस्त्रें नीट राहावीं म्हणून जसें नवेंजुनें करावें लागतें, पीक चांगलें यावें म्हणून बियाणाची निवड करावी लागते, त्याचप्रमाणें समाजामध्यें कार्य व्हावें लागतें. त्याचप्रमाणें एखाद्या वर्गाचें वर्चस्व राहावयाचें असेल तर तें वर्चस्व ज्या कारणानें आलें असतें तीं कारणें सतत असलीं पाहिजेत व त्यांत यथासमय परिवर्तन पण झालें पाहिजे. व्यक्तीचे गुणदोष आनुवंशिकतेवर अवलंबून असतात. कुलाची परंपरा हिचाहि महत्त्वाचा भाग व्यक्तीच्या आदर्शांत व जीवनमूल्यांत समाविष्ट झालेला असतो. तीच गोष्ट एखाद्या वर्गाबाबतहि म्हणतां येण्यासारखी आहे. त्या वर्गाचीं जीवनविषयक अशीं कांहीं मूल्यें असतात, कांहीं परंपरा असते व कांहीं नैतिक भावना पण असतात, आणि ह्या गोष्टी नीट जोपासल्या गेल्या नाहीं तर तो वर्ग पतित होत जातो. व्यक्तीला जसें स्वतःचें असें कांहीं घालून जुनीं मानसिक भूषणें कमीजास्त करावीं लागतात, त्याचप्रमाणें वर्गाचेंहि असतें. परंपरेनें विद्या येते असें नाहीं ; पण वर्तनांतील संयम दिसून येतात. तीच गोष्ट वर्गाबाबत पण लागू आहे. एके काळीं केलेले पराक्रम सतत पिढ्यानुपिढ्या केले जातात असें नाहीं व त्यामुळें महत्त्व कमी कमी होत जातें. विद्या, चारित्र्यविवेक ही कांहीं कुण्या एका वर्गाची खाजगी मालकी नसते व वंशपरंपरेनें ती येते हेंहि खरें नाहीं. ब्राह्मणकुलांत जन्म झाला म्हणून तो ताबडतोब दशग्रंथी होतो, अगर केव्हां तरी दशग्रंथी होतो, असा अनुभव नाहीं. समरांगणांत तलवार गाजवून रणझुंझार झालेल्या लोकांचीं मुलें सामान्य धैर्यसुद्धां नसलेलीं आढळून येतात. क्षत्रिय वर्गात जन्मला म्हणून प्रत्येक जण भीम अगर अर्जुन होतो असें नाहीं. पिढ्यानुपिढ्या चालू असलेल्या वर्णव्यवस्थेंतसुद्धां परंपरागत पराक्रमाचा अगर ज्ञानाचा वारसा कायम असतो असें नाहीं. चारित्र्य व शील ह्याचा ज्ञानाशीं अगर जन्माशीं अगर जातीशीं कांहीं संबंध नसतो. संत ज्याप्रमाणें कुठल्याहि जातींत उत्पन्न होऊं शकतो, त्याचप्रमाणें चारित्र्य व शील यांची गोष्ट आहे. ज्ञानाच्या बाबतींतसुद्धां व पराक्रमाच्या बाबतींतसुद्धां समाजांत संधी मिळतांच अनेक प्याद्याचे फर्जी झाले आहेत. शेळ्या-मेंढ्या चारणारे राज्यकर्ते झाले आहेत. सहीसुद्धां करतां येत नसतांना कोट्यवधि रुपयांच्या उलाढाली करणारे कारखानदार झाले आहेत. त्याचप्रमाणें कांहीं व्यक्तींत अशी पराक्रमी बुद्धि असते कीं, समाजामध्यें ते स्वतःसाठीं संधी उत्पन्न करतात. पराक्रमासाठीं क्षेत्र निर्माण करतात. आणि वैभव व प्रतिष्ठा प्राप्त करून घेतात. विद्यमान प्रतिष्ठितांच्या पंक्तीस न बसविले गेल्यास नवीन पंक्ति निर्माण करण्याचें सामर्थ्य दाखविणारी ही मंडळी समाजांत दिसून येतात. जेथें कोठें चारित्र्य, पराक्रम, उद्योगप्रियता हीं दिसून येते तेथें तेथें समाजाचें विद्यमान वातावरण बदललें जातें. चारित्र्य, पराक्रम व उद्योगप्रियता हीं कांहीं कोणा एका वर्गाची वा कुळाची मिरास नाहीं व याकामीं कुणालाहि मक्तेदारी प्रस्थापित करतां येणार नाहीं.

म्हणून जेथें आज श्रेष्ठ वर्ग प्रभावी असतो तेथें कालांतरानें तो निष्प्रभ होतो. काप जातात भोंकें शिल्लक राहातात, हें सामाजिक दृश्य दिसून येतें. जन्मावर आधारलेली वर्गव्यवस्था आधुनिक युगांत पूर्णतया कोसळलेली आहे. तथापि, अद्यापिहि कांहीं गंजलेली तलवार कमरेला लटकावून क्षत्रियकुलावतंस म्हणवून घेण्यांत अभिमान बाळगणारे दिसून येतात. ‘ अमुष्यविद्या रसनाग्रनर्तकी ’ हा दावा एकहि संस्कृत शब्द नीट उच्चारतां येत नसतांना सांगणारे अद्यापि आहेत. श्रेष्ठत्वाचीं लक्षणें जाऊन कोरडा अभिमान मात्र राहिलेला आहे व ही परिस्थिति जगांत सर्वत्र दिसून येते. त्याचबरोबर जे दृढनिश्चयी व चारित्र्यवान् असे सर्वसामान्य जनतेंतून निर्माण होतात ते आपल्या कर्तृत्वानें स्वतःला पुढें नेतातच. पण त्याचबरोबर बहुजनसमाजाची पण उन्नति करतात. ज्योतिबा फुले यांनीं शिक्षणाचें महत्त्व जाणलें, परंपरागत हिंदु धर्मांतील दोष न्याहाळले, आणि नव्या युगाचें प्रस्थान त्यांनीं ठेवलें, एका दृष्टीनें त्यांना ऋषीच म्हटलें पाहिजे. तीच गोष्ट कर्मवीर शिंदे यांनीं केली. तीच गोष्ट भाऊराव पाटील यांनीं केली. दुसऱ्या क्षेत्रांत टिळक, रानडे, आगरकर, गोखले यांनींहि तीच गोष्ट केली. परंपरागत क्षेत्रांतून काम करणारे वर्गभावनेनें रंगून गेलेले लोक नव्हते असें नाहीं. पण त्यांना नव्या युगाची गरज जाणून त्याला अनुकूल अशीं पावलें टाकण्याची बुद्धि झाली नाहीं. मैफलींतून रात्रीं व घोड्यांच्या शर्यतींतून दिवसा त्यांचें जीवन परिपूर्ण झालेलें दिसूं लागलें होतें. समाजामध्यें कितीहि वर्गव्यवस्था घट्ट असली, तरी पराक्रमी माणसें तिच्यावर मात करून यश संपादन करीत असतात. सामान्यपणें जें विद्यमान असेल त्याच्याशीं जुळवून कार्य करण्याची इच्छा असते. तें न जमल्यास त्यांना सोडून व जरूर पडल्यास त्यांचा विरोध करून समाजांतील महत्त्वाकांक्षा काम करीत असते. इंग्लंडमधील मजूर पक्षाचा इतिहास या दृष्टीनें विचार करण्यासारखा आहे. त्या पक्षानें प्रथम प्रथम सत्ताधीश वर्गाशीं जुळवून घेऊन प्रयत्न केला. पण जेव्हां सत्ताधीश वर्ग त्यांच्या आदर्शाला विरोधक असा स्पष्ट दिसूं लागला, त्यावेळीं त्यांनीं पुढील पाऊल उचललें व आलेल्या अनुभवाला अनुसरून आपल्या योजना आंखल्या व पन्नास वर्षांच्या काळांत सत्तेचें सिंहासन गांठण्यापर्यंत त्यांची प्रगति झाली. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, श्रेष्ठ वर्ग फार काळ पराक्रमी राहूं शकत नाहीं. फार काळ आपलें महत्त्व राखूं शकत नाहीं. ज्या गुणावर तो वर्ग प्रतिष्ठा पावला, ते गुण समाजांत अन्य कोठें दिसूं लागले म्हणजे तेथेंहि पराक्रमाचीं क्षेत्रें निर्माण होतात. नवे विचार व नवे आदर्श यांचीं क्षितिजें समाजापुढें दिसून येतात.

जसजशी सत्ताहीन व उपेक्षित जनतेमध्यें अन्यायाची भावना तीव्र होत जाते तसतसा त्या भावनेचा आविष्कार स्फोटक बनत जातो. केवळ अमुक एक गरजा आहेत, त्या पुऱ्या व्हाव्यात, अमुक एक अन्याय आहे, तो दूर व्हावा, एवढें मर्यादित स्वरूप जनतेच्या मागणीचें राहात नाहीं. ज्या कारणांमुळें अन्याय, विषमता उत्पन्न झाली असें

त्यांना वाटतें तीं कारणें म्हणजे समाजाची रचना हीच बदलली जावी असें मग प्रतिपादलें जातें. ज्यांच्या मागणीकडे उपेक्षेनें पाहिलें जात होतें, तुच्छतापूर्वक ज्यांचा निर्देश केला जात होता, ती परिस्थिति मग बदलते आणि मग सत्ताधीश व प्रभावी वर्ग गांगरतो. जुन्या घोषणा अर्थशून्य ठरल्या याचा त्याला अनुभव येतो, त्यानें केलेलीं चांगलीं कृत्यें जनता विसरून जाते, अगर ती प्रामाणिक होती हें मानण्यास ती तयार नसते. इतकेंच काय, वरच्या वर्गाबद्दलचा परंपरागत आदर नाहींसा होतो व तेथें मग वर्गद्वेषाचें वातावरण पसरतें आणि बौद्धिक हातचलाखी करून, जुन्या मालाला नवीन नांवें देऊन खपविण्याचा किती जरी प्रयत्न केला गेला, तरी जनता त्याला बळी पडत नाहीं. जो अविश्वास उत्पन्न होतो, तो वर्गगत असल्याकारणानें अपवाद असलेल्या व्यक्तिसुद्धां वगळल्या जात नाहींत. पराभूत झालेला सत्ताधीश संपत्तिमान् वर्ग पराभवापासून येणारा अनुभव घेऊन शहाणपणानें पुढील मार्ग आक्रमण करतो असें क्वचितच होतें. परिस्थितीला जुळवून घेण्याची प्रवृत्ति या वर्गांत सामान्यतः नसते. ज्या देशांत परिस्थितीला जुळवून घेण्याची प्रवृत्ति तेथील वरच्या वर्गांत दिसून येते, तेथें ते वर्ग सिंहासनापासून जरी दुरावले तरी समाजांत वजनदार म्हणून कांहीं तरी त्यांचें महत्त्व राहतेंच. व्यक्ति काय किंवा वर्ग काय, समाजाशीं जुळवून न घेईल तर त्यांची प्रगति होऊं शकत नाहीं. किंबहुना, काळाच्या प्रवाहांत त्यांच्या पायांखालची वाळू निसटून जाते व कांहीं वेळसुद्धां तो पोहूं शकत नाहीं व बुडतहि नाहीं. इकडून तिकडे लाथाडलें जावें त्याप्रमाणें त्याची स्थिति होते. राजकारण म्हणजे कोणत्या वेळीं काय व कसें शक्य आहे हें ध्यानांत घेऊन वागण्याचें शास्त्र. अभिमानानें कोणी परिस्थितीशीं जुळवून घेत नाहीं. अज्ञानानें कोणाला तें कसें करावें हें समजत नाहीं व पुष्कळ वेळां गाडी सुटल्यानंतर प्लॅटफॉर्मवर प्रवेश करावा त्याप्रमाणें या वर्गांतील लोकांची स्थिति होते. हिंदुस्थानांतील सनातनी धर्मवाल्यांची ही स्थिति झालेली आहे. हिंदु पक्षाची पण आजच्या भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकारणांत हीच स्थिति झाली आहे. त्यांचें जुनें नाणें राजकारणाच्या गुजरींत कोणी घेत नाहीं. त्यांचें तत्त्वज्ञान जन्मसिद्ध अधिकार या तत्त्वावर आधारलें असल्यानें आजच्या युगांत तें कुणाला पटत नाहीं. तात्कालिक भावनेचा फायदा घेऊन कोठें कांहीं तडजोड केली तरी अपेक्षिलेलें धैर्य, आशा, ग्राळगलेली प्रतिष्ठा, मिळालेली दिसत नाहीं. जगांतील बदललेली परिस्थिति नव्या आर्थिक रचनेबद्दलचें प्रभावी ठरलेलें तत्त्वज्ञान, जगांत सर्वसामान्यपणें घडून आलेली क्रांति याची दखल ज्या पक्षानें घेतली नाहीं, ते पक्ष समाजांत टिकूं शकत नाहींत. जगामध्यें आतां समाजसत्तावादाचें तत्त्वज्ञान हें चालू नाणें झालें आहे. समाजसत्तावादाची शीळ आतां जगांतील रानावनांतून ऐकण्यांत येऊं लागली आहे व म्हणून 'हिंदु-समाजसत्तावाद' म्हणून एक नवीन चूष भारतीय जनतेपुढें आली आहे. गेल्या पन्नास वर्षांत ज्याला प्रागतिक पक्ष म्हणत असत, त्यानेंहि बहुजनसमाजाच्या अंतःकरणाला जाणलें नाहीं व आज प्रागतिक पक्ष असा भारताच्या राजकारणांत

शिल्लक राहिला नाहीं. तात्पर्य, नव्या जगांत बहुजनसमाज जागृत झाला असून ठिक-ठिकाणीं तो सत्ता काबीज करीत आहे. बहुजनसमाज आतां 'शाकाम् वास्यात् लवणाम् वास्यात्' अशा मामुली सवलतीनें भुलून जाणार नाहीं. किमान वेतन एवढीच मागणी आतां उत्पादनक्षेत्रांत राहिली नाहीं. मजुरांना आतां मालकी हवी आहे. बहुजनसमाजाला आतां व्यक्तीस योग्य न्याय मिळावा एवढीच त्याची मागणी नाहीं, आतां त्याला सत्तेंत अधिकार हवा आहे व त्यांतून अधिकार गाजविण्याची सत्ता हवी आहे. बहुसंख्य समाज म्हणजे श्रमिक समाजाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव झालेली आहे. राजकारणांत आतां त्याची उपेक्षा होणार नाहीं हें जितकें खरें तेवढेंच त्याची आरती व आळवणी होईल हेंहि खरें आहे. बहुजनसमाजांत आतां संकटनेचें चैतन्य निर्माण झालें आहे. औद्योगिक क्रांतीनें व्यक्तीला ती उत्पादनयंत्राचा एक भाग म्हणून मानलें होतें ती परिस्थिति आतां राहिली नाहीं. उत्पादनसृष्टींत त्याचें महत्त्व आतां अधिक झालें आहे. हजारों व्यक्ति आतां हितैक्यामुळें एकत्र येतात व आपल्या हितसंबंधांची संघटनद्वारा जोपासना करतात. व्यक्ति आतां ज्या व्यवसायांत काम करीत असेल त्या व्यवसायांत महत्त्वाचा भाग होऊन बसली आहे. आम्ही रेल्वे कामगार, आम्ही पोस्ट-वाले, अशी व्यवसायविषयक भावना सर्वत्र आजच्या समाजांत दिसून येत आहे. म्हणून आजकालच्या ह्या नव्या दुनियेंत, या बदललेल्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे. राजकीय क्षेत्रांत असलेलें स्वातंत्र्य हें अर्थपूर्ण करण्यासाठीं उत्पादन-क्षेत्रांत तें असलें पाहिजे, तेथेंहि तें सार्थ व्हावयाचें म्हणजे तेथेंहि समता आली पाहिजे व म्हणून लोकशाही एका क्षेत्रांत आली म्हणजे दुसऱ्या क्षेत्रांत ती येणें अपरिहार्य ठरतें. मताच्या दृष्टीनें सर्व जग सारखें तर सामाजिक सत्याच्या दृष्टीनेंहि पण सर्व सारखें असलें पाहिजे हा विचार उत्पन्न होतो व त्या विचारांतून आर्थिक समतेची मागणी उत्पन्न होते.

राजकीय क्षेत्रांतील स्वातंत्र्य हें समतेच्या दृष्टीनें महत्त्वाचें आणि म्हणून औद्योगिक क्षेत्रांतहि स्वातंत्र्य त्याच दृष्टीनें महत्त्वाचें ही जाणीव ज्या पक्षांत होत नाहीं, तो पक्ष आधुनिक जगांत प्रभावी होणार नाहीं व कांहीं ऐतिहासिक कारणानें अनेक देशांत धनिक वर्गानें वंशपरंपरागत सत्तेला मर्यादित करण्याठीं बहुजनसमाजाची मदत घेतली. पण स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामीं आपल्या मदतीनें तें मिळालें याची जाणीव होतांच मदतीची किंमत मागण्यांत येऊं लागली. फळ तोडण्यासाठीं खांद्यावर घेतलेला म्हातारा फळ तोडून झाल्यानंतर खांद्यावरून उतरेना, अशीच परिस्थिति अनेक पाश्चात्य राष्ट्रांत घडून आली. राजकीय स्वातंत्र्यासाठीं व राजकीय समतेसाठीं बहुजनसमाजासह सत्ताधीश वर्गाविरुद्ध मध्यम वर्गानें व उत्पादक वर्गानें लढाई केली, पण त्या लढाईचे परिणाम व लढाईतील यश राजकीय क्षेत्रापुरतेंच मर्यादित करण्याचा प्रयत्न झाला. तथापि, एकदां स्वातंत्र्याचें वातावरण निर्माण झालें, म्हणजे तें जीवनाच्या सर्व क्षेत्रांत

पसरतें, हाच अनुभव इंग्लंडमध्यें आला व अन्य राष्ट्रांतूनहि तसाच आला. समतेची मागणी सर्व क्षेत्रांत होऊं लागली व गेल्या पन्नास वर्षांत लोकशाहीनें राजकीय क्षेत्रांतून सुरू केलेली मोहीम आर्थिक क्षेत्रापर्यंत नेली आहे. साम्यवादी राष्ट्रांतून आतां सर्वसाधारणपणें आर्थिक क्षेत्रांतसुद्धां समता निर्माण झाली आहे. किंबहुना, सर्व उत्पादन हें लोकांच्या मालकीचें हें तत्त्वज्ञान तेथें कार्यप्रवण झालें आहे. जेथें साम्यवाद नाहीं पण लोकशाही आहे तेथें कामगारांच्या कल्याणासाठीं मजदूरवर्गासाठीं गेल्या पन्नास वर्षांत जे कायदे झाले आहेत त्या सर्वांचा उद्देश आर्थिक विषमता दूर करण्याचाच आहे. इतके वेतनासंबंधीं कायदे करून समाधान उत्पन्न करणारी आर्थिक समता अद्यापि या राष्ट्रांतून निर्माण झालेली दिसून येत नाहीं व म्हणून मजूरवर्ग संतुष्ट नाहीं. मजूरवर्गाला आतां निश्चितपणें मालकीपद हवें आहे, आणि जे उद्योगधंद्यांतील मालक आहेत ते उद्योग-धंद्यांतील मालकी सोडावयास तयार नाहींत. धंद्याचें राष्ट्रीयीकरण हें ध्येय आतां संघटित मजूरवर्गांचें सर्वत्र झालेलें दिसून येत आहे. तें साध्य करण्याचा मार्ग लोकशाहीचा हें पथ्य मान्य केलें गेलें आहे. जे आज खाजगी भांडवलवाले आहेत व ज्यांच्या ताब्यांत मालकी आहे ते वर्ग अर्थात् त्याला विरोध करीत आहेत. राजकारणांत जे समतेचा व स्वातंत्र्याचा उदो उदो करीत होते, तेच उद्योगपति, तेच भांडवलवाले, आज भारतांत राष्ट्रीयीकरणाला विरोध करीत आहेत. जोंपर्यंत स्वार्थाला झळ लागत नाहीं तोंपर्यंत राजकारणांतील स्वातंत्र्याचा आदर्श त्यांना स्वागतार्ह वाटतो. आर्थिक क्षेत्रांत विषमता राहावी याच शर्तीवर राजकीय क्षेत्रांत स्वातंत्र्य व समता यावी याचा पुरस्कार त्यांनीं केला होता असेंच वाटतें. या वर्गाला अजून स्वातंत्र्याचा खरा अर्थ कळला अगर कळून उमजला असें वाटत नाहीं. त्यांनीं समजलें पाहिजे कीं, मजुरांना उत्पादनपद्धतींत व उत्पादन-व्यवस्थेंत योग्य स्थान न दिल्यास उद्योगक्षेत्रांत शांति नांदणार नाहीं. संपत्तीच्या निर्मितींत म्हणजेच उत्पादनाच्या व्यवस्थेंत मजुरांचें स्थान इतकें महत्त्वाचें आहे कीं, त्यांचें सहकार्य न मिळाल्यास, त्यांना संतुष्ट न ठेवल्यास उत्पादन होणार नाहीं, निदान फायदेशीर होणार नाहीं, ही गोष्ट आतां स्पष्ट झाली आहे. म्हणून मालकवर्गानें नव्या युगाला जुळवून घेतलें पाहिजे. केवळ राजकीय समतेची गांधी टोपी घालून आतां भागणार नाहीं. ते जें मिळवतात तें मजुरांच्या श्रमानें व साहाय्यानें, मग त्यांत मजुरांना प्राप्तीचा वांटा मिळाला पाहिजे. केवळ मालकवर्ग प्रचलित सरकारच्या पक्षाचा आहे व मजूर संघटनाहि त्याच पक्षाच्या आहेत एवढ्यावरून त्यांच्यांत हितैक्यता आहे असें ठरत नाहीं.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतांत स्वातंत्र्याच्या प्रतिक्रिया निरनिराळ्या वर्गांवर कशा झाल्या हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. जें स्वातंत्र्य मिळालें त्यासाठीं ज्यांनीं प्रयत्न केले ते वर्गदृष्टीनें पाहतां प्रामुख्येंकरून वरच्या वर्गाचे लोक होते. स्वातंत्र्याच्या प्रयत्नांतलें नेतृत्व उघड उघड मध्यमवर्गीय होतें आणि मध्यमवर्ग धनिक वर्गाला, संचितवादी वर्गाला, जवळचा वाटतो आणि राष्ट्रीय सभा ही देशासाठीं जरी भांडत होती,

तरी तिचें अंतर्गत स्वरूप पूर्णतया मनानें 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' असें होतें, असें म्हणणें जरा अवघड वाटतें. तथापि, राष्ट्रीय सभेची तात्त्विक पार्श्वभूमि समाजसत्तावादाला प्रतिकूल नव्हती. पण स्पष्टपणें समाजसत्तावादाचा पुरस्कार तिच्यांत नव्हता आणि म्हणून स्वातंत्र्याच्या पहिल्या प्रहरांत मध्यमवर्ग व बहुतेक धनिकवर्गानें सत्ता स्वीकारल्यानंतर तिचा अंतेवासी झाला. स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळींत आम जनतेनें भाग घेतला होता. संघटित मजूर संघांची सहानुभूति होती व प्रसंगाप्रसंगानें मजूर संघहि लढ्यांत सामील झाले होते. पण स्वातंत्र्याची लालसा सर्व समाजांत होती, सर्व समाजाला तें हवें होतें. लढ्याचें नेतृत्व काँग्रेसनें केलें असल्यानें सत्तादानाचें उदक जॉनबुलनें तिच्या हातावर सोडलें. राष्ट्रीय सभेचें नेतृत्व स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत सामान्यपणें एकविचाराचें होतें. पण सत्ताप्राप्तीनंतर स्वातंत्र्याच्या अर्थाबाबत, तें यथार्थ करण्याबाबत तात्त्विक मतभेद उत्पन्न झाले हें सर्वज्ञात आहे. तिच्या नेतृत्वांत कांहीं ज्ञानयुक्त श्रद्धेनें समाजसत्तावादी विचारांचे होते. त्याचप्रमाणें जुन्या अर्थव्यवस्थेची चिकित्सा न करतांना उत्पादन वाढवावें, देश समृद्ध व्हावा व विभागणीचा प्रश्न तितका महत्त्वाचा नाहीं असें मानणारेहि होते. कांहीं समाजसत्तावादाची स्थापना करण्याच्या दृष्टीनें सत्तेचा उपयोग केला जावा व त्यांत विलंब होऊं नये असें म्हणणारे होते. तर 'धीरे गाडी हांक रे भय्या जवाहरलाल रे' असाहि सल्ला देणारे कांहीं होते. राजकीय विचारांची एक गोधडी काँग्रेसनें निर्माण केली होती व अशी परिस्थिति उत्पन्न झाली कीं निश्चित कार्य करणें अशक्य झालें. प्रचलित समाजाचें स्वरूप बदलावयाचें, त्याबाबत कांहीं नियोजन करावयाचें, याचा विचारसुद्धां अनेकांना पडत नव्हता. अज्ञान व दारिद्र्य हें जर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर चालूच राहिलें तर स्वातंत्र्य हें मिळून निरुपयोगी ठरणार ही शंका अनेकांना येत होती व ती रास्त होती. धनिकवर्गानें राज्यसत्तेला सोडून समाजवादी विचारांना विरोध करणें सुरुवातीस पसंत केलें नाहीं. काँग्रेसमध्यें राहून राहूनच समाजसत्तावादाकडे जोरानें जाणाऱ्या रथाची गति कमी करावी, जमल्यास रोखून धरावी या विचारानें भारतांतील भांडवलवाल्यांनीं कांहीं वर्षें प्रयत्न केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशामध्यें भाषणस्वातंत्र्य असल्यानें अतिरेकी विचारसरणी समाजापुढें येऊं लागली व समाजसत्तावादी विचारप्रवाह समाजामध्यें जोरानें वाहूं लागले. भांडवलशाही आपल्या परीनें राज्यसत्तेवर प्रवाह पाडत होती. तर बहुजनसमाजांतील दारिद्र्य व अज्ञान हें राज्यसत्तेला स्तब्ध बसू देत नव्हतें. सत्ता स्वीकारतांना थोडीशी लोकशाही राज्यसंस्थेंतून काम करीतच होती व जेव्हां भारतानें आपली घटना तयार केली व ती स्वीकारली तेव्हां एक नवें युग सुरू झालें. विचारांना मार्गदर्शन करणारें असें तत्त्वज्ञान मिळालें आणि लोकशाही साधनांनीं जी आदर्श संविधानानें स्वीकारली ती अंमलांत आणावयाची हें उघड झालें. सार्वत्रिक मतदानाचा हक्क सर्वांना मिळाला व मग निवडणुकींना कल्पनातीत महत्त्व आलें. जो निवडून येईल त्याच्या तत्त्वज्ञानाचा

शिक्का समाजांत प्रभावी होणार, त्याच्या तत्त्वज्ञानाचा 'खुद्बा' (मंत्र) सर्वत्र वाचला जाणार, हेंहि उघड झालें. जें समाजाचें स्वरूप हवें आहे तें जनमत बनवून अंमलांत आणावयाचें. तलवारीनें सत्ता काबीज करणें हराम ठरलें. सत्ता देणारी वस्तु मतदानाची पेटी ठरली. सत्ता प्राप्त करण्याच्या मार्गाबाबत, साधनाबाबत, सर्व पक्षांची तात्त्विक दृष्ट्या तरी एकवाक्यता होती. लोकशाही उपनिषदाचें महावाक्य म्हणजे 'बहुमतमान्यता'. बहुमत झालें नाहीं, तर राज्याचा कायदा अमान्य करावयाचा, बहुमतवाल्या सरकारला अवैधपणें विरोध करावयाचा हें मग लोकशाही धर्माविरुद्ध होतें. राज्य ज्या मौलिक तत्त्वावर आधारलेलें आहे त्याबाबत एकवाक्यता असते. पक्षोपपक्षांत फरक असतो तो ते आदर्श कसे कार्यान्वित करावयाचे याबाबत. आणि ही प्रवृत्ति जर राष्ट्रांत नसेल तर लोकशाही नांदणार नाहीं हें उघड आहे. कित्येक पक्षांना बहुमत मिळत नाहीं व मग लोकशाहीच्या मर्यादा ते मानण्यास तयार नसतात. लोकशाहीचा संयम त्यांना मग शृंखला वाटतो. समाजामध्यें हितविरोध असतो व या हितविरोधाचा शांततेच्या मार्गानें परिहार करण्याचा मार्ग म्हणजे लोकशाही होय. जास्तींत जास्त लोकांचें हित जास्तींत जास्त प्रमाणांत पाहणारी जर कोणती राज्य-व्यवस्था असेल तर ती लोकशाही असा इतिहासाचा अनुभव आहे. पण ही लोकशाही यशस्वी व्हावयाची तर तिच्या मर्यादा व तिचे संयम पाळले पाहिजेत. जर सत्तारूढ पक्ष आपल्या हातीं आलेल्या सत्तेचा उपयोग जनतेला दाबून टाकण्याकडे करील तर तेथें लोकशाही नांदावयाची नाहीं. जे दमदाटीवर विश्वास ठेवतात अगर कायद्याचा दुरुपयोग करून आपली सत्ता कायम करूं इच्छितात तीं माणसें निश्चित अदूरदृष्टीचीं होत. लोकशाही सत्ता ही सर्वांसाठीं आहे, म्हणून ती वापरणारांचीं मनें व बुद्धि विशाल व व्यापक असली पाहिजे. सर्व समाजाच्या हिताचें कार्य पूर्णपणें यशस्वी व्हावयाचें तर सर्व समाजांतील लोक सत्तेनें आपलेसे केले पाहिजेत. आपल्याबरोबर त्यांना घेतलें पाहिजे. केवळ हातांतील सत्ता कायम ठेवण्याचा दृष्टीनें सत्तेचा उपयोग करणें म्हणजे लोकशाहीचें विटंबन करणें आहे व स्वातंत्र्यांत लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यासारखें आहे.

लोकशाही राज्यव्यवस्थेंत जास्तींत जास्त लोकांना जास्तींत जास्त हित साधतां येतें. तथापि, ही परिस्थिति लोकशाही व्यवस्थेंत प्रचलित असणाऱ्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असते. जितकी आर्थिक व्यवस्था समतास्वरूप असेल, न्याय्य विभागणीवर आधारलेली असेल, तेवढ्या प्रमाणांत सुखाचें वातावरण, समृद्धीचें वातावरण, अधिकाधिक लोकांना लाभतें व मग जें आवश्यक तें जीवनाला मिळत आहे, समाजांत जें अधिकाधिक निर्माण होईल त्यांत न्याय्य हिस्सा मिळत राहील, असा विश्वास उत्पन्न होतो. उलट पक्षीं जेथें असा विश्वास उत्पन्न होत नाहीं तेथें जनतेनें मतदान केलें तरी मतदान होत नाहीं. जेथें जनतेचें मन सत्तेच्या धोरणाशीं समरस आहे, जेथें जनतेच्या कागदी

संमतीनें नव्हे, गृहीत धरलेल्या संमतीनें नव्हे, मूक संमतीनें नव्हे, तर प्रत्यक्ष व सक्रिय संमतीनें राज्यकारभार चालला आहे, जेथें प्रगतीची गति तीव्र होते. तिचें क्षेत्र व्यापक होतें. जनतेची संमति ही न्याय मिळत आहे, संपत्तीच्या वांटणींत जास्त जास्त समानता आहे, या विश्वासांतून मिळत असते, परंतु जेथें आर्थिक विषमता तीव्र आहे तेथें जी संमति प्रगतीचें चैतन्य समजलें जातें ती राज्यसत्तेला मिळत नाहीं. विषम व्यवस्थेविरुद्ध विरोध केला जातो आणि जर राज्यकारभारांत सामान्य जनतेची संमति नसेल तर सामाजिक संघर्ष व अशांतता निर्माण होते. विद्यमान अन्यायाविरुद्ध सतत विरोध होतो असें नाहीं. कांहीं वेळ होतो, कांहीं वेळ समाज स्तब्ध राहतो. कांहीं खळबळ, कांहीं निवळ, असें हें निषेधाचें आंदोलन चालू असतें. किरकोळ दुःखें, किरकोळ तक्रारी, अनुभवानें परिचित बनतात व पुष्कळ वेळां लोक त्यांना अनिवार्य मानून आपलें जीवन व्यतीत करीत असतात. तथापि, ही हृदयाची जखम कायमची बरी होते असें मात्र नाहीं. आर्थिक अन्यायांतून सामाजिक अन्याय मग निर्माण होतो व मग त्यांतून समाजाच्या आत्म्याला क्लेश होत जातात. विद्यमान पिढीनें निषेध सोडून दिला, तरी नवीन दमाचे नवीन प्रयत्नवादी पुढें येतात. एक गोष्ट निश्चित कीं, झालेले अन्याय व राज्यसत्तेची उपेक्षा वर वर लोक विसरलेले दिसतात, तथापि ते जनमनामध्यें खोल अशी जखम करीत जातात व एक क्षण असा येतो कीं, त्या उपेक्षेचें व त्या अन्यायाचें प्रदर्शन कुठल्या तरी घटनेनें इतकें ढोबळ तऱ्हेनें केलें जातें कीं, शांति-ब्रह्मालासुद्धां चीड यावी असा प्रसंग येतो. कांहीं लोकांनीं, कांहीं वेळ, अन्याय सहन केला कीं बाकीच्या सर्वांना तो तसा वाटत नाहीं, असा अर्थ सत्ताधीश घेतात व लोक कांहीं वेळ गडबड करतील पण अखेरीस मानतील असा त्यांना विश्वास वाटतो. दंडुक्याच्या जोरावर सर्व कांहीं करतां येतें असें मानणारे दंडुकमहात्मे राजकीय दृष्टींत नसतातच असें नाहीं. लोकांना नको असलेलें द्विभाषिक पोलिसांच्या पाहाऱ्यांत त्यांच्या-वर कायमचें लादतां आलें असतें असाहि युक्तिवाद अद्यापहि करण्यांत येत नाहीं असें नाहीं. कांहीं लोकांनीं अन्याय सहन केला म्हणजे तो न्याय ठरत नाहीं. भीतीमुळें कोणी बोलणार नाहीं अगर बोलण्याचा कांहीं उपयोग नाहीं या परिस्थितींत जें होत आहे तें मान्य आहे असा निष्कर्ष काढणें ही राजकारणांतील फार मोठी चूक आहे. तथापि अनुभवानें शहाणे न होणारे लोक सत्ताधीश वर्गांत कांहीं कमी असतात असें नाहीं. ज्यांना आपला अनुभव म्हणजे सर्वांचा अनुभव असें वाटतें असेंहि लोक सत्ताधीश वर्गांत कांहीं कमी नसतात व मग लोकांच्या गरजा त्यांना क्षुल्लक वाटतात, अनावश्यक वाटतात, आणि आपण जी योजना केली असेल तीच जनहितार्थ आहे असें त्यांना प्रामाणिकपणें वाटूं लागतें. साध्या साध्या गोष्टींतसुद्धां मग संघर्ष करावा लागतो. कामाचे तास कमी करण्याचा प्रश्न असो, पगार कमी व बाजारभाव वाढत आहे हा प्रश्न असो, संघटनेला मान्यता देण्याचा प्रश्न असो, कुठलाहि प्रश्न संबंधित जनतेचा अनुभव

लक्षांत घेऊन सोडविणें त्यांना इष्ट वाटत नाहीं. जनतेची संमति हीच देशाच्या स्वातंत्र्याची व संरक्षणाची ग्वाही आहे, याचा विसर पडला म्हणजे समाजाचें भवितव्य अनिश्चित झालें असा त्याचा अर्थ असतो. आपलें धोरण सरकारनें, सत्ताधीश पक्षानें जनतेला पटवून दिलें पाहिजे व जनतेच्या अनुभवाला तें जुळणारें आहे अशी जनतेची खात्री केली पाहिजे. सत्ताधीश वर्गाचा अनुभव कांहीं जरी असला, तरी जनतेचा अनुभव हा प्रस्तुत असतो, म्हणून तो प्रभावी असला पाहिजे. जे हुकूमशाही वृत्तीचे असतात, दडपशाही वृत्तीचे असतात, त्यांना आपल्याला जें वाटतें, आपला जो अनुभव आहे, तो बरोबर आहे व त्यांत कांहीं चूक नाहीं असें त्यांना वाटत असतें, आणि जरी कांहीं चूक असली तरी सत्तेची लेखणी त्यांत दुरुस्ती करूं शकते हा आत्मविश्वास असतो. तथापि, जोंपर्यंत जनतेला तें पटत नाहीं, जनतेच्या अनुभवाला जुळत नाहीं, तोंपर्यंत केवळ दंडुक्याच्या जोरावर तें लादणें याचा अर्थ संघर्षाला राज्यसत्तेविरुद्ध बंड करण्याला आवाहन देण्यासारखें आहे. या दृष्टीनें चाललेलें सरकार क्षणिक यशस्वी ठरतें, तथापि अंतिम परिणाम भयावह होत असतात. ज्या सरकारच्या मागें जनतेची संमति आहे, ज्याच्या कारभारांत जनतेचें हार्दिक सहकार्य आहे, तेंच सरकार यशस्वी होतें व तें यश टिकाऊ असतें, जनतेची संमति मिळाल्यानें धोरणाची अंमलबजावणी सुखानें होते व अडथळे उत्पन्न झाले, तरी त्यांचें निवारण त्वरित होत जातें. जनतेच्या गरजा भागल्या जात आहेत असा अनुभव जनतेला आला म्हणजे जनता वस्तुतः कामधेनु बनते व सरकार जें जें मागेल तें तें देण्यास तयार होतें. जनतेला मग आपल्या मनाप्रमाणें होत आहे, आपले विचार ऐकले जात आहेत, आपला अनुभव जमेला धरला आहे, असा प्रत्यक्ष अनुभव येतो. याच्या उलट आपलेच निर्णय, आपलीच विचारसरणी, आपलेंच तत्त्वज्ञान, रेटीत नेल्यानें आज नाहीं उद्यां विरोध होतोच व तो विरोध पेंचप्रसंग निर्माण करीत असतो. लोकांना मग जें होत असतें तें असह्य वाटत असतें व आपणहि नागरिक आहोंत व आपले नागरिकत्वाचे हक्क अवमानिले जात आहेत याची तीव्रपणें जाणीव होत जाते. कांहीं तरी जें होऊं नये तें होत आहे, कांहीं तरी मनाला क्लेश देणारें घडत आहे, असें वाटतें व तें सहन करणें असह्य होतें. कोंडमारा करणारी परिस्थिति मग फार वेळ सहन केली जात नाहीं. निवडणुकीच्या द्वारें, सत्याग्रहाच्या द्वारें, अथवा उघड उघड बंडाच्या द्वारें, मग त्या परिस्थितीबाहेर पडण्याचा मार्ग काढला जातो. विद्यमान सरकार चांगलें का वाईट हें कोणा वेदाभ्यासजड पंडित याच्या मतावर अवलंबून नसतें, शास्त्रज्ञाच्या बुद्धिमत्तेवर तें अवलंबून नसतें, तात्त्विक दृष्टीनें केलेल्या विचारावरसुद्धां तें अवलंबून नसतें, तर जनतेला त्या सरकारच्या, त्या राज्यकारभाराचा जो अनुभव आला असेल त्यावर अवलंबून असतें व ही अंतिम कसोटी असल्यानें जनतेला नाराज करणें अगर तिच्या संमतीला न जुमानतां कारभार रेटणें हें लोकशाही स्वातंत्र्याला धरून होत नाहीं.

जनतेची संमति गृहीत धरून कुठल्याहि राज्यसत्तेला सामान्य परिस्थितींत जरी रेटतां आलें तरी असाधारण परिस्थिति उत्पन्न झाली म्हणजे गृहीत धरलेली संमति दृश्यमान होत नाहीं व जनतेच्या सहकार्याच्या अभावीं सरकार संभ्रमित होतें. जनताहि पण तिच्या भावना दुखवल्या गेल्या असल्याकारणानें सरकारच्या मदतीला धांवून जात नाहीं. म्हणून राज्यसत्तेवर असणाऱ्यांनीं सतत लोकमत काय आहे हें जाणून घेतलें पाहिजे. लोकमत जाणून घेणें हें जितकें आवश्यक तितकें सोपें मात्र नाहीं. लोकमत हें रसायन अनेक गोष्टींपासून, अनेक विचारांपासून, अनेक सामाजिक भावनांपासून, निर्माण होत असतें, अनेक वेळां तें वस्तुस्थितीला पूर्णपणें आकलन न करतां होत असतें आणि त्यामुळें पुष्कळ वेळां वस्तुतः तें निराळें असून वरवर तें निराळें भासतें, समाजांतील नानाविध संस्था प्रचारांत पटाईत असतात व त्यामुळें खरी वस्तुस्थिति अगर मोठ्या प्रमाणांत सत्य समजून येतें असेंहि नाहीं. आणि आजच्या जगांत संस्था संघटित असल्याकारणानें, पक्ष संघटित असल्याकारणानें, प्रचाराचीं साधनें त्यांच्या हातांत असतात व ते सत्याचें स्वरूप विपरीतपणें लोकमताच्या बाजारांत आणूं शकतात. हजारों तारा कवायतीच्या हुकुमाप्रमाणें राज्यसत्तेकडे येतात. शेकडों सभांतून बनविलेलें सत्य लोकांच्यापुढें मांडलें जातें. अनेक शिष्टमंडळें अधिकाऱ्यांकडे येत असतात व वृत्तपत्रांतून ठराविक पद्धतीनें प्रचार केला जात असतो. हें जसें एका पक्षाकडून होतें तसेंच इतर पक्षांकडूनहि नेमकें त्याविरुद्ध लोकमत आहे हेंहि त्याच मार्गानें दाखविलें जातें, आणि मग या परिस्थितींत खरें लोकमत काय हें जाणणें कठीण पडतें. निवडणूकद्वारा सामान्यपणें लोकमत अंदाजलें जातें हें खरें; तथापि निवडणुकीच्या वातावरणांत सर्व सत्य व संबंधित परिस्थिति लोकांच्या पुढें येतेच असें नाहीं. अनेक वेळां विवेकावर भावनेचा विजय होतो आणि या क्रियेंत खरें लोकमत निवडणुकींतूनहि दिसून येत नाहीं. तथापि, सामान्यपणें निवडणुकींतून लोकमत प्रदर्शित होत असतें, या सिद्धान्तावरच लोकशाही उभारलेली असते आणि लोकशाहींत लोकमत बदलतांच तो बदल समाजाच्या दृष्टीस उघड होतो. व राज्यकर्ते जर मदांध नसतील तर त्यांनाहि तो दिसून येतो. तथापि, प्रत्येक लोकमतांतील बदल सत्ताधीश पक्ष कायमचा असा मानत नाहीं व मग पुष्कळ वेळां देशांत अप्रिय झालेलें सरकार कायदेमंडळांत बहुसंख्याकांचें असल्यानें सत्तेवरील आपला दावा व ताबा सोडत नाहीं. सुवेझ कॅनॉलच्या घटनेनंतर इंग्लंडमध्यें १९५६ सालीं हेंच दिसून आलें. त्याच वेळीं जर निवडणुका घेतल्या असत्या तर सत्ताधीश कॉंझरवेटिव्ह पक्षाचा पराभव झाला असता, पण बदललेल्या लोकमताची कदर न करतां कॉंझरवेटिव्ह पक्षानें रेटलें व पुढें झालेल्या निवडणुकींत आपलें बहुमत कायम ठेवलें. कोठपर्यंत जनतेची संमति गृहीत धरून रेटतां येईल हें हेरणें राजकीय कौशल्याचें काम असतें. सत्ताधीश पक्षानें सर्व सत्य जनतेपुढें मांडलें पाहिजे हें नैतिक बंधन नेहमींच मानलें जातें असें नाहीं आणि आपण जें ठरविलें आहे तेंच धोरण बरोबर आहे हें

पटविण्यासाठीं वाटेल तेवढा खटाटोप मग केला जातो. जें सत्य, जी वस्तुस्थिति जनतेपुढें मांडल्यानें त्यांची सत्ता धोक्यांत येणार नाहीं तेवढें मांडण्याची ते जरूर मुभा देतात आणि सत्ता व सरकारहि लोकशाहीच्या मूल्यांना मान देतें, असा दावा सांगतात. तथापि, जनतेच्या मनांत झालेला अन्याय व समाजांतील आर्थिक विषमता ही खोल रुजलेली असते आणि तिचे सत्ताधीशवर्गाविरुद्धचे पूर्वग्रह केव्हां उमटतील याचा भरंवसा नसतो. अन्यायाची भावना व पूर्वग्रह हे स्वातंत्र्याच्या वातावरणाला विसंगत असतात. सत्ताधीश हे आपलेंच मत बरोबर, आपलीच विचारसरणी समाजाच्या हिताची व आपलाच अनुभव तेवढा खरा, असें मानत असल्याकारणानें तद्विरुद्ध कांहीं असूं शकेल अगर असल्यास त्यांत सत्याचा कांहीं तरी अंश असेल असें त्यांना वाटत नाहीं, आणि जेव्हां संकटकालीन परिस्थिति येते, राष्ट्रापुढें दुर्धर प्रसंग उभा राहतो, त्या वेळेला राज्याच्या हितार्थ व संरक्षणार्थ मौलिक स्वातंत्र्यें स्थगित केलीं जातात, अगर संकुचित केलीं जातात, आणि थोडा वाव ठेवला असला तरी कांहीं देशप्रेमानें, कांहीं भीतीनें, कांहीं उदासीनतेनें, आपलीं मतें सांगत नाहींत; आपले विचार प्रदर्शित करीत नाहींत. जे विद्यमान सत्ताधीशांच्या बाजूचे असतात त्यांना दुप्पट जोर येतो आणि बाष्कळ व वाचाळ यांचीं मतें मग समाजाचीं मतें म्हणून मानलीं जातात. विरोधाअभावीं जें सत्तेच्या बाजूनें बोललें जातें तेंच लोकमत व तेंच निर्धास्तपणें सरकारच्याच बाजूचें असतें. युद्धाच्या प्रसंगीं सामान्यपणें जनता अस्थिर असते आणि शत्रुविषयक जेवढें वाईट असेल तें खरें मानण्याकडे प्रवृत्ति असते. शांततेच्या काळापेक्षां संकटकाळांत, युद्धप्रसंगांत जनतेपुढें सत्य तें येणें अधिक महत्त्वाचें व समाजाच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत इष्ट असतें, तथापि अनुभव मात्र विरुद्ध असतो. लोक गप्प आहेत म्हणून संतुष्ट आहेत, ते बोलत नाहींत म्हणून त्यांना पटलें आहे, असेंच मानलें जातें आणि ही प्रवृत्ति हुकूमशाही सरकारचीच असते असें नव्हे, तर लोकशाही सरकारांतहि असते. पण विशेषतः त्या लोकशाही सरकारांत असते कीं ज्यांत अर्थव्यवस्था भांडवलशाही स्वरूपाची आहे, समाजांत आर्थिक विषमता आहे, आणि जी कांहीं समता आहे ती राजकीय क्षेत्रांत. भांडवलप्रधान लोकशाहींत सत्ताधीश सरकार जे आपल्या बाजूचे असतील त्यांनाच लोकमताचे प्रतिनिधि समजतें. आपल्या विचारसरणीविरुद्ध कोणी विचार मांडल्यास त्यांना क्रान्तिकारक समजतें, समाजविद्रोही समजतें व कोणीच विरोधी विचार न मांडतां गप्प बसल्यास त्यांचें मौन संमति मानून आपला राज्यकारभार चालवीत असतें. विरोधी मतांना दाबून टाकणें अगर त्याविरुद्ध सामाजिक शक्तीचा उपयोग करणें याचे परिणाम समाजाच्या दृष्टीनें अनिष्ट होतात, त्याप्रमाणें सत्य न बोलतां शांत बसणें याचेहि परिणाम समाजाच्या दृष्टीनें अनिष्ट असतात. कुणी तरी चार-पांच उपद्व्यापी व्यक्तींनीं अगर खटपटी संस्थांनीं सरकारप्रेरणेनें कांहीं तरी बोलावें, कांहीं तरी प्रचार करावा व त्याला लोकमत म्हणून प्रतिष्ठा मिळावी, हें खऱ्या

लोकशाहीच्या व खऱ्या स्वातंत्र्याच्या तत्त्वाविरुद्ध असतें. ब्रिटिश अमदानींत असा अनुभव येत असे कीं, लोकमत सरकारच्या बाजूस आहे हें शाबीत करण्यासाठीं ठराविक वृत्तपत्रांचेच लेख पुरावा म्हणून देण्यांत येत असत. ज्यांना कोणी समाजांत विचारीत नाहीं, त्यांना पदव्या देऊन, त्यांचें मत म्हणजे लोकांचें मत असें गौरविलें जाई. लोकशाहींत असें होतां कामा नये. लोकशाही सरकारचें स्थैर्य व कार्यक्षमता हीं लोकांच्या खऱ्या निष्ठेवर व खऱ्या सहकार्यावर अवलंबून असते. लोकमताचें खरें सोनें कोणतें व पितळ कोणतें हें जेव्हां संघर्ष उत्पन्न होतो तेव्हां तात्काळ दिसून येतें. म्हणून सरकारनें समाजामध्यें शांतता व समतोल राहण्याच्या दृष्टीनें खरें लोकमत हें काळजीपूर्वक निरीक्षिलें पाहिजे व त्याची दखल घेतली पाहिजे.

साधारणपणें जेथें विचारस्वातंत्र्य आहे, मतस्वातंत्र्य आहे, तेथें प्रत्येक व्यक्ति व प्रत्येक पक्ष आपलेंच मत व आपलीच विचारसरणी ही बरोबर आहे, असा दावा करतो, आणि प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षाच्या विचारसरणीला समाजविद्रोही मानतो व आपल्याशिवाय अन्य पक्ष सत्याची पर्वा करीत नाहीं, असा आरोप करतो. वस्तुस्थिति अशी असते कीं, पूर्ण सत्याच्या अभावीं व्यक्तीला वस्तुस्थितीचें खरें ज्ञान प्राप्त होत नाहीं. मग चार आंधळे हत्तीच्या शरीराचा जो भाग त्याच्या हातीं लागतो त्या अनुभवावर हत्तीच्या स्वरूपाबाबत अभिप्राय देतात, त्याप्रमाणें समाजांतील व्यक्ति आपापलें मत बनवीत असतात, आणि या सगळ्या गोंधळांत समाजांतील संघटित संस्था व संघटित पक्ष स्वतंत्र विचाराच्या व्यक्तींना प्रचाराची गर्दी करून निष्प्रभ करून टाकतात. भंपक वार्ता छापून, बेफाम लेख लिहून, प्रचाराचा डोंब उठवून मत बनविण्याचें व्यक्तिगत स्वातंत्र्य अर्थहीन करून टाकतात. मग अमक्या वर्तमानपत्राप्रमाणें माझें मत, अमक्या पुढाऱ्याप्रमाणें माझें मत, अमक्या पक्षाप्रमाणें माझें मत, असें व्यक्ति बोलूं लागतात. तयार शर्ट विकत घ्यावा त्याप्रमाणें तयार केलेलीं मतें स्वीकारणें व्यक्तीला सुलभ वाटतें. किंबहुना, पक्षसंघटित राजकारणांत व्यक्तीचें व्यक्तित्व कमी होत जातें व सामाजिक व संघटनात्मक भाव त्याच्या जीवनांत अधिक होत जातो. कोणी व्यक्ति स्वतंत्र रीतीनें आपलें म्हणणें मांडण्याचा प्रयत्न करूं म्हणेल तर ठायीं ठायीं त्याच्या मार्गांत अडथळे उत्पन्न केले जातात. आणि असें जर व्यक्तिगत स्वातंत्र्य प्रभावी होऊं लागलें तर समाजामध्यें समता उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें तें अतिशय प्रभावी ठरतें, आणि नेमकें त्याच कारणासाठीं समाजांतील प्रस्थापित हितसंबंध व त्यांचा शंखनाद करणारीं वृत्तपत्रें त्यांच्यावर, त्यांच्या प्रयत्नावर, तुटून पडलेले असतात. इतकेंच काय, विषम समाजांत शिक्षणाची व्यवस्थासुद्धां अशी रचली जाते कीं, शक्य तेवढें नवविचारांना प्रेरणा देणारें शिक्षण दिलें जात नाहीं. पाठ्यक्रमांतील पुस्तकापासून तें विद्यापीठांतील श्रेष्ठ शिक्षणक्रमापर्यंत असेंच वातावरण असतें. मगन तराजू आण, महादू बैल सोड, मोरू पोथी वाच, हीं वाक्यें केवळ भाषिक

महत्त्वाचीं नाहींत. त्या वाक्यांतून विद्यमान सामाजिक व्यवस्था डोकावत असते. म्हणून विचाराचे दांत मनुष्याला येण्यापूर्वीच ते सुळकेवजा असणार नाहींत, याची दक्षता घेण्यांत येते. या स्थितींतून वयांत आलेला नागरिक कांहीं स्वतंत्र बुद्धीचा निश्चितपणें निघेल असें कोणी सांगूं शकत नाहीं. विषम समाजांतील व्यवसायव्यवस्थाहि स्वतंत्र विचारांना फारसें अनुकूल वातावरण उपलब्ध करून देणारी नसते. न्यायाच्या व कायद्याच्या क्षेत्रांत समाजाच्या गरजेपेक्षां मागील दाखल्याचा (प्रिसीडंट) अधिक प्रभाव असतो. नव्या परिस्थितीला जुना कायदा अपुरा पडतो. हें जाणूनसुद्धां कायद्याच्या हेतूपेक्षां कायद्याचे शब्द महत्त्वाचे मानले जातात. समाजांतील परंपरागत व प्रस्थापित मूल्यें हींच चिरकालीन, ही वृत्ति काळजीपूर्वक समाजांतील संस्था, समाजांतील सत्ता व राज्यसत्ता पण जोपासत असतात. सत्याचा प्रचार करण्यासाठीं प्रतिज्ञा करून जन्माला आलेलीं माणसें व वर्तमानपत्रेंहि सत्य तेंच सांगणार असें म्हणत म्हणत सत्य तेंच नेमकें विसरतात. जें न्याय्य असेल तेंच उचलून धरणार अशी घोषणा करीत करीत न्याय्य तेंच सोडून देतात. राजकारणांत आमजनतेच्या सुखासाठीं जिवलगांच्या गांठीसुद्धां सोडाव्या लागल्या तर सोडूं असें म्हणणारे सत्तेवर येतांच जिवलगांचें हित पाहात असतात, त्यांच्याच नेमणुका करीत असतात. सर्व देशासाठीं आम्ही आहोंत व सर्व लोकांसाठीं आम्ही आहोंत असें म्हणत म्हणत आपलाच तालुका, आपलाच गांव, यांना देश मानतात व आपलेच नातभाई, आपलेच गांवभाई व आपलेच जातभाई यांना आमजनता समजतात. या वातावरणांत जर कोणी विरुद्ध मत बोलून दाखविलें अगर विरुद्ध प्रचार केल्यास असें सामाजिक वातावरण उत्पन्न केलें जातें कीं, हे विरोधक समाजांत राहून एकाकी होतात. देशांत राहून निर्वासित बनतात. बोलण्याचें स्वातंत्र्य असून बोलण्यांत स्वातंत्र्य दाखवूं शकत नाहींत. प्रस्थापित हिताविरुद्ध कुठलाहि विचार यत्किंचित् जरी त्यांच्यावर परिणाम करणारा असेल तर त्याला निष्प्रभ करण्याचे, गारठून टाकण्याचे सत्ताधीश प्रयत्न करतात. तथापि, त्याचा परिणाम एवढाच होतो कीं, कोसळणाऱ्या तंबूला थोड्या वेळापुरतें सांवरून धरण्यांत येतें, पण अंतींचा परिणाम अटळ असतो.

आर्थिक विषमतेमुळें संख्येंतील शक्ति कमी होते. बहुसंख्याक जनता तथापि ती प्रभावी न होतां अल्पसंख्याक आपल्या संपत्तीच्या जोरावर व सामाजिक प्रतिष्ठेच्या जोरावर प्रभावी होतात, सत्ताधीश होतात. प्रत्यक्ष सत्ताधीश न झाले तरी त्यांच्या इशाऱ्यावर सत्ताधीश चालतात. किंबहुना संपत्तिमान् वर्गाची सत्ता ही बटीक बनते. किंवा मार्क्सच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "राजकीय सत्ता या वर्गाची कार्यकारिणी समिति बनते." या परिस्थितींत बहुसंख्याकांना सुखाचा मार्ग अडचणीचा बनतो. उन्नतीचा त्यांचा प्रयत्न सतत दाबला जातो. वास्तविक शक्ति जनतेची, पण मूठभर लोकांच्यासाठीं उपयोगांत आणली जाते. जें बहुसंख्याक जनतेला, बहुजनसमाजाला,

न्यायाच्या दृष्टीनें देणें इष्ट व जरूर असतें त्याबाबत विकृत दृष्टिकोन ठेवला जातो. आणि राज्यसत्तेची सर्व बुद्धि बहुजनसमाजाला न्याय न देण्यांत खर्चिली जाते. जुनें गाऱ्हाणें नव्या स्वरूपांत मांडलें जातें. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पगार वाढविला जातो व कनिष्ठ नोकरांच्या पगारांत वाढ केल्यास आर्थिक समतोल बिघडेल असें सोज्वळ कारण दिलें जातें, समाजांत असलेली सामुग्री योग्य पद्धतीनें उपयोगांत आणली पाहिजे, म्हणून गरिबांच्यासाठीं ती वापरली जात नाहीं. आज उद्यां करूं हें पालुपद क्षुल्लक गोष्टींतसुद्धां गाइलें जातें. तात्पर्य, बहुसंख्याक असूनसुद्धां संघटनेच्या अभावीं आपली शक्ति बहुजनसमाजाला प्रभावी करतां येत नाहीं. साध्या साध्या गोष्टींत निराशा त्यांच्या पदरीं येते. त्यांना जें हवें असतें तें जीवन सार्थ करण्यासाठीं हवें असतें आणि सार्थ जीवन हें समाजाला प्रगतिपर करण्यासाठीं हवें असतें. निदान तसा परिणाम तरी घडून येतो. राजकीय स्वातंत्र्य हें मिरविण्यासाठीं नसतें, तर त्याच्या द्वारें जीवनांतील श्रेष्ठ हेतु, श्रेष्ठ आदर्श, साध्य करण्यासाठीं हवें असतें. महात्माजींनीं गोलमेज परिषदेंत म्हटलें होतें कीं, "मला स्वातंत्र्य हवें आहे तें त्याचा पट्टा डोक्यावर लावून मिरविण्यासाठीं नव्हे, तर अज्ञानांत, दारिद्र्यांत, वंचित स्थितींत, निरुत्साही वृत्तींत, पडलेल्या देशाला सज्ञान करण्यासाठीं, सुखी करण्यासाठीं, उत्साही करण्यासाठीं, उन्नतीच्या मार्गाकडे प्रवृत्त करण्यासाठीं तें हवें आहे." म्हणून मिळालेलें स्वातंत्र्य जर इच्छित साध्यासाठीं साधन न बनलें तर येथपर्यंत पुजलेला देव पाषाण आहे असा अनुभव येतो. नितांत भक्त निष्ठुर शत्रु बनतो. जनतेला मग तें स्वातंत्र्य आहे असें वाटत नाहीं आणि जे राज्यकर्ते आहेत ते आपले असले तरी आपल्याबरोबर नाहींत, सोयरे असले तरी सुख देणारे नाहींत, असें वाटूं लागतें. युगायुगाचें दारिद्र्य व विषमता जावी म्हणून बहुजनसमाजाला आर्थिक न्याय हवा असतो. म्हणून तिची मागणी आर्थिक समतेसाठीं असते. श्रमाला ती तयार असते, पण श्रमांतून साफल्य मिळेल अशी तिची खात्री नसते. आणि या परिस्थितींत राज्यकारभार जो कांहीं होत असतो त्यांत तिला रस वाटत नाहीं. ती उदासीन राहते, आणि कांहीं काळानें विरोधी व सक्रिय विरोधी बनते. आपण बहुसंख्याक पण केवळ सत्ताधीशांच्या हातांतील, त्यांचें हित साधण्यासाठीं साधनें झालों आहोंत, असें तिला रास्तपणें वाटूं लागतें. जनतेंतील लोक कांहीं बोलत असले तरी सामान्य जनता 'मुकी बिचारी कुणी हांका' अशी स्थिति तिची होते. भांडवलप्रधान लोकशाहींत राज्य हांकणारी व्यक्ति नसते, संघटित पक्ष असतो. ज्या समष्टि व सामुदायिक जीवनांत बहुजनसमाज वावरत असतो, त्यांत त्याला प्रेरक असें कांहीं आढळून येत नाहीं. ज्याच्यासाठीं हालअपेष्टा सोसून जगावें व ज्याच्यासाठीं श्रद्धायुक्त मनानें मृत्यूला कवटाळावें असें कांहीं भेटत नाहीं, राज्याप्रति, राष्ट्राप्रति, सामान्य जनाची निष्ठा असते. तथापि, पुजारी गरवर्तनी असला म्हणजे भक्ताच्या मनांत जी चीड उत्पन्न होते, तीच गोष्ट राज्याच्या देवालयांत पुजारीरूपी सरकार जें

करीत असतें त्यानें जनतेच्या मनांत चीड निर्माण होते. व्यक्तीच्या जीवनांत तो आस्तिक असो, अगर नास्तिक असो, कांहीं तरी व कशाबद्दल तरी त्याची एक दृढनिष्ठा असते. किंबहुना, निष्ठाशून्य मनुष्य क्वचित् आढळून येतो. कांहीं वेळ तो निष्ठाशून्य असूं शकेल, तथापि कुठल्या तरी निष्ठेला तो शरण जात असतो आणि निष्ठा असल्या-नंतर निष्ठेच्या विषयासंबंधीं किती जरी टीकात्मक सांगितलें गेलें तरी सामान्यपणें त्याच्या मनावर परिणाम होत नाहीं. राजकारणांतहि हाच अनुभव आहे. विभूतिपूजा नसावी असें म्हणणारेहि प्रसंगीं कडवे विभूतिपूजक असतात; त्याप्रमाणें एकदां नेत्यावर विश्वास ठेवला म्हणजे त्याच्या उघड उघड चुकासुद्धां डावपेंचाचा भाग मानला जातो. त्यांचीं स्वगतें प्रमेयें मानलीं जातात. सहज सांगितलेली गोष्ट भविष्य-वाणी समजून जवळ जवळ अंधश्रद्धेनें ती स्वीकारली जाते. जी निष्ठा व जे मनोभाव व्यक्तीबद्दल असतात तीच निष्ठा व तेच मनोभाव लोकशाहीमध्यें पक्षाबद्दल अगर संघाबद्दल लोकांच्या मनांत आढळून येतात. मजदूर संघाबद्दल निष्ठा उत्पन्न झाली म्हणजे त्या संघानें अगर त्याच्या पुढाऱ्यांनीं कांहीं जरी केलें तरी तें बरोबरच असें निष्ठा ती मग मानत असते. जेवढें हितैक्य अधिक स्निग्ध, नेता व अनुयायी यांच्यांतील संबंध जेवढे घनिष्ठ, तेवढी ही निष्ठा अधिक दृढ व अधिक प्रभावी असते. मग सरकार जुमानत नाहीं व आपला मजूर संघ, आपलें रेल्वे फेडरेशन, आपली क्लास फोर युनियन, ही आपल्या हितासाठीं झटत आहे, सदा दक्ष आहे, या अनुभवानें त्यांतील व्यक्ति अधिकाधिक संबंधित संघटनेशीं निष्ठावान् होत असतात आणि सरकार व संघ यांच्यांत संघर्ष उत्पन्न झाल्यास त्यांची निष्ठा संघाला बेइमान होत नाहीं. सरकार भलेंहि संघाच्या कार्याला देशविघातक म्हणो, किंवा देशद्रोही म्हणो, तरीसुद्धां त्यांची निष्ठा कायमच राहते. संघाला सोडण्यास ती तयार नसते व या प्रवृत्तीचें कारण एकच म्हणजे राज्य-कारभारांत त्यांच्या अनुभवाला जुमानलेलें नसतें आणि संघाचें कार्य त्यांच्या अनुभवा-वरच आधारलेलें असतें, किंबहुना त्यांचा अनुभव हीच संघाची कार्यप्रवण शक्ति असते.

आर्थिक विषमता असली म्हणजे वर वर समाज जरी एकजिनसी दिसला तरी वस्तुतः तो तसा नसतो. एका गाडींत ज्याप्रमाणें निरनिराळ्या वर्गांचे डबे असतात तसेंच मग समाजांतील माणसांचें वर्गव्यवस्थेंत विभाजन झालेलें असतें. समाजामध्यें मग सरळ दोन विभाग असतात. एक आहेरे व एक नाहींरे. ज्यांच्याजवळ संपत्ति आहे, सत्ता आहे, प्रतिष्ठा आहे, वाटेल तें करण्याची संधी आहे, त्यांचा वर्ग व जे गरीब आहेत, असंघटित आहेत, अज्ञानी आहेत, दरिद्री आहेत, उपेक्षित आहेत, वंचित आहेत, त्यांचा एक वर्ग. क्षणभर असें म्हटलें तरी चालेल कीं, एकराष्ट्र या औपचारिक छत्राखालीं हीं दोन राष्ट्रें एकमेकांसमोर जवळ जवळ युद्धाच्या पवित्र्यांत उभीं राहिलेलीं दिसून येतात व मग जो नाहींरे वर्ग आहे, ज्याच्याजवळ सत्ता नाहीं, संपत्ति नाहीं, तो संघटित होत

असतो व साहजिकपणें मग आपला उद्धारकर्ता जो संघ अगर जें संघटन त्याबाबत मग तो निष्ठावंत बनतो, देशाबाहेरील शत्रुशीं लढतांना जी स्वामिभक्ति, जें तीव्र देशप्रेम, जी त्यागाची भावना नागरिकांच्या मनांत सामान्यपणें असते, तीच भावना मग या नाहींरे वर्गातील लोकांच्या मनांत कार्यप्रवण होते. संपत्तिमान् वर्ग मग खरा खरा शत्रु वाटूं लागतो. संघासाठीं वाटेल तो त्याग करावयास तो मग तयार होतो व संघाची नैतिक पार्श्वभूमि ही नेहमींच स्वार्थत्यागावर आधारलेली असते. सत्ताधीश वर्गानें कांहीं जरी केलें तरी त्यावर हेत्वारोप केला जातो. त्यांनीं कांहीं न्याय केला असें आढळून आल्यास त्यांत अप्रामाणिकपणाचा वास येतो. सत्ताधीश, संपत्तिमान् वर्ग म्हणजे मानवी रूपानें वावरणारा राक्षसवर्ग वाटतो. त्याप्रमाणें सत्ताधीश, संपत्तिमान् वर्गालाहि सामाजिक न्याय मागणारें, आर्थिक समता मागणारें संघटन समाजद्रोही व देशद्रोही वाटत असतें. नाहींरे यांना जें हवें असतें तेंच नेमकें नाकारण्यांत आहेरे यांना आपल्या हिताचें संरक्षण वाटत असतें. नाहींरे वर्गातील लोकांना येणारा अनुभव या आहेरे वर्गाच्या लोकांना नसल्यानें तो खरा मानण्याची त्यांची तयारी नसते आणि मग आहेरे वर्ग मागें सांगितल्याप्रमाणें आपल्याच अनुभवाला बिनचूक समजून, त्याला लक्षांत घेऊन आपली सत्ता प्रस्थापित करीत असतो, चालवीत असतो आणि मग नाहींरे वर्गाला आपण समाजाच्या चित्रपटांत कोणीहि नाहीं, केवळ गाड्या ओढणारे व पायघड्या घालणारे आहोंत असें वाटूं लागतें व या वाटण्यापासूनच मग अटळ असा संघर्ष निर्माण होतो. नव्या विचारांना या परिस्थितींत प्रगति करणें किती अवघड आहे, ह्याची जाणीव भारतांतील लोकांना आहे. वास्तविक वेदोक्त कर्म करण्यांत बहुजन-समाजांतील लोकांना कांहीं अधिक अर्थप्राप्ति होणार होती असें नाहीं. एक सामाजिक प्रतिष्ठा, एक सांस्कृतिक अभिमान जरूर प्राप्त होणार होता, तथापि या साऱ्या गोष्टीलासुद्धां वरच्या वर्गाच्या लोकांनीं किती विरोध केला याचा इतिहास अजून ताजा आहे. राजकारणांत प्रगतिपर, त्यागी वृत्तीचीं, 'केसरी'सारखीं वर्तमानपत्रेंहि साठ वर्षांपूर्वी वेदोक्ताचा अधिकार बहुजनसमाजाला नाकारीत होतीं आणि जेथें संस्थानें व संपत्तिमान् वर्गाचा संबंध आला त्या ठिकाणीं तर क्रांतिकारक म्हणविणारेसुद्धां जातिविषयक व वर्गविषयक भावनेनें बहुजनसमाजाला विरोध करते झाले, हें महाराष्ट्राच्या इतिहासांत घडून आलें आहे. संस्थानें जावींत आणि त्यांतील प्रजा गुलामींतून मुक्त व्हावी असें प्रतिपादणारे प्रतिगामी लोकांच्या टीकेचे विषय झाले. संस्थानें म्हणजे जुन्या वैभवाचीं स्मारकें, नव्या आशेचा सतत वाहणारा झरा, असेंहि प्रतिपादण्यांत येत होतें. संस्थानिकांचीं कुकृत्यें, त्यांची जुलूमजबरदस्ती यांना लोकटीकेच्या झोतांत कोणीं आणल्यास त्याच्या जीवालाहि धोका होता. याचा विसर अजूनहि महाराष्ट्रांत पडला नाहीं. बहुजनसमाजाच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नाला हिंदुस्थानांतील बहुतेक संस्थानिकांनीं इंग्रज असेपर्यंत तर, विरोधच केला. प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना कसें कसें छळलें जात

होतें याचा इतिहास लोक अजून विसरले नाहींत. आणि अनेक संस्थानिक असे होते कीं, आपल्या रियासतींतील वाईट गोष्टी खालसा मुलखांत लोकांच्या चर्चेचा व टीकेचा विषय होऊं नये म्हणून खालसा मुलखांतील वर्तमानपत्रकारांना चंदा देत. खालसा मुलखांतील साहित्यिकांना पुरस्कार देऊन रियासतींत नसलेली सामाजिक प्रतिष्ठा खालसा मुलखांत मिळवीत. विरोध दाबून टाकण्याचे दोन्ही मार्ग म्हणजे दडपशाहीचा व मुखपिंड देण्याचा; दोन्हीहि केले जात होते. सरदार, इनामदार व जहागिरदार यांचें आतां सामाजिक प्रयोजन राहिलें नाहीं. सामाजिक सेवा अगर उपयुक्तता या वर्गापासून मिळणें अशक्य झालें याची, खात्री होऊनहि इनामदारांचे, जहागिरदारांचे किती तरी भाट सर्वत्र आढळून येत होते. खोताच्या साडेसातीपासून जनतेला मुक्त करण्यासाठीं जे प्रयत्न केले गेले त्यांची बाजू उचलणारीं वर्तमानपत्रें व माणसें रत्नागिरीच्या आळीपासून पुण्यांतील सदाशिव पेठेच्या हौदापर्यंत होतीं. तात्पर्य, समाजांतील आर्थिक विषमता नाहींशी करण्यासाठीं जे जे प्रयत्न होतात त्याला त्याला विरोधच होत असतो. प्रचलित समाजव्यवस्था व विषम आर्थिक परिस्थिति ही कायम राहावी असें म्हणणारा एक वर्ग सर्वकाळीं सर्व ठिकाणीं आढळून येतो. कारण विषम आर्थिक स्थितींत ज्याला ज्याला जसजसा अनुभव येतो, त्या त्या प्रमाणें त्याची बुद्धि व भावना बनते आणि मग ज्याच्याजवळ जें आहे तें कायम व्हावें, यावच्चंद्र दिवाकरौ राहावें, असें त्याला वाटतें; व ज्याच्याजवळ कांहीं नाहीं त्याला सारखें आपण कांहीं तरी व्हावें, आपणाजवळ कांहीं तरी असावें अशी त्याची मनोभावना होते.

ज्या समाजांत मग आर्थिक विषमता वावरत असते त्या समाजामध्यें साहजिकच प्रत्येकाच्या व विशेषतः संपन्न वर्गातील लोकांच्या पोटांत एक अनिश्चितता, एक भीति वाटत असते. आज आहे उद्यां राहील का? आज एवढा जुलूम झाला उद्यां अधिक होणार आहे का? आज इतके दडपले गेलों; उद्यां काय वाढून ठेवलें आहे? आज जबरीनें शेतें नांगरलीं; उद्यां आपल्या घरांत प्रवेश करणार नाहीं ना? गिरण्याबाहेर उभें राहून आरोळ्या-घोषणा केल्या; उद्यां कारखान्यांत शिरून हातोडे तर उगारणार नाहीं ना? अशी शंका, अशी भीति, समाजांतील सर्व थरांत वावरत असते ही परिस्थिति १९१५–१६ च्या सुमारास सुरू झाली व तेव्हांपासून वरच्या वर्गाच्या मनांत एक निराळें वातावरण उत्पन्न झालें व तें अजूनहि नाहींसें झालेलें नाहीं. निरनिराळ्या संस्थांनीं निरनिराळ्या संस्थानिकांविरुद्ध साधारणपणें २०–२१ च्या सुमारास चळवळ सुरू केली आणि तेव्हांपासून ४८ सालापर्यंत कुणाहि संस्थानिकाला चैन पडली असें झालें नाहीं. १९०८ सालीं खुदीराम बोसनें पिस्तूल झाडलें आणि त्याचा आवाज भारत सोडून जाईपर्यंत म्हणजे ४७ सालापर्यंत इंग्रजांच्या मनाला सतत धडकी देत होता. तात्पर्य, जेथें समता नाहीं, तेथें बाह्य शांतता असली तरी मानसिक

शांतता आढळून येत नाहीं. आजचा भरंवसा नसतो. उद्यांचें भविष्य निश्चित नसतें. स्वतःचेंच मन स्वतःचें शत्रु होतें व जें कल्पिलेलें नसतें तें होत जातें. समाजांत वर वर सर्व कांहीं यथासांग चाललें आहे असेंच वाटत असतें. राज्यकर्त्यांना मनांतल्या मनांत कोठपर्यंत आपण शिल्लक राहूं याचा भरंवसा नसतो आणि एकदां वर वर दिसणाऱ्या वातावरणांत थोडासा जरी स्फोट झाला म्हणजे ज्याला जें हातीं लागेल तें उचलून पोबारा करावा असें वाटूं लागतें. १९४५ च्या सुमाराला भारतांत आतां इंग्रज राहाणार नाहीं याची खात्री इंग्रजांप्रमाणें संस्थानिकांनाहि होऊं लागली व यांतील अनेक महाभागांनीं पुढील दोनतीन वर्षांत जेवढें कांहीं दौलतींतून खाजगी करतां येईल तेवढें करून घेतलें व ज्यावेळीं सत्तात्यागाचें उदक सोडावें लागलें त्यावेळीं अनेकांच्या गंगाजळी कोरड्या असल्याचें आढळून आलें. इतिहासाचा दाखला असा आहे कीं, एकदां संतोष व अन्यायाची चीड जनमनांत खोल रुजली म्हणजे ती प्राप्त क्षणाची वाट पहात असते, आणि तो क्षण टाळावा म्हणून सत्ताधीशांनीं, संचितवाल्यांनीं, संपत्तिमान् वर्गानें कितीहि व कसाहि प्रयत्न केला, तरी पंचांगांत सत्ताधीशांचा निश्चित झालेला निर्वाणदिन बदलत नाहीं. गोंजारून घेतलें जातें, गोंधळ उत्पन्न केला जातो, गोळ्या घालून भेडसाविलें जातें व अटळ भविष्य टाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. पण डोंगराच्या शिखरावरून ढळलेला दगड पायथ्याशिवाय कोठेंहि थांबत नाहीं. त्याप्रमाणें सगळे सत्ताधीश, सगळा धनिक वर्ग, प्रतिष्ठेच्या तळाशीं येऊन कोलमडतात, हाच इतिहासाचा सिद्धान्त आहे. कोठें कोठें कांहीं तरी सवलती देण्यांत येतात, कौन्सिलें नेमून पहा, द्विदल राज्यपद्धति करून पाहा, पण शेवट सवलती देऊन देऊन टळत नाहीं. सवलतींच्या राजकारणानें केलेली मागणी कधींच पुरी होत नाहीं. उलट, सत्ताधीशांचा दिन ढळला याचेंच प्रत्यंतर बहुजनसमाजाला येतें. पुष्कळ वेळां दीर्घदृष्टीचे सत्ताधीश धोरणानें वागतात व त्यामुळें शेवट थोडा वेळ लांबतो. नाटकांत मध्येंच एखादें प्रहसन व्हावें त्याप्रमाणें होतें; पण त्यामुळें नाटक बंद होतें असें नव्हे. पुष्कळ वेळां सत्ताधीश वर्ग नवविचाराचें स्वागतहि करतो. पण त्यामागील हेतु आपल्या त्यावरील हल्ल्याच्या तयारीला अधिक वेळ मिळावा या हेतूनेंच तें झालेलें असतें. इंग्रजांनीं जाण्यापूर्वीच्या साठ वर्षांत सर्व प्रयोग करून पाहिले. पण राजकारणांत ते मुरलेले असल्याकारणानें जें घेतलें जाणार होतें त्यावर उदक सोडून तें दिलें व पुण्य संपादन केलें. भारतांतील अनेक संस्थानिकांनीं विरोध करण्याचा प्रयत्न केला. पण अनेकांनीं इंग्रजांचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवलें व आत्मसमर्पण केलें हेंहि खरें आहे. इतिहासाचा अनुभव असा आहे कीं, सत्ताधीश हे होता होई तोंपर्यंत सत्ता सोडीत नाहींत. मग अपरिहार्य झालें तर टप्प्याटप्प्यानें, छटाकाछटाकानें स्वातंत्र्याचा शेर पुरा करीत असतात व मग अंत समीप आल्यानंतर राहिलें साहिलेलें मान्य करणें याचा अर्थ स्वत्वनिवृत्ति आहे हें ते ओळखतात आणि आपली दुनिया संपविण्यांत स्वातंत्र्याच्या दुनियेचा जन्म आहे याची जाणीव त्यांना

होते. स्वातंत्र्याचा लढा एकदां सुरू झाला म्हणजे बापाकडून मुलाकडे वारसा म्हणून दिला जातो व त्या लढ्याचा शेवट स्वातंत्र्य मिळण्यांत होतो यांत कांहीं शंका नाहीं.

स्वातंत्र्याची लढाई सुरू झाली म्हणजे तिचा शेवट स्वातंत्र्यप्राप्तींत होतो हा इतिहासाचा सिद्धान्त बरोबर आहे. तथापि, स्वातंत्र्याच्या युद्धाला सुरुवात झाल्याबरोबर सत्ताधीश व त्यांचे साथीदार वर्ग म्हणजे भांडवलवाले व संपन्न लोक यांच्या मनांत भीति उत्पन्न होते व कंसाला ज्याप्रमाणें ठायीं ठायीं श्रीकृष्ण दिसत होता, त्याप्रमाणें सत्ताधीशांची स्थिति होते. रामायणांत मग राज्यद्रोह दिसतो. साध्या भजनांतून राज्याविरुद्ध सांगितलें जात आहे असें वाटतें. कीचकवधाचें नाटक मग आपल्यावर गुदरणाऱ्या प्रसंगाचें चित्र वाटतें. समाजांतून जरा मोकळेपणानें चर्चा होऊं लागली म्हणजे राजद्रोहाचा प्रचार होत आहे असें वाटतें. ठायीं ठायीं त्यांच्या मनाच्या घोड्याला संताजी घोरपडे दिसत असतो. कुणी तरी मग या उसळणाऱ्या, वर येणाऱ्या असंतोषाला दडपून टाकावें असें धनवान् वर्गाला, प्रतिष्ठित वर्गाला वाटतें व मग त्यांचे साथीदार जे सत्ताधीश त्यांना मग चळवळ दडपून टाकण्याचा आग्रह करण्यांत येतो. सत्ता व संपत्ति यांची एका दृष्टीनें भागीदारी असते व एकानें कायद्याखालीं व एकानें सामाजिक शक्तीच्या साहाय्यानें समाजांत लुटीचें काम करावें असें जणूं ठरलेलें असतें असें वाटतें. जे सत्ताधीश असतात ते अर्थात् कायद्यानुसार हिंसा करीत असतात. जे संपत्तिमान् असतात ते प्रचाराच्या साधनांचा उपयोग करून समाजशक्तीचा दुरुपयोगच करीत असतात. पण दोघेहि सत्याला व युक्तीला (रिझन) भीत असतात. कुठल्याहि समाजामध्यें उघड उघड अन्याय करतांनासुद्धां कांहीं तरी तत्त्वांचा आधार घेतला जातो, कांहीं युक्तीचा स्वीकार केला जातो. इसापनीतींतल्या लांडग्यालासुद्धां कोंकरूं खाण्यापूर्वी, नदीचें पाणी तूं बिघडविलेंस, असा आरोप ठेवावा लागला. जेव्हां त्याच्यावर आरोप शाबीत होईना, तेव्हां तुझ्या बापानें बिघडविलें, असा आरोप करून लांडग्याला कोंकरूं खावें लागतें. तोच अनुभव मनुष्य कितीहि दुष्ट असला, कितीहि हुकूमशाही वृत्तीचा असला, तरी आपण केलेलें कृत्य न्यायाचें आहे हें दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. कांहीं ना कांहीं तरी करून त्याच्या मनांत त्याला दटावणारी जी सदसद्विवेकबुद्धि असते तिला समजावण्याची आवश्यकता त्याला वाटत असते व म्हणून हिंसेपुढें अहिंसा उभी राहिली म्हणजे हिंसेची शक्ति कमी होते. प्रसंगीं हिंसा शरणागति घेते. विरुद्ध पक्षाचा युक्तिवाद मानावा तर आपल्याला सत्ता व संपत्ति यांवरील कबजा सोडावा लागेल अशी त्यांची बुद्धि त्यांना सांगत असते. म्हणून युक्ति अगर विवेक यांना ते स्थान देत नाहींत. त्यांचे कान श्रवणाची क्रिया विसरून जातात. विरोधकांच्या युक्तिवादाला बळी पडून कांहीं सवलत द्यावी म्हटलें तर आपला दावा खोटा आहे अशी कबुली आपण दिली असें त्यांना वाटतें. युक्तीचा मान राखणें म्हणजे आपण असत्याचे साथी आहोंत असें मग सिद्ध झालें असें त्यांना वाटतें. म्हणून

आपल्या कारभारावर, आपल्या वर्चस्वाबाबत कोणी शंका प्रदर्शित करतांच त्याला राजद्रोही समजून, समाजद्रोही समजून, त्याचा नायनाट करण्याकडे या सत्ताधीशांची व संपत्तिमान् वर्गाची प्रवृत्ति धांवते. या परिस्थितींत राज्य हें आपल्या सुखासाठीं आहे, आपल्या संरक्षणासाठीं आहे, ही मौलिक श्रद्धा जनतेच्या मनांतून झपाट्यानें कमी होत जाते. जनतेचीं सुखदुःखें खरोखर काय आहेत, जनतेच्या अडचणी खरोखर काय आहेत, याची दखल घेतली जात नाहीं व कोठें घेतली गेल्यास त्याच्यावर विचार केला जात नाहीं गिरणीच्या जीवंतच्या वातावरणांत आठ तास काम केल्यानंतर कामगार शरीरानें तर थकतोच, पण तेथें मिळालेल्या वागणुकीनें त्याचें मनहि थकतें व उदास होतें. या स्थितींत कुठल्या तरी चाळींतील घाणेरड्या खोलींत १०×१५ च्या खोलींत तीन जोडप्यांबरोबर तो संसार करीत असतो, याची जाणीव मालकवर्गाला नसते आणि सत्तेचे प्रतिनिधि तर खानेसुमारीच्याच वेळेला दहा वर्षांतून एकदां जातात. जनतेचें प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांनाहि निवडणुकीच्या आधींच्या आठवड्यांशिवाय जाण्याला वेळ नसतो. त्यांचीं नागडीं उघडीं मुलें रस्त्यावर हिंडत असतात. त्यांच्या शिक्षणाची सोय फारशी कोणी बघत नाहीं. तात्पर्य, या बहुसंख्याक जनतेच्या जीवनाचा अनुभव मालकवर्गालाहि नसतो व सत्ताधीशांनाहि नसतो. जुन्या इतिहासाच्या ताम्रपटावर चालू घडीला सत्तेवर राहण्याचा अधिकार सांगितला जातो व त्याविरुद्ध कांहीं कांगावा केल्यास कायदा व सुव्यवस्था यांच्या नांवाखालीं येथून तेथून जनतेला दाबून टाकलें जातें. विषम समाजांतील या दोन राष्ट्रांमध्यें म्हणजे आहेरे व नाहीरे यांच्यामध्यें राहणारे लोक निरनिराळ्या दुनियेंत राहतात असें आढळून येतें व जेव्हां कोठें ते एकत्र येतात त्यावेळेला आपल्या परीटघडीच्या कोटाला धक्का लागणार नाहीं अशी काळजी वरच्या वर्गांतील दुनियेंतील लोक घेत असतात. दोघांच्या आवडीनिवडी निराळ्या असतात. एकाला बालगंधर्वाचें नाटक आवडतें, तर दुसऱ्याला पठ्ठे बापूरावचा तमाशा आवडतो. एकाला ललित व लाडे लाडे बोलणाऱ्या नायकांच्या कादंबऱ्या आवडतात, तर दुसऱ्याला कांहीं तरी अचकट विचकट गोष्टींचा भरणा असलेलें साहित्य आवडतें. आचार, विचार, संस्कृति या सर्व बाबतींत विरोध ठळकपणें दिसून येतो. मजुरांच्या सभेंत बोलणारा वरच्या वर्गांतील समाजसत्तावादी उभा असतांनासुद्धां निराळा वाटतो. त्याचे हावभाव, त्याची भाषा निराळी वाटते. त्याची सहानुभूति बहुजन-समाजाबाबत ओथंबत असली तरी पुष्कळ वेळां तीं आंसवें नक्राश्रु असतात. जास्तींत जास्त त्याला न्याय द्यावयाचा झाला तर त्याची सहानुभूति बौद्धिक असते. पण आपुलकीची तळमळ त्या ठिकाणीं नसते. तात्पर्य, या दोन्ही दुनियेंतील लोक जेव्हां एकत्र येतात तेथें एकता उत्पन्न होते असें नाहीं. एका गाडींत बसले म्हणून यथार्थपणें सहयात्री ते होत नाहींत. शरीरें एकत्र दिसलीं तरी मनें दोन ध्रुवांइतकीं लांब असतात. बहुजनसमाजानें म्हणणें जोरानें मांडल्याबरोबर ती दमदाटी बनते. कांहीं ठांसून विधान

केल्याबरोबर तेथें हिंसेचा वास येतो. आणि समाजामध्यें आर्थिक विषमता असल्यानें सामाजिक न्याय मिळत नाहीं व तो नसला, म्हणजे समाज अस्थिर असतो, त्याच्यामध्यें समतोल राहत नाहीं आणि जरी कोठें न्याय दिल्याचा देखावा दिसला तरी त्याच्या-योगानें जनता भुलत नाहीं. उलट, कांहीं तरी प्रचारी विष त्यामध्यें आहे असेंच तिला वाटतें व या सर्वांचा परिणाम मग वर्गसंघर्ष निर्माण होतो व वर्गसंघर्ष निर्माण झाला म्हणजे दोन्ही पेहेलवान अहिंसेच्या व वैधतेच्या आखाड्यांत राहूनच कुस्ती करतील याचा भरंवसा नसतो. ज्या समाजामध्यें जीवनांतील प्राप्ति व केलेले प्रयत्न यांत कांहीं कार्यकारणभाव नसतो, त्या ठिकाणीं विफल झालेले प्रयत्न, खंडित झालेले मनोरथ, चिरडलेल्या महत्त्वाकांक्षा, हिंसेचा स्वीकार करतात. जें न्याय्य आहे तें दिलें तरी पाहिजे, नाहीं तर आज नाहीं उद्यां हिंसेचा मुकाबला करण्यास तयार झालें पाहिजे याशिवाय अन्य विकल्प दिसून येत नाहीं व जेव्हां न्याय नाकारण्याची क्रिया सारखी चालू असते व विनाशाचा कडा जसा जवळ येत जातो त्यावेळीं जे सत्ताधीश आहेत, आहेरे आहेत ते, ज्याप्रमाणें दिवा विझण्यापूर्वी सतेज होतो त्याप्रमाणें जे राहिलें असेल तें कवटाळून ठेवण्याचा अखेरचा प्रयत्न करतात. जालीयनवाला बाग आधीं होते व नंतर युगपरिवर्तन दिसून येतें. जसजसा सत्याचा व युक्तीचा विजय होत जातो तस-तसे संचितवाद्यांचे हितसंबंध विस्कळीत होत जातात. सत्य हें अंतिम विजयी होतें; व तें विजयी होतें याचा अर्थ स्वातंत्र्य विजयी होतें. स्वातंत्र्य विजयी होतें याचा अर्थ समता विजयी होते. आहेरे व नाहींरे यांच्या युद्धांत शेवटीं आहेरे यांचा पराजय होतो. विनाश टाळावयाचा असेल, सर्वनाश टाळावयाचा असेल, तर जें न्याय्य आहे तें दिलें पाहिजे. न्यायाशीं संघर्ष हें त्याला उत्तर नाहीं. त्याला उत्तर समर्पण आहे. पण जें मुठींत पकडून ठेवलेलें आहे तें हात तुटेपर्यंत द्यावयाचें नाहीं हा मनुष्यस्वभाव आहे. न्यायाशीं झगडण्यांत एवढें नुकसान आहे याची जाणीव होत नाहीं व जेव्हां जाणीव होते त्या वेळेला हातांतील गेलेलेंच आढळून येतें. शेंडी तुटो कीं पारंबी तुटो या निश्च-यानें झगडा करण्यास उभे राहिलेले सत्ताधीश व संपत्तिमान् हेच शिखानष्ट होतात हाच आतांपर्यंतचा अनुभव आहे.

स्वातंत्र्य व सत्ता यांचा लढा सुरू झाला म्हणजे अंतीं सत्तेचा पराभव होतो हें खरें असतें. तथापि, तो क्षण येईपर्यंत मध्यंतरीच्या काळांत स्वातंत्र्य पराभूत झालेलें दिसतें. हुकूमशाहीचा भाव वाढलेला दिसतो. पहिल्या लढाईनंतर जर्मनीचा इतिहास असें सांगतो कीं, तेथील लोकांनीं लोकराज्य स्थापन केलें; पण युद्धानंतरहि किंचित् काळ स्तब्ध बसलेला, पराभूत झालेला सत्ताधीश व संपत्तिमान् वर्ग डोकें वर काढूं लागला. स्वातंत्र्यवादी पक्षांनीं, संघटित मजूरपक्षांनीं, जें करावयास पाहिजे होतें तें केलें नाहीं व शेवटीं परिणाम असा झाला कीं, कैसरशाहीपेक्षांहि स्वातंत्र्याला अधिक मारक अशी हिटलर-शाही आली. कालांतरानें हिटलरशाही गेली, कांहीं स्वातंत्र्य लाभलें; पण त्याची किंमत

अजून पण जर्मन लोकांनीं पुरी दिलेली दिसत नाहीं. तथापि, १९–२० शतकांतील जगाचा इतिहास सामान्यपणें असें दर्शवितो कीं, शेवटीं स्वातंत्र्यवादी जनता यशस्वी होते. एकोणीसाव्या शतकांत व विसाव्या शतकांतहि राष्ट्रवादाचा विचार अधिक प्रभावी होता आणि राष्ट्रवाद व स्वातंत्र्याच्या कल्पना यांचा मिलाफ होऊन एक नवीन विचारप्रणाली जगभर उसळली व सर्वत्र राष्ट्रराज्याची ( नेशन स्टेट ) मागणी जोरावली. सामान्यपणें स्वातंत्र्याच्या दृष्टीनें राज्य व राष्ट्र यांच्या मर्यादा समान असाव्यात हा विचार स्पष्ट होत गेला. याचाच अर्थ असा झाला कीं, एका राज्यांत एका सरकाराखालीं दोन राष्ट्रें नांदणें नैतिक दृष्ट्या अयोग्य व त्यालाच साम्राज्यवाद ही संज्ञा देण्यांत आली. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करणें म्हणजे त्या दुसऱ्या राष्ट्राला गुलामींत ठेवण्यासारखें आहे व एकोणीसाव्या शतकांत व विसाव्या शतकांतहि ही राष्ट्रराज्याची चळवळ, स्वयंनिर्णयाची चळवळ प्रभावीपणें चालू होती. व मोठ्या प्रमाणांत ती यशस्वी झाल्याचें दिसून येत आहे. राष्ट्र व स्वातंत्र्याची कल्पना यांतून राष्ट्रीय-स्वातंत्र्य ही एक चैतन्ययुक्त भावना निर्माण झाली. राष्ट्र म्हणजे सारखेपणाचा भाव व पृथक्‌पणाचा भाव यांचें मिश्रण असें म्हटलें तरी चालेल. आम्ही आपसांत एक आहोंत, अन्यापासून निराळे आहोंत, या दोन भावांचें मिश्रण राष्ट्रीय भावनेंत आहे. ऐक्य व पृथक्‌पणा या दोहोंच्या संगमांतून राष्ट्राचें तीर्थोदक उत्पन्न होतें आणि याच भावनेचे परिणाम आज आफ्रिका खंडांतसुद्धां दिसून येत आहेत. एकोणीसाव्या शतकांत जर्मन हें एक राष्ट्र निर्माण झालें. इटलीचें राष्ट्र निर्माण झालें. रशियाच्या साम्राज्याकडून उत्तरेकडील अनेक देश बाहेर पडले व तीं राष्ट्रें झालीं आहेत. पहिल्या महायुद्धानंतर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार अनेक लहान लहान राष्ट्रें युरोपांत निर्माण झालीं. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला इंग्रज साम्राज्याचे कांहीं विभाग स्वायत्त वसाहतीच्या तत्त्वानुसार विविध राष्ट्रें बनलीं आणि गेल्या दहा वर्षांत म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर हिंदुस्थान, पाकिस्तान, सीलोन हीं स्वतंत्र राष्ट्रें झालीं; म्हणजे राष्ट्रराज्यें झालीं. आफ्रिकेमध्येंहि वर सांगितल्याप्रमाणें राष्ट्रवादाची हवा सुरू झाली आहे, व एकामागून एक आफ्रिका खंडांतील प्रदेश राष्ट्र–राज्यें होत आहेत आणि साम्राज्यशाही, निदान जुनी साम्राज्यशाही, झपाट्यानें नष्ट होत आहे. किंबहुना, ती केली जात आहे. पहिल्या महायुद्धांतून स्वयंनिर्णयाचें तत्त्व समुद्रमंथनांतून अमृत निघावें त्याप्रमाणें दिसलें. तथापि, दुसऱ्या महायुद्धापर्यंत हें अमृत निर्मळ नाहीं असाहि अनुभव आला. कारण स्वयंनिर्णयांतून राष्ट्र–राज्य निर्माण झालें हें खरें; तथापि जगामध्यें अशांतता अधिक वाढली. दुसऱ्या महायुद्धाचीं कारणें स्वयंनिर्णयाची मागणी व राष्ट्रराज्याची महत्त्वाकांक्षा हीं होत असें म्हटलें जातें, तें अगदीं चूक नाहीं. फ्रेंच साम्राज्याच्या नाशांतून उत्पन्न झालेली राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना सबंध एकोणीसाव्या शतकभर प्रभावी होती. पहिल्या महायुद्धांत त्या भावनेला स्वयंनिर्णयाची शक्ति प्राप्त झाली व त्यांतून मागें सांगितल्या-

प्रमाणें अनेक लहान लहान राष्ट्र–राज्यें निर्माण झालीं. व राजकीय चित्रपटावर प्याद्यां-प्रमाणें त्यांचा उपयोग केला. पहिल्या महायुद्धांत स्वयंनिर्णयाचा उदय झाला व स्वयंनिर्णयांतून दुसऱ्या महायुद्धाचा जन्म झाला. जगामध्यें राष्ट्रीय स्वातंत्र्य ही आतां एक प्रचंड शक्ति झाली आहे. आंतरराष्ट्रीय जगांतील घटनांना निर्माण करणारी व त्यांचें नियमन करणारी अशी दुहेरी शक्ति झाली आहे.

राष्ट्रीय स्वातंत्र्य या कल्पनेंत राष्ट्र ही एक कल्पना व स्वातंत्र्य ही दुसरी कल्पना; अशा दोन कल्पना आहेत. स्वातंत्र्याचा अर्थ, त्याचा आशय, याचें विवरण या ग्रंथांत वरेंचसें आलें आहे. व्यक्ति व स्वातंत्र्य यांचा राज्यांत जो संबंध असतो, तसाच थोडासा राष्ट्र व आंतरराष्ट्रीय जग यांच्यांत असतो. राष्ट्र ही एक अंततो गत्वा भावना आहे, असें त्या भावनेचें वर्णन करतां येईल. पण अगदीं तर्कशुद्ध व्याख्या करणें कठीण आहे. राष्ट्र–राज्य व राज्य या कल्पनेचा विकास यासंबंधीं ऊहापोह व विस्तारशः विवरण प्रस्तुत लेखकाच्या 'राज्यशास्त्र–विचार'या ग्रंथांत आढळून येईल. तथापि, येथें थोडक्यांत त्याचा विचार करणें प्रस्तुत आहे. राष्ट्र ही एक मनाची भावना आहे व तिचा उगमहि मानसिक परिस्थितींतच उत्पन्न झालेला आहे. मी भारतीय आहे, मी महाराष्ट्रीय आहे, या भावनेंत काय काय येतें याची जाणीव मला पूर्णपणें असते. मी भारतीय आहे व ऋग्वेदापासून कालिदासापर्यंत जें कांहीं रचलें गेलें आहे, गाइलें गेलें आहे, या सगळ्याबद्दलचा माझा अभिमान त्या भावनेंत असतो. राष्ट्र या भावनेबरोबर प्रादेशिक भावनेची कल्पना येते हेंहि खरें. तथापि, प्राचीन काळीं या भावनेंत प्रादेशिकतेचा संबंध नव्हता हें ऐतिहासिक सत्य आहे. लोक तेव्हां स्थिर झाले नव्हते व जीवन जगण्यासाठीं सतत टोळ्या टोळ्या करून हिंडत असत, पण त्या प्रत्येक टोळीमध्यें ऐक्याची भावना होती. म्हणजे एका दृष्टीनें राष्ट्र ही भावना होती, ती टोळी कशी झालीं हेंहि पाहाणें महत्त्वाचें आहे. एकाच कुटुंबांतील ते असतील, कांहीं ना कांहीं कारणानें ते एकत्र आले असतील, एक भाषा ते बोलत असतील; तथापि ज्ञात कालापासून जें माहीत आहे तें हें कीं, या टोळ्या अस्तित्वांत आहेत, हे जनसंघ अस्तित्वांत आहेत. वंश, भाषा, समाज, पुढारी या गोष्टी आहेत, म्हणून तेथें राष्ट्रभावना आहे असें म्हणणें बरोबर नाहीं. हें तर असलेंच पाहिजे, पण यापेक्षां कांहीं अधिक असलें पाहिजे. तें केवळ आधिभौतिक नसून आध्यात्मिक असलें पाहिजे. एक भाषा बोलणारे यांचींहि अनेक राष्ट्रें आहेत. एका वंशांत जन्मलेले यांचींहि अनेक राष्ट्रें आहेत. एकाच राजकीय यंत्रणेखालीं असणारीं अनेक राज्यें आहेत. समान परंपरा, समान पराक्रम, मिळून जुळून भोगलेलीं सुखदुःखें या सर्व गोष्टी राष्ट्र या भावनेला मदत करणाऱ्या असतात व जोपासणाऱ्या असतात हें खरें, तथापि मानवाच्या ऐतिहासिक उन्नतींत अस्थिरतेपासून स्थिरतेपर्यंत चरवै इति ह्या वृत्तीपासून अचल स्थिति या घटनेपर्यंत जो प्रवास झाला, तो अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. भटकणाऱ्या टोळ्या प्रथम चालत असत. नंतर वाहनाचें युग सुरू झालें. गाढव, घोडे,

उंट हीं साधनें वापरण्यांत येऊं लागलीं. त्यानंतर रथांचा व गाड्यांचा उपयोग होऊं लागला. याच उन्नतीच्या अवस्थेबरोबर कुठल्या तरी भूमीवर पिकणाऱ्या अन्नधान्याचा शोध लावून कांहीं टोळ्या तेथें राहूं लागल्या. वस्ती झाली. बरोबर वास्तूची भावना उत्पन्न झाली. मग तें क्षेत्र सर्वांचें न राहतां विवक्षित लोकांचें झालें आणि सामुदायिक मालकीचा भाव तेथें आला. आपल्या टोळीबाहेरील लोक हे आपल्यापासून पृथक् आहेत हा भाव निर्माण झाला. मग झगडे झाले. लढाया झाल्या. कांहीं भूमिभाग पराक्रमाचा भाग झाला, जीं लढलों व जिंकलों तीं स्थानें मग पूजास्थानें, पवित्र स्थानें झालीं. जेथें पूर्वज धारातीर्थी पडले तीं तीर्थें झालीं, श्रद्धास्थानें झालीं. मग टोळीच्या राष्ट्रविषयक अध्यात्म-भावाला ती भूमि मग आधिभौतिक भाग बनली. त्यांच्यांत देह व आत्मा असें स्वरूप आलें आणि राष्ट्र म्हणजे निश्चित केलेला प्रदेश, ज्यांना आपण एक आहोंत व अन्यापासून निराळें आहोंत असें वाटणारे लोक तेथें राहूं लागले. राष्ट्र या भावनेंत आपलेपणाबरोबरच पृथक्पणाचा भाव आहे. किंबहुना, पृथक्पणाच्या भावनेनेंच राष्ट्राचें लक्षण स्पष्ट होतें. आपली भूमि निश्चित झाल्यानंतर तिच्यावर कोणी आक्रमण केल्यास मरेपर्यंत विरोध करावयाचा हा अनुभव मग सर्वत्र येऊं लागला. याच कल्पनेचा विकास होत होत आज जगभर राजकीय रचना राष्ट्रराज्याच्या तत्त्वाला अनुसरूनच झालेली आहे.

एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र राज्य होतें असें नाहीं. पण प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र राज्य होण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे, असा थोडासा विचार अठराव्या शतकाच्या अखेरीस अखेरीस युरोपमधील राजकीय तत्त्वज्ञानांत आलेला आढळून येतो. राष्ट्रराज्य होणें याचा अर्थ तें स्वतःपुरतें स्वतंत्र व प्रभुत्वपूर्ण संघटन होणें असा आहे. प्रभुत्वपूर्ण राज्य म्हणजे आपल्या क्षेत्रांत तें एकमेव सत्ताधीश असतें, त्याच्या आज्ञा न मानल्यास तें कृत्य दंडनीय ठरतें. शिक्षेस पात्र ठरतें. राज्याच्या क्षेत्रांत राहणाऱ्या यच्चयावत् माणसांवर त्या राज्यांना कायदेशीर अधिकार असतो. नागरिकाच्या जन्मापासून तों मृत्यूपर्यंत, चालू मिळकतीपासून मृत्यूनंतर ठेवलेल्या इस्टेटीपर्यंत राज्याचा अधिकार मानला जातो. राज्यानें कांहीं मर्यादा नागरिकांच्या जीवन व वित्त यांवर घातल्यास त्यास परवानगी असते. इतर कोणाकडे ती विचारावी लागत नाहीं. आपले हेतु काय असावेत, आपलीं ध्येयें काय असावींत व तीं अंमलांत आणण्याचीं साधनें कोणतीं असावीं, राज्याचें संरक्षण व संवर्धन कसें असावें, अंमलबजावणीची व्यवस्था कशी असावी, हें सर्व ठरविण्याचा अधिकार त्याचाच आहे. अन्य कोणाला तें जबाबदार नाहीं. राज्यांत कोणाला येऊं द्यावें, कोणत्या मालाची आयात अगर निर्यात व्हावी, ह्याबाबत राज्याला कोणालाहि विचारावें लागत नाहीं. न्यायदानाची व्यवस्था शिक्षेची व्यवस्था, शिक्षणाची व्यवस्था, थोडक्यांत म्हणजे राज्याला आपल्या प्रादेशिक क्षेत्रांत वाटेल तें करण्याचा अधिकार आहे. प्रभुत्वपूर्ण राज्य याचा विधिशास्त्रदृष्ट्या अर्थ

म्हणजे सर्व सत्ताधीशपणा. राज्यानें जगांतील तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें कांहीं चुकीचें जरी केलें, जगांत जे झाले नाहींत असे कांहीं प्रयोग केले, सामान्य न्यायाच्या कल्पनांना सोडून जरी कायदे केले, तरी विधिशास्त्राच्या दृष्टीनें तें सर्व राज्याच्या अधिकारक्षेत्रांत येतें. अधिकारांत केलें म्हणजे न्याय्य तेंच केलें अगर इष्ट तें केलें असा त्याचा अर्थ नाहीं. आणि राज्य या संस्थेचा इतिहास पाहतां अनेक अन्यायाचे कायदे, अनेक अन्यायाचीं कृत्यें प्रसंगाप्रसंगानें राज्य करीत असतें. व अर्थात् तें राज्याच्या कल्याणाचेंच करीत असतें, हा दावा नेहमींच सांगितला जातो. जें व्यक्तीच्या बाबतींत अन्यायाचें ठरेल तें राज्याच्या बाबतींत ठरणार नाहीं, हें उघड आहे. व्यक्तीच्या जीवनाला लागू पडणारीं नीतिमूल्यें राज्याच्या जीवनाला लागू पडत नाहींत. तीं अप्रस्तुत असतात अगर अपुरीं ठरतात. राष्ट्र जेव्हां राज्य होतें तेव्हां राष्ट्रांतील सर्व नागरिकांच्या व्यक्तिगत जीवनांतील केवळ शक्तीची ती बेरीज नसते. त्यापेक्षां अधिक शक्ति राज्याला प्राप्त होत असते. चार व्यक्ति एकत्र आल्या म्हणजे जी केवळ बेरीज नसून तेथें संघटन झाल्यानें तेथें गुणाकार होतो. व्यक्तिगत धैर्य याची गोळाबेरीज तर तेथें असतेच, पण त्याजबरोबर संघटनेचेंहि धैर्य तेथें असतें. सामान्य जीवनांतसुद्धां व्यक्ति चार मंडळींत घाबरत असली म्हणजे तिचें धैर्य सरतें यांतील मर्म उघड आहे. त्याबरोबर व्यक्तींतील अस्मिता, अहंभाव, अभिमान हा सर्व व्यक्ति जेव्हां समष्टिरूपांत येते, त्या वेळेला ह्याहि गुणांचा अगर दुर्गुणांचा गुणाकार झालेला दिसून येतो. व्यक्तीव्यक्तीमध्यें जो पृथक् भाव असतो, तो राष्ट्र होण्यामध्यें अधिकाधिक स्पष्ट होत जातो व राष्ट्राचें राज्य झालें म्हणजे त्या पृथक् भावाला कायदेशीरपणा येतो व त्याला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त होते. हा पृथक् भाव राष्ट्रीय भावनेच्या मुळाशीं असतो; किंवा वर सांगितल्याप्रमाणें हें त्याचें मुख्य लक्षण असतें; आणि आंतरराष्ट्रीय सबंधांत जीं नीतीमूल्यें प्रभावी असतात तीं अर्थात् राष्ट्रीय जीवनांतील नीतिमूल्यांपेक्षां कमी स्तरावर असतात, कमी पातळीवरचीं असतात. व्यक्तीनें व्यक्तीला मारलें म्हणजे खुनाचा गुन्हा होतो. पण हजारों व्यक्तींनीं हजारों व्यक्तींना मारलें म्हणजे त्याला युद्ध ही संज्ञा आहे. आणि जेव्हां एका राज्यानें दुसऱ्या राज्याविरुद्ध युद्ध पुकारल्यास वैयक्तिक संघर्षांत उत्पन्न होणारी चीड अगर राग यापेक्षां अधिक चीड व अधिक राग त्या राज्यांतील जनता दाखवीत असते. आणि युद्धाचा परिणाम पराजित राष्ट्राच्या जनतेचें स्वातंत्र्य नाहींसें करण्यांत अगर कमी करण्यांत होतो. या दृष्टीनें विचार करतां राज्याराज्यांतील संबंध असे असले पाहिजेत कीं, त्यावर कांहीं संयम, कांहीं मर्यादा असतील. व्यक्तीचा विचार करतांना स्वातंत्र्य याचा अर्थ कायद्याला अनुसरून स्वातंत्र्य असा केला आहे. आंतरराष्ट्रीय जगांत जें स्वातंत्र्य प्रत्येक राज्यानें उपभोगावयाचें त्यालाहि कांहीं संयम, कांहीं मर्यादा जगांतील शांततेच्या दृष्टीनें हवी असते व म्हणून आंतरराष्ट्रीय जगांत कांहीं आंतरराष्ट्रीय नीति, कांहीं आंतरराष्ट्रीय कायदा हवा असतो व ह्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय संस्था यांचें महत्त्व असतें. किंबहुना असें म्हटलें तरी चालेल

कीं, जगामध्यें सर्व राज्य एकमेकांचें स्वातंत्र्य मानण्यास तयार असतील तर त्याच्या राज्यांत स्वातंत्र्य अर्थपूर्ण होईल, प्रभावी होईल.

राज्याची सत्ता अमर्याद आहे. तथापि, राज्याचें स्वरूप व त्याचा गौरव त्या सत्तेचा उपयोग कसा केला जातो यावर अवलंबून आहे. तें जर आपल्या सत्तेचा विशिष्ट व्यक्तींच्या हितासाठीं, विशिष्ट गटाच्या हितासाठीं, विशिष्ट वर्गाच्या हितासाठीं, उपयोग करूं लागेल तर देशामध्यें सामाजिक शांतता राहत नाहीं, हें मागें सांगितलें आहे. आजच्या जगांत धनिक वर्ग अगर श्रीमान् वर्ग आपल्या कार्याचें जाळें केवळ देशांतच पसरवितो असें नव्हे, तर परदेशांतहि तो पसरवीत असतो व तेथें आधीं व्यापार जातो, मागून सत्ता जाते. आधीं तागडी जाते, नंतर तलवार जाते. निदान हा अनुभव भारताला परिचित आहे. देशामध्यें संपत्तिमान् वर्गाच्या इशाऱ्यावर राज्यसत्ता वागत असते व मग संपत्तिमान् वर्गाची प्रतिष्ठा राज्याची प्रतिष्ठा ठरते. सावकाराचा अगर धन्याचा अपमान झाला म्हणून कुळें ज्याप्रमाणें आपलाच अपमान झाला असें मानतात, त्याप्रमाणें भांडवलवाल्यांचा आंतराष्ट्रीय जगांत अपमान झाला अगर त्यांच्यावर कांहीं अन्याय झाला तर तो राष्ट्राचा अपमान झाला असें मानून राज्यसत्ता भांडवलवाल्यांच्या साह्यार्थ धांवून जाते. ईस्ट इंडिया कंपनीच्या वखारीच्या संरक्षणार्थ इंग्रज राज्याच्या पलटणी तेथें आल्या. दक्षिण आफ्रिकेंत सोन्याच्या खाणीचे मालक इंग्रज धनिक होते; म्हणून इंग्रजांच्या पलटणी त्यांच्या साह्यार्थ आफ्रिकेंत केल्या. आजहि दक्षिण अमेरिकेंतील राज्यांतून युनायटेड स्टेटच्या भांडवलवाल्यांच्या साह्यार्थ युनायटेड स्टेटचें राज्य धांवून जात आहे. भांडवल मग तें तेलाच्या धंद्यांत गुतलेलें असो, पोलादाच्या धंद्यांत गुंतलेलें असो, चहाच्या मळ्यांत गुंतलेलें असो; एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, देशी भांडवल परदेशीं गेलें म्हणजे त्याच्या संरक्षणाची हमी राज्य घेत असतें. प्रसंगीं हें उघड नसलें तरी भांडवलवाल्यांना आपलें सरकार आपली बाजू घेईल याची खात्री असते व मग अनेक परकीय देशांतून आर्थिक पकड व ती पक्की करण्यासाठीं राजकीय सत्ता धांवून गेली म्हणजे ज्याला साम्राज्यवाद म्हणतात तो तेथें उत्पन्न झाला ही गोष्ट स्पष्ट होते. मग मागासलेले प्रदेश अगर मागासलेलीं राष्ट्रें भांडवल गुंतवल्यामुळें कांहीं आर्थिक प्रगति संबंधित प्रदेशाची होते हें खरें जरी असलें, तरी त्याचे राजकीय परिणाम वाईट होतात. कायदा व सुव्यवस्था सुधारली तरी, राहणीचें मान सुधारलें तरी, चारित्र्य पतन पावतें व जबाबदारीची प्रवृत्ति खचून जाते. दुसरीकडे भांडवल गुंतविणाऱ्या राष्ट्राची आर्थिक दृष्ट्या प्रगति होत जाते. अठराव्या शतकांत हिंदुस्थानांतील संपत्ति सूक्तासूक्त मार्गानें इंग्लंडमध्यें गेली व तिच्या जोरावर इंग्लंडचें भांडवल वाढलें, उद्योग वाढला, किंबहुना इंग्लंडमधील एकोणीसाव्या शतकांतील सुसंपन्नतेची परिस्थिति हिंदी संपत्तीचें परिणामस्वरूप आहे. फिलीपाईनमध्यें व दक्षिण अमेरिकन संस्थानांत अमेरिकेनें जें शोषण केलें तेंच अमेरिकेंतील समृद्धीला कारण झालें. आर्थिक कबजांत

आलेला प्रदेश थोड्या आर्थिक उन्नतिप्रत जातो. पण त्याच्या आदर्शाला ओहोटी लागते. कितीहि राज्य सुराज्य असलें तरी त्याला स्वराज्याची प्रतिष्ठा कधींच येत नाहीं. स्वराज्य म्हणजे आत्मविश्वास. स्वराज्य म्हणजे नागरिकांच्या विधायक कर्तृत्वाला आव्हान हें उघड आहे. स्वराज्य म्हणजे चूक करण्याचा अधिकार, पण त्याचबरोबर चूक सुधारण्याची पण जबाबदारी तेथें येते. कुठल्याहि राज्यांत प्रजेच्या समाधानावर राज्याची उभारणी असते आणि जर प्रजेला आपला अनुभव राज्यकारभारांत गणला गेला नाहीं असें आढळून आलें तर ती नाराज होते. जे कायदे व जी व्यवस्था त्यांना अनुभवावी लागते ती त्यांच्या अनुभवाला विसंगत असते. किंबहुना प्रकृति न पाहातां, चिकित्सा न करतां, एखादें पेटंट औषध घ्यावें अशाप्रकारें व्यवहार केलेला आढळून येतो. आणि जेथें राज्यकर्ते व प्रजा हे एका समाजाचे घटक नाहींत, एका संस्कृतीचे वारस नाहींत, त्या ठिकाणीं मग उत्पन्न होणारा सुरुवातीचा असंतोष फार लवकर तीव्र होतो, जे परकीय सत्ताधीश असतात ते साम, दाम, दंड व भेद या चारहि उपायांचा स्वीकार करीत असतात. भीतीच्या वातावरणांत राहात असल्यामुळें अधिकाधिक संरक्षण शस्त्रास्त्रांनीं करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. जनतेची संमति लाभत नसल्यानें त्या राज्यसत्तेला दडपशाहीशिवाय अन्य उपाय राहात नाहीं व म्हणून जगामध्यें शांतता राहण्याच्या दृष्टीनें साम्राज्यवाद, वसाहतवाद, मागासलेल्यांना वर आणण्यासाठीं तथाकथित उन्नतिवाद हे सर्व निरुपयोगी ठरतात.

राष्ट्रराज्य झालें म्हणजे त्यांतील भांडवलवाला वर्ग आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत जातो व मग आपल्या स्वार्थासाठीं आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा इरेस घालतो. म्हणून जगांत शांतता राहावी या दृष्टीनें राष्ट्रराज्याच्या शक्तीवर व अधिकारावर आंतरराष्ट्रीय दृष्टीनें कांहीं मर्यादा असली पाहिजे हें इष्ट ठरतें. जगांत जी शांतता आहे अगर असावी, जी सभ्यता आहे व जी असावी, जी संस्कृति आहे व जी असावी, असें जगांतील लोकांना सामान्यपणें वाटतें, त्यासाठीं प्रत्येक राष्ट्रराज्यावर नियमन असलें पाहिजे. आणि ज्या क्षेत्रांत एकापेक्षां अधिक प्रभुत्वपूर्ण राज्यांचा संबंध येतो तेथें कोणा एका राज्याचा फतवा जारी होतां कामा नये. तसें झालें तर त्या क्षेत्रांत तें विशिष्ट राष्ट्र साम्राज्य जरी झालें नाहीं तरी त्याची साम्राज्यवादी वृत्ति पोसली जाते. आजच्या जगांत राज्याला स्वतंत्र राहूनहि आंतरराष्ट्रीय शांतता राखण्यासाठीं जें ऐक्य, जें हितैक्य आवश्यक असतें तेंहि साधतां येईल. ज्याप्रमाणें समाजांत व्यक्ति व समाज ह्यांच्या हितसंबंधांत विरोध निर्माण झाला म्हणजे समाजाचें हित हें आधीं व अग्रेसर मानलें जातें, त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय जगांत एखाद्या राष्ट्रराज्याचें हित व आंतरराष्ट्रीय जगाचें हित यांत संघर्ष उत्पन्न झाल्यास आंतरराष्ट्रीय जगाचें हित हें आधीं व अग्रेसर असलें पाहिजे. जगाची गरज अर्थात् राष्ट्राच्या गरजेपेक्षां आधींची व अधिक मानली पाहिजे व एखाद्या राज्यानें आंतरराष्ट्रीय व्यवहारांत कांहीं तंटा उपस्थित केल्यास त्याचा न्याय देण्याचे काम

अन्यांनीं केलें पाहिजे, हें न्याय्य ठरतें. विचारविनिमय करून, तडजोड करून, शांतता राखण्यासाठीं प्रश्न सोडविले पाहिजेत व हा दृष्टिकोन तात्त्विक दृष्ट्या योग्य आहे. व्यवहाराच्या दृष्टीनें उपयुक्त आहे. एक राज्य व दुसरें राज्य यांच्यांत उत्पन्न होणारे तंटे नानाविध असतात. एक राज्य व दुसरें राज्य यांच्या सीमा निश्चित करणें इष्ट असतें. कारण राज्याचें एक लक्षण म्हणजे जेथें हुकमतीचा प्रदेश निश्चित असणें. मग हा प्रदेश संबंधी राज्यानें एकतर्फी निश्चित करून भागत नाहीं. दुसऱ्या संबंधित राज्याशीं विचारविनिमय करून तो कायम करावयाचा असतो. आजकालच्या जगांत वाहतुकीच्या व संवाहनाच्या क्षेत्रांत इतकी प्रगति झाली आहे कीं, देशादेशामधील अंतर खंडाखंडामधील अंतर, अर्थशून्य झालें आहे व अनेक अर्थानें अनेक स्वतंत्र राज्यें असून जागतिक असा एक भाव जगांतल्या प्रजेंत उत्पन्न झाला आहे. विनोबांची ‘जय जगत्’ ही घोषणा विद्यमान परिस्थितीशीं जुळणारी असून जगाच्या भवितव्याच्या दृष्टीनें अर्थपूर्ण आहे. आज जगामध्यें कुठेंहि कांहींहि खुट्ट झालें, कीं त्याचा प्रतिध्वनि सर्वत्र ऐकूं येतो. कोरियांत लढाई झाली व पुण्यांत महागाई झाली, यांतील कार्यकारणसंबंध वर वर दिसला नाहीं तरी तो आहे हें निश्चित. आणि ज्याप्रमाणें आळींत गडबड झाली म्हणजे प्रत्येक घरमालक सावध होतो, त्याप्रमाणें आजच्या जगाची स्थिति आहे. व्यक्तिगत राष्ट्राचे सर्व व्यवहार परस्परांवर फार मोठ्या प्रमाणांत अवलंबून आहेत. आज जर कोणी एखादें राष्ट्र अलिप्त राहूं म्हणेल तर तें शक्य नाहीं. त्याची इच्छा असो अगर नसो, भांडणांत त्याला पडावें लागतें. यु. एन्. ओ. च्या चावडींत बसावें लागतें. चौधरीगिरी करावी लागते व शांतता राखण्याचा, तंटे तोडण्याचा प्रयत्न करावा लागतो. त्यांत भाग घ्यावा लागतो. संबंध तोडूं म्हटलें तर कोणाहि राज्याला तो तोडतां येणार नाहीं. जगाच्या शांततेंत प्रत्येक राष्ट्राची सुरक्षितता आहे. जगांतील राजकारणांत समतोल राहिल्यास त्याच्या राजकारणांत समतोल राहाणार आहे. आज प्रत्येक राष्ट्र जें करतें त्याचा परिणाम सूक्ष्म रीतीनें का होईना, जगांतील सर्व राष्ट्रांवर होतो. इंग्लंडमध्यें कोणता पक्ष विजयी झाला, अमेरिकेचा अध्यक्ष कोणत्या पक्षाचा निवडून आला, चीनच्या राजकारणी गटांतून काय घडत आहे, क्रुश्चेव याचे स्थान अटळ आहे का ढळलें आहे, या सर्व घटनांचा परिणाम संबंधित राष्ट्रापुरताच मर्यादित नसतो. केरळांत साम्यवादी पक्ष सत्ताधीश झाला याचा अर्थ निवडणुकीच्या मार्गानें साम्यवादाला विजयाची आशा आहे, असा अनेकांनीं लावला. अवैध मार्गानें, असंसदीय साधनानें तें सरकार स्थानभ्रष्ट करण्यांत आलें, ह्याहि गोष्टीचा परिणाम केवळ हिंदुस्थानच्याच राजकारणावर झाला असें नाहीं, तर त्या घटनेचे थोडे तरी परिणाम राष्ट्रीय राजकारणावर झालेले आहेत असें मानण्यास आधार आहे. आफ्रिकेमध्यें काळ्या आफ्रिकनांना कसें वागविण्यांत येतें याचा परिणाम जगाच्या राजकारणावर झाला आहे. अमेरिकेंत नीग्रो लोकांना समान हक्क अजून दिले जात नाहींत याचाहि परिणाम

अमेरिकेंतील निवडणुकीपुरताच मर्यादित राहिला नाहीं. प्रत्येक राष्ट्रांतील घरगुती भांडण-सुद्धां आतां जगाच्या चौकांत चर्चिलें जातें. कुण्या राष्ट्रानें नवीन शस्त्राचा अगर अस्त्राचा शोध लावला याचा परिणाम अन्य राष्ट्रावर होतो. व अधिक विनाशकारी शस्त्रास्त्रें निर्माण करण्याची शर्यत लागते व मग ती सर्व परिस्थिति जगांत धोक्याचें वातावरण उत्पन्न करते. साध्या साध्या क्षेत्रांतसुद्धां हीच परिस्थिति आहे. म्हणून या गोष्टीमध्यें एकापेक्षां अनेक राष्ट्रांचा संबंध येतो, त्या क्षेत्रांत कांहीं तरी नियमन पाहिजे, नियंत्रण पाहिजे, सामुदायिक मार्गदर्शन पाहिजे व कांहीं तरी सामुदायिक कार्यक्रम पाहिजे, हें स्पष्ट होतें. केवळ दोन राष्ट्रांत तंटा उत्पन्न झाला म्हणजे त्यांनीं त्याचा आपापसांत निकाल लावावा, तडजोड करावी, शांततेनें प्रश्न सोडवावा, हें सर्व ठीक, पण न झालें तर जी आग पेटेल ती दोन्ही राज्यांपर्यंतच मर्यादित राहील असें नाहीं. दोन माणसांत रस्त्यांत मारामारी झाली म्हणजे चार लोक गोळा होतात. कोणी ह्या बाजूचे, कोणी त्या बाजूचे व मग दंग्याला सुरुवात होते. दुकानें बंद होतात. लोकव्यवहार स्तब्ध होतो. जवळ जवळ तसेंच दोन राष्ट्रांत तंटा सुरू झाला कीं होत असतें म्हणून ज्या गोष्टीमध्यें विशेष हितसंबंध गुंतलेले नाहींत त्यांत सर्व जगभर एक सूत्र असावें, एक धोरण असावें, हें कोणी अमान्य करणार नाहीं. अफू, चरस, चंडोल यांचें नियमन, वाहतुकीचें नियमन, रोगाच्या सांथीचें नियमन, त्याप्रमाणें कामगारविषयक धोरण, इत्यादि बाबतींत बरेंच सहकार्य आधुनिक जगांत निरनिराळ्या राष्ट्रांत दिसून येत आहे. व्यापारविषयक क्षेत्रांतहि कांहीं संकेत, कांहीं व्यवस्था, आतां सर्वमान्य झालेल्या आहेत. इतकेंच नव्हे तर अन्नधान्याच्या बाबतींतहि आंतरराष्ट्रीय संस्था निर्माण झाल्या आहेत. एका दृष्टीनें या क्षेत्रांतून जगांत एक नियमन केलें जात आहे. जगामध्यें गव्हाचा पुरवठा, तांदुळाचा पुरवठा व कांहीं औषधांचा पुरवठा याबाबत आंतरराष्ट्रीय संस्था निर्माण झाल्या आहेत, व कांहीं नियमांनुसार त्यांचें काम चालू आहे. एवढेंच नव्हे, तर जगांत भांडवलाचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनेंहि 'वर्ल्ड बँक' व 'मानेटरी फंड' यांसारख्या संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. जगामध्यें पूर्वी सारखी आर्थिक व व्यापारविषयक परिस्थिति राहिली नाहीं. या दोन्ही क्षेत्रांत कांहीं नियम अंमलांत आहेत व गळेकापू स्पर्धा बरीच कमी झाली आहे. तात्पर्य, अनेक क्षेत्रांत निरनिराळ्या राष्ट्रांत हितैक्य निर्माण झाल्यानें शांतता बिघड-विणारीं अनेक कारणें नाहींशीं झालीं व हें सर्व व्यक्तिगत राष्ट्रानें अगर राज्यानें स्वखुषीनें जागतिक नियमन अगर नियंत्रण मान्य केलें म्हणून.

गेल्या अर्ध्या शतकांत जीं दोन महायुद्धें झालीं व जे शास्त्रीय शोध झाले, विनाशक व विधायक दोन्ही; त्यामुळें प्रत्येक राष्ट्राचा जगाबद्दलचा दृष्टिकोन बदललेला आहे. मागें सांगितल्याप्रमाणें सर्व जग हें एका अर्थानें एक झालेलें आहे आणि जर प्रगति व्हावयाची असेल तर एकेकट्याची होण्यामध्यें जगाला धोका आहे व सर्वांची होण्यामध्यें जगांत शांतता आहे व जगाची प्रतिष्ठा पण आहे. आणि जर सर्वांची प्रगति

व्हावयाची तर त्या दृष्टीनें कोणी तरी एक शास्त्र, एक नियंत्रक, अगर एक नियामक असणें इष्ट ठरतें. अमुक एक गोष्ट जगाच्या दृष्टीनें हिताची किंवा अन्यथा हें ठरविणारी एखादी अधिनायकी (पॅरामाऊंट) सत्ता असली पाहिजे. व आधुनिक जगांत असल्या सत्तेचें स्वरूप साहजिकच एखादी संस्था अगर संघटन असें असतें व मग हा जगाचा शास्ता अगर नियंत्रक केवळ धर्मोपदेशकासारखा असून भागत नाहीं. केवळ 'सांगेन गोष्टी युक्तीच्या चार' अशीहि त्यांची भूमिका असून भागत नाहीं. एक तर निर्णय द्यावयाचा व तो मान्य करावयाचा याचा अर्थ सर्वप्रभुत्वपूर्ण राष्ट्रानें आपल्या प्रभुत्व-पूर्णतेला थोडा तरी आळा घातला पाहिजे, व्यक्ति ज्याप्रमाणें समाजांत येतांच स्वातंत्र्याला आळा घालते अगर त्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा बसते, त्याप्रमाणें स्वतंत्र राष्ट्र, नियामकी अशा जागतिक संघटनेंत येतांच त्यांना आपल्या स्वातंत्र्यावर थोडा आळा घातला पाहिजे, थोडी मर्यादा स्वीकारली पाहिजे. जागतिक संघटन हें तेव्हांच सार्वभौम व प्रभावी होऊं शकतें, जेव्हां त्या संघटनेंतील प्रत्येक स्वतंत्र राज्य आपल्या प्रभुत्वाचा थोडा थोडा हिस्सा बहाल करतें. मध्ययुगीन राज्यस्वातंत्र्याची कल्पना कधींच नामशेष झाली आहे. एकोणीसाव्या शतकांतील राज्यस्वातंत्र्याची कल्पना अपुरी व अप्रस्तुत आहे. आजच्या जगांत कुठल्याहि राज्याचें स्वातंत्र्य अर्थपूर्ण व्हावयाचें असेल तर त्यानें आपल्या स्वातंत्र्यावर थोडी तरी मर्यादा मान्य केली पाहिजे व कांहीं तरी जागतिक शासन मानलें पाहिजे, जर एखादें राष्ट्र आज मी कोणाचें मानणार नाहीं, जगांतील सर्वसंमत अधिनायकी संघटनेला जुमानणार नाहीं, असें म्हणूं लागेल तर त्याला कठीण भविष्याला तोंड द्यावें लागेल. आज दक्षिण आफ्रिकेच्या राज्याची हीच परिस्थिति आहे. आज कुठलेंहि स्वतंत्र राज्य प्रतिष्ठेचा सवाल उत्पन्न करून आग्रही वृत्तीनें वागूं लागेल तर त्याचें तें करणें अदूरदृष्टीचें ठरतें. व्यक्तीव्यक्तींत न्याय देण्याची व्यवस्था राज्याची. राज्याराज्यांतील न्याय देण्याची जबाबदारी आजच्या जगांत आंतरराष्ट्रीय संघटनेवर आहे. संयुक्त राष्ट्रसंघ अगर हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालय या संस्था आजच्या जगांत प्रमुख मानल्या जात आहेत, संतापानें अगर शक्तीच्या जोरावर कोणी आग्रह चालवूं म्हणेल तर तें जमणार नाहीं, उपस्थित झालेले प्रश्न युक्तिवाद करून, विचारविनिमय करून सोडविले पाहिजेत. तलवारीला तलवार भिडवून तरी प्रश्न सोडविले पाहिजेत किंवा युक्तिवाद घडवून प्रश्न सोडविले पाहिजेत. युक्तीचा (रिझन्स) स्वीकार करून, विवेकबुद्धीला कौल लावून, प्रश्न सोडविणें हें स्वातंत्र्याचें लक्षण आहे. दोन्ही पक्षकार पूर्णपणें स्वतंत्र आहेत व म्हणूनच त्यांनीं शस्त्राला हात न घालतां शास्त्रावर हात ठेवून युक्तिवाद केला पाहिजे. जर प्रत्येक राज्य आपल्या स्वातंत्र्याच्या पूर्णतेबाबत आग्रह धरूं लागलें आणि जागतिक लोकमताला मानणार नाहीं असें म्हणूं लागलें तर जगांत शांतता राहणार नाहीं व पूर्ण स्वातंत्र्यवादी राष्ट्रहि आपलें स्वातंत्र्य फार काळ टिकवूं शकणार नाहीं. आजकालच्या जगांत यापुढें

निदान शस्त्रास्त्राच्या जोरावर कोणी आपला हेका चालवूं म्हणेल तर अन्य राष्ट्रें चालवूं देणार नाहींत. सुवेझच्या प्रश्नांत अमेरिका व रशिया यांचा प्रत्यक्ष संबंध नव्हता, पण रशिया व अमेरिका यांनीं या प्रश्नाबाबत जे अभिप्राय व्यक्त केले त्यामुळें सुवेझचा प्रश्न तडजोडीनें मिटला, युद्धानें नव्हे. आफ्रिका खंडांत आज जें वसाहतवादाचें महानिर्वाण होत आहे, त्यालाहि कारण जागतिक मत हेंच आहे. इंग्लंड आज आफ्रिकेंतल्या वसाहतीला स्वातंत्र्य देत आहे. बेल्जम आज कांगोला स्वातंत्र्य देत आहे, फ्रेंच राष्ट्र आज आपल्या वसाहतींना स्वायत्तता बहाल करीत आहे. या सर्व घटनांचा अर्थ हाच कीं, हीं राज्यें व त्यांचे अंकित प्रदेश यांचें भांडण जगाच्या चर्चेचा विषय बनले. गांवांत भांडण झालें म्हणजे पाटील भांडणाऱ्या व्यक्तींना चावडींत बोलावतो व तंटा तोडत असतो. तीच परिस्थिति आज दोन राष्ट्रांच्या भांडणांत जागतिक लोकमतानें अगर आंतरराष्ट्रीय राष्ट्रसंघानें त्या भांडणाची दखल घेतली म्हणजे निर्माण होते. केवळ शक्तीच्या व भावनेच्या जोरावर कोणी जागतिक प्रश्न सोडवूं म्हटल्यास न्यायदृष्ट्या तो सोडविला जाणार नाहीं. जो विजयी होईल तो माजेल व जो पराभूत होईल तो सूड घेईल. यापेक्षां विवेकानें, विचारविनिमयानें, युक्तिवादानें प्रश्न सोडविणें हें जागतिक शांततेच्या दृष्टीनें, संबंधित राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीनें इष्ट ठरतें.

राज्यांत संघर्ष निर्माण झाल्यास तो विवेकानें व युक्तिवादानें टाळला पाहिजे व तडजोड घडवून आणली पाहिजे हें जसें इष्ट, तसेंच आंतरराष्ट्रीय जगांतील तंटे तडजोडीनें मिटले पाहिजेत. जर आंतरराष्ट्रीय जगांत तडजोडीनें तंटे न मिटले तर संघर्ष अगर समर अटळ आणि मग तो संघर्ष मर्यादित राहील असें शक्य नाहीं. कोठल्या क्षणीं राष्ट्रांतील तंटा जागतिक स्वरूप धारण करील हें कोणी सांगूं शकत नाहीं. आणि तडजोडीनें न मिटल्यास समरप्रसंग अटळ आहे असें वाटूं लागलें म्हणजे संबंधित राष्ट्रांचीं मनें भीतिग्रस्त होतात आणि मग गटबाजी सुरू होते ( अलायन्स ). संरक्षणाबाबत नाना तऱ्हेचे करारमदार होतात व जगभर भीतीचें व अनिश्चिततेचें वातावरण सुरू होतें व प्रत्यक्ष युद्ध जरी सुरू झालें नाहीं तरी युद्धाचें वातावरण सुरू होतें. घरांत साप आहे याची जाणीव असल्यानंतर मालकास झोंप येत नाहीं व तो जसा चिंताग्रस्त असतो त्याप्रमाणें जगाची स्थिति असते. आपल्या स्वातंत्र्याच्या दुराभिमानामुळें आपल्या राष्ट्रीय भावनेच्या अमर्याद आविष्कारामुळें राष्ट्रावरच आपत्ति येते असें नव्हे, तर सबंध जगावर आपत्ति येते. म्हणून हें सर्व टाळावयाचें तर आंतरराष्ट्रीय दृष्टीनें व आंतरराष्ट्रीय जगांत कुठल्याहि राष्ट्राला आपल्या स्वातंत्र्याचा अमर्याद अर्थ लावून देणें हें जगाला धोकादायक ठरतें. सामान्य व्यवहारांत कुठलेंहि राज्य आपल्या नागरिकाला स्वतःचा कायदा स्वतःसाठीं करण्यांत परवानगी देत नाहीं. राष्ट्राचा कायदा त्या व्यक्तीनें मानलाच पाहिजे असा आग्रह धरतें, त्याप्रमाणें आंतरराष्ट्रीय जगांत कुठल्याहि एका राष्ट्रराज्याला स्वतःपुरता कायदा करून देणें हें शांततेच्या दृष्टीनें धोक्याचें आहे. राष्ट्रराज्याच्या स्वातंत्र्याच्य

मर्यादा आंतरराष्ट्रीय दृष्ट्या अमर्याद ठेवल्या तर जगांत शांतता व सुख नांदणार नाहीं. म्हणून आंतरराष्ट्रीय दृष्ट्या राज्याचें स्वातंत्र्य म्हणजे जेवढें तें जगाच्या व्यापक हिताला अनुसरून असेल तेवढेंच तें मानलें पाहिजे. जगामध्यें राष्ट्राराष्ट्रांत चांगले संबंध राहावे या दृष्टीनें वरील सिद्धान्त मान्य होणें इष्ट आहे. राष्ट्रांत व्यक्तीनें राज्याचा कायदा अमान्य केल्यास राज्याला त्याच्याविरुद्ध दंडव्यवस्था अंमलांत आणतां येते. आंतरराष्ट्रीय जगांतील जागतिक लोकमताला मानलें नाहीं अगर नियामक अशा जागतिक संस्थेचे निर्णय मानले नाहीं तर तेथें कांहीं दंडव्यवस्था नाहीं. तथापि, गेल्या महायुद्धा–पासून अशी कांहीं व्यवस्था असावी याला मान्यता मिळाली आहे. पण प्रत्यक्ष असें मोठें लष्कर राष्ट्रसंघाजवळ नाहीं. तथापि, कोरियाच्या युद्धांत राष्ट्रसंघां-तील राष्ट्रांनीं राष्ट्रसंघाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठीं मदत केली व राष्ट्रसंघाचें सैन्य अशी एक व्यवस्था अस्तित्वांत आली. इतकेंच नव्हे तर तंटा निर्णयासाठीं राष्ट्रसंघापुढें आल्याबरोबर युद्धतहकुबी करावयाची व निकाल होईपर्यंत यु. एन्. ओ. नें शांततेचें रक्षण करावयाचें हीहि प्रथा सुरू झाली आहे. व्हिएटनाममध्यें व इजिप्त – इस्त्राइलच्या सीमाभागांत राष्ट्रसंघानें याच दृष्टीनें वर्तन केलें. तथापि, खरोखरच दोन मोठ्या राष्ट्रांत सरळ युद्ध सुरू झाल्यास यु. एन्. ओ. कांहीं प्रभावीपणें करूं शकेल याचा विश्वास अजून जगाला वाटत नाहीं. युद्ध टाळावें यांत मतभेद नसतो, तथापि सर्व सरकारांना आपापल्या राज्यांतील लोकमताला संपूर्णपणें ताब्यांत ठेवतां येतेंच असा अनुभव नाहीं. प्रत्येक राज्यांत अतिरेकी व माथेफिरू व्यक्ति व पक्ष असतात व अनेक वेळां विद्यमान सरकार सत्ता राखण्याच्या प्रलोभनानें अविवेकी गोष्ट करतें व परिणाम जगाच्या शांततेच्या दृष्टीनें वाईट होतात. कित्येक लोक अद्यापि युद्ध ही एक जीवनविषयक अपरिहार्य गोष्ट आहे असें मानतात. युद्ध हा सृष्टीचा सिद्धान्त मानतात. त्याची अपरिहार्यता स्वाभाविक आहे. आणि सृष्टीच्या व्यवस्थेंत युद्धाचें स्थान निश्चित आहे, असाहि वेदान्त सांगतात. कित्येक जण युद्ध म्हणजे राष्ट्राचा निश्चय, त्याची पराक्रमबुद्धि दाखविण्याचें एक साधन मानतात. आतां युद्धें दूरवर व त्याच्या वार्ता रम्य, असें राहिलें नाहीं. आधुनिक युद्ध म्हणजे सर्व राष्ट्रचें राष्ट्र युद्धभूमि बनतें. शेतांत नांगरणारा शेतकरी, कारखान्यांत यंत्रें चालविणारा मजूर, शाळेंत इतिहास–भूगोल शिकविणारा शिक्षक हे सर्व शिपाई समजले जातात व कोणीहि तोफेच्या गोळ्यापासून, बॉम्बच्या हल्ल्या-पासून, सुरक्षित राहात नाहीं. आधुनिक युद्ध म्हणजे सबंध राष्ट्र त्यांत युद्धाच्या पवित्र्यांत उभें राहतें. सर्व राष्ट्र युद्धकाळांत सर्व दृष्टीनें संघटित होतें. एरवीं भूषण वाटणारीं नागरिक-स्वातंत्र्यें युद्धाच्या जयाच्या मार्गांत अडथळे वाटतात व म्हणून युद्धांतील तोफेचा पहिला गोळा सुटतांच नागरिकस्वातंत्र्यें हादरतात. राज्य मग युद्धांत विजय मिळविण्यासाठीं या सर्व स्वातंत्र्यांना बंदिस्त करतें. युद्ध सुरू होतांच याप्रमाणें स्वातंत्र्य संपतें. तथापि, युद्धकाळांत जरी सर्व राष्ट्र युद्धभूमि होतें, सर्व त्यांत लढवय्ये होतात, तरी त्यापूर्वी

युद्धाची तयारी होत असतांना व युद्धाची घोषणा होईपर्यंत सामान्यपणें लोकांना आपलीं मतें बोलून दाखविण्याचें स्वातंत्र्य असतें. आणि युद्धाच्या पूर्वीच्या या काळांत लोकमत जागृत नसेल तर सत्ताधीश व त्यांना साथ देणारे वर्ग व व्यक्ति आपल्या स्वार्थाच्या दृष्टीनें युद्धाच्या प्रश्नाचा विचार करीत असतात. एकदां युद्ध सुरू झालें म्हणजे विचारविनिमय, तडजोड हीं अशक्य होतात. कांहीं काळ युद्ध झालें त्याचा कांहीं परिणाम दोन्ही पक्षांनीं भोगल्यानंतर थोडा विवेक जागृत होतो. तथापि, जो महत्त्वाचा काळ असतो तो युद्ध सुरू होण्यापूर्वीचा होय, आणि त्या काळांत बहुसंख्याक लोकांनीं राज्यसत्तेवर विवेकाचा प्रभाव न टाकला तर मग जे वर्ग सत्ताधीश असतात ते त्या बिकट परिस्थितीचा फायदा घेऊन राजकारण खेळत असतात. पक्षनिष्ठ राजकारण खेळत असतात. आणि त्यांचा खेळ होतो, पण तळ्यांतील बेडकांप्रमाणें सामान्यजनांच्या प्राणांचा निकाल लागत असतो. सत्ताधीशांच्या हातांत मग अगदीं खऱ्या खऱ्या अर्थानें अगदीं पूर्ण सत्ता आलेली असते व त्यांच्या सत्तेवर तावडतोब क्रान्ति न झाल्यास कोणतीहि मर्यादा राहत नाहीं. व हे वर्ग म्हणजे राष्ट्र असें गणित असल्याकारणानें राज्याचें स्वातंत्र्य हें मग एक त्यांच्या मनाप्रमाणें स्वैराचाराचें साधन ठरतें व देशाचा नाश, देशांतील संस्कृतीचा व सभ्यतेचा नाश याला हे वर्ग कारणीभूत होतात. देशावरील आपत्तीचे व संकटाचे हे वर्ग शिल्पकार ठरतात. या दृष्टीनें विचार करतांना आंतरराष्ट्रीय जगांतील व्यवहारांत राज्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा असणें इष्ट आहे. अन्याय होत असतांना व्यक्ति उदासीन राहिली, भीतीमुळें गट स्तब्ध राहिले, विरोधी पक्ष त्याग करण्यास कचरला म्हणजे सर्वांचा परिणाम विद्यमान राज्यसत्ता युद्धापूर्वीच्या काळांत बेफाम होते व मग जगाची शांतताहि धोक्यांत येते. खिळ्यापायीं नाल गेला, नालापायीं घोडा गेला व घोड्यापायीं स्वार गेला, अशी परिणामांची सांखळी निर्माण होते.

समाज झाला काय किंवा राष्ट्र झालें काय, या दोहोंची वृत्ति व स्वरूप त्यांतील घटकांच्या म्हणजे नागरिकांच्या वृत्तीवर अवलंबून असतें. व्यक्तीव्यक्तींतील व्यवहार व राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहार या दोन्हीमध्यें साम्य असतें. राज्यामध्यें असे अनेक हितसंबंध असतात व त्यांच्या त्यांच्या संदर्भात व्यक्तीव्यक्तीमधील, व्यक्ति व संघ यांमधील, व्यक्ति व राज्य यांमधील वार्ता आकार घेत असतात. आपल्याला सुख व्हावें, आनंद व्हावा, मनोरंजन व्हावें, या दृष्टीनें माणसें एकत्र येतात, संघ बनतात, किंबहुना राज्याच्या संबंधांतसुद्धां हा सुखाचा भाव स्पष्ट असतो. म्हणून व्यक्तीव्यक्तींच्या वागणुकींत जीं नीतितत्त्वें समाज पाहूं इच्छितो तींच नीतितत्त्वें बहुशः राष्ट्राराष्ट्रांच्या संबंधांत पाहिलीं जातात. मजूरसंघानें कसें वागावें व मजूरसंघाचा संबंध राज्याशीं कसा असावा, याबाबत समाजांत प्रदर्शित केले जाणारे विचार आंतरराष्ट्रीय जगांत विविध राष्ट्रांनीं एकमेकांशीं कसें वागावें यासंबंधींच्या विचारांशीं सुसंगत असतात. सामान्यपणें व्यक्तीला न

विचारतां, न जुमानतां त्याचा अभिप्राय न समजून घेतां एखादा निर्णय लादल्यास त्याचा ती व्यक्ति विरोध करते. निषेध करते. राज्यांतील विविध संस्थांना अगर संघांना त्यांचा अभिप्राय न विचारतां, त्यांना आपलें म्हणणें मांडण्याची संधी न देतां, राज्यानें कांहीं निर्णय घेतल्यास ते तो निमूटपणें मानत नाहीं. निषेध करतात, विरोध करतात. त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय जगांतहि कोणी कोणाविरुद्ध निर्णय घेतल्यास व तो निर्णय घेण्याच्या कामीं विचारविनिमय न केल्यास तेथेंहि विरोध होतो. तात्पर्य, व्यक्तीच्या ज्या भावना असतात त्याच जातीच्या व त्याच स्वरूपाच्या भावना व्यक्तीनें बनलेल्या समाजांत अगर राष्ट्रांत असतात. अनेक दाण्यांनीं सज्ज झालेल्या कणसाची गोडी त्यांतील प्रत्येक दाण्यावर अवलंबून असते. कस्तुरीचा गोळा घेतला तर त्याचा सुवास व त्याच्यांतील एखादा कण बाजूला काढून त्याचा सुवास या दोहोंत प्रतीनें फरक नसतो. प्रमाणांत जरूर असतो. म्हणून आंतरराष्ट्रीय जगांत एखादी व्यवस्था करण्यापूर्वी व्यवस्थेच्या परिणामाशीं संबंधित असलेल्या सर्व राष्ट्रांचा विचार घेतला पाहिजे. व्हर्सायच्या राजप्रासादांत बसून १९२० सालीं युरोप व आफ्रिका यांतील प्रदेशांची जी वांटणी केली, त्यांतून संतोष व समाधानाऐवजीं भावी अनर्थांचीं बीजेंच रोंवण्यांत आलीं. जी गोष्ट व्यक्ति मान्य करणार नाहीं ती गोष्ट समष्टि अगर समाज मान्य करणार नाहीं हें उघड आहे. म्हणून व्यक्तीची संमति असली म्हणजे राज्यकारभार सुखी असतो. तेथें शांतता असते; त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय जगांत व्यक्तिगत राष्ट्राची संमति असेल तरच खरी शांततेची व्यवस्था टिकाऊ होईल. आज राष्ट्रसंघांत चर्चा होते, विचारविनिमय होतो व कुठल्याहि एका राज्याला निकालांत लावण्याचा अगर नष्ट करण्याचा प्रयत्न होत नाहीं ही चांगली गोष्ट आहे. व्यक्ति समाजांत आली म्हणजे तिच्या विकासाला अनुकूल असें वातावरण तिला भेटतें. त्याप्रमाणें राष्ट्र–राज्य हें व्यापक जागतिक संघटनेंत आल्यानें त्याच्या विकासाला अधिक वाव मिळतो. त्याचें कर्तृत्व उत्साही बनतें आणि जागतिक संघटनेंत येण्यानें थोडी स्वातंत्र्यावर मर्यादा बसतें हें निश्चित असलें तरी त्याच मर्यादेमुळें राष्ट्र–राज्याचें स्वातंत्र्य अधिक सुरक्षित असतें. गांवांत पोलीसचौकीच नसली म्हणजे भांडण उपस्थित झाल्यास त्याचा निकाल डोकीं फोडण्यांत होतो. पण गांवांत पोलीस-चौकी आहे याची जाणीव असली म्हणजे तंटा उपस्थित होतांच कोणी तरी एक चौकीकडे धांव घेतो. चौकी असल्यामुळें आपल्यावर सहसा कोणी हल्ला करणार नाहीं असा विश्वास वाटत असतो. तीच गोष्ट जागतिक संघटन असलें म्हणजे अनुभवाला येते. राष्ट्रसंघाच्या अस्तित्वामुळें विद्यमान असलेलीं राष्ट्रराज्यें सुरक्षित आहेत व जसजसें सहकार्य जागतिक संघटनेच्या द्वारा वाढत जाईल, तसतशी व्यक्तिगत राज्यांची सुरक्षितता दृढ होत जाईल. प्रगतीला अधिक वेग मिळेल. आंतरराष्ट्रीय नियंत्रणानें राष्ट्रांतील परस्पर संबंधांत अधिक नैतिकता येते व तशीच व्यवहारांतहि अधिक उपयुक्तता येते. जो

अनुभव व्यक्तिगत जीवनांत येत असतो, तोच अनुभव व्यापक अशा आंतरराष्ट्रीय जीवनांत राष्ट्र–राज्यांना येत असतो. व्यक्ति समाजांत आहे म्हणून तिला वाटेल तें करण्याचा अधिकार पोंचत नाहीं. समाजाच्या दृष्टीनें कांहीं मर्यादा घालाव्या लागतात. त्याप्रमाणें जगांत राष्ट्रराज्य जन्माला आलें एवढ्यानें त्याला अमर्याद सत्ता प्राप्त होते असें नाहीं. त्याच्या स्वातंत्र्यावर व सत्तेवरहि मर्यादा बसतात व त्या मर्यादा मानणें हिताचें ठरतें. समाजांत भलेंहि राज्याचें ऐकलें जाईल, त्याचे आदेश व आज्ञा शिरसावंद्य ठरतील. पण आंतरराष्ट्रीय जगांत तसली आज्ञाबाजी अगर हुकूमशाही चालणार नाहीं. समाजांत-सुद्धां प्राप्त झालेली सत्ता बिनशर्त नसते. कागदावर संपूर्ण असली तरी, संविधानांत बिनशर्त असली तरी, अध्याहृत मर्यादा त्यामध्यें असतात. त्यांचें उल्लंघन कोणी सत्ताधीश सहसा करीत नाहीं. कारण, तसें उल्लंघन केल्यास सत्तेपासून उच्चाटन हें अनिवार्य याची जाणीव असते व अशा मर्यादा आहेत म्हणून कुठलीहि सत्ता स्वतःला अपमानित समजत नाहीं. त्याप्रमाणें राष्ट्रराज्यानें जगाच्या राजरस्त्यावरून जातांना सर्वांबरोबर कांहीं मर्यादा पाळाव्या लागतात. त्यांत अपमान झाला असें मानण्याचें कारण नाहीं.

आंतरराष्ट्रीय जगांत थोडासा नियमनाचा हेतु लक्षांत ठेवून अस्तित्वांत आलेलें संघटन म्हणजे लीग ऑफ नेशन्स होय. १९२० पासून १९३९ पर्यंत म्हणजे दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत लीग ऑफ नेशन्स कांहीं नियमन करीत होती. तिचाच एक भाग आय. एल्. ओ. म्हणजे आंतरराष्ट्रीय मजदूर संघटन. यानें मजूर-विषयक क्षेत्रांत पुष्कळच काम केलें आहे. तथापि, व्यक्तिगत राष्ट्रराज्यांच्या स्वातंत्र्यावर प्रभावीपणें मर्यादा घालण्याच्या कामीं लीग ऑफ नेशन्स यशस्वी झाली नाहीं. मांचुरियावर जपानचा हल्ला ती थांबवूं शकली नाहीं. ॲबिसिनियावरील अत्याचार तिला डोळे मिटून पाहावा लागला. तथापि, जागतिक नियमनाच्या दृष्टीनें एक पुढचें पाऊल लीग होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. अनेक प्रसंगीं लीगनें कांहीं चांगले निर्णय घेतले. अनेक आंतरराष्ट्रीय तंट्यांत उभय पक्षकारांना मान्य होईल असेहि निकाल दिले. तथापि, जें घडत होतें त्याला धैर्यानें ती तोंड देऊं शकली नाहीं आणि त्याचें कारण लीगजवळ दंडविषयक योजना (सँक्शन) नव्हती. लहान राष्ट्रांच्या प्रश्नांत ती जोरानें बोले, पण जेव्हां मोठ्या राष्ट्रांत कलह उत्पन्न होई त्यावेळीं लीगचे प्रणेते व मार्गदर्शक कांहीं करीत नसत. कारण त्यांना खात्री होती कीं, आपला निर्णय मान्य केला जाणार नाहीं व मग या १९–२० वर्षांच्या काळांत कांहीं ठिकाणीं ती गप्प बसली, कांहीं ठिकाणीं तिनें डोळे-झांक केली, कांहीं ठिकाणीं तत्त्वभ्रष्टता दाखवली. तिच्या संघटनेंत मोठ्या राष्ट्रांचा प्रभाव अधिक होता आणि त्यामुळें जगांत शांतता राखण्यासाठीं निर्माण झालेलें लीगचें संघटन दुसऱ्या महायुद्धाला अवश्य तें वातावरण उत्पन्न करण्याचें कारण बनलें. दोन युद्धांतील शांतता दुसऱ्या युद्धाच्या पूर्वीचें उद्योगपर्व ठरलें. शस्त्रास्त्रांचे

प्राथमिक प्रयोग निरनिराळ्या राष्ट्रांनीं निरनिराळ्या क्षेत्रांत केले. आपले शत्रु कोण हें या काळांत मोठमोठ्या राष्ट्रांनीं निश्चित करून ठेवलें व येणाऱ्या युद्धाची कुंडली मांडली व शांतता जगामध्यें राहणें कठीण करून युद्ध अटळ केलें. तीनचारशें वर्षांच्या प्रयत्नांनीं थोडीशी मर्यादा लीग ऑफ नेशन्सला मान्यता देऊन जगांतील स्वतंत्र राष्ट्रांनीं आपल्या स्वातंत्र्यावर थोडी मर्यादा स्वीकारली होती. तथापि, लीगचा जन्म शांततेच्या मुळावर आला असेंच म्हटलें पाहिजे. युद्ध बंद झालें होतें, पण मनामधील द्वेष व संताप थंड झाला नव्हता व त्यामुळें जेत्या राष्ट्रांत एक सूडाची भावना उत्पन्न झाली होती व जित राष्ट्रांत ती उत्पन्न होत होती. या परिस्थितींत लीगचा अधिकार व जो केवळ नैतिक होता, त्यालाहि कोणीं फारसें मानलें नाहीं. जगांतील राष्ट्रांमध्यें असे अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्न होते कीं, ज्यांवर मतैक्य होणें अशक्य नव्हतें व ज्या क्षेत्रांत साधारणपणें हितैक्यहि दिसून येत होतें, त्या क्षेत्रांत कांहीं प्रयत्न लीगनें केले ही गोष्ट खरी आहे. दुसरें, लीग ही एक जगापुढें आपलें म्हणणें मांडण्याची, वादविवादाची चावडी झाली व अनेक प्रसंगीं लोकमताचा दाब प्रभावी ठरला. तथापि लीगच्यामागें मोठाल्या राष्ट्रांची खरी संमति नव्हती. उलट, लीगचा उपयोग त्यांनीं विद्यमान अन्याय कायम ठेवण्यासाठीं केला. ज्या राष्ट्राचा पराभव झाला त्या राष्ट्राचा मुलूख ओलीस म्हणून घेण्यांत आला. त्याच्या वसाहती जेते राष्ट्रांना तेथील जनतेचें पालन करण्यासाठीं देण्यांत आल्या. सद्‌भावनेचें प्रदर्शन लीगच्या प्रत्येक सभेंत होई, पण सद्भावनेच्या पलीकडे प्रत्यक्ष कार्यरूपानें फारसें पाऊल पुढें पडलें नाहीं. एक विचार मात्र आंतरराष्ट्रीय जगाच्या राजकारणांत मूळ धरूं लागला व तो म्हणजे विविध आदर्श असूनसुद्धां अनेक राष्ट्रें मनांत आणलें तर चांगल्या कार्यासाठीं एकत्र येऊं शकतात व सहकार्यानें कांहीं क्षेत्रांत तरी आंतरराष्ट्रीय नियमन रचू शकतात हा होय. आंतरराष्ट्रीय सरकार असें जरी कांहीं त्यावेळीं निर्माण झालें नाहीं तरी आंतरराष्ट्रीय कारभार करण्यासाठीं मोठें क्षेत्र आहे व यशाची शक्यता आहे, एवढें लीगमुळें दीर्घ दृष्टीच्या मुत्सद्द्यांनीं लक्षांत घेतलें.

लीगपासून ज्या अपेक्षा अनेकांनीं बाळगल्या होत्या त्या जरी फळाला आल्या नाहींत, तरी आंतरराष्ट्रीय संबंधांत जागतिक शांततेच्या दृष्टीनें व जागतिक व्यवस्थेच्या दृष्टीनें पुढें पाऊल पडलें हें निश्चित. बहुजनसमाजाला खरें स्वातंत्र्य लाभावयाचें तर देशांतील आर्थिक रचना भांडवलशाही स्वरूपाची असून चालणार नाहीं, विभाजनव्यवस्था न्यायाची असली पाहिजे व प्रत्येक व्यक्तीला स्वाभिमानानें जीवन जगण्याचा हक्क आहे, या गोष्टी मौलिक स्वरूपाच्या मानल्या जाऊं लागल्या व देशांतील अंतर्गत भांडवलशाही ही जगांतल्या भांडवलशाही व्यवस्थेनें पोसली जाते, हा सिद्धान्तहि अधिक प्रभावीपणें पहिल्या महायुद्धानंतर लोकांपुढें आला होता. देशांतील भांडवलवाले देशाबाहेरच्या क्षेत्रांत पाय पसरतात व त्यांना योग्य नफा त्यांच्या उत्पादनव्यवस्थेत

मिळावा यासाठीं देशाची शक्ति व प्रतिष्ठा पणाला लावली जाते व प्रसंगीं या मूठभर लोकांच्या फायद्यासाठीं राष्ट्राला युद्धांत पडावें लागतें. या दृष्टीनें जर जगामध्यें कांहीं सार्वभौमस्वरूपी, अधिनायकीस्वरूपी नियमन अंमलांत येईल तर तें इष्ट, असें लोकांना वाटूं लागलें होतें व त्यांतूनच लीग निर्माण झाली. लीगच्या हयातींत जगामध्यें सर्वव्यापी असें जागतिक राज्य असावें असे विचार अनेकांनीं मांडले. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीला उभा राहिलेला उमेदवार विल्की यानें तर एक जग या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला होता. जगांत एकराज्य ही कल्पना, केवळ कल्पना न राहतां एक विद्यमान चर्चेचा विषय दहा वर्षांपूर्वी झाला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपूर्वी लीगनें आपलें धोरण खंबीर ठेवलें असतें तर कदाचित् जागतिक एकराज्याच्या कल्पनेला अधिक स्पष्ट आकार आला असता. दुसऱ्या महायुद्धानंतर हीच कल्पना थोड्या निराळ्या स्वरूपांत लोकांपुढें वावरत आहे. जगामध्यें शांतता राहावी, सुव्यवस्था राहावी, जगाची आर्थिक व सांस्कृतिक उन्नति व्हावी या दृष्टीनें नियमन करणारी व्यवस्था असल्यास चांगलें असें लोकांना पटलें आहे. राष्ट्रांत जशी आर्थिक विषमता वाईट व अन्यायकारक, त्याप्रमाणें आंतरराष्ट्रीय जगांत आर्थिक दृष्ट्या कांहीं राष्ट्रें संपन्न; तर कांहीं राष्ट्रें विपन्न, कांहीं श्रीमान्; तर कांहीं दरिद्री, हें विरोधी चित्र शांततेला पोषक नसतें. जगामध्यें अनिर्बंध स्वातंत्र्य असावें हा विचार अमेरिकन अध्यक्ष रुझवेल्ट यांनीं हिरीरीनें मांडला होता. जनतेला विवंचना नसावी. भीति नसावी. उन्नतीचें स्वातंत्र्य असावें. नागरिक स्वातंत्र्य असावें. इत्यादि गोष्टींबाबत महायुद्धांत गुंतलेल्या हिटलरविरोधी राष्ट्रांत मतैक्य होतें आणि या मतैक्यांतूनच राष्ट्रसंघाचा (यु. एन्. ओ.) उदय झाला. यु. एन्. ओ. ची सनद एका दृष्टीनें जागतिक एकराज्य असावें या तत्त्वज्ञानांतील प्रागतिक विचारांची निदर्शक आहे. यु. एन्. ओ. च्या घटनेंत सर्व जगाची एक पार्लमेंट या कल्पनेचें बीज आहे. राष्ट्राराष्ट्रांतील तंट्याची दखल राष्ट्रसंघ घेतो. त्यावर चर्चा होते. निर्णय घेतले जातात. तावडतोबीचे प्रश्नसुद्धां सोडविण्याच्या दृष्टीनें सिक्युरटी कौन्सिल जें कार्य करतें तें थोडेंसें राज्यांतील कार्यकारी सत्तेच्या स्वरूपाचें असतें. यु. एन्. ओ. च्या संघटनेनें गेल्या चौदा वर्षांत अनेक महायुद्धाचे प्रसंग—निदान युद्धाचे प्रसंग—तरी टाळले आहेत व युद्ध सुरू होऊं नये, म्हणून युद्धाचीं कारणें कमी करण्याकडे ही संघटना सतत प्रयत्न करीत असते. जागृत असते. ही संघटना आहे म्हणून कुठल्याहि स्वतंत्र राष्ट्राला आपलें स्वातंत्र्य कमी झालें आहे असें वाटत नाहीं. यु. एन्. ओ. शीं संलग्न असलेलें आय. एल्. ओ. हें मजूरसंघटन अजूनहि मजुरांच्यासंबंधीं आंतरराष्ट्रीय दृष्ट्या प्रभावी आहे. या संघटनेनें जें कांहीं मान्य केलें असेल तें त्या संघटनेच्या सभासद राष्ट्रांनीं मान्य करण्याचें नैतिक बंधन आहे, व सामान्यपणें तें मान्य केलेंहि जातें. यु. एन्. ओ. च्या राष्ट्रसंघाच्या निकालाबाबत आतां केवळ नैतिक बंधन आहे अशी स्थिति

राहिली नाहीं. दंडव्यवस्थेची कायदेशीर योजना केली असून मागें सांगितल्याप्रमाणें राष्ट्रसंघ ही आपली दंडव्यवस्था योग्य प्रसंगीं अंमलांत आणूं लागली आहे. राष्ट्रसंघांत झालेल्या निर्णयानें व त्याचें पालन करण्याच्या परंपरेनें कुठल्याहि राष्ट्राच्या स्वातंत्र्याला कमीपणा येतो असें आतां वाटत नाहीं. राष्ट्रसंघ ही व्यक्तिगत राष्ट्राच्या संरक्षणाच्या दृष्टीनें लीगपेक्षांहि अधिक प्रभावी शक्ति ठरली आहे. राष्ट्राच्या सीमा राष्ट्रसंघांत दाद मिळत असल्यानें अधिक सुरक्षित आहेत. चीन हा जर राष्ट्रसंघाचा सभासद असता तर आजचा सीमावाद उत्पन्न झाला नसता, किंवा फार लवकर मिटला असता. राष्ट्रसंघाच्या नियमनानें अगर नियंत्रणानें कुठल्याहि राज्याच्या पार्लमेंटच्या सार्वभौमत्वावर आक्रमण झालें असें कोणाला वाटत नाहीं. याच्या उलट राष्ट्रसंघ स्थापन झाल्यापासून कोट्यवधि लोक व लक्षावधि मैलांचा प्रदेश परदास्यांतून मुक्त झाला आहे व मुक्त होऊन स्वतंत्र झालेले प्रदेश स्वतंत्र राज्यें या स्वरूपांत राष्ट्रसंघाचे सभासद झाले आहेत व सभासद होऊन त्यांनीं आपापल्या स्वातंत्र्याचा जणूं कांहीं विमाच उतरला आहे असें दिसून येतें. राष्ट्रसंघ झाला म्हणून कुठल्याहि राष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनांत जबरदस्तीनें फरक घडून आणला गेला नाहीं. उलट, शिक्षण, व्यापार, संस्कृति इत्यादि क्षेत्रांत राष्ट्रसंघामार्फत जी कामगिरी होत आहे ती जगाच्या ज्ञानांत भरच टाकत आहे. राष्ट्रसंघाचीच एक शाखा युनेस्को, सांस्कृतिक व कल्याणक्षेत्रांत जें काम करीत आहे तें श्रेष्ठ आहे व ह्या कार्यापासून कुठल्याहि राष्ट्रांतील जीवनावर मर्यादा आली असें कुणाला वाटत नाहीं. जगांतील धान्याचा पुरवठा व वांटणी, अपंग अर्भकें यांच्या बाबतींत कांहीं नियमन राष्ट्रसंघामार्फत केलें जात आहे, त्यायोगानें निरनिराळ्या राष्ट्रांतील जीवनाला मदतच होत आहे, हें कोणीहि मान्य करील. न्यायदानाच्या कामीं अगर नीतिविषयक बाबतींत कुठल्याहि तऱ्हेचें नियमन राष्ट्रसंघ करीत नाहीं. किंबहुना, प्रत्येक राष्ट्राचें जें कांहीं व्यक्तिगत अगर खास असें जीवनविषयक क्षेत्र असेल, त्यांत राष्ट्रसंघ अडथळा करीत नाहीं. उलट, राष्ट्रसंघाच्या कार्यानें त्याहि क्षेत्रांत मदतच होत असते. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, सामुदायिक रीतीनें जीवनांतील कांहीं क्षेत्रांतून जगभर सारखेपणा आल्यास व त्या क्षेत्रांत नियमन केल्यास राष्ट्रांची प्रगतीच होत आहे व म्हणून आंतरराष्ट्रीय नियमन हें इष्ट असें अधिकाधिक पटून येत आहे व ज्या क्षेत्रांत समानता आहे त्यांतून अधिकाधिक नियमन जागतिक व्यवस्थेनें केल्यास इष्टच ठरणार आहे. जगांतील प्रत्येक व्यक्तीला तिच्या सुखासाठीं व उन्नतीसाठीं किमान गोष्टी व सोयी मिळाल्या पाहिजेत हें मान्य केल्यानंतर तें घडून येण्यासाठीं केवळ एका राष्ट्रांत नियोजनव्यवस्था असून भागणार नाहीं, जगभर नियोजन इष्ट ठरतें, आणि जगभर नियोजन करावयाचें म्हणजे तें कार्य करण्यासाठीं जागतिक अशीच संस्था किंवा व्यवस्था असली पाहिजे व या दृष्टीनें एक जागतिक राज्य झाल्यास हवें आहे. एक जागतिक राज्य झाल्यानें जगांत एक भाषा होईल, एक धर्म होईल, सर्वत्र एकसारखेपणा येईल व जीवन अगदीं

जेलस्वरूपी, सांचीव व ठोकळेबंद होईल, असें मानण्याचें कारण नाहीं. मानव हा येथून तेथून एकच आहे. ही मौलिक एकता जागतिक एक–राज्यानें सदेह होणार आहे. प्रत्येक बाबतींत स्वायत्तता राहून व्यापक जीवनांत, विशाल जीवनांत भाग घेण्याची, समरस होण्याची या व्यवस्थेनें त्याला संधी मिळणार आहे. जागतिक व्यवस्थेंत आल्यानें स्वातंत्र्य जातें, महत्त्व कमी होतें, बंधनें निर्माण होतात हें खरें नव्हे. चित्राला चौकट असली म्हणजे ज्याप्रमाणें चित्र चांगलें दिसतें, त्यांत प्रमाणबद्धता येते, तीच गोष्ट येथें अनुभवाला येते. जगामध्यें नियमन झाल्यानें व्यक्तिगत राष्ट्राचें स्वातंत्र्य अधिक अर्थपूर्ण होतें. कारण त्या व्यवस्थेंत अधिक शाश्वती, अधिक सुरक्षितता असते. आणि राष्ट्राच्या दृष्टीनें अधिक शाश्वती, अधिक सुरक्षितता, अधिक शांति, याचा अर्थ व्यक्तीचें स्वातंत्र्य पण अधिक सार्थ व अधिक समृद्ध. व्यक्ति ही अशा रीतीनें जागतिक व्यवस्थेच्या कार्यांत प्रस्तुत ठरते व त्या व्यवस्थेनें तिची प्रगति होते ; यास्तव ती व्यवस्था आणण्यांत तिचें हित आहे व कर्तव्य पण आहे.

# : ४ :

## स्वातंत्र्य, समता व कायदा

स्वातंत्र्याच्या कल्पनेबाबत विचार करतांना असें म्हटलें आहे कीं, खरें स्वातंत्र्य समतेशिवाय अर्थशून्य आहे व स्वातंत्र्य व समता या दोहोंचा अनुभव नागरिकांना यावयाचा असेल, तर राज्याचें संघटन व संविधान हें लोकशाही आशयाचें असलें पाहिजे. पाश्चात्य देशांत ज्या वेळेला राज्यविषयक कल्पनांचा विचार लोकशाही दृष्टीनें होऊं लागला व व्यक्तिस्वातंत्र्य व राज्याचे अधिकार यांतील विरोध जाणवूं लागला, त्यावेळीं स्वातंत्र्य याबद्दलहि अनेकांना भीति वाटूं लागली व त्याचप्रमाणें समताविषयक कल्पनांबाबतहि तसेंच झालें. स्वातंत्र्य आणि समता यांचा विचार करतांना तो निरपेक्षपणें करतां येत नाहीं, हें पूर्वींच सांगितलें आहे. या परिस्थितीच्या संदर्भात कल्पना आकार घेत असतात, आभरणें घेत असतात, म्हणून स्वातंत्र्याची कल्पना काय, अगर समतेची कल्पना काय, यांचा विचार करतांना दोन्ही कल्पना निरपेक्ष नाहींत व सामाजिक संदर्भात त्यांचा विचार केला पाहिजे हें लक्षांत ठेवणें इष्ट आहे. स्वातंत्र्याची अथवा समतेची प्रवृत्ति कशी आहे, या प्रवृत्ती-वरून विचार करावयाचा असतो. स्वातंत्र्य याचा अर्थ विद्यमान परिस्थितींत व्यक्तीला स्वतःसंबंधीं निर्णय घेण्याचा हक्क. पण हा निर्णय त्यानें परिस्थिति लक्षांत घेऊन शक्यतेचा, युक्तीचा, वाजवीपणाचा विचार करून घ्यावयाचा असतो. व्यक्ति ही सामान्यतः आपल्याला सुख व्हावें, आपलें व्यक्तित्व संरक्षिलें जावें या दृष्टीनें विचार करीत असते आणि त्याच्या साध्याच्या दृष्टीनें स्वातंत्र्य हें एक साधन असतें; ध्येयाकडे नेणारा तो एक मार्ग असतो. हेतुहीन, आदर्शहीन स्वातंत्र्य असें कोणी अंगीकारीत नाहीं. चमचा हा चमचा म्हणून प्रिय नसतो अगर उपयुक्तहि नसतो, पण त्याच्या साहाय्यानें वाटींतील बासुंदी काढून घ्यावयाची असते, त्याप्रमाणें स्वातंत्र्य हें आहे. मला लिहिण्यासाठीं स्वातंत्र्य हवें आहे, बोलण्यासाठीं स्वातंत्र्य हवें आहे. कांहीं व्यक्तींना पाहावयाचें आहे, कांहीं क्षेत्रांचें दर्शन घ्यावयाचें आहे, म्हणून मला संचाराचें स्वातंत्र्य हवें आहे. ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, केवळ प्राथमिक गरजा म्हणजे अन्न, वस्त्र व

निवास या भागल्या म्हणजे मनुष्य सुखी होतो हें खरें नाहीं. हें तर सर्व हवेंच असतें, पण ह्याहिपेक्षां कांहीं अधिक हवें असतें. हें सर्व जरी त्याला विनाश्रम मिळालें तरी तो संतुष्ट नसतो. केवळ अन्नमय असें त्याचें जीवन नसतें, म्हणून कांहीं अधिक करावेंसें त्याला वाटतें. कांहीं अधिक व्हावेंसें वाटतें व तें करण्याची व तें होण्याची संधी व स्वातंत्र्य हवें असतें. त्याच्याशिवाय त्याच्या जीवनाला पूर्णता येत नाहीं. तो चालतो पण त्यांत गति नसते. तो ऐकतो पण श्रवणीय असें त्यांत कांहीं नसतें. थोडक्यांत म्हणजे, जीवनविरहित तो जगत असतो. स्वातंत्र्याप्रमाणें समता पण समाजाच्या संदर्भांत कार्यप्रवण व्हावयाची असते. आणि समता याचा अर्थ सारखेपणा नव्हे, किंवा विधिशास्त्रांतील समानताहि नव्हे; त्याचप्रमाणें केवळ न्यायभाव (इक्विटी) असाहि तिचा अर्थ नाहीं.

सर्व मनुष्यमात्रांत मानव्याच्या दृष्टीनें, अध्यात्म दृष्टीनें सारखेपणा आहे, समता आहे, इतकाच समतेचा अर्थ घेतला पाहिजे. समता म्हणजे टांकसाळींतील नाण्यांप्रमाणें तोच शिक्का, तेंच स्वरूप, तेंच वजन, तीच किंमत, इतकी समता नसते व असणेंहि शक्य नाहीं. कृत्रिम समता ही स्वातंत्र्याला पूर्ण करूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें जे अन्यायाचे कायदे आहेत, जे तरतमभाव निर्माण करणारे सामाजिक संकेत आहेत, तेहि स्वातंत्र्याशीं विसंगतच असतात. लोभ, गर्व, अहंकार यांच्यांतून सामाजिक विषमता उत्पन्न होते हें खरें; तथापि, समतेची मागणी अगर प्रवृत्ति, मत्सर, भीति अगर असूया यांतून निर्माण होते हें म्हणणें सर्वस्वीं खरें नाहीं. सृष्टीमध्यें न्याय आहे पण सर्वत्र समतेचा भाव आहे असें कोणी म्हणेल तर तें खरें नाहीं. सृष्टीमध्यें नानाविध तरु आहेत, नाना तऱ्हेचीं फळें आहेत, पुष्पें आहेत, नाना तऱ्हेचे प्रदेश उंचसखल असेहि आहेत. म्हणून सृष्टीहि समतेविरुद्ध आहे असेंहि म्हणणें बरोबर नाहीं. समता याचा अर्थ विषमतेंतून ती निर्माण होत असते व ती निर्माण करणारी कोणी तरी शक्ति त्या ठिकाणीं सूचित असते, संकल्पिलेली असते, कुठें तरी जें विषम आहे, जें अन्यायाचें आहे, तें सम व न्याय्य करण्याकडे प्रवृत्त झालेलें असतें. स्वातंत्र्य व समता यांचा समन्वय घडवून आणावयाचा असतो. मुळांत ते परस्परविरोधी भाव आहेत असें कांहींचें म्हणणें आहे तें सर्वस्वीं चूक नाहीं.

स्वातंत्र्य हें प्रगतीचें एक साधन, विकासाचा एक मार्ग, हें तत्त्व पाश्चात्य राजनीतिशास्त्रज्ञांनीं मान्य केलेलें आहे. स्वातंत्र्य हें प्रगतीचें जीवन असल्यानें त्याचा संबंध देशांतील राज्यव्यवस्थेशीं येतो हें उघड आहे आणि देशांतील राज्यव्यवस्था स्वातंत्र्याला वाव देणारी नसेल तर प्रगति होणार नाहीं असें नाहीं; पण ती प्रगति सामान्य लोकांच्या अनुभवाला येणार नाहीं व त्यांना हवी आहे तशा स्वरूपाची पण ती असणार नाहीं. अठराव्या व एकोणीसाव्या शतकांत स्वातंत्र्याच्या कल्पना पाश्चात्य राजकीय क्षेत्रांत अधिकाधिक स्पष्ट होत गेल्या आणि राज्य हें लोकांच्या सुखासाठीं

आहे हें सांगण्याची संधी त्यांना मिळाली पाहिजे. याचाच संपूर्ण अर्थ लोकमत हें राज्यकार्यांत प्रभावी झालें पाहिजे. लोकमत प्रभावी होण्याच्या दृष्टीनें लोकशाही व्यवस्था ही त्यांतल्या त्यांत श्रेष्ठ असा अनुभव आलेला आहे. लोकशाहीचा अर्थ लोकांचा राज्यकारभारावर हुकमी प्रभाव असें मानण्यास हरकत नाहीं. केवळ गरीब बहुजन-समाजाबद्दल सहानुभूति असा त्याचा अर्थ नाहीं. लोकशाही म्हणजे एक जीवनदृष्टि हाहि अर्थ पुरेसा नाहीं. लोकशाही याचा अर्थ केवळ राजकीय क्षेत्रांत लोकांचा परिणाम-कारक स्वभाव एवढाहि संकुचित अर्थ नाहीं. लोकशाही याचा अर्थ राज्यांतील प्रत्येक व्यक्ति प्रत्यक्षपणें राज्यकारभारांत भाग घेते असाहि नाहीं. विद्यमान लोकशाहीचें स्वरूप म्हणजे लोक आपला प्रभाव प्रतिनिधिद्वारा राज्यकारभारावर टाकत असतात व प्रतिनिधि निवडण्याचा हक्क सर्वांना म्हणजे वयांत आलेल्या सर्वांना असतो. हा हक्क प्रदत्त करण्याच्या बाबतींत समानता असते. विद्यमान लोकशाहीचें स्वरूप सांगावयाचें झाल्यास कायद्याच्या दृष्टीनें व राजकारणाच्या दृष्टीनें समता; म्हणजे सर्वांना एकच कायदा लागू व सर्वांना मतदानाचा हक्क असणें. त्याजबरोबर जें बहुमत असेल त्यास अनुसरून राज्यकारभार चालणें हेंहि या एकतेच्या कल्पनेंत समाविष्ट आहे. लोकशाही राज्यकारभारांत अल्पसंख्याकांचें संरक्षण, मौलिक अधिकाराची व्यवस्था, बहुमतावर कांहीं बंधनें या सगळ्या गोष्टी असतात. तथापि, लोकशाही याचा अर्थ लोकांचा राज्यकारभारावर प्रभाव हें सामान्यपणें मान्य झालें आहे. प्रसिद्ध अमेरिकन राज्य-शास्त्रज्ञ 'जेफरसन' लोकशाहीबद्दल असें म्हणतो कीं, लोकशाही म्हणजे ती व्यवस्था कीं, ज्यामध्यें गुणानें व लायकीनें जे श्रेष्ठ असतील त्यांची राज्यकर्ते म्हणून निवड. त्यांनीं पुढें असेंहि म्हटलें आहे कीं, जोंपर्यंत अमेरिका शेतकीप्रधान आहे तोंपर्यंत हें शक्य आहे. पण जेव्हां अमेरिका उद्योगप्रधान होईल, मोठमोठीं शहरें अस्तित्वांत येतील, त्यावेळीं अमेरिकेंतील लोकशाही भ्रष्ट होईल. केवळ संख्येच्या दृष्टीनें विचार करतां ज्या राज्यव्यवस्थेंत जास्तींत जास्त लोकांना मतदानाचा हक्क दिला असेल, त्या ठिकाणीं अधिक लोकशाही आहे असें म्हणतां येईल. पण तें तिचें स्वरूप औपचारिक, त्याचप्रमाणें एखादा अनियंत्रित सत्ता असलेला राजा प्रगतिपर असला तरी तेथें लोकशाही आहे असें म्हटलें जात नाहीं. उलट ५१ टक्के लोक देशावर कल्पनातीत हुकूमशाही चालवत असले तरी ती लोकशाही असें मानलें जातें व या लोकशाही सत्तेला कशाचीहि मर्यादा नसते व पक्षीय हुकूमशाही ही व्यक्तिगत हुकूमशाहीपेक्षां अधिक लोकद्रोही व अधिक पक्षस्वार्थाची ठरते. आजहि सोविएत रशिया व अन्य साम्यवादी राष्ट्रें आपण लोकशाही आहोंत असाच दावा करीत असतात. वस्तुतः, व्यक्तीच्या दृष्टीनें लोकशाहींतील स्वातंत्र्य त्या ठिकाणीं अनुभवाला येत नाहीं आणि अगदीं लोकशाही मार्गानें हिटलर हुकूमशहा बनला हा इतिहासाचा दाखला अगदीं ताजा आहे. सामान्यपणें व्यक्तिगत हुकूमशहा लोकशाही मार्गानें आला तरी अखेरीस त्याचा नाश

होतो व स्वातंत्र्याचा विजय होतो हें खरें. पण ही अखेरची घटका येईपर्यंत कित्येक व्यक्तींची अखेर होते. कित्येक नैतिक व लोकशाही मूल्यें नष्ट होतात.

हुकूमशाहींतून लोकशाही मार्गानेंच हुकूमशाही वाटचाल करते हा अनुभव केवळ आधुनिक जगाचाच आहे असें नव्हे, असाच थोडासा अनुभव प्राचीन काळीं लोकांना आल्याचा उल्लेख ॲरिस्टॉटलच्या ग्रंथांतून आहे. तसाच थोडासा अनुभव फ्रेंच राज्यक्रान्तीनंतर फ्रान्सच्या वांट्याला आला. स्वातंत्र्य, समता व भ्रातृभाव या आवाजांतूनच हुकूमशाही रणभैरवी ऐकूं आली आणि त्याहिवेळीं शेवटीं लोकशाहीचा म्हणजे स्वातंत्र्याचा जय होणार असेंहि सांगणारे राजनीतिज्ञ होते. एकोणीसाव्या शतकांत फ्रेंच क्रांतीनंतर जे परिणाम दिसून येत होते ते लोकशाहीला अनुकूल होते हें जरी खरें तरी त्या लोकशाहीकडे प्रवृत्त झालेल्या विचारांतच हुकूमशाहीला पोसणारीं विचारद्रव्यें नव्हतीं असें नाहीं. एडमंड बर्क, लॉर्ड ॲक्टन, मील, मेन यांच्या ग्रंथांतून लोकशाहींतून हुकूमशाही होण्याची भीति प्रदर्शित केलेली आहे. आणि ह्या प्रकारच्या भीतीचें कारण सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतांना असें आढळून येतें कीं, स्वातंत्र्याच्या पूर्णतेसाठीं समतेची आवश्यकता भासेल आणि त्यांतूनच मग हुकूमशाही पैदा होईल. सर्वत्र सारखेपणा पाहिजे. सामाजिक भूमि समतल पाहिजे, ही वृत्ति एकदां उत्पन्न झाल्यानंतर स्तब्ध राहात नाहीं. मग वरचे वर्ग खालीं यावे व खालचे वर जावेत असे विचार सुरू होतात. समावेशकपणा मग तेथें आढळून येतो आणि या परिस्थितींत स्वातंत्र्याच्या कल्पनेला आळा बसतो. एकदां सर्व सारखें असावें हा विचार सुरू झाला म्हणजे जें जें कांहीं पाऊल त्या दृष्टीनें पडेल त्या त्या योगें त्या विचारांची गति वाढते. अग्नींत तूप पडावें म्हणजे अग्नि अधिक वाढतो असें होत जातें, आणि ह्या क्रियेला विरोध न केल्यास सर्वत्र राष्ट्रांत एकसारखेपणा येतो. पण त्याहून वाईट गोष्ट म्हणजे, जो नमुना असेल त्याला न जुळणारा मनुष्य पापी, अनैतिक, किंबहुना कृत्रिम मानला जातो. वस्तुतः जो नमुना होत असतो तो एका दृष्टीनें कृत्रिम असून तो स्वाभाविक मानला जातो. आणि आजहि ज्या देशांतून अशी ठोकळ नमुनाबाजी आहे, त्या देशांतील लोकांना अन्य देशांतील विविधता अस्वाभाविक वाटते. येथून तेथून सर्व लोक एकसारखे पाहिजेत यांतील मर्यादा लक्षांत न घेतां समतेच्या धुंदींत प्रगतीला आवश्यक असणारी प्रवृत्तीसुद्धां नष्ट होते, असा कांहींचा आक्षेप आहे. एकसारखेपणा असण्यांत विशेष ध्येयनिष्ठेच्या भावना नसतात, किंबहुना एकसारखेपणा म्हणजे यांत्रिकपणाचा भाव व चैतन्यहीनता. याच्या उलट विविधता असण्यांत संघटना असते, विविधतेंत जीवन आहे व सारखेपणांत मृत्यु आहे असाहि युक्तिवाद एकोणीसाव्या शतकांत अनेकांनीं केला आहे. फ्रेंचक्रान्तीनंतर समता व सारखेपणा ह्या उन्मादकारी वृत्ति निर्माण झाल्या आणि त्याचा परिणाम अनेकांचें स्वातंत्र्य कमी करण्यांत झाला. मनुष्याला स्वाभाविकपणें सन्निध असलेल्या परिस्थितीबद्दल अभिमान वाटतो, आनंद वाटतो. माझा मोहल्ला, माझें गांव,

माझी बैठक, माझी जीवनव्यवस्था या सर्वांत माझें असें वैशिष्ट्य असल्यानें त्याला आनंद वाटतो. एकच हार्मोनियम, त्यावर अनेक जण अनेक राग वाजवतील, त्याचप्रमाणें एका समाजांत विविधतेला वाव असला पाहिजे. पण समतेच्या धुंदींत केवळ राजकीय समता व सामाजिक समता एवढाच अर्थ न मानतां सर्वांच्या सर्वांगीण जीवनांत सारखेपणा पाहिजे, येथपर्यंत सिद्धान्तिक आग्रह होऊं लागला आणि सत्ता लोकांच्या हातांत आल्याकारणानें विविधतेवर आक्रमण होऊं लागलें. विविधतेवर आक्रमण होऊं लागल्यावर त्यांतूनच विरोधाची वृत्ति प्रबळ झाली असेंहि आढळून आलें. सामान्यपणें समतेच्या व सारखेपणाच्या नांवाखालीं हुकूमशाही सुरू झाली. जर्मनीमध्येंहि तोच अनुभव आला आणि समता व हुकूमशाही यांचा हा संबंध ॲरिस्टॉटल यानें जाणला होता. एकोणीसाव्या शतकांतील अनेक राजनीतिशास्त्रज्ञांनीं पण जाणला होता.

प्राचीन ग्रीस देशाचा इतिहास असें सांगतो कीं, लोकांची खुशामत करून त्यांच्यांतील हीन भावनांना आवाहन करून जेवढें कांहीं वेळ व ज्येष्ठ समाजांत असेल तें नष्ट केलें गेलें व हें करण्याच्या कामीं संपत्ति अगर गुण यांचाहि विचार झाला नाहीं. समता व सारखेपणा यांच्या नांवाखालीं प्रत्येकाची मालकी प्रत्येक गोष्टीवर आहे अशी अविवेकी विचारसरणी कांहीं ठिकाणीं प्रदर्शित पण झाली. वास्तविक समता व सारखेपणा यांच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत. याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, समता जर शक्य असेल तर लोकशाहींतच ती असूं शकते आणि ती समता म्हणजे स्वातंत्र्याला पूरक असणारी सत्ता, गुलामगिरींतील समता नव्हे. सर्वांना एकच कायदा असावा हें मान्य, पण एकच कायदा विषम सामाजिक परिस्थितींतील माणसांना लावणें अयोग्य. तेथें कायदा असेल, न्याय असणार नाहीं. सिंह व कोल्हा यांना एकच कायदा लावणें हें कोणालाहि पटणार नाहीं. पण त्याजबरोबर एकच कायदा लावण्याची आवश्यकता वादातीत आहे. लोकशाहीमध्यें बहुमतानें कायदा बनतो आणि मग बहुमताचा निर्णय प्रत्येक क्षेत्रांत लागू होतो. सामान्यपणें लोकशाहीमध्यें प्रत्येकाला असें वाटतें कीं, आपण कांहीं कमी नाहीं आणि म्हणून अन्य कोणी असल्यास त्याला कमी करण्याकडे प्रवृत्ति व प्रयत्न केले जातात. ज्या ठिकाणीं इतरांचा मोठेपणा अगर श्रेष्ठता मग ती व्यक्तिविषयक असो, अगर वर्गविपयक असो, कमी करण्यांत यश न आल्यास द्वेष व वर्गद्वेष समाजामध्यें दिसून येतात. पण त्याजबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, द्वेषाच्या प्रवृत्तीबरोबर समतेची प्रवृत्ति उत्कृष्ट भावनांना पण जन्म देत असते. समता म्हणजे केवळ द्वेषावर आधारलेली भावना आहे हें म्हणणें बरोबर नाहीं. म्हणून लोकशाहीचें कार्य व प्रक्रिया अशी असावी कीं, द्वेष मर्यादित राहील व समतेंतून निर्माण होणारी श्रेष्ठ भावना अधिक कार्यकारी ठरेल. अनेकांना स्वातंत्र्य व समता यांचा संबंध पसंत नसतो. तथापि, एकदां सर्वत्र समता स्थापण्याची क्रिया सुरू झाली म्हणजे थोडीशी अनुदार प्रवृत्ति उत्पन्न होते हें खरें, तथापि ती फार काळ टिकत नसते. समाजामध्यें

औदार्याचा उदय सुस्थिति प्राप्त झाली असतां त्वरेनें होतो. कांहीं व्यक्ति स्वभावतःच उदार प्रवृत्तीच्या असतात. जेव्हां विषमता असेल तेव्हां मत्सर जसा उत्पन्न होतो त्याप्रमाणें नाहीं त्याला, ज्याच्याजवळ आहे त्याला, द्यावेंसें वाटतें व जेव्हां विषमता कमी कमी होत जाते त्या वेळेला सुस्थिति व थोडी समतेची स्थिति असल्यानें औदार्याला प्रोत्साहन मिळतें. अनेकांच्या मतें लोकशाही ही संकुचित भावनांना अधिक वाव देते, पण तें खरें नाहीं. सुमारें शंभर वर्षांपूर्वी मेकॉलेनें म्हटलें आहे कीं, लोकशाही संस्था–निर्भेळ लोकशाही संस्था–आज नाहीं उद्यां, स्वातंत्र्य व समता दोन्हींचा त्या नाश करतील. आणि ज्या ठिकाणीं लोकसंख्या अधिक आहे त्या ठिकाणीं हें लवकर घडून येईल. तथापि, गेल्या शंभर वर्षांचा अनुभव असा आहे कीं, सुस्थितींत असलेल्या अमेरिकेनें व समतेच्या वातावरणांत असलेल्या रशियानें राजकीय हेतु धरून का होईना, जें औदार्य दाखविलें आहे तें स्पृहणीय आहे व ह्या औदार्यांत निश्चितपणें समतेचें एक लक्षण आहे. गेल्या शंभर वर्षांत लोकशाही संस्था आहेत, म्हणून राज्यांत स्वातंत्र्य अगर समता नाहींशी झाली असेंहि घडलें नाहीं. आर्थिक कारणानें लोकशाही संस्थांचें स्वरूप विविध झालें आणि स्वातंत्र्याचा अर्थ नवीन नवीन रूप घेता झाला. लॉर्ड ॲक्टन यांच्या मतें फ्रेंच राज्यक्रान्तींत समतेचें तत्त्व घुसडलें नसतें तर राज्यक्रान्ति यशस्वी झाली नसती. कारण मग स्वातंत्र्य शिल्लक राहिलें असतें. फ्रेंच क्रान्तीच्या वेळीं मध्यम वर्गाला स्वातंत्र्य हवें होतें व खालच्या वर्गाला समता हवी होती. माझ्या मतें आजहि तीच स्थिति आहे. मध्यम वर्गाला समतेपेक्षां स्वातंत्र्याची अधिक ओढ असते. कारण त्याची बौद्धिक पार्श्वभूमि होय. खालच्या वर्गाला समता हवी असते, कारण त्याच्या अनुभवाला जीवनांत क्षणोक्षणीं, पदोपदीं विषमतेचा वाईट अनुभव येत असतो.

प्रश्न असा उपस्थित होतो कीं, लोकशाही व स्वातंत्र्य, स्वातंत्र्य व समता यांमध्यें खरोखर विरोध आहे का? या ग्रंथांत सुरुवातीपासून ही विचारसरणी मानली आहे कीं, लोकशाहीशिवाय स्वातंत्र्य नाहीं आणि समतेशिवाय स्वातंत्र्य पूर्ण होत नाहीं, तें सार्थ होत नाहीं. तथापि, कांहींचें मत असें आहे कीं, समतेशिवाय म्हणजे यथार्थ समतेशिवाय लोकशाही नांदूं शकते. याचा अर्थ असा कीं, आर्थिक विषमता असली म्हणजे खरी लोकशाही नांदते व खरी लोकशाही तीच कीं, जेथें अनिर्बंध स्वातंत्र्य आर्थिक बाबतींत आहे. आजहि हिंदुस्थानांत नुकताच स्थापन झालेला राजकीय पक्ष 'स्वतंत्र पक्ष' याची मुख्य भूमिका हीच आहे. त्या पक्षाला आर्थिक क्षेत्रांत नियोजन नको आहे. कारण त्याला नियमन व नियंत्रण नको आहे. लोकशाही हवी आहे ती एवढ्याचसाठीं कीं, ती ह्या क्षणाला नको म्हटली तर राजकारणांत उभें राहण्यासुद्धां जागा मिळणार नाहीं. नव्या नव्या राजकीय कल्पना व विचार लोकांपुढें येत आहेत व लोकांनीं ते अधिक सूक्ष्म दृष्टीनें न्याहाळून त्याबाबत विचार केला पाहिजे.

आज जगाची स्थिति अशी आहे कीं, लोकशाहीचा कांहीं बरा वाईट अनुभव लोकांना आला आहे व सामान्यपणें लोकशाही राज्यव्यवस्थेंत स्वातंत्र्य जोपासलें जातें, सुखाची आशा असते, असा अनुभव आलेला आहे आणि जेथें लोकशाही कमी लेखली गेली अगर तिचा विपरीत अर्थ लावला गेला तेथें जी परिस्थिति निर्माण झाली ती विचार करण्यासारखी आहे. जर्मनी, इटली या दोन राष्ट्रांत महायुद्धांतील दरम्यानच्या काळांत जें घडलें त्यामुळें कांहीं लोकांचा विश्वास लोकशाहीबाबत कमी झाला असला, तरी दुसऱ्या महायुद्धानंतर लोकशाहीशिवाय तरणोपाय नाहीं हेंहि शाबीत झालें आहे. सोविएत रशियामध्यें गेल्या चाळीस वर्षांत जें घडून आलें आहे, त्याचा अर्थ इतकाच कीं, लोकशाहीचा अर्थ इंग्लंड – अमेरिकेंत लावतात तसा तेथें लावला गेला नाहीं. एक गोष्ट निश्चित आहे कीं, कुठें तरी लोकशाही या कल्पनेंत समतेची भावना असतेच आणि आजच्या युगांत समतेचा आलाप काढल्याशिवाय भागत नाहीं. म्हणून हुकूमशाहीलासुद्धां लोकशाही म्हणण्याचा अट्टाहास केला जातो. लोकांच्या मतानें हिटलर निवडून आला तेव्हां तीहि घटना लोकशाहीची, पाकिस्तानांत जनरल अयूब निवडून आले हेंहि लोकशाहीचें लक्षण सांगण्यांत येत आहे. लोकांपुढें जो विकल्प मांडला जातो तो असा कीं, व्यक्तीमध्यें निवड नाहीं व जी व्यक्ति प्रतिष्ठित झाली आहे, ती असेंच घडवून आणते कीं, मनांत कांहीं असलें तरी हातानें व मनानें त्या प्रतिष्ठित व्यक्तीला जें हवें असतें तेंच नोंदलें जातें. हिटलरला ९८ टक्के मतें मिळालीं व अयूबला ९९ टक्के मतें मिळालीं यावरून समतेचा भाव हा लोकशाहीचा आत्मा आहे हें मान्य करून त्याला विकृत स्वरूप दिलें जातें. जर लोकशाहीचें स्वरूप सरळ ठेवलें तर समतेचा भाव जीवनाच्या सर्व क्षेत्रांत पसरेल व मग समाजाला लुबाडण्याचें स्वातंत्र्य नष्ट होईल. आजहि जें नियमन व नियंत्रण केलें जातें तें लोकशाही मंत्र म्हणूनच. लोकशाही ही केवळ राजकीय क्षेत्रांत थांबत नाहीं तिचीं पावलें मग आर्थिक लोकशाहीकडे वळतात आणि आर्थिक लोकशाही याचा अर्थ राष्ट्रीय मालकी, नोकरशाही, योजनांचें नियमन व नियंत्रण आणि या सर्वांचा परिणाम व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर होतो, म्हणून समतेलाच विरोध करावयाचा व तो स्वातंत्र्याच्या नांवानें अशी ही विचारसरणी युरोप व अमेरिका त्याचप्रमाणें भारतांतहि जोरानें सुरू झाली आहे आणि त्याच विचारसरणीचा एक भाग म्हणून लोकशाहीलाहि विरोध सुरू झाला आहे. लोकशाही म्हणजे सर्व लोकांच्या सुखासाठीं झटणारी व सर्वांना न्याय देणारी व्यवस्था हें मान्य केल्यानंतर तिचें कार्यक्षेत्र अनंत होतें आणि मग तिला कार्यक्षम करण्यासाठीं व्यक्तीच्या जीवनावर तिला अमर्याद सत्ता द्यावी लागते. सामान्य लोकांना व्यक्तिशः करतां येणार नाहीं म्हणून राज्य सर्व योजना हातीं घेतें. मग व्यक्ति ह्या समाजाचे घटक या दृष्टीनें महत्त्वहीन होत जातात आणि राज्याचे आज्ञाधारक नागरिक हा भाव त्याच्यांत अधिक येतो असा आक्षेप घेतला जातो. समाज व राज्य यांच्यांतील भेद मग नाहींसा होतो आणि जें

जीवन निर्माण होतें त्यांत सामाजिक सुस्थिति असली तरी व्यक्तिस्वातंत्र्य राहात नाहीं. शरीराच्या गरजा भागविल्या जातात, पण व्यक्ति ही आध्यात्मिक जीवनाला वंचित होते असाहि आक्षेप घेतला जातो. व्यक्तीची हुकूमशाही जाते व एका 'नव्या वर्गाची' हुकूमशाही सुरू होते. शरीराप्रमाणें मनालाहि विचारांची कवायत शिकविली जाते. जनतेचें जीवनमान निश्चित वाढतें, पण त्यानें जीवन सुखी होतें असें मात्र घडत नाहीं. लोकांचें राज्य खरें, लोकांची सत्ता खरी, पण आपण ती वापरूं शकतों असें कुणालाहि वाटत नाहीं. कोणी तरी, कुठें तरी, कांहीं तरी ठरवीत आहे व एखाद्या यंत्राप्रमाणें सर्व कांहीं घडून येत आहे असें वातावरण उत्पन्न होतें. सर्व कांहीं राज्यानें व्यापलेलें, व्यक्तीला व्यक्ति या दृष्टीनें निर्णय करण्यासारखें कांहींच शिल्लक राहात नाहीं. जन्मापासून व्यक्तीची काळजी घेतली जाते. शिक्षणाची व्यवस्था राज्य करतें. कोणत्या रोजगारांत घालावयाचें हें राज्य ठरवितें. कोठें राहावें, कसें राहावें हें राज्य ठरवितें, कोणतें गाणें ऐकावें, कोणतीं पुस्तकें वाचावीं, याचा निर्णय राज्य करतें. व्यक्तीला स्वतःचें असें कपड्याशिवाय कांहीं आहे असें वाटत नाहीं व कपडेहि पाहिजेत ते तो घालूं शकत नाहीं. ही स्थिति अनेकांच्या मतें आज साम्यवादी राष्ट्रांतून दिसून येत आहे व हें सर्व लोकशाहीच्या नांवाखालीं झालें आहे. समतेच्या परिपूर्णतेसाठीं झालें आहे व यांत स्वातंत्र्य नष्ट झालें आहे.

प्रश्न असा उपस्थित होतो कीं, हें सर्व घडून येत असतांना लोक कसें सहन करतात ? समतेची भावना मागें सांगितल्याप्रमाणें मत्सर व द्वेषावर उभारली असल्या-कारणानें व्यवहारांत ज्याप्रमाणें मनुष्य आपलें जमलें नाहीं तरी चालेल, पण दुसऱ्याचें जमतां कामा नये असें म्हणतो, तोच अनुभव येथें आहे असें म्हणतां येईल. सर्व कांहीं आपण करीत आहोंत, आपण त्या चित्रांत आहोंत ह्या विश्वासामुळें समतेच्या भावनेचा आविष्कार अतिरेकीपणें राज्यव्यवस्थेंतून व राज्यकारभारांतून होतो. इतिहासांत घटनेचें बाह्य स्वरूप एक व प्रत्यक्ष अनुभव निराळा, असें अनेक वेळां घडलें आहे. आकार व आशय हे नेहमींच एकमेकाला जुळणारे असतात असें नाहीं. सामान्यपणें लोक उदासीन असतात, त्यांचे प्रतिनिधि लोकांच्या अज्ञानावर व्यापार करीत असतात व पुष्कळ वेळां राज्य लोकांचें व फायदा विशिष्ट वर्गाचा असें दिसून येतें. 'खुल् खुदाका मुल्ख बादशहाका, अंमल कंपनी सरकारका' ही म्हण अठराव्या शतकांतच खरी होती असें नव्हे, तर त्यांतील अनुभव सर्वकाळीं दिसून येणारा आहे. हुकूमशाहीमध्यें स्वातंत्र्य नाहीं, या विधानाला कांहीं अर्थ नाहीं. कारण तेथें तें कधींच असूं शकत नाहीं. पण लोकशाहींत तें नाहीं याचा अर्थ मनाला भिवविणारा असतो. अप्सरा कुरूप आहे, किंवा पुण्यांतील माणसाला राजकारण कळत नाहीं असें म्हणण्यासारखें आहे. पण गेल्या एकोणीसाव्या शतकांतील व विसाव्या शतकांतील अनुभव असा आहे कीं, हुकूमशाहीची भीति लोकशाहींतच विशेष असते. नामवंत राज्यशास्त्रज्ञ ही भीति प्रदर्शित

करतात त्यावेळीं ती केवळ निराधार मानणें योग्य नाहीं, अगर त्यांची थट्टामस्करी करून त्यांच्या विचारांना बाजूला सारणें योग्य नाहीं. आजहि राजाजींसारखे विचारवंत सध्यांच्या लोकशाहींत स्वातंत्र्य नाहीं झोटिंगशाही वावरत आहे असें म्हणतात, त्यावेळीं राजाजी हे विफल मनोवृत्तीचे आहेत, मत्सरी आहेत हा युक्तिवाद मांडणें नैतिक नाहीं, बुद्धिमत्तेचें तें लक्षण पण नाहीं. भारताची घटना नामवंत पंडितांनीं तयार केली आहे. जगांतील आतांपर्यंतच्या नानाविध राष्ट्रांच्या घटना लक्षांत घेऊन, त्यांना आलेला अनुभव लक्षांत घेऊन येथें आलेला अनुभव व बुद्धीनें काढलेलें अनुमान या सर्व गोष्टींच्या आधारावर घटना झालेली आहे. त्या घटनेंत स्वातंत्र्य व समता व लोकशाही यांवर जोर आहे. किंबहुना यांवर ती आधारलेली आहे. फ्रान्सच्या क्रान्तीचा ओघ स्वातंत्र्य, समता, भ्रातृभाव यांतून बोनापार्टीझमच्या झोटिंगशाहींत लुप्त झालेला आहे, हा इतिहास कोणी विसरलेला नाहीं. समाजाची धारणा, अधिकार व आज्ञाधारकपणा या दोन तत्त्वांवर झालेली असते. कुणाचें तरी बाकीच्या सर्वांनीं ऐकावयाचें असतें, तसें न झालें तर समाज नाहीं, अधिकार वापरणारा मग व्यक्ति असेल, कुटुंब असेल, वर्ग असेल किंवा सर्व समाजानें निवडून दिलेले प्रतिनिधि असतील. एकदां अधिकार हें आद्य तत्त्व मानल्यानंतर समाजांत प्रतिष्ठेच्या दृष्टीनें मग लहानमोठीं वजनमापें होतातच. अधिकाराची उतरण लागते, व मग त्यांतून विषमतेचा भाग उत्पन्न होतो. अधिकाराच्या संदर्भांत असलेली विषमता जीवनाच्या अन्यक्षेत्रांत मग दिसून येते आणि म्हणून अनेकांच्या मतें सर्व समाज अधिकार व विषमता यांवर उभारलेला आहे हें मत प्रतिपादलें जातें. या पायाभूत तत्त्वाशीं जेवढी विसंगत नसेल तेवढी समता, मग राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनांत नांदूं शकते. समतेच्या नांवाखालीं गुणांना हद्दपार करणें आणि चारित्र्याचा नाश करणें हें केव्हांहि समाजाच्या दृष्टीनें घातक मानलें पाहिजे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, समाजामध्यें स्वातंत्र्याच्या नांवाखालीं अगर निसर्ग व समाजाचा न्याय विषमतेला परिपोषक आहे म्हणून वाटेल तें घडावें. संपत्तीच्या भोंवतालीं मग खरा वाद उत्पन्न होतो आणि अर्थव्यवस्थेवर धर्म व धर्मावर राज्य हें चाणक्याचें सूत्र लागूं पडतें. संपत्तीची विषमता लोकांनीं मानली नाहीं याचा अर्थ लोक गुणाला अगर बुद्धिमत्तेला मान देत नाहींत असा करणें बरोबर नाहीं. संपत्तीच्या बाबतींतील मनुष्याचें खरें स्वरूप कळून येतें. संपत्तीला हात घालीपर्यंत उपनिषदांतील धर्म नांवाजला जातो. ‘ धन ही माया आहे’ हें सांगितलें जातें. ‘ खरें धन विद्या आहे ’ अशी घोषणा केली जाते. पण थोडा आयकर वाढवतांच अगर मृत्युकर लागूं करतांच मेल्यानंतर ज्यांचा संपत्तीशीं संबंध असत नाहीं तेहि जिवंतपणीं ओरड करतात. समाजांतील वंचितांना वंचित ठेवूं इच्छितात. मतानें बरोबर, मानानेंहि बरोबर; पण संपत्तीच्या बाबतींत विषमता ठेवली पाहिजे असें आग्रहानें प्रतिपादलें जातें.

सबंध एकोणीसाव्या शतकांत युरोपांतील राजकीय विचार जितके समतेला अनुकूल दिसत होते तितकीच आर्थिक विषमता ही समाजाच्या स्थैर्यासाठी व प्रगतीसाठीं आवश्यक आहे असेंहि आग्रहानें प्रतिपादत होते. लोकशाही यांतच स्वातंत्र्य शक्य आहे याच विचाराबरोबर लोकशाही आणि स्वातंत्र्य ह्या दोन गोष्टी निराळ्या आहेत, असेंहि सांगितलें जात होतें. लोकशाहीचें विकृत स्वरूप म्हणजे हुकूमशाही, मात्र जनतेच्या नांवानें केलेली हें तर वारंवार प्रतिपादलें जात होतें. लोकशाही म्हणजे जिव्हेचें राज्य आणि त्यांतूनच तलवारीचें राज्य निर्माण होतें, असा सिद्धान्त एका मोठ्या जर्मन विचारवंतानें मांडला होता. इतकेंच नव्हे तर स्वातंत्र्य हवें असेल तर पुन्हां राजेशाही स्थापन केली पाहिजे, असेंहि म्हणणारे तत्त्वज्ञ आढळून येतात. आणि आजहि या देशांत आहे यापेक्षां इंग्रजांचें राज्य बरें असें म्हणणारे सदाशिवपेठी विद्वान् आढळणार नाहींत असें नाहीं. स्वातंत्र्या-साठीं लोकशाही आणि ती जन्मतांच स्वातंत्र्याच्या मुळावर येते आणि समतेकडे प्रवास करतांना हुकूमशाही स्वरूपांत परिणीत होते, असा एकोणीसाव्या शतकाचा अन्वयार्थ अनेकांनीं लावला आहे. लोकशाही म्हणजे समान गुलामगिरी, लोकांचें राज्य म्हणजे ज्यांत सर्व कांहीं सरकार करतें तें, लोकशाही म्हणजे सत्तेचें पूर्ण केंद्रीकरण आणि अशी परिस्थिति असते कीं, ज्यामध्यें लोक उपक्रमशून्य, उदासीन होतात. अर्थात् या व्याख्येप्रमाणें युरोपच्या इतिहासांत कांहीं ठिकाणीं तरी जुळणारा अनुभव येत होता हें निश्चित. विसाव्या शतकांतील गेल्या साठ वर्षांत लोकशाहीची जी प्रगति झाली आहे, तिचा अन्वयार्थ लावणें झाल्यास परस्परविरोधी अशीं विधानेंसुद्धां करतां येण्या-सारखीं आहेत. आज सोविएत युनियनमध्यें किंवा चीनमध्यें जें होत आहे तें लोकशाही-विरुद्ध आहे, स्वातंत्र्याच्या मौलिक कल्पनेविरुद्ध आहे, असेंहि विधान करतां येईल. त्याचप्रमाणें तेथील लोकांच्या इच्छेबरहुकूम तें होत आहे व लोकांच्या मताप्रमाणें तें आहे; मग तेथें लोकशाही नाहीं, स्वातंत्र्य नाहीं असें म्हणणें थोडें धाडसाचें होईल. जेथें मिय्या बिब्बी राजी आहेत, तेथें गांवचा काजी कांहीं करूं शकत नाहीं. राज्यकर्ते व लोक यांत जेथें सायुज्यतेची स्थिति आहे, जेथें त्यांच्यांत अद्वैत आहे, तेथें कोण कुणावर अधिकार गाजवतो हें सांगणें कठीण आहे. ज्या ठिकाणीं वर्गविषमता हा समाजधारणेचा स्थायिभाव आहे, तेथील लोक भलेहि सोविएत वा चीनमध्यें स्वातंत्र्य नाहीं असें म्हणतील; पण त्या म्हणण्याचा परिणाम संबंधित लोकांच्या दृष्टीनें कांहीं नाहीं. त्याचप्रमाणें समतेच्या तत्त्वज्ञानाचा अतिरेक केला म्हणजे राज्य अधिक बलवान् होतें आणि समतेसाठीं दिलेली सत्ता राज्य मग सर्व क्षेत्रांत वापरूं लागतें ह्याहि म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण ज्या ठिकाणीं सत्तेचा उपयोग सर्व लोकांच्या दृष्टीनें जास्तींत जास्त संबंधित लोकांना पसंत असा होत आहे, त्या ठिकाणीं राज्य बलवत्तर झालें तर तें वाईट असें म्हणतां येणार नाहीं. विचारस्वातंत्र्य नाहीं, बौद्धिक स्वातंत्र्य नाहीं, हे नेहमींचे आरोप त्या ठिकाणीं संबंधित लोकांच्या दृष्टीनें अर्थशून्य ठरतात.

मागें सांगितल्याप्रमाणें जनतेच्या विचारांची वाटचाल सुरू झाली कीं तिला केवळ राजकीय अगर सामाजिक क्षेत्रांतच मर्यादित करण्याचे प्रयत्न यशस्वी होत नाहींत. निदान लोकशाही मार्गानें ते यशस्वी होत नाहींत. स्वातंत्र्य मिळालें याचा अर्थ उपाशी राहण्याचें स्वातंत्र्य मिळालें असा कोणी करणार नाहीं. समता मिळाली याचा अर्थ सर्वांना एकच मत एवढा करून ज्यांना तो हक्क प्राप्त झाला आहे ते समाधान पावत नाहींत. दारिद्र्य व दुःख त्यांना स्वस्थ बसूं देत नाहीं आणि पोटाची विवंचना मग एक शक्ति बनते. मजजवळ कांहीं नाहीं, व तुजजवळ सर्व कांहीं आहे. या विषम अवस्थेंत भ्रातृभावाचा घोष करून भागत नाहीं. जर बंधुत्व नसेल तर भ्रातृभाव हा व्यर्थ आहे. एकमेकांमध्यें सुखदुःखाची मिळणी–जुळणी करण्याची प्रवृत्ति नसेल तर खरा बंधुभाव तेथें नाहीं आणि स्वातंत्र्य, समता व भ्रातृभाव या घोषणेला अर्थ राहात नाहीं. दुःख व दारिद्र्य जाण्यासाठीं मग वंचित जनता साहजिकपणें उठाव करते. हा उठाव शांततेचा व वैध मार्गाचा असेल अगर अन्यथाहि असेल, पण मग त्यामागचें चैतन्य, त्या मागची प्रेरणा समानतेची, भ्रातृभावाची असते. लोकशाहीच्या चौकटींत हें झाल्यास ठीक, न झाल्यास लोकशाहीची चौकट मोडली जाते. बहुमतानें कायदा झाला आहे हें सांगणें योग्य असलें तरी जेथें आर्थिक विषमतेचा सवाल उत्पन्न होतो तेथें कायद्याची चौकट खिळखिळी केली जाते. लोकमत म्हणजे कायद्याचें प्राथमिक स्वरूप आणि पुष्कळ वेळां लोकमताचें कायद्यांत रूपांतर होण्यापूर्वीच तें प्रभावी बनत जातें आणि आजहि आपण अनेक राष्ट्रांतून तें पाहात आहोंत. राजकीय स्वातंत्र्य असूनसुद्धां व्यक्तिगत स्वातंत्र्य आकसलेलें दिसत आहे आणि राजाजीसुद्धां पुष्कळ वेळां भारतांत गुलामगिरी आली आहे असें म्हणत असतात. आणि याचें कारण हें कीं, कायद्याच्या जुलमापेक्षां लोक-मताचा जुलूम व जबरदस्ती ही अधिक प्रभावी असते. पक्षनिष्ठ लोकशाही असल्यानें ५१ टक्के मत ज्याला निवडणुकींत मिळालें तो पक्ष मग कायदेशीर रीतीनें राहिलेल्या ४९ टक्के लोकांवर अंमल गाजवूं शकतो, राज्य करूं शकतो आणि समाजामध्यें निवडून आलेला पक्ष लोकमतावर मालकी सांगून त्यांत समाविष्ट असलेली सामाजिक शक्ति पक्षदृष्टीनें वापरीत असतो. वर्तमानपत्रें कीं ज्यांच्या द्वारें स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य कार्यान्वित होतें, तीं संघटित पक्षांच्या हातीं असतात. स्वतंत्रपणें कोणी चालवूं शकेल असें क्वचित् आणि मग पक्षबाजी दृष्टीनें चालविण्यांत आलेलीं पत्रें व्यक्तिस्वातंत्र्याचा अनादर करतात. सामान्य हेतूंचाहि विपर्यास करतात व आपल्या प्रचारानें लोकमताला हवी तशी कलाटणी देत असतात. परिणाम असा होतो कीं, ज्याला कांहीं स्वतंत्रपणें बोलावयाचें असतें तें तो बोलूं शकत नाहीं, लिहूं शकत नाहीं. आणि लोकशाही जर स्वातंत्र्याला व खऱ्या अर्थानें समतेला मदत करणारी अशी व्यवस्था ठरावयाची असेल, तर राष्ट्रांतील स्वतंत्र प्रवृत्तीच्या माणसांना आपले विचार बोलण्यास व त्यांचा प्रचार करण्यास खरी खरी मोकळीक असली पाहिजे. जर ठराविक सांचेबंद पद्धतीचीं मनें व

मतें झालीं तर प्रगति होणार नाहीं. किंबहुना जें नैतिक धैर्य समाजाच्या आध्यात्मिक जीवनासाठीं आवश्यक असतें तेंहि मग राहणार नाहीं. या दृष्टीनें पुष्कळ वेळां असा अनुभव येतो कीं, कायद्यापेक्षां लोकमताचाच अन्याय व जबरदस्ती अधिक असते. आज आपण भारतांतील अनुभव पाहिला तर अनेक ठिकाणीं सत्ताधीश पक्षांतील मंडळी उन्मत्तपणें वागतांना दिसून येतात आणि त्याचा परिणाम असा होतो कीं, अनेकांना नमावें लागतें. अनेकांना स्वस्थ बसून राहावेंसें वाटतें आणि हें जर असेंच चालू राहिलें तर लोकशाही ही टप्प्याटप्प्यानें हुकूमशाहीकडे जाते व जें कांहीं सरकार राज्य-कारभारांत करतें व सत्ताधीश पक्षाचीं माणसें समाजांत करतात तें सर्व लोकशाहीच्या नांवानें होतें. देवाचें नांव घेऊन दरोडा घालावा त्याचप्रमाणें लोकशाहीचें नांव घेऊन समाजांतील स्वातंत्र्यावर आक्रमण केलें जातें.

लोकशाहीमध्यें व्यक्तिगत स्वातंत्र्य हें नसेल तर ती लोकशाही न राहातां पक्षनिष्ठ राज्यव्यवस्थेनें हुकूमशाहीकडे जाते, हा गेल्या शंभर वर्षांतला अनुभव आहे. जेथें लोक-शाही म्हणजे बहुमत हें नैतिक व वैध संयम पाळून वागतें तेथें मग ती चांगल्या अर्थानें अनुभवाला येते. पण जेथें बहुमत राज्यकारभारावर कबजा करतें व समाजांत स्वतःला सरकार समजून वागतें, सरकारचीं मतें म्हणजे आपलीं मतें असें मानूं लागतें त्यावेळीं व्यक्तीचीं स्वातंत्र्यें हळू हळू कानसलीं जातात व लोकमत जसें व्यक्तीवर प्रभाव करीत जातें त्याचप्रमाणें कायदाहि तसाच प्रभाव करीत जातो. सोविएत रशियामध्यें अगर चीनमध्यें लोकशाही नाहीं असें कोणी तेथील नागरिक म्हणूं शकत नाहीं. समाजांतील बगीच्यांत शंभर फुलें आहेत व कुठलेंहि चिरडलें जात नाहीं अशीच घोषणा केली जाते. आणि आर्थिक विषमता ज्या राज्यांत कमी होत जाते व सामाजिक व्यवस्था अधिक समपातळीची होते त्या ठिकाणीं व्यक्तिगत स्वातंत्र्य सांगणें, प्रभावी रीतीनें त्याचें प्रदर्शन करणें, म्हणजे चार्वाकी मतें प्रतिपादन करण्यासारखें असतें. जो राज्यकर्त्यांचा अगर शासकांचा वर्ग, नवा वर्ग, निर्माण होत जातो, तोच खरा सत्ताधीश असतो. त्याचे आदेश व आज्ञा या राज्यांत मानल्या जातात. जन्मानें अगर संपत्तीनें राष्ट्रांत असलेली वर्गशाहीहि नाहींशी होते, पण कार्यपरत्वें अगर कर्मपरत्वें एक नवीन वर्गशाही निर्माण होते. समता म्हणजे वर्गविहीन समाज असें समीकरण जें गृहीत धरलें असतें तें व्यर्थ आहे असें आढळून येतें. विभूतिपूजा नसावी, व्यक्तिनिष्ठा नसावी, असें म्हणत म्हणत मूर्तिपूजेपेक्षांहि तीव्र अशी निष्ठा व्यक्तीबाबत उत्पन्न होते. आजहि त्याचा अनुभव जगांत दिसून येत आहे. इमर्सन म्हणतो त्याप्रमाणें समाज चालावयाचा तर कांहीं तरी अलौकिक माण-सांची जरुरी असते. श्रेष्ठ व अलौकिक माणसें नसतील तर जनसमूह म्हणजे मुंग्या व माश्या जमल्यासारखें त्याचें स्वरूप दिसतें, हें त्याचें विधान अगदींच अर्थशून्य आहे असें मानतां येणार नाहीं. वर्ग नाहींसे केले, सामंतशाही संपवली, राजेशाहीला परलोकवास

दाखविला, एवढ्यानें सामान्य माणसावर येणारी राजकीय जबाबदारी तो पार पाडूं शकतो असें मात्र नाहीं. पुष्कळ वेळां आतां सर्वांचें काम झालें म्हणून तें कोणाचेंच काम शिल्लक राहात नाहीं. म्हणून लोकशाही राज्यव्यवस्थेंत व्यक्तिस्वातंत्र्यें सुरक्षित राहतीलच अशी ग्वाही कोणी देऊं शकत नाहीं. राज्याची जुलूमशाही तिची जागा घेते आणि बहुमताचा जुलूम व्यक्तीच्या जुलमापेक्षां तीव्रतर असतोच. व्यक्तिगत जुलूम असला तर व्यक्तीचा नायनाट करून ती संपवितां येईल, पण बहुमताचा जुलूम झाल्यास त्याचें निवारण करणें फार कठीण असतें. तो जुलूम कायम ठेवण्यांत बहुमताचे हितसंबंध गुंतलेले असतात व जे विरोधक असतात ते कायद्यानें व लोकमतानें घेरले गेलेले असतात. राजकीय अन्यायाबरोबर सामाजिक अन्याय चालू झालेला असतो व जात्यांत जोंधळे भरडले जावेत, त्याप्रमाणें अल्पसंख्याकांची स्थिति होते. ते देशनिर्वासित होतात अगर केले जातात. कोणाला सैबेरियांत जावें लागतें, कुणाला फांशीं जावें लागतें आणि कोणी राहूं म्हटलें तर तुरुंगाच्या भिंती नसूनसुद्धां तुरुंगवासाचा अनुभव घ्यावा लागतो.

बहुमताचा जुलूम हा धोका लोकशाहीमध्यें असूं शकतो किंवा होऊं शकतो. या दोन्ही बाबतींत मतभेद होण्याचें कारण नाहीं. अनेक ठिकाणीं तसा अनुभव येतो पण आहे. बहुमतशाही सुरू झाली म्हणजे सरकार मग कायद्याची सत्ता हातांत असल्यानें ज्या क्षेत्राला सामान्यपणें सामाजिक क्षेत्र मानलें जातें, त्या क्षेत्रांत पण कायद्यामार्फत राज्य प्रवेश करतें. खाणेंपिणें, मनोरंजन, त्याचप्रमाणें क्रीडा व बौद्धिक क्षेत्र यांतहि कायद्याचा प्रवेश मग सतत चालूच राहातो. बहुजनसुखाय, बहुजनहिताय यासाठीं निर्माण झालेलें लोकशाही राज्य अल्पजनांचें अहित व अल्पजनांचें दुःख निर्माण करण्याला कारणीभूत होतें. व्यक्तीच्या सुखासाठीं झटण्याचें ध्येय असणारें राज्य हें संघटन, एक तर व्यक्तीला व्यक्तित्वशून्य करतें, अथवा तिचा विनाश करतें. फ्रेंच राज्यक्रान्तीनें जीं तत्त्वें जगाला दिलीं त्यांच्यांतून आज अनुभवाला येणारीं राजकीय रसायनें निर्माण होतील असें कोणालाच वाटलें नाहीं. राजेशाही अथवा सामंतशाहींत राज्य हा एक प्रभावी सामाजिक व सामूहिक भाव होता. लोकशाही तत्त्वप्रणालीच्या आघातानें राष्ट्र ह्या कल्पनेपेक्षां व्यक्ति या कल्पनेवर सबंध एकोणीसाव्या शतकांत भर दिलेला आढळून येतो व मग जेव्हां पुन्हां व्यक्तीव्यक्तींतून सामाजिक भाव अगर सामुदायिक भाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला त्यावेळीं संघटित राष्ट्र उत्पन्न होण्याऐवजीं सैरावैरा वागणारे लोकसमूह उत्पन्न झाले; असा अभिप्राय एका प्रसिद्ध राजनीतिशास्त्रज्ञानें दिलेला आहे. अमेरिकन कवि व्हिटमन म्हणतो कीं, एकटा मी गातों आणि आणि स्वतःला स्वतंत्र समजतों, पण लोकशाही या शब्दाचें साम्राज्य सुरू झाल्याबरोबर माझें व्यक्तिगत स्वातंत्र्य निमालें व आतां मी जनता झालों. हा जनताभाव कांहींना पसंत पडत नाहीं हें निर्विवाद आहे व अजूनहि जनता या भावनेचा उल्लेख अथवा बहुजनसमाज या कल्पनेचा उल्लेख नेहमींच सद्भावनेनें होतो असें नाहीं. नापसंत वक्त्यांवर

दगड व चपला फेंकणारा समाज पाहतां अजूनहि शिष्ट लोक ‘ही पहा तुमची जनता’ असें म्हणतात हें खोटें नाहीं आणि म्हणून लोकशाहींतला विरोध ओठांमार्फत सरळ होत नसला तरी व्यंजनेनें होतो आणि पोटांत तो असतो याबद्दल तर शंकाच नको. आणि जेव्हां आगापिछा नसलेले, सामाजिक शेंडाबुडखा नसलेले इसम नेते बनून थाटांत पण धमकीनें बोलूं लागतात त्यावेळीं इतिहासाला असें म्हणावें लागतें कीं, ‘हें काय फल मम तपाला.’ सबंध एकोणीसाव्या शतकांत स्वातंत्र्य व समतेसाठीं, लोकशाहीसाठीं क्रांति व त्यांतून जें निर्माण झालें तें आज मॉस्को व पेकिंग येथें विराजमान झालेलें दिसत आहे असें प्रतिपादलें जात आहे. पूर्वग्रह व एकांगी विचार सोडून दिले, तरी एवढें मान्य करण्यास हरकत नाहीं कीं, जर लोकशाहीमध्यें जनताशाही आली तर व्यक्तिविकासाला, स्वातंत्र्याला, चांगल्या राज्यकारभाराला थोडा तरी धोका उत्पन्न होतो हें खरें; व जी समता म्हणून मिरवली जाते त्यांतच जालीम विषमतेचीं बीजें असतात. अनेकांच्या मतें यावरील तोडगा म्हणजे लोकशाहीची मुख्य गरज, म्हणजे श्रेष्ठ नेतृत्व तें जोपासलें पाहिजे. लोकशाही ही कोणाहि एका व्यक्तीला शक्य तर महान् बनूं देत नाहीं व पुढाऱ्यांची व्याख्या ‘जो अनुयायांचें ऐकतो तो’ अशी केली जाते. लोकशाहीमधील समस्या मागील अनुभवाला धरून काय असते याचें विवेचन थोडेंसें वर केलें आहे. स्वातंत्र्य ठेवून विषमता जोपासावयाची नाहीं. कारण त्यापासून समाजामध्यें निष्फळ जीवनाचा क्षयरोग पसरतो. लोक म्हणून अधिकार द्यावयाचा व व्यक्ति म्हणून तो अर्थशून्य करावयाचा, हेंहि होतां कामा नये. स्वातंत्र्य आहे पण नवे विचार कोणी मांडूं शकत नाहीं. कारण, नवे विचार म्हणजे राष्ट्रद्रोह मानला जातो. या सर्वांतून कांहीं तरी मध्यम मार्ग काढावयाचा आहे व त्या दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे स्वातंत्र्य व समता या कल्पनांचें अधिक पृथक्करण करणें जरूर ठरतें.

राज्याचें एक मुख्य ध्येय म्हणजे त्यांतील प्रत्येक नागरिकाच्या व्यक्तिविकासाला वाव देऊन त्याच्यांतील जें श्रेष्ठ व ज्येष्ठ असेल त्याचा उपयोग राज्याच्या अंतिम ध्येयासाठीं करून घेणें हें होय आणि व्यक्तींना जास्तींत जास्त वर लिहिल्याप्रमाणें संधी देणारी व्यवस्था राज्य करीत असतें असें गृहीत धरून राज्यानें दिलेल्या आज्ञा व आदेश हे योग्य व न्यायपूर्ण आहेत असें मग मानलें जातें. जितक्या जास्त व्यक्तींना हा अनुभव येईल तितक्या जास्त प्रमाणांत राज्यकार्यांतील न्याय व औचित्य पटत जातें. व्यक्तिविकासाची योजना म्हणजे जे मौलिक हक्क आहेत त्या बाबतींतील योजना असें म्हणण्यास हरकत नाहीं आणि ते मौलिक हक्क जे फ्रेंच राज्यक्रान्तीपासून सर्वमान्य झाले आहेत ते म्हणजे स्वातंत्र्य, समता व भ्रातृभाव. फ्रेंच क्रांतीच्या वेळीं ते मान्य झाले. याचा अर्थ त्याचेपूर्वी नव्हते असा नाहीं. किंबहुना असें म्हटलें तरी चालेल कीं, या तिन्ही कल्पना राज्यकल्पनेबरोबर जन्माला आलेल्या आहेत. फरक एवढाच कीं, त्या प्रगट झाल्या नव्हत्या. तथापि, ही गोष्ट मान्य केली पाहिजे कीं, त्या

मौलिक कल्पनांना फ्रेंच क्रांतीनें साकार केलें. अर्थाला शब्दाचें शरीर दिलें. मौलिक हक्क अगर स्वातंत्र्यें यांचा संदर्भ राज्य व समाज या दोन्हींशीं असतो आणि त्यांत न्यायाचा भाव अगर औचित्याचा भाव हा अपरिहार्यपणें समाविष्ट असतो. स्वातंत्र्य, समता, भ्रातृभाव हे जरी निरनिराळे असले तरी त्यांच्यांतील मुख्य कल्पना समान आहेत आणि ती कल्पना म्हणजे न्यायाची कल्पना होय. या तिन्ही कल्पनांमागें न्यायाची भावना आहे, आणि राज्य हें या कल्पनांना जोपासत असतें व: जोपासण्याची ही क्रिया कायद्यामार्फत होते. जर मी कुठल्याहि राज्याचा नागरिक नसेन, तर सर्व स्वातंत्र्यें, समता इत्यादि सर्व हक्क अर्थशून्य आहेत. कारण त्यावर आक्रमण झाल्यास कोणी प्रतिकार करण्यास असत नाहीं आणि म्हणून जीं कांहीं स्वातंत्र्यें आहेत तीं नागरिकाला आहेत. कायद्यानें तीं संरक्षिलीं असतात. मग तो कायदा स्पष्ट असो अगर सांकेतिक असो. राज्यशास्त्रविषयक ग्रंथांतून नैसर्गिक हक्क इत्यादि कल्पना चर्चिल्या गेल्या आहेत. जन्मसिद्ध हक्क तर सर्वत्र प्रसिद्ध आहेत. तसें पाहिलें तर नैसर्गिक हक्क हे जोंपर्यंत ते समाज या कल्पनेशीं संबंध ठेवीत नाहींत तोंपर्यंत हक्क होऊंच शकत नाहींत. तीच स्थिति जन्मसिद्ध हक्कांबाबत म्हणतां येईल. जन्मसिद्ध हक्कसुद्धां समाजाच्या संदर्भांतच विवरले पाहिजेत व आणि म्हणून जे कांहीं स्वातंत्र्याचे हक्क आहेत ते सर्व ज्या राज्यांत व्यक्ति नागरिक म्हणून राहते त्या राज्याच्या कायद्यानुसार त्याला प्राप्त झालेले असतात. त्या राज्यांत जन्मतःच हे हक्क त्याचें पैतृक धन बनतें. निसर्गानें ज्याप्रमाणें श्वासोच्छ्वास करण्याची व्यवस्था मनुष्याबाबत केलेली असते, त्याचप्रमाणें राज्य तितक्याच स्वाभाविकपणें कांहींना कांहीं व्यवस्था ह्या हक्कांबाबत करीत असतें. हीं स्वातंत्र्यें अगर तद्विषयक हक्कहि त्याला व्यक्तिविकासार्थ आवश्यक असतात. आणि समाजाच्या दृष्टीनें सर्वांचा विकास व्हावा, शक्य तेवढा विकास व्हावा, म्हणून पण आवश्यक असतें. व्यक्तीला जसें पार्थिव शरीर असतें त्याप्रमाणें हीं स्वातंत्र्यें व हे अधिकार यांनीं त्याचा नैतिक देह बनविलेला असतो आणि शरीरानें ज्याप्रमाणें त्यानें श्रम करून आपली जबाबदारी नागरिक या नात्यानें पार पाडावयाची असते, त्याप्रमाणें त्याची नैतिक जबाबदारी पार पाडण्यासाठीं त्याला प्राप्त झालेलीं स्वातंत्र्यें व अधिकार मदत करीत असतात.

वरील विवेचनांत जीं स्वातंत्र्यें अगर अधिकार व्यक्तीला राज्याकडून मिळत असतात तीं अमुकच मिळतील व अमुकच नाहीं; किंवा त्यांत एक घे व एक मिळणार नाहीं, असा विकल्प असत नाहीं. स्वातंत्र्य का समता असा प्रश्न तेथें उपस्थित होत नाहीं. सर्व स्वातंत्र्यें हीं त्याच्या नैतिक जीवनासाठीं व विकासासाठीं सामुदायिक रीतीनें अपरिहार्य असतात. त्याजबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या स्वातंत्र्यांचा हेतु व प्रयोजन यांचा विपर्यास अगर विकृति होतां कामा नये. मनुष्याला कांहीं तरी नैतिक भाव असतोच. आणि त्यांतूनच सूक्ष्म विचार केला असतांना या सर्व स्वातंत्र्यांचा

उगम होतो. व्यक्तीला स्वतःची अशी कांहींतरी नैतिक जबाबदारी असते. समाजांत तो वावरत असल्याकारणानें त्याची जाणीव पण त्याला असते, आणि त्या दृष्टीनें स्वातंत्र्यादिक हक्क अगर अधिकार हे स्वाभाविक अगर सृष्टिनिर्मित आहेत असें म्हणणें मर्यादित अर्थानें खरें ठरतें. त्याच्या स्वभावामुळें ते उत्पन्न होतात, म्हणून स्वाभाविकपणें त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, हीं स्वातंत्र्यें व हे अधिकार या दोन्ही गोष्टी सामाजिक संदर्भाला सोडून असूं शकत नाहींत; आणि म्हणून ते राजकीय स्वरूपाचे अगर कायद्याच्या संदर्भांतील आहेत असें मानावें लागतें. आणि कायद्याचा व समाजाचा संदर्भ एवढ्यासाठीं कीं, स्वातंत्र्य अगर अधिकार हे प्रभावी असले पाहिजेत, ते केवळ कल्पनेंत अगर कागदावर असून चालणार नाहींत. आजहि अनेक राज्यांच्या घटनांप्रमाणें सर्व नागरिक सारखे, सर्वांना समान संधी, असें असतें. तथापि अनुभव निराळा येतो. डंका पिटविला जातो पण घडून मात्र येत नाहीं. म्हणून जे माझे अधिकार अगर स्वातंत्र्यें आहेत, त्यांचें नियमन अगर नियंत्रण, किंबहुना त्यांचें जनकत्वसुद्धां माझ्या व्यतिरिक्त आहे. एका अर्थानें मानवी स्वभावांतून तें निर्माण झालें म्हणून स्वाभाविकपणें, व दुसऱ्या अर्थानें व्यक्तिव्यतिरिक्त असें कांहीं संघटन विद्यमान असल्यानें त्यानें तें निर्माण केलें म्हणून तें सामाजिक अगर राजकीय असें म्हणणें प्राप्त होतें. निराळ्या शब्दांत सांगावयाचें: म्हणजे व्यक्तीचे हक्क व स्वातंत्र्यें हीं सर्व राज्यापासून निर्माण होतात आणि राज्यापासून जर तीं स्वातंत्र्यें निर्माण झालीं नसतील तर तीं अर्थशून्य बनतात. प्रत्यक्ष अनुभवांत कमीजास्त प्रमाणांत हेंच दिसून येतें. ज्या स्वातंत्र्यांना अगर अधिकारांना कायद्याची हमी नसेल, कायद्याचें संरक्षण नसेल तर तीं व्यर्थ आहेत. अमेरिकेमध्यें आजहि कांहीं क्षेत्रांत सर्व तऱ्हेचे नागरिक हक्क (सिव्हिक राइट्स्) नीग्रोंना आहेत, पण प्रत्यक्ष त्यांचा उपयोग ते करूं शकत नाहींत. कारण कायद्याचें संरक्षण त्यांना मिळत नाहीं. याचा अर्थ एवढाच कीं, राज्य हें ज्या प्रमाणांत आदर्श असेल, म्हणजे आपल्या कर्तव्याबाबत जागृत व प्रभावी असेल, त्या प्रमाणांत नागरिकांचे हक्क अर्थपूर्ण असतात. नुसते ते हक्क अगर तीं स्वातंत्र्यें नैसर्गिक आहेत, ईश्वरदत्त आहेत, इत्यादि अवडंबरी शब्दांनीं तीं अर्थपूर्ण होत नाहींत. कठोर अनुभव देणाऱ्या जगांत कायदा कठोर असेल, निष्ठुरपणें निःपक्षपाती असेल, तर व्यक्तीला आपलीं स्वातंत्र्यें उपभोगण्यास मिळतात. अन्यथा मालकी असून वहिवाट नाहीं, कागदोपत्रीं नांव असून प्रत्यक्ष कबजा नाहीं, अशा परिस्थितींत जमीनमालकाप्रमाणें त्याची परिस्थिति असते.

वर सांगितलें आहे कीं, कुठलेंहि राज्य शंभर टक्के आदर्शपूर्ण असत नाहीं. इतिहासाच्या प्रक्रियेंतून तें निर्माण होत असतें व सतत इतिहासाच्या प्रवाहांत वाहात असल्यानें त्याचें स्वरूप आदर्शाच्या दृष्टीनें कमीजास्त होत गेलें, तर त्यांत आश्चर्य

मानण्याचें कारण नाहीं. राज्याचा हेतु प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी देणें, आणि या संधी देण्यामध्यें न्यायभाव नसेल, तर दिलेली संधी कांहींच्या लाभस्थानीं असेल व कांहींना ती हानि पोंहचवील या दृष्टीनें न्याय ही एक श्रेष्ठ भावना राज्य या कल्पनेशीं जोडलेली असते. आणि मग न्याय मिळावा म्हणून प्रसंगीं कांहीं सम-विषम झालें तर तें दोषास्पद मानणें योग्य ठरणार नाहीं. न्याय द्यावयाचा म्हणजे त्यांत कांहीं व्यवस्था व कांहीं नियम हे अपरिहार्यपणें येतात, हें मान्य केलें पाहिजे, आणि हे नियम पण न्याय देण्याच्या उद्देशाला सफल करणारे असले पाहिजेत. याचा अर्थ ज्या प्रमाणांत व्यक्तींना या नियमानुसार विकासाची संधी मिळेल, त्या प्रमाणांत त्यांची सफलता मोजली जाणार. पुष्कळ वेळां मग स्वातंत्र्य आधीं का न्याय आधीं असा प्रश्न उपस्थित होतो आणि या समस्येचा मग तात्त्विक दृष्ट्या परिहार करावा लागतो. मग स्वातंत्र्य का समता एवढाच प्रश्न मर्यादित न राहतां न्याय का व्यापक स्वातंत्र्य अशा तऱ्हेनें उपस्थित होतो. एकदां राज्याचा हेतु निश्चित झाल्यानंतर त्याच्या साध्याच्या दृष्टीनें न्यायाची श्रेष्ठता मग वादातीत होते. स्वातंत्र्य हें तर राज्याचा एक मूलभूत आधार, स्वातंत्र्य म्हणजे राज्यांतील प्रत्येक व्यक्ति आपल्या विकासाबाबत स्वतंत्र आहे आणि ती तशी स्वतंत्र असल्यानें तत्संबंधींचे सर्व हक्क व अधिकार जे राज्यानें कायद्याचे द्वारा दिले असतील, त्यांचा पूर्ण उपयोग ती करणार व करण्याचा अधिकार तिला आहे हें मानलें पाहिजे. व्यक्ति विचाराच्या वयाची झाली म्हणजे आपल्या कल्पनेप्रमाणें आपल्या जबाबदारीवर ती वागेल अशी राज्य अपेक्षा करते. आधीं स्वातंत्र्य असल्यानें जबाबदारी तेथें असते हें गृहीत धरलें जातें. जेथें जबाबदारीची जाणीव नाहीं, तेथें स्वातंत्र्याचा खरा आस्वाद अगर उपभोगहि होऊं शकत नाहीं. कारण स्वातंत्र्य हें राज्यानें प्रत्येकाला दिलें असतें आणि प्रत्येकाला तें लाभावें म्हणून प्रत्येकाला जबाबदारीची जाणीव असली पाहिजे. आणि ह्या जाणीवेची जाणीव, एका दृष्टीनें सर्वांना ज्ञान मिळावें म्हणून राज्याचा कायदा प्रत्येकाला करूं देत असतो. याचाच अर्थ प्रत्येकाचें खरें स्वातंत्र्य म्हणजे राज्याच्या कायद्यानें मान्य व मर्यादित केलेलें आणि याच मान्यतेनें व मर्यादेनें त्याला स्वरूप प्राप्त होतें.

स्वातंत्र्याप्रमाणें समतेचा अर्थ आपण घेतला पाहिजे. समतेचा अर्थ कायद्याच्या दृष्टीनें केवळ करून भागत नाहीं. कायद्यापुढें सर्व सारखे एवढें मानल्यानें अगर म्हटल्यानें सर्व सारखे होत नाहींत अगर असत नाहींत; म्हणून कायद्यापुढील समता व अन्य समता या दोहोंचा विचार केला पाहिजे. नैतिक दृष्ट्या सर्व माणसें समान आहेत आणि ही नैतिक समानता राज्याचा मौलिक कायदा कायदेशीर समतेंत परिवर्तित करते. समाजामध्यें श्रीमंताला एक न्याय व गरिबाला एक न्याय याचा खरा अर्थ असा असतो कीं, श्रीमंताच्या व गरिबाच्या बाबतींत कायद्यांतील समता समानपणें अंमलांत आणलीं जात नाहीं. लोकांमध्यें वर्ग असतील, पण कायद्यामध्यें वर्गीय

न्याय अगर कायद्याच्या समतेला वर्गीय स्वरूप असतां कामा नये. जेथें कायद्याचा प्रश्न येतो त्या ठिकाणीं कायद्याची समता सर्वांना सारखी असली पाहिजे. जेथें राज्याच्या कायद्याचा संबंध न येतां सामाजिक व आर्थिक संबंध येतात, तेथील समता कायद्याच्या समतेच्या कक्षेबाहेरील आहे आणि व्यक्तीची पात्रता, योग्यता, सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक संपन्नता या व्यक्तीव्यक्तीमध्यें निरनिराळ्या असूं शकतील. केवळ भांडवलशाही समाजांतच असें दिसून येतें असें नाहीं, तर समतावादी राष्ट्रांतूनहि कांहीं क्षेत्रांत विषमता दिसून येते; पण कायद्याच्या क्षेत्रांत समता निश्चित असते. प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य दिलें म्हणजे सामाजिक व आर्थिक परिणाम घडतात, तसेच थोडेसे परिणाम सर्वांना सारखे मानले तर घडून येतात आणि आजच्या जगापुढें असा प्रश्न उपस्थित झाला आहे कीं, स्वातंत्र्य तरी मर्यादित करावें आणि समता प्रस्थापित करावी; अगर स्वातंत्र्य अमर्याद व अनिर्बंध करून समतेचा निकाल लावावा. आणि ह्या समस्यांचा विचार करतांना स्वातंत्र्याच्या मर्यादा व समतेच्या मर्यादा या लक्षांत घेतल्या तरच उपाय शक्य आहे. एक गोष्ट उघड आहे कीं, आजच्या भारतांतील कायद्याप्रमाणें सर्व व्यक्ति समान आहेत. याचा अर्थ कोर्टाच्या कायद्यापुढें त्या समान आहेत. सामाजिक बाबतींत ही समानता नाहीं. आर्थिक बाबतींत तर नाहींच नाहीं. तसा विचार करून पाहिलें तर प्रत्येकाला समतेच्या दृष्टीनें सामाजिक क्षेत्रांत कार्य करण्यालासुद्धां पूर्ण अवकाश अगर संधी नाहीं. तथापि, कायद्याची समतासुद्धां व्यापक अर्थानें कार्यप्रवण केल्यास कांहीं सामाजिक समतेचा भाग त्या ठिकाणीं येऊं शकतो. प्रत्येक जण मतदार आहे व वयांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीला राजकीय क्षेत्रांत समान हक्क आहेत. श्रीमंताच्या मताला गरिबाच्या मतापेक्षां अधिक किंमत नाहीं. शिक्षिताच्या मताला अशिक्षितांच्या मतापेक्षां अधिक किंमत नाहीं. विश्वविद्यालयाचीं दारें सर्वांना खुलीं आहेत, पण गरिबांचीं बुद्धिमान् मुलें पैशाच्या अभावीं प्रवेश करूं शकत नाहींत. कारकुनी अगर गिरणींत मजुरी करणें त्यांना भाग पडतें. सर्वांना शिक्षण आहे हें खरें व्हावयाचें तर शिक्षण घेतां येण्यासारखी आर्थिक परिस्थिति सर्वांची व्हावयास पाहिजे. सारखी पात्रता असून पैशाच्या विषमतेमुळें अथवा साधनांच्या विषमतेमुळें विषमताच उत्पन्न होते आणि म्हणून जर सामाजिक क्षेत्रांतून व आर्थिक क्षेत्रांतून अधिक अधिक समता उत्पन्न होईल, तर कायद्यांतील समतेंत पण अधिक सार्थता येईल. वैयक्तिक लायकी, आर्थिक साधनें, सामाजिक प्रतिष्ठा या सर्वांना समतेच्या वातावरणांत आणावयाचें हें राज्याचें काम आहे व तसें झालें म्हणजेच व्यापक अर्थानें कायदा हा सर्वांना सारखा आहे हें खरेंच आहे. प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिशः स्वातंत्र्याची व समतेची त्याच्या विकासार्थ जरुरी आहे, आणि सर्वांना या गोष्टी हव्या आहेत. म्हणून सर्वांच्या हितसंबंधांत एकवाक्यता असावी याचाच अर्थ भ्रातृभाव.

भ्रातृभावाची कल्पना काय किंवा समतेची कल्पना काय, या दोन्ही स्वातंत्र्याच्या कल्पनेंतून निर्माण होतात आणि त्याच्याशिवाय स्वातंत्र्याला पूर्णता नाहीं हें प्रमेय या ग्रंथांत पुनः पुन्हा प्रतिपादलें आहे. व्यक्तीच्या विकासासाठीं समाजाचें नियंत्रण व नियमन करणारी व्यवस्था म्हणजे राज्य आणि हा संबंध लक्षांत घेतां जें स्थूल मानानें व्यक्तींत, तेंच सूक्ष्म दृष्टीनें व तात्त्विक दृष्टीनें समाजांत आणि त्याचाच अभिप्राय राज्य या कल्पनेंत प्रतिबिंबित होतो. पोहण्याचे नियम अगर पोहण्यासंबंधींचें सर्व कांहीं पाण्याला सोडून अगर अधिक सूक्ष्मतेनें बोलावयाचें झाल्यास जलसंचयाला सोडून सांगतांच येत नाहीं; त्याचप्रमाणें व्यक्तीबद्दल बोलावयाचें झाल्यास समाज व राज्य यांचा संदर्भ व संबंध यथा प्रमाणांत आल्याशिवाय बोलतां येत नाहीं. सामान्यपणें मनुष्य तरी काय इच्छीत असतो हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. मनुष्य हा प्राणी बुद्धिमान् आहे, विवेकी स्वभावाचा आहे असें सामान्यपणें मानलें जातें आणि मग विवेकी जीवन जगणें हें सुद्धां एक त्याचें ध्येय होऊं शकतें. प्रत्येक व्यक्तीनें असें वागावें कीं, जें ध्येय सामान्य असेल. सर्वांना आहे तें सर्वांना साधारणपणें आचरतां आलें पाहिजे. कोणीहि व्यक्तीनें अन्य व्यक्तीचा उपयोग त्याच्या या ध्येयाला विसंगत होईल, असें करतां कामा नये आणि या वागण्यांतच स्वातंत्र्यहि आहे. व्यक्तीच्या दृष्टीनें व राज्याच्या दृष्टीनें नियमन व मर्यादा पण आहे. या स्वाभाविक मर्यादा राज्य कायद्याच्या द्वारा स्पष्ट करीत असतें. पण एक गोष्ट वरील सिद्धान्त मान्य केल्यास स्पष्ट होते कीं, राज्य हें स्वतंत्र आहे. आपल्या मताप्रमाणें वागण्यास मोकळें आहे. त्यांचा संघ आणि त्या संघांत अगर राज्यांत त्याच्या कायद्याच्या मर्यादेंत कोणालाहि बंधन असूं शकत नाहीं. अर्थात् हें बंधन कायद्याच्या दृष्टीनें झालें, म्हणजे राज्याच्या संदर्भात झालें. तथापि, राज्याबरोबर समाज पण आहे व समाजाचा व राज्याचा संबंध लक्षांत घेतां राज्याचें पाऊल समाजांतल्या सर्व जीवनक्षेत्रांत येऊं देत नाहीं. जेथें राज्य व समाज हे अविभाज्य झाले अथवा त्यांच्यांत सायुज्यतेचा भाव उत्पन्न झाला, तर काय परिस्थिति होईल हें सांगणें कठीण. सोविएत समाज याहि राज्यव्यवस्थेंत समाजजीवन हें एक थोडें स्वतंत्र असें जीवन अजूनहि आहे.आणि म्हणून स्वातंत्र्याचा विचार करतांना केवळ कायद्यानें प्रतिष्ठित केलेलें, सुस्थापित केलेलें, गौरविलेलें अगर ग्वाही दिलेलें स्वातंत्र्य एवढाच अर्थ न घेतां समाजाच्या जीवनांतील स्वातंत्र्याचा विचार केला पाहिजे. समाजामध्येंहि पण व्यक्ति दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड न येतां आपलें स्वातंत्र्य भोगण्यास मुक्त असली पाहिजे. मोकळीक असली पाहिजे. सामाजिक क्षेत्रांतील स्वातंत्र्य, कायद्याच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ, राज्यकायद्याच्या प्रतिष्ठेसाठीं कानसलें जातें, त्यावर आक्रमण केलें जातें आणि हें करणें व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठींच आहे असेंच प्रतिपादलें जातें. एखाद्या दरोडेखोरानें वाटसरूला गांठून संपत्तीचें ओझें हलकें करतों असें म्हणून डबोलें न्यावें असेंच थोडेंसें दिसून येतें. सामाजिक जीवनक्षेत्रांत धार्मिक स्वातंत्र्याला महत्त्व आहे आणि तें धार्मिक स्वातंत्र्य असणें व्यक्तीच्या विकासाच्या

दृष्टीनें इष्ट आहे. मंदिरें, मशिदी, गुरुद्वारें यांचा दुरुपयोग होतो, म्हणून तीं नष्ट करणें बरोबर नाहीं व धर्म ही अफूची गोळी आहे असें म्हणून उच्चाटण करणें हेंहि अयुक्त आहे. धर्माच्या नांवाखालीं संपत्तीचा संग्रह मर्यादित करणें यांत राज्यानें कांहीं हस्तक्षेप केल्यास तो अयोग्य असें म्हणतां येणार नाहीं. राज्य हें व्यक्तीच्या विकासासाठीं आहे. आणि समाजांतील संपत्ति जर विषमतेमुळें अगर तिच्या विकृत उपयोगामुळें समाजामध्यें अन्याय अगर अशांतता होऊं लागली, तर राज्याच्या कायद्यानें मध्यस्थी केल्यास धार्मिक स्वातंत्र्यावर गदा येते हें म्हणणें पटण्यासारखें नाहीं. आणि सामाजिक जीवनांत केवळ राज्याचीच शक्ति प्रभावी असते असें नव्हे, तर मागें सांगितल्याप्रमाणें सामाजिक शक्ति पण आपला प्रभाव पाडीत असते. जातीबाहेर टाकणें, पतित म्हणून जाहीर करणें, अपंक्त ठरविणें इत्यादि गोष्टी सामाजिक शक्तीच्या निदर्शक आहेत. विधवा स्त्री रस्त्यांत दिसली असतां अगर अस्पृश्य जातीचा मनुष्य रस्त्यांत दिसला असतां त्यांना अपशकुनाचा मानणें म्हणजे एकप्रकारें अन्याय न करतां सामाजिक शिक्षा भोगणेंच आहे. सामाजिक जीवनांत पुष्कळ व्यवसायांतून व्यवसायांतील नीती-प्रमाणें समाजशक्ति प्रायश्चित्त देत असते. अमक्याच्या घरीं काम करावयाचें नाहीं, अमक्याचीं लांकडें फोडावयाचीं नाहींत, इत्यादि गोष्टी अजूनहि क्वचित् क्वचित् आढळून येतात. जसजसें जग आधुनिक होत गेलें त्या त्या प्रमाणांत सामाजिक शक्ति म्हणजे तिचें दंडस्वरूप कमी होत गेलें हें खरें; आणि म्हणून जर सामाजिक शक्ति अन्याय्य रीतीनें दंड देऊं लागली, तर सामाजिक स्वातंत्र्यासाठीं कायद्यानें मध्यस्थी करणें हें योग्य ठरतें. आणि त्यांत सामाजिक स्वातंत्र्य कमी होत नसून सामाजिक स्वातंत्र्य यथार्थपणें उपभोगण्याचें वातावरण निर्माण केलें जातें.

येथपर्यंत स्वातंत्र्य म्हणजे केवळ कायद्यान्वित स्वातंत्र्य एवढेंच नसून सामाजिक स्वातंत्र्यहि पण मौलिक स्वातंत्र्याच्या कल्पनेंत येतें आणि कायद्यान्वित स्वातंत्र्यासाठीं सामाजिक स्वातंत्र्यावर जसें प्रसंगीं आक्रमण होतें, तसेंच कायाद्यान्वित स्वातंत्र्य सामाजिक स्वातंत्र्यासाठीं पण उपयोगांत आणण्यांत येतें. कारण राज्य हें 'सर्वशरण्यम्' स्वरूपाचें असतें, म्हणजे अंततो गत्वा अखेरचा आधार राज्य हें असतें. स्वातंत्र्य हें एक नाहीं, त्याचीं स्वरूपें एकाहून अधिक आहेत. इतकेंच नव्हे, तर जें कायद्यन्वित स्वातंत्र्य आपण म्हणतों तेंसुद्धां एकाहून अधिक स्वरूपाचें असतें. पण येथें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, कायद्यान्वित स्वातंत्र्य हें श्रेष्ठ, अंतिम, तथापि अमर्याद अगर निरपेक्ष नाहीं. प्रत्येक व्यक्ति ही स्वतंत्र आहे, याचा अर्थ ती निरपेक्षपणें, निरंकुशपणें स्वतंत्र आहे असा नाहीं. प्रत्येक व्यक्तीचें स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठीं मर्यादित असतें. सर्वांनीं स्वातंत्र्य भोगावयाचें हें पण क्रमाक्रमानें नव्हे, तर एकाच वेळीं एकाच समयीं; आणि म्हणून तें स्वातंत्र्य सर्वांना सारखें आणि सर्वांना समान असावें लागतें. मला सायकलवरून वाटेल त्या रस्त्यावरून जाण्याचा हक्क आहे, याचा अर्थ इतरांना

तसलाच जो हक्क आहे त्याला बाध न येतां मला तो वापरावयाचा आहे. अन्यथा माझ्या सायकलनें सुखाऐवजीं अपघात व्हावयाचे. सामाजिक जीवनांत स्वातंत्र्याचे अधिकार सर्वांना असल्याकारणानें प्रत्येकानें मर्यादा सांभाळून ते वापरावयाचे असतात. धंद्यामध्यें मी भांडवल घातलें, मी कारखाना उभारला, तेव्हां मला वाटेल तो माल मी उत्पादन करीन, मला वाटेल तो कामगार अगर कारकून ठेवीन, मला वाटेल तितका पगार मी त्यांना देईन, इतकें व्यापक स्वातंत्र्य अगर अमर्याद स्वातंत्र्य आधुनिक समाजांत पुंजीपतीला असूं शकत नाहीं. मालकाचें अगर पुंजीपतीचें स्वातंत्र्य समाजांतील अन्याच्या स्वातंत्र्याशीं व विशेषतः काम करणाऱ्या कामगारांच्या स्वातंत्र्याशीं तें विसंगत नसलें पाहिजे. कसें काम करावयाचें, काय वेतन घ्यावयाचें, कोणत्या परिस्थितींत काम करावयाचे या बाबतींत कामगार हा स्वतंत्र असला पाहिजे. त्यालाहि कामाच्या शर्ती व परिस्थिति निश्चित करण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे. याचा अर्थ असा कीं, प्रत्येक व्यक्तीचें स्वातंत्र्य सापेक्ष आहे व सशर्त आहे. याचाच अर्थ असा कीं, हें स्वातंत्र्य नियमित झालें पाहिजे, नियंत्रित झालें पाहिजे. आणि याचाच अर्थ असा कीं, जेथें नियमन नाहीं तेथें मग प्रत्येकाला स्वातंत्र्य नाहीं. कांहींना असेल, कांहींना असणार नाहीं. स्वातंत्र्याची कल्पना भूमितींतल्या सिद्धान्ताप्रमाणें निरपेक्ष, कालातीत, समाजसंदर्भरहित अशी असूं शकत नाहीं. स्वातंत्र्य हें बर्कच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे प्रभावी, नैतिक पण नियमित असें असलें पाहिजे आणि या बाबतींत मतभेद होण्याचें कारण नाहीं. केवळ व्यक्तीव्यक्तीच्या दृष्टीनें स्वातंत्र्याचें नियमन अवश्य आहे; एवढेंच नव्हे, तर तेथें थोडी नैतिकतेची पण भावना आहे. सर्वांना स्वातंत्र्य असणें ही नैतिक गरज आहे, ती व्यक्तीची नैतिक गरज आहे, हें पूर्वी सांगितलेंच आहे आणि त्या नैतिक गरजेंतून स्वातंत्र्याच्या कल्पनेचा उगम झाला हें मानल्यानंतर जी कांहीं स्वातंत्र्याची व्यवस्था असेल ती मग त्या मौलिक नैतिक कल्पनेशीं जुळणारी असली पाहिजे. याचाच अर्थ त्याहि दृष्टीनें स्वातंत्र्याचें नियमन झालें पाहिजे. ही नैतिक गरज व्यक्तीची आणि ती कुणी तरी कल्पनाबाह्य व्यक्ति नव्हे, तर निश्चित व साकार स्पष्ट व्यक्तित्व असलेली व कांहीं तरी हेतु धरून वागत असलेली अशी ती व्यक्ति मानलेली आहे. आणि तिची गरज, तिची नैतिक गरज, म्हणून स्वातंत्र्याची कल्पना प्रस्तुत ठरली आहे. व्यक्तीव्यक्तींतील संबंध असो अगर मूळ नैतिक गरजेच्या विचारानें असो, कुठल्याहि दृष्टीनें विचार केला तरी स्वातंत्र्याचें नियोजन हें क्रमप्राप्त व अपरिहार्य ठरतें. राज्यांत अनिर्बंध स्वातंत्र्य कोणालाहि नाहीं, जें स्वातंत्र्य आहे तें सापेक्ष व नियमनसहित आणि असें आहे म्हणूनच सर्वांना तें जास्तींत जास्त प्रमाणांत उपलब्ध होऊं शकतें व हें प्रमाण ठरवितांना प्रत्येकाची गरज लक्षांत घेतली जाते. प्रत्येकाची सामान्य गरज लक्षांत घेतली जाते, प्रत्येकाची विशेष गरजहि लक्षांत घेतली जाते, पण प्रमाण ठरवितांना सर्वांचा स्वातंत्र्याचा हक्क मानला जातो. स्वातंत्र्य याप्रमाणें नियमन-

सहित जरी असलें, त्याचें प्रमाण जरी ठरलेलें असलें, तरी तें स्वातंत्र्य यांत शंका नाहीं. कस्तुरीचा कण असेल अगर गोळा असेल, पण ती कस्तुरी. अधिक विचार केला असतां निरपेक्ष व नियमनरहित स्वातंत्र्य म्हणजे अनेकांना स्वातंत्र्याचा अभाव व उरलेल्यांच्या स्वातंत्र्यांत अनिश्चितता, आणि जर स्वातंत्र्य सापेक्ष व नियमनसहित असेल, तर यथार्थ अर्थानें तें प्रमाणानें व प्रतीनें व्यक्तिशः व समष्टिशः अधिक चांगलें असा इतिहासाचा अनुभव आहे.

कायद्यान्वित स्वातंत्र्य असा नवा शब्दप्रयोग अंमलांत आणला आहे. त्यामध्यें कायदा व स्वातंत्र्य यांचा संबंध सूचित केला आहे. राज्यांत न्याय मिळावयाचा तर स्वातंत्र्य हवें हें सांगतांना स्वातंत्र्याला साधन केलें असून न्यायाला साध्य मानलें आहे व साध्य–साधनांत असा अनुभव अनेक वेळां येतो कीं, दोन्हीहि एकमेकांत विलीन झालेलीं दिसतात. तसें याहि ठिकाणीं आहे. कायदा व स्वातंत्र्य यांतील संबंधाचें अधिक विवरण पुढें करण्याचें योजलें आहे. येथें एवढें सांगणें जरूर आहे कीं, स्वातंत्र्य हेंहि कायदा आहे, किंबहुना कायद्यांतील एक महत्त्वाचा भाग आहे एवढें सांगणें पुरें होईल. कायदा याचा अर्थ कोंडवाड्याचा कायदा अगर देवी टोंचण्याचा कायदा असा नसून कायदेभाव हा अर्थ आहे. ज्याप्रमाणें विद्या म्हणजे अमुकच विद्या नव्हे व व्यापक अर्थानें ती मानली जाते, त्याप्रमाणें येथें भाववाचक असा कायदा हा शब्द वापरला आहे. इंग्रजी समाजांत कायदा प्रचलित असतो याचा अर्थ कायद्यासंबंधीं ज्या कल्पना आहेत त्या प्रचलित असतात हा त्याचा अर्थ आहे. पुष्कळ वेळां अमुक एक कायदा कायद्याला धरून नाहीं असें म्हणतों, याचा अर्थ कायद्याबाबत ज्या मुख्य व मौलिक कल्पना आहेत त्यांना धरून नाहीं असाच अर्थ आपण त्याचा घेतों आणि जेव्हां कायद्यांप्रमाणें राज्य चाललें आहे असें म्हणतों, त्यावेळीं प्रत्यक्ष स्वातंत्र्यच त्या कायद्याद्वारें वावरत असतें. कायदा व स्वातंत्र्य आधुनिक राज्यांतून तरी विच्छेद करून घेत नाहींत. तथापि सदासर्वदा त्यांत मतैक्य असतेंच असें नाहीं. स्वातंत्र्याचीं स्वरूपें जशीं भिन्न त्याप्रमाणें भाववाचक कायद्याचीं पण स्वरूपें भिन्न असूं शकतात. स्वातंत्र्याचीं स्वरूपें व क्षेत्रें भिन्न असतात, याचा थोडा उल्लेख सामाजिक स्वातंत्र्याचा विचार करतांना केला आहे. स्वातंत्र्याचा विचार करतांना त्याचीं तीन स्वरूपें उघड उघड डोळ्यांपुढें येतात. एक व्यक्तीचें व्यक्ति या नात्यानें असलेलें स्वातंत्र्य अगर नागरिक स्वातंत्र्य. ब्लॅकस्टोन या राजनीतिशास्त्रज्ञानें नागरिक स्वातंत्र्याचे पण तीन प्रकार कल्पिले आहेत. जीवन व स्वास्थ्याबाबत, इतकेंच नव्हे, तर प्रतिष्ठेबाबत संरक्षणाचें स्वातंत्र्य. दुसरें. व्यक्तीचें विहारस्वातंत्र्य. जेथें कोठें त्यास जावयास पाहिजे तेथें जाण्याचें हें स्वातंत्र्य आणि तिसरें, मालमत्तेबाबतचें स्वातंत्र्य. म्हणजे आपल्या संपत्तीचा वापर, उपभोग अगर वासलात लावण्याची स्वतंत्रता. आधुनिक घटनांतून हीं स्वातंत्र्यें सामान्यपणें रक्षण करण्याची व्यवस्था असते. भारताच्या संविधानांत पण मौलिक

अधिकार या प्रकरणांत ही व्यवस्था दिली आहे. आधुनिक भाषेमध्यें या स्वातंत्र्याचें वर्गीकरण शरीरस्वातंत्र्य, बौद्धिक स्वातंत्र्य, आणि व्यवहारस्वातंत्र्य असें करण्यांत येतें. प्रत्येक व्यक्तीला आपल्या शरीराचें संरक्षण करण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे. त्याप्रमाणें फिरण्याचें, जेथें वाटेल तेथें जाण्याचें. बौद्धिक स्वातंत्र्यांत विचारस्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्य येतें. व्यवहारविषयक स्वातंत्र्यांत कोणाशीं कसें वागावें, कोणाबरोबर व्यवहार करावा, कोणाबरोबर करार करावा, याचा समावेश होतो. या सर्व स्वातंत्र्यांचा उल्लेख नागरिक स्वातंत्र्यें या समावेशक शब्दांत करतां येईल. नागरिकस्वातंत्र्याबरोबर व्यक्तीला राज्याचे नागरिक या नात्यानें अलग असें एक स्वातंत्र्य असतें. राज्याचा तो नागरिक आहे, राज्य हें एक संघटन आहे, आणि त्याचा सदस्य या नात्यानें तें स्वातंत्र्य आहे. त्या स्वातंत्र्याला राजकीय स्वातंत्र्य म्हणतां येईल. एके काळीं या राजकीय स्वातंत्र्याचें स्वरूप अभावात्मक होतें आणि त्यांत नागरिकानें काय करावें यापेक्षां राज्यसत्तेनें काय करूं नये, यावर भर होता आणि इंग्लंडच्या इतिहासांत स्वातंत्र्यांची अभावात्मक व्याख्या करण्यांत एकप्रकारें ऐतिहासिक परिस्थिति कारण झाली होती. ज्या ठिकाणीं राज्यसत्ता ही आपल्यापेक्षां कांहीं निराळी आहे आणि तिच्या आक्रमणापासून आपल्याला सुरक्षित राहावयाचें आहे हा भाव असेल तेथें राजकीय स्वातंत्र्य हें विरोधात्मक असल्यानें अभावात्मक स्वरूपाचें होतें. नागरिक म्हणून माझें शरीर व वित्त यांचें संरक्षण करण्याचा हक्क आहे. नागरिक म्हणून माझीं दुःखें दूर व्हावींत हें सांगण्याचा हक्क आहे. न्याय मिळावा म्हणून कोर्टात जाण्याचा हक्क आहे. या सर्वांमागें राज्य व व्यक्ति यांत विभिन्नतेचा, द्वैतपणाचा भाव होता. आज राज्य अगर राज्यसत्ता ही नागरिकापासून निराळी नाहीं. सरकार अथवा राज्यसत्ता हें कांहीं तरी हत्तीच्या कानांतून उगवलेलें अगर स्वर्गातून खालीं आलेलें असें कांहीं नसून आम्हीच नागरिकांनीं तें निर्माण केलें आहे. आमच्यापासून तें जन्मलें आहे. म्हणून आमच्यांत व त्यांत द्वैत आहे. या पार्श्वभूमींत राजकीय स्वातंत्र्य हें भावात्मक स्वरूपाचें ठरतें. आम्हींच ठरविलें कीं, सत्तेच्या पालखींत अमुकानें बसावें व आम्ही ती वहावी. कंटाळा आला कीं, अगर ठराविक वेळ झाली कीं, पालखींत बसणारा पालखी वाहणारा होतो व पालखी वाहणारा पालखींत बसतो. जें स्वातंत्र्य आहे तें कोणी तरी उत्पन्न केलेलें, सरकार मर्यादित करण्याचें नसून सरकारच उत्पन्न करण्याचें आहे. त्याचें नियंत्रण करण्याचें आहे, तें कसें चालावें हें ठरविण्याचें आहे. जें सरकार असणार आहे तें कोणी तरी लादलेलें नाहीं तर तें आम्हीं स्वीकारलेलें आहे. किंबहुना आम्हीं निवडून दिलेलें आहे. हा कार्यात्मक भाव आज राजकीय स्वातंत्र्यांत दिसून येतो. निवडणुकीनें सरकार अस्तित्वांत येतें. सतत आणि सामान्यपणें विचारविनिमय व चर्चा होऊन तें कार्यान्वित होत असतें, नियंत्रित होत असतें व या क्रियेंत प्रत्येक नागरिक यथाशक्ति भाग घेत असतो.

व्यक्तिगत स्वातंत्र्य त्याचप्रमाणें नागरिक या नात्यानें असलेलें स्वातंत्र्य ज्याला राजकीय स्वातंत्र्य म्हटलें जातें, हीं तर दोन असलीं पाहिजेच ; पण त्याचबरोबर राज्यामध्यें आर्थिक स्वातंत्र्य व्यक्तीला असलें पाहिजे व तेथें त्या व्यक्तीचें नातें श्रम करणारा कामगार अगर कारकून या नात्यानें तें असलें पाहिजे. श्रम मग ते शारीरिक असोत किंवा मानसिक असोत, राज्यांत ते होत असले पाहिजेत. ते श्रम मग सरकारी क्षेत्रांत असोत अगर खाजगी उत्पादनक्षेत्रांत असोत, केलेल्या श्रमापासून ती श्रम करणारी व्यक्ति आपली उपजीविका चालवीत असते. समाजाच्या दृष्टीनें व्यक्तिगत स्वातंत्र्य महत्त्वाचें आहे. राजकीय दृष्टीनें नागरिकस्वातंत्र्य महत्त्वाचें ; पण आर्थिक स्वातंत्र्य हें दोन्ही दृष्टींनीं महत्त्वाचें आहे. आर्थिक स्वातंत्र्याची कल्पना ही गेल्या शंभर वर्षांत प्रामुख्यानें पुढें आली आहे. राजकीय स्वातंत्र्य असलें म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य आहेच, असें कांहीं मानतात. कित्येक व्यक्तिगत स्वातंत्र्यांत तें आलें असेंहि मानतात. आणि कित्येकांच्या मतें ही आर्थिक स्वातंत्र्याची कल्पना अनावश्यक आहे व त्यामुळें विचारांत थोडी क्लिष्टता येते, असेंहि प्रतिपादलें जातें. आणि जर आर्थिक स्वातंत्र्याची कल्पना निराळी मांडली, तर धार्मिक स्वातंत्र्याची कल्पना पण कां निराळी असूं नये असें विचारलें जातें. धार्मिक स्वातंत्र्य हें उघड उघड व्यक्तिगत स्वातंत्र्यामध्यें समाविष्ट आहे. व्यक्तिगत स्वातंत्र्यें अथवा नागरिक स्वातंत्र्यें हीं एका दृष्टीनें एकच आहेत. नागरिक स्वातंत्र्य हें राजकीय स्वातंत्र्यावर अधिक भर देत असल्यानें त्याला राजकीय स्वातंत्र्य असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. पण आर्थिक स्वातंत्र्य हें नागरिक स्वातंत्र्याशीं, व्यक्तिस्वातंत्र्याशीं संबंध ठेवीत असलें तरी त्या स्वातंत्र्याच्या कल्पनेंत सबंध समाजांतील आर्थिक संबंधांचा विचार समाविष्ट असतो आणि त्या दृष्टीनें आर्थिक स्वातंत्र्य या कल्पनेला आधुनिक जगांत महत्त्व प्राप्त झालें आहे. सर्व आर्थिक सामाजिक संबंधांशीं आर्थिक स्वातंत्र्याचा संबंध येत असल्यानें राजकीय स्वातंत्र्य पण आर्थिक स्वातंत्र्यासाठीं व स्वातंत्र्याच्या दृष्टीनें विशेष महत्त्व पावतें. सर्व तर्क व शब्दजंजाल बाजूला सारून असेंहि म्हणतां येईल कीं, नागरिक स्वातंत्र्यांत सर्व स्वातंत्र्यांचा समावेश होतो. स्वातंत्र्याच्या कोणत्या स्वरूपावर अधिक भर द्यावयाचा एवढेंच तारतम्य ठेवलें म्हणजे सर्व कल्पना सुगम होतात आणि एकाच उगमांतून निरनिराळे प्रवाह निघतात. त्याप्रमाणें हीं तिन्ही स्वातंत्र्यें वस्तुतः एकच आहेत व अगदीं खऱ्या अर्थानें असलीं तर तिन्ही असतात, नाहीं तर जें स्वातंत्र्य असेल तें तकलुपी व दिखाऊ असतें. नागरिक व मतदार या नात्यानें जर राज्य कसें चालवावयाचें याबाबत नागरिकाला स्वातंत्र्य आहे, तर त्याच्या जीवनाला अवश्य असणारी व सांगता देणारी अशी अर्थव्यवस्था समाजांत असली पाहिजे हें सांगण्याचें स्वातंत्र्य व अधिकार असला पाहिजे. त्याचें व्यक्तिगत स्थान आर्थिक व्यवस्थेंत व समाजांतील आर्थिक संबंधांत काय असलें पाहिजे, एवढें सांगण्यापुरता त्याचा अधिकार

अगर त्याचें स्वातंत्र्य मर्यादित नाहीं. समाजाच्या दृष्टीनें सर्व आर्थिक व्यवस्था कशी असावी, त्यांस उद्योगांची मांडणी कशी असावी, व्यापाराची विण कशी असावी, हेंहि सांगण्याचा त्याला अधिकार आहे. या विचारसरणींत त्याच्या राजकीय स्वातंत्र्यांतून आर्थिक स्वातंत्र्याचा अधिकार उगम पावलेला दिसून येतो. राजकीय स्वातंत्र्य ही एक वस्तुस्थिति आहे, एक तथ्य आहे, आणि त्यांतून जें अध्याहृत होतें तें स्पष्ट केलें आणि त्याला आर्थिक स्वातंत्र्य नांव दिलें असें म्हणतां येईल. कांहींच्या मतें जोंपर्यंत आर्थिक स्वातंत्र्य नाहीं तोंपर्यंत राजकीय स्वातंत्र्य हें वास्तविक होत नाहीं व त्यांत तथ्य दिसून येत नाहीं. आजीविकेसाठीं, टीचभर पोटासाठीं ज्यानें आपले शारीरिक श्रम विक्रीची वस्तु केली आहे आणि ज्यामुळें व्यक्तिगत स्वातंत्र्य असें राहिलें नाहीं व ज्यामुळें आर्थिक स्वातंत्र्य असें राहिलें नाहीं तो मनुष्य यथार्थतया राजकीय दृष्ट्या स्वतंत्र नाहीं, स्वतंत्र नागरिक नाहीं आणि या स्थितींत मग त्याला राजकीय स्वातंत्र्य आहे असें म्हणणें हा एक थट्टेचा प्रकार होतो. पहिल्या विचारसरणींत राजकीय स्वातंत्र्य आधीं त्यानंतर व त्यांतूनच आर्थिक स्वातंत्र्य प्रभावी करावयाचें. दुसऱ्या विचारसरणींत आर्थिक स्वातंत्र्य हें प्रथम. वास्तविक व प्रभावी असलें पाहिजे, म्हणजेच मग राजकीय स्वातंत्र्य आपोआप येतें. दुसरी विचार-सरणी मार्क्सवादी लोकांची आहे. पहिली विचारसरणी प्रागतिकवादाची आहे. जी नवीन प्रवृत्ति दिसून येत आहे ती आर्थिक स्वातंत्र्य हें प्रथम महत्त्वाचें व राजकीय स्वातंत्र्या-साठीं अनिवार्य. केवळ आर्थिक स्वातंत्र्य व्यक्तिगत स्वातंत्र्याचा एक भाग असें मानून चालणार नाहीं. आर्थिक स्वातंत्र्य हें आज राजकीय स्वातंत्र्याचा कणा मानलें गेलें आहे.

राज्याच्या दृष्टीनें विचार करतां नागरिक ही एक व्यक्ति आहे, या दृष्टीनें तिचें स्वातंत्र्य, ती एक नागरिक आहे या भूमिकेच्या दृष्टीनें राजकीय स्वातंत्र्य, आणि नाग-रिक समाजामध्यें श्रम करणारा आहे या दृष्टीनें एक स्वातंत्र्य, असें त्रिविध स्वरूप स्वातंत्र्याचें आहे असें म्हणतां येईल. व्यक्तिगत स्वातंत्र्य हें मन, शरीर व संपत्ति या दृष्टीनें विवरलें जातें. राजकीय स्वातंत्र्य हें सरकारच्या अगर सत्तेच्या उपयोगाच्या दृष्टीनें महत्त्वाचें असतें आणि आर्थिक स्वातंत्र्य हें या दोन्ही स्वातंत्र्यांना यथार्थ कर-णारें केवळ पूरकच नव्हे, तर पोषक स्वरूपाचें आहे. वास्तविक ही तीन एक असून त्यांमध्यें इतिहासकाळांत संघर्ष अगर विरोध उत्पन्न झालेला आढळून येतो. राजकीय स्वातंत्र्यासाठीं व्यक्तिगत स्वातंत्र्यावर आक्रमण झालेलेंहि आढळून येतें. राज्यांत व्यक्तिगत स्वातंत्र्यावर आक्रमण होण्यासाठीं हुकूमशाही परिस्थिति असावी लागते, असें नाहीं. संसदीय लोकशाहीमध्यें बहुमतवाला पक्ष लोकांच्य हितार्थ, लोकांच्या संरक्षणासाठीं मुद्रणस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, तात्पर्य विचारस्वातंत्र्य व संचार-स्वातंत्र्यावरहि आक्रमण करूं शकतो आणि हें सर्व विधिवत् तो करीत असतो म्हणजे कायद्यानें करीत असतो. राजकीय स्वातंत्र्याचें नांव घेऊन करीत असतो. ‘ बिसमिल्ला

की बरकत' असें म्हणून बकरें कापावें, त्याप्रमाणें राजकीय क्षेत्रांत ही मुलाणीगिरी केली जाते. वर्गद्वेष, जातीय कलह, देशाचें संरक्षण हीं सर्व कारणें देण्यामध्यें येतात आणि सर्वच प्रसंगीं तीं यथार्थ असतात असें नाहीं. व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या नांवाखालीं कामगारांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर हल्ला केला जातो हा तर चालू अनुभव आहे. आमचें भांडवल, आमची अक्कल, तेव्हां आमचा अंमल असें भांडवलवाले गणित मांडीत असतात आणि त्यांच्या या गणिताची रीत जास्तींत जास्त नफ्याचें उत्तर यावें म्हणून कामगारांच्या हिताचा छेद अगर उच्छेद म्हणा दिला जातो. मजुराला योग्य वाटल्यास त्यानें राहावें नाहीं तर काम सोडून जावें. मजूर व मालक यांतील संबंध कराराच्या कायद्यानुसार आहेत, त्यांत राज्यसत्तेनें अगर सरकारनें पडूं नये असा दावा मांडला जातो. आणि करारस्वातंत्र्याच्या नांवाखालीं आर्थिक स्वातंत्र्य चिरडलें जातें आणि बिचारे कामगार अगर कारकून वस्तुतः गुलाम बनतात. निराळ्या अर्थानें 'अर्थस्य पुरुषो दासाः' हा अनुभव येतो आणि अशी परिस्थिति जेव्हां लोकशाही जमान्यांत तीव्र होत जाते त्यावेळीं राजकीय स्वातंत्र्य मध्यें पडतें. पण जर या परिस्थितींत बहुमतवाला पक्ष पुंजीपतींच्या आहारीं गेला असल्यास, मालकवर्गाच्या पुरस्कारानें मिंधा झाला असल्यास राजकीय स्वातंत्र्याच्या नांवाखालीं कामगारवर्ग नव्या नव्या कायद्यानें व वटहुकुमानें दाबला जातो. त्यांचीं संघटनें बेकायदेशीर ठरवलीं जातात. जथीमथीनें वागण्याचा त्यांचा हक्क म्हणजे संप करण्याचा हक्क मर्यादित केला जातो. प्रसंगीं तो संपूर्णपणें कानसून काढला जातो. वरील विवेचन लक्षांत घेतां एक गोष्ट स्पष्ट होते कीं, स्वातंत्र्य ही एक सरळ सोपी एकसंधी अशी कल्पना नाहीं, स्वातंत्र्याच्या भावनेंतून प्रेरित होऊन लोक एकत्र येतात, संघटित होतात, प्रयत्नशील होतात, पण त्याजबरोबर स्वातंत्र्याचें विविध स्वरूप स्पष्ट होत जातें. लोक विखरले जातात, विघटित होतात, विसंगत दृष्टिकोन मांडूं लागतात व मग त्याप्रमाणें आचरणहि घडूं लागतें. स्वातंत्र्याच्या निशाणाखालीं एकत्र झालेले निशाणाच्या रंगाबद्दल भांडूं लागतात. तांबडा का तिरंगी, पांढरा का हिरवा आणि मग स्वातंत्र्याच्या नांवाखालीं राष्ट्रांत राज्य चालविण्याची अहमहमिका बाळगणारे हे अनेक जण निर्माण होतात, आणि प्रत्येक जण आपलाच पक्ष हा खरा स्वातंत्र्यवादी असें आग्रहानें व अतिरेकानें गर्जून सांगत असतो. तात्त्विक दृष्ट्या विचार करतांना स्वातंत्र्य म्हणजे न्यायकल्पनेच्या अंतर्गत असणारें एक तत्त्व आणि राज्यांतील कायदा त्या तत्त्वाला अनुसरून असला पाहिजे एवढेंच पहावयाचें असतें. तथापि राज्याचा कायदा व त्यांत अंतर्भूत असलेलें स्वातंत्र्य हें जेव्हां कार्यान्वित होत असतें त्यावेळीं निरनिराळ्या व्यक्तींचें व समूहाचें स्वातंत्र्य यामध्यें जसा समन्वय ठेवावयाचा असतो त्याचप्रमाणें स्वातंत्र्याच्या विविध स्वरूपांतहि समन्वय ठेवावयाचा असतो आणि हें जर करावयाचें तर एकेरी व एकांगी विचारसरणीचा अवलंब करून तें कधींहि होणार नाहीं. न्याय याचा अर्थ

संबंधित हितसंबंधांत अगर व्यक्तींत जास्तींत जास्त समन्वय घडवून आणणें असा केल्यास तें चूक ठरणार नाहीं. स्वातंत्र्याबरोबर समतेचा समन्वय केला पाहिजे. स्वातंत्र्य व समतेबरोबर भ्रातृभावाचा समन्वय केला पाहिजे आणि हें समन्वय करण्याचें कार्य समाजांतील न्यायबुद्धीला करावयाचें असतें. ज्या प्रमाणांत हा समतोल साधेल त्या प्रमाणांत खऱ्या अर्थानें स्वातंत्र्य प्रवावी होत जातें व आज उपस्थित झालेला प्रश्न स्वातंत्र्य का समता असा मग उपस्थित होणार नाहीं. स्वातंत्र्याचा विचार करतांना प्रत्येक व्यक्ति राज्याच्या दृष्टीनें एक स्वतंत्र व्यक्तित्व स्वीकारीत असते व त्या कायदेशीर व्यक्तित्वामुळें (पर्सनॅलिटी) राज्याच्या संदर्भात वागण्यास स्वातंत्र्य असतें. त्याच न्यायानें समतेच्या दृष्टीनें व्यक्तीहि अन्य व्यक्तींप्रमाणें कायद्याच्या संदर्भात समान असली पाहिजे हें उघड ठरतें. येथें जो विचार आपण करीत आहोंत तो व्यक्तीच्या वैध अथवा कायदेशीर व्यक्तित्वाचा, व त्या दृष्टीनें, नैतिक दृष्टीनें अगर नैतिक व्यक्तित्वाच्या दृष्टीनें नव्हे. मनुष्याचें वजन शंभर पौंड असो अगर दोनशें पौंड असो, ट्रामचें अगर रेल्वेचें तिकीट त्याला एकच घ्यावें लागतें. कारण त्या दृष्टीनें सर्व शक्ति समान आहेत. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, सर्व यात्रा करणारे नैतिक दृष्ट्या सारखे आहेत अगर प्रत्येकाची बुद्धि सारखी आहे. किंबहुना प्रत्येकाची पात्रता सारखी आहे, वैध अगर कायदेशीर दृष्टीनें व्यक्तीचें व्यक्तित्व हें समान आहे, याचा अर्थ कायद्याच्या संदर्भात तें सारखें आहे. नागरिकाची प्रतिष्ठा जेव्हां कायदा व्यक्तीला देतो अगर राज्य देतें तेव्हां ती प्रतिष्ठा कमी जास्त असूं शकत नाहीं. सर्वांना ती सारखी दिली जाते. किंबहुना तशी ती सारखी असणें हें अनिवार्य असतें. कदाचित् या दृष्टीनें निरनिराळीं प्रमाणें लावणें राज्याला अशक्य होत असेल. कारणें कांहीं कां असेनात; वैध व्यक्तित्व हें सारखें असतें. विद्यापीठाचा कुलगुरु असो अगर विद्यापीठांत काम करणारा कुली असो, अगर विद्वान् पंडित असो अगर अशिक्षित अक्षरशत्रु मजूर असो, मतदानाच्या दृष्टीनें त्याचें वैध व्यक्तित्व सारखें असतें. कायद्यानें ही समानता दिसत असली तरी जीवनाच्या अन्य क्षेत्रांत ती समानता राहील असें कोणी सांगूं शकत नाहीं, अगर तशी ग्वाही राज्य देऊं शकत नाहीं. शर्यतींतील घोडे ज्याप्रमाणें सुरुवातीस एका ओळींत असतात आणि विजयस्तंभाला जाईपर्यंत कोणी दुसरे अशाप्रमाणें त्यांची स्थिति असते आणि तसें झालें तर त्या बाबतींत त्या विषमतेला राज्य अगर समाज सर्वस्वीं जबाबदार आहे असें म्हणतां येणार नाहीं. राज्य व समाज जास्तींत जास्त अडथळे दूर करील. आनुषंगिक वातावरण निर्माण करील. परमेश्वरानें सर्वांनाच पाय दिले आहेत, पण सर्वांना सारखा वेग दिलेला नाहीं. याचा अर्थ असा कीं राज्यानें सुरुवातीला जास्तींत जास्त समानता असणारी परिस्थिति उत्पन्न केली पाहिजे. निराळ्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे जे हक्क व अधिकार इतरांना आहेत ते व तेवढे मला असले

पाहिजेत आणि सर्वांना समान संधी असली पाहिजे. अमुक धर्माचा म्हणून, अमुक वर्गाचा म्हणून, याप्रमाणें अधिकारांच्या बाबतींत पंक्तिप्रपंच होतां कामा नये आणि कायदेशीरपणें वयांत आल्यानंतर प्रत्येकाला संपत्तीबाबत जे कांहीं अधिकार असतील तेहि समान असले पाहिजेत. जें कायदा देईल त्यांत समानता असेल, याचा अर्थ प्रत्येकाला समान पात्रता त्यांतून मिळेल असा मात्र नाहीं. त्याप्रमाणेंच सर्वांना सारखे हक्क याचा अर्थ सर्वांना सर्व गोष्टी समान रीतीनें मिळतील येथपर्यंत तो अर्थ ताणतां येणार नाहीं. जोंपर्यंत कायदा कायद्याच्या दृष्टीनें समानतेच्या तत्त्वावर कार्यप्रवण होत आहे तोंपर्यंत त्या राज्यांत समानता आहे हें मान्य केलें पाहिजे. या तात्त्विक पार्श्वभूमी-मुळें पुष्कळ वेळां समानतेचा पूर्ण अर्थ लक्षांत येत नाहीं. सर्व माणसें कायद्यापुढें समान आहेत, याचा अर्थ त्यांचें कायदेशीर व्यक्तित्व समान आहे. कायदा जसा कमीजास्त होईल त्याप्रमाणें वैध व्यक्तित्व कमीजास्त होतें आणि तें जसें कमीजास्त होईल त्याप्रमाणें या कायद्यान्वित समतेचें स्वरूप कमीजास्त होतें. कांहीं ठिकाणीं असें म्हणणारे लोक होऊन गेले कीं, कायद्यापुढील समानतेचा विचार करतांना व्यक्तीची पात्रता, तिची सामाजिक परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. रेल्वेच्या दृष्टीनें सर्वच एका तिकिटाच्या समानतेचे असले तरी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत ही समता असूं शकत नाहीं व कोणी आणूं म्हणेल तर तें अशक्य आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, सर्वत्र अनिर्बंध-पणें कृत्रिम विषमतेला उत्तेजन मिळालें. केवळ संपत्तीच्या विषमतेमुळें वैध व्यक्तित्व विषम असावें असें म्हणणें योग्य होणार नाहीं. विशेष बुद्धिमत्तेच्या विषमतेमुळें वैध व्यक्तित्व विषम असावें असें म्हणणें युक्त होणार नाहीं. त्याचप्रमाणें वैध अगर कायद्यान्वित व्यक्तित्व (लीगल पर्सनॅलिटी) हें समान आहे म्हणून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत समानतेचा अधिकार सांगणें योग्य होणार नाहीं. कायद्यासमोर समान म्हणून संपत्तींत समानत्व मानणें, सामाजिक क्षेत्रांत समान प्रतिष्ठा अपेक्षणें, त्याचबरोबर नैसर्गिक पात्रतेंतहि समानता असावी अगर आहे हें गृहीत धरून चालणें, हें योग्य होणार नाहीं. मर्यादेपर्यंत वैध व्यक्तित्वांतील समता सामाजिक समतेशीं जुळणारी असावी हें योग्य, पण दोन्ही समतेचीं क्षेत्रें संपूर्णपणें एकच हा दावा टिकणार नाहीं आणि ऐतिहासिक काळांत टिकला नाहीं.

आज आधुनिक जगांत सर्व राजकीय विचारप्रवाह समतेच्या दिशेनें वाहत आहेत. आजची ही मनोवृत्ति व एतद्विषयक दृष्टिकोन मागील काळांत काय झालें याचें सम्यक् ज्ञान असल्याशिवाय समजून येणार नाहीं. गतकाळांत अनेक शतकेंपर्यंत समाजांतील बहुसंख्याक लोकांना कायद्याच्या दृष्टीनेंहि विषम वागणूक दिली जात होती. कायद्यांत विषमता असणें अगर कायद्याच्या दृष्टीनें अन्य क्षेत्रांतील विद्यमान विषमता लक्षांत घेऊन व्यवहार अगर न्यायव्यवस्था चालू ठेवणें हें कांहीं गैर आहे असें वाटत नव्हतें. श्रीमंतानें एखादें कृत्य केल्यास त्याबाबतचा विचार न्यायाधीश निराळ्या दृष्टीनें

करीत. सामान्य माणसाचा सामान्य गुन्हा प्रसंगीं भयंकर मानला जाई. समाजांत काम करण्यास तयार असून, रोजगार मिळत नाहीं हा कांहीं व्यक्तीचा दोष नाहीं. पण कायदा त्या व्यक्तीला उडाणटप्पू समजून त्याच्या स्वातंत्र्याला मर्यादा घाली व त्याच्या हालचालींवर मर्यादा ठेवली जाई. हातांत पैसे असल्याशिवाय अगर नोकरी असल्या-शिवाय नव्या नव्या शहरांतून त्याला प्रवेश मिळत नसे, असेहि दाखले पाश्चात्य देशांत दिसून येत असत. राजकीय क्षेत्रांत तर ही विषमता इतकी स्वाभाविक वाटे कीं, त्याविरुद्ध बोलणें म्हणजे अधर्म मानला जाई, राजद्रोह तो होताच. इंग्लंडमध्यें थोडेसे लोक मतदान करीत ही परिस्थिति १८३२ पर्यंत होती. १९१८ मध्यें वयांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा हक्क मिळाला. भारतांत मतदानाचा हक्क १९५० पर्यंत जे भाडेकरू आहेत, घरमालक आहेत, प्राप्तिकर देणारे आहेत, जमिनी वाहणारे खंडकरी आहेत, जमीनमालक आहेत, एवढ्यांपुरताच मर्यादित होता. ज्याला जमीन नाहीं अगर स्वतः खंडानें घेऊन ती कसत नाहीं व केवळ शेतमजूर आहे, त्याला मतदानाचा अधिकार नव्हता. स्वदेशांत तो उपरा उडाणटप्पू ठरला होता. निरक्षर माणसाला मत नव्हतें. शिक्षित मनुष्यसुद्धां जर पदवीधर नसेल तर, घरभाडें देणारा नसेल तर, घरमालक नसेल तर, तोहि याचप्रमाणें उपरा व राजकीय दृष्ट्या प्रतिष्ठाशून्य होता. तात्पर्य, संविधान झाल्यानंतर स्वतंत्र भारतांत आज प्रौढ व सार्वत्रिक मतदानाचा हक्क दिसून येत आहे आणि म्हणून आतां ही विषमता दूर झाल्यानें व त्या जागीं समता आल्यानें समतेचें मानसिक वातावरण सर्वत्र निर्माण झालें आहे आणि आतां असें म्हणतां येईल कीं, सामान्यपणें वैध व्यक्तित्व हें समान झालें आहे. जात, वर्ग, लिंग अगर धर्म कुठल्याहि दृष्टीनें याबाबत पंक्तिप्रपंच केला जात नाहीं. कायद्यापुढें, राज्याच्या कायद्यापुढें आतां भारतांतील सर्व व्यक्ति समान आहेत. सर्वांना समान अधिकार या बाबतींत आहेत. एवढ्यानें प्रत्येकाला ते अधिकार गाजविण्याची समान संधी अगर समान शक्ति आहे असें मात्र नाहीं. सर्वांना न्याय मिळेल हें खरें. न्यायकोर्टें सर्वांना उघडीं आहेत, पण सर्वांच्याजवळ कोर्ट-फी देण्यासाठीं अगर वकिलाला फी देण्यासाठीं सर्वांजवळ पैसे आहेत असें मात्र नाहीं. कायद्यान्वित समता झाल्यानें सामाजिक व सांपत्तिक समता झाली असा अनुभव येत नाहीं आणि सर्वांना मोकळें असणारें न्यायाचें, शिक्षणाचें क्षेत्र वस्तुतः तसें असत नाहीं. गरिबाचा मुलगा पहिल्या सपाट्यानें पास होऊन पैशाच्या अभावीं पुढील शिक्षण घेऊं शकत नाहीं आणि विश्वविद्यालयाचीं द्वारें उघडीं असून त्याला मात्र प्रवेश करतां येत नाहीं. तसेंच गरिबां-वर झालेला अन्याय, न्याय मिळविण्यासाठीं अवश्य ती आर्थिक सामुग्री नसल्यानें न्यायाचा कांटा त्याच्या बाजूनें झुकत नाहीं. कोर्टांतील नियम व प्रक्रिया या महागाईच्या असतात आणि एका अर्थानें न्याय विकत घ्यावा लागतो, व ती किंमत देण्याइतकी सर्वांची परिस्थिति नसते. पण त्याबरोबर हेंहि खरें कीं, आधुनिक समाजांतून गरीब

पक्षकारांना मदत करणाऱ्या संस्था पण दिसून येतात. पुष्कळ वेळां राज्यहि त्या क्षेत्रांत मदत करीत असतें. तथापि मुख्य प्रश्न म्हणजे ज्याला आपण सामाजिक समता म्हणतों तिचा अनुभव यथार्थ प्रमाणांत समाजांत आला, तर वैध समता अर्थपूर्ण होते. ही सामाजिक समता आणण्याचे प्रयत्न कोणी करावयाचे ? आणि जर राज्यानें करावयाचें म्हटलें तर त्यांतील अडचणी पण समजून घेतल्या पाहिजेत. त्यांतील मर्यादा पण समजून घेतल्या पाहिजेत. जी समता सामाजिक क्षेत्रांत आणावयाची ती स्वाभाविकपणें सांस्कृतिक क्षेत्रांत पण प्रवेश करते आणि आर्थिक क्षेत्रांत तिचा प्रवेश कोणी नाकारूं शकत नाहीं. राजकीय समता हा पहिला टप्पा झाला. सामाजिक समता हा संपूर्ण समतेच्या प्रवासांतील दुसरा टप्पा झाला. सामाजिक समता हा संपूर्ण समतेच्या प्रवासांतील दुसरा टप्पा ठरतो. मतदानाच्या दृष्टीनें सर्व माणसें समान, मग सामाजिक क्षेत्रांत व आर्थिक क्षेत्रांतहि तीं कां समान नसावींत असा प्रश्न उपस्थित होतो. नागरिक या नात्यानें कुठल्याहि सार्वजनिक ठिकाणीं प्रवेश करण्याचा हक्क प्राप्त झाल्यानंतर सार्वजनिक मंडळांतून, सार्वजनिक शिक्षणक्षेत्रांत, सार्वजनिक मनोरंजनाच्या ठिकाणीं, तसेंच सार्वजनिक उपाहारगृहांतून तो नाकारतां येणें अशक्य होतें, आणि म्हणून राज्य आपल्या क्षेत्रांत सामाजिक विषमता नाहींशी करण्यासाठीं हस्तक्षेप करतें. देवळें व मंदिरें खुलीं होतात. सत्याग्रहानें, उपवासानें लोकमताला जागृत केलें असेल, समाजाचा आत्मा जागृत झाला असेल, समाजाची सदसद्विवेकबुद्धि आळविली गेली असेल, तथापि हें सर्व प्रत्यक्ष अनुभवास येण्यासाठीं कायद्याची आवश्यकता असते. कायदा हें प्रभावी लोकमताचें शस्त्र आहे. तें आज्ञास्वरूपी आहे. म्हणजे पालन न केल्यास दंड, पण त्याचबरोबर नैतिक आवाहन स्वरूपाचें तें आहे व तें नागरिकांच्या मनांत असा भाव उत्पन्न करीत असतें कीं, जें कायदा सांगत आहे तें सामान्यपणें, निदान योग्य व न्यायाचें आहे. आणि याप्रमाणें सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रांतून समता प्रस्थापित झाली म्हणजे ती तिसऱ्या टप्प्याकडे प्रवास करूं लागते. शिक्षणक्षेत्रांत समान संधी यथार्थपणें प्रवास करूं लागते. शिक्षणक्षेत्रांत समान संधी यथार्थपणें मिळूं लागली म्हणजे आर्थिक समतेकडे पहिलें पाऊल पडलें असें होतें. यथार्थ संधी, समता म्हणजे ज्याची शिक्षण घेण्याची इच्छा व पात्रता आहे, त्याला त्याकामीं अवश्य असणारी आर्थिक मदत व साहाय्यता राज्यानें केली पाहिजे. शिक्षणक्षेत्रांत विषमता याचा अर्थ सांस्कृतिक क्षेत्रांतहि विषमता. शिक्षणाची संधीच मिळाली नाहीं म्हणजे मनाची प्रगति विशेष होत नाहीं. ज्ञान व विज्ञान याला ती व्यक्ति मुकते आणि मग जे संपत्तिमान् वर्ग असतात ते शिक्षण-संपन्न व संस्कृतिसंपन्न होतात आणि जे दरिद्री वर्ग आहेत ते दोन्ही गोष्टी मिळवूं शकत नाहींत आणि मग समाजामध्यें या दोन वर्गांत सामाजिक विषमतेचें खिंडार मोठ्या प्रमाणांत दिसून येतें. चांगले संस्कार शिक्षणानें येतात असें म्हणण्यानें अन्यथा ते येत नाहींत असें नाहीं. चांगल्या स्वभावाचीं माणसें कोठेंहि, कोठल्याहि परिस्थितींत भेटलीं

तरी रंगेलपणें वागत नाहींत. सभ्यता सोडीत नाहींत व त्यांच्या जीवनांत अहंकार व दंभ यांची दुर्गंधी आढळून येत नाहीं. परंतु जर सर्वत्र शिक्षणाचा स्तर वाढला, तर संस्कृतीहि अधिक व्यापक व अधिक प्रमाणांत दिसून येते. एका चंद्रम्याच्या प्रकाशानें रात्र ही ज्योतिष्मति होते हें खरें. तथापि, अनंत तारेसुद्धां लुकलुकत असतात, म्हणून आकाशाचें सौंदर्य वाढत असतें. परंपरेनें व वांशिक म्हणून अनेक व्यवसाय चांगले होतात. म्हणून त्या कामीं अधिक व आधुनिक ज्ञान देण्याचें कारण नाहीं असें कोणी म्हणाल्यास तें मूर्खपणाचें ठरेल. परंपरागत शेती करणें व शेतीचें शास्त्र समजून शेती करणें, यांतील फरक नाकारतां येणार नाहीं. अक्षर चांगलें आहे पण त्याचबरोबर शुद्धलेखनाचे नियम माहीत असले म्हणजे तेंच लेखन वाचकांना प्रसन्न करतें. त्याप्रमाणें जीवनांत शिक्षण मिळाल्यानें सामान्य आचारविचारसुद्धां उन्नत होतात व त्यांतील सभ्यतेचा स्तर वाढतो. म्हणून शिक्षण-विषयक क्षेत्रांत किमान शिक्षण प्रत्येक व्यक्तीला मिळालें पाहिजे व कोणी अधिक घेऊं इच्छील तर त्याबाबत त्याची सोय राज्यानें केली पाहिजे. शिक्षण किंवा संस्कृति या दोन्ही क्षेत्रांत शंभर टक्के समता उत्पन्न होईल असें कोणी म्हणत नाहीं आणि असें कोणी म्हणेल तर तें उघड उघड मूर्खपणाचें आहे. पहिली गोष्ट ही कीं, व्यक्ति तितक्या प्रकृति व दर पिंडागणिक मति भिन्न ही वस्तुस्थिति निसर्गनिर्मित आहे. ही परिस्थिति नाहींशी करणें अशक्य. व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीनेंहि विचार करतांना कांहीं क्षेत्रांत समता लादल्यास तें त्याच्या स्वातंत्र्यावर आक्रमण ठरतें. सर्वांनीं तींच पुस्तकें वाचावयाचीं, तींच नाटकें पाहावयाचीं, तेच चित्रपट पाहावयाचे यांत समता झाली; पण व्यक्ति-स्वातंत्र्यावर सरळ आक्रमण झालें. साक्रेटिसच्या मनामध्यें जे विचार येतील तेच प्रत्येक सामान्य माणसाच्या मनांत आले पाहिजेत हें करणें अवघड, अशक्य व अपेक्षिणें हें मूर्खपणाचें. विश्वविद्यालयांतील तत्त्वज्ञ मामलेदार, कचेरींत काम करणारा कारकून, कापडाच्या दुकानांत गजानें कापड फाडणारा विक्रेता, बुधवारबागेंत कुंचला व बादली घेऊन उभा राहणारा रंगारी, या सर्वांची मानसिक भूमि समान नाहीं आणि म्हणून त्यांतून समान विचारांचें पीक येणार नाहीं. गुरु सर्व विद्यार्थ्यांना तोच धडा देतो, तथापि परिणाम निरनिराळे घडून येतात, हा सार्वत्रिक अनुभव आहे. आकाशांतून पडलेलें निर्मळ पाणी ज्या भूमींत पडेल तिच्या गुणामुळें निरनिराळ्या रुचीचें बनतें. त्याचप्रमाणें दुसरें असें कीं, समाजामध्यें जें कार्य व्यक्ति करीत असते, त्याला अनुसरून व त्याला उपयुक्त अशी त्याच्या मनाची ठेवण असते अगर होत जाते. चार रेल्वेचे कारकून एकत्र जमले, चार गिरणींतील मजूर एकत्र जमले, चार खासदार एकत्र जमले, म्हणजे प्रत्येक समूहांतील चर्चाविषय निरनिराळे असतात. एवढेंच नव्हे, तर सामान्यपणें आपापल्याच व्यवसायाबद्दल बोलत असतात (टॉक शॉप). या दोन्ही गोष्टींचा विचार करतांना स्वाभाविक विविधता व व्यावसायिक विविध दृष्टिकोन यामुळें

सर्वत्र समता येणें अशक्य व अयोग्यहि ठरतें. तथापि, या दोन्ही मर्यादा सांभाळून जे कांहीं विषमतेचे भाव असतील, प्रकार असतील, ते कमी झाले पाहिजेत हें उघड आहे. सर्वत्र समाजांत एकसारखेपणा असेल तर तेथें शिस्त असेल, पण सौंदर्य दिसेलच असें नाहीं. अनुशासनता नजरेला येईल, पण औचित्य असेल याची खात्री नाहीं. किंबहुना मानवी जीवनांत व विचारांतहि जेवढी विविधता असेल तेवढें सौंदर्य अधिक, सभ्यता व्यापक व प्रगति तीव्रतर बनते. आणि असेंहि म्हणतां येईल कीं, ही विविधता अगर विषमता समतेच्या मौलिक भावाशीं विसंगत नाहीं. समता म्हणजे समानता नव्हे. समता म्हणजे नाणेंवजा सारखेपणा नव्हे. जी समता उत्पन्न व्हावयाची ती व्यक्तिविकासांतून उत्पन्न झाली पाहिजे. व्यक्तीवर संयम लादून अगर मर्यादेनें जखडून टाकून नव्हे. म्हणून समतेचें मुख्य ध्येय म्हणजे व्यक्तीचा विकास. तो ज्यायोगें साधला जाईल अशी गोष्ट समाजांत झाली पाहिजे आणि जर कोणी समतेला समानता समजून कांहीं करूं लागला, तर त्याचा परिणाम समतेच्या मौलिक मूल्यांना कमी करण्यांतच होतो. समतेचें तत्त्व आर्थिक क्षेत्रांत लागू करणें हें अधिक अवघड, आणि तेथेंहि राज्यानें नुसता पुढाकारच घेतला पाहिजे असें नव्हे, तर संपूर्णपणें त्याबाबतची जबाबदारी उचलली पाहिजे. ‘तेन त्यक्तेन भुंजीथाः’ हा उपदेश उपनिषद्‌काळापासून चालूच आहे. जें मिळत नाहीं तें सोडलें जातें. हातांतून मासा निसटला म्हणजे कोळी धर्म केला असें म्हणतो. हाच अनुभव युगानुयुगांचा आहे. जें जरुरीपेक्षां अधिक आहे तें चोरीचें मानलें पाहिजे हा सिद्धान्त जुना. मार्क्सनें अतिरिक्त मूल्याच्या (सरप्लस व्हॅल्यू) सिद्धान्तांत त्याचें आधुनिकीकरण केलें. तथापि, गरजा इतक्या वाढविल्या जात आहेत कीं, जें मिळेल अगर मिळविलें जाईल तें अधिक ठरतच नाहीं. अपुरें वाटत आहे. महत्त्वाकांक्षा व लोभ याला पूर्वीहि मर्यादा नव्हती, आजहि नाहीं. लोकांच्या सद्‌बुद्धीवर समाजांतील निर्माण होणाऱ्या संपत्तीचें वितरण जोंपर्यंत आधारलेलें आहे तोंपर्यंत समाजांतील आर्थिक दृष्ट्या विषमता हाच स्थायिभाव राहील. स्वतःजवळील संपत्ति ही परोपकारार्थ आहे हें प्रत्येक जण सांगण्यास नाखूष नसतो, पण करण्यास कोणी धजावत नाहीं. ‘दानम् समविभागाः’ हें खरें दान म्हणजे संपत्तीची समान अगर सम्यक् वांटणी. तथापि असलें दान कोणी करीत नाहीं. हयातींत कोणी करीत नाहीं. मेल्यानंतर सुद्धां आपल्या इच्छेनुसार मागें ठेवलेल्या संपत्तीचा उपयोग व्हावा, असें मृत्युपत्रानें आदेश देणारे महाभाग असतात. कायदाहि त्याप्रमाणें करण्यास परवानगी देतो. मृताची इच्छा त्यानें मिळविलेल्या संपत्तीवर, तक्षक नागाप्रमाणें पहारा करीत असतो. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतां आर्थिक समता सुखासुखी प्रस्थापिली जाईल हें सुतराम् अशक्य, आणि जरी प्रस्थापित झाली तरी ती टिकेल हेंहि कठीण आहे व तसाच आधुनिक जगाचा अनुभव आहे. तात्पर्य, या आर्थिक समतेसाठीं सर्व खटपट राज्यानें केली पाहिजे. या दृष्टीनें एकोणीसाव्या शतकापासून जगांतील निरनिराळ्या राज्यांतून प्रयत्न

झालेले दिसतात. विसाव्या शतकांत तर या दृष्टीनें फार मोठे प्रयत्न झाले आहेत व होत आहेत. आर्थिक स्वातंत्र्य त्या मानानें मोठ्या प्रमाणांत गेल्या शंभर वर्षांत दिसून येत आहे. तथापि आर्थिक समता मात्र तेवढ्या प्रमाणांत दिसून येत नाहीं. आर्थिक समतेचा विचार दोन दृष्टींनीं करावयास पाहिजे. आर्थिक समता ही एक प्रतिष्ठा आहे या दृष्टीनें, त्याचप्रमाणें आर्थिक समता म्हणजे त्या ठिकाणीं संपत्ति व प्राप्ति यांचाहि विचार येतो. प्रतिष्ठेच्या दृष्टीनें विचार करतांना देशांतील उत्पादनव्यवस्थेंतील संघटन व प्रक्रिया यांचा विचार करावा लागतो. कारखाना आहे तो राष्ट्रीय मालकीचा आहे, तथापि त्यामध्यें काम करणारे कामगार व व्यवस्था पाहणारे व्यवस्थापक यांच्यांतील संबंध कसे आहेत हें पाहिलें पाहिजे. भांडवलशाही व्यवस्थेप्रमाणें म्हणजे आर्थिक विषमतेच्या व्यवस्थेप्रमाणें या दोन्ही वर्गांच्या जीवनमानांत फरक असेल, प्राप्तींत फरक असेल, तर मग समत्वाची प्रतिष्ठा तेथें लाभणार नाहीं. उत्पादन निर्माण केलें किंबहुना प्राप्तीहि कमीजास्त प्रमाणांत सर्वांना सारखी मिळाली, तरी तेवढ्यानें समतेचा भाव उत्पन्न होत नाहीं. उत्पादनाच्या कार्यांत, निर्मितीच्या कार्यांत वरपासून खालपर्यंत उत्पादनाच्या सर्व क्रियेंत काम करणारे हे समान दर्जाचे भागीदार आहेत, या जाणीवेचें वातावरण जर नसेल तर तेथें समताभाव नांदणार नाहीं. म्हणून प्रतिष्ठेच्या दृष्टीनें समताभाव यावा यासाठीं सर्व उद्योगक्षेत्रांत असा संघटनात्मक भाव उत्पन्न झाला पाहिजे कीं, मजूर व मॅनेजर, हातोड्यानें काम करणारे व लेखणीनें काम करणारे, येथून तेथून सर्व समान भूमिकेवर आहेत. या दृष्टीनें विचार करतांना असें स्पष्ट होत जातें कीं, उद्योगधंद्याचें नियंत्रण व नियमन हें सरकारनें हातीं घेतलें तर ही समता शक्य आहे, अन्यथा नाहीं. अर्थात् सरकारनें हें केव्हां करावें, किती प्रमाणांत करावें, कशा तऱ्हेनें करावें, हे सर्व प्रश्न मग अधिक महत्त्वाचे ठरतात. तथापि येथें त्यांचा विचार करणें आवश्यक नाहीं. मुख्य मुद्दा हा आहे कीं, हें समतेचें वातावरण उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा अन्य व्यक्तीच्या प्रतिष्ठेच्याप्रमाणेंच असली पाहिजे. प्रतिष्टा व पत, प्राप्ति व संपत्ति यांत विषमता आहे हेंहि दृश्य बरोबर नाहीं. म्हणून राष्ट्राची संपत्ति आणि चालू प्राप्ति यांतील विषमता दूर करणें हेंहि काम राज्यालाच करावें लागेल आणि या दृष्टीनें संपत्तीच्या वितरणाबाबत तिच्या संग्रहाबाबत आधुनिक राज्यांतून अगदीं भांडवलशाही राज्यांतूनसुद्धां गेल्या साठ वर्षांत प्रयत्न झालेले आहेत. नाना तऱ्हेचे कर लादून चालू प्राप्तींतून राज्य मोठा वांटा घेत आहे. त्याचबरोबर मजुरीचे दर वाढवून, किमान मजुरीचें मान ठरवून, निरनिराळ्या सुखसोयी उपलब्ध करून, सामाजिक कल्याणक्षेत्रांत व्यापक खर्च करून, प्राप्तींतील विषमता कमी करण्याचे प्रयत्न सर्वत्र दिसून येत आहेत. मोफत शिक्षण, मोफत वैद्यकीय मदत इत्यादि गोष्टींचा स्वीकार करून समाजांतील कमी प्राप्तीच्या लोकांचा जीवनस्तर वाढविला जात आहे. ज्याच्याजवळ जरुरीपेक्षां अधिक आहे, त्याच्या दानबुद्धीवर विसंबून न राहतां

आधुनिक राज्य कररूपानें त्याच्या प्राप्तींतून आपला वांटा घेत आहे व ज्यांच्याजवळ नाहीं अगर जरूर त्या प्रमाणांत नाहीं, त्यांच्या सुखसोयींसाठीं याप्रमाणें मिळविलेलें धन राज्य खर्च करीत आहे. जे आर्थिक दृष्ट्या वर आहेत त्यांना खालीं आणण्याची एक क्रिया व जे आर्थिक दृष्ट्या खालीं आहेत त्यांना वर आणण्याची दुसरी क्रिया, या दोन्हींच्या द्वारें आर्थिक समतेचा समतल निर्माण करण्याचा प्रयत्न सर्वत्र चालू आहे. तथापि केवळ कर घेऊन अगर सामाजिक कल्याणाचा कार्यक्रम हातीं घेऊन आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणांत दूर होत नाहीं, हा इंग्लंड व अमेरिकेंतील अनुभव आहे. जरुरीपेक्षां अधिक प्राप्ति झाली म्हणजे मनुष्य बचत करतो. त्या दृष्टीनें बचत करणाऱ्यांची संख्या थोडी अधिक वाढली, असा अनुभव कल्याणकारी योजनेपासून आलेला आहे. नुकतीच या दृष्टीनें कांहीं क्षेत्रांतून पाहणी केली, त्यांत हें दिसून आलें आहे. धंद्यांत मालक व मजूर यांनीं अनेक ठिकाणीं भागीचें तत्त्व मान्य केल्याचेंहि दिसून येत आहे. आणि त्याचा परिणामहि अनेक ठिकाणीं मालकी जी थोड्या लोकांच्या हातांत होती, ती अधिक लोकांच्या हातांत आली हें खरें, तथापि आर्थिक समता प्रस्थापित झाली असें नव्हे. आज अमेरिकेमध्यें भांडवल गुंतविणाऱ्यांची संख्या पूर्वीच्यापेक्षां अधिक वाढली आहे. विमा उतरविणारेहि अधिक वाढले आहेत. हें खरें असलें तरी सर्व समाजांतील व्यक्तींना ह्या व्यापक मालकींत अद्यापि स्थान मिळालेलें नाहीं. पूर्वीपेक्षां अधिक लोक श्रीमान् झाले हें खरें. देशांतील श्रीमंती वाढली हेंहि खरें, तथापि देशांतील दारिद्र्य अगर सांपत्तिक विषमता नाहींशी झाली असें मात्र नाहीं. कोणी खुषीनें उत्पादन भागींत करोत अगर सर्व उत्पादनाचें नियंत्रण व मालकी राज्याच्या हातीं घेवो, याचा निश्चित उद्देश आर्थिक समता स्थापन करण्याचा असला पाहिजे. या बाबतींत अर्धवटपणा चालणार नाहीं. थोडेंसें दिल्यासारखें दाखवून बरेंचसें गिळंकृत करण्याचा प्रयत्न खाजगी क्षेत्रांत जोंपर्यंत चालू आहे, तोंपर्यंत आर्थिक समता खऱ्या अर्थानें प्रस्थापित होईल असें वाटत नाहीं. बऱ्याचशा लोकांना थोडेंसें अधिक मिळाल्यानंतर बरें वाटतें, पण त्याचा परिणाम त्यांच्या नैतिक भावावर होतो. त्यांच्या आचरणावर होतो. इंग्लंडमध्यें गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकींत हेंच दिसून आलें. ज्यांचें जीवनमान वाढलें त्यांनीं ज्यांच्या सहानुभूतीवर, सहकारी प्रयत्नावर हें फळ मिळविलें त्यांनाच ते विसरले. सुखावल्याबरोबर आदर्शापासून ते दुरावले, हेंच मजूरपक्षाच्या पराभवाचें निदान अनेकांनीं केलेलें आहे. सर्व समाज संपन्न झाला तरी आर्थिक समता तेथें खऱ्या अर्थानें असेल असें कोणी सांगू शकत नाहीं. उलट, सधन समाज झाल्यानें (अप-युलेट सोसायटी) नैतिक अधःपतन होतें, असाहि निष्कर्ष आज काढला जात आहे.

वैध समता खऱ्या अर्थानें प्रस्थापित व्हावयाची तर आर्थिक समतेच्या बाबतींत प्रतिष्ठेच्या व प्राप्तीच्या दृष्टीनें बरेंच कार्य करावयास हवें. वैध समता केवळ सिद्धान्त न

राहतां सिद्ध गोष्ट व्हावयाची, तर आर्थिक समतेच्या क्षेत्रांत झपाट्यानें प्रगति झाली पाहिजे. प्रत्येक जण नागरिकत्वाच्या दृष्टीनें समान आहे, एवढें म्हटल्यानें समता साधली जात नाहीं. जोंपर्यंत आर्थिक प्रतिष्ठा व आर्थिक प्राप्ति यांत समत्व नाहीं, तोंपर्यंत वैध समता ही एक आदर्श म्हणूनच अनुभवाला येते. केवळ इच्छा म्हणजे प्राप्ति नव्हे. हवें तें मागितलें म्हणजे तें मिळालें असें कोणी मानत नाहीं. कोर्टापुढें सारखी वागणूक मिळाली, मतदानक्षेत्रांत समानता मिळाली, याचा अर्थ नोकरींत ती मिळाली, असें होत नाहीं. मतदानाचा हक्क मिळाला याचा अर्थ प्रत्येक जण खासदार अगर आमदार होऊं शकत नाहीं. उलट, असा अनुभव येतो कीं, सामाजिक कारणामुळें, पक्षानिष्ठ राजकारणामुळें योग्यतेऐवजीं उपयुक्तता लक्षांत घेतली जाते. सत्यापेक्षां प्रचाराकडे अधिक लक्ष दिलें जातें. सेवेपेक्षां राजकीय सोय ही अंतिम कसोटी ठरते. प्रत्येकाला भाषण करण्याचें स्वातंत्र्य आहे, पण आजकालच्या दिवसांत सभा बोलविणें व तिची व्यवस्था ठेवणें हें पैशाचें काम आहे. आणि एखादी व्यक्ति जरी उत्कृष्ट वक्ता असली, तरी पैशाच्या अगर वशिल्याच्या अभावीं त्याचें वक्तृत्व दरिद्री माणसाच्या मनोरथा-प्रमाणें उत्पन्न होतें व विलयाला जातें. या दृष्टीनें विचार करतांना आर्थिक समता असेल तर, आर्थिक प्रतिष्ठा असेल तर, नागरिकत्व हें खऱ्या अर्थानें व्यक्तीच्या अनुभवाला येतें. समान नागरिकत्वासाठीं आर्थिक समता हवी याचा अर्थ ही आर्थिक समता निरपेक्ष अगर एकमापी असावी असा नाहीं. आर्थिक समतेचा संबंध जसा वैध समतेशीं अगर कायद्यान्वित समतेशीं आपण जोडला त्याचप्रमाणें तो सर्व स्वातंत्र्यांचा व समतेचा मूळ उद्देश जो व्यक्तिविकास त्याच्याशीं पण जोडला पाहिजे. व्यक्तीच्या विकासासाठीं त्याची नैतिक मानसिक पात्रता वाढविण्यासाठीं, त्याला बौद्धिक दृष्ट्या सुसंपन्न करण्यासाठीं, समाज व राज्य हीं अस्तित्वांत आलीं आहेत आणि तो हेतु साध्य करण्यासाठीं स्वातंत्र्य व समता हीं साधनें आहेत. म्हणून ज्या मानानें साधनांचा उपयोग व्यक्तिविकासासाठीं होईल त्या मानानें हीं साधनें व्यक्तीला उपलब्ध झालीं पाहिजेत. केवळ समतेच्या नांवावर येथून तेथून सर्वांना एकमापी आर्थिक क्षेत्रांत वागणूक दिल्यास व्यक्तीचा विकास होण्याऐवजीं उलटेंच होईल व सामाजिक दृष्ट्या आर्थिक संपत्तीचा अयोग्य उपयोग होईल हेंहि संभवनीय आहे. प्रत्येकावर सारखें ओझें घातलें तर न्याय न होतां अन्याय होतो. म्हणून साहवेल तैसें ओझें द्यावें. ऐरावतावर अंबारी घातली पाहिजे. मुंगीच्या पाठीवर कणाचेंच ओझें न्याय्य ठरणार आहे. सामान्य-पणें ही विचारसरणी अमान्य होण्यासारखी नाहीं. मग जो अधिक विचार करावयाचा आहे तो असा कीं, आर्थिक प्राप्ति आणि नैतिक प्रगति व व्यक्तिविकास यांची सांगड कशी घालावयाची ? आणि हा प्रश्न सोपा अगर साधा नाहीं. व्यक्तिविकासासाठीं समान हक्क असले पाहिजेत व वैध व्यक्तित्वांत समता असली पाहिजे, हें मान्य. कोणी यांतून असा सिद्धान्त काढूं शकेल कीं, हें घडून येण्यासाठीं संपत्तीची वांटणी आणि संपत्तीची

मालकी शंभर टक्के सारखी असली पाहिजे, तींत संपूर्ण समत्व असलें पाहिजे. तथापि हा सिद्धान्त थोडा विचार करतांच व्यवहारदृष्ट्या व ज्या हेतूसाठीं हें करावयाचें तो हेतु सिद्ध होणार नाहीं. मग कांहीं तरी निश्चित व व्यावहारिक मार्गदर्शी तत्त्वें या बाबतींत कल्पिलीं पाहिजेत. हातीं आलेल्या संपत्तीचा अगर साधनांचा यथाप्रमाण व यथोचित उपयोग ही कसोटी लावली तर काय होईल हें पाहिलें पाहिजे.

व्यक्तिविकासाचें ध्येय साधण्याच्या दृष्टीनें व तें साधत असतांना समाजांतील आर्थिक साधनसंपत्तीचा दुरुपयोग होऊं नये म्हणून कांहीं निश्चित कसोट्या अवश्य आहेत असें वर सांगितलें आहे. जी साधनसामुग्री व्यक्तीला उपलब्ध करून घ्यावयाची तिचा उपयोग करण्याची पात्रता तेथें असली पाहिजे, हें उघड आहे. संगीताची गोडी असो नसो, गळा गोड असो नसो, समतेच्या नांवाखालीं सर्वांना सारंग्या देणें अगर अन्य संगीताची सामुग्री पुरविणें हें उघड उघड सामाजिक संपत्तीचा दुरुपयोग ठरेल. त्याजबरोबर एक व्यक्ति जो उपयोग करील त्यापेक्षां दुसरी व्यक्ति अधिक चांगला उपयोग करील, हीहि दृष्टि बरोबर ठरणार नाहीं. साधनसामुग्रीचें वांटप करतांना संभाव्य पात्रताहि लक्षांत घेतली पाहिजे; त्याचबरोबर विद्यमान पात्रताहि. तसें हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मनुष्य एखाद्या गोष्टीसाठीं प्रयत्न करीत असतो. आपली पात्रता पण वाढवीत असतो. अक्षर गिरवतां गिरवतां तें चांगलें व वळणदार होत जातें. प्रयत्नान्तीं प्राप्तीप्रमाणें पात्रताहि येत जाते, असें म्हटलें तर अयोग्य होणार नाहीं. ऊंस जसजसा वाढत जातो तसतसा त्याचा रसहि वाढत जातो व गोडीहि वाढत जाते. यांतील रहस्य समजलें पाहिजे. वयाबरोबर शहाणपण येतें, ही म्हण अनुभवाची निदर्शक आहे. मनुष्य प्रयत्न करीत असतांना त्या प्रयत्नाचें फळ बाह्य सृष्टींत तर दिसतच असतें, पण त्याजबरोबर त्याच्या मानसिक सृष्टींतहि थोड्याबहुत प्रमाणांत त्याच्या कर्तृत्वाचा साक्षात्कार होत असतो. कांहीं रचना केली तर त्यांतील शिल्प अगर कला हीं दोन्ही निर्मात्याच्या अंगचें कर्तृत्वहि दाखवितात. त्याजबरोबर निर्मात्यालाहि आपण असें कांहीं करूं शकतों असा विश्वास उत्पन्न होत असतो. ही जी पात्रतेची जाणीव अगर कर्तृत्वाबद्दलचा आत्मविश्वास थोडा असेल, भोंगळ स्वरूपाचा असेल, पण तो असतो हें निश्चित. प्रत्यक्ष निर्मिति थोडी असेल व त्यांतील सौंदर्य व स्वरूप हेंहि साधारण असेल, पण ती कृति आपण करूं शकतों ही जाणीव त्या कृतीइतकीच सत्य असते. यांतील मर्म असें आहे कीं, जें आपण करूं तें आपलें आहे असें म्हणण्याची परिस्थिति असली म्हणजे ती परिस्थितीच पात्रतेला, कर्तृत्वाला चालना व प्रेरणा देत असते. एका अर्थानें ही स्वामित्ववृत्ति अगर संग्रहवृत्ति मनुष्याला प्रयत्न करण्यास प्रेरणा देते व अन्यथा सुप्त असलेली योग्यता अगर लायकी प्रगट होण्याला संधी देते. आणि ही क्रिया व्यक्तिविकासाच्या दृष्टीनें एक श्रेष्ठ गोष्ट मानली पाहिजे. किंबहुना व्यक्ति-विकासाची बुद्धि तेव्हांच पावलें टाकते, कीं ज्या वेळेला कांहीं तरी आपण करूं व

मिळवूं ही भावना उदित होते,. तेव्हां व्यक्तिविकासाची प्रेरणा अतिसूक्ष्म दृष्टीनें संग्राह्य बुद्धीनें निर्माण होते व व्यक्तिविकासाचा परिणाम प्रत्यक्ष संग्रहरूपानेंच दिसून येतो व तो तसा दिसून आला म्हणजे मनुष्याचें व्यक्तिमत्त्व वाढतें, फुलतें. व्यक्तीव्यक्तीगणिक विकासासाठीं उत्पन्न होणारी प्रेरणा सारखी असत नाहीं. आणि म्हणून व्यक्तिविकासाचा परिणाम म्हणून होणारी प्राप्ति साहजिक सारखी असणार नाहीं. त्यांत समानता असणार नाहीं. ही जी कांहीं विषमता असेल ती आदि व अंतीं नाहींशी करणें शक्य नाहीं. आणि ती जर नाहींशी झाली तर कदाचित् कुणालाहि कांहीं मिळविण्यासाठीं, प्राप्तीसाठीं प्रयत्न करावेसे वाटणार नाहीं. किंबहुना व्यक्तिविकासाची चोदना नाहींशी होईल, आणि हें सर्व मग समाजाच्या भौतिक व आध्यात्मिक नाशाला कारण होईल. मग प्रश्न असा उपस्थित होतो कीं, प्राप्तीच्या मापानें जी विषमता दिसून येते ती कशी घालवावयाची? प्रेरणेंतील विषमता घालविणें सामाजिक प्रयत्नापलीकडील गोष्ट आहे. प्राप्तींतील विषमता ऐन प्रेरणेला बाध येणार नाहीं अशा दृष्टीनें कशी घालवावयाची? जी प्राप्ति प्रयत्नाचें फळ नाहीं ती अयोग्य हें कोणीहि मान्य करील. जी प्राप्ति व्यक्तीच्या प्रयत्नाशीं संबंध नसतांना सामाजिक परिस्थितीमुळें अगर केवळ दैववशात् मिळाली असेल, तीहि नैतिक दृष्ट्या सर्वस्वीं ज्याला मिळाली असेल त्याच्याकडे ठेवणें हेंहि अयोग्य, हाहि सिद्धान्त मान्य होण्यासारखा आहे. वारशानें येणारी संपत्ति यांत व्यक्तीचा प्रयत्न खास कारणीभूत नाहीं. कोणाच्या इच्छा लक्षांत घेऊन मनुष्याला जन्माला घातलें जात नाहीं अगर कोठें जन्म मिळावा याबाबत व्यक्तीला कोणी विचारीत नाहीं. आपल्या मुलाबाळांना सुस्थिति लाभावी म्हणून माणसें प्रयत्न करतात, संपत्ति मिळवितात पण ती प्राप्ति व संपत्ति त्याच्या प्रयत्नाशीं संबंध ठेवते, मुलांशीं नाहीं. या दृष्टीनें वारसा हा प्रयत्नांचा परिणाम नव्हे. अदृष्टात् अगर दैववशात् हें घडतें, म्हणून वारशानें मिळालेली संपत्ति व त्यांतील विषमता दूर करण्यास अगर कमी करण्यास राज्याला खास नैतिक अधिकार आहे. त्याप्रमाणें प्रयत्न व प्राप्ति यांतील गणित व्यस्त असेल तर तेथील प्राप्ति अगर संपत्ति घेण्याचा नैतिक अधिकार राज्याला खास आहे. पुष्कळ वेळां व्यापारांत राजकीय अगर आर्थिक परिस्थितीमुळें अफाट नफा होतो. जगांत युद्ध सुरू झालें, कांहीं वस्तूंचा पुरवठा कमी झाला, त्याजबरोबर किंमती वाढल्या, भरमसाट नफा झाला, यांत व्यक्तीच्या प्रयत्नानें कांहींहि झालें नाहीं म्हणून अशा तऱ्हेनें मिळवलेली प्राप्ति, मिळालेली संपत्ति राज्यानें घेतल्यास तें अयोग्य ठरणार नाहीं. सामान्यपणें ज्या ठिकाणीं प्रयत्न व प्राप्ति यांमध्यें योग्य प्रमाण नसेल तेथें राज्याला ही सांपत्तिक विषमता दूर करण्याचा अधिकार निश्चित आहे.

विवेकहीन दृष्टि ठेवून आर्थिक समता स्थापण्याचा प्रयत्न करणें हें अयोग्य. त्यामुळें व्यक्तीवर अन्याय होईलच, पण समाजाच्या प्रगतीला बाधा येईल. कांहीं

करावें, कांहीं मिळवावें ही भावना मग राहणार नाहीं. चढतीबढतीची तलवार समाजामध्यें ललकारलेली दिसून येणार नाहीं. कांहीं विविधता आणि म्हणून कांहीं विषमता समाजामध्यें असल्याशिवाय प्रयत्न आकर्षिले जात नाहींत. शिखर दिसत असलें म्हणजे तें गांठण्यासाठीं पावलें वळतात. विविधताशून्य समाज हा समसमान अगर समतापूर्ण समाज असेल, पण तो प्रागतिक समाज असेल असें नाहीं. अनेकांना प्रयत्नाला वाव देणारें वातावरण व प्रयत्नापासून होणारी प्राप्ति प्रयत्न करणाऱ्याला मिळेल, हा विश्वास असला म्हणजे समाजांतील श्रेष्ठ व उत्कट भावना काम करूं लागतात. कर्तृत्व फोंफावतें, व्यक्तिविकास जोरावतो व सर्वसाधारणपणें तो समाज मग गतिमंद न राहतां प्रगतिशील होतो, आदर्शाकडे तीव्र गतीनें जाणारा तो होतो. याचा अर्थ असा नव्हे कीं, समाजांतील आर्थिक व्यवस्था सर्वतंत्रस्वतंत्र, अनिर्बंध राहील. वर सांगितल्याप्रमाणें ज्या ठिकाणीं प्रयत्न व प्राप्ति यांचा संबंध नाहीं अगर अयोग्य संबंध आहे, त्या ठिकाणीं राज्यानें हस्तक्षेप केला पाहिजे. उत्पन्न झालेली प्रयत्न व प्राप्ति यांचा संबंध नाहीं अगर अयोग्य संबंध आहे त्या ठिकाणीं राज्यानें हस्तक्षेप केला पाहिजे व उत्पन्न झालेली आर्थिक विषमता दूर केली पाहिजे. किंबहुना वैध समतेच्या पूर्णतेसाठीं राज्यानें हें करणें आवश्यक ठरतें, तें त्याचें कर्तव्य ठरतें. हें विसरून चालणार नाहीं कीं, आर्थिक विषमतेच्या वातावरणांत सामाजिक समता मूळ धरीत नाहीं आणि राजकीय समता अर्थशून्य बनते व वैध समता हीहि केवळ कागदोपत्रीं राहाते. म्हणून जेथें जेथें वर सांगितल्याप्रमाणें आर्थिक विषमता आढळून येत असेल, तेथें तेथें सरकारनें कायदे करून, हस्तक्षेप करून ती दूर केली पाहिजे. समतेचा विचार केवळ समतेच्या दृष्टीनें करून भागणार नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें समतेचें तत्त्व निरपेक्ष नाहीं. समता व स्वातंत्र्य जणूं कांहीं लोकशाही जीवनाच्या दोन श्वासनलिका आहेत. म्हणून समता व स्वातंत्र्य यांची जुळणी झाली पाहिजे आणि ती जुळणी जेथें भ्रातृभाव असेल तेथें होते. म्हणून भ्रातृभावाच्याहि कल्पनेशीं या दोन्ही कल्पनांची जुळणी केली पाहिजे. केवळ स्वातंत्र्य यावर जोर देऊन भागणार नाहीं. स्वातंत्र्य का समता हा प्रश्न अनेक राजकीय धूर्तांनीं भारतांत उत्पन्न केलेला आहे. स्वातंत्र्य व समता दोन्ही हवीं आहेत. स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे व समतेकडे इतिहासाची वाटचाल चालू आहे. पुष्कळ वेळां मागाहून आलेलें तत्त्व अधिक गोंजारलें जातें, पण हें करणें पुष्कळ वेळां धोक्याचें ठरतें. मनुष्याच्या व्यक्तिविकासाला स्वातंत्र्याची प्रथम प्रेरणा असली तरी समतेची कल्पना हें त्याच्या प्रयत्नाचें चैतन्य असतें. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर समता त्यांतून येते हें खरें असलें, तरी ही प्रसूति सुलभ नसते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं अनेक हृदयें समान स्पंदन करतात. अनेक जिव्हा एकच भाषा बोलतात. तथापि समतेच्या प्रयत्नांत ही एकता, ही समान कृति, हा समान मंत्र, दिसून येत नाहीं. व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें ईर्षा-मत्सरादि भाव उत्पन्न

होतात. स्वातंत्र्याच्या प्रभातकाळापर्यंत दिसून येत असलेली एकता नाहींशी होते. म्हणून समतेचें शिखर गांठतांना नवसमाजनिर्मिति करणाऱ्यांनीं अधिक दक्षता घेतली पाहिजे. संविधानांत लिहिलेली समान संधी ही प्रथम यथार्थ केली पाहिजे. संधी मिळेल तरच मनुष्याचें कर्तृत्व दिसून येतें. गाण्याची संधी मिळाली तर गळा गोड आहे किंवा नाहीं हें समजून येतें. स्वातंत्र्य म्हणजे गुलामगिरींतून मुक्ति व आर्थिक समता म्हणजे गरिबीच्या दुःखाच्या गुलामगिरींतून मुक्तता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आर्थिक समता म्हणजे समान प्रतिष्ठा आणि गुणाशीं संबंध ठेवणारी विषमता. स्वातंत्र्यप्राप्ति आतां भारतास झाली आहे. आतां आर्थिक विषमतेवर हल्ला करावयाचा आहे व असा नवा समाज स्थापन करावयाचा आहे कीं, सर्वांच्या जीवनांत प्रतिष्ठा राहील, सर्वांना न्यायपूर्ण प्राप्ति मिळेल. सर्व सारखे म्हणून सर्व सुखी आणि मग खऱ्या स्वातंत्र्याचा अनुभव लोकांना भेटेल व राज्यानें कायद्याच्या रूपानें जी समता बहाल केली असेल ती अर्थपूर्ण होईल.

स्वातंत्र्य व समता यांत विकल्प नाहीं, हें कां तें असा प्रश्न नाहीं. दोन्हीहि एकमेकांची पूरक अगर एकमेकांला अपरिहार्य अशीं आहेत आणि ही भावना सर्व समाजांत असावयाची याचाच अर्थ भ्रातृभाव, असें म्हणण्यास हरकत नाहीं. एक विरुद्ध एक हा भाव नाहींसा झाला म्हणजे एक आणि एक असा संघटनेचा भाव उत्पन्न होतो. आणि विरोध नसला म्हणजे सहकाराचें वातावरण निर्माण होतें. समष्टि-भाव तेथें आला, सर्वांच्या सुखाचा भाव तेथें आला म्हणजे भ्रातृभाव आला. हें आपलें आहे असें म्हटल्याबरोबर आपण त्याचे होतों व तें व आपण ही भिन्नता नाहींशी होते तेव्हां ऐक्य भावात्मक होतें. माझ्या जीवनांतील न्यूनता पुरी करण्यासाठीं इतरांना न्यूनतेचा अनुभव देणें जसें अयोग्य त्याप्रमाणें मला अधिक हवें म्हणून अगर मज-जवळ अधिक आहे म्हणून त्यासाठीं अन्यांकडून घेणें अगर अन्यांना न देणें हेंहि अयोग्य, व अशा वृत्ति ज्या वातावरणांत असतात तेथें भावात्मक ऐक्य नाहीं. सामुदायिक हितांत व्यक्तीचें हित व व्यक्तीनें करावयाचा उपभोग ‘ सर्वेषाम् अविरोधेन ’ जेथें असेल तेथें भ्रातृभाव आहे. भावात्मक ऐक्य आहे. जेथें प्रवृत्ति घेण्याची अगर ओरबडण्याची नसून देण्याची व दानाची असेल, तेथेंच भ्रातृभाव असतो. समता, स्वातंत्र्य व भ्रातृ-भाव या तिन्ही कल्पना विकल्पात्मक नाहींत. त्यांच्यामध्यें मौलिक ऐक्य आहे. किंबहुना एकाच बीजांतून अनेक कोंब निघावेत असें त्यांचें स्वरूप आहे, आणि जें मौलिक ऐक्य आहे तें म्हणजे न्यायभाव. राज्य हें समाजामध्यें न्याय देण्याची प्रतिज्ञा करून जन्माला आलें आहे. राज्य या संघटनेचा हेतु अगर प्रयोजन राज्यांतील व्यक्तिमात्राला आणि सामुदायिक दृष्टीनें समाजालासुद्धां न्याय देणें हें आहे आणि त्या बुद्धीनें व तो हेतु साध्य व्हावा म्हणून समाजामध्यें स्वातंत्र्य, समता, भ्रातृभाव यांचा उपयोग करावयाचा असतो. आणि या दृष्टीनें राज्य ही संस्था आज्ञा काढून, आदेश देऊन,

कायदे करून, हें घडवून आणत असते. कुणाला अधिकार आहेत म्हणून त्यांचा परामर्श घेतला पाहिजे, दु:खें आहेत म्हणून निवारण केलीं पाहिजेत. आणि स्वातंत्र्य, समता इत्यादि बाबतींत अधिकार अगर हक्क यांची निर्मिति करून राज्य मग त्या हक्कांची अगर अधिकारांची जोपासना करतें. त्यांचा पुरस्कार करतें. तें करतांना स्वातंत्र्य व समता आहे म्हणून भ्रातृभावाचा उच्छेद तें करीत नाहीं. सर्व तऱ्हेनें राज्यांतील नागरिकांचे संबंध राज्य असें विणतें कीं, त्यांतून सुखाचें व समाधानाचें महावस्त्र निर्माण व्हावें आणि हें कार्य करीत असतांना जी मौलिक न्यायभावना तिला धरूनच हें काम होत असतें. न्यायाची कल्पना केवळ तात्त्विक सिद्धान्तस्वरूपी अगर निराकार नसते. कल्पनेपेक्षां कांहीं तरी साकार व साक्षात् असें तिचें स्वरूप असतें. प्रत्येक व्यक्तीच्या मनांत न्यायाची कल्पना असते. न्यायाचें प्रत्येक स्वरूपहि त्याच्या डोळ्यांपुढें साधारणपणें उभें असतें. गोडी म्हटल्याबरोबर माणसाच्या मनापुढें निराकार असें कांहीं असत नाहीं, तर तिचें स्वरूप साखरेच्या स्वरूपांत, गुळाच्या स्वरूपांत आंब्याच्या स्वरूपांत, मधाच्या स्वरूपांत, कुठल्यातरी स्वरूपांत उभें असतें. आणि ही न्यायाबद्दलची कल्पना युगायुगांपासून मानवी मनांत आहे. अनेक संस्कारांनीं ती आकार घेत आलेली आहे व ही क्रिया अनंतकालपर्यंत चालूच राहणार आहे. म्हणून न्याय जेव्हां समाजांत मागितला जातो व राज्य देतें, त्यांत साकारत्वाचा भाग अधिक आणि न्याय ही कांहीं कल्पना न राहतां ती एक सामाजिक वस्तुस्थिति बनते. प्रत्येक मनामध्यें तद्विषयक आकृति उत्पन्न होते आणि जेव्हां मन अधिक विचार करूं लागतें आणि विचार करतांना प्रत्यक्ष परिस्थिति विचाराच्या चित्रांची चौकट आंखून देत असते आणि मग त्या चौकटींत प्रत्यक्ष न्याय काय आहे याचें चित्र संबंधित मन चितारीत असतें. समाजांतील मानवी संबंध जुळवून घेण्याचें कार्य न्याय करीत असतो. न्याय म्हणजे नीतिमत्ता नव्हे. याचा अर्थ नीतीच्या विरुद्ध तो असतो असें नव्हे. त्याचप्रमाणें न्याय म्हणजे आचारस्मृति नव्हे. आचारस्मृतींची दखल तो घेतो हें खरें. कांहीं तरी मानसिक सृष्टींत गुरफटलेला असा तो भाव नसून प्रत्यक्ष जगांत काम करणारा प्रभावी संकल्प तो असतो. व्यक्तीव्यक्तीच्या मनांत काय आहे यापेक्षां व्यक्तीव्यक्तींनीं आपसांत कसें वागावें याचा तो विचार करतो. याचा अर्थ व्यक्तीच्या मनांतील विचारांना तो मानत नाहीं असें नव्हे. समाजामध्यें जीवन अधिक सुखी, संतोषी व शांत व्हावें व त्या दृष्टीनें अडथळे असतील ते दूर करावे हें त्याचें कार्य असतें व हें कार्य करीत असतांना समाजाच्या गरजा, व्यक्तीच्या गरजा यांचा विचार समाजांतील नीतिमूल्यें आध्यात्मिक पार्श्वभूमि यांचा विचार करून हें कार्य केलें जातें.

न्यायविषयक भावना ही सर्व स्वातंत्र्याची पार्श्वभूमि आहे. म्हणून तिचा विचार हा स्वातंत्र्याच्या दृष्टीनें महत्त्वाचा ठरतो. न्यायभाव हा केवळ मानसिक सृष्टींत वावरणारा भाव नाहीं हें वर सांगितलेंच आहे. तथापि प्रत्यक्ष सृष्टींत, सामाजिक

सृष्टींत व्यक्तीव्यक्तीचे संबंध प्रत्यक्ष आचारनियमांनीं जुळत असतात. न्यायभावनेंतील तात्त्विक विचारसरणी कार्य करीत असते. व्यक्ति न्याय मागते याचा अर्थ स्वतःला जें त्याच्या दृष्टीनें योग्य आहे तें मागत असते. पण त्याबरोबर इतरांचेंहि नुकसान न करण्याची इच्छा सामान्यतः असते. त्याप्रमाणें आपण व अन्य यांच्यांतील संबंध उभयतांना सुखविणारे राहतील, अशी त्याची इच्छा असते. पण या तिन्ही आचार-क्षेत्रांत त्याच्या मनांतील न्यायविषयक तात्त्विक भावना सर्वस्वी अप्रस्तुत असते असें नव्हे. किंबहुना तशी ती जर नसेल तर ह्या तिन्ही क्षेत्रांत त्याची वर्तणूक यथार्थपणें न्यायभावाची अशी आढळून येणार नाहीं. व्यक्तिमात्राला समाजांतील व्यवहारांत म्हणजे प्राप्तींत व प्रतिष्ठेंत योग्य हिस्सा मिळण्याच्या दृष्टीनें जी न्यायव्यवस्था असते, तिला विभागणीस्वरूप न्याय असें म्हटलें तरी चालेल. व्यक्तीव्यक्तीच्या व्यवहारांत जेथें न्यायाच्या दृष्टीनें न्यूनता असेल, अगर जेथें न्यायाच्या दृष्टीनें जरुरीपेक्षां अधिक गेलें असेल, त्या ठिकाणीं जेव्हां न्यायभावाच्या दृष्टीनें व्यवस्था केली जाते त्या व्यवस्थेचें स्वरूप दुरुस्तीवजा असतें. न्यून तें पुरतें करावयाचें असतें, अधिक तें सरतें करावयाचें असतें. समाजामध्यें केवळ एकपक्षीय देणें होत नाहीं. एकपक्षीय घेणें होत नाहीं. समाजांतील व्यवहार केवळ एकमार्गी (वन वे) यातायात-स्वरूपाचा नसतो. कांहीं उत्पादन करीत असतात, कांहीं उपभोग घेत असतात, कांहीं विकत असतात कांहीं विकत घेत असतात. श्रमांतून मूल्य व मूल्यांतून श्रम असा हा परस्परावलंबी संबंध असतो. आणि ह्या सर्व व्यवहारांचा साकल्यानें विचार करून जी न्यायव्यवस्था असते तिचें स्वरूप अर्थात् समष्टिस्वरूपाचें असतें. तेथें अ व्यक्ति अगर ब व्यक्ति, अ समूह अगर ब समूह असा विचार नसतो. व्यक्ति व वर्ग किंबहुना समाजाच्या समग्र हिताचा विचार त्या व्यवस्थेंत केलेला असतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे न्यायव्यवस्था मनुष्यांचे परस्परसंबंध सर्व क्षेत्रांत व सर्व दृष्टीनें विचारांत घेते. हें कार्य करीत असतांना न्यायव्यवस्था स्वातंत्र्य व समता यासंबंधींचा विचार पण करीत असते. समाजामध्यें उपभोगावयाचें स्वातंत्र्य, अपेक्षिलेली समता व अवश्य असलेला सहकारभाव या सर्वांचा समन्वय करण्यांत न्यायभाव आपलें श्रेष्ठ कार्य समजत असतो. समाजामध्यें केवळ स्वातंत्र्य हवें, समता नको असें म्हणणारे असतात. कारण समता प्रभावी झाली तर आणि शंभर टक्के प्रभावशाली झाली तर समाज वर्गविहीन होईल. त्यांत विविधता राहणार नाहीं. सर्वांना जर सारखें मिळालें तर, आणि कोणालाहि अधिक मिळण्याचा अगर अधिक ठेवण्याचा अधिकार नसेल तर, त्याचा अर्थ व्यक्तीला स्वातंत्र्य नाहीं असा होतो. म्हणून स्वातंत्र्याच्या निशाणाखालीं राहून अनेक समतेवर हल्ला करीत असतात. त्याचप्रमाणें स्वातंत्र्याच्या नांवाखालीं सहकारभावनेविरुद्धहि अगर भ्रातृभावाच्या भावनेविरुद्धहि विरोध दर्शवीत असतात. कारण त्यांना अशी भीति वाटते कीं, सहकारी तत्त्वाच्या अगर भ्रातृभावाच्या

नांवाखालीं समाजांतील प्राप्ति व संपत्ति व्यक्तिगत मालकीची न राहतां समाजाच्या मालकीची होईल आणि सर्वांच्या मालकीची झाल्यानें, व्यक्तिविषयक मालकी नसल्यानें व्यक्तीचें स्वातंत्र्य कमी होईल, एवढेंच नव्हे तर व्यक्तीची नैतिक उन्नति होणार नाहीं. जीवनामध्यें प्रेरणा अगर चोदना राहणार नाहीं. जेव्हां व्यक्तीला आपल्या श्रमाचें फळ आपल्याला मिळणार आहे व त्यावर आपली मालकी राहणार आहे, हा विश्वास असला म्हणजे व्यक्तीचें कर्तृत्व फुलतें व त्याच्यांतील उत्कट व भव्य सद्‌गुणांना आवाहन केलें जातें. स्वामित्व म्हणजे उपभोगण्याचा, दान करण्याचा, विनिमय करण्याचा, वासलात लावण्याचा हक्क. मी उत्पादन केलें पण माझे फक्त श्रमच, बाकी सर्व हक्क इतरांना अगर समाजाला असतील तर कांहीं करावें असें त्या व्यक्तीला वाटत नाहीं. या दृष्टीनें विचार करतांना स्वातंत्र्य व समता यांत उत्पन्न होणारा अगर झालेला संघर्ष कमी करण्याचें कार्य न्यायभाव करीत असतो. इतकेंच नव्हे, तर स्वातंत्र्याच्या क्षेत्रांतहि अनेक संघर्ष निर्माण होतात. आर्थिक स्वातंत्र्याच्या विरुद्ध नागरिकस्वातंत्र्य असूं शकतें. प्रसंगीं राजकीय स्वातंत्र्य नागरिकस्वातंत्र्याविरुद्ध व आर्थिक स्वातंत्र्या-विरुद्ध असूं शकतें. म्हणून स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या सर्वांत संतुलन करणारें, समतोल राखणारें असें कांहीं द्रव्य असलें पाहिजे आणि तें द्रव्य म्हणजे या तिन्हींच्या मुळांशीं असलेलें न्यायभावाचें तत्त्व होय. न्यायभाव म्हणजे समावेशक न्यायभाव. तोडणारा न्यायभाव नव्हे, जोडणारा न्यायभाव. सोनें कसें आहे, किती टचचें आहे हें जसें निकषावर पाहून ठरविलें जातें, वजन बरोबर आहे कीं नाहीं हें जसें धर्मकांट्या-वरून ठरविलें जातें, त्याप्रमाणें हे तिन्ही अधिकार स्वातंत्र्य, समता, बंधुभाव हे समाजाच्या दृष्टीनें योग्य आहेत कीं नाहींत हें ठरविण्याचें कार्य अगर निकष म्हणा न्यायभाव आहे. ह्या दृष्टीनें मनुष्यामनुष्यांमध्यें काय संबंध असावेत, त्याचप्रमाणें त्याच्या वर्तनाला प्रेरणा व प्रोत्साहन देणारीं जीं मूल्यें आहेत, जीं तत्त्वें आहेत, त्यांच्या-त्यांच्यांत काय संबंध असावेत, मनुष्यामनुष्यांत व तत्त्वांत व मूल्यांत काय संबंध असावेत, हें ठरविण्याचें कार्य न्यायभावाचें आहे. चांगला माळी फुलें निवडून कमीजास्त करून गुच्छाची प्रमाणबद्ध व सौंदर्यपूर्ण रचना करतो तेंच कार्य न्यायभाव समाजांत करीत असतो.

राज्याचा आध्यात्मिक भाव म्हणजे न्याय आणि न्याय या कल्पनेंत सारखेपणा, समतोलपणा असल्याकारणानें न्यायाचा कांटा अशीच शब्दरचना समाजामध्यें प्रचलित झालेली आहे. न्याय याचें निदर्शक चिन्ह म्हणजे कांटा असें आपण मानतों. या कांट्यानें व्यक्तीव्यक्तींत, विविध विचारसरणींत व व्यक्ति व विचारसरणी या सर्वांत समतोल उत्पन्न करावयाचा व कुणाचेंहि पारडें जड अगर खालीं करूं द्यावयाचें नाहीं हेंच खरें न्यायाचें लक्षण मानलें जातें. समाजाची रचना समाजसत्तावादी स्वरूपाची झाली म्हणून आतां न्यायभावांत व्यक्तीचा विचार करण्याची जरुरी नाहीं असा आक्षेप

कोणी काढील. व्यक्तीच्या विकासासाठीं ही राज्याबाबतची मौलिक कल्पना समाजवादानें सोडलेली नाहीं. उलट समाजवादाचा दावा असा आहे कीं, समाजवादांतच व्यक्तीला जास्त न्याय मिळतो व व्यक्तीचा विकास अधिक होतो. कारण, या गोष्टीला पोषक असें वातावरण समाजसत्तावादी समाजांतच मिळतें. समाजसत्तावादी समाजांत व्यक्तीच्या भावनेला वाव नाहीं हें खरें नाहीं. व्यक्तीच्या इच्छा प्रभावी नाहींत हेंहि खरें नाहीं. समाजाच्या गरजा म्हणजे वस्तुतः समाजांतील व्यक्तीच्या गरजा होत. व्यक्तिविरहित समाज नाहीं व समाजविरहित व्यक्ति आधुनिक जगांत नाहीं. म्हणून व्यक्तीच्या समाधानासाठीं अगर समाजाच्या समाधानासाठीं व्यवस्था असावी. यामध्यें फरक मानण्याचें कारण नाहीं. व्यक्तीच्या गरजांबाबत, स्वातंत्र्याबाबत जसा एक निकष अगर माप आपण निर्माण करतों त्याप्रमाणें सामाजिक गरजांबाबत माप निर्माण होऊं शकतें. समाजसत्तावाद म्हणजे सर्वांच्या गरजा एकसारख्या शिक्केवजा असें मानणें, याचा अर्थ समाजसत्तावाद न समजणें हा आहे. विविध दृष्टिकोन, विविध अपेक्षा, विविध गरजा, विवक्षित संबंध या सगळ्यांची जुळवणूक जास्तींत जास्त सामाजिक समाधान उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें समाजसत्तावादांत केली जाते. आणि जास्तींत जास्त सामाजिक शांतता व समाधान हेंच मग सामाजिक गरजा मापण्याचें माप ठरतें. आणि त्याच दृष्टीनें मग तेथें न्यायभावाला काम करावयाचें असतें. न्यायभाव हा प्रत्यक्ष समाजांत अगर राज्यांत कार्यप्रवण व्हावयाचा म्हणजे प्रत्यक्ष अशा न्यायव्यवस्थेनें व न्यायसंस्थाद्वारा न्यायव्यवस्थेंत काय आदर्श असावा, न्यायभावविषयक काय तत्त्वज्ञान असावें, याचा नुसता विचार असून भागत नाहीं. पण त्याबरोबर हें तत्त्वज्ञान आद्यतत्त्वाइतकें महत्त्वाचें आहे. दुसरी अवस्था म्हणजे न्यायव्यवस्था निश्चित झाल्यानंतर, तिची रूपरेषा साकार झाल्यानंतर एक वैध संघटन तिला कार्यान्वित करण्यासाठीं आवश्यक असतें आणि तें संघटन म्हणजे राज्य होय. नैतिक न्याय अगर स्वाभाविक न्याय हे कायद्यांत जोंपर्यंत समाविष्ट झाले नाहींत, तोंपर्यंत त्यांचा अनुभव व्यक्तिमात्राला निश्चितपणें, अनिवार्यपणें मिळत नाहीं. गोडीचा अनुभव मिळावयाचा तर रेवडी, गूळ, साखर, बर्फी कांहींतरी प्रत्यक्ष पदार्थांतूनच, त्याप्रमाणें न्याय याचा अनुभव राज्यांतच प्रवर्तित असणाऱ्या कायद्यानेंच मिळावयाचा असतो. कायद्यामार्फतच त्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार व्यक्तिमात्राला होत असतो. राज्य नसेल तर कायदा नाहीं आणि कायदा नसेल तर न्याय केवळ एक कल्पना मात्र रहाते. अनुभवाला न येणारी गोडी असें तिचें स्वरूप राहतें. राज्य कायदे करून न्यायाचा आदर्श नागरिकांच्या जीवनाच्या क्षेत्रांत व्यक्तिगत व सामाजिक कार्यान्वित करीत असतें. नागरिकाच्या अनुभवाला जो येतो तो कायदा आणि मग कायद्याची पार्श्वभूमि अनेक वेळां व अनेकांच्याकडून दुर्लक्षिली जाते. जें कायद्याचें स्वरूप लोकांपुढें येतें तें आज्ञापक व वज्रमुष्टि स्वरूपाचें, आणि कायद्याचा अवमान केल्यास दंड अगर

प्रायश्चित्त हें निश्चित असल्यानें नागरिकांचें मन कायद्यांतील इष्टता व नैतिकता यांकडे न जातां त्यांतील दंडस्वरूपी भीतीकडेच जातें. वास्तविक जो कायदा होत असतो तो कांहीं अंतराळांत उत्पन्न होत नाहीं अगर कायदा म्हणजे आकाशांतून पृथ्वीवर अवतारस्वरूपी कांहीं घटना आहे असेंहि असत नाहीं. त्यामागें एक तत्त्वज्ञान, एक विचारप्रणाली निश्चित असते. दीर्घ सामाजिक व वैचारिक क्रियेचें अखेरी स्वरूप असें तें असतें. दूध आटून आटून खवा होतो, त्यांत साखर पडते, मग पेढा निर्माण होतो, त्याप्रमाणें गत काळांतील अनुभव आटवून आटवून विद्यमान अनुभवाची त्याला जोड देत देत भावी आशेची गोडी लावत लावत जें रसायन तयार होतें तें कायदा होय. सामाजिक मन हें सामाजिक विचार प्रसवत असतें आणि ही प्रसूति दीर्घकाळ प्रयत्नाचें फळ असतें. आणि हा जो सामाजिक विचार याचें वैध स्वरूप म्हणजे कायदा. म्हणून त्याचा संबंध अतीत, विद्यमान व भविष्य या तिन्ही काळांशीं असतो. कोणी तरी कांहीं तरी मनांत आणलें व कायदा झाला असें होत नाहीं. खजिनदार पगार देत असला; तरी प्रत्यक्ष कोण पगार देत असतो हें आपण जाणतों. वाण्याकडून धान्य घेतों म्हणून त्याला आपण धान्याचा उत्पादक म्हणत नाहीं. त्याप्रमाणें अधिकार-पदानें कायदा जाहीर झाला असला, अगर करण्यांत आला असला, तरी ही निर्मिति समाजाची आहे हें आपण विसरतां कामा नये. कोणी एका व्यक्तिसमूहानें अगर वर्गानें सामान्यपणें कायद्याला जन्म दिलेला नसतो. समाजांतील सर्वसामान्य इच्छा, अपेक्षा, अनुभव यांवर तो आधारलेला असतो. हें लक्षांत घेतल्यानंतर कायद्याचें प्रत्यक्ष स्वरूप जरी आज्ञार्थी असलें तरी वस्तुतः तो आव्हानार्थी असतो आणि म्हणून मागें सांगितल्याप्रमाणें कायद्याचें पालन म्हणजे आपणच दिलेली आज्ञा आपणच पाळावयाची असें ठरतें. समाजाची सदसद्विवेकबुद्धि म्हणजे कायदा अशी जी व्याख्या आहे, ती योग्य आहे. सदसद्विवेकबुद्धीचें ऐकणें जितकें इष्ट व हितकर तितकेंच कायद्याचें पालन करणें इष्ट व हितकर ठरतें. आज्ञार्थी असल्यानें कायद्याची अंमलबजावणी राज्य करीत असतें आणि कायद्यानें जेव्हां स्वातंत्र्यसमतादिक अधिकार जाहीर केले जातात, तत्संबंधींची व्यवस्था मांडली जाते, त्या वेळेला समाजावर ती बंधनकारक असते. कायद्याची पार्श्वभूमि लक्षांत घेतां स्वातंत्र्य व अन्य व्यवस्था त्याप्रमाणेंच मौलिक अधिकारहि कायद्याला धरून नागरिकांनीं वापरावयाचे याचें कारण स्पष्ट होतें. दहा रुपयांची नोट कवडी किंमतीचीसुद्धां नाहीं, ती पेटवून चमचाभर चहासुद्धां होणार नाहीं, तथापि ती बाजारांत दिली असतां तेवढ्या किंमतीचे पदार्थ मला मिळतात याची ग्वाही असते, गॅरंटी असते. कारण राज्यानें ती दिली असते. त्याप्रमाणें स्वातंत्र्याच्या हुंडीला राज्यांतील कायद्यानें स्वीकृति दिली असल्यानें तें मला माझ्या व्यक्तिगत व सामाजिक जीवनांत लाभेल, असा दृढविश्वास असतो. कायद्यानें मान्यता न दिलेलें, शिक्कामोर्तब न केलेलें स्वातंत्र्य अगर अधिकार एक तर

शेखमहंमदी स्वप्नें ठरतात, अगर त्यांचा उपभोग व्यक्तीच्या मनगटांत ताकद असेल तोंपर्यंतच होतो. जेथें हात तेथेंच भात, अन्यथा कांहीं नाहीं, असा अनुभव येतो. म्हणून स्वातंत्र्य हें कायद्यान्वित स्वातंत्र्य असलें पाहिजे. समता ही कायद्यान्वित समता असली पाहिजे. समाज जसा परिवर्तनशील असतो व मानवी विचार जसे प्रवाही स्वरूपाचे असतात, त्याप्रमाणें राज्याचा कायदाहि नित्य, न बदलणारा, काळ्या दगडावरील रेघ अशा स्वरूपाचा कधींच नसतो. माणसाचें भाग्य तो बसला म्हणजे बसतें, तो उभा राहिला म्हणजे उभें राहतें, तो चालूं लागला म्हणजे चालूं लागतें, त्याप्रमाणें समाज अगतिक झाला, चालूं लागला अगर धांवूं लागला म्हणजे त्याच्या त्या त्या अवस्थेप्रमाणें कायदा त्याच्याशीं जुळवून घेत असतो. समाजजीवनाचा संरक्षक, पोषक व प्रेरक असें जरी कायद्याचें वर्णन केलें तरी तें चालण्यासारखें आहे. राज्य हें कायद्याचें अपत्य व कायद्याचा जनक असें एक सुंदर वर्णन ऐका राजनीतिशास्त्रज्ञानें केलें आहे. न्यायभावांतून राज्याची कल्पना उत्पन्न झाली आणि राज्याचें न्यायभावाला कायद्याचें स्वरूप दिलें ही वस्तुस्थिति कोणी नाकारूं शकत नाहीं. आणि म्हणून कायद्याचें महत्त्व समाजाच्या नित्य व बदलणाऱ्या दोन्ही जीवनांत आहे.

कायदा हा न्यायाची तराजू धरणारा व व्यक्तीव्यक्तीच्या, व्यक्ति व समाजाच्या संबंधांत समतोल राखणारा म्हणूम त्याचें महत्त्व व त्याची प्रतिष्ठा. कायद्याचें बोधचिन्ह तराजू म्हणून मानलें जातें, पण कायद्याला तलवारीची उपमा पण दिली जाते. दोन्ही उपमांमध्यें अर्थ आहे. जें योग्य तें केलें पाहिजे व जें योग्य तें अंमलांत आणलें पाहिजे आणि म्हणून अंमलबजावणीच्या संबंधांत कायद्याचें शक्तिस्वरूप ध्यानांत येतें. हिंसेनें समाजांत अन्याय अगर अनर्थ होऊं नये म्हणून कायदा आणि त्याला प्रभावी करण्यासाठीं हिंसा पण अपरिहार्य ठरतें. यामध्यें विरोध आहे, तथापि ती अनिवार्य आहे. कायदा हा मागें सांगितल्याप्रमाणें लोकांच्या संमतीवर आधारित असल्यानें त्या संमतीला प्रभावी करण्याच्या दृष्टीनें इष्ट व आवश्यक एवढीच हिंसा मग अंमलबजावणीच्या कामीं इष्ट व आवश्यक असतें. म्हणून कायद्याचें स्वरूप वस्तुतः संमति, जनसंमति हें प्रमुख, हिंसात्मक हें दुय्यम हें स्पष्ट होतें. शक्तींतून कायदा निर्माण झाला नाहीं, पण कायद्याचें पालन न केल्यास परिणामीं, शक्तीचा उपयोग असें म्हटलें तर तें योग्य ठरेल. सामान्यपणें लोकांना पटलें म्हणजे ते खुषीनें मानतात. कायदा मानण्याची इच्छा मनुष्याच्या मनांत जेव्हां त्याला तो योग्य वाटतो तेव्हांच होते. आणि म्हणून जेवढी लोकांची इच्छा प्रबल, जेवढी लोकांची कायद्याच्या योग्यतेबाबतची खात्री प्रभावी, तेवढ्या प्रमाणांत कायदा हा प्रभावीपणें पाळला जातो व मग पोलिसाचा हात अगर संकेत काम करीत असतो, मग त्याच्या कमरेला असलेलें शस्त्र शोभा ठरतें. दंड ही कायद्याची पार्श्वभूमि नव्हे, कायद्याची प्रभावी पार्श्वभूमि नैतिकता आहे, हें विसरणें धोक्याचें आहे. कायदा मोडण्यांत व्यक्तीचें हित असेल, पण समाजाचें हित व राज्याची

सुरक्षितता निश्चित नाहीं. शक्ति किंवा हिंसा हें कायद्याचें एक दुय्यम स्वरूप आहे. किंबहुना मनुष्याच्या सदसद्विवेकरूपी श्रद्धेचा कायदा प्रतिनिधि मानला तर त्याचें हिंसात्मक स्वरूप हें संकटसमयींचें एक शस्त्र ठरतें. कायद्याचें पालन न करणाऱ्यास दंड न केल्यास, शिक्षाविषयक व्यवस्था न केल्यास, कायदा मग अजागळस्तनाप्रमाणें शोभा व संरक्षण दोन्ही ठरत नाहीं. कायदा म्हटला कीं तेथें दंडव्यवस्था, शिक्षाविषयक व्यवस्था, हीं असलींच पाहिजे. त्या व्यवस्थेचें स्वरूप काय असावें, प्रतिबंधक, सूडविषयक अगर सुधारणाविषयक याचा विचार येथें करण्याचें कारण नाहीं; तो अन्य ग्रंथांत प्रस्तुत लेखकानें केला आहे. येथें जो विचार करावयाचा आहे तो एवढाच कीं, जी दंडव्यवस्था असेल ती सामाजिक हिताच्या दृष्टीनें असली पाहिजे. जें समाजाच्या संरक्षणासाठीं व हितासाठीं करणें आवश्यक असेल तें केलें पाहिजे आणि समाजाच्या व राज्याच्या स्वातंत्र्यासाठीं आवश्यक ठरल्यास कांहीं व्यक्तींचें स्वातंत्र्य रद्द केलें पाहिजे. यांत अन्याय आहे असें मानण्याचें कारण नाहीं. शिक्षा व्यक्तिगत असते पण ती समाजाच्या संदर्भांत दिली जाते आणि तिचे परिणाम व्यक्तीच्या पै-पैशांत मोजावयाचें नसून समाजाच्या संरक्षण व स्थैर्यरूपी भांडवलांत मोजावयाचें असतें.

कायद्याचें पालन करणें हें व्यक्तिमात्राला कर्तव्य वाटलें पाहिजे. मागें सांगितल्याप्रमाणें दंडाच्या भीतीनें सद्वर्तन करणें व स्वभावतः सद्वर्तन करणें यांत मोठा फरक आहे. कोठल्याहि कारणानें कां होईना, नैतिक अगर वैध कायदा पालन करणें हें कर्तव्य मानलें तरच समाजाची धारणा होऊं शकते व राज्य सुस्थिर होतें. समाजाप्रति आणि म्हणून राज्याप्रति व्यक्तिमात्राचें कांहीं किमान कर्तव्य असल्याशिवाय व्यक्तीलाहि स्वातंत्र्य लाभणार नाहीं, संरक्षण लाभणार नाहीं, हें सहज लक्षांत येईल. व्यक्तीनें समाजाप्रति आपलें कर्तव्य पाळावें, याबाबत अनेक कारणें असूं शकतात. तथापि त्यानें कर्तव्यपालन केलें पाहिजे हें कार्य निश्चित असलें पाहिजे. राजा हा विष्णूचा अंश आहे म्हणून त्याचें मानलें पाहिजे हीहि एक विचारसरणी आहे, आहे म्हणण्यापेक्षां होती, असें म्हटलें तर चालेल. त्याप्रमाणें राज्यसत्ता ही परंपरागत चालत आली आहे व राज्यसत्तेचें ऐकावें ही एक नैतिक वहिवाट झाली आहे, म्हणून ऐकलें जातें असें म्हणणारेहि कांहीं लोक आहेत. राजसत्ता कशी उत्पन्न झाली याचा विचार मग वहिवाटीच्या दृष्टिकोनांतून अप्रस्तुत ठरतो. ऋषीचें कूळ पाहूं नये म्हणतात, त्याप्रमाणें राज्यसत्तेचें मूळहि पाहण्यांत वैधिक समाधान कदाचित् वाटेल, पण प्रस्तुत क्षणाला त्याचा कांहीं उपयोग नसतो. क्लाईव्ह अगर वॉरन हेस्टिंग्ज यांनीं खोटीं कामें करून, खोटे दस्तऐवज करून, सत्ता मिळविली हें खरें असलें, तरी जी सत्ता प्राप्त झाली ती खणखणीत ठरली. प्रभावी झाली. निवडणुकीमध्यें खोटा प्रचार केला, लोकांना भुलविलें, हें सर्व खरें असलें तरी निवडणुकीचा परिणाम म्हणून राज्यसत्ता लाभली हें ढळढळीत सत्य नाकारण्यांत अर्थ नसतो. सत्तेचें स्वामित्व

आहे. तें असल्यानंतर कसें मिळालें हा प्रश्न गौण ठरतो, म्हणून विद्यमान सत्ता जी असेल तिच्याप्रति प्रत्येक व्यक्तीचें कांहीं कर्तव्य ठरतें. याचा अर्थ विद्यमान राज्यसत्तेला संपुष्टांत आणण्याचा अगर तिच्यांत बदल करण्याचा अधिकार प्रजेला नाहीं असें होत नाहीं. राज्यसत्ता चालविणारे कोणीहि असतील, पण राज-सत्ता ही समाजामध्यें असली पाहिजे आणि म्हणून तिच्याप्रति व्यक्तीचें किमान कर्तव्य हें असलेंच पाहिजे. नाण्यावरील शिक्का बदलेल, पण नाण्यांतील सोनें अगर रुपें हें बदलत नाहीं. नाण्याच्या ऐन किंमतींत अगर मूल्यांत कमीजास्त होईल, पण तें निर्मूल होणार नाहीं हेंहि तितकेंच खरें. म्हणून किमान कर्तव्य हें व्यक्तीला पाळावेंच लागतें. पत्त्याच्या डावांत पाहिजे तसा डाव आला नाहीं म्हणून पत्ते पुन्हां पिसण्यास संधी असते, पण पाहिजे तो डाव आला नाहीं म्हणून पत्ते फाडणें हें घडत नाहीं आणि तसें कोणी केल्यास डावच संपला असें होतें. त्याच न्यायानें किमान कर्तव्य राज्यसत्ताविषयक म्हणजे कायदाविषयक, व्यक्तीनें न पाळल्यास समाजाचा व राज्याचा डावच उधळला जातो. कांहींच्या मतें कर्तव्यपालन जें करावयाचें तें व्यक्ति व राज्य यांमध्यें एक निरंतरचा करार झाला आहे म्हणून. हें करारविषयक राजकीय तत्त्वज्ञान संपूर्णपणें येथें विवरणें शक्य नाहीं. एवढीच गोष्ट निश्चित कीं, असें कांहीं तत्त्वज्ञान मानलें तर व्यक्तीला आपल्याला नापसंत असलेलें अथवा अयोग्य काम करणारें सरकार बदलण्याच्या कामीं अधिक नैतिकतेचा पाठिंबा मिळतो. कराराच्या शर्ती कोणी ठरविलेल्या नसतात हें खरें, तथापि राज्याचे हेतु आधुनिक जगांत तरी राज्याच्या संविधानांत स्पष्ट असतात व त्याप्रमाणें विद्यमान सरकार न वागल्यास व्यक्तीच्या राज्यविषयक व कायदाविषयक स्वरूपांत बदल होतो आणि मग प्रसंगीं कर्तव्यपालन न करणें, कायद्याचा भंग करणें, त्याची अवज्ञा करणें हें क्षम्य ठरतें व नैतिकहि ठरतें.

मागें सांगितल्याप्रमाणें राज्याचा हेतु सर्व क्षेत्रांत व सर्व संबंधांत न्याय देणें व प्रस्थापित करणें हा आहे व तो देणारें माध्यम म्हणजे कायदा हेंहि मागें सांगितलें आहे. सर्व संबंधांत न्याय देणें यासाठीं स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांची आवश्यकता आहे. किंबहुना त्याशिवाय न्याय ठरत नाहीं हेंहि पाहिलें म्हणून कायद्याचें पालन करणें याचा अर्थ वस्तुतः न्यायाच्या कल्पनेला व मूल्यांना धरून चालणें हाच आहे. कायदा हें संरक्षण करणारें कवच, त्याचप्रमाणें संवर्धन करणारें चैतन्य पण आहे. औषधहि आहे व अन्नहि आहे व दोन्ही ठिकाणीं पथ्य पाळणें हें आवश्यक आहे, हेंहि त्यांत अध्याहृत व स्पष्ट आहे. म्हणून व्यक्तिमात्राचें राज्याप्रति किमान कर्तव्य म्हणजे विधियुक्त अंमलांत आलेला कायदा पाळणें हें ठरतें आणि ह्या किमान कर्तव्याचें पालन न झाल्यास व्यक्ति व राज्य यांतील राजकीय संबंध बिघडतात. एवढेंच नव्हे, तर सामाजिक जीवनावर सर्वतोपरी परिणाम होत असतो. हें मान्य केलें पाहिजे कीं, राज्याच्या कायद्यांत नैतिकता असली पाहिजे, समाजाच्या दृष्टीनें

इष्ट तें असलें पाहिजे आणि जेव्हां तो कायदा त्या दृष्टीनें पूर्ण असेल तेव्हां कायद्याचें पालन हें शंभर टक्के कर्तव्य ठरतें. जें कायद्याचें पालन होतें तें कांहीं प्रत्येक व्यक्तीनें प्रत्येक वेळीं अगर प्रत्येक पिढीनें प्रत्येक वेळीं राज्यसत्तेशीं करार केला असतो म्हणून नव्हे, अथवा कांहीं औपचारिक प्रतिज्ञा घेतली गेली म्हणून नव्हे. हें कर्तव्य-पालन सामाजिक दृष्ट्या साहजिक असतें व व्यक्ति जन्मल्याबरोबर तें उत्पन्न होत असतें. न्यायविषयक कल्पना बदलतांच कायदा बदलतो व मग त्या प्रमाणांत या कर्तव्याचें स्वरूप बदलतें हें खरें, तथापि व्यक्तीपुढें पुष्कळ वेळां असा प्रश्न उपस्थित होतो कीं, हें कर्तव्यपालन राज्याशीं आहे, का राज्य जो न्याय देतें त्याशीं आहे ? केवळ राज्याशीं असेल तर त्या कर्तव्याचें स्वरूप कांहीं निराळें असेल. केवळ न्यायाशीं असेल तर त्याचें स्वरूप निराळें. आणि सर्वत्र ह्या प्रश्नाला महत्त्व आलेलें आहे. आमच्या नैतिक मूल्यांना, आमच्या न्यायविषयक कल्पनांना विद्यमान राज्याचें स्वरूप जुळत नाहीं असें म्हणणाऱ्या व्यक्ति व समूह आहेत आणि त्यांच्यावर मग कायदापालन करण्याचें कर्तव्य किती व कोणत्या मर्यादेंत, हा प्रश्न उपस्थित होतो. राज्य हें सामान्यपणें सर्वांना न्याय देणारें संघटन म्हणून त्याचें मानलें पाहिजे हें सामान्यपणें कोणी नाकारणार नाहीं. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, राज्यांत सत्ताधीश असलेला अधिकारी जें म्हणेल तें बरोबर; अगर जें करील तें न्याय्य. सामान्यपणें जें राज्य करील तें मानलें पाहिजे यांतील मर्यादा सहज लक्षांत येण्यासारखी आहे आणि जेव्हां राज्य औपचारिक रीत्या कायदा करून व्यक्तींच्या कर्तव्याचा मार्ग निश्चित करतें त्या वेळेला तो ऐकणें, तो मानणें हें व्यक्तीचें कर्तव्य ठरतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यक्तींनींच आपल्या इच्छा संविधानाच्या व्यवस्थेप्रमाणें स्पष्ट केलेल्या असतात व त्यांतूनच कायद्याची निर्मिति होत असते. समाजांतील कल्पनांना नीटनेटका आकार देऊन कायदा रचला जातो, त्याचें जनकत्व जनतेकडे असतें. आणि म्हणून आपणच निर्माण केलेला कायदा, आपणच रचलेला संयम पाळला पाहिजे हें नैतिक दृष्ट्याहि व्यक्तीचें कर्तव्य ठरतें. कायद्यामुळें त्या कर्तव्यांत आज्ञापक स्वरूप आलें म्हणून अगर न ऐकल्यास दंड अशी व्यवस्था आहे म्हणून तो न मानणें हें योग्य ठरत नाहीं. विश्वामित्री पवित्र्यामध्यें 'न मम न मम' असें म्हणून चालणार नाहीं. ह्या कर्तव्यांत राज्याच्या पायाभूत असलेल्या न्यायविषयक कल्पनांना अधिक महत्त्व असतें. आणि सामान्यपणें त्या कल्पना समाजाला मान्य असतात. एखाद्या दुसऱ्या व्यक्तीला अगर एखाद्या दुसऱ्या गटाला प्रसंगविशेषीं एखादी राज्याची आज्ञा अगर आदेश पटला नाहीं म्हणून सरसहा आज्ञा-भंग करणें अगर कायदा अमान्य करणें हें बरोबर नाहीं. कोटाला एखादें बटन जास्त आहे अगर कमी आहे म्हणून कोट कोणी फाडून टाकत नाहीं. त्यामध्यें इष्ट ते फरक जसे व्यक्ति करून घेते त्याप्रमाणें येथेंहि आहे.

सर्वंध राज्यविषयक तत्त्वज्ञान थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, राज्य हें संघटन न्यायसंस्थापनेसाठीं आहे व न्याय याचा व्यापक अर्थ व्यक्ती-व्यक्तींत व व्यक्ति व समाजांत जे संबंध असतात त्यांमध्यें योग्य असा समतोल असावा व ज्याचा परिणाम जास्तींत जास्त लोकांना जास्तींत जास्त संधी, आपली जास्तींत जास्त उन्नति करण्याची संधी असावी ही न्यायाची भावना, ज्याप्रमाणें गोडी ही उंसाच्या सर्व कांड्यांत असते त्याप्रमाणें समाजांतील व राज्यांतील सर्व संस्थांतून व भावनांतून असली पाहिजे. ही भावना बनत असतांना अनेक व्यक्तींचीं मनें त्यांत भाग घेत असतात आणि जें अनेकांना अथवा सर्वसामान्यपणें जास्तींत जास्त लोकांना वाटतें, योग्य वाटतें, तेंच समाज न्याय समजतो. समाजाला जें वाटत असतें तें राज्य कायद्याच्या रूपानें स्पष्ट व कार्यप्रवण करीत असतें व हें काम राज्याला करावें लागतें, म्हणून त्यामध्यें आज्ञापक भाव येतो. एका अर्थानें व्यक्ति व्यक्ति विचारविनिमय करून, विचारमंथनांत भाग घेऊन जें निर्माण करीत असतात तें सामाजिक स्वरूपाचें असतें. तो विचार कोणा एका व्यक्तीचा नसून सामाजिक असतो. व तो विचार राज्यघटनेनें स्वीकारून कायद्यामार्फत कार्यप्रवण केला, म्हणून आपल्या सांगण्याप्रमाणें, आपल्या इच्छेप्रमाणें, आपल्या अपेक्षेप्रमाणें कायदा सामान्यपणें असल्यानें व तो कायदा न्याय संस्थापित करीत असल्यानें तो मानणें व्यक्तीचें कर्तव्य ठरतें. सामान्यपणें ही प्रक्रिया लक्षांत घेतां आणि विशेषतः लोकशाही राज्यव्यवस्थेंत ज्या रीतीनें नागरिकांचीं मतें व मनें, त्यांच्या भावना व त्यांचे आदर्श लक्षांत घेतले जातात, यांचा विचार करतां लोकशाही राज्यव्यवस्थेंत आज्ञाभंग अगर कायदेभंग हा अवैध ठरतो. एवढेंच नव्हे, तर अनैतिकहि ठरतो. या सामान्य नियमाला कोठल्या परिस्थितींत अपवाद असूं शकतात याचा उल्लेख मागें येऊन गेला आहे. लोकशाही व्यवस्थेंत राज्याचें स्वामित्व अगर प्रभुत्व हें लोकांचें असतें. तें अमर्याद असतें. तथापि तें कांहीं नियमानुसार प्रभावी होत असतें आणि तद्विषयक नियम व संकेत हे लोकशाही राज्याचे संविधानांत स्पष्ट असतात. लोकमत अथवा लोकांची संमति हें लोकशाही राज्याचें जीवनतत्त्व आणि म्हणून लोकमताला पूर्ण वाव मिळाला पाहिजे. व्यक्तिमात्राला आपला अनुभव, आपला दृष्टिकोन, जाहीरपणें सांगतां आला पाहिजे. आणि अशी परिस्थिति असली म्हणजे लोकशाही तंत्रानें व मंत्रानें पास झालेला कायदा व्यक्तीनें मानणें हें त्याचें नैतिक व वैध कर्तव्य ठरतें. असें असूनसुद्धां प्रसंगविशेषीं कांहीं व्यक्तींना अगर कांहीं समूहांना एवंगुणविशिष्ट कायदा पसंत नसेल तर तसें सांगण्याचा, आपली श्रद्धा जाहीर करण्याचा, हक्क असला पाहिजे, स्वातंत्र्य असलें पाहिजे. तथापि लोकशाही पद्धतीनें पास झालेला कायदा राजकीय दृष्टीनें निष्ठावंतपणें एक राजकीय कर्तव्य म्हणून पाळला पाहिजे. जेथें एक सामाजिक अगर नैतिक कर्तव्य म्हणून तो न पाळणें व्यक्तीला अपरिहार्य वाटत असेल, तेथें तेवढ्यापुरता अपवाद मानणें योग्य ठरतें. कायद्याची पार्श्वभूमि लोकशाही व्यवस्थेंत

जनविचार व जनसंमति असल्यानें व त्यांत न्यायभाव असल्यानें राज्याचा जो मूळ हेतु तो साधला जातो. राज्य हें त्या हेतूला कार्यान्वित करणारें संघटन असल्यानें राज्याबाबतची निष्ठा किंवा राज्याबाबतचें कर्तव्य हें निरपेक्ष आहे, त्याबाबत सशर्तपणा नाहीं. कारण, राज्याबद्दलच निष्ठा नसली तर समाज अशक्य आहे. न्याय मिळणें त्याहूनहि दुरापास्त आहे. समाजाबाबत निष्ठा सशर्त असूं शकते. परंतु राज्याबाबतची निष्ठा तशी असून चालणार नाहीं. राज्याची तात्कालिक व्यवस्था विद्यमान सत्तेकडे असते, सरकारकडे असते, म्हणून आपल्या श्रद्धेला पसंत नसलेला कायदा विद्यमान सरकारनें केला म्हणून तो मान्य न करणें यांत अनैतिक नाहीं. तथापि त्या अवमानतेला मर्यादा आहेत. टांकाचें निफ चांगलें चालत नाहीं. म्हणून टांक मोडून टाकणें हा मार्ग नव्हे. निफ बदलावें अगर त्यांत दुरुस्ती करावी, हें योग्य. आणि सरकार बदलण्याची व्यवस्था लोकशाही घटनेंत असतेच. लोकशाही ही रीत आहे पण केवळ रीत नव्हे, रस पण आहे; व्याकरण आहे पण केवळ व्याकरण नाहीं; त्यांत अर्थहि आहे. लोकशाही म्हणजे निवड. कोणीतरी निवडून दिलेलें अगर निर्मित केलेलें मानणें असा त्याचा अर्थ नव्हे. आणि म्हणून पसंत नसलेलें बदलून घेणें हें योग्य, पण जो मौलिक भाव आहे आणि ज्याचें कार्यकारी स्वरूप म्हणजे राज्य त्याबद्दलची निष्ठा ही निश्चित पाहिजे, निरपेक्ष पाहिजे. राज्याचें प्रभुत्व हें सर्वांचें हें खरें, पण त्याचें प्रत्यक्ष स्वरूप म्हणजे विद्यमान राज्यसत्ता अगर सरकार हेंहि तितकेंच खरें. हिमालय हा प्रचंड खरा पण उल्लेख होतो तो कैलास शिखराचा. तीच स्थिति येथें आहे आणि म्हणून अपरिहार्य झाल्याशिवाय कायद्याशीं विरोध करणें हें योग्य नव्हे.

प्रसंगविशेषीं अपवाद मान्य केल्यानंतर कोणत्या स्थितींत ते अपवाद क्षम्य ठरतात, याचाहि थोडक्यांत विचार केला पाहिजे. व्यक्तीला आपल्या श्रद्धेला मौलिक विरोधाचें असें कांहीं वाटलें तर त्यानें आज्ञाभंग करावा. कायदा अवमानावा असें मागें सांगितलें आहे. पण हेंहि खरें कीं, व्यक्ति ही किती जरी व्यक्तिगत असली, तरी कांहीं तरी सामाजिक भाव तिचा असतोच. किंबहुना जी सामाजिक नाहीं ती व्यक्ति नाहीं, अशीहि बाह्यतः विसंगत पण वस्तुतः सुसंगत व्याख्या करतां येईल. अरण्यांत राहिली तरी ती एकाकी नसते. समाजाशीं तिचा संबंध शंभर टक्के तुटलेला नसतो. व्यक्तीच्या मनांत उद्भवणारे विचार म्हणजे गंगेच्या प्रवाहांतून ओंजळभर काढलेल्या पाण्याप्रमाणें असतात. त्या ओंजळीच्या पाण्यांतील गुणदोष प्रवाहांतील पाण्यांतील गुणदोषांशीं मेळ राखतात. व्यक्तीचें शारीरिक जीवन समाजापासून दूर झालें तरी तिचें मानसिक व वैचारिक जीवन समाजाशीं संबंधितच असतें. म्हणून व्यक्तीचें आचरण व विचार हे वस्तुतः सामाजिक असतात. म्हणून व्यक्तीनें आपण जें काय करूं त्याचा समाजावर काय परिणाम होईल, याचा विचार केला पाहिजे. ही त्याची जबाबदारी तो टाळूं शकत नाहीं व ती त्यानें टाळली म्हणजे आपलें नैतिक कर्तव्य न पाळण्यासारखें आहे. आपली

व्यक्तिगत संमति विशिष्ट कायद्याला नाहीं एवढ्यामुळें तो पाळण्याची जबाबदारी आपल्यावर नाहीं असें म्हणून चालणार नाहीं. तो कायदा पाळणें हें त्याचें राजकीय कर्तव्य आहे. लोकांच्या मतानें त्यांचा विचार घेऊन कायदा पास झाला ही वस्तुस्थिति असते. ती नाकारून चालणार नाहीं आणि म्हणून अन्य लोकांनीं आपल्या अधिकारांत केलेली गोष्ट नापसंत असलेल्या व्यक्तीनें लाथाडून चालणार नाहीं. राजकीय कर्तव्यापेक्षां अधिक श्रेष्ठ कर्तव्य आहे व त्या कर्तव्याची हांक त्याला आज्ञाभंग करण्यास आज्ञा देत आहे असें तो म्हणूं शकतो. राजकीय कर्तव्य पालन करावयाचें कीं सदसद्विवेकबुद्धीची आज्ञा मानावयाची असा पेंचप्रसंग मानवी समाजांत अनेकांच्यापुढें अनेक वेळां आला आहे. पालन करण्यानें समाजाचें हित होईल कीं नाहीं, याचा हिशेब प्रत्येक व्यक्ति बुद्धिपूर्वक करूं शकते असें नाहीं आणि परिणामाकडे दृष्टि ठेवून वागण्यांत पार्श्वभूमि विसरली जाते. पार्श्वभूमि ही कीं, समाजानें सामान्यपणें तें स्वीकारलेलें आहे. या स्थितींत मार्ग काढावयाचा हें सोपें काम नाहीं. व्यक्तिगत अधिकार अगर व्यक्तिगत स्वातंत्र्य हें कायद्यापेक्षां अधिक मानून कायदेभंग करावयाचा का निमूटपणें उदासीन बसून जीवनमूल्यांना व श्रद्धेला निष्ठाशून्य व्हावयाचें ह्या बाबतींत विचारवंतांनीं जो मार्ग सुचविलेला आहे त्याचा ऊहापोह मागें थोडासा केलाच आहे. सामान्यपणें 'देवाचें देवाला दिलें पाहिजे, राजाचें राजाला दिलें पाहिजे' असें जें येशू ख्रिस्तानें सांगितलें आहे तसें येथें केलें पाहिजे. राज्यांत व राज्यव्यवहारांत राज्याचा कायदा न मानला तर होणारी शिक्षा भोगली पाहिजे व मनाच्या आत्मिक समाधानासाठीं कायदेभंग पण केला पाहिजे. पण तो व्यक्तीनें केला पाहिजे. कारण त्या व्यक्तीला जें झालें आहे, राज्यानें केलें आहे, तें न्याय्य नाहीं असें वाटत असतें. राज्यांत राहावयाचें असल्यानें राजकीय कर्तव्य शिक्षा सोसून पाळावयाचें व नैतिक कर्तव्य कायदा अवमानून पाळावयाचें हा तो मार्ग आहे. जोंपर्यंत व्यक्ति राज्यांत आहे तोंपर्यंत राजकीय कर्तव्यापासून ती विमुक्त होऊं शकत नाहीं. राजकीय कर्तव्य मानलें नाहीं, तर अराजक माजेल, कोणाचेंहि स्वातंत्र्य राहाणार नाहीं, समता गहाळ होऊन जाईल, न्याय निर्वासित होईल, म्हणून कितीहि नापसंत कायदा असला तरी तो पाळण्याचें राजकीय कर्तव्य असतें. समाजविषयक कर्तव्य पाळणें न पाळणें हें सशर्त असूं शकतें. राजकीय कर्तव्याबाबत तसें नाहीं व सामाजिक कर्तव्य सशर्त असतें याचा अर्थ जें समाजानें मान्य केलेलें आहे त्यामध्यें बदल घडवून आणण्याचा नैतिक हक्क व्यक्तीला असतो व तेवढ्यापुरतें तो बोलूं शकतो. म्हणून त्याला बोलण्याचा संपूर्ण अधिकार असला पाहिजे. समाजाचे विचार स्तब्ध असतील तर त्यांत खळबळ उत्पन्न करण्याचा त्याला अधिकार आहे. मग चर्चा होईल, वादविवाद होईल आणि मग लोकशाही प्रक्रियेनें कायद्यांत बदलहि घडून येईल. आणि श्रद्धा जाहीर करण्याचें अगर विचार बोलून दाखविण्याचें कार्य करीत असतांना विद्यमान कायद्यानुसार मिळालेली

शिक्षा स्वीकारली पाहिजे. जुनें नष्ट करून नवें निर्माण करीत असतांना एखादा दगड अंगावर पडल्यास तक्रार करतां कामा नये. जगामध्यें स्पष्ट व सत्य बोलणारे निघाले म्हणून जगाची प्रगति झाली. प्रचलिताला धक्का देणारे, त्यागी व तत्त्वज्ञ निघाले म्हणून समाजाचें पाऊल पुढें पडलें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. कायदा पालन करण्यानें काय होईल व न पालन करण्यानें काय होईल, याचा विचार करण्याऐवजीं अधिक विचार ज्या गोष्टीवर सर्व समाज सुस्थापित आहे व ज्याच्यामुळें लोकव्यवहार चालला आहे, त्या पार्श्वभूमीचा अधिक विचार केला पाहिजे. हातांत कोणतें शस्त्र घ्याव-याचें हें महत्त्वाचें आहे. तथापि हात समर्थ पाहिजेत हें अधिक महत्त्वाचें आहे. आणि म्हणून राज्यामार्फत व्यक्तीचा विकास व्हावयाचा आहे. राज्यामार्फत न्याय मिळवावयाचा आहे. न्याय मिळावयाचा आहे, याचा अर्थ स्वातंत्र्य, समता यांचें सुख अनुभवा, वयाचें आहे. स्वातंत्र्य, समता व अन्य अधिकार व्यक्तींना, नागरिकांना आहेत, समाजामध्यें सुखी जीवन जगण्याचा हक्क सर्वांना आहे आणि तो जर प्रभावी व्हावयाचा असेल, तर तलवारीची मूठ जशी भक्कम असली पाहिजे, त्याप्रमाणें कायदाविषयक अगर राज्यविषयक निष्ठा प्रबल असली पाहिजे. राज्यांतील व्यक्तिमात्राला केवळ राजकीय समता मिळाली पाहिजे एवढेंच नव्हे; तर तिजबरोबर सामाजिक व आर्थिक समता पण मिळाली पाहिजे. विद्यमान समाजांतील विषम वांटणी व विषम आर्थिक व्यवस्था पद्धतशीर रीतीनें व प्रभावी रीतीनें दूर करावयाचा एक मार्ग म्हणजे कायद्याचा मार्ग आहे आणि तो कायदा कोणा एका व्यक्तीची लहर नव्हे. कुण्या एका गटाचा तत्त्वनिष्ठ सोंवळेपणा नव्हे, अथवा कोण्या एका पक्षाचा उच्छृंखल-पणा नव्हे. कायदा म्हणजे समाजांतील व्यक्तीच्या इच्छेचा, अनुभवाचा, दृष्टिकोनाचा निदर्शक असला पाहिजे. कायद्याची वैधता वरील गोष्टी ज्या प्रमाणांत आहेत त्या प्रमाणांत वस्तुतः असते. तथापि शरीराशिवाय आत्मा नाहीं, त्याप्रमाणें कायद्याचें औपचारिक शरीर याचा सन्मान झाला पाहिजे. लोकशाही व्यवस्थेंत स्वातंत्र्य, समता इत्यादि व्यक्तीचे अधिकार व कायदा यांचा तात्त्विक व आंतरिक संबंध कसा असतो हेंच थोडक्यांत सांगितलें आहे.

: ५ :

# एक दृष्टिक्षेप

प्रस्तुत पुस्तकांत आधुनिक राज्य व स्वातंत्र्य यासंबंधींचा विचार एका विशिष्ट भूमिकेवरून केला आहे. आधुनिक राज्य याची कल्पना कशी निर्माण झाली, त्याचें स्वरूप कोठें व कसें बदललें गेलें, कोणत्या पद्धतीनें बदललें गेलें, याचा विस्तारशः विचार केला नाहीं. त्यासंबंधींचा विचार प्रस्तुत लेखकाच्या 'राज्यशास्त्रविचार' या ग्रंथांत केला आहे. त्याचप्रमाणें स्वातंत्र्य व त्याचीं विविध स्वरूपें यांचाहि विस्तारशः विचार 'राज्यशास्त्रविचार' व 'राज्यव्यवहारविचार' या ग्रंथांतून केला आहे. कायद्यासंबंधींचा विचार 'विधिशास्त्रविचार' या ग्रंथांत विस्तारशः केला आहे. प्रस्तुत ग्रंथांत जो विचार केला आहे, तो या सर्व कल्पनांमागील नैतिक व तात्त्विक भूमि हीच गोष्ट डोळ्यांपुढें ठेवून केला आहे. आणि विद्यमान जगांत आतां लोकशाही स्वरूपाचें राज्य ही चालू राजकीय फॅशन झाली आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. आधुनिक राज्य हें सामान्यपणें 'लोकशाही राज्य' निदान आज जगांतील कुठलेंहि राज्य आपण 'हुकूमशाही' आहोंत असा दावा करीत नाहीं. उलट, उघड उघड वस्तुतः हुकूमशाही असलेलीं राज्यें लोकशाहीचें बेगड लावून आपण लोकशाही आहोंत असें दाखवीत असल्याचा अनुभव येत आहे. यावरून एक गोष्ट सिद्ध आहे कीं, हुकूमशाही ही एक राजकीय शिवी झाली आहे. जगांतील लोकमताचा त्या कल्पनेला पाठिंबा नाहीं. दारूबंदी झाली असतांना जशीं कांहीं माणसें चोरून दारू पितात व गाळतात, त्याचप्रमाणें लोकमतानें जगांत हुकूमशाहीला बंदी केली असली, तरी फसवून, चोरून, बनवाबनवी करून, हुकूमशाहीचे प्रयोग अनेक ठिकाणीं चालू असल्याचें आढळून येतें. सामाजिक प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत असल्याचें आढळून येतें. सामाजिक प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत हुकूमशाहीला राहिली नाहीं, ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. व्यक्तीला समाजाची चाड असते त्याप्रमाणें राष्ट्रांना व राज्यांना आंतरराष्ट्रीय जगाच्या मताची चाड असते, ही गोष्ट आतां अधिकाधिक प्रत्ययाला येत आहे. एका दृष्टीनें निरनिराळ्या स्वतंत्र राज्यांनीं आपसांत कसें वागावें यासंबंधींचीं कांहीं मूल्यें गेल्या दोनशें वर्षांत निर्माण झालीं आहेत. त्याप्रमाणें प्रत्येक राज्यानें काय आदर्श

ठेवावेत यासंबंधींचींहि सर्वमान्य मूल्यें निर्माण झालीं आहेत. व्यक्तिस्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक समता, आर्थिक न्याय या गोष्टी आतां कोणी दिलेला प्रसाद अगर केलेला अनुग्रह असें मानलें जात नाहीं. उलट, या गोष्टी आतां इतक्या नैसर्गिक आवश्यक वाटूं लागल्या आहेत कीं त्या जेथें नाहींत अगर अपुऱ्या आहेत त्या ठिकाणीं कांहीं तरी न्यूनता आहे, दोष आहे असें जग मानतें.

ही जी स्थिति आज प्राप्त झाली आहे ती फ्रेंच राज्यक्रांतीपासून सुरू झालेल्या विचारप्रवाहांचें परिणामस्वरूप आहे. राजकीय स्वातंत्र्य व समता केवळ जगांतील एका राष्ट्रांत असून भागत नाहीं ती आंतरराष्ट्रीय जगांत असेल तर त्या विशिष्ट देशांत राहते, वाढते, व असें झालें म्हणजे जगभर स्वातंत्र्याचें, समतेचें आणि म्हणून शांततेचें वातावरण निर्माण होतें. स्वातंत्र्य काय किंवा हुकूमशाही काय किंवा कुठलीहि समाजांतील वृत्ति काय, या सर्व स्पर्शजन्य रोगाप्रमाणें पसरत असतात. एका पणतीनें दुसरी पणती लावावी, उदाहरणामागून उदाहरणें घडावीं त्याप्रमाणें होतें व तोच अनुभव गेल्या दोनशें वर्षांत आलेला आहे. फ्रेंच क्रांतीनंतर अनेक हुकूमशाही राष्ट्रांतून स्वातंत्र्या-साठीं, न्यायासाठीं उठाव झाले. अनेक कृत्रिमपणें अंमलांत आलेलीं राज्यें व साम्राज्यें कोसळून पडलीं. त्याच प्रवृत्तीबरोबर अनेक असंघटित राज्यें मोठ्या माशानें लहान माशाला गिळावें याप्रमाणें क्रिया होऊन अनेक साम्राज्यें पण निर्माण झालीं. वसाहतवाद हा फ्रेंचक्रान्तीनंतर स्वातंत्र्यवादाबरोबर वाढीस लागला. आशियाला व आफ्रिका खंडांत अनेक राष्ट्रांचीं स्वातंत्र्यें हिरावून घेण्यांत आलीं. एकाच वेळीं जगांतील एका भागांत स्वातंत्र्यवादी राष्ट्रवाद प्रभावी होत होता तर दुसरीकडे वसाहतवादी साम्राज्यशाही जोरानें वाढत होती. पहिल्या युद्धाचा परिणाम अधिक लोक व अधिक राष्ट्रें स्वतंत्र झालीं आणि लोकशाहीचें पाऊल थोडेसें कां होईना पुढें पडलें. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ (लीग ऑफ नेशन्स) कांहीं उदात्त हेतूसाठीं स्थापन झाला. राष्ट्रवाद व स्वातंत्र्यवाद यांचा पुरस्कार व पाठपुरावा करण्यासाठीं स्थापन झालेलें हें संघटन ज्यांनीं जें बळकावलें होतें त्यांच्या त्या कृत्यांना प्रतिष्ठा देणारें संघटन बनलें. त्याप्रमाणें राष्ट्रा-राष्ट्रांतील तंटेबखेडे तोडण्याची त्याची योजना प्रभावी ठरली नाहीं. जीं राज्यें जबरदस्त होतीं त्यांनीं या संघाला विचारलें नाहीं, जुमानलें नाहीं, आणि परिणाम असा झाला कीं, या दोन महायुद्धांतील काळांत औपचारिक लोकशाही जरी कांहीं ठिकाणीं दिसत असली तरी व्यक्तिगत स्वातंत्र्यें कानसलीं गेलीं. समता फारशी नव्हतीच, पण तिचा विचार करणेंसुद्धां राष्ट्रद्रोह मानण्यांत येऊं लागला आणि कायदा या परिस्थितींत भांडवलवाल्या सत्ताधीशांचा हुकूम ठरला. कांहीं ठिकाणीं तर व्यक्तिगत हुकूमशाही स्थापन झाली. पहिल्या महायुद्धानंतर लोकशाहीच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या, सर्वसाधारण समतेच्या ज्या आशा व अपेक्षा निर्माण झाल्या होत्या, त्या मेल्या जरी नाहींत तरी मूर्च्छित झाल्या. जगभर हिटलरशाही, मुसोलिनीशाही आणि स्टालीनशाही या सर्व

त्रिशाह्यांनीं जगांतील सामान्य लोकांना त्राहि भगवन् केलें. अनेक देशांची आर्थिक प्रगति झाली पण त्या प्रगतीनंतरहि सामान्य जनतेचें दारिद्र्य फारसें कमी झालें नाहीं. आर्थिक दुःखांवर स्वातंत्र्य हेंच एकमेव औषध आहे. याची जाणीव वाढली, पण या औषधाचा प्रयोग फारसा होऊं शकला नाहीं. उलट अनेक बुद्धिमान् लोक हुकूमशाही अर्थव्यवस्थेचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागले. आर्थिक संपन्नता म्हणजे खरें स्वातंत्र्य व संरक्षण म्हणजे समता असे सिद्धान्त निर्लज्जपणें मांडण्यांत येऊं लागले. सोईपुढें तत्त्व जमीनदोस्त झालें. नैतिक जीवन शारीरिक संरक्षणापुढें हतप्रभ झालें. संघर्ष व युद्ध नको म्हणून केलेले प्रयत्न व लोटांगणें यांनींच युद्ध जवळ आणलें, अपरिहार्य केलें. आणि मग दुसऱ्या महायुद्धाच्या घोषणा प्रथम आपापल्या आखाड्यांतून आणि नंतर रणमैदानांतील शस्त्रांच्या खणखणाटानें सुरू झाल्या. दुसऱ्या महायुद्धाचें ध्येय युद्धमान राष्ट्रांनीं आपआपल्या परीनें जाहीर केलें आणि दोन युद्धमान गटांत समान असें कांहीं नव्हतें. किंबहुना इंग्लंड, अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्या गटांत हिटलरविरोधी यापेक्षां कांहींहि बंधनकारक अशी समान भावना नव्हती. रूझवेल्टसाहेबांचीं चार स्वातंत्र्यें गौरवास्पद होतीं यांत शंका नाहीं, आणि त्यामुळें महायुद्धानंतर राष्ट्रवादी स्वातंत्र्य व व्यक्तिगत स्वातंत्र्य हीं वाढीस लागतील असें वाटूं लागलें. युद्ध संपून एक तप होऊन गेलें. युद्धानंतर लोकशाही व स्वातंत्र्य ह्या कल्पना पुन्हा एकदां प्रतिष्ठित व प्रभावी झाल्या. गेल्या तेरा वर्षांत संयुक्त राष्ट्रसंघ (यू. एन्. ओ.) यानें कांहीं प्रथा व परंपरा निर्माण केल्या आणि गांवांत पोलीसचौकी आल्यामुळें तंटेबखेडे कमी होतात अगर मर्यादेपलीकडे ते वाढले जात नाहींत, तसा थोडासा अनुभव आला हें खरें. तथापि जगामधील गटशाही कमी झाली नाहीं. जुन्या स्वार्थाच्या कल्पना नव्या स्वरूपांत पुढें येऊं लागल्या. आफ्रिकेंतील राष्ट्रें भराभर स्वतंत्र होऊं लागलीं आहेत. पण जगाची या दोन गटांनीं केलेली विभागणी त्या त्या गटांतील सभासद राष्ट्रांना संपूर्ण स्वातंत्र्या-पासून वंचित करीत आहे हेंहि उघड दिसत आहे. म्हणून आज संयुक्त राष्ट्रसंघानें राष्ट्रसंघापेक्षां अधिक प्रभावी संघटन निर्माण केलें आहे हें खरें. पूर्वीच्यापेक्षां अधिक अभय-दान लहान लहान स्वतंत्र राष्ट्रांना मिळत आहे हेंहि खरें. तथापि राष्ट्रांचें स्वातंत्र्य निर्विवाद नाहीं, त्याचप्रमाणें व्यक्तिगत स्वातंत्र्यें याचा अर्थ केवळ राजकीय असा आतां राहिला नाहीं. स्वातंत्र्य याचा अर्थ राष्ट्र स्वतंत्र आहे एवढाच राहिला नाहीं. स्वातंत्र्याचा खरा अर्थ राष्ट्र स्वतंत्र आहे, व्यक्तिहि स्वीकृत मर्यादेंत स्वतंत्र आहे. ती स्वतंत्र आहे याचा अर्थ तिला लोकशाही राज्यांत स्थान आहे एवढाच नाहीं. आर्थिक दृष्ट्या व्यक्तीचें जीवन सार्थ व समृद्ध झालें एवढ्यानेंच तें जीवन यथार्थतः स्वातंत्र्यपूर्ण झालें असें नाहीं. ज्या सामाजिक संदर्भांत ती व्यक्ति असेल तेथें सामाजिक व आर्थिक समता असली पाहिजे, समाज सधन झाला, किमान जीवनमान वाढलें, एवढ्यानें स्वातंत्र्यपौर्णिमा उदित झाली असें म्हणतां येणार नाहीं. कांहीं कला उमलल्या, प्रज्वलित झाल्या एवढें

म्हणतां येईल. स्वातंत्र्याची प्रसादपौर्णिमा जेव्हां विषमतेच्या आर्थिक व सामाजिक कलंकापासून विमुक्त असते, तेव्हांच ती पूर्ण पौर्णिमा म्हणतां येईल. एवढें खरें कीं, गेल्या तेरा वर्षांत जगभर जनतेमध्यें थोडें आशेचें, साहसवृत्तीचें वातावरण उत्पन्न झालें आहे, त्याजबरोबर व्यक्तीची उन्नति व विकास हा राष्ट्राची उन्नति विकासाशीं संबंधित असला पाहिजे, याची जाणीव पण झाली आहे आणि म्हणून एतद्विषयक चर्चा सर्वत्र खुल्या मनानें होत आहे.

दोन महायुद्धांनंतर जगांतील समता व स्वातंत्र्यविषयक विचारसरणींत पुष्कळ व्यापकता आली आहे, विशालपणहि आलें आहे. पण त्याचबरोबर स्वातंत्र्य ही स्थायीभावना संपूर्णपणें स्थापित झाली आहे असें मात्र नव्हे. जगामध्यें गरमागरम युद्ध नसलें तरी शीतयुद्धाचें वातावरण स्पष्ट आहे. कांहीं राज्यांना त्याच्या प्रगतीसाठीं त्याची आवश्यकता वाटत आहे. क्षणभर विष खाऊन जगण्याचा हा प्रयत्न आहे. थोड्या प्रमाणांत विष हें औषध ठरतें, असें म्हणतात. तथापि, सामान्य माणसाच्या दृष्टीनें विचार करतांना हें शीतयुद्ध मनाला शांति देत नाहीं. भवितव्याला साडेसातीच चालू आहे असें वाटतें. त्याचप्रमाणें जगांतील प्रत्येक राज्यांत व्यक्तिगत स्वातंत्र्य किती रुंदावलें, सामाजिक व आर्थिक समता किती व्यापक झाली हें पाहिलें असतां झालेली प्रगति कांहीं ठिकाणीं समाधानकारक असली, तरी बहुसंख्याक प्रदेशांतून ती असमाधानकारक आहे. स्वातंत्र्य हें सामाजिक समता व आर्थिक न्याय याविना परिपूर्ण नसतें आणि ती स्थिति यावयाची, तर आर्थिक परिस्थिति व औद्योगिक उन्नति जगभर मोठ्या प्रमाणांत व्हावयास पाहिजे, आणि याबाबत ज्या ठिकाणीं आशास्पद वातावरण आहे त्या ठिकाणीं कायदा सामान्यपणें मानला जातो. अर्थव्यवस्था प्रगमनशील आहे, रोजगार वाढत आहे, कर्तृत्वाला संधी आहे असें वातावरण असलें म्हणजे तेथें साहस, प्रयत्नशीलता व उत्कट गुण, सृजनशीलभाव, कार्यप्रवण असतो आणि लोकशाहीप्रणीत विचारस्वातंत्र्य असल्यानें वरील वातावरण अधिकाधिक वाढतच जातें. याच्या उलट जेथें आर्थिक व्यवस्था खुरटलेली, चालचलाऊ व विषमतापूर्ण असेल तेथें भविष्याबद्दल किंबहुना विद्यमाना-बद्दलहि माणसें साशंक होतात आणि मग त्यांना मर्यादेंत ठेवण्यासाठीं राज्यसत्ता मौलिक स्वातंत्र्यांना कमी करते, कानसत जाते. अनेकांना मग नवे विचार भयानक वाटतात व जें प्रगतिशील अर्थव्यवस्थेंत स्तुत्य मानलें गेलें असतें तेंच मग निंद्य ठरतें. लोकांचीं गाऱ्हाणीं दुर्लक्षिलीं जातात. आणि मग पुष्कळ वेळां लोकांना दाबून तरी टाकलें जातें नाहींतर सोईसाठीं म्हणून कोणाशीं तरी वैर करून देशामध्यें संकटाचें व लढाईचें वातावरण उत्पन्न केलें जातें व जें न्याय्य तें विलंबित केलें जातें. आजूबाजूला मदत करणारे अयूब अगर मावो त्से तुंग सामान्यतः निमित्ताला सांपडतातच. लोकांच्या अपेक्षा दाबून टाकून अगर त्यांचें लक्ष राष्ट्रीय

संकटाकडे ओढून कांहीं काळ कंठतां येतो हें खरें. राष्ट्राच्या संरक्षणासाठीं प्रजेच्या भावना प्रक्षोभित करून संचितवादाचें हितच संरक्षिलें जातें. राज्याच्या सीमांचें संरक्षण करण्याच्या निमित्तानें स्वातंत्र्यावर आक्रमण करून त्याच्या सीमा मागें मागें ढकलल्या जातात. दोन महायुद्धांनंतरहि स्वातंत्र्य व समता यांना कोठेंच धोका नाहीं अशी स्थिति नाहीं. स्वातंत्र्याचा उत्साह व समतेंतील अभिमान जगभर दिसून येत आहे असेंहि म्हणतां येत नाहीं, आणि स्वातंत्र्याचा व समतेचा अर्थहि जेवढ्या व्यापक प्रमाणांत मागील लिखाणांत करण्यांत आला तेवढा अजून कित्येक ठिकाणीं करण्यांत येत नाहीं. अमेरिकेंत अद्यापि स्वातंत्र्य म्हणजे नियंत्रण व नियोजनरहित अर्थव्यवस्था, खुल्या बाजाराची व्यवस्था, म्हणजे समान संधी असें मानलें जात आहे. आशियांतील व आफ्रिकेंतील अनेक राष्ट्रांतून स्वातंत्र्य याचा अर्थ सताधीश वर्गाची मिरास असाच आढळून येत आहे. जो कांहीं स्वातंत्र्याबद्दलचा विचार होत आहे तोसुद्धां वर्गहितदृष्टीनें. आशिया व आफ्रिका खंडांत अगणित व असंख्य लोक अद्यापि दारिद्र्याच्या गाळांत रुतून पडले आहेत. कांहीं युरोपियन राष्ट्रांतून महायुद्धांतील पराभवामुळें आशामय जीवन नाहींसें झालें आहे आणि जेथें स्वातंत्र्य व सधन समाज एकत्र आले आहेत तेथें तुच्छतेची भावना व नैतिक ऱ्हास दिसून येत आहे. खऱ्या स्वातंत्र्याचा अर्थ आपल्या प्रमाणें अन्यहि देशांतील व परदेशांतील लोक स्वतंत्र व सुखी झाले पाहिजेत अशी बुद्धि असणें, पण तशी ती दिसून येत नाहीं. गेल्या तेरा वर्षांत कांहीं प्रगति झाली नाहीं असें नाहीं. स्वातंत्र्याचा विचार माणसें आपण जीवंत आहोंत एवढें अनुभवाला आलें म्हणजे करूं लागतात. घरीं, दारीं, बाजारीं व शेजारीं सर्वत्र दारिद्र्य, जीवंत राहण्यासाठीं सुद्धां विवंचना अशी स्थिति असेल तेव्हां माणसांचीं मनें उद्यांचा दिवस कसा असेल व आजचा कसा निभेल याचा विचार करण्यांतच गढून जातात. व्यापक व तेजस्वी अशा नैतिक भावना त्यांच्या मनाला शिवतसुद्धां नाहींत आणि म्हणून आवश्यक गरजेपासून मुक्ति ( फ्रीडम फ्रॉम वॉन्टस् ) ही एक महत्त्वाची घोषणा महायुद्धाच्या काळांत ठरली. प्रत्येकाला जीवंत राहण्याचा हक्क आहे हा एक मौलिक हक्क ठरला आणि ह्या हक्काच्या अनुरोधांतच नियोजनव्यवस्था आर्थिक क्षेत्रांत आकर्षक ठरली. तथापि सामान्य जनांच्या उन्नतीसाठीं आवश्यक असणारी नियोजनव्यवस्था स्वातंत्र्यावर आक्रमण आहे असें म्हणून तिला विरोध करणारे अमेरिकेंतच आहेत असें नव्हे, तर भारतांतहि सीलोनपासून श्रीनगरपर्यंत आहेत आणि जर एका राष्ट्रांत स्वातंत्र्य उपभोगणारे व गुलामींत राहाणारे एकत्र राहूं शकत नाहींत, अथवा एकाच राष्ट्रांत संपन्न व विपन्न असे वर्ग फार काळ राहूं शकत नाहींत, हा ऐतिहासिक अनुभव मान्य केल्यानंतर जगामध्येंहि कांहीं राष्ट्रें स्वतंत्र व संपन्न व कांहीं राष्ट्रें दास्यांत व दारिद्र्यांत असेंहि आतां राहणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें एकाच्या स्वातंत्र्याच्या पूर्णतेसाठीं त्याच्याशीं संबंध येणारे समाजांतील व समाजाबाहेरील लोक हेहि स्वतंत्र असावे

लागतात, त्याप्रमाणें एका राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं अन्य राष्ट्रेंहि स्वतंत्र असलीं पाहिजेत, हा नैतिक सिद्धान्त आतां मान्यता पावला असून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून त्याचा प्रचार होत आहे आणि म्हणून गेल्या दहाबारा वर्षांत जगांतील अर्थव्यवस्थे-बाबतहि कांहीं नियमन स्वीकारलें गेलें आहे. संयुक्त राष्ट्रसंघामार्फत त्या दृष्टीनें अनेक गोष्टी घडून आल्या आहेत. हें सर्व चांगल्या रीतीनें घडून येण्यासाठीं जगामध्यें सहकार व शांतता हवी आहे. तथापि अद्यापहि आंतरराष्ट्रीय जगांतील तंटे तोडण्याचा मार्ग युद्ध हाच आहे असें मानलें जात आहे. युद्धोत्तरचा काळ म्हणजे नवीन युद्धाची प्रस्तावना असेंच समजलें जात आहे.

सुधारणा व प्रगति ज्या टप्प्यापर्यंत आली आहे तो लक्षांत घेतां जगभर स्वातंत्र्य, सुबत्ता, स्वास्थ्य व स्वराज्य यांचा अनुभव न आल्यास जगाची जी प्रगति झाली आहे ती निश्चितपणें धोक्यांत येईल. जगाचें राजकारण – विद्यमान राजकारण – तरी सामान्यपणें दोन गटांत विभागलें आहे. तरी एक तिसरा असंघटित पण अध्याहृत असा तटस्थ गट आहे. तथापि या राजकारणानें कोठें जरी खुट्ट झालें तरी त्याचा परिणाम जगभर होतो आणि जर या राजकारणांत वक्रता आली व जगाच्या व्यवहारांत वक्रता येऊं पाहात आहे तर त्यामुळें राष्ट्रीय एकी व आंतरराष्ट्रीय एकी पण धोक्यांत येईल. अनेक ठिकाणीं धोक्यांत आलेली दिसून येत आहे. राजकारण आग्रही झालें म्हणजे देशामध्यें क्रान्तीचें वादळ उठण्याचा संभव असतो आणि आंतरराष्ट्रीय जगांत राजकारण आग्रही झालें म्हणजे युद्धाआधींचीं अशुभ चिन्हें दिसूं लागतात. आज युद्ध झालें तर त्याचें रणमैदान एखादा विशिष्ट प्रदेश अगर एकादा खंड हें न राहातां सर्व भूगोल व खगोल त्या युद्धाच्या ज्वालांनीं व्यापला जाईल. शेषाच्या शिरावर असलेली पृथ्वी बरबाद होईल. शेषसुद्धां शेष राहील कीं नाहीं याचीच शंका आहे आणि तसें झालें म्हणजे सर्व स्वातंत्र्यें गेलीं व सर्व नैतिक भाव गेले. ग्रंथच जळाल्यानंतर त्यांतलें साहित्य जळालें हें सांगण्याचें कारण नाहीं. आणि म्हणून व्यक्ति-व्यक्तीसाठीं व राष्ट्रासाठीं, जगामध्यें शांतता, सद्भाव व सहकार यांची आवश्यकता आहे. तसा सद्भाव, सहकार अगर शांति जगामध्यें राष्ट्राराष्ट्रांत आर्थिक विषमता असेपर्यंत राहाणार नाहीं हें उघड आहे आणि म्हणून आजच्या राष्ट्रांत .आहेरे आणि नाहींरे असें जें चित्तक्षोभक दृश्य दिसत आहे तें कमी झालें पाहिजे आणि तें कमी व्हावयाचें तर शक्तीचा प्रयोग अनुचित व निरुपयोगी ठरणार आहे आणि म्हणून त्याहि क्षेत्रांत विचारविनिमय चर्चा होऊन इष्ट तें घडवून आणलें पाहिजे. ज्याप्रमाणें राष्ट्रांतील विविध पक्षांत मौलिक विचारसरणीबाबत, मौलिक गृहीतकृत्याबाबत एकवाक्यता असेल तरच राष्ट्राची प्रगति होते, त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय जगांत कांहीं मौलिक गृहीत-कृत्यांबाबत एकवाक्यता असली पाहिजे आणि जर विचारविनिमयानें, शांततेनें सर्व प्रश्नांचा निकाल लागला पाहिजे ही मौलिक श्रद्धा जगांतील राष्ट्रांमध्यें नसेल तर

प्रगति होणार नाहीं व जगाचें भविष्य तसेंच लटकत राहील. आज प्रस्फोट झाला नाहीं तरी उद्यां तो होईल. कारण, जगांतील जनतेला स्वातंत्र्याची ओढ लागलेली आहे. तिची सुखी जीवन जगण्याची भूक सारखी वाढतच आहे. या परिस्थितींत आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत कोणी दांडगाईनें वागूं लागल्यास त्याला क्षणैक यश मिळेल; पण त्याचें व जगाचें युगापर्यंतचें नुकसान होईल. जबरदस्ताचें ऐकावें तर आंतर-राष्ट्रीय जगांतहि असें अनुभवाला येतें कीं त्याचा जबरदस्तपणा वाढतच जातो. स्वस्थ बसण्यानें तटस्थता राखली जाईल, पण ही आजची तटस्थता उद्यांच्या विनाशाची नांदी ठरेल. म्हणून जेथें मौलिक श्रद्धेचा प्रश्न येतो तेथें तटस्थता असून भागत नाहीं आणि मोघमपणा फार वेळपर्यंत मुत्सद्दीपणा ठरत नाहीं. रस्त्यांतील प्रत्येक भांडणांत माणसानें पडावें हें बरें नाहीं हें मान्य. तथापि जेथें उघड उघड निर्दय व असह्य अन्याय होत आहे, गाय मारली जात आहे, स्त्रीची अब्रू घेतली जात आहे, त्या ठिकाणीं धांवून न जाणें ही कर्तव्यच्युति ठरते. आणि यु. एन. ओ. च्या धर्मसभेत ज्यांनीं अशी तटस्थांची भूमिका घेतली त्यांनीं आपल्या आत्म्याला तर अवमानित केलेंच पण त्याजबरोबर आंतरराष्ट्रीय राजकारणाला वाईट वळण दिलें असेंच म्हटलें पाहिजे. जगामध्यें शांतता राखण्यासाठीं सतत व संतत प्रयत्न झाले पाहिजेत. कारण शांततेच्या अभावीं जगांतील स्वतंत्र राष्ट्रांतील स्वातंत्र्य व व्यक्तीचें स्वातंत्र्य हीं नष्ट होतील.

तसें पाहूं गेलें तर जगांतील दोन मस्त गटांत केवळ आदर्शविषयकच फरक आहेत असें नाहीं किंबहुना सामान्यपणें असेंहि म्हणतां येईल कीं, आदर्शांच्या बाबतींत बऱ्याच अंशापर्यंत उभतांमध्यें समान क्षेत्र आहे. फरक आहे साधनांबद्दलचा आणि त्याजबरोबर विशेषतः संपत्तिविषयक दृष्टिकोनांचा. ज्या देशांतून लोकशाही व्यवस्था चालू आहे असा दावा सांगितला जातो, त्या ठिकाणीं वर्गव्यवस्था व सुप्त अथवा गुप्त वर्गकलहहि आहेत आणि हा कलह संपत्तिविषयक आहे. लक्ष्मी ही सर्व जगांतील दुःखांचें आदिकारण आहे असें कोणीं म्हटलें तर तें रास्त आहे. समुद्रमंथनांतून निर्माण झालेली ही लक्ष्मी सर्वत्र खळबळ व मंथन करणारी देवता ठरली आहे. खाजगी संपत्तीबाबत पाश्चात्य लोकशाही राज्यें यांचे दृष्टिकोन स्पष्ट आहेत. आणि तेथें असें दिसून येतें कीं, संपत्तिविषयक बाबतींत या दृष्टिकोनावर वा अर्थव्यवस्थेवर हल्ला झाल्यास त्याचा मुकाबला संपत्तिमान् वर्ग रक्तपाताला-यादवीलासुद्धां न जुमानतां करतील. इतकेंच काय लोकशाहीमुळें समतेची मागणी होत आहे म्हणून जरूर पडल्यास लोकशाहीचाहि ते बळी देतील. दोन महायुद्धांतील अनुभव हेंच दर्शवितो. त्याबरोबर हेंहि खरें कीं, अनेक राष्ट्रांतून संपत्तीचें उत्पादन वाढल्यानें समाज सधन झाला आहे. वरचे खालीं आले नाहींत. खालचे वर आल्यानें वर्ग असूनसुद्धां कलहाची तीव्रता कमी झाली आहे. तथापि विषमता ही कांहीं प्रसंगाप्रसंगानें उठणारी पोटतिडीक नाहीं. तो एक कायमचा सामाजिक रोग आहे. त्या रोगावरील औषध आंकड्यांची

चलाखी करून निर्माण होत नाहीं, गांवाला मिळालें म्हणून गांवकींतील प्रत्येक व्यक्तीला मिळालें असें होत नाहीं, आणि म्हणून समाजांतील प्रत्येक व्यक्तीला किमान तर मिळालेंच पाहिजे. पण तेवढ्यानें भागत नाहीं. आजच्या युगांत आवश्यकतेपेक्षां, सामाजिक सरासरीपेक्षां जें ज्यांच्याजवळ अधिक असेल तें प्रयत्नानें, कष्टानें, नीतियुक्त मार्गानें मिळविलें आहे हें दाखविण्याचा बोजा त्यांच्यावर आहे. हुकूमशाहीमध्यें दारिद्य हें आरोपीच्या पिंजऱ्यांत असतें. लोकशाहीमध्यें तें साक्षीदार बनतें. आणि अनीतीचा प्राथमिक आरोप संपत्तिमान् वर्गावर केला जातो व जोंपर्यंत देशामध्यें किमान प्रत्येक व्यक्तीला मिळत नाहीं तोपर्यंत शांतता नाहीं व तें मिळाल्यानंतर समान मिळेपर्यंत लोकांचीं मनें स्वस्थ राहात नाहींत व त्यामुळें स्वातंत्र्यहि त्या समाजांत यथार्थ होत नाहीं, फुलत नाहीं. म्हणून संपत्तीच्या निर्मितीवर समाजाची मालकी सामान्यपणें असली पाहिजे. तिच्या निर्माण करण्याच्या कामीं ज्यांनीं भाग घेतला त्यांना त्यांना त्यांचा हिस्सा खळ्यावरच मिळाला पाहिजे आणि देशामध्यें ही व्यवस्था चांगल्या रीतीनें तेव्हां शक्य होते, जेव्हां आंतरराष्ट्रीय जगांत अनुकूल असे आदर्श प्रभावित होतात. राष्ट्रांत अनेक मार्गांनीं इष्ट तें घडवून आणण्यास संधी असते. जगांत तितकी संधी असत नाहीं. सर्व जग एक झालें व 'जय हिन्द' अगर 'जय सोव्हिएटच्या' ऐवजीं 'जय जगत्' ही घोषणा सर्वमान्य झाली, तर राष्ट्रीय सीमा, राज्याराज्यांतील सीमा या अर्थशून्य ठरतील आणि अगदीं खऱ्या अर्थानें सुवत्ता व संपत्ति अविभाज्य ठरली म्हणजे तिचा उपभोग न्याय्य प्रमाणांत सर्वांना घेण्याची संधी मिळेल. आजच्या जगांत राष्ट्रवाद प्रभावी असल्यानें आपापलें प्रभुत्व जागतिक शांततेसाठीं अगर कल्याणाकरितां थोडेंसेंसुद्धां कमी करून घेण्यांत राष्ट्र-राज्यें तयार नसतात. व्यक्ति आपल्या विकासासाठीं समाजाचे संयम व राज्याचे निर्बंध मानत असते. कारण त्या चौकटींतच त्याचें जीवनचित्र प्रमाणबद्धपणानें प्रतिष्ठा पावत असतें. अशी कांहीं चौकट आंतरराष्ट्रीय जगांत निर्माण झाली नाहीं. आंतरराष्ट्रीय कायदा हा विनवणीस्वरूपाच्या पलीकडे गेला नाहीं. त्याला आज्ञापक असें स्वरूप आलें नाहीं. गांवच्या चार चौधरींचा निवाडा अगर निर्णय एवढाच त्याचा अर्थ आजहि आहे. कारण तो न मानल्यास प्रभावी अशी दंडव्यवस्था नाहीं. याचा अगदीं ताजा अनुभव चालू आफ्रिकेंतील राजकारणांत येत आहे. नजीकच्या भविष्यांत संयुक्त राष्ट्रसंघ एक आज्ञापक निर्णय देणारें व ते अंमलांत आणण्याची शक्ति बाळगणारें संघटक झाल्यास जगांतील शांतता निश्चित प्रस्थापित होईल व सुबत्ता पण जगाच्या जीवनांत मांगल्यानें प्रवेश करील.

ह्या ग्रंथांत सांगितलें आहे कीं, आज जगांत स्वातंत्र्य हें आर्थिक सुसंपन्नतेशिवाय यथार्थ नाहीं. देशामध्यें आर्थिक समता व संपन्नता येण्यासाठीं खाजगी मालकी कमी झाली पाहिजे व संपत्तीची निर्मिति व तिचें अधिक स्वामित्व जास्तींत जास्त लोकांना

लोकशाही राज्यव्यवस्थेंतच मिळूं शकतें, हा इतिहासाचा अनुभव. तोच जमेला धरून आर्थिक व्यवस्थेचा विचार ह्या ग्रंथांत केलेला आहे. खाजगी मालकी व लोकशाही व्यवस्था ह्या आतां एकत्र नांदूं शकत नाहीं आणि यांपैकी खाजगी मालकीनें हट्ट धरल्यास त्याचा परिणाम काय होईल हें सांगण्याचें कारण नाहीं. लोकशाही मग तिचें औपचारिक स्वरूप कसेंहि कां असेना, अनंत काळपर्यंत खाजगी मालकी समाजांत राहूं देणार नाहीं. ती क्रमाक्रमानें घालवावयाची का क्रांतीनें घालवावयाची एवढाच प्रश्न जगाच्या राजकारणांत महत्त्वाचा बनलेला आहे. आर्थिक विपन्नता व विषमता केवळ एका राष्ट्रांत नाहींशी होऊन चालणार नाहीं. आढीमध्यें एक आंबा वाईट असला तरी सर्व आंबे बिघडतात, त्याप्रमाणें आजच्या दुनियेंत कुठल्याहि प्रदेशांत विपन्नता अगर विषमता असेल तर जगाच्या राजकारणाची आढी नासण्यास ती पुरेशी होते. आणि म्हणून या प्रश्नाचा विचार व त्यावरील उपाययोजना जागतिक स्थरावरून झाली पाहिजे. ती करतांना सध्यांच्या युगांतील अतिरेकी राष्ट्रवाद व अतिरेकी राष्ट्रीय स्वातंत्र्य यांना आळा घालावा लागेल हें उघड आहे. कांहीं संयम जगाच्या हिताइतकेच राष्ट्रीय हितासाठीं प्रत्येक राष्ट्राला पाळावे लागतील हें उघड आहे. आजहि हरेक राष्ट्रांतून असे पक्ष विद्यमान आहेत कीं राष्ट्राच्या भौगोलिक मर्यादांना ते जुमानत नाहींत. दुनियेंतील कामगारांनो एक व्हा ही गर्जना दुर्लक्षणीय नाहीं. जगांतील कम्युनिस्ट पक्ष राष्ट्राराष्ट्रांतील सीमा मान्य करूं शकत नाहीं. कारण तसें मान्य केल्यास मौलिक तत्त्वज्ञानच नाकारल्यासारखें होतें. सीमाविषयक वाद कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाला अर्थशून्य वाटतात आणि म्हणूनच अनेक राष्ट्रांतून कम्युनिस्ट पक्षाला राष्ट्रवादी पक्षाकडून विरोध होत असतो. राष्ट्रवाद हा अद्यापि प्रभावी आहे. आणि पुष्कळ वेळां कम्युनिस्ट तत्त्वज्ञानावर कम्युनिस्ट म्हणविणाऱ्या पक्षांत तो मात करीत असतो. समाजसत्तावादाच्या बाबतींतहि असें म्हणतां येतें कीं, त्यांतहि ठिकठिकाणीं राष्ट्रवादाची व धार्मिक सांप्रदायिकतेची छाप पडली आहे. ख्रिश्चन सोशलिझम, हिंदु-सोशलिझम, चिनी सोशलिझम हे शब्द निरनिराळ्या कल्पनांनाच दर्शवितात. कांहीं साम्य त्यांच्यांत आहे हें खरें. भात खरा पण कांहीं आंबेमोहोर, कांहीं बसुमती याप्रमाणें विविधता दिसून येते. तथापि आज जें हवें आहे तें भौगोलिक सीमांना कमी लेखून अगर बाजूला सारून जें साम्य प्रभावी ठरेल तें हवें आहे. प्रादेशिक संयुक्तपणा आज जो दिसून येत आहे, तो एक टप्पा मानला पाहिजे संयुक्त भारतसंघ म्हणजे संयुक्तपणाचा एक भाव आहे. व त्या भावांत प्रादेशिकपणाबरोबर ध्येयविषयक साम्यता पण आहे. ही संयुक्तपणाची भावना अधिक व्यापक प्रमाणांत वर झाली पाहिजे, तरच स्वातंत्र्याच्या दृष्टीनें जगाचें पाऊल पुढें पडेल. लोकांना आतां स्वातंत्र्य केवळ कागदोपत्रीं नको आहे. सुखी जीवन, समृद्ध जीवन जर स्वातंत्र्यांतून निर्माण होणार नसेल तर तें स्वातंत्र्य टिकणार नाहीं व तसें स्वातंत्र्य आतां नको आहे. असें जीवन समृद्ध करावयाचें

तर सर्व जग हें एका आर्थिक व्यवस्थेखालीं एका स्थूल नियोजनव्यवस्थेखालीं आलें पाहिजे. आणि त्या दृष्टीनें जगांतील राष्ट्रांमध्यें अनुकूल प्रवृत्ति निर्माण झाल्या पाहिजेत. जी निष्ठा राष्ट्राबद्दल असते तशीच निष्ठा जागतिक व्यवस्थेबद्दल हळूहळू निर्माण केली पाहिजे. आणि म्हणून जगांतील प्रत्येक व्यक्ति सुशिक्षित व सुविचारी झाली पाहिजे. जर युद्धकाळांत अवाढव्य खर्च करून राष्ट्र संघटित करतां येतें तर राष्ट्राला सुशिक्षित करण्यासाठीं संघटन करतां येत नाहीं हें म्हणणें कोणीहि मान्य करणार नाहीं. आणि म्हणून संपत्तीचा विनिमय मोठालीं जहाजें बांधण्यांत, अंतरिक्षाला पार पाडणारीं आयुधें निर्माण करण्यांत, जगाचा नाश करणारीं अणुबाँबविषयक साधनें निर्माण करण्यांत न करतां मनुष्याच्या मनाला उन्नत व विवेकी करण्यांत श्रम व पैसा खर्च झाला पाहिजे. आज यंत्रें, साधनें, वाढत आहेत. तंत्रविषयक शोध मोठ्या प्रमाणांत होत आहेत. तथापि या क्षेत्रांतील प्रगतीबरोबर मनुष्याच्या मानसिक उन्नतीच्या क्षेत्रांत तेवढी प्रगति झालेली दिसून येत नाहीं. आणि जोंपर्यंत मनुष्यांचीं मनें विवेकी, निष्ठावंत व खंबीर नाहींत तोंपर्यंत त्याच्या हातांत आधुनिक शस्त्रें देणें हें धोक्याचें आहे हें उघड आहे. आज जगांतील स्वातंत्र्य सुरक्षित राहावयाचें असेल तर मानसिक क्रांति मोठ्या प्रमाणांत झाली पाहिजे आणि तशी क्रांति झाल्याशिवाय समाजाला समता व आर्थिक संपन्नता योग्य प्रमाणांत लाभणार नाहींत व जो समतोल सामाजिक संबंधांत हवा असतो तो राहणार नाहीं. मानसिक क्रांति न झाली तर जगामध्यें स्वातंत्र्य, समता व भ्रातृभाव या कल्पना मागें सारल्या जाऊन शस्त्रास्त्रांच्या संघर्षांत जिवंत कसें राहावयाचें एवढीच चिंता शिल्लक राहील.

विद्यमान जगांतील तांत्रिक क्षेत्रांतील शोध व बोध लक्षांत घेतां व जे कांहीं विचारप्रवाह आज आपल्याला आंतरराष्ट्रीय जगांत दिसून येत आहेत त्यांना विचारांत घेतां एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, स्वातंत्र्यविषयक तत्त्ववान व तद्विषयक सिद्धान्त हे मान्यता पावले असले, त्यांना प्रतिष्ठा मिळाली असली तरी ते संपूर्णपणें सुरक्षित आहेत, त्यांवर आक्रमण होणार नाहीं असें कोणी सांगू शकत नाहीं आणि म्हणून संरक्षणाची गरज उघड आहे व त्यासाठीं राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जगांत संघटन निर्माण केलें पाहिजे व जें थोडेंसें आहे तें समर्थ व शक्तिमान् केलें पाहिजे. अन्यायाविरुद्ध मग तो संघटन राष्ट्रीय संदर्भांत असो अगर आंतरराष्ट्रीय संदर्भांत असो, आवाज न उठविल्यास प्रबळ त्याविरुद्ध न निर्माण केल्यास दोन्ही क्षेत्रांत स्वातंत्र्य परास्त होईल, पराभूत होईल. मुकाट्यानें अन्याय सहन केल्यास भंपक व बोलघेवडे लोक यांचें फावतें, त्याप्रमाणें आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत जें राष्ट्र अगर जीं राष्ट्रें सत्याला सोडून सोईची पूजा करतात, तत्त्वाचा आवाज काढून स्वहित गोळा करतात, त्यांचें फावतें आणि मग कोठें तिबेटची शोकांतिका होते, कोठें कांगोछाप विचका होतो. मुकाट्यानें राहणें अगर मुकाट्यानें आज्ञापालन करणें हें जसें राष्ट्रीय क्षेत्रांत स्वातंत्र्यबाधक व मारक त्याप्रमाणें आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत उघड

उघड झालेले अन्याय निर्बलपणें पाहणें व नुसता निषेधसुद्धां न करतां सहन करणें या गोष्टी मग आंतरराष्ट्रीय टगेपणाला, गुंडपणाला प्रोत्साहन देणाऱ्या ठरतात. केवळ आर्थिक क्षेत्रांत संघर्ष निर्माण होईल म्हणून स्वस्थ बसणें अगर आर्थिक क्षेत्रांत मिळणारें सहकार्य मिळणार नाहीं म्हणून स्वस्थ बसणें हेंहि योग्य होणार नाहीं. म्हणून आंतर-राष्ट्रीय क्षेत्रांतसुद्धां स्पष्टपणें सत्याच्या व शांततेच्या संस्थापनेसाठीं स्पष्ट बोललें पाहिजे व जेव्हां सत्य व शांतता व लोकशाही स्वातंत्र्यें धोक्यांत येतील, त्यावेळीं 'नरोवा कुंजरोवा' हे नीतितत्त्व न मानतां स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. शांतता व सुबत्ता ही सर्वतोपरी इष्ट, तथापि या दोन्हीपेक्षां स्वातंत्र्य हें अधिक श्रेष्ठ मानलें पाहिजे. राष्ट्रीय क्षेत्रांत ज्याप्रमाणें स्वामित्वाला कमी लेखून स्वातंत्र्याला आपण अधिक महत्त्व देणें इष्ट मानतों, तीच वृत्ति आंतरराष्ट्रीय व्यवहारांत असली पाहिजे. कोठेंहि स्वातंत्र्याला कमी लेखून सत्ता व संपत्ति यांना अग्रपद दिलें तर स्वातंत्र्य कळाहीन होतें, नामशेष होतें आणि म्हणून जगामध्यें स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीं तें सुप्रतिष्ठित राहावें म्हणून अखंड जागृत राहिलें पाहिजे आणि ही जागृति म्हणजे सतत न्यायपूर्ण व्यवस्था आर्थिक क्षेत्रांत होत जाईल हें पाहणें. राष्ट्रीय क्षेत्रांत संपत्तीची मालकी ही खाजगी व्यक्तीकडे राहूं देणें अगर मोठ्या प्रमाणांत राहूं देणें हें जसें स्वातंत्र्याला धोक्याचें तसेंच आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत संपत्तीच्या निर्मितीबाबत कांहींना कांहीं मक्तेदारी मिळेल असें वातावरण ठेवणें हेंहि धोक्याचें. वर्गविहीन समाज हें नव्या समाजाचें लक्षण आतां स्पष्ट होत आहे. त्याचेंच आंतरराष्ट्रीय स्वरूप म्हणजे जगांतील सर्व राष्ट्रें समान भूमिकेवर आलीं पाहिजेत व त्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय जगाचें संघटन झालें पाहिजे. आंतरराष्ट्रीय जगांत आजहि गट करून हातीं आलेली सत्ता व आपापलीं प्रभावाचीं क्षेत्रें (स्पीअर ऑफ इन्फ्ल्यूअन्स) न सोडण्याचा हट्ट कायम आहे. जुनी साम्राज्यशाही, जुना वसाहतवाद वस्तुतः गेला नाहीं. कायापालट झाला असला तरी आत्मा तोच आहे. आणि म्हणून जगांतील प्रागतिक व स्वातंत्र्येच्छु जनता संघटित न झाली तर प्रगति व स्वातंत्र्य दोन्हीहि थंडावतील. संपत्तीची मालकी जोंपर्यंत दोन्ही क्षेत्रांत मर्यादित लोकांच्या हातांत आहे तोंपर्यंत स्वातंत्र्याचें संरक्षण होणार नाहीं व संपत्तीचें स्वामित्व थोड्या व्यक्तींच्या हातांत राहण्यासाठीं अधिकाधिक प्रयत्न झाल्यास स्वातंत्र्याला अधिकाधिक धोका निर्माण होईल हें स्पष्ट आहे. आज संपत्तीचें स्वामित्व कांहीं व्यक्तींच्या अगर विविक्षित वर्गाच्या हातांत नसावें म्हणून जेथें प्रयत्न झाले आहेत, तेथें एक नवी सभ्यता, नवी समाजरचना निर्माण होत आहे. गेल्या चाळीस वर्षांत यादवींतून जगांतील अन्यराष्ट्रांच्या विरोधी करामतीला तोंड देत देत, दुसऱ्या महायुद्धाच्या सर्वनाशी जबड्यांतून सोव्हिएट रशियानें एक नवी संस्कृति, एक नवी सभ्यता, निर्माण केली आहे हें मान्य केलें पाहिजे. त्यांतील स्वातंत्र्याच्या दृष्टीनें जें न्यून आहे तें लक्षांत घेऊन एक नवी संस्कृति व सभ्यता जगामध्यें निर्माण होणें आवश्यक आहे.

२० - ६० - १९६९

चिंताक्रांत करणारी बेकारी आज सोव्हिएट रशियांत नाहीं. शिक्षण संपलें म्हणजे बेकारीला सुरुवात होते ही परिस्थिति तेथें नाहीं. नियोजनपूर्ण अर्थव्यवस्थेनें माणसें व कामें, कार्य व कार्यकर्ते यांची जुळणी अशी केली जाते कीं, एकंदर उत्पादन वाढावें व सामान्य जनांसाठीं उपभोगाचा स्थर वाढतच जावा. ज्या आर्थिक आपत्ति अपरिहार्य मानल्या जात होत्या, तेजीमंदी म्हणजे एक स्वाभाविक गोष्ट समजली जात होती, मागणी व पुरवठा या सिद्धान्ताला परमेश्वरी आज्ञेचें स्वरूप दिलें जात होतें, तें सर्व आतां सोव्हिएट रशियानें बदलून टाकलें आहे. उपभोगासाठीं उत्पादन हा एकमेव हेतु. अन्यांना आर्थिक राज्यांतून निर्वासित केलें आहे. एवढेंच नव्हे, तर सामाजिक क्षेत्रांत एक नवीन आत्मविश्वासाचें आत्मप्रतिष्ठेचें वातावरण निर्माण झालें आहे. श्रम हें एक तप मानलें जात असून त्यापासून होणारी निर्मिति समाजाचें कल्याण व व्यक्तीचें सुख यासाठींच दिसून येत आहे. 'तेन त्यक्तेन भुंजीथः' ही स्वार्थत्यागाची भूमिका आज या नव्या संस्कृतींत समाजाची पार्श्वभूमि झाली आहे. याशीं तुलना करतां जगांतील अन्य राष्ट्रांतून जेथें भांडवलशाही उत्पादनव्यवस्था प्रभावी आहे तेथें दारिद्र्याचा प्रश्न, विषमतेचा प्रश्न, विफल जीवनाचा प्रश्न, बेकारीचा प्रश्न, आर्थिक अस्थिरतेचा प्रश्न, अद्यापि सुटलेला नाहीं. आणि जोंपर्यंत जुन्या जगांत जुने मंत्र म्हणणारी संस्कृति कायम आहे, तोंपर्यंत हे प्रश्न सुटणार नाहींत. अमेरिकेमध्यें संपत्तीची मालकी अधिक लोकांच्या हातांत आहे. बहुसंख्याक लोक विमेदार आहेत, मोठ्या प्रमाणांत राष्ट्रीय पुंजींत ज्यांनीं पैसे गुंतविले आहेत, अशांची संख्याहि खूप वाढली आहे आणि अमेरिकेंत भांडवलशाही असली तरी ती लोकशाही भांडवलशाही आहे व संपत्तिनिर्मितींत अनेकांना हिस्सा आहे (पॉप्युलर कॅपिटॅलिझम). तसा असला तरी उत्पादनपद्धतींत जोंपर्यंत त्यांत श्रम करणारे कामगार यांना (भाग घेणाऱ्यावरोवर) समान अधिकार नाहींत तोंपर्यंत भांडवलशाही उत्पादनाचे दोष शिल्लक राहतील. या दृष्टीनें विचार करतांना अमेरिकेमध्यें संपन्नता अधिक आलेली आहे, जीवनमानाचा स्थर अधिक वाढला आहे, तरी पण सामाजिक संतोष व निश्चितीबद्दलचा आत्मविश्वास अद्यापि तेथें नाहीं. म्हणून सोव्हिएट पद्धतींतील कांहीं मूल्यें स्वीकारलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें सोव्हिएट संस्कृतीनें स्वातंत्र्य-विषयक कांहीं मूल्यें स्वीकारलीं पाहिजेत. म्हणजे स्वातंत्र्य व संपन्नता यांचा योग्य समतोल राहील. जीवनामध्यें संरक्षण हवें आहे, पण त्याचबरोबर स्वातंत्र्यहि हवें आहे. स्वातंत्र्य का संरक्षण असा विकल्प नसावा. कारण येथपर्यंत जें प्रतिपादलें आहे तें हें कीं, संपन्नतेशिवाय, आर्थिक संरक्षणाशिवाय, समतेशिवाय, स्वातंत्र्य परिपूर्ण होत नाहीं. गुलामाला सर्व कांहीं जरी दिलें, सर्व कांहीं त्याच्या भौतिक गरजा भागविल्या, तरी स्वातंत्र्याशिवाय त्याचें जीवन त्याला व्यर्थ वाटतें. उलट स्वातंत्र्य आहे परंतु दुपारची भ्रांत आहे या स्थितींत स्वातंत्र्य वरापेक्षां शापच ठरतें. आज जगापुढें जो

सर्वांत मोठा प्रश्न आहे तो हा कीं, माणसें स्वतंत्र असलीं पाहिजे व तीं तशीं राहावींत म्हणून संपन्न असलीं पाहिजेत. राजकीय क्षेत्रांत ज्याप्रमाणें हुकूमशाही नसावी व गुंडशाही नसावी, त्याचप्रमाणें आर्थिक क्षेत्रांत भांडवलशाहीहि नसली पाहिजे. त्याचप्रमाणें सर्वतंत्रस्वातंत्र्यशाही पण नसली पाहिजे. म्हणजेच जगामध्यें राजकीय क्षेत्रांत व्यक्तिस्वातंत्र्य ग्वाहित करणारी लोकशाही हवी आहे व आर्थिक क्षेत्रांत अनियमितपणा न ठेवतां उत्पादनाचें, विनिमयाचें, उपभोगाचें नियमन, नियंत्रण झालें पाहिजे. कारण, तसें झालें तरच व्यक्तिमात्राला आपलें जीवन संतोषानें व स्वाभिमानानें व्यतीत करतां येईल.

विद्यमान जग हें अस्थिर स्थितींत आहे आणि विद्यमान जमान्यांतील माणसें मुकाट्यानें स्वस्थ बसणार नाहींत व जें घडून येत आहे तें कोणी तरी अदृश्य व्यक्ति घडवून :आणीत आहे हें मानण्यास तयार नाहीं. प्राप्ति देवाची देणगी अगर नशिबाचें बक्षिस, ही विचारसरणी आतां त्याज्य ठरलेली आहे. स्वकर्मानें मनुष्य आपलें जीवन घडवीत असतो. त्याचप्रमाणें ध्येयी व धूर्त, न्यायी व सोय पाहाणारीं जगांतील माणसें जगाचें राजकारण खेळत आहेत, त्याला आकार देत आहेत, हा प्रत्यक्ष अनुभव आहे. आणि म्हणून जें आहे त्यापासून जें इष्ट आहे तेथें जाण्याचा प्रयत्न जाणीवेनें केला पाहिजे. स्वातंत्र्य ही व्यक्तीची, गटाची अगर केवळ एका राष्ट्राची मिरास न राहतां सर्वांना तें प्राप्त झालें पाहिजे. सर्वांना प्राप्त व्हावयाचें म्हणजे कांहीं संयम, कांहीं नियमन, सर्वांनीं मानले पाहिजेत आणि म्हणून हें साध्य होण्यासाठीं सहिष्णुता व्यक्तीव्यक्तींत व राष्ट्राराष्ट्रांत हवी आहे व केवळ धोरण म्हणून नव्हे तर एक श्रेष्ठ तत्त्व म्हणून सहिष्णुतेचा गौरव झाला पाहिजे. सत्ता अगर संपत्ति थोड्यांच्या हातीं राहिल्यास थोडे सुखी होतील, हा अनुभव असल्यानें ती सत्ता व ती संपत्ति सर्वांच्या मालकीची व सर्वांच्या नियंत्रणाखालीं आली पाहिजे. आणि हें घडवून आणण्याचा मार्ग सहिष्णुता व युक्तिवाद हा आहे. मतभेद असले पाहिजेत. कारण नंबरी मालप्रमाणें समाजांत नंबरी विचार झाले तर प्रगति होणार नाहीं. प्रगतीसाठीं विचारस्वातंत्र्य असलें पाहिजे हें या ग्रंथांतील एक मुख्य प्रतिपादन आहे. आणि विचारस्वातंत्र्य परिणामकारक व्हावयाचें तर प्रसंगविशेषीं प्रचलित आदर्शाविरुद्ध अगर प्रचलित सत्तेविरुद्ध दंड थोपटून उभें राहणें यांत वावगें कांहीं नाहीं. उलट विशिष्टप्रसंगीं तें नैतिक कर्तव्य ठरतें. भीतीनें अगर प्रलोभनानें स्वातंत्र्याचें संरक्षण करण्याचें कर्तव्य सोडून देणें अनेक वेळां घडून येतें. पुष्कळ वेळां लोक कर्तव्य काय आहे हें समजून उदासीन राहातात. या दृष्टीनें विचार करतांना कायद्याविरुद्ध मर्यादित क्षेत्रांत कोणी वागल्यास तें अनैतिक मानलें जाऊं नये. नवीन म्हणून क्रान्तिकारक मानणें नवीन म्हणून समाजोच्छेदी मानणें हें बरोबर नाहीं. जें नवीन तें तपासलें पाहिजे, जुनें तेंहि तपासलें पाहिजे. परंपरेचा शिक्का आहे म्हणून तें सोळा आणे किंमतीचें आहे हें मानणें बरो-

बर नाहीं. नाण्यालाहि झीज असते, त्याप्रमाणें आदर्शहि झिजत जातात व निर्मूल्यहि होत जातात. आणि म्हणून स्वातंत्र्याच्या कल्पना, सामाजिक न्यायाच्या कल्पना कायमच्या असत नाहींत. त्यांत फेरफार होत असतो व हे फेरफार समयाला अनुसरून कालाची नाडीपरीक्षा करून केलें पाहिजेत. इतिहास असें सांगतो कीं, स्वातंत्र्याची लढाई ही संपतच नाहीं. क्षणाक्षणाला अधिकार त्यावर आक्रमण करीत असतो. विद्यमान कल्पनेंत ज्यांना त्यामुळे सुख व संपन्नता आली असते ते अपरिवर्तनवादी असतात, हट्टी असतात, आग्रही असतात. तथापि वाऱ्याला वाट पुसावी लागत नाहीं, मृत्यूला मुहूर्त लागत नाहीं, त्याप्रमाणें स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं व विकासासाठीं अमुक एक ध्येय अगर अमुक एक साधन हें असलेंच पाहिजे असेंहि नाहीं. प्रयत्न सतत होत असतात व जितक्या जाणीवेनें ते होतील तेवढें इष्ट असतें. स्वातंत्र्य रक्षावयाचें म्हणजे समाजांतील संकेत व संस्था या सजीव व कार्यप्रवण असल्याच पाहिजेत. आणि एकंदर वातावरण युक्तिवादाला अनुकूल असलें पाहिजे. जे युक्तिवाद मानत नाहींत ते हिंसेचा स्वीकार करतात व स्वतःच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करण्यास पुढेंमागें पाहात नाहींत. म्हणून आज जरी पूर्वीच्यापेक्षां स्वातंत्र्याचें क्षेत्र मोठें झालें असलें, अधिक लोकांना तें अनुभवाला येत असलें, तरी जगांतील सर्व लोकांना तें प्राप्त झालें पाहिजे व यथार्थपणें प्राप्त झालें पाहिजे. आणि या दृष्टीनें राज्य या कल्पनेचा व स्वातंत्र्य या कल्पनेचा विस्तारशः विचार या ग्रंथांत येथपर्यंत केला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 33710 दि: 15.6.4
क्रमांक 9705 ग्रं. कि. 20/11/4
मराठी ग्रं. संग्रहालय ठाणें
दा. क्र. 92349
REFBK-0012358

# शुद्धिपत्रक

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | १३ | सत्तेवर असला | सत्तेवर दाब असला |
| १७ | ५ | त्याची | त्यांची |
| २० | ३० | उत्सवाला | उत्साहाला |
| २३ | १८ | क्षत्रियकुलावंतास | क्षत्रियकुलावतंस |
| २८ | १ | ( हर्ट ) | ( हार्ट ) |
| ३९ | ३१ | आब | आग |
| ४९ | २७ | मूक | भूक |
| ६१ | १८ | ससाजाचा | समाजाचा |
| ६५ | ८ | त्याची | त्यांची |
| ६९ | ४ | कुठले | कुठलेहि |
| ७६ | ७ | भक्त्याच्या | वक्त्याच्या |
| ७६ | ९ | वक्तव्याच्या | वक्त्याचा |
| ८४ | १ | असतात | नसतात |
| ८६ | २ | निर्मळ | निर्मूळ |
| ९७ | ८ | वीण | वाण |
| ९७ | २४ | मागाणी | मालकी |
| ११२ | २८ | एकशर्त | एक शर्त |
| १२८ | २९ | आम | आद्य |
| १२९ | १ | धमाची | धर्मांची |
| १३१ | १३ | मार्ग | मध्यमार्ग |
| १३२ | ३२ | समाजाला | समाजांत |
| १३८ | ३० | मान्य | कांहीं मान्य |
| १४१ | १५ | मानलें | माजतें |
| १५२ | २ | कलाल | कुलाल |
| १५२ | १८ | छलयुभ्यैति | छलंमभ्यैति |
| १५२ | ३३ | सिक्रेट | सेक्रेड |
| १५५ | २६ | चाकस | चौकस |
| १५६ | ८ | इनिसिटी | इनीसीएंटीव्ह |
| १६१ | ५ | मिळू | मिळवूं |

| | | | |
|---|---|---|---|
| १७२ | १० | वध | वैध |
| १७५ | १८ | मानणें | मांडणें |
| १७५ | २२ | करण्यास | करतांना |
| १७८ | ४ | समाजाला | समाजदृष्ट्या |
| १७८ | २८ | जबाबरीच्या | जबाबदारीच्या |
| १७९ | १० | संधी न मिळाल्यानें | संधी मिळाल्यानें |
| १७९ | २१ | मन | मग |
| १८३ | २ | शाकाम् | शाकाय |
| १८३ | २ | लवणाम् | लवणाय |
| १८३ | ६ | सकटनेचें | संघटनेचें |
| १८५ | १९ | पडत | पटत |
| १८५ | २७ | प्रवाह | प्रभाव |
| १९३ | ३२ | गरवर्तनी | गरवर्तनी |
| १९७ | १७ | संतोष | असंतोष |
| २०४ | १४ | जीवनांत सुद्धां व्यक्ति चार मंडळींत घाबरत असली | जीवनांत सुद्धां घाबरट व्यक्ति चार मंडळींत असली |
| २०४ | १४ | म्हणजे तिथे | म्हणजे तिचे |
| २०४ | १५ | धैर्य सरतें | धैय धरते |
| २०४ | ३१ | राष्ट्रीय | अंतरराष्ट्रीय |
| २०५ | १ | राज्ये | राज्यें |
| २०७ | २६ | अटळ | अढळ |
| २०९ | १ | शास्त्र | शास्ता |
| २१६ | १६ | असावे | नसावे |
| २१७ | २ | लागली | लागला |
| २२१ | ७ | स्वभाव | प्रभाव |
| २४१ | २२ | द्वैत | अद्वैत |
| २४५ | ५ | प्र वावी | प्रभावी |
| २४६ | २५ | संपीसमता | संधीसमता |
| २४९ | २२ | तत्वेज्ञ | तत्वज्ञ, |
| २५० | २५ | दानस् | दानः |
| २५० | २९ | असतो | असते |
| २५५ | ३२ | वाढ | बाधा |
| २६१ | ३० | सामानिक | सामाजिक, |

कायदा, स्वातंत्र्य, समता — ज्या गोष्टी मनुष्याचें जीवन
सुखी व संपूर्ण करतात, त्या जास्तींत जास्त प्रमाणांत
व जास्तींत जास्त लोकांना उपलब्ध व्हावयाच्या
तर लोकशाही राज्यव्यवस्थेंतच आणि
लोकशाही ही कायद्याचे द्वारा कार्यान्वित होत
असते व त्या दृष्टीनें कायद्याचें महत्त्व काय
व त्याच्या आज्ञापालनाची आवश्यकता व
मर्यादा यांचाहि विचार केला पाहिजे....

स्वातंत्र्य हें गेल्या दीडशें वर्षांत वाढलें आहे,
त्याचा बराच प्रचार झाला आहे व आज जरी
अनेक प्रदेशांतून व राज्यांतून तें सुस्थापित
दिसत असलें तरी ज्याप्रमाणें वेदरत ब्राह्मणानें
दररोज सूर्याला अर्घ्य दिलें पाहिजे
त्याचप्रमाणें कल्याणेच्छु म्हणजे स्वातंत्र्येच्छु
प्रत्येक नागरिकानें दररोज जागृतीची
व अधिकार–संरक्षणाची संध्या म्हटली पाहिजे.

स्वातंत्र्य हें अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीनें व्यक्ति-
मात्राला आर्थिक क्षेत्रांत संपन्नता, सामाजिक क्षेत्रांत
न्याय व समता, आणि जीवनांत पूर्णतेचा
आनंद आला पाहिजे हाच सिद्धान्त विविध
दृष्टिकोणांतून या ग्रंथांत मांडण्याचा यथाशक्ति
प्रयत्न केला आहे.

—न. वि. गाडगीळ
प्रस्तावना